वनिता-सारस्वत

★

डॉ. सरोजिनी बाबर

व नि ता
सा र स्व त

लेखिका

डॉ. सरोजिनी बाबर
एम्. ए., पीएच्. डी.

मूल्य दहा रुपये

समाज शिक्षण प्रकाशन : १४

प्रकाशिका
कु. शरदिनी बाबर, एम्. ए.
समाज शिक्षण प्रकाशन
१४८६ सदाशिव : पुणें २

प्रथमावृत्ति : दि. ३ एप्रिल १९६१

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.)
आनन्द मुद्रणालय
१५२३ सदाशिव : पुणें २

वडिलांचे सेवेसी—

अनुक्रम

* * *

माझें लेखन--

मी बी. ए. झालें त्यावेळची म्हणजे इ. स. १९४५ मधील ही गोष्ट आहे. मुंबई विद्यापीठांत त्यावेळीं मराठी विषयांत मी पहिल्या क्रमांकानें पास झालें होतें. त्यानिमित्तानें पुण्याच्या स. प. महाविद्यालयांत माझ्यासाठीं सत्कार-समारंभ आरंभला होता. अध्यक्षस्थानीं साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर होते. त्यांनीं मराठींत पहिल्या येणाऱ्या मला ' यशोदा चिंतामणी ' ह्या आपल्या बक्षिसाचें मानपत्र देतांना त्यावेळीं बजावलें होतें, " तूं लेखिका हो. मला तें फार आवडेल. तुझ्या लेखणींत तें सामर्थ्य आहे. " आणि त्याच वेळीं उत्तरादाखल केलेल्या भाषणांत मींही त्यांची ही आज्ञा मानली होती. केवळ ते म्हणाले म्हणून नव्हें तर मला मुळांतच लेखनाची विशेष आवड होती म्हणूनहि. लहानपणापासूनच आपण लेखक व्हावें हें ध्येय बाळगून मी माझा अभ्यास करीत असें.

त्यामुळें माझ्या हातून एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास झाला पाहिजे, याची माझ्या वडिलांनीं नेहमींच खबरदारी घेतली व वेळोवेळीं गु. म. म. दत्तो वामन पोतदार व गु. कै. श्री. म. माटे यांनीं मार्गदर्शनहि केलें.

इतर लेखकमंडळी ज्या प्रकारचें लेखन करतात त्यापेक्षां आपलें लेखन निराळें व्हावें ही माझी फार दिवसांची इच्छा. त्याकारणानें ठराविक सांच्याच्या

प्रीतिकथा लिहायच्या भानगडींत मी कधींच पडलें नाहीं. आणि माझ्या नजरेसमोर लेखनाचें जग म्हणून मी नेहमींच बहुजनसमाजांतील व खेड्यांतील वातावरण प्रामुख्यानें राहील हें पाहिलें. तसेंच जीवनांतील सर्व प्रकारचें प्रेम रंगविण्याचा माझ्या कथालेखनांतून मी प्रयत्न केला. उपेक्षितांच्या अंतरंगाला हात घालण्याचीहि कोशीस केली.

त्यामुळें लेखिका म्हणून मला म्हणावें तसें अद्यापहि आजच्या जगांत नांव मिळवितां आलेलें नाहीं. मागणी तसा पुरवठा मी करूं शकलें नाहीं. त्याचप्रमाणें वाचकांना आवडेल तेंच लिहायचा सोस मी केव्हांच मनाशीं बाळगला नाहीं. अर्थात् त्याचा बरा वाईट परिणाम मला नेहमींच भोगावा लागलेला असला, तरी मी त्याची फारशी खंत कधींहि केलेली नाहीं. माझ्या मनांत येईल तें मी लिहीत राहिलें व त्याचें प्रकाशनहि होत गेलें.

कथा, कादंबरी, काव्य, निबंध व प्रबंध या साहित्याच्या माध्यमांतून मी आजवर पुष्कळसें लेखन केलें आहे. याखेरीज बालवाङ्मय व नभोवाणीचें लेखन या प्रांतांतहि भरपूर लिहिलें आहे. परंतु लोकगीतांच्या माझ्या अभ्यासानें त्यासंबंधींच्या लेखनानें मराठी रसिकांना माझी खरी ओळख करून दिली याचा मला विशेष अभिमान वाटतो. नभोवाणीवर वेळोवेळीं मीं सादर केलेलीं मूळच्या गावरान चालींतील सुंदर लोकगीतें सर्व थरांतील मंडळींना विशेष आवडलीं. त्याचप्रमाणें लोकगीतांवर आधारित अशा लिहिलेल्या माझ्या कथाहि विशेष लोकप्रिय झाल्या आणि "मराठींतील स्त्रीधन" ह्या माझ्या लोकगीतांवरील प्रबंधाची पहिली आवृत्ति देखील अल्पावधींत संपली. त्यामुळें माझ्या पीएच्. डी. च्या प्रबंधाचाच हा विषय असा सर्वत्र गैरसमज पसरला गेला आहे ! !

एकपरीनें ही गोष्ट तशी वाईट नाहीं. कारण पीएच्. डी.करितां अभ्यास करण्यासाठीं म्हणून 'मराठींतील लोकसाहित्य' हाच विषय मला पाहिजे होता. परंतु त्यावेळीं विद्यापीठानें (इ. स. १९४८ मध्यें) या विषयाला मान्यता दिली नाहीं आणि म्हणून "स्त्रियांनीं मराठींत लिहिलेलें वाङ्मय" (The Contribution of women writers to Marathi Literature) हा विषय माझ्या पीएच्. डी.च्या पदवीसाठीं अभ्यासाला म्हणून मीं मान्य केला. आणखी इ. १९५१ च्या मार्चमध्यें मला या विषयावर संशोधन केल्याबद्दल पीएच्. डी. ची पदवीहि मुंबई विद्यापीठानें बहाल केली.

पण "वनिता सारस्वत" ह्या नांवानें माझ्या पीएच्. डी.च्या ह्या प्रबंधाचें आतां प्रकाशन होतें आहे. म्हणजे जवळ जवळ दहा वर्षांनीं माझा हा प्रबंध पुस्तकरूपानें वाचकांच्या हातीं येतो आहे; तसेंच त्यामुळें लोकसाहित्य हा माझ्या संशोधनाचा स्वतंत्र विषय आहे व पीएच्. डी च्या पदवीशीं त्याचा संबंध नाहीं हेंहि खात्रीलायकरीत्या आतां सर्वांना कळून चुकतें आहे.

वास्तविक ह्या प्रबंधाचें प्रकाशन या पूर्वीच होणें अगत्याचें होतें. परंतु एक तर मला स्वतःलाच त्याचें प्रकाशन करणें जमलें नाहीं आणि माझी आपली मनापासून ही इच्छा कीं, पीएच्. डी. साठीं नाकारलेला विषय आपण या प्रबंधाचे प्रकाशनापूर्वी शक्य तर सर्वमान्य करतां आला तर पहावा. योगायोगानें माझी ही अपेक्षा पुरी झाली आणि दरम्यानच्या काळांत माझ्या अनेक सन्मित्रांनीं केलेल्या तगाद्याचा परिणाम म्हणून ' वनिता सारस्वत 'चेंहि प्रकाशन आतां होतें आहे.

मराठी साहित्याच्या प्रांतामध्यें स्त्रीच्या लेखणीनें केव्हां केव्हां व कसकसा प्रवेश केला व हातभार लावला हें ठरवितांना कालमर्यादा कोणती ठरवावी हा फार मोठा प्रश्न माझ्यापुढें होता. परंतु मराठींतील एक प्रसिद्ध लेखक व आमचे स्नेही प्रा. न. र. फाटक यांनीं या विषयाची चर्चा करतांना " From महदंबा To सरोजिनी " असें उत्तर दिलें व चटकन् या विषयाचें कालमर्यादेचें क्षेत्र निश्चित होऊन गेलें. माझ्या अभ्यासासाठीं विद्यापीठानें मार्गदर्शक म्हणून मान्यता दिलेले गु. डॉ. के. ना. वाटवे यांनींहि या गोष्टीस संमति दिली व त्याप्रमाणें माझा अभ्यासहि सुरू झाला.

या माझ्या अभ्यासाच्या प्रारंभाच्या काळांत गु. डॉ. वाटवे यांच्याखेरीज श्री. वि. स. खांडेकर, प्रा. न. र. फाटक, श्री. के. नारायण काळे, प्रा. डॉ. वि. भि. कोलते, गु. प्रा. रा. श्री. जोग, गु. म. म. दत्तो वामन पोतदार, कै. साने गुरुजी, कै. रियासतकार सरदेसाई इत्यादींची मला वेळोवेळीं विशेष मदत झाली. त्यांचे मार्गदर्शन मला फारच उपयोगी पडलें. याखेरीज पुणें शहरांतील केसरी ग्रंथालय, महाराष्ट्र ग्रंथालय, स. प. महाविद्यालयाचें ग्रंथालय, फर्ग्युसन महाविद्यालयाचें ग्रंथालय, पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेज फॉर मेनचें ग्रंथालय, व गु. दत्तो वामन पोतदारांचें खाजगी ग्रंथालय यांचाहि मला बराच उपयोग झाला. शिवाय श्री. ग. ल. ठोकळ यांच्या लेखन वाचन भांडाराची देखील मला अमोल मदत झाली. त्याचबरोबर अनेकदां माझ्या परमपूज्य वडिलांचेंहि मला विशेष मार्गदर्शन झालें आहे. हें मी मुद्दाम सांगूं इच्छितें.

माझ्या या अभ्यासाला आणखी चांगली दिशा लाभावी म्हणून मी इ. स. १९४९ सालीं पुणें येथें भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे वेळीं एक खास कार्यक्रम घडवून आणला होता. मराठींतील प्रसिद्ध लेखिकांना व कवयित्रींना बोलावून " मी व माझें लेखन " या विषयावर त्यांचे विचार त्यांनीं मांडावेत म्हणून डॉ. चंद्रकला हाटे यांच्या अध्यक्षतेखालीं एक स्वतंत्र संमेलन भरविलें होतें. याखेरीज अनेक लेखिकांशीं मीं समक्ष व पत्रांतूनहि या विषयावर चर्चा केली होती. त्यावेळीं सर्वांनीं मला विशेष आपुलकीनें सहकार्य दिलें होतें हें मी येथें मुद्दाम नमूद करूं इच्छितें. कित्येकींनीं तर आपलें प्रकाशित व अप्रकाशितहि

साहित्य मला अभ्यासासाठीं म्हणून ठराविक काळ कां होईना मजकडे धाडलें होतें, हें तर मी माझें भाग्यच मानतें.

माझा हा अभ्यास विद्यापीठानें घातलेल्या दोन वर्षांच्या काळांत मी पुरा करूं शकलें याचें आतां मला समाधान वाटतें. कारण या पुस्तकाचा प्रकाशनाचा विचार करायला मला त्याहिपेक्षां कितीतरी वेळ खर्ची टाकावा लागला आहे !!

स्त्रियांनीं लिहिलेल्या वाङ्मयासंबंधीं मला जें कांहीं सांगावयाचें आहे त्याचा मी या ग्रंथांत सर्वत्र उल्लेख केलेला आहे. येथें फक्त मी माझ्या या लेखनाची पार्श्वभूमि दिलेली आहे इतकेंच.

' वनिता सारस्वता ' चें प्रकाशन होत असतांना आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. वास्तविक माझ्या या पुस्तकासाठीं मराठींतील एक नामवंत लेखक व टीकाकार श्री. वि. स. खांडेकर यांनीं " मराठींतील स्त्रीधन " हें नांव सुचविलें होतें. परंतु मी त्या नांवाचा उपयोग माझ्या लोकगीतांच्या प्रबंधासाठीं केला आणि हें दुसरें नांव कै. साने गुरुजींनीं बोलून दाखविलें होतें तें या ग्रंथासाठीं आतां वापरलें आहे. याखेरीज सांगण्यासारखी या संदर्भातील दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा ग्रंथ प्रकाशित करतेवेळीं मी मूळच्या प्रबंधांत बराचसा बदल केलेला आहे आणि गेल्या दहा वर्षांतील वाङ्मयाचाहि –स्त्रियांच्या लेखनाचा–त्यांत समावेश करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हेतु एवढाच कीं, पदवीपरीक्षेसाठीं सादर केलेल्या ग्रंथापेक्षां ह्या ग्रंथाचें स्वरूप अद्यावत् व बरेचसें आटोपशीर असें व्हावें.

माझ्या या लेखनाचे कामीं ज्या ज्या लेखक लेखिकांचें व ग्रंथालयांचें मला सहाय्य झालें त्या सर्वांची मी ऋणी आहें. त्याचप्रमाणें या ग्रंथाची छपाई विशेष आपुलकीनें व वेळेवर करून दिल्याबद्दल आनंद छापखान्याचे श्री. दादा जोशी यांचीहि मी आभारी आहें.

पुणें
३ एप्रिल, १९६१

—सरोजिनी बाबर

डॉ. सरोजिनी बाबर

यांचें प्रकाशित वाङ्मय

प्रबंध

वनिता सारस्वत

मराठींतील स्त्रीधन

कादंबरी

कमळाचं जाळं

अजिता

हिरवा चुडा

तूं भेटायला नको होतास—

आठवतंय तेवढं सांगतें

आणि इथं गोष्ट संपली

कथासंग्रह

नव्याची पुनव

चिंचेची पत्रावळी

डोंगरची मैना

झालं गेलं सांगतें

देवदर्शन

रुखवत

सुंबरान मांडीलं—

निबंध

साहित्य दर्शन भाग १

मंगलाक्षता

मराठी लोककथा

निबंधलेखन

कॉंग्रेस स्त्री-संघटना

शब्दचित्रें

वडीलधारी माणसें

बालवाङ्मय

मानवी प्रवास

भारतीय स्त्रीरत्नें, भाग १ ते ४

बाल-नाटिका, भाग १ ते ४

काचेची पेन्सिल

खेळ आणि गाणीं

निळे डोळे

समाजशिक्षण

जात्यावरील गोड गाणीं

मीहि माणूसच आहें

माझं नांव गिरजा

उखाण्यांचें वैभव

सांग सांगतें

विठ्ठला, तूं असा आहेस का रे ?

खुतनीचा झोळणा

आईचीं पत्रें

माझ्या आवडीची जनाई

पूजा

दोन पाव्हण्या

आठवणींतल्या गोष्टी

भानुमति

लोकगीतांतील आनंद

घराची शोभा

आपलें आरोग्य

महाराष्ट्राचे शिल्पकार

चोळी बांगडी

लोककला

मायबोलीचा नवस

वगैरे वगैरे

भगिनीशिक्षण

आमचीं गाणीं

शुभमंगल

.१.

स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा वाङ्मयीन आविष्कार

भारतीय संस्कृतीच्या उच्चतम आदर्शांचा विचार करीत असतांना आजवर अनेक विद्वान् लोकांनीं वैदिक कालाचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे; आणि या गौरवपूर्ण उल्लेखाचें प्रमुख कारण म्हणून अनेक प्रकारच्या ग्रंथांमधून त्या काला-मध्यें स्त्रियांना व पुरुषांना मिळालेल्या समान सामाजिक दर्जाचा आवर्जून उल्लेख आलेला आहे. ह्या कालांतील सामाजिक जीवन निरोगी व प्रसन्न होतें याची साक्ष वैदिक वाङ्मयांत सांपडते; आणि त्यावेळच्या सामाजिक जीवनाचा बौद्धिक विकास करण्यांत पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांनींहि भाग घेतलेला आहे असें आढळून येतें.

त्यावेळच्या स्त्रियांचें शिक्षण बालपणापासूनच मुलांच्या बरोबरीनें होत असे. तसेंच यज्ञोपवित धारण करून वेदाध्ययन करण्याची व अग्निहोत्र चालविण्याची मुभाहि त्यावेळच्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें असावयाची. त्यामुळें स्त्रियांच्या मध्यें घोषा, सूर्या, लोपामुद्रा, विश्ववारा इत्यादि सूक्तकार ब्रह्मवादिनी सांपडतात. ऋग्वेदामध्यें सव्वीस सूक्तांच्या प्रणेत्या स्त्रिया असून त्यांचें लेखनहि अव्वल दर्जाचें झालेलें दिसून येतें. त्यावेळच्या समाजानें या स्त्रियांच्या सूक्तांचा दर्जा वरच्या प्रतीचा असल्याचें गौरवानें नमूद केलेलें आहे, असें वैदिक वाङ्मयावरून लक्षांत येतें.

तथापि या संदर्भात एक गोष्ट जरूर लक्षांत घ्यावयास पाहिजे, ती अशी कीं, या कालांतहि स्त्रीजीवन विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊन वाटेल त्या प्रकारचें स्वातंत्र्य उपभोगूं शकत नव्हतें !

" अधः पश्यस्व मोपरि संतरां पादकौ हर ।
मा ते कशप्लकौ दृशन् स्त्रीहि ब्रह्मा बभूविथ ॥ " (८-३३-१९)

ऋग्वेदाच्या आठव्या मंडलामधील तेहेतिसाव्या सूक्तांतील एकोणिसाव्या क्रमांकाच्या या ऋचेमध्यें स्त्रियांच्या आचारासंबंधीं प्लायोगीस इंद्रानें केलेली सूचना आलेली आहे. देवतेच्या शापामुळें प्लायोगी स्त्री झाला, त्यावेळीं ही सूचना इंद्रानें केली आहे. या सूचनेंत इंद्र म्हणतो कीं, " हे प्लायोगे, खालीं पहा. वर पाहूं नकोस. पावलें हळूच टाक. पायाचे घोटे दिसूं देऊं नकोस. कारण, तूं पुरुष नसून आतां स्त्री झाला आहेस. "

याच सूक्तामध्यें इंद्रानें स्त्रीचें मन ताब्यांत ठेवण्यास कठीण असतें आणि तिची बुद्धि हलकी असते, असा या सूचनेपूर्वीच निर्वाळा देऊन टाकला आहे ! * म्हणजे पुरुषांच्या बरोबरीनें समाजामध्यें वावरणाऱ्या स्त्री-जीवनालाहि विशिष्ट मर्यादा होत्या, असें यावरून अनुमान काढतां येईल.

परंतु या मर्यादा स्वीकारूनहि त्यावेळच्या स्त्रियांनीं वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यक्षेत्रामध्यें जी अपूर्व कामगिरी केली आहे, तिचा जरूर विचार केला पाहिजे. तसेंच त्या त्या विशिष्ट कार्यक्षेत्रामध्यें स्त्रियांनीं अधिकारी बनून केलेल्या कार्याचाहि याच संदर्भात अवश्य विचार झाला पाहिजे.

वेदकालीन समाजाप्रमाणेंच उपनिषत्कालीन स्त्रियांचें जीवनहि वरच्या दर्जाचें होतें. ऋग्वेदकालीन स्त्रीजीवन त्यांच्या पाठीशीं होतें. त्याच्या जोडीला तत्त्वज्ञानाची भर पडत गेली. यावेळीं ब्रह्मविद्या समाजाच्या सर्व थरांत पोंचलेली होती. त्यामुळें सम्राट जनकाच्या ब्रह्मवादी सभेमध्यें याज्ञवल्क्यास अनेक तात्त्विक व गहन प्रश्न विचारून जेरीस आणणारी गार्गी वैदिक काळांतील स्त्रियांच्या सांस्कृतिक पातळीची उत्कृष्ट निदर्शक म्हणून लक्षांत घ्यावयास हरकत नाहीं. याज्ञवल्क्याची पत्नी मैत्रेयी भौतिक वैभवाची वांटणी बाजूस झुगारून देऊन अमरत्वास पोंचविणाऱ्या तत्त्वचर्चेंत गुंतलेली बृहदारण्यकोपनिषदांत वर्णिलेली आहे. त्यावरून असा निष्कर्ष काढतां येईल कीं, वैदिक कालांतील भारतीयांचें कौटुंबिक व सामाजिक जीवन बौद्धिक संस्कृतीच्या निकोप वाढीस कारणीभूत झालें होतें. स्त्री व पुरुष यांच्यांत संपूर्ण मानसिक फारकत दाखविणारी सामाजिक विकृति त्यावेळीं अस्तित्वांत आलेली नव्हती.

वादविवादामध्यें पुरुषांनाहि माघार घ्यावयास लावण्याची बौद्धिक शक्ति कमावलेल्या स्त्रिया उपनिषत्कालांत जन्माला आल्या होत्या, तरी देखील त्यांच्या स्त्रीजीवनाला म्हणून कांहीं वेगळ्या मर्यादा समाजानें जरूर घालून दिल्या होत्या ! ज्या स्त्रीचा पति देशांतरीं गेला असेल त्या स्त्रीनें क्रीडा, न्हाणें, माखणें, उत्सवादिक पहाणें, हास्य करणें आणि दुसऱ्याच्या घरीं जाणें ह्या गोष्टी करूं नयेत असें जाणते लोक सुद्धां बोलून दाखवीत असत ! ‡ तरी देखील त्या वेळच्या स्त्रियांनीं ज्ञान व धर्म यांच्या साहाय्यानें स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेण्याची संधि भरपूर प्रमाणांत साध्य करून घेतलेली आहे हें विशेष होय. त्याचबरोबर या कालांतील स्त्रियांनीं सामाजिक जीवनाच्या सर्वांगीण विकासाला मोठ्या अभिमानानें हातभार लावला आहे, ही गोष्टहि लक्षांत घेणें अत्यावश्यक आहे.

---

* इंद्रश्चिद्ध तदब्रवीत्स्त्रिया अशास्यं मनः । उतो अह क्रतुं रघुम् ॥८-३३-१७.

‡ क्रीडा शरीरं संस्कारं समाजोत्सवदर्शनम् ।
हास्यं परगृहे यानं त्यजेत् प्रोषितभर्तृका ॥—याज्ञवल्क्यः

वेदकालीन स्त्रियांचा व पुरुषांचा दर्जा कशा प्रकारचा होता याची कल्पना उपनिषदापूर्वी अस्तित्वांत आलेल्या " शतपथ ब्राह्मणा " मध्यें जी पहावयास मिळते ती अशी आहे—

" अर्धो ह वा एष आत्मनो यज्जाया ।
यावन्नविन्दते जायां तावद् अर्धो भवेत् पुमान् ॥
नार्धं प्रजायते सर्वं प्रजायेयेति च श्रुतिः ॥ "

(५, १, ६, १०)

म्हणजे स्त्री व पुरुष मिळून एकाच संपूर्ण मानव्याचीं दोन अंगें आहेत व त्यांपैकीं एक दुसऱ्यावांचून पूर्ण होऊं शकत नाहीं; म्हणजेच तीं परस्परांना पूरक आहेत अशी ही कल्पना आहे. यावरून उपनिषदकालीन स्त्रियांचा दर्जा कोणत्या पार्श्वभूमीवर उभारला गेला होता याची कल्पना येते.

' मनुस्मृती ' मध्यें त्यावेळच्या स्त्रियांच्या संबंधीं मोठे गौरवपूर्ण उद्गार आलेले आहेतः—

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते । रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते । सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ "

(३, ५६)

म्हणजे ज्या ठिकाणीं स्त्रियांना मानानें वागविलें जातें त्या ठिकाणीं प्रत्यक्ष देवताहि खूष होतात. आणि जेथें त्यांना मानानें वागविलें जात नाहीं तेथें सर्व कामें निष्फळ होऊन जातात !

आजच्या काळांतहि या गौरवाचा उल्लेख जाणते लोक आनंदानें व अभिमानानें करीत असल्याचें दिसून येतें. या गौरवाबरोबरच मनूनें स्त्रीजीवनांतील एका कटुसत्याचाहि उल्लेख ' मनुस्मृती ' मध्यें केलेला आहे. त्याचें म्हणणें असें कीं—

" पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥ "

म्हणजे स्त्री ही बालपणीं वडिलांचेकडून, तरुणपणीं नवऱ्याकडून व उतार वयांत नवरा हयात नसल्यास मुलाकडून रक्षण केली जाते; आणि त्यामुळें स्त्री ही स्वतंत्र राहाण्याला योग्य असत नाहीं. निसर्गामुळें स्त्रीच्या जीवनांत एक प्रकारची अशी अवस्था निर्माण झालेली आहे कीं, तिला कोणा ना कोणाच्या तरी आधारावर जगावें लागतें. संरक्षणाची तिला आवश्यकता आहे. आणि तें मनूनें म्हटल्याप्रमाणें घरचीं, प्रेमाचीं माणसें आपुलकीनें देतातहि. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं, स्त्रीला स्वातंत्र्य हें नसतेंच. ती जरूर स्वतंत्रपणें जगूं शकते. एरव्हीं त्यानेंच तिचा गौरव केला नसता ! परंतु त्याच्या या म्हणण्याचा नेमका काय अर्थ घ्यावयाचा

हा वादाचा मुद्दा असल्यानें, त्याच्या ह्या म्हणण्यामुळें स्त्रीजीवनाला एक प्रकारचा थोडा कमीपणाचा दर्जा प्राप्त झाला आहे, असा सर्वसामान्य समज रूढ झालेला आहे !

तथापि आपला प्राचीन धर्म हा यज्ञप्रधान असल्यामुळें यजमानाबरोबर त्याच्या पत्नीलाहि फार मोठा मान मिळत असे, ही गोष्टहि तितकीच खरी आहे. पाणिनीनें पत्नी शब्दाची व्याख्याच मुळीं " पत्युर्नो यज्ञसंयोगे " (IV, I, 33) अशी केलेली आहे. स्त्री ही गृहिणी, भार्या किंवा जाया या नात्यानें कुटुंबांतील एक जबाबदार व मोठ्या योग्यतेची व्यक्ति आहे, ही जाणीव वरील ग्रंथांतून पदोपदीं व्यक्त झालेली आहे.

" विष्णु पुराणा " मध्यें स्त्री आणि पुरुष यांच्यामधील परस्परांना पूरक होणारी अशी मोठी सुंदर कल्पना सांगितलेली आहे—

" पुरुष विष्णु है, स्त्री लक्ष्मी. पुरुष विचार है, स्त्री भाषा. पुरुष धर्म है, स्त्री बुद्धि. पुरुष तर्क है, स्त्री रचना. पुरुष धैर्य है, स्त्री शान्ती. पुरुष हट है, स्त्री इच्छा. पुरुष दया है, स्त्री दान. पुरुष मंत्र है, स्त्री उच्चारण. पुरुष अग्नि है, स्त्री इन्धन. पुरुष सूर्य है, स्त्री आभा. पुरुष विस्तार है, स्त्री सीमा. पुरुष समुद्र है, स्त्री किनारा. पुरुष धनी है, स्त्री धन. पुरुष युद्ध है, स्त्री शक्ति. पुरुष दीपक है, स्त्री प्रकाश. पुरुष दिन है, स्त्री रात्रि. पुरुष वृक्ष है, स्त्री फल. पुरुष संगीत है, स्त्री स्वर. पुरुष न्याय है, स्त्री सत्य. पुरुष सागर है, स्त्री नदी. पुरुष स्तम्भ है, स्त्री पताका. पुरुष शक्ति है, स्त्री सौन्दर्य. पुरुष आत्मा है, स्त्री शरीर." *

* * *

अभिजात संस्कृताच्या काळांत, विशेषतः ललित वाङ्मयामध्यें स्त्रीकडे पहाण्याची पुरुषाची दृष्टि ही प्रायः शृंगारप्रधान असल्याचें दिसून येतें. त्यावेळच्या लेखकांनीं स्त्रीची केलेली स्तुति ही बहुधा तिच्या शरीर सौष्ठवावरच आधारलेली होती. त्यामुळें स्वाभाविकच अतिरंजितपणाचा दोष त्या स्तुतीमध्यें निर्माण झालेला आहे.

याच काळामध्यें याच्या अगदीं उलट अशी विचारांची एक जबरदस्त लाट कांहीं लोकांच्या विचारप्रणालीमध्यें उसळलेली दिसून येते. तापसी, ब्रह्मचिंतक वगैरे विरागी लोकांनीं स्त्रियांच्याबद्दल अतिशय अनुदाराचे उद्गार काढलेले आहेत. त्यांच्या मतें स्त्री ही स्वैरिणी, निसर्गतः चतुर, अधिक बोलणारी, आंतून क्रूर परंतु बाह्यतः सौम्य दिसणारी अशी आहे !† आणि त्यावेळच्या समाजानेंहि

* ' दुखी भारत ' से

† अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभिता ।
अशौचं निर्दयत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥ (सुभाषितम्)

अशाच प्रकारचा समज करून घेतल्यामुळें स्त्रियांची परिस्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. एवढेंच नव्हें तर ' केवळ दर्शनानें चित्त वेधून घेणारी, स्पर्शानें धनाचा नाश करणारी, संगमानें सत्त्व हरण करणारी नारी ही प्रत्यक्ष राक्षसीच आहे '* अशा कल्पनाहि त्यावेळीं समाजांत रूढ झालेल्या होत्या !

बुद्धकाळामध्यें मात्र स्त्रियांना शिक्षणाच्या व धर्मप्रसाराच्या दृष्टीनें बरीच मुभा मिळत गेली. स्त्री शिक्षणाकडे त्यावेळच्या समाजानें उदार बुद्धीनें लक्ष दिलें. या काळांतील स्त्रियांनीं बरेच ग्रंथलेखन केल्याचाहि उल्लेख आढळतो.

महानुभाव पंथांतील लोकांनीं स्त्रियांच्याबद्दलची पूर्वापार रूढ असलेली कल्पना जवळ बाळगलेली असली, तरी देखील स्त्री ही मोक्षाला पात्र असल्याची आपली कल्पना मधून मधून आपल्या लेखनांत मांडलेली दिसून येते.

संतवाङ्मयावर प्रायः वैराग्याची छाप पडलेली असल्यामुळें स्त्रीविषयक दृष्टि जेवढी साफ असावयास हवी तेवढी असलेली त्यामध्यें दिसत नाहीं. गृहिणी किंवा धर्मपत्नी या नात्यानें स्त्रीबद्दलचीं कांहीं गौरवपर वचनें संत–वाङ्मयांत आढळून येत असलीं, तरीहि पुरुषाला विषयकर्दमांत गुंतवून ठेवणारी एक अडचण याच दृष्टीनें स्त्रीचा वारंवार उल्लेख आलेला दिसून येतो.

इंग्रजी आमदानीनंतर मात्र पाश्चात्यांच्या सुधारलेल्या कल्पनांच्यामुळें समाजांतील कर्त्या लोकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण बराच निवळलेला दिसतो. पाश्चात्य देशामध्यें मिल् अगर इब्सेन सारख्या समाज सुधारकांनीं स्त्री कैवाराची चालविलेली मोहीम, व्हिक्टोरियन युगाचा परिणाम आणि त्यांच्या समाजामध्यें स्त्रीला प्राप्त झालेला समानदर्जा लक्षांत घेऊनच आमच्या समाजसुधारकांनीं स्त्रीचा दर्जा उंचावून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, आमच्या-कडील लेखकांनीं स्त्रियांच्या बद्दलची अनुदारवृत्ति सोडून दिली. लोकहितवादी, महात्मा फुले, विष्णुशास्त्री पंडित, आगरकर इत्यादींच्या प्रयत्नानें स्त्रीच्या न्याय्य हक्काला चांगलेंच सहाय्य मिळत गेलें आणि याच विचारसरणीचा पडसाद केशवसुत, हरीभाऊ आपटे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या लेखनांत उमटत गेला. केशवसुतांनीं हरीभाऊंच्या स्त्री कैवाराबद्दल पुढील धन्योद्गार काढले— " भूपृष्ठस्थित आद्य दैवत जणू त्या वाटली भामिनी...." आणि हरीभाऊ आपट्यांनीं तर आपल्या कादंबऱ्यांच्यामधून अतिशय सहानुभूतीनें स्त्रीजीवनाचा आविष्कार केला आहे.

* * *

* दर्शनाद् ग्रसते चित्तं स्पर्शनाद् ग्रसते धनम् ।
संगमाद् ग्रसते सत्त्वं नारी प्रत्यक्ष राक्षसी ॥ (सुभाषितम्)

अगदीं पुरातन कालापासून तों आतां पावेतों स्त्री जीवनामध्यें कशा प्रकारचीं स्थित्यंतरें घडत गेलीं आणि त्यामुळें स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाची घडणहि कशी होत गेली, याचा हा अगदीं त्रोटक असा इतिहास पाहतां, एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते ती अशी कीं, स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा वाङ्मयीन आविष्कार अजमावण्यापूर्वीं स्त्री-पुरुषांची नैसर्गिक स्वभावभिन्नताहि जरूर विचारांत घेतली पाहिजे. एरव्हीं त्या आविष्काराचें वैशिष्ट्य तितकेंसें नजरेंत भरणें सहजसुलभ होणार नाहीं.

वास्तविक एक गोष्ट अगदीं सत्य अशी आहे कीं, स्त्री-पुरुषांमधील नैसर्गिक परस्पराकर्षण हें पूर्वीं होतें तसेंच तें आतांहि आहे आणि अनंतकाल तें तसेंच राहीलहि. कारण मानवी मनाचा तो एक नैसर्गिक असा स्थायीभाव आहे. असें असूनहि स्त्री व पुरुष यांच्यामधील समान भूमिकेबाबत वारंवार चर्चा केली जाते. वास्तविक अशी चर्चा व्हावयाचें कारण नसावें. परंतु वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, ही चर्चा मोठ्या प्रभावानें झालेली दिसून येते आहे; आणि त्यासाठीं आधारभूत म्हणून सद्भिरुचि, सौंदर्यदृष्टि, संयम व समता या कल्पना पुढें आलेल्या दिसतात. त्यामुळें ज्या समाजामध्यें स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीची, त्याच्या सारखीच सुसंस्कृत आणि गुणांनीं युक्त व स्वतंत्र अशी मानली जाते, त्या समाजामधील शृंगाराच्या आविष्काराचें स्वरूप वरच्या दर्जाचें असतें. आणि याच्या अगदीं उलट स्थिति उरलेल्या समाजामध्यें दिसून येते. तेव्हां यावरून एवढेंच फार तर म्हणतां येईल कीं, स्त्री-पुरुषांच्या सामाजिक भेदाभेदाविषयींच्या कल्पना ह्या कांहीं अंशीं तत्त्वज्ञानात्मक, कांहीं अंशीं सांसारिक जबाबदारींतून व्यक्त होणाऱ्या, तर कांहीं अंशीं शृंगारिक अगर वैराग्याच्या दृष्टीमधून निघालेल्या अशा आहेत. मात्र हें सारें विवेचन शास्त्रीय दृष्ट्या बरोबर आहे असें म्हणतां येणार नाहीं. ह्या केवळ कल्पना आहेत. शास्त्राचा आधार त्यांना नाहीं. कारण खरें शास्त्रीय विवेचन हें शरीर विज्ञानशास्त्र, जीवशास्त्र आणि मानसशास्त्र या शास्त्रांच्या आधारानेंच झालें पाहिजे.

स्त्री आणि पुरुष यांच्या जन्माच्या वेळच्या भूमिकेबद्दल अमेरिकेमधील रुटजर्स विद्यापीठांतील मानवशास्त्र शाखेचे प्रमुख मि. ॲशले मांटेग्यू यांनीं एक शास्त्रीय आधार पुढें आणला आहे. "जीवनशास्त्र आणि अनुवंशशास्त्र यांचे शोध आतां सूक्ष्मतर जीवाणूंचें गमन आणि पृथक्करण करण्यापर्यंत पोंचलेले आहेत. मनुष्यबीजाच्या लहानांत लहान पेशीमध्यें एकंदर चोवीस जीवाणु असतात. या चोवीस जीवाणूंच्या पेशींत एकच जीवाणु काय तो स्त्री किंवा पुरुष उत्पन्न होण्याच्या कामीं प्रभावी असा असतो. चोवीसांपैकीं लिंगभेदनिर्णायक असा एक जीवाणु ‘अ’ वर्गाचा असला तर मुलगी जन्माला येते आणि ‘ब’ वर्गाचा असला म्हणजे मुलगा जन्माला येतो. ‘अ’ आणि ‘ब’ वर्गाच्या एकेक अणु

असणाऱ्या पेशी या संख्येनें समान असतात. म्हणून स्त्रीजन्म लाभणार का पुरुष-जन्म लाभणार याचा संभव सारखाच म्हणजे पन्नास टक्के असतो.

"यावरून निसर्गानें स्त्री-पुरुषांची निर्मितीपासूनच समानता मानली आहे असें दिसेल. पण ती वरवरची आहे. संख्येनें समसमान स्त्री-पुरुष निर्माण व्हावे इतकीच निसर्गाची योजना त्यांत दिसते. पण आतां या सूक्ष्म 'अ' आणि 'ब' वर्गांच्या निर्णायक जीवाणूंचेंहि सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानेंच सांगोपांग संशोधन झालेलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, 'अ' वर्गाचा सूक्ष्म जीवाणु (ज्याच्या योगानें स्त्रीजन्म निर्णीत होतो तो) हा एक वाढीच्या दृष्टीनें पूर्णत्वाला गेलेला जीवाणु आहे तर 'ब' वर्गाचा सूक्ष्म जीवाणु (ज्याच्या योगानें पुरुष जन्म निश्चित होतो तो) हा 'अ' वर्गाच्या जीवाणूचा एक तुकडा आहे. ज्याची वाढ खुरटली आहे असा 'अ' वर्गाचा जीवाणु म्हणजेच 'ब' वर्गाचा जीवाणु होय! म्हणजे परि-पूर्ण वर्धित जीवाणूपासून स्त्री निर्माण होते तर खुरटलेल्या अंशात्मक अशा त्याच्या तुकड्यापासून पुरुष निर्माण होतो...

"वर्धित आणि अवर्धित जीवाणूंच्या या मूळांतील सूक्ष्म भेदामुळें पुरुषांना मूल उत्पन्न करणें शक्य नाहीं किंवा मुलासाठीं दूध उत्पन्न करणें शक्य नाहीं. स्त्री आणि मूल यांचा संबंध हा पुढेंहि स्त्रियांवर मानवजातीला हितावह असे चांगले संस्कार उत्पन्न करतो. तसे संस्कार पुरुषांच्या मनावर उत्पन्न होत नाहींत. स्त्री आणि बालक यांचे परस्पर प्रेमाचे आणि सहकारितेचे संबंध हेच सर्व मानवी संबंधांमध्यें मूलभूत आणि महत्त्वाचे आहेत." *

परंतु असें असूनदेखील स्त्री श्रेष्ठ कीं पुरुष श्रेष्ठ हा मोठ्या विवादाचा प्रश्न "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" असें म्हणणाऱ्या मनूपासून तो "अधिकार, अधिकार" म्हणून स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठीं झगडा करणाऱ्या कै. वामनराव जोशांच्या "रागिणी" तील उत्तरेपर्यंत अनेकांनीं सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्त्री आणि पुरुष हीं संसाराचीं दोन चाकें आहेत, अशी कल्पना करून त्यांची समान-भूमिका कांहीं लोकांनीं प्रतिपादिलेली आहे, तर कांहींनीं त्यांच्या मानसिक व शारीरिक अशा विविध प्रकारच्या गुणदोषांवर भर देऊन त्यांच्यावरील भिन्न भिन्न सांसारिक जबाबदाऱ्यांची चर्चा केलेली आहे.

अपत्य निर्मिति आणि बालसंगोपन ही महत्त्वाची कामगिरी स्त्रीवर निसर्गानेंच सोंपविलेली आहे. त्या दृष्टीनें विचार करतां स्त्री व पुरुष यांच्या कार्य-क्षेत्रामध्यें आढळून येणारा फरक हा मानवजातीच्या सुरवातीपासूनचा असा अगदीं जुना आहे. जुन्या काळच्या अगदीं रानटी अवस्थेंतील समाजामध्यें देखील हेंच

---

* स्त्रियांच्या श्रेष्ठत्वास आधार. ग. वि. केतकर, केसरी, २७ जुलै १९५२.

दिसून येतें. त्यावेळच्या पुरुषांनीं शिकारीची व युद्धाची बाजू सांभाळिली आणि समाजाच्या सांस्कृतिक व औद्योगिक विकासाचा भाग स्त्रियांनीं सांभाळला. "रानटी समाजांतील पुष्कळ स्त्रिया पुरुषांच्या इतक्याच सशक्त असत. त्यामुळें वेळप्रसंगीं युद्धांतहि त्यांना भाग घ्यावा लागत असे; आणि अभिमानानें त्याहि हा भाग घेत असत, हें विशेष होय. युद्धांत पाडाव झालेल्या कैद्यांवर पहारा करण्याचें काम पुष्कळ वेळां स्त्रियाच करीत. आपली सर्व शक्ति एकवटून, एकाच स्थानावर ती केंद्रीभूत करून, तिचा एकदम उपयोग करण्याचें सामर्थ्य पुरुषाला असतें. स्त्रिया आपली सर्व शक्ति शांतपणें खर्च करितात व शक्तीवरील दाब फारसा वाढूं देत नाहींत. स्त्रियांची शक्ति अफाट पसरलेल्या समुद्रासारखी असते. तर पुरुषांच्या शक्तीला उंच उभारलेल्या जलस्तंभाची उपमा देतां येईल. . स्त्री-पुरुषांचें शारीरिक सामर्थ्य सारखेंच असलें तरी जीं कामें करतांना शक्ति एका स्थानावर केंद्रीभूत करून मोठ्या आवेगानें तिचा व्यय करावा लागतो, अशीं कामें पुरुषांनीं पत्करिलीं; आणि शक्ति शांतपणें खर्च करून कमी दाबानें करावीं लागणारीं कामें स्त्रियांच्या वांटणीस आलीं." *

स्त्री पुरुषांच्या या नैसर्गिक स्वभाव–भिन्नतेचा विचार करीत असतांना इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशामध्यें पुरुषांच्या बरोबरीनें हक्क प्राप्त करून घेण्यासाठीं जोराची चळवळ करणाऱ्या स्त्रिया प्रत्यक्ष वेळ आली असतां कशा वागल्या, हें या संदर्भांत जरूर लक्षांत घेण्यासारखें आहे.

१८७० सालीं सौ. ग्रे नांवाच्या एक बाई लंडन स्कूल बोर्डच्या सभासद म्हणून जेव्हां पहिल्यांदांच समाजापुढें भाषण करण्यासाठीं उभ्या राहिल्या, त्यावेळीं आवर्जून त्या असें म्हणाल्या कीं, 'स्त्रियांना अतिशय मोलाची अशी वाटणारी व्यक्तिगत व खाजगी मोकळीक आतां माझ्या बाबतींत तरी नाहींशी झाली आहे.'' †

म्हणजे सामाजिक जीवनामध्यें भाग घेण्यासाठीं घर बाजूला सारून पुढें येत असतांना, त्यांना स्वतःच्या खाजगी जीवनांतील मौलिक स्वातंत्र्य गमावल्या-सारखें वाटलें! याचा अर्थच असा कीं, स्त्रियांनीं देखील निसर्गानें आपणावर सोंपविलेल्या जबाबदारी पलीकडे आपलें कार्यक्षेत्र वाढवून आपला विकास करून घेण्याची गरज आपल्याला कितीक पिढ्या फारशी भासूं दिली नाहीं! अगदीं आजच्या जगांत देखील सामान्य स्त्रियांच्या जीवनामध्यें हीच भावना दिसून येते. पिढ्यान् पिढ्या जणुं त्यांनीं या मर्यादित क्षेत्रालाच आपलें सर्वस्व मानलें आणि त्यांतच आनंदहि उपभोगला.

---

* श्री. न. ल. आठवले, स्त्रीपुरुषांची स्वभावभिन्नता, सह्याद्रि, नवंबर १९३५.

† "I lose the privacy which is most precious to woman."
Women and a new Society. P. 12

त्यामुळें जगप्रसिद्ध असलेले एक नामवंत मानसशास्त्रज्ञ श्री. हॅवलॉक एलिस यांनीं आपल्या Man and Woman या ग्रंथामध्यें म्हटलें आहे कीं--

" स्त्री आणि पुरुष यांना एकमेकांचें अनुकरण करण्याचें स्वातंत्र्य जरी असलें तरी त्या स्वातंत्र्याचा उपयोग ते आपल्या जीवनांत करूं इच्छित नाहींत. त्यांना आपल्या म्हणून असलेल्या स्वतंत्र भावनांचाच वापर करणें आधिक आवडतें. कारण तसें करण्यामुळें उच्च प्रकारच्या व सुखी सुधारणेची बांधणी केली जाते असें त्यांना वाटतें व म्हणूनच कोणत्याहि एकाच-स्त्री वा पुरुष-व्यक्तित्वाचें वैशिष्ट्य सर्वांनीं पत्करण्याकडे त्यांच्या मनाचा कल झुकत नाहीं. " *

स्त्री आणि पुरुष यांच्यामध्यें निसर्गानें केवळ शारीरिक दृष्ट्याच वेगळी ठेवण केली आहे असें नसून मानसशास्त्र दृष्ट्याहि त्यांच्यामध्यें फरक असलेला दिसून येतो. वस्तुस्थिति अशी आहे कीं, मानसिक संवेदनांचे आघात स्त्रीवर अधिक तीव्रतेनें होत असतात. हर्षशोकादि भावनांचे परिणाम स्त्रियांच्या मनावर फार जलद होतात; आणि त्या त्या वेळच्या या भावनांचा आविष्कारहि त्यांच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित व्हावयास वेळ लागत नाहीं. पुरुषांचे बाबतींत तसें होत नाहीं. सुखदुःखाच्या होणाऱ्या भावना ताब्यांत ठेवून त्यांचा आविष्कार चेहऱ्यावर होऊं न देण्याची ते खबरदारी घेत असतात. अर्थात् या सर्वसामान्य नियमाला कांहीं अपवादहि असूं शकतात. एवढेंच नव्हें तर प्रत्येक मानवामध्यें स्त्रीत्वाच्या व पुरुषत्वाच्या कांहीं बाबी कमजास्त प्रमाणांत असलेल्या आढळून येतात ! मग तो मानव स्त्री वा पुरुष कोणीहि असो.

स्त्रीची व पुरुषाची आयुष्याकडे पहावयाची दृष्टीच वेगळी असते. त्यामुळें त्यांचें जीवन एकमेकांना पूरक होणाऱ्या कर्तृत्वानें परिपूर्ण झालेलें दिसून येतें. त्या कारणानें स्वाभाविकच स्त्री आणि पुरुष यांची तुलनाच होऊं शकत नाहीं अशी वस्तुस्थिति आहे. यासंबंधीं अधिक खोलांत जाऊन विचार करावयाचा तर असें म्हणतां येईल कीं:—

"स्त्री आणि पुरुष यांची समस्या ही दोघांच्या प्रश्नावर अवलंबून राहूं शकत नाहीं. मानव म्हणून ते एकच आहेत. म्हणजे स्त्री आणि पुरुष हे एकमेकांना पूरक असे आहेत. परंतु परस्पराहून सर्वस्वीं भिन्न असे ते असले तरीहि त्यांच्या एकत्वामुळें

---

* " The sexes do not play their part in life by their freedom to imitate each other even though they are entitled to possess that freedom; but by liberating their own native impulses, and in that way, building up a richer and more joyous civilization than can ever be founded on the instincts of one sex alone. "

तरी देखील ती डगमगत नाहीं. तिला मनापासून असें वाटतें कीं, तिची निर्मिति ही आज्ञेसाठीं झालेली नाहीं. त्यामुळें स्वाभाविकच ज्यांचेकडून प्रेम, दया आणि न्याय याबाबत चोख वागणूक मिळेल, त्यांच्यापुढें मान वाकविण्यांत किंवा त्यांची आज्ञा मानण्यांत तिला पराकोटीचें समाधान मिळतें "*

* * *

आजचा काळ अगदीं बदलेला आहे; स्त्रियांचें शिक्षण वाढलेलें आहे; आणि पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रिया आतां विविध प्रकारच्या कार्यक्षेत्रांतहि भाग घेऊं लागल्या आहेत. त्याचबरोबर बदललेल्या व आजच्या सुधारलेल्या जगामध्यें स्त्रियांच्या घरकामांतहि फरक पडत चालला आहे. वेदकालीन स्त्रीप्रमाणें गाईची वा म्हशीची धार काढणें, दही घुसळणें, घडा घेऊन पाणी आणणें, सोमरसाच्या निर्मितीसाठीं त्या विशिष्ट झाडाच्या फांद्या आणून रस काढणें, कपडा विणणें, शेतीवर नजर राखणें इत्यादि घरगुती कामें आजच्या सुधारलेल्या पांढरपेशा स्त्रीला करावीं लागत नाहींत. अर्थात् शेतकरीवर्ग ह्या गोष्टीला अपवाद आहे.

वेदकालीन स्त्री ही सर्व प्रकारच्या हस्तकौशल्यामध्यें, गायनवादनामध्यें आणि नृत्यकलेमध्यें निपुण होती. एवढेंच नव्हे तर नव्या नवरीला सार्वजनिक सभेमध्यें कलापूर्ण असें व्याख्यान देतां आलें पाहिजे व सभा जिंकतां आली पाहिजे अशी अपेक्षा बाळगली जात असे! आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यावेळची स्त्री घरगुती उद्योगाबरोबरच औद्योगिक क्षेत्रामध्यें आवडीनें लक्ष घालून बाण तयार करणें, धनुष्य तयार करणें, कपडा विणणें, टोपल्या बनविणें व शेती करणें इत्यादि गोष्टीमध्यें वाकबगार होत असे! म्हणजे त्यावेळच्या समाजाला सर्वांगीण रीतीनें विकास पावण्यासाठीं स्त्रिया हातभार लावीत असत. यासंबंधीं थोडक्यांत सांगावयाचें व सारांशानें बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं,

"सामाजिक जीवनाच्या विकासाच्या दृष्टीनें त्यावेळच्या स्त्रीपुढें असा आदर्श असे कीं, शांततेच्या काळामध्यें स्वास्थ्य निर्माण करण्यासाठीं व युद्धामध्यें विजय

---

* "A good woman has no desire to rule where she feels it to be her duty, as it is her highest pleasure to love, honour and obey; and she submits with cheerful acquiescence to that order in the conjugal relation which God and nature has established. Woman feels that she is not made for command, and finds her truest happiness in submitting to those who wield a rightful sceptre in justice, mercy and love."

Mrs. Graves, The Feminine Character. P. 11.

संपादण्यासाठीं आपली मदत व्हावी. युद्धांतील यशासाठीं फार मोठ्या सैन्याची आवश्यकता असल्यामुळें स्त्रिया स्वखुशीनें प्रत्येकीला दहा पुत्र होण्यांत व फार मोठ्या कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी पत्करण्यांत धन्यता मानीत ! खेरीज जगभरच्या स्त्रियांना करावें लागणारें घरकाम सांभाळून फावल्या वेळीं त्या आपला उपयोग शेती करणें, सूत कातणें, कापड विणणें आणि युद्धाचीं अवजारें तयार करणें इत्यादि कामीं होईल हें पहात ! त्याचप्रमाणें धार्मिक जीवन व साहित्याचें क्षेत्र यामध्येंहि आपला वाटा उचलण्यांत त्या आवर्जून लक्ष घालीत. पुरुषांच्या बरोबरीनें त्यांना शिक्षण मिळे. त्यांच्यापैकीं कांहींनीं तर आपल्या उच्चतम सांस्कृतिक जीवनाचा उपयोग लेखनासाठींहि केला असून कित्येकींचें काव्य वैदिक ऋचां-मधूनहि उपयोगांत आणलें आहे. एवढेंच नाहीं तर वेदकालीन यज्ञयागांमधून त्यांनीं मोठ्या हिरीरीनें भाग घेतला असून, त्यायोगें सामाजिक जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेल्या दैवी साक्षात्कारासहि आपण जिंकूं शकूं अशी त्यांची भावना असे ! *

आजच्या काळामध्येंहि याच भावनेनें स्त्रिया आपलें घर सांभाळून सार्वजनिक जीवनामध्यें भाग घेत आहेत. परंतु हें प्रमाण फार कमी आहे. तथापि त्या दिशेनें पावलें पडायला अभिमानानें व चिकाटीनें सुरवात झाली आहे, असें निश्चितपणें म्हणतां येईल. तरी पण एक गोष्ट खरी कीं, आमच्या जुन्या काळच्या स्त्रियांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आजच्या बदलत्या काळानुसार स्त्रियांनीं

---

* " The ideal before women in social life was to help society in procuring prosperity in peace and victory in war. The war of expansion required a numerous army; women cheerfully accepted the responsibility of rearing a large family with ten sons for each mother. Besides doing the household work, as women have got to do all over the world, they used to devote their spare time to agriculture, spinning, weaving and manufacturing war materials. They were keen to make their own contribution to the literary and religious life. They did not lag behind men in education; many women in cultured classes were also authers, some of whose poems have been included in the vedic canon. They enthusistically performed the vedic sacrifices, hoping thereby to secure divine favour, so necessary for the prosperity of society. "

(Great women in India. P. 29.)

आपलें कार्यक्षेत्र वाढवावयास सुरुवात केलेली असली, तरी कांहीं जाणत्या स्त्रियांनाच असें वाटतें आहे कीं, स्त्रीनें पुरुषांचें अनुकरण करण्यापेक्षां आपलें स्त्रीत्व वैशिष्ट्यानें टिकवून धरलें पाहिजे; तें फार अगत्याचें आहे. कारण अद्यापहि प्राचीन संस्कृतीचा पगडा त्यांच्या मनावर भरपूर आहे.

बदलत्या काळाच्या ओघाबरोबर स्त्रीजीवनाचा हा आदर्शहि बदलत गेला. कार्यक्षेत्र विकासलें. शिक्षणांत वाढती प्रगति झाली. जीवनाकडे पहावयाची हिंमत वाढली. त्यामुळें स्त्रीजीवनाचे म्हणून खास वेगळे असे मानले गेलेले स्वभावभेद आतां केवळ निसर्गसिद्ध मानून भागणार नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाली. स्त्रीजीवनांत आमूलाग्र बदल घडविणारी सुधारणा अस्तित्वांत येत चालली. त्या कारणानें श्री. रिचर्ड कर्लसारख्या विचारवंतांना आवर्जून म्हणावेसें वाटलें कीं—

"स्त्रीस्वभावाची पारंपारिक अशीं जीं वैशिष्ट्यें आहेत त्यासंबंधींच्या आपल्या कल्पनांना स्त्रियांच्या सामाजिक जीवनांत घडून आलेल्या अलीकडच्या फरकांनीं एक प्रकारें आव्हानच केलेलें आहे!"*

* * *

स्त्रीच्या अशा प्रकारच्या बदलत्या व्यक्तिसत्त्वाचें चित्रण आजवर प्रामुख्यानें अनेक पुरुष लेखकांनींच केलेलें आहे. त्याचा परिणाम मात्र असा झाला आहे कीं, स्त्रीच्या म्हणून ज्या विशिष्ट भावना त्यांनीं रंगविल्या आहेत, त्यांचें स्वरूप दत्तक घेतलेल्या मुलासारखें झालें आहे! स्त्रीच्या अंतःकरणांतून प्रकट होणाऱ्या त्या खऱ्या भावना नव्हेत. स्त्रीला काय वाटत असेल याची कल्पना करून मांडल्या गेलेल्या त्या कल्पना आहेत. त्यामुळें स्त्रीच्या जीवनाचें खरें चित्रण येथें झालें आहे असें म्हणतां येणार नाहीं. अर्थात् हरीभाऊ आपट्यांच्या सारख्या कांहीं लेखकांनीं स्त्रीजीवनाचा बारकाईनें अभ्यास करून व जास्तींत जास्त मेहनत घेऊन आपल्या लेखनांतून स्त्रीजीवन रंगविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. परंतु हा प्रयत्न एक तर अल्पसा आहे; आणि दुसरें असें कीं, तो कांहीं झालें तरी पुरुषाच्या दृष्टिकोणामधून झालेला आहे. त्या कारणानें अशा कलाकृतींचें सानंद स्वागत करीत असतांना, एक विचार मनाला असा स्पर्श करून जातो कीं, हेंच एखाद्या बाईनें लिहिलें असतें, तर आणखी चांगलें झालें नसतें कशावरून? कारण

* "Recent changes in the Social position of women have challanged our views concerning the so-called eternal traits of the feminine character."

Foreword, The feminine character.

एखाद्या बाईनें आपल्या अनुभवामधून रंगविलेलें स्त्रीजीवन आणि एखाद्या पुरुषानें आपल्या अनुभवामधून रंगविलेलें स्त्रीजीवन यांत बराचसा फरक असणें स्वाभाविक आहे. पण जोंपर्यंत स्त्रियांनीं हातांत लेखणी घेऊन आपल्या भावनांना वाचा फोडली नाहीं, तोंपर्यंत पुरुषांनीं चित्रित केलेल्या स्त्री-जीवनावरच विसंबून रहाणें भाग आहे. आणि तें देखील ज्या वाङ्मय प्रकारामध्यें ज्या पद्धतीनें स्त्रीजीवनाचा आविष्कार झाला असेल तो प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे असें मान्य करून ! कारण पुरुषांच्या लेखणींतून उतरलेली स्त्री ही त्यांना पाहिजे होती, दाखवायची होती, तशीच ती शब्दचित्राच्या किंवा स्वभावरेखेच्या रूपानें समाजापुढें आलेली असते. * पण खरी स्त्री रंगविलेली पहायची असेल तर ती एखाद्या कुशल स्त्रीच्या लेखणींतून उतरलेलीच असावयास पाहिजे. कारण वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपल्या शरीरांतील जीवनरसानें आपल्या अपत्याचें पोषण करींत असतांना जी त्यागवृत्ति स्त्रियांच्या अंतःकरणांत विकास पावते, तिचा यथार्थ अनुभव हा तिनेंच सांगितला तर तो जिवंत वाटेल. एरव्हीं पुरुषांनीं केवळ कल्पना करून अगर ऐकीव माहितीवर विसंबून ही कल्पना मांडली, तर तिला म्हणावा तसा जिवंतपणा येणार नाहीं. फार तर एखाद्या विषयावरील रुक्ष निबंधासारखें तें विवेचन होईल. किंवा एखाद्या डॉक्टरनेंच तो प्रश्न हाताळला तर त्यास शास्त्रीय विवेचनाचें श्रेय द्यावें लागेल. परंतु ह्या भावनेची खरी हृद्यता स्त्रीच्या लेखणीमुळेंच वैशिष्ट्यानें पहावयास मिळेल. कारण हा भावनाविष्कार तिच्या अनुभवानें रंगलेला असतो. ती आपलें म्हणून कांहीं अशा वेळीं बोलत असते. असें हें जें तिचें आपलें म्हणून वेगळें वैशिष्ट्य आहे, हा जो तिचा स्वतंत्र असा आविष्कार आहे, त्याचेंच मूल्यमापन ह्या प्रबंधामध्यें करावयाचें आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रबंधामध्यें स्त्रियांनीं निर्मिलेल्या मराठी साहित्याचें परिगणन व मूल्यमापन करावयाचें आहे. त्यासाठीं मराठीच्या प्रारंभ कालापासून तों अगदीं आजतागायत प्रसिद्ध झालेल्या स्त्रियांच्या कांहीं निवडक ग्रंथांचा इथें उपयोग करण्यांत आलेला आहे. हें वाङ्मय प्रामुख्यानें ललित आहे. त्यामुळें स्त्रीच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा आविष्कार कसा झालेला आहे

---

* " She has been repeatedly portrayed in plays and novels and we can sense her peculiar influence in lyric poetry which so often celebrates her. She figures in myths and legends, but she is always shown from the main point of view . . A mass of literature has grown up about them, but the explanation is always based on the man's idea of the woman; it is never the woman's interpretation of herself. "

(The way of all women. P. 4)

हें पहाणें अर्थातच सोईचें होईल. कारण विशेषतः ललित वाङ्मयामध्येंच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार झालेला असतो हें तत्त्व आतां सर्वमान्य झालेलें आहे.

* * *

अगदीं सुरवातीच्या काळामध्यें आपलें म्हणणें इतरांच्यापुढें मांडावें आणि इतरांचें म्हणणें आपल्याला समजावें या भावनेनें मनुष्यप्राणी गोष्टी सांगणें व गोष्टी ऐकणें यांत विलक्षण आनंद मानीत असे; आणि अगदीं आजच्या काळामध्यें देखील मानवाच्या या स्वभावामध्यें खंड पडलेला नाहीं. मानवी मनांतील हा एक स्थायीभाव आहे. त्यामुळें आपल्यासह व आपल्या व्यतिरिक्त असें जगाचें ज्ञान करून घेण्यासाठीं गोष्टींचा वापर करण्याची ही मानवाची कला त्याच्या हृदयांत खोल जाऊन रुजलेली आहे आणि ती मानवी जीवनाच्या अंतापर्यंत अखंड राहील यांत शंका नाहीं.

या गोष्ट सांगण्याच्या व ऐकण्याच्या कलेमध्यें आजवर पुरुषांच्याप्रमाणेंच स्त्रियांनींहि भाग घेतलेला आहे. जुन्या काळच्या बायका पुरुषांच्याप्रमाणेंच आपल्या मुलाबाळांना व नातवंडांना परंपरेनें चालत आलेल्या लोककथा सांगतांना अद्यापहि कुठें कुठें दिसून येतात. मात्र त्यांची ही गोष्ट स्मरणशक्तीच्या बळावर पिढ्यान् पिढ्या तग धरून राहिलेली असते; आणि तिची जोपासना मानवाच्या ओठांवर अखंडपणें झालेली असते हें विशेष होय.

स्त्रियांनीं सुरवातीला गोष्ट ऐकण्याच्या व सांगण्याच्या कलेचा मोठ्या प्रमाणावर विकास केला आणि नंतर जेव्हां त्यांना अक्षर ओळख झाली व त्या लिहायला शिकल्या तेव्हां त्यांनीं येत असलेली गोष्ट प्रथम लिहायला आरंभ केला.

त्यांनीं आपल्या ललित लेखनाला प्रारंभ केला तो एखाद्या लहानशा गोष्टीचा विकास करण्यासाठीं आणि त्या गोष्टीचा गाभा जो ठेवला तो देखील प्रीतिरसाला आळविण्यासाठीं असाच ठेवला.* तसेंच आपल्या लेखनाला त्यांनीं आधार घेतला तो स्वतःला माहीत असलेल्या जगाचा व आलेल्या अनुभवांचा असाच घेतला.

त्यामुळें एक गोष्ट प्रामुख्यानें या संदर्भांत लक्षांत घ्यावी लागेल ती अशी कीं, स्त्रियांच्या या साहित्याचें मूल्यामापन जें करावयाचें तें त्यांना मिळालेल्या संधीवर अवलंबून राहील असेंच किंवा ती संधि लक्षांत घेऊनच करावयाचें.

* "Women make their entrance into fiction with the development of the short tale such as novella, which had love interest as its pivotal point."

(Women Writers. P. 12)

एरव्हीं त्यांना योग्य तो न्याय मिळेलच असें नाहीं. कारण त्यांचें जगच पुरुषांच्या मानानें वेगळें व मर्यादित असें असतें; आणि याची चर्चा मागें आली आहेच.

स्त्रियांनीं आपल्या स्वतःच्या भावना आपल्या शब्दांमध्यें व्यक्त करायला सुरवात केली, म्हणजे त्या आविष्कारांत कांहीं वेगळेपणा येऊं शकतो किंवा काय, हें पहावयाचें म्हणजे कांहीं उदाहरणें लक्षांत घेणें अगत्याचें आहे. या संदर्भामध्यें अगदीं जुन्या काळचें उदाहरण म्हणून वेदकालीन स्त्रीनें केलेला खास आपल्या अशा भावनेचा पुढील आविष्कार पहातां येईल—

"इमां खनाम्योषधिं वीरुधं बलवत्तमाम् ।
यया सपत्नीं बाधते इया संविन्दते पतिम् ॥ १ ॥
उत्तान पर्णे सुभगे देवजूते सहस्वति ।
सपत्नीं मे धम पतिं मे केवलं कुरु ॥ २ ॥
उत्तराहमुत्तर उत्तरेदुत्तराप्यः ।
अया सपत्नी या ममाऽधरा साधराम्यः ॥ ३ ॥
न ह्यस्या नाम गृभ्णानि नो अस्मिन् रमते जने ।
परामेव परावतं सपत्नीं गमयासि ॥ ४ ॥
अहमस्मि सहमानाऽथ त्वमसि सासहिः ।
उभे सहस्वती भूत्वा सपत्नीं मे सहावहै ॥ ५ ॥
उपतेऽधां सहमानामभि त्वाधां सहीयसा ।
मामनु प्र ते मनो वत्सं गौरिव धावतु पथावारिव धावतु ॥ ६ ॥*

[अर्थः—१. जीमुळें सवतीला त्रास होतो आणि तिला पति प्राप्त होतो, ती ही बलवानांतली बलवान् असणारी लतारूप ओषधि मी खणतें.

२. हे उताणी पानें असलेले, भाग्यदाते, देवांनीं निर्माण केलेले आणि पराभव करणारे ओषधि, माझ्या सवतीला घालव आणि नवरा केवळ माझा कर.

३. हे उत्कृष्ट ओषधि, मी उत्कृष्टांतले उत्कृष्ट व्हावें आणि जी (माझी) सवत आहे ती निकृष्टांतील निकृष्ट व्हावी.

४. मी ह्या सवतीचें नांवहि घेणार नाहीं. तिच्याबरोबर कोणी खेळत नाहीं. मी सवतीला अत्यंत दूर देशालाच घालवितें !

५. हे ओषधि, मी पराभव करणारी आहें. तूं पराभव करणारी हो. आपण दोघीहि पराभव करणाऱ्या होऊन सवतीचा पराभव करूं.

६. हे पतिदेवा, सवतीचा पराभव करणारी ही वनस्पति तुझ्या (डोक्या)-जवळ मी ठेवतें. पराभव करणाऱ्या ओषधीनें तुला धारण केलें आहे. गाय वासराकडे किंवा पाणी उतरत्या मार्गानें जातें, त्याप्रमाणें तुझें मन माझ्याकडे धावो.]

* ऋषिका इंद्राणी, ऋग्वेद, मंडळ १०, सूक्त, १४५, ऋचा १ ते ६.

सवतीच्या कल्पनेमुळें स्वतःच्या मनाला पोंचणारा धक्का या प्रकारें इंद्राणीनें व्यक्त केलेला आहे. सवतीमत्सर हा स्त्रीस्वभावाचा एक विलक्षण धर्म आहे ! त्याचाच हा आविष्कार होय. त्यामुळें असें म्हणतां येईल कीं, ही भावना केवळ स्त्रीच्याच मनांत विशेषत्वानें उद्भवणारी आहे आणि म्हणूनच एवढ्या उत्कटतेनें तिचा आविष्कारहि झालेला आहे.

वेदकालीन वाङ्मयांतील स्त्रीच्या लेखणीचा हा आविष्कार तिच्या व्यक्तिमत्त्वाचें निःसंशय वेगळें वैशिष्ट्य दर्शवीत आहे. तेव्हां या दृष्टीनें वेगवेगळ्या कालखंडांतील व वाङ्मयप्रकारांतील स्त्रियांच्या साहित्याचें स्वरूप पुढें पहावयाचें आहे. त्यापूर्वीं ठोकळमानानें स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलचा पुढील निष्कर्ष काढतां येण्यासारखा आहे.

नैसर्गिक भेदामुळें असो किंवा परिस्थितिजन्य संस्कारामुळें असो, वाङ्मयांत आविष्कृत होणारें स्त्रीचें सर्वसामान्य व्यक्तिमत्त्व निदान मराठीपुरतें तरी पुढील विशेषांनीं युक्त असलेलें दिसून येतें.

स्त्री ही पुरुषांपेक्षां अधिक प्रेमळ, भावनाप्रधान व त्यागी आहे. तिची दृष्टि वैयक्तिक, मूर्त व नजीकच्या प्रश्नांकडे अधिक वळलेली असते. अधिक खोलवर जाऊन एखाद्या प्रश्नाचा दूरवरच्या दृष्टिकोणामधून ती विचार करूं शकत नाहीं. ती धार्मिक प्रवृत्तीची असून तिच्या मनाचा कल हा परंपरेच्या उच्छेदापेक्षां तिच्या रक्षणाकडेच अधिक झुकलेला असतो. वात्सल्य, सौम्यपणा, विनय, भौतिक वैभवाची आवड, मानीपणा व व्यवहारचतुरता हे तिचे विशेष गुण आहेत. मानवाच्या संसाराला सौंदर्य आणि स्थैर्य तिच्यामुळेंच प्राप्त झालें आहे. परानुनय, चातुर्य किंवा दुसऱ्याचें मन आपल्याकडे वळविणें हा गुण स्त्रीमध्येंच विशेषेंकरून दिसून येतो. ध्येयवादापेक्षां व्यवहाराकडे, उलथापालथीपेक्षां अनुसंधानाकडे आणि गतीपेक्षां स्थितीकडे तिच्या मनाचा ओढा अधिक असतो.

शीलसंरक्षण, पातिव्रत्य व कुलाभिमान हीं स्त्रीचीं मानस्थानें आहेत. एखाद्या विषयाबाबत तिचे ग्रह लौकर बनतात हें खरें असलें, तरी एकदां बनलेले ग्रह ती लौकर सोडीत नाहीं ही गोष्टहि तितकीच खरी आहे. स्वतःचें वर्चस्व गाजविण्याची प्रवृत्ति क्षणभर बाजूला ठेवून दुसऱ्याच्या कलानें घेणें, आपण पुढाकार घेण्यापेक्षां पुढाकार घेणारास सहाय्य करणें; आणि बाह्य संस्कारांचा परिणाम मनावर झटकन् करून घेणें इत्यादि इतरहि कांहीं विशेष तिच्या बाबतींत सांगतां येतील. अर्थात् हे सर्व विशेष सर्व सामान्य स्त्रीच्या ठायीं दिसून येणारे असे आहेत.

याखेरीज प्रत्येक स्त्रीचें स्वतःचें असें निराळें व्यक्तिमत्त्व आढळून येतें तें वेगळेंच. त्याचप्रमाणें स्त्रियांचे म्हणून मानले जाणारे कांहीं स्वभावविशेष कांहीं पुरुषांत आणि पुरुषांचे कांहीं स्वभावविशेष कांहीं स्त्रियांत असलेले कितीकदां

आढळून येतात! पण तें केवळ अपवादात्मक आहे, हें मात्र जरूर ध्यानांत घ्यावयास हवें आहे.

शेवटीं भारताच्या एक दिवंगत पण श्रेष्ठ कवयित्री सौ. सरोजिनीदेवी नायडू यांच्या कल्पनेप्रमाणें सध्यां इथें एवढेंच सांगतां येईल कीं, भारताच्या आधुनिक स्त्रीजीवनानें प्रभावीपणें घातलेला हुंकार या प्रबंधाच्या पानापानांवर ऐकायला मिळतो आहे. आणि या हुंकारानें मानवी मूल्यांचा अतिशय जिव्हाळ्यानें इथें विचार केलेला आहे.*

★

* " The voice of modern Indian womanhood speaks through these pages that treat of topies of the most divine human value and interest. "

Sarojini Naidu. " Women in Modern India. "

.२.

प्राचीन मराठी काव्य

सात शतकांची उज्ज्वल परंपरा लाभलेली मराठी कविता पहिल्यांदां जेव्हां लोकांच्या नजरेला पडली, तेव्हां तिनें त्या लोकांच्या अंतःकरणावर असामान्य प्रभुत्व गाजविलें. मनाचा निर्भेळपणा, स्वभावांतील मार्दव, अंतःकरणांतील प्रौढ भाव आणि संस्कृतीचें अभिजात वळण या गुण-समुच्चयामुळें तिनें तेव्हांच मराठी मनाची पकड घेतली. मनांत आलें तें तिनें बोलून दाखविलें. सभोंवतालच्या क्रांतिकारी जीवनाचा तिनें आविष्कार केला. तसेंच त्या वेळच्या समाजाची वृत्ति निवृत्तिपर आणि अध्यात्माभिमुखी असल्यामुळें तिनें याच मनोवृत्तीला आपल्या वतीनें वाचा फोडली. अशी ही मराठी कविता सुरुवातीला जी मिळाली, ती यादवकालीन महानुभावांची होती. मराठींतील सर्वांत प्राचीन अशी ग्रंथरचना यादवकालीन महानुभावी कवींनीं केली आहे आणि त्यांच्या या ग्रंथरचनेसच मराठीचा प्रारंभकाल असें निदान आज तरी मानलें जाते आहे. तसेंच त्यावेळच्या प्रारंभींच्या कालखंडास मराठी कवितेचा आध्यात्मिक कालखंड असेंहि समजण्यांत येतें.

सामान्यतः मराठीचा हा पहिला कालखंड ज्ञानदेव ते तुकाराम असा मानण्यांत येतो. या कालखंडांतील कवितेनें प्रामुख्यानें ओंवी छंद हाताळलेला आहे. ज्या छंदामध्यें सर्व प्रकारचें वाङ्मय सुलभतेनें ओंवतां येतें, ती ओंवी होय. ओंवी म्हणजे मराठीची जणुं गायत्रीच होय ! " ॐ ! म्हणजे ईश्वरतत्त्व. विराट्, व्यापक, विशाल, सर्वांचा समावेश करणारें असें ब्रह्माचें सगुण स्वरूप. ॐ ! हें अक्षर आहे आणि शब्दहि आहे. शब्द या नात्यानें ॐ ! चा अर्थ ' होय ' असा आहे. ॐ ! हें ईश्वराचें ' होय ' रूप आहे....अक्षर या नात्यानें तो वर्ण मात्राचें प्रतीक मानला जातो. त्याची सुरवात ' अ ' पासून आहे आणि शेवट ' म ' मध्यें आहे. या दोहींना जोडणारा ' उ ' सांधा आहे...वर्णांचा उगम कंठांतून होतो आणि समाप्ति ओंठांत...कंठ व ओष्ठ यांच्या मधल्या स्थानांतून उत्पन्न होणाऱ्या वर्णांचा प्रतिनिधि म्हणून ' उ ' उभा आहे. ' उ ' म्हणजे उभय, इकडला व तिकडला सांधा जोडणारा. मिळून सर्व सारस्वत, सर्व साहित्य, सर्व शुभाशुभ वाङ्मय ॐ ! मध्यें येऊन गेलें. ही उपपत्ति काल्पनिक खरी, पण अशा प्रकारें सगळ्या वाणीचें एक प्रतीक कल्पिण्यांत व्यापक, विश्वरूप, ईश्वर-

तत्त्वाचें चिन्ह म्हणून तें चिंतनाला उपयोगी पडतें. "* आणि म्हणूनच सर्व वाङ्मय ज्या छंदांत सुलभतेनें ओंवतां येतें ती ओंवी होय. तेव्हां अशा या ओंवी छंदाचा वांपर या अध्यात्मिक कालखंडांतील कवींनीं मोठ्या कौशल्यानें केलेला आहे.

काव्यलेखनाच्या दृष्टीनें विचार करतां असें दिसून येतें कीं, या कालखंडांतील कवींची मनापासून अशी श्रद्धा होती कीं, त्यांच्या हातून होणाऱ्या काव्यलेखनाचें कर्तेपण हें त्यांचेकडे जात नव्हतें ! कारण त्यांची अशी समजूत होती कीं, खुद्द परमेश्वरच तें अंतःप्रेरणेनें आपणाकडून निर्माण करवीत असतो ! स्वतः-कडे फक्त त्यांनीं निमित्तमात्र म्हणूनच पाहिलें.

या कवींच्या काव्यलेखनाचें दुसरें एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनीं आपली "काव्यसृष्टि केवळ काव्यासाठीं म्हणून उभारलेली नाहीं. तर भक्तीचा प्रचार करून सारें जग परमार्थाच्या वाटेस लावणें हा ही वाक्सृष्टि निर्माण करण्यांत त्यांचा 'परंभाव' आहे." ‡

आपल्या काव्यनिर्मितीबाबत खुद्द तुकोबांनीं असें स्पष्टपणें सांगितलें आहे कीं—

" संतांचें सेविलें तीर्थ पायावणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥
ठाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनी ॥
वचनें मानिलीं नाहीं सुहृदांचीं । समूळ प्रपंचीं वीट आला ॥
सत्यअसत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमता ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥
यावरीया झाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिलें चित्तीं विठोबाचें ॥ "

म्हणजे आपल्या काव्यलेखनाची पार्श्वभूमि सांगतांना इथें तुकोबांनीं आपल्या मनाची अवस्था बोलून दाखविली आहे. आणि अखेरीस असा निर्वाळाहि देऊन टाकला आहे कीं—

" तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल—पांडुरंगें । " तेव्हां " या उद्‌गारांवरून एक पक्षीं या कविवर्यांची निरंहकार व विनयपूर्ण वृत्ति जशी प्रकट होते, तशीच दुसऱ्या पक्षीं त्याच्या ठायीं—

आम्ही वैकुंठवासी । आलों याच कारणासी ।
बोलिले जें ऋषी । साचभावें वर्ताया ॥

---

* स्थितप्रज्ञ-दर्शन. आचार्य विनोबा भावे.

‡ रा. द. रानडे. प्रस्तावना. पांच संतकवी.

आपलें कवित्व हें जीविताचें इतिकर्तव्य असल्याची भावनाहि दिसून येते. " *

या कालखंडांतील कवींनीं अशा प्रकारची आपली मनोभूमिका स्पष्ट करतांना महाराष्ट्रांतील मराठी मनाची भूमिका तयार केली. तिच्यामध्यें धर्माभिमानाचें बीज रुजविण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यावेळच्या महाराष्ट्राला अध्यात्माची व निवृत्तिपर भक्तीची उत्तम शिकवण मिळत गेली. अर्थात् या शिकवणुकीला पोषक असें साहित्यहि त्यामुळें स्वाभाविकच या कालखंडानें निर्माण केलें आहे.

" वाचें बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥ " ज्ञानदेवांनीं सत्काव्याची व्याख्याच मुळीं अशा प्रकारें केली आहे. त्यांच्या मतें सत्काव्य हें जसें रसात्मक असलें पाहिजे, तसेंच तें परतत्त्वाला स्पर्श करणारें अगर जीविताचें रहस्य उकलून दाखविणारेंहि असलें पाहिजे.

" काव्य प्रभावशाली होण्यास प्रसाद, माधुर्य इत्यादि काव्य गुणांची आवश्यकता आहे. निर्मल व शांत जलाशयांत पाहणाऱ्यास आपलें प्रतिबिंब स्पष्ट उमटलेलें दिसतें; त्याचप्रमाणें प्रासादिक ग्रंथांत प्रतिबिंबित झालेलें प्रमेय वाचकांच्या स्पष्ट अनुभवास येतें. गहन विषय सहज सुंदर भाषेंत सांगणें, हें कार्य कठीण आहे. त्यांतून प्रसाद गुणास नादमाधुर्याची जोड मिळाल्यास पहावयासच नको. असें उभयगुणयुक्त काव्य म्हणजे ज्ञानदेवांचाच दृष्टान्त द्यावयाचा तर ' सहजें मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु । आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या ॥ तरी स्पर्शें सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी । तेवींचि कानांकरवीं । म्हणवी बापु माझा ॥ (अ. ४ । २२०–२२१ ज्ञानेश्वरी) ज्ञानदेवांना असें प्रसन्न मधुर काव्य निर्मावयाचें होतें. " † आणि त्याच्या प्रसारासाठीं त्यांनीं ज्ञानदेवी सारखा महान् ग्रंथ लिहिला. गीतेसारख्या मूळ संस्कृत ग्रंथावर ज्ञानदेवी ही टीका त्यांनीं लिहिली. एवढेंच नव्हें तर मूळचें संस्कृतांतलें सर्व धार्मिक भावांचें ब्रह्मविद्येचें-भांडार त्यांनीं बहुजनसमाजाला आपल्या टीकेच्या रूपानें उघडें करून दिलें. नामदेवासारखा उत्तम कीर्तनकार हाताशीं धरून टाळमृदंगांच्या निनादांत ज्ञानदेवांनीं आपल्या विचारांची आम मराठी मनांत पेरणी केली.

आणि अशा प्रकारच्या ज्ञानसंवर्धनाचा व ज्ञानदानाचा महान् प्रयोग त्यावेळच्या थोर कवींनीं केला. तसेंच त्यांच्या या महान् कार्याला त्यावेळच्या कांहीं कवयित्रींनींहि हातभार लावला, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. ह्या कवयित्री कुणी मोठ्या विदुषी नव्हत्या तरी त्या भगवंताच्या एकनिष्ठ उपासिका

* मराठी साहित्य समालोचन पा. ३३.

† श्री. शं. वा. दांडेकर. सार्थ ज्ञानेश्वरी. प्रस्तावना. पा. ३६

होत्या. भगवंतावर त्यांची जशी मनोभावें भक्ति होती तशीच दृढ निष्ठाहि होती. भगवंताशीं त्या एकरूप होऊं पहात होत्या. भगवंताच्या जीवनांत आपलें जीवन विलीन करण्यासाठीं त्यांची धडपड चालली होती. त्यामुळें त्यांची कविता अतिशय प्रेमळ झाली. तिनें हृदयाची भाषा केली. " शिवाय तींत स्त्री स्वभावांतील मार्दव, भावनांची उत्कटता आणि भाषेचा साधेपणा हीं वैशिष्ट्यें असल्यामुळें संतकवींच्या कवितेपेक्षां ही संतकवयित्रींची कविता पुष्कळ बाबतींत अगदीं स्वतंत्र आणि पृथगात्म अशी झाली आहे. "*

मराठीच्या प्रभात कालांतील कवयित्री

महदाइसा ऊर्फ महदंबा

यादवकालीन समाजामध्यें चातुवर्ण्यामुळें जन्मजात उच्चनीचतेच्या कल्पना रूढ झालेल्या होत्या. त्या कारणानें लोकांच्या मनांत निर्माण झालेली असंतोषाची भावना समाजरचना विस्कळित करण्यास कारणीभूत झालेली होती. समाजाची ही स्थिति सुधारावी आणि समानतेच्या भूमिकेवर लोकांना जगतां यावें, म्हणून या काळांत एका मोठ्या पंथाची नव्यानें स्थापना झाली. ह्या पंथाचें नांव महानुभाव पंथ असें होतें; आणि हा पंथ स्थापण्याचा प्रयत्न त्यावेळीं श्री. चक्रधर स्वामींनीं मोठ्या धडाडीनें केला होता. प्राचीन काळांतील धार्मिक विचारसरणीस अनुसरून श्री. चक्रधरस्वामींनीं ह्या पंथाचा धर्मग्रंथ म्हणून श्रीमद्‌भगवद्‌गीता या ग्रंथास मान्यता दिली. त्याचबरोबर त्यांनीं श्रीकृष्ण व दत्तात्रय या दोनच देवता आपल्या उपासनेच्या देवता म्हणून ठरविल्या.

महानुभाव पंथांतील क्रांतिकारी विचारसरणीमुळें चातुवर्ण्यातील विषमतेची तीव्रता त्यावेळच्या समाजामध्यें कमी होत गेली. म्हणजे सर्व वर्णांचे घटक मानवी प्राणीच व सर्व पापपुण्याचे ते सारखेच साधक, असें असतां एक श्रेष्ठ व दुसरा कनिष्ठ असें मानणें चुकीचें वा विपरीत असल्याची शिकवण महानुभवांनीं समाजाला दिली. तसेंच या महानुभाव पंथानें स्त्रियांना उदार दृष्टीनें चांगल्या प्रकारची वागणूक दिली. "पुरुष देहाला हा पंथ ज्ञानप्राप्तीचें दृष्टीनें अधिक महत्त्व देत असला, तरी स्त्री देहांत मुक्ति मिळू शकत नाहीं, असें त्याचें मत नव्हतें. "ऽ या स्त्रीविषयक उदार धोरणामुळें ह्या पंथाच्या प्रचाराचे कार्यासाठीं कांहीं स्त्रियाहि आवडीनें काम करूं लागल्या; आणि त्याचें ठळक उदाहरण म्हणजे महदंबा हें होय.

---

* श्री. आजगांवकर. प्रस्तावना. महाराष्ट्र संतकवयित्री.

ऽ डॉ. कोलते. महानुभाव तत्त्वज्ञान. पान ४८८.

श्रीचक्रधर स्वामींनीं आपल्या कल्पनांचा प्रसार करतांना जे अनेक शिष्य मिळविले, त्या शिष्यांचेमध्यें महदाइसा ऊर्फ महदंबा हिचाहि समावेश होतो. महानुभावांच्या प्रसिद्ध व ठळक ग्रंथांच्यामध्यें या महदंबेच्या ‘ धवळ्यां ’ चाहि समावेश झालेला आहे.

ह्या महदंबेचें मूळचें नांव ‘ रूपाई ’ किंवा ‘ रूपाबाई ’ असें होतें. ‘ महदाईसा ’ व ‘महदंबा’ हीं तिचीं नंतरचीं नांवें आहेत. महानुभाव वाङ्मयांत महदाइसा हें नांवच विशेष प्रचारांत आल्यानें याच नांवावरून जगाला तिची ओळख झालेली आहे. श्रीचक्रधरस्वामींनीं तिच्या पणजीवरून तिचें हें नांव ठेवलें. ‘ लीलाचरित्रा ’ च्या एका पोथींत पूर्वार्धामध्यें यासंबंधींची हकीकत आली आहे, ती अशी—

“ माहादाइसे नामकरणः ॥ एक दीं गोसावीयांसी (चक्रधराला) उदयाचा पूजावसर जालेयानंतरें रूपाबाईसीं म्हणितलें : जी जी वायनायकाची (महदाइसेच्या बापाची) आजी तथा नावं माहादाइसे : तीये कैसी जी प्राज्ञे : कांहीं वाचीलें होतें जी : आन तयातें म्हाळाइसे प्रसन्न होती : तयासि प्रत्यक्ष बोले जी : तीये महादेवरायाची पुरोहितेः राजा तयातें भलतें होइक (= भविष्य) पुसे जी : ते तयासि भवीस (ष्य) स्फुरे जी : आन एक वेळ तेहीं विद्वांस जीतीले जी : ऐसीया जी प्राज्ञः बाइला : परि आपण (स्वतः रूपाई) कांहींचि नेणीजे जी : यावरि गोसावीये म्हणीतलें : बाइ माहादेवरायाचीए ठाइ तीए माहादाइसें : आन तुम्ही एथीची (चक्रधराची) माहादाइसें : तीए तयासि बोलत : तुम्ही यासी (चक्रधरासी) बोलावें : हें काइ जी : मी काइ बोलों जाणें : मग गौसावीयें म्हाणितलें : तरि हेंचि (चक्रधरच) तुमसीं बोलेल की : जी जी म्हणौनि श्रीचरणा लागली : ॥ २५० ॥ ” *

या महदाइसेचें महदंबा हें संस्कृत भाषेतील रूपांतर होय. केसोबाच्या ‘ रत्नमालास्तोत्रम् ’ या संस्कृत काव्यांत हें नांव आढळतें. तेव्हां महदाइसेचें महदंबा नांव करणारा तोच पहिला ग्रंथकार असावा.

महदाइसेची चरित्र विषयक माहिती ‘ इतिहास ’, ‘ लीलाचरित्र ’, ‘ ऋद्धिपुरलीला ’ व ‘ स्मृतिस्थळ ’ या ग्रंथांतून प्रामुख्यानें आलेली आहे. त्यावरून तिच्याबद्दल असें म्हणतां येईल कीं, “ महदाइसा जशी अत्यंत विरक्त होती तशीच ती जिज्ञासूहि होती. स्वामींना नाना प्रकारचे प्रश्न विचारून ती आपली जिज्ञासा तृप्त करीत असे. त्याचमुळें “ स्वामींनीं तिला निरय (उत्त. १०२), ब्रह्मानुभूति (उत्त. २७७), कलिधर्म (उत्त. ३०९), संन्यास (उत्त. ४४१), जीवप्रपंच व ईश्वर (उत्त. ४८९, ४९०) इत्यादींचें निरूपण केलें. अशा निरूपण

* प्रस्तावनाः—आद्य मराठी कवयित्री वा. ना. देशपांडे.

प्रसंगींच स्वामींनीं महदाइसेला ' डोळेयाचा ' (उत्त. २७८), दीक्षित कन्येचा, कर्म चांडाळाचा (उत्त. १२५) वगैरे अनेक दृष्टांत सांगितले. नागदेवाच्या खालोखाल अधिक दृष्टांत स्वामींनीं महदाइसेलाच निरूपण केले होते. या जिज्ञासू वृत्तीमुळेंच तिनें स्वामींना एकांकीच्या अनेक लीळा विचारून घेतल्या. किंबहुना चक्रधर स्वामींचें पूर्वचरित्र त्यांच्या मुखावाटें आपणाला उपलब्ध करून देण्याला महदाइसेची जिज्ञासाच कारणीभूत झालेली आहे, असें म्हटलें तर चुकीचें होणार नाहीं. ती जशी जिज्ञासू होती तशीच चर्चकहि होती. पुराण वगैरे ऐकल्यावर ती स्वामींबरोबर नेहमींच चर्चा करीत असे. म्हणून स्वामींनींच ' म्हातारी जिज्ञासकः म्हातारी चर्चकः म्हातारी एथ काही पूसतचि असे : ' (उत्त. ४९१) असे उद्‌गार तिच्याविषयीं काढलेले आहेत. "*

या महदंबेला काव्यस्फूर्ति अगदीं सहज होत असे. त्यासंबंधींचें उदाहरण म्हणून श्रीचक्रधर स्वामी पैठणला असतांना त्यांच्या उपाहारासाठीं सोजी कांडतांना तिनें गाइलेल्या पुढील ओव्या लक्षांत घेण्याजोग्या आहेत.

> गोमतीए तीरी : निळेया गूढरा : राजेया गुजरा : कृष्णराया
> नीळा गुढरू : राजा गुजरू : माणीकी मंडपीं : श्रीचक्रधर
> गोमटें सांजीटें : आखकुंडीचें : राजेया डौंडीचे : चक्रधरा
> गोरे अंग बाहीया : डवरीया चंदनें : श्रीचक्रधरा झणें : दीठी होए
> बापु म्हणे की भाइया : माझेया साजणी : गोत तों साजणीचाही यावो.

" यात ' बापु म्हणे की भाइया ' असा उल्लेख असल्यामुळें हें कर्तृत्व महदाइसेचें नसावें असें वाटण्याचा संभव आहे. पण या ओव्या ऐकून ' बाइः ऐसिया वोविया बापां भाऊवासि गाइजति की ' या स्वामींच्या प्रश्नाला जी जीः गोसावीचि बापु : गोसावीचि भाऊ : गोसावीचि साजणी गोत ' हें तिनें दिलेलें उत्तर पाहिलें म्हणजे या ओव्या महदाइसेनेंच रचल्या असल्या पाहिजेत असें दिसतें. शीघ्र काव्यरचना करून चक्रधरस्वामींचें आर्ततेनें चिंतन करणें हा महदाइसेच्या स्वभावाचा विशेष स्वामींच्या प्रयाणानंतरहि दिसून येत होता. ' नागदेवाचेया खांदावरि करू : राजा चक्रधरू बीजे करीं सोनेसळीं शेला : नेसला मालगंठी : म्हाइया आला भेटी : प्रभूचीये ' (स्मृ. स्थ. १२३) अशी चक्रधराची काव्यात्मक स्मरणें ती नेहमीं करीत असे ",† यांपैकीं उत्तरोक्त असलेल्या ओव्या ऐकून नागदेव म्हणाला, " नाथाची नाथवाणि : आणि रूपैची सिद्धवाणि : "‡

---

* डॉ. कोलते. श्रीचक्रधर चरित्र. पा. ८०

† डॉ. कोलते, श्रीचक्रधरचरित्र. पा. ८१

‡ ' स्मृ. स्थ. ' क्र. १२३. पा. ४१.

म्हणजे नागदेवासारख्या समकालीनास महदंबेच्या कवित्वाबद्दल गाढ आदर होता हें या स्मृतीवरून व्यक्त होतें !

आजपर्यंत उपलब्ध झालेल्या मराठी वाङ्मयांतील ग्रंथरचनेचा आद्य मान यादवकालीन महानुभाव पंथांतील कवींच्याकडे जातो, हें मागें सांगितलें आहेच. तेव्हां या संदर्भांत एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते ती अशी कीं, आजच्या मराठींत साहित्यसेवा करणाऱ्या लेखिकांच्या दृष्टीनें परंपरा प्रवर्तक या नात्यानें महदंबा हीच सर्वांत पहिली अशी कवयित्री होय. म्हणूनच मराठीच्या प्रभातकालांतील लेखिकांच्यामध्यें तिला अग्रस्थान दिलें जातें.

* * *

" महदंबेचे धवळे " या नांवानें महदंबेचें काव्य प्रसिद्धीस आलें आहे. या काव्यामध्यें तिनें भगवान् श्रीकृष्णाची कथा सांगितली आहे. श्रीचक्रधरस्वामींना ज्यांनीं पहिल्यांदां दीक्षा दिली त्या गोविंदप्रभूंच्या मनांत एकदां श्रीकृष्णाचा विवाहोत्सव करण्याची कल्पना आली. त्यामुळें नवरदेव श्रीकृष्ण हे आपल्या विवाहास तयार झाले आहेत, अशी कल्पना करून त्यांनीं, महदंबेस नवरदेवाच्या करवलीचा मान दिला. चक्रधरस्वामींनींहि महदंबेला तशी आज्ञा केली. त्यावेळीं महदंबेनें श्रीकृष्णाची करवली होऊन त्या विवाहाच्या निमित्तानें जीं गीतें स्वतः रचून म्हणून दाखविलीं, तींच गीतें " धवळे " या नांवानें प्रकाशित झालीं आहेत.

' धवळे ' हा शब्द मूळच्या ' धवल ' या संस्कृत शब्दावरून आलेला आहे आणि त्याचा अर्थ लग्नांत गावयाचें वरविषयक गीत असा होतो. हा धवल शब्द एकनाथाच्या ' रुक्मिणीस्वयंवरा'मध्यें " सभा बैसली निज बोधें। ढवळे गाती आनंदे " (१६-४६) असा आलेला असून नरेंद्रानेंहि आपल्या ' रुक्मिणीस्वयंवरां 'त त्याचा अनेकदां वापर केलेला आहे. (ओंवी २७५३ इ.) मूळ ' धवल ' शब्द हेमचंद्राचें ' छंदोनुशासन ' सोमेश्वराचा ' मानसोल्लास ' व शार्ङ्गदेवाचा ' संगीत रत्नाकर ' यांत आला असून गुजराती भाषेंतील ' धोळ ' शब्द त्याच शब्दावरून निर्माण झाला आहे,* या सर्व ठिकाणीं या शब्दाचा अर्थ विशिष्ट गीतप्रकार असाच अभिप्रेत झाला आहे.

या धवळ्यांच्या निर्मितीबाबत मूळ ऋद्धिपूर चरित्रामध्यें जी हकीकत आली आहे ती अशी:—

" म्हाइंभटीं केशवनायकः विठ्ठल नायकः परमेश्वर नायकः रूपनायकः मुख्य अवधे लोक पाचारिले : ते सर्वज्ञातें पाहात मांढवातु बैसले: सर्वज्ञ तयांतें अवलोकिती: मग म्हाइंभटीं अवघेयांसि गंधाक्षत केलें: विडे दीधले: बाहीति

* डॉ. ना. ग. जोशी. ' मराठी छंदोरचना ' पा. १८४–९४.

मांडवाचां द्वारीं मंगळतुरें: वाद्यंतरें वाजति: मग ऐसा अवसरीं लोकु धवळ गाति: रुपदेवोबा चांग बोला: म्हणे तें जवळीं नसताचि तेव्हाळि: सर्वज्ञ काकोसातें भणितलें: आसेली (महदाइसा) चांग बोला म्हणेना: चांग बोला म्हण: मग तेहि चांग बोला म्हणतिला: आन सर्वज्ञ बाइसातें भणितलें: आसेली गायेना भणे: गाये गाये भणे: भा: वाळिवांचा अवसरीं भणितलें: आसेली गाये म्हणे: गायेना म्हणे: बाइसीं भणितलें गाये गाये जी: आवो कांहीं गा: तरी धवल गावो जी: नागदेवो भागवताचे पाच धवळ गाइले: सर्वज्ञ भणितलें: आसेली हें ना म्हणे: आणिक कांहीं गाये म्हणे: तरी काये गाये जी: आसेली: कृष्णरुक्मिणी गजरथतुरें या थाट ऐसें गाये म्हणे: कैसे गायेजी: चक्रधराचे सीरीं धरूनिया चरण ऐसें गाये: म्हणे: ऐसा वरू दीधला: मग बाइसा स्फूर्ति जाली: बाइसीं: श्रीचक्रधराचे सीरीं धरूनिया चरणु: या पहिलीया कडवेया पासौनि लागला नीरुता जीवीं हें कडवेपर्यंत भणितलें: "...

धवळे हे सयमक असून दर कडव्यांत चार चरण येतात. सुप्रसिद्ध कन्नड कवि प्रा. य. रा. बेंद्रे यांनीं धवळ्यांच्या छंदाचा उगम हा द्राविड 'अक्कर' जातीच्या छंदांत गवसत असल्याचें म्हटलें आहे. * त्यांनीं "श्रीकृष्ण रुक्मिणी गरजथ करे" वगैरे महदंबारचित धवळ्याची तुलना इ. स. ९०० च्या सुमारास पंपकवीच्या 'मृगमंगाळियं निर्वेयं पक्केयं गणिदमं कंडियं मार्कंडीय"...ह्या वृत्ताशीं केली आहे.

धवळे हा छंदप्रकार तेलगु वाङ्मयांत आहे असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

डॉ. ना. ग. जोशी यांनीं आपल्या मराठी 'छंदोरचने' ‡ मध्यें धवळ्यांच्या छंदाबाबत बरेंच विवेचन केलें आहे. त्यांच्या मतें धवळ्यांच्या रचनेंत अष्टमात्रक आवर्तनें आढळतात. परंतु "धवळ्यांची रचना कांहींशी ग्रांथिक ओंवीसारखी असून तींत कसलींहि आवर्तनें शोधणें व्यर्थ आहे...त्यांत कांहीं स्थळीं अष्टमात्रक आवर्तनांचा आभास होत असेल, हें खरें. पण तें त्यांचें व्यवच्छेदक लक्षण खचित नव्हें. धवळे गातांना मीं ऐकले आहेत व गातांना त्यांत अक्षरांची फारच ओढाताण होते! म्हणून धवळ्यांत गण, मात्रा, अक्षरसंख्या यांची अपेक्षा करणें निरर्थक आहे!" † लोकसाहित्यांत विखुरलेलीं कितीक विवाह विषयक गीतें ऐकतांना देखील हाच अनुभव येतो. घरांत लग्न निघालें म्हणजे होणाऱ्या आनंदाला अशा वेळीं उधाण येतें; आणि बायका मनांतील भावना गीताच्या रूपानें साकार करीत असतात. छंदशास्त्राची त्यांना कल्पना

---

* ज्ञानेश्वरपूर्वकालीं कानडी वाङ्मय. म. सा. पत्रिका ७।५.

‡ पा. १८४–२०२.

† वा. ना. देशपांडे. आद्य मराठी कवयित्री. पा. १७. प्रस्तावना.

नसते. मनांत आलें तें गाइलें एवढेंच त्यांना माहीत. मात्र आपल्या शब्दाला व गीताला भरपूर लयबद्धता प्राप्त झाली पाहिजे, या बाबतीत कटाक्षानें त्या लक्ष घालीत असतात. महदंबेच्या बाबतींततहि असेंच झालें असलें पाहिजे.

महदंबेचे " धवळे " हे विलंबितोच्चारी सरणीचीं चतुष्पाद गीतें आहेत. त्यांत तीव्र प्रयत्न म्हणजे दीर्घ उच्चारणाचें प्राबल्य आहे; आणि ' पतितपावन ' व ' लवंगलता ' यांच्या रचनेला जवळची अशी ती मात्रागणी, तीव्रोच्चारी रचना आहे. उदाहरणार्थ—

श्री सर्वेश्वराचे सारीं धरुनियां चरण
मग धवळीं गाईन गोविंदु राणा ।
जेणें रुक्मिणि हरीयेली, तेणें पवाडे केले अतिबहुत
पाविजे परमागति भक्तीं आयिकतां कृष्ण चरित्र ॥ १ ॥

प्रसिद्ध महानुभाव कवि नरेन्द्र यानें आपल्या ' रुक्मिणी स्वयंवरां 'त ' धवळ्यां 'चा उल्लेख अनेकदां केलेला दिसून येतो.

महदंबा ही ज्याप्रमाणें मराठींतील आद्य कवयित्री म्हणून प्रसिद्धीस आली आहे, त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या चरित्रावर तिनें रचलेलें हें काव्य (धवळे) देखील या विषयावरील मराठींतील आद्यकाव्य म्हणूनच प्रसिद्धीस आलें आहे. म्हणजे श्रीकृष्णाच्या चरित्राला वाङ्मयीन स्वरूप देण्याच्या दृष्टीनें महदंबेनें केलेली ही कामगिरी अपूर्वाईची तशीच विशेष उल्लेखनीयहि होय. मराठी वाङ्मयांत श्रीकृष्णाच्या चरित्रानें नटलेला जो बराचसा भाग आहे; आणि ज्यामुळें मराठीच्या वैभवांत कांहीं अंशी का होईना चांगली भर पडली आहे, त्या वाढीला वा विकासाला महदंबेचे धवळेच प्रथम कारणीभूत झाले असले पाहिजेत असें यावरून अनुमान काढतां येईल.

रुक्मिणी स्वयंवरासारख्या विषयावर महदंबेनें पहिल्यादांच काव्यरचना केली असल्या कारणानें, तिच्या ह्या काव्याचा थाट एकंदरीनें अतिशय साधा पण हृदयंगम झालेला आहे. ऐनवेळीं सुचलें तें महदंबेनें इथें बोलून दाखविलें असल्या-मुळें, विचारांचें वैभव किंवा कल्पनेची भरारी तिच्या काव्यांत तितकीशी आढळत नसली, तरी तिच्या या साधेपणानेंच तिच्या काव्याला निराळें वैशिष्ट्य मिळवून दिलें आहे...

* * *

महदंबा ही एक साधी भोळी स्त्री होती. त्यामुळें अगदीं सामान्य स्त्रीच्या ठायीं असणाऱ्या स्त्रीस्वभावाचीं वैशिष्ट्यें तिच्या काव्यामध्यें व्यक्त झालीं आहेत. घरांतील लग्नसमारंभ म्हणजे स्त्रियांच्या आवडीचा व कोडकौतुकाचा विषय.

बारीक सारीक चालीरीतींची अंमलबजावणी करून घेणें हें त्यांचें समाधान. महदंबेनें कृष्णाच्या लग्नांतील बारीकसारीक गोष्टीहि मोठ्या बारकाव्यानें रंगविलेल्या आहेत. श्रीकृष्णाला पाठविलेला रुखवत देऊन विद्याधरी परत आल्या, त्यावेळीं 'श्रीकृष्ण तुम्हांला कसा काय दिसला?' असा प्रश्न रुक्मिणी जेव्हां मोठ्या उत्सुकतेनें त्यांना विचारते, तेव्हां त्या सांगतात—

" तिया म्हणती देवी सांडा हे मातु :
लागलें प्रेमपिसें जेव्हाळि देखिले श्रीजगन्नाथु :
रुक्मिणी पुढां बाळा सांगती वृत्तांतु :
सर्वांगीं न देखो तुमचा वो कांतु :
देखियलें जें आंग तेथोनि न ढळतीचि लोचन :
जाणती भक्तजन रुपें अगाधु गोविंदराणा :
कांई रूपें वानूं नंदाचा कुमरु :
तुझा पति आम्हां पीता दुजा नाठवे विचारु : *

"श्रीकृष्ण किती सुंदर आहे हें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. कारण ज्यावेळीं आम्हीं त्याला पाहिलें त्यावेळीं आम्हीच प्रेमवेड्या होऊन गेलों! पण तुझ्या पतीचें आम्हांला सर्वांगाण दर्शन घडलें नाहीं. परंतु त्याला आम्ही जेवढें पाहिलें तेवढाहि तो इतका सुंदर होता कीं, त्याला पहातांक्षणींच आमची नजर त्याच्यावर खिळून राहिली." रुक्मिणीला तिच्या भावी पतीचें वर्णन असें करून सांगितल्यानंतर आपण एखादीच्या पतीबद्दल अशी भाषा करणें बरें नाहीं, कदाचित रुक्मिणीं आपणाबद्दल गैरसमज करून घेईल अशी शंका विद्याधरींच्या मनांत येते. म्हणून त्या पुन्हां सांगतात, "बाई ग, तुझा पति आम्हांला आमच्या वडिलांसारखा आहे. त्याच्याबद्दल आमच्या मनांत या शिवाय दुसरा कोणताहि भाव नाहीं."

महदंबेनें स्त्रीस्वभावाची केलेली ही उकल तिच्या सूक्ष्म ज्ञानाची निदर्शक अशीच आहे. तसेंच तिनें केलेला हा भावनाविष्कार म्हणजे स्त्रीनें स्वतःच्या मनांतील आपल्या कल्पना आपल्याच शब्दांनीं आपल्या परीनें व्यक्त केल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय! या दृष्टीनेंहि या काव्याचें वैशिष्ट्य अपूर्वाईचें आहे.

या काव्याचें आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे गतिशीलता. या काव्यांत सर्वत्र एक प्रकारचें प्रवाहित्व आलेलें दिसून येतें. वर्णनें तशीं साधींच आहेत. पण भाषा ओघवती आहे. प्रसंगांचें चित्रण चित्तवेधक आहे. या संदर्भात कृष्ण दर्शनानें बेभान होऊन रुक्मिणी माडीवरून उडी टाकावयास जाते, तो पुढील प्रसंग उल्लेखनीय ठरेलः—

* धवळे पूर्वार्ध, ६०, ६१, ६२।२.

" झणीं माय करिसी चींता यादवांचा रावोकृष्ण पाहे वो त्वरीत :
मेदनी ठावो नाहीं देवी चालतां तुमचिया कांता :
जेथचि तेथ सैन्यें दीसती यतां :
गजरथां–वारुवां संख्या नाहीं तेथ
कवण तो श्रीकृष्णरावो वीप्रा मज दावी पां निरुता :
तुझेनि प्रसादें नमस्कारीन श्री जगन्नाथा :
पालव–छत्रां श्रीगारीं नाहीं (तेथ) अंतु :
हिरे विस्फुरती गरुढध्वजरथु :
तेथ पाहीं श्रीकृष्णरावो कंठीं कौस्तुभ हरितें रवीचें तेज :
चवरे सहस्र ढळती पीतांबरु शोभे देवी हा पती तुझा :
सौदरु श्रीकृष्णु देखियला झळकतां:
तंव तियेचें आकर्षिलें चित्त :
कैसी संभ्रयति जाली माडा वरुनियां घालूं पाहे झेप :
तंव वीप्रें सांवरिली बाळी म्हणे देवी नव्हें तुमचें उचीत: *

या प्रमाणेंच कृष्णाला न्हाऊं घालणाऱ्या रमणींची त्याच्या रूपयौवनानें—

" करचरण पोखीती नारी होतसे अमृताचा वरीसावो:
एकि आलिंगन चीन्तीति यकी चीत्रीस्ता होउनी पाहाती श्रीसुखभावो:

(उ. १७।३।४)

अशी अवस्था झाली तें वर्णन, किंवा द्वारकेंत वधूवर गृहप्रवेश करीत असतांना रुक्मिणीला उद्देशून नारदमुनींनीं केलेला—

" तुझा पती गौळी : देवी ऐसे वीनोद तेथ केले नारदें" (उ. ६०।४).

असा विनोद वगैरे हा सर्वच भाग चित्तवेधक आहे.

महदंबेच्या धवळ्यांतील वर्णनें हीं नरेंद्राच्या रुक्मिणी स्वयंवरांतील वर्णनांच्या प्रमाणें उपमा उत्प्रेक्षांनीं नटलेलीं नसलीं, तरी साधेपणांतच खुलून दिसणारीं आहेत. त्यांच्यामध्यें भावनेचा ओलावा आहे, जिव्हाळा आहे. सांगण्याची तऱ्हा आकर्षक, तशींच प्रसंगचित्रेंहि रेखीव आहेत. समईतील तेवत्या वातीप्रमाणें सर्वत्र सारें मंगल आहे. शिशुपालाला रुक्मिणी द्यावयाची असें निश्चित झाल्यानंतर विवाहपूर्व असा सर्व विधि होऊन जातो आणि मग जेव्हां रुक्मिणी आपला नवस फेडण्यासाठीं अंबाबाईस जाते, तेव्हांचा प्रसंग महदंबेनें कसा रंगविला आहे, हें या संदर्भांत पहाण्यासारखें आहे—

* धवळे, पूर्वार्ध ३२ ते ३५.

" आंगवळे सवें बहुत दळभारु :
तंव तिया सवें भाट पढती कैवाहु :
वाद्यंत्रें सुडाविलीं तंव विप्रु दावी खुणा :
हा पैल देखे तुझा वल्लभ गोविंदुराणा : ॥
अंबिके भुवनीं प्रविष्ट सुंदरी :
पूजा केली देवी पंचमा उपचारी :
दोन्ही कर जोडूनी बोले रुक्मिणी सुललित वाचा :
तुं मज वरद होइ वेगीं मेळवी यादव राजा : ॥
अंबिके रायांगणीं उभी ठेली बाळी :
तंव वीप्रें येतु देखिला वनमाळी :
सांवळा कमळनयन देवी पाहे पां लावण्यसिंधु :
तंव तीया रुक्मिणी दोन्ही करीं जोहारिलें गोविंदु : ॥
हंसगती चाले बाळा :
आनंदे आंसुवें कांहीं न देखेचि डोळां :
कंपित सासंकित अंगीं रोमस्वेद लल्लाटीं :
तंव तिया रुक्मिणी यादवरावो श्रीकृष्ण देखिला थाटी : ॥*

धवळ्यांमध्यें महदंबेच्या कांहीं साध्याच पण सुंदर कल्पनाहि पुढीलप्रमाणें आढळतात—

(१) घातला कंठीं वेगीं पातला परमानंदु :
तें सुख काइं वानुं जैसा मीनला प्रीयो गोवींदु : (पू. ५९।३)
(२) जुंझे बळीभद्र जसा प्रळयाचा काळु: (उ. ५।१)
(३) वाताहतें पत्रें तैसी भेणें रखमीणी: (उ. ८।१)
(४) सुंदर गोपीनाथ देखूनी प्रारुखलें नक्षेत्रांचें भ्रमण : (उ. ५६।४)

विशिष्ट प्रसंगीं तात्कालिक स्फूर्ति झाल्यानंतर महदंबेनें ताबडतोब ह्या काव्याची रचना केली असल्यामुळें, गुणाबरोबरच या काव्यामध्यें कांहीं दोषहि आढळून येतात. " वृत्तशैथिल्य, विस्कळित रचना (उ. ४६।४), पुनरुक्ति (पू. ४३।२ व ७९।२), यमकभाव (पू. ३०।३, ४) व ढिलाईचीं यमकें (पहिलेंच कडवें)-हें "‡ या काव्यांतील ठळक दोष होत. तथापि केवळ सुचेल तसें गाइलेलें हें गीत या प्रकारचें पहिलेंच असल्यानें त्यास त्या दृष्टीनें विशेष महत्त्व आहे.

---

* धवळे, पूर्वार्ध. ७६–७९.

‡ वा. ना. देशपांडे. प्रस्तावना. आद्य मराठी कवयित्री. पा. २२

गोविंदप्रभूंच्यासमोर महदंबेनें धवळ्यांचा पूर्वार्ध रचला. त्यानंतर उत्तरार्धाची रचना तिच्या उतारवयांत झाली. ह्या उत्तरार्धनिर्मितीचा इतिहास 'स्मृतिस्थळां'त‡ आला आहे तो असा—

"म्हाइंभटीं रुक्मिणीसैंवर करणें : ॥ एकुदीसु म्हाइंभटीं : लक्ष्मीधरभटीं महादाइसांतें म्हणितलें : समोरें रुक्मिणीसैंवर कां न करा : महादाईसी म्हणितलें : मज काइ करवैल : तैं गोसावीं वरुदीधला म्हणोनि स्फुरलें : म्हाइंभटीं : लक्ष्मीधरभटीं म्हणितलें : तरि आन्ही शब्द घडवुनि : तुम्ही गा : महादाइसीं मानिलें : तेंहीं शब्द घडउं घडउं पदें बांधिलीं : आणि महादाइसीं गाइलीं : यापरी दुसरी माळ केली : "

ही आख्यायिका जर खरी मानली तर उत्तरार्धाच्या रचनेच्या श्रेयाचा निदान निम्मा तरी वांटा म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट यांना द्यावयास पाहिजे. परंतु या दोघांनीं इथें सांगितल्याप्रमाणें केवळ महदंबेसाठींच उत्तरार्ध केला, त्यामुळें तो तिच्याच नांवानें ओळखला जाणें वाजवी आहे. तथापि केवळ महदंबेचेंच काव्य म्हणून त्याचा उल्लेख इतरत्र न आल्यानें त्याचा इथें अधिक विचार केलेला नाहीं.

धवळ्यांच्या रचनाकालाबाबत निश्चित अशी माहिती अद्याप उपलब्ध झालेली दिसत नाहीं. तथापि "त्यांचा पूर्वार्ध ज्ञानेश्वरीपूर्वीं निर्माण झाला, असें म्हणतां येतें. 'ऋद्धिपुरलीले' वरून गोविंदप्रभूंच्या हयातींत पूर्वार्ध रचिला गेल्याचें दिसतें. या ग्रंथाच्या एका पोथींत* गोविंदप्रभूंचा निधनकाल 'शके १२०७ व्ये संवत्सरे भाद्रपद शु॥ अष्टमी जेव्हा नक्षेत्र अवसी पहारा आंतु" असा दिला आहे.† तेव्हां यापेक्षां अधिक बळकट पुरावा हातीं येईपर्यंत शके १२०८ पूर्वीं केव्हांतरी धवळ्यांचा पूर्वार्ध निर्माण झाला असला पाहिजे; आणि धवळ्यांचा उत्तरार्ध हा १२३४ पूर्वीं केव्हांतरी जन्मास आला असला पाहिजे, असें स्थूलमानानें म्हणतां येईल.

महदंबेनें लिहिलेलें दुसरें काव्य म्हणजे "मातृकी रुक्मिणी–स्वयंवर" हें होय. या काव्याचा विषय तिच्या धवळ्यांचाच असला तरी इथें नीटनेटकेपणा बराचसा आढळतो. तिच्या भाषेला अधिक सुटसुटीतपणा आला असून रचनासौष्ठवहि उठावदार झालें आहे. या काव्याची रचना ओंवी छंदांत झालेली आढळून येते. महदंबेनें हाताळलेला हा नवा छंद असल्याचा उल्लेख नागदेवाचार्यांच्या १३८ व्या स्मृतींत आलेला आहे. खेरीज या काव्याच्या अखेरीस खुद्द महदंबेनेंच या नव्या ओंवी छंदाबद्दल पुढील उद्गार काढले आहेत—

‡ स्मृ. स्थ. क्र. २०९ : पा. ५७.
* वि. ना. देशपांडे–संपादित 'ऋद्धिपुर वर्णन' पा. १४०
† अ. ना. देशपांडे, प्रस्तावना. आद्य मराठी कवयित्री. पा. १५

" जालें हें संपूर्ण रुक्मिणी सैंवर :
मातृकी नागरः वोंवीबंधीं : "

या काव्यामध्यें महदंबेनें केलेलें श्रीकृष्णस्वरूपाचें पुढील वर्णन फारच बहारदार झालें आहे—

" कांसे पीतांबरु कंठीं कुंदमाळा :
कांतु शोभे सावळा : रुक्मिणीचा :
खांदावरि कावडी पडिभरें : चालतु :
तो खेळे बनांतु : दत्तु सए :
गावो द्वारावती गोमतीए प्रांतीं :
गोदरीयें क्रीडती : चक्रपाणी :
धावो देउनि अविप्रे घाली निजपदीं :
खेळे कृपानिधि : रिध पुरी :
चांपे गौर कांती चांपयाच्या इति :
चांपौलीं साजती : चक्रपाणी : "

या दोन्ही काव्यांच्या खेरीज " गर्भकांड ओव्या " या नांवाचें आणखी एक काव्य महदंबेनें लिहिलें आहे. शिवाय आणखीहि कांहीं तिची रचना असणें शक्य आहे. परंतु अद्याप हें सारें अप्रकाशित असल्यामुळें त्यासंबंधीं कांहीं विचार करणें अशक्य आहे.

महदंबेनें रचिलेल्या या काव्यांतून तत्कालीन समाज परिस्थितीची बरीच माहिती मिळते. त्या वेळच्या वाद्यांच्यामध्यें " निशाण, टाळ, शंख, तुरे हीं असत. वाहनांत घोडें, पालख्या, अंबाऱ्या होत्या. ' दुसे ' म्हणजे तंबू होते. भांडारी अधिकारी असत. राजे लोक ' आंगवळे ' बाळगीत. पुरुषांच्या अलंकारांत बुगडिया (कडीं), सांखळिया (गोफ), झळुंबके (कुंडलें), तोडर (तोडा) यांचा आणि स्त्रियांच्या अलंकारांत कांकणें, अंदु (चाळ), रत्नहार यांचा समावेश होई. अंगास चंदनाची उटी व कपाळावर कस्तुरीचा टिळा लावीत. अन्नाला कापराचा सुवास देत–(उ. ६२।३). स्त्रिया नवऱ्याचें उष्टें खात (पू. ५८।३). मेव्हणा थट्टेचा विषय असे (उ. १०।३).

लग्नामध्यें औक्षण करणें (पू. ६८।२), तैलादि मर्दणें (पू. ६८।१), लोणवाण–केळवाण–मूळनहाण करणें (पू. ७४।३), रुखवत देणें (पू. ४८।२), वरास बासिंग बांधणें (पू. ६९।४), त्याला मंडपांत शिरतांना वधुमाय व वरमाय यांनीं ओवाळणें (उ. २७।१,२), नर्तकींचा नाच होणें (उ. २९।३) इ. इ. सोहळे होत. "*

* वा. ना. देशपांडे. आद्य मराठी कवयित्री. पा. १९-२०.

महदंबेच्या काव्याची भाषा अगदीं जुन्या वळणाची आहे. ह्या काव्यांत बऱ्याच जुन्या शब्दांचा भरणा आहे. उदाहरणार्थ, 'दायपसाय' हा शब्द शके १०७९ च्या पळसगांवच्या शीलालेखांत आलेला आहे. महदंबेनें आपल्या काव्यांत त्याचा वापर केला आहे. तसेंच तिनें "सातु, वोगर, बोणें" असे कांहीं कानडी शब्द व "वलिये, आरोगणें (आरोगवूं)" असे गुजराथी शब्दहि आपल्या काव्यासाठीं उपयोगांत आणिले आहेत. ज्ञानेश्वरींत सांपडणारे शब्द तर या काव्यांत कितीतरी दृष्टीस पडतात.

साध्या विचारांची हृदयंगम मांडणी आणि ओघवती भाषा हा महदंबेच्या काव्यांचा प्रमुख विशेष होय. महदंबेच्या 'धवळ्या'मुळें मराठीस एक नवा छंद वा वृत्तप्रकार मिळाला हाहि तिच्या काव्याचा आणखी एक विशेष आहे. ह्या धवळ्याचें वृत्त कांहींसें अभंगाच्या स्वरूपाचें असून त्याच्या प्रत्येक कडव्याचे चार चरण आहेत. दोन दोन चरणांचे शेवटीं यमक आहे. या वृत्ताला गणमात्रांचा किंवा अक्षर संख्येचाहि निर्बंध नाहीं. *

मराठी सारस्वतास महदंबेनें ही प्रत्यक्ष देणगी जशी दिली आहे, तशीच कांहीं अप्रत्यक्ष देणगीहि दिलेली आहे. आजच्या मराठींत 'चरित्र' म्हणून जो वाङ्मयप्रकार रूढ झालेला आहे, त्याचें मूळ महदंबेच्या काव्यामध्यें सांपडतें ! श्रीचक्रधरस्वामींच्या सहवासांत महदंबा नेहमीं असल्यामुळें त्यांना ती अनेक प्रश्न विचारीत असे. त्यामुळें या प्रश्नांना उत्तर देण्याच्या हेतूनें श्रीचक्रधरस्वामी जें बोलत, तें त्यांच्या आयुष्यांतील अनेक गोष्टींचा उलगडा करीत बोलत असत. त्या कारणानें गद्यवाङ्मयास यावेळीं नकळत आरंभ झाला व लोकांच्या समोर श्रीचक्रधरस्वामींचें चरित्र आपोआप आलें ! चक्रधराच्या सिद्धांतसूत्र पाठांत अशीं प्रश्नोत्तरें बरींच सांपडतात. या संदर्भात लीलाचरित्रांतील पहिल्या भागामधील एकांकांतील पुढील माहिती पहाण्याजोगी आहे—

"का उरळीची का पारव्या :

प्रसिधि आइकौनि : रतीचीया चाड तिथें आली : देवतेची आज्ञा लंघोनि साउमेया व वचवे : तेथ ब्रह्मचर्याची प्रवृत्ति : म्हणौनि बाहेरी बीजें न करीति : ऐसी साव अहोरात्रें उभी होती : तिएचा आग्रह देखोनि तें पुरत्यजीलें : तिए समई गुजरातेचेया प्रधानचिया कूमराचें देह गेलें : तें समसाना आणिलें होतें : तेव्हळिं तें स्वीकारीलें : ॥ आणि महादाईसीं गोसावियातें पुसीलें : हां जि : आमचे गोसावी काइं हें गुजराथेचेया प्रधानाचे कुमरू : हां जि : मग : निगो कैसें दीधलें : या उपरि रामयातेचि गोष्ट सांगीतली : ..."

* श्री. आजगांवकर. 'महाराष्ट्र संत कवयित्री' पा. १३.

महदंबेच्या काल निर्णयाबद्दल अद्याप निश्चित पुरावा हातीं न आल्या-कारणानें मतभेद आहेत. तथापि तेराव्या शतकामध्यें तिचें वास्तव्य असावें असें दिसतें. * नागदेवाच्यार्यांच्या स्मृतींत महदंबेबद्दल आणि तिच्या काव्या-बद्दलहि पुढील गौरवपर उद्गार आलेले आहेत—

" एकादा महादाइसीं काइसेया प्रकरणावरूनति वोवीया गाइलीया तें नेणीजे : तीया वोवीया ऐसींया । नागदेवाचेया खांदावरि श्रीहरु । राजा चक्रधरु राज्य करी ।। सोनसळा सेला नेसला माल्गंठी । म्हाइंया आला भेटी प्रभुराया ।। ऐसीया वोवीया आइकुनि भटोबासी : नागदेवानें म्हणितलें : नालंचीया तीया नाथ वाणी : आन रुपैचीया तीया आसुचीया सीधवाणी : " (क्र. १२८)

" आन म्हातारी धर्मरक्षक : प्रीतिरक्षक : सहृदत्व (रक्षक) ऐसां दुखपूर्वक आळापी भटोबासीं सोखु केला : " (क्र. २४८)

शेवटीं श्री. वा. ना. देशपांडे यांनीं म्हटल्याप्रमाणें सारांशानें महदंबेबद्दल सांगावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, " ज्याचें कर्तृत्व एका स्त्रीकडे जातें, व ज्याचा पूर्वार्ध ज्ञानेश्वरापूर्वी निदान चार वर्षें म्हणजे कमींतकमी साडेसहाशें वर्षांमागें निर्माण झाला, असें हें काव्य (धवळे) मराठी भाषाभक्तांस अपूर्व वाटेल !" महदाइसेचें मातृकी रुक्मिणी स्वयंवर चांगल्यापैकीं काव्य आहे, व पुढें मागें तिचीं कदाचित् आणखींहि कांहीं चांगलीं काव्यें उपलब्ध होतील. पण मराठी साहित्यांत महदाइसेच्या काव्यकीर्तीची द्वारकानगरी वैशिष्ट्य संपन्नतेमुळें धवळ्यांच्याच एका खांबावर स्थिर राहील, यांत शंका नाहीं.

• • •

मुक्ताबाई

तेरावें शतक म्हणजे एक प्रकारें सामाजिक क्रांतीचाच काळ होय. महानु-भाव पंथाची स्थापना होऊन देखील चातुर्वर्ण्यामुळें समाजाची विस्कटलेली घडी आटोक्यांत येऊं शकली नव्हती. त्यामुळें ज्ञानदेवांनीं हिंदुधर्माचें तत्त्वज्ञान सर्व-सामान्य लोकांना समजावून देण्यासाठीं म्हणून नव्यानेंच भागवतधर्माची स्थापना केली. या नव्या क्रांतीमुळें माणसांच्या विचारांत आणि आचारांतहि बदल होत गेला. ज्ञानदेवांनीं श्रीकृष्णाला आपल्या भागवत धर्माची मुख्य देवता मानल्या-कारणानें भक्तिमार्गाचा अवलंब सर्वत्र होऊं लागला. मनोभावानें देवाची भक्ति

---

* महदंबेचे " हे धवळे शके १२०८ पूर्वींच्या सुमारास लिहिलेले आहेत. "
—डॉ. कोलते भास्करभट्ट बोरीकर. पा. १६६.

करणाऱ्या लोकांची जात ही एकच समजली जावी, हें तत्त्व अस्तित्वांत येऊं लागलें. त्याच्या अंमलबजावणीसाठीं भक्तमंडळींनीं पंढरीच्या विठोबाचें देऊळ हेंच पवित्र क्षेत्र ठरविलें. तेथील विठोबा त्यांचा पाठीराखा झाला ! याच ठिकाणीं सर्वांठायीं आत्मा एकच आहे हें पटवून द्यावें म्हणून ज्ञानदेवांनीं ज्ञानदानाचें नवें विद्यापीठ स्थापन केलें. या विद्यापीठाच्या व्यासपीठावरून त्यांनीं सर्वांना प्रेमानें एकत्र आणावें म्हणून लोकांना आपली ज्ञानदेवी गाऊन दाखविली. भगवान् श्रीकृष्णांनीं माणुसकीचा महान् धर्म सांगितलेली भगवद्गीता ज्ञानदेवांनीं सोपा अर्थ लावून, आपल्या मराठी मायबोलींत सर्वसामान्य लोकांच्या समोर ज्ञानदेवीच्या रूपानें ठेविली. सामान्य मनाला माणुसकीची शिकवण सांगितली. त्यासाठीं त्यांनीं नामदेवासारखा प्रख्यात कीर्तनकार हाताशीं घेतला. टाळमृदंगांच्या निनादांत पंढरीचें राऊळ दुमदुमून गेलें. ज्ञानदेवांच्या कार्याला जोरानें आरंभ झाला.

" टाळ मृदंग विणे सुस्वर । नादें दुमदुमलें अंबर
त्यांतहि टाळियांचा गजर । अपरंपार ओढवला ॥ "

भगवंतांच्या नामोच्चाराच्या खालोखालच ज्यांच्या नामोच्चारानें सामान्य लोकांची वाणी पवित्र झाली, त्या ज्ञानदेवांना मुक्ताबाई नांवाची एक धाकटी बहीण होती; व निवृत्तिनाथ व सोपानदेव हे भाऊ होते. या चारी भावंडांचें आयुष्य समाजाशीं झगडण्यांत गेलें. वास्तविक या भावंडांच्याविषयीं अद्याप भरपूर माहिती उपलब्ध झालेली नसल्यानें त्यांच्या कर्तबगारीची थोरवी मापणें त्या मानानें अशक्य झालें आहे. परंतु आजवर उपलब्ध झालेल्या त्यांच्या वाङ्मया-वरून मात्र असें म्हणतां येईल कीं, " या चार अलौकिक व्यक्तींनीं महाराष्ट्र वाङ्मय मंदिराचा पाया घातला. व तो इतका बळकट घातला कीं, त्यावर उभार-लेल्या महाराष्ट्र–वाङ्मय–मंदिरास कालत्रयींहि धोका येण्याचा संभव नाहीं."* म्हणजे त्यांचें वाङ्मय एवढें वैशिष्ट्यपूर्ण आहे. तसेंच अल्पवयांतहि या भावंडांनीं जी अलौकिक कामगिरी केली व सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांत क्रांति करून आपलें स्थान अमर केलें, त्यामुळें त्या सर्वांना त्यांच्या समकालीन व नंतरच्या महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व संतकवींनीं गुरुस्थानीं मानलें.

आईबापांविना पोरकीं झालेलीं हीं भावंडें समाजानें त्यांना आपल्यापासून दूर केल्यामुळें अपमान गिळून रानोमाळ भटकत होतीं. पदोपदीं समाजाविरुद्ध बंड पुकारून व परिस्थितीला जिंकून स्वाभिमानानें कसें जगावें याचा धडा घेत होतीं. यांपैकीं मुक्ताबाई ही सर्वांत लहान. तरीदेखील तिच्या रक्ताचा अणुरेणू बंडखोर-वृत्तीनें भारून गेला होता.

* श्री. आजगांवकर. महाराष्ट्र संतकवयित्री. पा. २४.

मुक्ताबाई ही आपल्या भावांच्या प्रमाणेंच विद्वान् होती. त्यांच्याप्रमाणें विरक्त वृत्तीनें ती रहायची. तिनें आजन्म कौमार्यव्रत पाळलें होतें. मरणसमयीं ती अवघी अठरा वर्षांची होती. परंतु तेवढ्या लहान वयांतहि तिनें अभंग, पदें, कल्याणपत्रिका, हरिपाठ, ताटीचे अभंग अशी काव्यरचना केली. आज ती विशेष प्रसिद्ध आहे. मुक्ताबाईची ही सर्वच रचना गोड आहे; व स्त्रियांच्या कोमलपणाची छटा तींत पसरली आहे. सूर्योदयापूर्वीं पक्षी बिलबिल करूं लागले म्हणजे जो आनंद होतो तोच हिचे अभंग वाचतांना होतो हिचे 'ताटीचे अभंग' तर विशेषच गोड आहेत. एक दिवस ज्ञानेश्वरांस पाहून कोणी टवाळानें या संन्याशाच्या पोराचें दर्शन घडलें, हा आपणास मोठा अपशकुन झाला असें म्हटल्यावरून, ज्ञानेश्वर आपल्या मनांत फार खिन्न होऊन खोलींत जाऊन बसले; व खोलीचीं ताटी किंवा दार उघडून मुक्ताबाईस आंत घेत ना. यावेळीं ताटी उघडून आपणांस आंत घेण्याविषयीं मुक्ताबाईनें विणवणी केली. हेच अभंग हल्लीं ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत."* या अभंगांच्या कांहीं ओळी अशा आहेत —

मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।
संत जेणें व्हावें । जग बोलणें सोसावें ॥
तरीच आंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान ।
थोरपण जेथें वसे । तेथ भूतदया असे ॥
रागें भरावें कवणाशीं । आपण ब्रह्म सर्व देशीं ।
ऐशी समदृष्टी करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥
योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ।
विश्व झालीया वन्ही । संतमुखें व्हावें पाणी ॥
शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ।
विश्व परब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥
लडिवाळ मुक्ताबाई । बीज मुद्दल ठायीं ठायीं ।
तुम्ही तरोन विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

मुक्ताबाईचे हे अभंग पाहिले म्हणजे एवढ्या लहान वयांत तिनें ही रचना केली कशी याबद्दल मन थक्क होऊन जातें! तसेंच एवढ्या लहान मुलीच्या ठायीं अशी दांडगी भक्ति आणि विरक्ति कोठून आली आणि तिला जगाचें एवढें ज्ञान तरी कसें प्राप्त झालें, याबद्दल अचंबा वाटतो!

या ताटीच्या अभंगासारख्या कवनांतून 'मुक्ताई' असा इतरत्र आलेला उल्लेख न येतां 'मुक्ताबाई' असा अखेरीस उल्लेख आल्यामुळें हे अभंग तिचेच आहेत किंवा कसे याबद्दल मतभेद आहेत.

---

* महाराष्ट्र सारस्वत. पा. १५५,५६.

मुक्ताबाई ही काव्य आणि अध्यात्म या दोन्हीहि बाबतींत ज्ञानदेवाच्या अगदीं जवळ येते. ज्ञानदेवाच्या सहवासांत तिच्या स्फूर्तीला उजाळा मिळाला. आपल्या आध्यात्मिक अनुभवांचें चमत्कृतिपूर्ण वर्णन करतांना ती किती पटाईत होती हें पुढील वर्णनावरून दिसून येतें—

" मुंगी उडाली आकाशीं । तिनें गिळिलें सूर्यासी
थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला
माशी वियाली घार झाली । देखोनि मुक्ताई हांसली "

मुक्ताबाईचा 'हरिपाठ' हि काव्यमधुर आहे. तिच्या चांगदेवावरील अभंगांतून तिचा अध्यात्माधिकार अधिक स्पष्ट दिसतो. हे अभंग काव्यदृष्ट्याहि रम्य आहेत. " त्यांत चांगयास आपला बाळ कल्पून ती त्यास ज्ञानामृतानें न्हाऊ घालते, अव्यक्तानें विणलेल्या अविनाशी पाळण्यांत टाकते, त्याचें 'नाम' करण करते, अनुहात टाळी वाजवून त्याला स्वस्वरूपीं निजविते व मनपवनाची दोरी हातीं घेऊन त्याचा डोळा अलक्ष्यीं स्थिर करते. ही रूपकपद्धति मुक्ताबाईनें ज्ञानेश्वरांपासून उचललेली दिसते. "*

एका प्रसंगीं मुक्ताबाई आणि जनाबाई या सारख्या वयाच्या व सारख्या अधिकाराच्या कवयित्रींनीं एकत्र बसून म्हटलेल्या ओव्यांतील मुक्ताईची ओवी जशी काव्यमय तशीच ज्ञानमयहि आहे.

पहिली माझी ओवी । परतूनि पाहिलें
दृष्टीनें देखिलें । निजरूपीं

येथून प्रारंभ करून योगमार्गातील एकेक खुणा सांगत हा स्वानुभव चित्रपट तिनें पुरा केला आहे. †

आपल्या भावंडांच्याप्रमाणेंच मुक्ताबाईला योगविद्या अवगत होती. योगविद्येचा अभ्यास करून लेखन करणारी मराठींतील ही पहिलीच कवयित्री होय.

" नामबळें देहीं असोनियां मुक्त । शांति क्षमा चित्त हरिभजनें
दया धरा चित्तीं सर्वभूतीं करुणा । निरंतर वासना हरिरूपीं
माधव मुकुंद हरिनाम चित्तीं । सर्वत्र पैं मुक्ति नाम पाठें
मुक्ताईचें धन हरिनाम उच्चारु । अवघाचि संसारु मुक्त केला "

म्हणजे अशा प्रकारची कल्पना बाळगूनच मुक्ताबाईनें आपलीं देवाविषयींचीं मतें बनविलीं होतीं असें दिसतें. एकनाथांनीं ही मुक्ताबाई म्हणजे " मुक्तपणें मुक्त अशी योगियांची विश्रांति " † असें तिचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे.

---

* डॉ. तुळपुळे. महाराष्ट्र-सारस्वत पुरवणी. पा. १००
† डॉ. तुळपुळे. पांच संतकवि. पा. २१५

मुक्ताबाई जशी स्वाभिमानी तशीच सडेतोड विचारांचीहि होती. तिला चावगें खपत नसे. एकदां ती आपल्या भावांच्याबरोबर पढंरपुरास गेली असतां सर्वांनीं विठोबासमोर बसलेल्या नामदेवासहि प्रदक्षिणा घालून नमस्कार केला. त्यामुळें आपण इतरांच्यापेक्षां श्रेष्ठ असल्याची जाणीव नामदेवाला झाली ! त्यानें तसें बोलून दाखविलें ! त्या कारणानें मुक्ताबाईला राग आला. म्हणाली—

अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार नाहीं गेला ?
मान अपमान वाढविसी हेवा । दिवस असतां दिवा हातीं घेसी
परब्रह्मासंगें नित्य तुझा खेळ । आंधळ्याचे डोळे कां बा झाले ?
कल्पतरु तळवटीं इच्छिली ते गोष्टी । ऐसा द्वाड आहे जगामाजी

कारण तिची अशी समजूत होती कीं, माणसाला ज्ञान असल्याशिवाय भक्ति जमणार नाहीं; आणि ज्ञान मिळविल्याशिवाय अहंकारहि जाणार नाहीं !

मुक्ताबाईच्या या मर्मभेदक बोलण्यानें नामदेवाला वाईट वाटलें. पण तिनें त्याची फिकीर केली नाहीं. शेवटीं ज्ञानदेवाच्या गुंफेंत गोरा कुंभार याजकडून सर्व संतांची परीक्षा करावी असें ठरलें. त्यांना गुरुपदेश देण्याचें घाटलें. त्यावेळीं गोरोबाला बोलाविण्याची कामगिरी मुक्ताबाईकडेच आली, " डक्ताबाई म्हणजे प्रत्यक्ष आदिमायेचा अवतार ! ज्ञानेश्वरापेक्षांहि तिची वृत्ति बंमुखोर. तेव्हां ती गोरोबांकडे जातांना कशी दिसली याचें वर्णन असें केलें आहे—

मोतियांचा चुरा फेंकिला अंबरीं । विजूचियापरी कीळ झालें ।।
जरी पीतांबरें नेसविलीं नभा । चैतन्याचा गाभा नीलबिंदु ।।
तळीपरी पसरे शून्याकार जालें । सर्पाचींही पिलें नाचूं लागे ।।
कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायीं । भेटली मुक्ताबाई गोरोबाला* ।।

सुरवातीला मुक्ताबाई व तिचीं भावंडें हीं संन्याशाचीं मुलें म्हणून देवाच्या दारीं येण्याची त्यांना मुभा नव्हती. त्यामुळें देवाचें खरें स्वरूप जाणून घेण्याची उत्कंठा त्यांना लागली. त्यासाठीं त्यांनीं आपल्या समाजांतील धर्ममार्तंडांच्या विरुद्ध क्रांतीचें रणशिंग फुंकलें. मुक्ताबाईनेंहि या लढयांत भाग घेतला.

देउळाच्या कळशी नांदे एक ऋषि । तया घातली पुशी योगेश्वरी ।।
दिवसां चांदिणें रात्रीं पडे उष्ण । कैसेनि कठिण तत्त्व जालें ।।
ऋषी म्हणे चापेकळिकाला पैं कांपे । प्रकाश दीपें निघोन जाय ।।
ठायींच्या ठायीं असें पहातां न दिसे । मनाच्या धारसें एक होय ।।
एकट एकलें वायाचि पैं गुंफिलें । मुक्त पैं वरिलें सहज असे ।।
वैकुंठ अविट असोनि प्रकट । वायाचि आडवाट मुक्ताई म्हणे ।।

* महाराष्ट्र संतकवयित्री पा. ३४

त्यावेळीं अशा प्रकारचें कांहींतरी गूढ तिच्या मनांत एकसारखें खळखळ निर्माण करीत होतें. प्रचीति वादाचा तिला अनुभव आला होता. गोरोबानें संतांची परीक्षा करीत असतां नामदेवास 'कच्चा घट' ठरविलें, त्यावेळीं मुक्ताबाईनें जें वर्णन केलें तें देखील अशाच प्रकारचें गूढ दर्शवितें. म्हणजे यावरून असें दिसून येतें कीं, आध्यात्मिक ज्ञानाची कल्पना आल्यामुळें खरें सत्य शोधण्याकडे तिची दृष्टि लागलेली होती.

मराठीमध्यें अलिकडे गूढगुंजन म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो व ज्या गूढवादाची चर्चा केली जाते त्याचें मूळ स्त्रियांच्या लेखनाच्या दृष्टीनें पहातां पहिल्यांदां मुक्ताबाईच्या काव्यांमध्यें गवसतें असें म्हणतां येईल. ज्ञानेश्वरासारख्या महान् व्यक्तीच्या सहवासांत मुक्ताबाईच्या मनांत गूढविचार चालणें अस्वाभाविक दिसत नाहीं. या भावंडांचें सारेंच वेगळें होतें, वरच्या दर्जाचें होतें. त्या कारणानें त्यांच्या कल्पनांना येणाऱ्या मूर्त स्वरूपामुळें होणारा भावनाविष्कारहि वेगळा होता. त्यांचें तेंच वैशिष्ट्य होतें. त्यामुळें "दळितां कांडितां। तुज गाईन अनंता।" अशी जनाबाईप्रमाणें मुक्ताबाईची कल्पना नव्हती. परिस्थितीच्या प्रखर ज्वालांमधून आपलें वैशिष्ट्य टिकवीत तिला सहीसलामत बाहेर पडावयाचें होतें. त्या कारणानें तिचें काव्यहि तिचा पारमार्थिक अधिकार दर्शविणारें झालें आहे.

मुक्ताबाईनें आपल्या लहानग्या जीवनांत सुखदुःखाचे जे अनुभव मिळविले, आणि जगाचें खरें दर्शन घडवून घेण्याचा जो प्रयत्न केला, त्या सर्वांचा पडसाद तिच्या कवितेंतून उमटला आहे. एक प्रकारच्या स्वाभाविक व प्रामाणिक भावनाविष्कारानें तिची कविता सजली आहे. या संदर्भात उदाहरण म्हणून तिची पुढील रचना पहाण्याजोगी आहे—

देउळींचा देवो घरभरी भावो। कळसेंवीण वावो जातु असे ॥
जाताती वाउगे नटनाट्य सोंगें। चित्त अनुरागें भजतीना ॥
असोनि न दिसे उगेयाचिपिसें। घेती वायां वसे सज्जनेवीण ॥
रावोरंक कोहं न म्हणेचि सोहं। साकारलें अहं न कळे तया ॥
भ्रांतीचेहि भुली वायाचि घरकुली। माया आड ठेवी अरे रया ॥
मुक्ताई परेसी दुभतें चहूंसीं। सत्रावी सर्व रसीं एका देवें ॥

मुक्ताबाईचें आणि तिच्या भावंडांचें आयुष्य सामान्य लोकांच्यापेक्षां निराळें होतें. त्यांचें जीवन उदात्त, थोर, भव्य आणि भगवद्भक्तीच्या गाभाऱ्यांतून निनादणारें असें एक चित्ताकर्षक भावगीत होतें. त्या भावगीतांच्या स्वरलहरींतून मुक्ताबाईनें छेडलेली ही वीणेची तार देखील त्या सर्व उदात्ततेला शोभेल अशीच भावमधुर आहे.

सामाजिक अन्यायाविरुद्ध बंड पुकारून काव्यलेखन करणारी पहिली कवयित्री म्हणून मुक्ताबाईची थोरवी मराठी मनाला मोठी आहे. तसेंच तिनें

अन्यायाची चीड येऊन निर्भयपणें आपल्या मनाचा आवेग समाजापुढें व्यक्त करण्याचें धाडस दाखविलें, हें तिचें कृत्यहि त्या वेळच्या परिस्थितीच्या दृष्टीनें अपूर्वाईचें आहे.

मुक्ताबाईच्या काव्यामध्यें आलेलीं 'संसारु, उच्चारु, पुरुषोत्तमु' वगैरे अशीं अकारान्त शब्दाचीं उकारान्त रूपें आणि "पैठा, पैसु, बरळ, रया, आरावो" इत्यादि जुने शब्द हे ज्ञानेश्वरीच्या भाषेशीं सहज जुळते आहेत. त्यावरून ही मुक्ताबाई म्हणजे ज्ञानदेवाची बहीण मुक्ताई आहे याबद्दल साशंकता रहाण्याचें कारण नाहीं. उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून मुक्ताबाईचा जन्मकाल "शके १२०१ प्रभाति संवत्सर, आश्विन शुद्ध १, मध्यान्ह" असा आढळतो आणि "शके १२१९ वैशाख वद्य १२ रोजीं" तिचा प्रयाणकाळ सांपडतो.* म्हणजे तेराव्या शतकाचा अखेरीचा काळ हा मुक्ताबाईचा काळ असें मानण्यास हरकत नाहीं.

चांगदेवाच्या अभंगांतून मुक्ताबाईसंबंधीं आलेला उल्लेख असा आहे—

वऱ्हाडी आले संसार नगरा । चांगा तो नोवरा केळयला
हातीं कांकण उभा वटेश्वरीं । शांति नोवरी पर्णावया
पर्णिली शांति बैसला पाटीं । मुक्ताई करवली हळदुली वाटी

मुक्ताबाईचा आध्यात्मिक दर्जा ओळखून तिच्या प्रयाणाविषयीं नामदेवानें म्हटलें आहे कीं—

टाळविणे मृदंग सुस्वर गायन । कोंदलें गगन दाहीदिशा ॥
प्रळयींच्या विजा वर्षती आपार । झाला धुंधकार दाही दिशा ॥
ऋषि म्हणति हरि पातलेसें विघ्न । आतां कैसें प्राण वांचतील ॥
कोणाचिया शुद्धि नाहींचिया कोणा । म्हणती नारायणा मृत्यु आला ॥
कडाडली वीज निरंजनीं जेव्हां । मुक्ताबाई तेव्हां गुप्त झाली ॥
वैकुंठीं लक्ष घंटा वाजती एक घाई । झाली मुक्ताबाई स्वरूपाकार ॥
एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनीं । जेव्हां निरंजनीं गुप्त झाली ॥
गेलें निवारुनी आकाश आभुट । नामा म्हणे कोठें मुक्ताबाई ॥

मुक्ताबाईचें जीवनच भव्य होतें. तिचे विचारहि तसेच भव्य. तिच्या अभंगांतील तिचे विचार वाचतांना कित्येक ठिकाणीं अर्थ लावणें कठीण होऊन बसतें! तिच्या काव्याचा थाट एकंदरीनें वेदांतपर असाच आहे. तथापि त्यामध्यें तिचा अनुभव, काव्याचें तेज; आणि प्रेमळ अनुभूति यांचा मोठा सुंदर त्रिवेणी संगम पहावयास सांपडतो. त्यामुळें त्यास आलेला जिवंतपणा अक्षय्य राहील यांत शंका नाहीं. या काव्यामध्यें पाठांतर आणि 'लेखक प्रमाद' यामुळें आलेली

---

* महाराष्ट्र संतकवयित्री. पा. २९.

अशुद्धता तिच्या मूळच्या लेखनाची शुद्धता दाखवूं शकत नसली, तरीहि ज्या स्वरूपांत आज हें काव्य प्रकाशित झालें आहे, तेंहि विशेष उल्लेखनीय व भव्य विचार प्रकट करणारें आहे यांत शंका नाहीं.

● ● ●

जनाबाई

मोक्षप्राप्तीचें एक साधन म्हणून ज्ञानेश्वरादि भगवद्‌भक्तांनीं भक्तिमार्गाचा अवलंब केला होता. येथें भक्ति म्हणजे मानवी मनांत देवाविषयीं वसत असलेली आदराची उत्कट भावना आहे. संत काव्याचा स्थायीभाव त्यामुळेंच भक्ति आहे असें मानतात. हे सर्व कवि भागवत धर्मानुयायी भक्त होते व काव्य हें त्यांच्या भक्तीचें एक साधन होतें. " त्यांनीं आपले अभंग काव्य म्हणून इतरांसाठीं लिहिले नसून आपल्या अंतःकरणांतील तळमळ देवापुढें व्यक्त करण्यासाठीं लिहिले होते. मनाची एकाग्रता करून समाधि लावण्यांत त्यांना परमोच्च आनंद मिळे. "* भक्तीच्या ह्या आविष्कारामध्यें स्त्री पुरुष हा भेद मुळींच आड येत नव्हता. देवाच्या दारांत जमतील ते सारे एका भूमिकेवरून विठ्ठल दर्शनासाठीं जात असत. तेथें कोणत्याहि प्रकारचा भेदभाव मानण्यांत येत नसे.

ह्या भक्त मंडळींत नामदेवाला बरेंच वरचें स्थान प्राप्त झालेलें होतें. तो एक उत्तम कीर्तनकार होता. त्याच्या घरीं जनाबाई ही एक त्यानेंच सांभाळलेली मुलगी होती. मूळची ती गंगाखेडची परंतु नामदेवाच्या सहवासानें तिला देखील विठोबाबद्दलच्या भक्तीची आवड वाटूं अगली. त्यामुळें आपला हा भोळा भाव व्यक्त करण्यासाठींच जनाबाईनें अभंगरचनेस आरंभ केला. भगवंताच्या नामसंकीर्तनांत स्वतः तल्लीन होऊन जाणें तिला समाधानाचें वाटूं लागलें. तिच्या मधुर वाणीला अंकुर फुटला. आणि तिनें यासंबंधींची आपली भूमिका सर्वांना पुढील प्रमाणें सांगून टाकली—

पक्षी जाय दिगंतरां । बाळकांसी आणी चारा ॥
घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिल्लांपाशीं ॥
माता गुंतली कामासी । चित्त तिचें बाळापाशीं ॥
वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधुनी उदरीं ॥
तैसि आम्हांसी विठ्ठल माये । जनी वेळोवेळीं पाहे ॥

जनाबाईनें नामदेवाचें कीर्तन अनेकदां ऐकिलें होतें. त्यावेळीं तिला अनेक पौराणिक कथाहि ऐकावयास मिळाल्या होत्या. नामदेवाच्या हरिनामाच्या जपावर

* श्री. ग्रामोपाध्ये, संत काव्य समालोचन.

तिची श्रद्धा बसत गेली होती. देवाचें गुण गाण्याचें तर तिला जणुं वेडच लागलें होतें ! वास्तविक आपल्या आईवडिलांना सोडून जनाबाई नामदेवाकडे रहात होती आणि म्हणूनच तिला आपण पोरकें आहोंत असें वाटे. पण ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या सहवासामुळें तिला प्रत्यक्ष परमेश्वरच आपल्या आईच्या ठिकाणीं दिसूं लागला ! त्यासाठीं

येग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई

असें म्हणत ती देवाला मनापासून आळवूं लागली. तिच्या याच भावनेचें प्रत्यंतर पुढील अभंगांत दिसून येतें.

माय मेली बाप मेला । आतां सांभाळी विठ्ठला ॥
मी तुझें गा लेकरूं । नको मजशीं अव्हेरूं ॥
मति मंद मी तुझी दासी । ठाव द्यावा पायांपाशीं ॥
तुजविण सखे कोण । माझें करील संरक्षण ॥
अंत किती पाहासी देवा । थोर श्रम झाला जीवा ॥
सकळ जीवाच्या जीवना । म्हणे जनी नारायणा ॥

जनाबाईच्या मनामध्यें अहोरात्र विठ्ठलाचाच विचार चालल्यामुळें त्याचें गुणगान गाण्यांतच ती स्वतःला धन्य मानूं लागली.

जनाबाईच्या मनामध्यें देवाविषयीं चाललेली ही भावना आणि त्यामुळें तिच्या अंतःकरणांत होणारी खळबळ एका स्त्रीच्या हृदयाची होती. सामान्यतः कोण-त्याहि आवडणाऱ्या व्यक्तीवर स्त्रीचें सारें प्रेम एकवटून जातें ! ती व्यक्ति म्हणजेच तिचें सर्वस्व होऊन बसतें. त्या व्यक्तीच्या चिंतनांत तिला जगाचा विसर पडतो. अशा प्रकारची स्त्रीच्या हृदयांत चालणारी सर्व प्रकारची मृदु भावना जना-बाईच्याहि हृदयांत निर्माण झाली होती. तिचें सारसर्वस्व पांडुरंग होऊन बसला होता. त्यामुळें तिच्या सर्व भावना पांडुरंगाभोंवतीं एकवटून गेल्या होत्या. त्या भावनांचा आविष्कार करतांना जनाबाई म्हणते,

वाट पाहतें मी डोळां । कां गा न येसी विठ्ठला ॥
तूं वो माझी निज जननी । मज कां टाकियलें वनीं ॥
धीर किती धरूं आतां । कव घालीं पंढरीनाथा ॥
मला आवड भेटीची । धनी घेईन पायांची ॥
सर्व जीवांचे स्वामिणी । म्हणे जनी मायबहिणी ॥

जनाबाईच्या या आत्यंतिक जिव्हाळ्यानें तिला अखेर देवाची भेट झाली. आतां देव आपणावर प्रसन्न होऊन नेहमीं आपल्याजवळच राहूं लागला आहे असें तिला वाटूं लागलें !

जनाबाईला सर्वठायीं विठ्ठल दिसत होता आणि त्यामुळें तिच्या श्रांत देहाला विठ्ठलानें येऊन शीणभाव उतरल्याचा अनुभव येत होता. " जेथें जातो तेथें

तूं माझा सांगाती " अशी तुकारामाप्रमाणेंच तिचीहि देवावर भक्ति होती. मनाला असें वाटूं लागावें व अंत:करणाला असा अनुभव येऊं लागावा, हीच भक्तिसुखाची अत्युच्च पायरी आहे. भोळ्या भावड्या जनीला ती लाभली होती. तिचें दर्शन जनाबाईनें पुढील अभंगांत केलेलें दिसून येतें.

झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ॥
पाटी घेऊनिया शिरीं । नेऊनियां टाकी दुरी ॥
ऐसा भक्तिसी भूलला । नीच कामें करूं लागला ॥
जनी म्हणे विठोबाला । काय उतराई होऊं तुला ॥

साळी सडायासी काढी । पुढें जाउनि उखळ झाडी
कांडितां कांडितां । शीण आला पंढरिनाथा ॥
सर्वांगीं घाम आला । तेणें पितांबर भिजला ॥
पायीं पैंजण हातीं कडीं । कोंडा पाखडोनि काढी ॥
हातां आला असे फोड । जनी म्हणे मुसळ सोड ॥

धुणें घेऊनि कांखेसी । जनी गेली उपवासी ॥
मागें विठ्ठल धांवला । म्हणे कां टाकिलें मला ॥
कां गा धांवोनि आलासी । जाय जाय राउळासी ॥
चहूं हातें धुणे केलें । जनी म्हणे बरें झालें

देव खातें देव पितें । देवावरी मी निजतें ॥
देव देतें देव घेतें । देवासवें व्यवहारितें ॥
देव येथें देव तेथें । देवाविणें नाहीं रितें ॥
जनी म्हणे विठाबाई । भरूनि उरलें अंतरबाहीं ॥

" जनाबाईच्या उपलब्ध असलेल्या अभंगांपासून हें स्पष्ट दिसतें कीं, ती पांडुरंगाची अगदीं नि:सीम उपासिका होती व पांडुरंगाचीहि तिजवर पूर्ण कृपा होती. कारण तसें असल्याशिवाय, दासीवृत्तीनें रहाणाऱ्या जनीसारख्या शेतकरी वर्गांतल्या निरक्षर स्त्रीच्या कवितेंत इतका प्रसाद आणि इतका प्रेमळपणा येणें शक्य नाहीं."*

स्वत:च्या मनांत येणारी प्रत्येक कल्पना आपल्या व देवाच्या परस्परांवरील श्रद्धेच्या द्वारां व्यक्त करण्याची ही पद्धति जनाबाईनें नव्यानेंच सुरु केली होती. मनांत येईल तें तें तिनें निर्भयपणें सांगून टाकलेलें आहे. पण तिच्या या आत्माविष्काराकडे पहातांना श्री. आजगांवकर म्हणतात कीं, " देवानें मला

* महाराष्ट्र संत कवयित्री, पा. ४९, ५३.

न्हाऊं घातलें, माझें दळणकांडण केलें, माझ्याबरोबर गाणें गायिलें, इत्यादि गोष्टींचा ज्या अभंगांत उल्लेख आलेला आहे ते अभंग जनाबाईंचे असतील असें मला वाटत नाहीं." परंतु रात्रंदिवस पांडुरंगाची उपासना करणाऱ्या जनाबाईंच्या मनांत अशा कल्पना येणें संभवनीय नाहीं, असे कसें म्हणतां येईल ? कारण, विठ्ठलाशीं तिनें एवढा जिव्हाळ्याचा संबंध जोडला होता कीं, स्वतः आणि विठ्ठल यामध्यें दुजाभावच मुळीं तिला दिसत नव्हता ! विठ्ठलाला तिनें आई मानल्या-मुळें विठ्ठल आणि ती जणुं एकरूप होऊन गेली होती ! ! त्यामुळें तिनें आपलें सर्व काम विठ्ठलानें केलें असें म्हटलें, तर त्यांत वावगें असें काय होणार आहे कळत नाहीं.

पहिली माझी ओवी ओवीन जगत्र । गाईन पवित्र पांडुरंग ॥
दुसरी माझी ओवी दूजा नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे पांडुरंग ॥
तिसरी माझी ओवी तीजा नाहीं ठाव । अवघाची देव पांडूरंग ॥
चवथी माझी ओवी वैरिलें दळण । गाईन निदान पांडुरंग ॥
पांचवी माझी ओवी माझिया माहेरा । राहे निरंतर पांडुरंग ॥
सहावी माझी ओवी सहाही शिणले । गुरुमूर्तीं भेटले पांडुरंग ॥
सातवी माझी ओवी आठवे वेळोवेळां । देखिलें म्यां डोळां पांडुरंग ॥
आठवी माझी ओवी अठ्ठाविसी युगें । उभा चंद्रभागें पांडुरंग ॥
नववी माझी ओवी संपलें दळण । चुकवी मरण पांडुरंग ॥
दहावी माझी ओवीं दहा अवतारीं । यावें संवसारीं पांडुरंग ॥

विठ्ठलाकडे पहायची जनाबाईंच्या मनाची ही कल्पना होती.

आणखी—

विठोबा मला मूळ धाडा । (मी) धांवत येईन दुडदुडां ।
चरणीं लोळेन गडगडां । माझा जिव झाला वेडा ॥
नामदेवाचें कौतुक । मला सांपडलें माणिक ।
विठोबा पाहुन तुझें मुख । हारपली माझि तहानभूक ॥
विठोबा तुझी संगत बरी । जैसा चंदन मैलागिरी ।
संत चालले पंढरी । निशाण पताका जरितारी ॥
जसि मोहळासि लुब्ध मासी । तसी तूं सखी माझि होसी ।
सुखदुःख सांगेन तुजपासी । माझा जीव होइल खुषी ॥

तिच्या मनांत विठ्ठलाबद्दलच्या या श्रद्धेनें ठाण मांडलें होतें.

त्यामुळें ज्याच्या पदरीं जनाबाई होती, त्या नामदेवाच्या अभंगांतहि जनाबाईचें चरित्र पुढीलप्रमाणें आलें आहेः—

" नामयाचें घरीं असे दासी जनी । तिनें चक्रपाणी वश केला ॥
करितां कामधंदा ध्यानीं नारायण । करीत चिंतन अहोरात्र ॥
देखोनिया भाव तिचा पांडुरंग । काम करूं लागे जनी लागी ॥
रात्रीं येऊनियां जनीचिया घरीं । दळूं लागे हरी तिजलागी ॥
दळितां काढिली माळ वैजयंती । ठेविली परती शालजोडी ॥
जनीचें आवडे देवाजीस गाणें । झालासे तल्लीन पांडुरंग ॥

म्हणजे जनाबाईचे वरील कांहीं अभंग तिनें रचलेले नसावेत अशी शंका मनांत असेल, तर मग नामदेवाचा हा अभंगहि असाच त्याचा नसावा असें म्हणावें लागेल !

अभंगाच्या कर्त्याची ही शंका मनांतून बाजूला काढून जर जनाबाईच्या अभंगाकडे पाहिलें तर एक गोष्ट प्रामुख्यानें आढळून येते कीं, जनाबाईची दृष्टि फार अंतर्मुख होती. मनाला वाटेल तें प्रामाणिकपणें लिहिण्याची प्रथा तिनें सुरू केली. तिचें लेखन अर्थातच त्यामुळें वास्तववादी झालें. तेव्हां या संदर्भात तिचा पुढील अभंग जरूर पहातां येईल.

डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारीं जाईन मी ॥
हातीं घेइन टाळ खांद्यावरी वीणा । आतां मज मना कोण करी ॥
पंढरीच्या पेठे मांडीयले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ॥
जनी म्हणे देवा मी झालें येसवा । निघालें केशवा घर तुझें ॥

" दळूनदळून हात दुखूं लागले आहेत. शरीर गळून गेलें आहे. तें विश्रांतीची वाट पहात आहे. पण त्याची पर्वा न करिता घोंगडीला पाठ लागतांच डोळे मिळून स्वतःशींच गुणगुणत ब्रह्मानंदांत निमग्न होणारी ही नामयाची दासी

माझिये जननी हरिणी । गुंतलीस कवणें वनीं ॥
सुकें तुझें मी पाडस । चुकलें माये पाहे त्यास ॥

म्हणून ती आपल्या आईला, विठ्ठलाला, आळवीत आहे. केवढा गोडवा, केवढी आर्तता, नाजुक भावनेचा आविष्कार करण्याचें केवढें कौशल्य या चिमकुल्या ओळींत प्रकट झालें आहे ! "*

श्री. ग्रामोपाध्ये यांनीं म्हटल्याप्रमाणें " नामदेव, जनाबाई, चोखामेळा या सारख्या संतकवींचे अभंग शुद्ध भावगीतें आहेत. तीं त्यांच्या अंतःकरणांत अंकुरतात, तिथेंच उमलतात आणि अखेर तिथेंच कोमेजतातहि. पण त्यांचा हा सुमनहार अंतःकरणांतल्या पांडुरंगाला पोहोंचत असे. "

जनाबाईप्रमाणें सर्व संत कवींची देवाकडे पहाण्यासाची दृष्टीच भिन्न होती. ज्या ज्या भावनेनें जनाबाईनें देवाकडे पाहिले, ती ती भावना देवापर्यंत पोंचली

* वि. खांडेकर, तारका प्रास्ताविक.

जाऊन देव तिला वश झाला ! अशा भावनेच्या या उत्कटतेनें जनाबाईनें लिहिलेले असल्यानें आजच्या भावगीताचें मूळ उगमस्थान जनाबाईच्या अभंगांत सांपडतें, असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं.

कोणत्या तरी एका प्रमुख कल्पनेभोंवतीं भावगीतांतील तदनुषंगिक इतर कडवीं फिरत असतात. त्यांत रंगविलेली सर्व भावना अतिशय हळुवार आणि हृदयांतील भावनांचें दर्शन घडविणारी असल्यानें, तिला एक प्रकारचें गेय स्वरूपहि प्राप्त होतें. भावगीताविषयीं सध्यां दृढ असलेली ही कल्पना जनाबाईच्या अभंगाला तंतोतंत लागू पडतें. तिच्या भावगीतांतून तिचा साधा भोळा भाव तिनें मनाच्या तल्लीनतेंतून व्यक्त केलेला आहे. त्यामुळें श्री. वि. स. खांडेकर यांनीं " भाववेलीवर उमलणारें फूल म्हणजे कविता " ही केलेली काव्याची व्याख्या येथें ध्यानांत आल्याविना रहात नाहीं.

जनाबाई एक स्त्री होती. तेव्हां स्त्रीच्या भूमिकेमधून तिच्या हृदयांतून उमटलेले सहज सुलभ भाव पुढील अभंगांत पहावयास मिळतील —

विठो माझा लेकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा ॥
निवृत्ति हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरीं ॥
पुढें चालले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर ॥
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी ॥
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ॥
जनी म्हणे गोपाळा । करीं भक्तांचा सोहळा ॥

किंवा

एकच टाळी झाली चंद्रभागे वाळवंटीं ।
माझा ज्ञानराज गोपाळाशीं लाह्या वाटी ॥
नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग ।
जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग ॥
अभंग बोलितां रंग कीर्तनीं भरला ।
प्रेमाचेनि छंदें विठ्ठल नाचुं लागला ॥
साधु या संतांनीं देवाला धरिला मनगटीं ।
काय झालें म्हणुनी दचकले जगजेठी ॥
ऐसा कीर्तन महिमा सर्वांमाजीं वरिष्ठ ।
जडमूढ भाविका सोपी केली पायवाट ॥
नामयाची जनी लोळे संतांच्या पायीं ।
कीर्तन प्रेमरस अखंड देई गे विठाई ॥

सामान्यत: स्त्रियांचा बराचसा काळ आपल्या मुलाबाळांत जात असल्यानें जनाबाईंचे हे उपमा दृष्टांत स्त्री स्वभावाचें वैशिष्ट्य दर्शवीत नाहींत काय? सर्व संत मंडळींनीं देवाची भक्ति केली, आपल्या सर्व कल्पनांत त्यांनीं देवाला बसवला तरी त्या देवाला लेकुरवाळा होण्याचें भाग्य जनाबाईनेंच मिळवून दिलें !

" जनाबाईची तळमळ म्हणजे एका स्त्रीहृदयाची तळमळ होती. हृदयांतील सर्व भावना एकवटून पांडुरंगावर शिंपल्या जात होत्या..."*

जनाबाई स्त्री होती म्हणून तिला आपल्या स्त्रीजीवनाचें दु:ख होत नव्हतें. उलट तिनें त्याबद्दल बोलतांना स्पष्ट म्हटलें आहे:—

" स्त्री जन्म म्हणवुनि न व्हावें उदास ।
साधुसंता ऐसें केलें जनी ॥
संतांचे घरची दासी मी अंकिली ।
विठोबानें दिली प्रेमकळा ॥ "

जनाबाई स्वत:ला नामदेवाची दासी समजत होती. त्यामुळें साहजिकच तिला दासीपदाला योग्य अशीं कामें करावीं लागत, असें तिच्या अभंगावरून पदोपदीं आढळून येतें. म्हणूनच स्वत:विषयीं बोलतांना ती म्हणते—

दळितां कांडितां । तुज गाईन अनंता ॥
न विसंबे क्षणभरी । तुझें नाम गा मुरारी ॥

परमेश्वराबद्दल आपल्या मनामध्यें जनाबाई असा भाव ठेवीत होती. अशा त्या परमेश्वराचें अखेरीस आपणाला दर्शन घडलें असें ती मानते. त्यावेळीं तिला तो कसा दिसला याचें तिनें केलेलें पुढील वर्णन स्त्री स्वभावाला अनुरूप असेंच असल्याचें दिसून येईल.

वैकुंठींचा हरि । तान्हा यशोदेच्या घरीं
रांगतसे हा अंगणीं । माथां जावळाची वेणी
पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे
धन्य यशोदा माय । दासी जनी वंदी पाय

किंवा

पाय जोडुनि विटेवरी । कर ठेवुनि कटीवरी
रूप सांवळे सुंदर । कानीं कुंडलें मकराकार
गळां वैजयंती माळा । तो हा मदनाचा पुतळा
गरुड सन्मुख उभा । जनी म्हणे धन्य शोभा

* श्री. ग्रामोपाध्ये, संतकाव्य समालोचन.

किंवा

माझें अचडें बचडें छकुडें ग राधे रूपडें ।
पांघरूं घालिति कुंचडें ॥ धृ० ॥
हरि माझा गे सांवळा । पायीं पैंजण वाजे खुळखुळा ।
यानें भुलविल्या गोपीबाळा ॥...

जनाबाईच्या नांवावर उपलब्ध झालेले सर्व अभंग नामदेवकालीन जनाबाईचेच आहेत असें म्हणतां येणार नाहीं, अशी कांहीं अभंगांची रचना झालेली आहे. नामदेवाचे गुरु विसोबा खेचर होते असें खुद्द नामदेवानेंहि म्हटलेलें आहे. परंतु जनाबाईनें नेहमीं त्याच्या सहवासांत राहूनहि तिनें

" माझ्या नामयाचा गुरु । तो हा सोपान सद्गुरु ॥ "

ह्या अभंगांत " सोपान " हे नामदेवाचे गुरु होते अशी चुकीची माहिती कशी द्यावी हें आश्चर्य आहे ! त्याचप्रमाणें नामदेवांचे व आपले स्वतःचे अवतार यापूर्वीं कोठें झाले याची माहिती देणारा जनाबाईचा जो अभंग आहे, तोहि असाच बनावट असलेला दिसून येतो.

" बोढीला ताडिला । देव भक्तीनें फाडिला ॥
एका प्रेमा नामासाठीं । भक्तीं काढियला कंठीं ॥
झाला नाभ्याचा मजूर । भोळ्या बांधाख्याचा थर ॥
भिंती चांदया राचिले । त्याचें छप्पर शेकारिलें ॥
वरी सोडुनिया पाणी । धन्य भक्ता म्हणे जनी ॥ "

ह्या अभंगामधील भाषेची रचना अर्वाचीन आहे असें दिसतें. " मजूर, छप्पर " हे येथें योजिलेले शब्द सहाशें वर्षांमागें होऊन गेलेल्या जनाबाईच्या अभंगांत असणें संभवनीय वाटत नाहीं. त्यामुळें जनाबाईच्या नांवावर असे कांहीं अभंग मागाहून कुणींतरी रचिलेले असणें शक्य असावें असें यावरून दिसतें !

जनाबाईच्या अभंगामधील असा कांहीं भाग सोडून दिला, तरी तिचे स्वतःचे म्हणून जे अभंग मागें दिलेले आहेत, त्यामध्यें पांडुरंगाबद्दलची तिची नितांत भक्ति, सहजसुलभ पण उत्कट भावनाविष्कार, लोकगीतांच्या धाटणीची सोपी भाषाशैली, वर्णनांतील सहजसौंदर्य व प्रामाणिकपणा ठळकपणें नजरेंत भरतो.

जनाबाईची योग्यता तिच्या समकालीन संत मंडळींत फार मोठी होती हें "भक्तविजय, अध्याय२२" मधील "ज्ञानेश्वराचीं शब्दरत्नें । तीं सच्चिदानंद लिहील ब्राह्मण।...आणि नामया जनीचें बोलणें । रुक्मिणीरमण लिहितसे" इ० ओव्यांवरून दिसून येतें.

" जुन्या ग्रंथांत जनाबाईचा समाधिकाल आषाढ वद्य १३ शके १२७२ हा दिला आहे. निवृत्ति, ज्ञानदेव. सोपान, मुक्ताबाई, नामदेव, विसोबा खेचर,

चोखामेळा, परिसा भागवत, सावता माळी, गोरा कुंभार, जोगा परमानंद, कूर्मदास हे सर्व संत जनाबाईचे समकालीन होत. "*

• • •

कान्होपात्रा

कान्होपात्रा ही शामा नांवाच्या एका गणिकेची मुलगी होती. श्री. वि. का. राजवाडे यांनीं कान्होपात्रेचा अंदाजी काल शा. शके १३९० हा दिलेला आहे. ती मूळची मंगळवेढें येथील रहाणारी. परंतु पांडुरंगाच्या भक्तीनें तिचें अंतरंग भरून गेल्यामुळें ती वारकऱ्यांचे बरोबर जाऊन पंढरपुरास राहिली. स्वतःची गणिकेची स्थिति ध्यानांत घेऊन, आपला उद्धार व्हावा या हेतूनें, ती पांडुरंगाचें दर्शन घडतांच म्हणाली—

दीन पतित अन्यायी । शरण आल्यें विठाबाई
मी तों आहें यातिहीन । न कळे कांहीं आचरण
मज अधिकार नाहीं । भेटी देई विठाबाई
ठाव देई चरणापाशीं । तुझी कान्होपात्रा दासी

कान्होपात्रा स्वरूपानें फार देखणी होती. त्यामुळें बेदरच्या बादशहाची तिच्यावर नजर होती. त्यानें जेव्हां कान्होपात्रेस आणावयास म्हणून आपले नोकर पाठविले, तेव्हां कान्होपात्रेनें आपलें संरक्षण करावें म्हणून विठ्ठलाची करुणा भाकली. गाभाऱ्यांत जाऊन देवाला हात जोडून तिनें सांगितलें:—

नको देवराया अंत पाहूं आतां । प्राण हा सर्वथा फुटो पाहे
हरिणीचें पाडस व्याघ्रें धरियेलें । मजलागीं जाहलें तैसें देवा
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनीं । धांवे हो जननी विठाबाई
मोकलोनी आस जाहलें मी उदास । घेई कान्होपात्रेस हृदयांत

पतित पावन म्हणविसी आधीं । तरी कां उपाधि भक्तामागें
तुझें म्हणवितां दुजे अंगसंग । उणेपणा सांग कोणाकडे
सिंहाचें भातुकें जंबुक पै नेतां । थोराचिया माथां लाज वाटे
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणें । करावा जतन ब्रीदासाठीं

आणि शेवटीं परलोकीं प्रयाण केलें ! आपल्या निःसीम भक्तीनें अशा प्रकारें तिनें आपलें नांव अजराभर करून ठेविलें आहे.

---

* महाराष्ट्र—संतकवयित्री, पान ५५

कान्होपात्रेचे अभंग फार थोडे उपलब्ध आहेत. ह्या अभंगांवरून तिची भाषा बरीच सुधारलेली दिसून येते. स्वत: गणिका असूनहि पांडुरंगाबद्दल तिनें दर्शविलेली उत्कट भक्ति हाच तिच्या अभंगाचा प्रमुख विशेष आहे. सर्व संकटां-मधून परमेश्वरच फक्त आपली सुटका करील हा तिचा भोळा भाव सगळीकडे दिसून येतो. ऐहिक जीवनामधूनच तिचें काव्य निर्माण झालेलें आहे. या काव्यांत करुण रसाचाच उठाव अधिक झालेला आहे. स्वतःच्या उद्धारासाठीं तिनें ही जी काव्यरचना केलेली आहे, तीस एक प्रकारें अधिक वास्तवता आलेली आहे.

प्रेमाबाई

प्रेमाबाईची फारच थोडी कविता उपलब्ध झालेली आहे. तथापि तिची जीं चार-पांच पदें उपलब्ध झालेलीं आहेत, तीं इतकीं प्रेमळ आणि रसाळ आहेत कीं, त्यावरून तिचें वैशिष्ट्य उठून दिसावें. उदाहरणार्थ तिचें " गडे हो कृष्ण गडी आपुला " हें पद पहावें.

" गडे हो कृष्ण गडी आपुला । राजा मथुरेचा झाला ॥ धृ० ॥

टाकोनि काळा कांबळा । कासे पीतांबर कसिला ।
टाकी मयूर पिच्छांला । जडित मुकुट घातला ।
आतां काय ओळखिल आपुल्याला । राजा मथुरेचा झाला ॥ १ ॥

टाकुनि गुंजांची दाटी । घातला कौस्तुभ श्रीकंठीं ।
टाकुनि मुरली वेताटी । करिं घे आयुधें गोमटीं ।
अतां काय बागुलभय त्याला । राजा मथुरेचा झाला ॥ २ ॥

गोधनें चारूं विसरला । अतां तो नृपांमधें शिरला ।
नारीनें उरीं धरुनि चुरला । अतां तो कुब्जेनें वरिला ।
देतसे निज पद प्रेमेला । राजा मथुरेचा झाला ॥ ३ ॥

" वरील कविता म्हणजे एका अशिक्षित भाविक स्त्रीची साधी प्रेमळ वाणी आह. तिच्या साधेपणामुळेंच तिला एक प्रकारची हृदयंगमता प्राप्त झाली असून प्रसाद तर तींत अगदीं पूर्णपणें भरून राहिला आहे. शिवाय मनुष्य स्वभावाचें सहजसुंदर वर्णनहि तींत उत्तम प्रकारें ग्रथित झालेलें आहे. " *

* श्री. आजगांवकर, महाराष्ट्र संत कवयित्री पान ९३.

अभंग आणि ओवी ही या पूर्वींची छंद रचना सोडून प्रेमाबाईनें पदें रचिलीं. हें तिच्या काव्याचें आणखी एक वैशिष्ट्य सांगतां येईल. शिवाय या पदांची रचनाहि अत्यंत चटकदार झालेली असल्यानें त्यांची गोडी कायम टिकणारी आहे, असें त्यांच्या आजहि दिसून येणाऱ्या लोकप्रियतेवरून म्हणतां येईल.

श्री. वि. का. राजवाडे यांनीं प्रेमाबाईचा काल शके १५८० हा दिलेला असून महिपतीनें आपल्या भक्तलीलामृताच्या ४२ व्या अध्यायांत प्रेमाबाईचें चरित्र अतिशय रसाळ भाषेंत दिलेलें आहे.

संत बहिणाबाई

अगदीं बाळपणापासूनच परमार्थाकडे विलक्षण ओढा असलेली अशी संत बहिणाबाई ही एक अद्वितीय कवयित्री होऊन गेली. संत शिरोमणी तुकाराम महाराज यांच्या नेतृत्वाखालीं बहिणाबाईनें पांडुरंगाचें नामसंकीर्तन गायिलें आहे. आपल्या ह्या गुरुबद्दल बहिणाबाईस अपार भक्ति वाटत असे. जनाबाईला जसा विठ्ठलाचा ध्यास तसाच बहिणाबाईस तुकारामाचा ध्यास. त्यामुळें ध्यानीं, मनीं, स्वप्नीं सदासर्वदा तिला तुकारामच दिसूं लागे. आपला हा गुरुबद्दलचा भाव व्यक्त करतांना बहिणाबाई लिहिते:—

तूं माझी माउली मी तुझें बालक । करितसें कौतुक नामीं तुझें
तूं माझी गाउली मी तुझें वासरूं । करितसें हुंकारूं नामीं तुझे
तूं माझी कुरंगी मी तुझें पाडस । करीं रात्रंदिवस ध्यान तुझें
तूं माझा चंद्रमा मी तुझें चातक । सदा हरीस स्मरणीं तुझे
तूं माझा मेधुला मी तुझें चकोर । उल्हास हा थोर देखोनिया
तूं माझा सज्जन मी तुझी सांगाती । अखंड हे चित्तीं ध्यान तुझें
बहेणी म्हणे माझा तैसा प्राण सखा । तुकाराम देखा सर्व धनी

तुकारामाचें आणि आपलें नातें अशा तऱ्हेनें व्यक्त केल्यानंतर तुकोबाविषयींची आपली स्वतःची भावना ती पुढीलप्रमाणें वर्णन करते.

जयाचिया पदें होतसे विश्रांति । त्याची देहाकृति विठ्ठलचि
विठ्ठलासि तया नाहीं भेदभाव । ऐसें माझें मन साक्ष आहे
पांडुरंग तुका पांडुरंग तूं का । वेगळीक देखा कैंवि होय
कलियुगीं बौद्धरूप धरी हरि । तुकोबा शरीरीं प्रवेशला
तुकोबाचीं बुद्धि पांडुरंग रूप । मन तें स्वरूप तुकोबाचें

तुकोबाचि सर्व इंद्रियें चालक । पांडुरंग देख सत्य आहे
तुकोबाचे नेत्र तेहि पांडुरंग । क्षेत्र तें अभंग रूप त्याचें
तुकोबाचे हात लिहिताती जें जें । तें तें तें सहजे पांडुरंग
बहेणि म्हणे रूपें व्यापक तुकोबा । ध्यान माझ्या जीवा हेंचि वाहे

बहिणाबाईच्या ह्या अभंगावरून गुरुभक्तीचें माहात्म्य स्त्रियांनीं लिहिलेल्या साहित्यांत इतक्या उत्कटत्वानें पहिल्यांदांच सुरू झालें आहे, असें दिसून येतें. यापूर्वी विठ्ठलाच्या भक्तीचें माहात्म्य जनाईनें, मुक्ताईनें किंवा कान्होपात्रेनें गाइलें. परंतु देवादिकांना सोडून प्रत्यक्ष मानवाच्या श्रेष्ठपदाचें माहात्म्य गाण्याचें पुण्य बहिणाबाईनेंच आपल्या पदरीं पाडिलें, असें म्हणावें लागेल. तुकारामासारख्या थोर संताचा सहवास आपणाला लाभला याबद्दल बहिणाबाईस वाटणारा आनंद या शब्दांतून व्यक्त झालेला आहे.

बहिणाबाईच्या चरित्रांतील एक विशेष उल्लेखनीय अशी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिनें दिलेलें स्वतःचें आत्मचरित्र. मराठी सारस्वतांतील आत्मचरित्राचें उगमस्थान म्हणून बहिणाबाईच्या या अभगांचें मोल मोठें आहे. आपल्या आत्मचरित्रास सुरवात करतांना बहिणाबाई म्हणते:—

देवगांव माझें माहेर साजणी । वेरूळ तेथोनी पूर्वभागीं
देवाचा समूह सर्व जये ठायीं । भिळालासे पाहीं देवगांवीं
हिमालयाहुनी चालिला अगस्ती । चातुर्मास्य वस्ती केली जेथें
तेथुनी पश्चिमें शिवनद वहात । तीर्थ हें अद्‌भुत तीर्थांमाजीं
लक्ष तीर्थ जेथें येउनी सर्वदा । लाक्षायणी सदा वास तेथें
तें स्थळ पवित्र देखोनी अगस्ती । अनुष्ठाना येती दिनोदयीं
वर हा दिधला ऋषी अगस्तीनें । लक्ष तीर्थें जाण लावग्रामा
स्नान-दान करी जप अनुष्ठान । सिद्धि तेथें जाण होय नरा
अगस्ती राहोनि देवगांवीं जाण । शिवनदी-स्नान करी सदा
बहेणि म्हणे ऐसें स्थळ देवग्राम । तेथें माझा जन्म झाला असें

अशा रीतीनें आपल्या जन्मापासून तों अखेरीपर्यंतचें सर्व चरित्र बहिणाबाईनें मोठ्या कौशल्यानें आपल्या अभंगांतून चित्रित केलेलें आहे. त्यामध्यें तिच्या जीवनांतील बराचसा भाग मोठा मनोरंजक उतरलेला आहे. जन्मपत्रिका, गोत्र, विवाह, सडासंमार्जन, तीर्थयात्रेचा प्रवास इत्यादि लहानमोठे प्रसंग सविस्तरपणें बहिणाबाईनें दिलेले आहेत. त्याचप्रमाणें आपले आईवडील, नातेवाईक, नवरा वगैरे सर्वांची यथायोग्य ओळखहि येथें चांगल्या रीतीनें घेतां येण्यासारखी परिस्थिति बहिणाबाईच्या अभंगांनीं निर्माण केली आहे.

बहिणाबाईच्या चरित्रांतील दुसरी एक विशिष्ट गोष्ट म्हणजे तिनें आपल्याला गाईच्या वासराचा असलेला जो लळा व्यक्त केला आहे ती होय. येथें बहिणा-

बाईच्या स्त्रीमनाची–वात्सल्याची–ओळख सुलभतेनें पटते. बहिणाबाईचें हें वात्सल्य पुढील शब्दांतून प्रतीत झालेलें आहे:—

गाईचें तें वत्स तेही पैं कपिला । माझ्या ठायीं तिला हेत बहू
मीच सोडीं तरी वत्स रिघे दोहा । करितां दोहना सवें माझी
मीच पाणी पाजी तृण घाली मीच । मजवीण कांच (खंती) मनीं वाहे
मी जाय पाणिया ओरडे तें वत्स । गाय वाया पुच्छ सवें चालें
करूनियां लोक नवलाचे राहतीं । उगेच पाहती वत्स गाई
मोकळेंचि वत्स असोनियां जाण । न वचे (जाई) आपण गाईपाशीं
तृण घालीं तरी भक्षिती आपण । पाजिल्या जीवन तेव्हां पिती
रात्रीं का अवसरीं वत्स निजे शेजे । पुराणीं तें फुंजे (स्फुंदित) श्रवण कालीं
कथे पासीं जाय सवें तेंही येत । उभेंचि निवांत कथा ऐके
गाय गोठां घरीं आपण कथेसी । जातां मी स्नानासी सवें चाले...

या वासराचें वैशिष्ट्य सांगतांना बहिणाई आणखी सांगते—

आरती झालिया नमस्कार होती । आपणहि क्षितीं ठेवी डोकें

येथें हा अद्भुत चमत्कार वाचीत असतांना ज्ञानदेवांनीं रेड्याला बोलायला लावल्याची कथा ध्यानांत येते !

बहिणाबाईनें केवळ देवादिकांवरीलच आपले विचार काव्यांतून न गोवतां प्रत्यक्ष व्यवहाराशीं अधिक जवळचें नातें स्वीकारलें. लहानपणापासूनच तिचा ओढा परमार्थाकडे विशेष होता. सर्वसामान्य स्त्रीच्या जीवनांत येणारे कांहीं प्रश्न तिनें मोठ्या कुशलतेनें आणि विचारप्रवर्तक रीतीनें सोडवलेले आहेत. ती स्वतः आपल्या संसारांत सभोंवतालच्या चार स्त्रियांसारखी रममाण झाली नव्हती. तथापि, सांसारिक स्त्रीच्या मनांत उचंबळणाऱ्या भावना तिच्याजवळ होत्या. याविषयीं बहिणाईच्या कवितांचें प्रकाशन केलेल्या प्रकाशकानें आपल्या उपोद्घातांत म्हटलें आहे, " ज्या काळीं स्त्रियांना अभ्यासाची मुळींच गोडी नव्हती आणि हल्लींसारख्या शाळाहि स्थापन झाल्या नव्हत्या, त्याकाळीं स्त्रियांनीं केलेले अभंग हीच साक्ष पटवीत आहेत कीं, स्त्रियांनीं आपला पतिव्रताधर्म संभाळून, राहिलेल्या-वेळीं प्रेमानें भगवंताचें नामस्मरण करीत असावें. म्हणजे त्याच नामस्मरणानें आपली वृत्ति ईश्वराचे ठायीं तल्लीन होऊन जाते. याचें प्रत्यक्ष उदाहरण सर्व मनुष्यमात्रांत संत बहिणाबाईनें घालून दिलें आहे. "

पतिव्रता कोणाला समजावें हें सांगतांना बहिणाबाई म्हणतेः—

धन्य त्रिभुवनीं वंद्य पतिव्रता । जे आपुलिया हिता प्रवर्तली
आपुला पति जिनें ओळखिला चित्तीं । धन्य ती जगतीं त्रिभुवनीं...

आणि हा पतिव्रता धर्म जो आहे त्याची महती गातांना तिच्या—स्त्रीच्या-अंत:करणांतून बाहेर पडलेले पुढील बोल विशेष लक्षांत घेण्याजोगे आहेत:—

पतिव्रता धर्म ऐका गे साजणी । धन्य जा गर्तिनी पुण्यशील
येणेंचि श्रवणें मुक्ति होय जीवा । पतीवीण देवा नाठविजे
आपणा आपण ओळखिलें जिनें । धन्य तेचि जाण पतिव्रता
प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेंच गगन झेलियलें....
साधुसंत सेवा पतीचें वचन । पाळी तेंचि धन्य पतिव्रता
शांति-क्षमा-दया पाळी भूतकृपा । जाणोनि स्वरूपा पतीचिया
पतीचें वचन अमृता समान । धन्य तिचा जन्म माता-पिता
बहेणि म्हणे तिनें जिंकिला संसार । वैकुंठीचा थार केला तिनें
ऐका गे साजणी स्वहिताच्या काहाणी । सांगतां हें मनीं धरा बाई...

सर्वसामान्य स्त्रीला तुळशीचें माहात्म्य विलक्षण वाटतें. एखाद्या भक्ताला देवासंबंधीं जसा नितांत आदर वाटतो तसाच स्त्रियांना तुळशीबद्दल नितांत आदर वाटत असतो. बहिणाबाईहि एक स्त्री होती. तिच्याजवळहि ही भावना होतीच. परंतु ती भगवद्भक्त असल्यामुळें तिनें आपली ही भावना पुढील शब्दांत व्यक्त केली आहे:—

जेथें नाहीं वृंदावन । तेंचि जाणावें स्मशान
राहूं नये तये ठाईं । एक घडी पळ पाही
जेथें तुळशीचें पान । तेथें असे नारायण
बहेणि म्हणे विष्णु नांदे । तुलसीचे ठाईं बोधे
...सर्व सिद्धि वृंदावनीं । येती तुलसी दर्शनीं
बहेणि म्हणे वृंदावन । कलियुगीं मुक्तिस्थान
गंगा आणि भागिरथी । तुलसीचें ठाईं येती
होय दर्शन जयासी । तोचि देह पुण्यराशी
सर्व तीर्थांचें माहेर । आहे तुलसी साचार
बहेणि म्हणे तुलसि जेथें । तेथें तीर्थांचा संघात
तुलसीचें पत्र । असे देवासी एकच
नाहीं दोघां भिन्न भेद । दोघांचें तें एक पद
तुलसीचें पानीं । बसे राधाकृष्ण दोन्ही
बहेणि म्हणे धन्य देवा । जया तुलसीची सेवा
...देव न सांपडे मना । तरि जावें वृंदावना
तेथें होय समाधान । स्वयें भेटे नारायण...

बहिणाबाईच्या काव्यांतील हें स्त्रीजीवन जितकें रम्य आहे, तितकीच तिची कोणत्याहि विषयावरची विचारशक्तीहि अभिनव आहे. ती स्वतः स्वतंत्र रीतीनें विचार करीत होती आणि म्हणून तिच्या विचारांनाहि इतरांहून एक वेगळें वळण लागलें होतें. त्यामुळें कोणत्याहि गोष्टीचा अर्थ लावतांना ती स्वतःचें मत स्पष्टपणें व्यक्त करीत असे.

"बहिणाबाईनें ब्राह्मणाचें महत्त्व फार वर्णिलें आहे, परंतु ब्राह्मणाच्या जातींत जन्म पावला तो ब्राह्मण, अशी मात्र तिची ब्राह्मणाची व्याख्या नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे." (आजगांवकर) त्यासंबंधीं ती म्हणतेः—

जीव हा ब्राह्मण म्हणावें इत्यर्थ । तरी तेथें अर्थ सांपडेना
सर्वां ठायीं जीव सारखाचि एक । पशुपक्षी देख चांडाळादि
पुढें जीव होती मागें बहु झाले । ब्राह्मणत्व आलें नाहीं तयां
बहेणि म्हणे जीव प्राणीमात्रीं एक । ब्राह्मणत्व देख म्हणों नये...

इतर लोक समजतात त्याप्रमाणें पांडित्य, ब्रह्मकर्म, इत्यादिकांचाहि ब्राह्मण्याशीं कांहीं संबंध नाहीं असें स्पष्ट सांगून खऱ्या ब्राह्मण्याची व्याख्या बाईनें पुढीलप्रमाणें केली आहेः—

गुणांत असोन गुणासी नातळे । क्रियेसी न कळे अणुमात्र
तोचि रे ब्राह्मण ओळखावा जनीं । द्वैत तया स्वप्नीं आढळेना
षडुर्मिरहित षड्भाव नातळे । दोषाचेनि मेळे सांपडेना
बहेणि म्हणे सत्य न सांडी सर्वथा । ब्राह्मण तत्त्वता तोचि एक
निर्विकल्प जया समाधि जोडली । चित्तासी असोलीं परब्रह्मीं
तोचि एक खरा ब्राह्मण वेदार्थी । आणिक तीं मतें पाखंडांचीं ..

कोणत्याहि कल्पनेचा अर्थ संत आपापल्या परीतें कोणत्याहि प्रकारानें लावूं शकत असत. बहिणाबाईनेंहि कांहीं स्वतंत्र अर्थ लावले होते. श्रीकृष्ण चरित्रांतील रासक्रीडा वगैरे प्रकारांमधून व्यभिचार ध्वनित करण्याच्या ज्या कांहीं कथा आल्या आहेत, त्याबद्दल बहिणाबाई म्हणतेः—

अष्टधा प्रकृति तेचि ह्या गोपिका । अष्टभाव देखा गोपाळ हे
क्रीडती गोकुळीं सदा या शरीरीं । स्वानंदे निर्भरीं परमानंद
इंद्रिय गोधनें विषयतृणचरें । उभती अपारें निजसत्त्वें
गोरसाचे डेरे अखंड संचले । सुखें सुखावले स्वानुभवें
तेणें सुखानंदें वाचती गोपाळ । करिती गदारोळ गोपिका त्या
बहेणि म्हणे जेथें कृष्णाचा अवतार । तेथें व्यभिचार स्वप्नीं नाहीं

आणि अशा रीतीनें व्यभिचाराची कल्पना तिनें साफ धुडकावून दिली आहे.

सर्व संतांप्रमाणें पंढरीच्या विठ्ठलाचें वेड बहिणाबाईसहि होतें. पंढरपूरचा विठ्ठल म्हणजे संतांना एक विसाव्याची जागा होती. हा विठ्ठल म्हणजेच जणुं

त्यांचें सारसर्वस्व ! आणि म्हणून त्याचें जेवढें गुणगान करतां येईल तितकें ते करीत. विठ्ठलासी एकरूप होऊन जाण्यांत त्यांना अलौकिक आनंद मिळे.

मनांत पाहिलें बुद्धींत गाइलें । चित्तांत ध्याइलें विठ्ठलासी

अशी बहिणाबाईची अवस्था होती. त्यामुळें विठ्ठलाचा थोरपणा ध्यानांत आल्यावर बहिणाबाई म्हणतेः—

तुझ्या थोरपणा कोण लावी हात । वाटतें मनांत धरावेसें
धरोनिया बंदीं घ्यावें हृदयांत । सोडवील तेथ कोण दुजें
विवेक राखण ठेवीन जवळीं । हृदयाची टाळी देऊनिया
बहेणि म्हणे माझें देह भांडवल । ऐकोनिया बोल आतां तरी

जनाबाई प्रमाणेंच पंढरीच्या विठ्ठलाला बहिणाबाईनेंहि लेकुरवाळा करून ठेविलें आहे :—

विठो माझा लेकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा
तुकोबा तो कडियेवरी । नामा करांगुली धरी
एकनाथ खांद्यावरी । कबीराचा हात धरी
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जिवा बरोबरी
पुढें चाले ज्ञानेश्वर । मागें मुक्ताई सुंदर
बहेणि म्हणे बा गोपाळा । करिसी भक्तांचा सोहळा

जनाबाईच्या अभंगांत आणि या अभंगांत स्त्री हृदयाचा आविष्कार सारख्याच रीतीनें व्यक्त झालेला आहे. फक्त काळाप्रमाणें त्यांत आलेल्या व्यक्तींना वेगवेगळें स्थान मिळालें आहे इतकेंच काय तें.

विठ्ठलाला भेटायला अनेक संत जात असत. पण ते सर्वच संत होते कीं नाहीं, याची भ्रांती पडून बहिणाबाईनें संताची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे :—

दुसरियाचे दुःखें शिणें ज्याचें चित्त । तोचि एक संत ओळखावा
तयासी पुसतां हारील तो शीण । दुःख घे हिरोन रोकडेंची
परोपकार जया आलासे विभागी । शांती हे सर्वांगीं डोलतसे ..
...कृपा जयापाशीं होउनी आंदण । आनंदी निमग्न सदाकाळीं
बहेणि म्हणे मनीं भूतकृपा पूर्ण । तेचि ओळखण संतजना

आणि असे हे संत भक्तिमार्गानें जातात, तेव्हां भक्ति म्हणजे खऱ्या दृष्टीनें काय आहे, तर—

संताचे वचनीं दृढ जया भाव । भक्ति अभिनव हेचि खरी
सांगितली खूण आइके जो मनीं । पावेल निर्वाणीं तोचि एक
संतांचें वचन शास्त्राचें आधारें । भक्तीचे निर्धारें दृढ व्हावें
बहेणि म्हणे संत-पायीं जया आर्त । हाचि भक्तिपंथ ओळखावा

असें बहिणाबाईस वाटतें. अशा भक्तिमार्गानें जाणाऱ्या संतांबरोबर पंढरीला वारीसाठीं जातांना होणारा परमानंद तिनें पुढील शब्दांतून गोवून ठेवलेला आहे:—

चालतां पाउलीं पंढरीच्या वाटें । ब्रह्म सुख भेटे रोकडेंचि
दिंडी ध्वजा भार चालती अपार । मृदुंग गंभीर स्वर देती
हमामा हुंबली घालिती परवडी । होउनी उघडी विष्णुदास
बहेणि म्हणे ऐसा आनंद वाटेचा । कोण तो दैवाचा देखे डोळा ।

बहिणाबाईच्या चरित्रामधील सर्वांत अलौकिक अशी गोष्ट म्हणून तिनें सांगितलेल्या आपल्या तेरा जन्मांचा वृत्तांत होय. बहिणाबाईचा हा तेरा जन्मांचा वृत्तांत म्हणजे आजपर्यंत इतक्या बारकाईनें कोणीहि नमूद न केलेली अशी उल्लेखनीय गोष्ट आहे. वयाच्या ७२ व्या वर्षी बहिणाबाईनें आपल्या मुलांस ही गोष्ट सांगितलेली आहे ! तिचें आध्यात्मिक ज्ञान विशेष प्रकारचें होतें, असें या हकीकतीवरून दिसून येतें. याबद्दल कै. प्रा. शिवरामपंत परांजपे यांनीं म्हटलें आहे " संस्कृत आणि मराठी वाङ्मयांतून जुन्या भारत-भागवतादिकां-सारख्या इतिहास पुराणांतून आणि नव्या भक्तिरसाच्या भाविक ग्रंथांतून पूर्वीच्या जन्मांचीं आणि पुनर्जन्मांचीं वर्णनें प्रसंगवशात् पुष्कळ आलेलीं आहेत. परंतु बहिणाबाईनीं दिलेल्या वर्णनाइतकीं तीं सविस्तर नाहींत. शिवाय बहिणाबाईचे पूर्वजन्म हें अगदीं अलीकडच्या काळांतील असल्यामुळें ते पौराणिक प्रदेशापेक्षां अधिक विश्वासार्ह आणि विचारार्ह वाटणें स्वाभाविक आहे. " आपल्या पहिल्या जन्माच्या वेळची हकीकत देतांना बहिणाबाई म्हणते—

पूर्वील संस्कार होता कांहीं शुद्ध । जन्मतां प्रसिद्ध कळों आला
जन्मलिया मज वर्षाचिया कोडी । पाहतांचि दृष्टी वदन माझें
आणिला सद्गुरु केदारें आपुला । तयातें दावीला भाव माझा
नाहीं लग्न करूं दिधलें आपण । माझा सहजगुण ओळखला
दीधली ते दीक्षा शंकराचा मंत्र । जपें अहोरात्र खेळतांहि
खेळतां देऊळ शंकराची मूर्ति । करीतसें भक्ति प्रेमरसें

अशा रीतीनें आपण कोठें जन्म घेतला, कुणाच्या पोटीं जन्म घेतला व आपलें आयुष्य कसें गेलें, याची सविस्तर माहिती बहिणाईनें दिली आहे. तेरा जन्मांची हकीकत सांगून झाल्यावर शेवटीं ती सांगते—

तीन शतें आणि वरुषें एकावन्न । आयुष्य निर्माण तेरा जन्मीं
घातलें स्त्रीरूपें साधनें हरीच्या । निमाल्या मनाच्या वृत्ति जंव
आतां निश्चयानें सांगेन निर्धार । झालें निर्विकार चित्त माझें
बहेणि म्हणे कांहीं पुढें नाहीं हेत । स्वरूपीं निवांत चित्त माझें

पुष्कळ माणसांचा पूर्वजन्मावर किंवा पुनर्जन्मावर विश्वास असत नाहीं. याच्या उलट त्या गोष्टीवर विश्वास ठेवणारेहि कांहीं लोक आहेतच. बहिणाबाईच्या

विविध अभंगांवरून प्रा. परांजपे यांनीं एक सविस्तर कोष्टक तयार करून तेरा जन्मांचा बरोबर आराखडा तयार केलेला आहे. त्याचा आधार घेऊन ते म्हणतात, "या कोष्टकांत दिलेल्या तेरा जन्मांपैकीं अखेरचा म्हणजे तेराव्या जन्माच्या अखेरीस बहिणाबाई ही मुक्त झालेली आहे; आणि मुक्त होण्याच्या स्थितीला येणें म्हणजे अर्थात् जीवाची आध्यात्मिक उन्नति अत्यंत परिपक्वतेला येऊन पोहोंचणें असाच अर्थ होय, हें उघड आहे. एखादा जीव ताबडतोब उद्धरत नाहीं, तर उद्धरण्याच्यापूर्वीं त्याला अनेक जन्म घ्यावे लागतात. अशी आपल्यामधील या विषयासंबंधाची कल्पना आहे. "अनेक जन्म संसिद्धस्ततो याति परां गतिम्" या भगवद्गीतेंतील वचनामध्येंहि हाच भावार्थ सांगितलेला आहे. या आध्यात्मिक उन्नतीच्या वाढीचें चित्र या बहिणाबाईच्या तेरा जन्मांच्या वर्णनामध्यें आपल्याला जसें पाहावयाला सांपडतें, तसें तें अन्यत्र क्वचित्च दृष्टीस पडतें."

बहिणाईनें सांगितलेल्या या पूर्वजन्मांच्या माहितीवर कोणाचा विश्वास बसो अगर न बसो, पण त्यावरून एक गोष्ट मान्य करावयास हरकत नाहीं आणि ती म्हणजे बहिणाबाई ही एक अलौकिक बुद्धिमत्तेची स्त्री होऊन गेली, ही होय. स्वतंत्र रीतीनें विचार करण्याची ताकद तिच्या अंगीं होती हें तिच्या अभंग लेखनावरून स्पष्ट दिसून येते. आपल्या या हकीकतेची सर्व माहिती सांगून झाल्यावर त्याबद्दल खुद्द तिनेंच स्पष्ट शब्दांत लिहून ठेवलें आहे—

अवघेचि ते जन्म आठवती मज । अंतरींचें गुज मृत्युवेळा
आरशांत जैसे प्रतिमुख । तैसे जन्म देख दिसती डोळां
लटिकेची शब्द व्यवहारी मानिती । मूर्ख तयांप्रति बोलों नये...

तुकारामासारख्या थोर संताच्या सान्निध्यांत बहिणाबाईचा बराचसा काळ गेल्यामुळें स्वतःबद्दल प्रामाणिकपणें तिनें सांगितलेली ही हकीकत अगदींच खोटी आहे, असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. शिवाय या तेराहि जन्मांमधून तिनें आपण स्त्रीचाच जन्म घेतला आहे असें निर्विवादपणानें सांगितलेलें असल्यानें, तशी शंका मनांत येण्याचें कारणहि उरत नाहीं.

बहिणाबाईचा ओढा लहानपणापासूनच परमार्थाकडे असल्यामुळें थोरामोठयांच्या संगतीचा लाभ आपल्याला घडावा असें तिला फार वाटत असे. एकदां जयरामस्वामी वडगांवकर तिला भेटायला आले असतां तिला वाटलें कीं,

कृपा उपजली जयरामस्वामीसी । आले पहावयासी भाव माझा
देखोनी तयांसी आनंद वाटला । कंठ कोंदाटला आनंदानें

आणि तुकारामाबद्दल तर तिला नितांत आदर. तुकारामाची भेट व्हावी म्हणून तिला कोण उत्कंठा लागलेली. त्याबद्दल ती म्हणते—

तुकोबाचा छंद लागला मनासी । ऐकतां पदांसी कथेमध्यें ॥
तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ॥

तुकारामाबद्दलची बहिणाबाईची ही निष्ठा बघून पुष्कळांना अशी शंका येते कीं, त्या काळीं पुष्कळसे विद्वान् ब्राह्मण असतांना तुकारामाचें शिष्यत्व ह्या ब्राह्मण स्त्रीनें का पत्करावें? वास्तविक हा प्रश्न उत्पन्न होण्याचें कारणच असूं नये. कारण स्त्रीची नेहमींची अशी एक दृढ निष्ठा असते कीं, ज्याच्याजवळ पराक्रम दिसेल त्याची पूजा करायला ती सिद्ध होते. तेव्हां तुकारामाचें खरें व अलौकिक तेज बहिणाबाईनें ओळखलें असलें पाहिजे. तुकारामाच्या एकंदर जीवनाचा साक्षात्कार तिला घडला असला पाहिजे आणि म्हणूनच तिनें तुकारामास आपले गुरु मानलें असावें.

सद्गुरुचे पाय धरीन हृदयांत । राहीन ध्यानस्थ सर्व काळ ॥

अशीच तिची भावना होती. तुकारामानें आपणांस उपदेश केला, असें तिनें पुढील शब्दांतून नमूद केलें आहे.

तुकाराम रूपें प्रत्यक्ष बोलत । होई सावचित्त समाधान ॥
पाहे परतोनी आपुलिया दिठीं । सांगितली गोष्ट एक काळीं ॥
तयाचा उच्चार करूं नये वाचे । झालेसें चित्ताचें समाधान ॥
बहेणी म्हणे मना केलासे प्रकाश । असत उदास ठाव नाहीं ॥

बहिणाईचे कांहीं अभंग तुकारामाच्या अभंगाशीं अगदीं एकजीव झालेले आढळतात. उदाहरणार्थ,

भक्तिप्रेम सुख न कळे आणिकां । पंडितां वाचकां वैदिकांसी
जीवन्मुक्त जरी झाला आत्मनिष्ठ । भक्तिप्रेम सुख दुर्लभ त्या ...

हा बहिणाबाईचा अभंग या संदर्भात तुकारामाच्या खालील अभंगाशीं ताडून पहाण्यासारखा आहे—

भक्तिप्रेम सुख नेणवे आणिकां । पांडित वाचकां ज्ञानियांसी
आत्मनिष्ठ जरी जाले जिवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां...

बहिणाईची एकंदर कविता स्फुट स्वरूपाची आहे. तिच्या भाषेंत जिव्हाळा आहे, स्फूर्ति आहे, तेज आहे. समजायला ती सोपी आणि साधी आहे. मात्र कांहीं ठिकाणीं तिची रचना ओबडधोबड व विस्कळीत झालेली दिसून येते. हा दोष सोडला तर तिच्या एकंदर कवितेचा थाट भारदस्त आणि प्रसन्न आहे; व प्रसाद हा काव्यगुण तर सगळीकडे भरपूर प्रमाणांत आढळून येतो. तथापि कांहीं भाग तुकारामाच्या अभंगाचें रूपांतरित स्वरूप दर्शविणारा आहे हें नाकबूल करून चालणार नाहीं. त्याचबरोबर मधून मधून स्त्रीजीवनाचा झालेला आविष्कार उल्लेखनीय असाच आहे असें म्हणतां येईल. बहिणाबाईची विषयांची निवड भरपूर असून त्यांत प्रामुख्यानें भक्ति व वेदांत यांनाच मुख्य स्थान दिलें गेलें आहे.

बहिणाबाईनें स्वतःच्या नवऱ्याबद्दल त्याच्याशीं पटत नसतांहि कोठें अनादर राखविलेला नाहीं. उलट पतिव्रतेचें माहात्म्यच तिनें विशेष खुलासेवार रंगविलेलें

आहे ! बहिणाबाईंच्या तेरा जन्मांच्या हकीकतींत बराचसा सामाजिक भागहि आलेला असून तो मनोरंजक आहे.

बहिणाबाईनें स्वतःच्या मृत्यूसंबंधीं उल्लेख केलेला आहे. तिला तुकारामाप्रमाणेंच स्वतःचा मृत्युकालहि दिसत होता. आणि म्हणून—

आपलें आपण देखिलें मरण । तो झाला शकुन स्वानंदेसी
उभारली गुढी मनाच्या शेवटीं । झाली मज भेटी आत्मारामीं...

असें म्हणतच ती समाधिस्थ झाली आहे. त्यावेळीं तिचें वय ७२ वर्षांचें होतें आणि तोंपर्यंत तिनें काव्यलेखन केलें ही विशेष गोष्ट आहे. तिचा मुलगा विठ्ठल यानें तिच्यावर रचिलेल्या आरतींत " बाईचा मृत्यु शक 'शक सोडश वरी द्वाविंशत्' म्हणजे शके १६२२ हा दिला आहे. "* त्या काळाच्या मानानें बहिणाबाई ही स्त्री समाजांत फारच श्रेष्ठ अशी स्त्री होऊन गेली असेंच म्हणावें लागतें. तिच्या अलौकिक काव्यशक्तीबद्दल कुणाचेंहि दुमत होण्याचें कारण नाहीं. तिच्या कवितेनें मराठी सारस्वतास फार मोठी अशी पारमार्थिक देणगी दिलेली आहे. भागवत धर्माचा इतिहास सांगतांना बहिणाबाईनें म्हटलें आहे—

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणें केलासे विस्तार ॥
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥

वेणाबाई रामदासी

वेणाबाई ही श्री समर्थ रामदासस्वामी यांच्या शिष्यांपैकीं एक प्रमुख शिष्या होती. तिची पुष्कळशी कविता उपलब्ध आहे. परंतु तिचें चरित्र मात्र वास्तव स्वरूपांत स्वतंत्रपणें कोणीं लिहून ठेवल्याचें आढळत नाहीं. तथापि लहानपणांतच वैधव्य प्राप्त झाल्यामुळें वेणाबाई शांत स्वभावी व विरक्त वृत्तीची होती अशी माहिती तिच्या " सीता स्वयंवर " या पुस्तकास जोडलेल्या अल्प-चरित्रांत श्री. देव यांनीं दिलेली आहे.

रामदासांचें शिष्यत्व पत्करीत असतांना वेणाबाईस सासरच्या व माहेरच्या लोकांचा अतिशय त्रास झाला. परंतु तो निमूटपणें सहन करून तिनें आपली वृत्ति

* श्री. आजगांवकर, महाराष्ट्र संत-कवियत्री पान १४२

ढळूं दिली नाहीं. तसेंच रामनामाच्या ठिकाणीं ती किती तन्मय होऊन गेली होती, हें तिच्या पुढील पदावरून दिसून येईल:—

" तुझी तुझी तुझी पावना रामा ॥ धृ० ॥
भावें अभावें कुभावें, परि तुझी, पावना रामा ॥ १ ॥
सुष्ट हो दुष्ट हो नष्ट हो, परि तुझी, पावना रामा ॥ २ ॥
हीन दीन अपराधी, वेणी म्हणे परि तुझी, पावना रामा ॥ ३ ॥

तिची ही वृत्ति पालटून टाकण्याचा तिच्या माहेरच्या लोकांनीं खूप प्रयत्न केला. पण तिनें मुळींच ऐकलें नाहीं. उलट ती म्हणाली—

" राम नामाविण मज कंटेना ॥ धृ० ॥
कोणी वंदिती कोणी निंदिति ।
वास मी त्यांची पाहीना ॥ १ ॥
हृदयीं धरिले सद्गुरुचरण ।
प्राणांतींहि विसंबेना ॥ २ ॥
वेणीचें निजधन रामचि जीवन ।
होणार तें कां सुखें होईना ॥ ३ ॥

समर्थांनीं वेणाबाईची भक्ति ओळखून तिला आपल्या शिष्यवर्गांत सामील केलें. स्वतःच्या मुलाप्रमाणें त्यांचें तिच्यावर प्रेम होतें.

मनींची जीवींची गोष्टी यथार्थ । भक्ति वेणीसी सांगती समर्थ ।
कां जे श्रीराम उपास कां पांसी गुह्यार्थ । आत्माराम निरोपिती ॥

—कित्ता, समास १३, ओ. ४७.

वेणाबाईचा अधिकार समर्थांच्या सर्व शिष्यिणींमध्यें फार मोठा होता. फक्त तिलाच तेवढें सभेंत उभें राहून कीर्तन करण्याची समर्थांनीं अनुज्ञा केलेली होती !

" वेणाबाईवांचूनि कांहीं । इतरां कन्येसी सभेसी कीर्तनाज्ञा नाहीं ।
येकासनीं बैसोनि कीर्तन करणें पाहीं । प्रसंगानुसारें मर्यादें ॥ "

—समर्थप्रताप, अ. २०, ओ. ३१.

वेणाबाईनें लिहिलेल्या " कौल " या प्रकरणामधील भाषेवर रामदासी भाषेची बरीच छाप पडलेली दिसून येते. येथें कौल म्हणजे राजाकडून प्रजेस मिळणारें अभयपत्र आहे. राम सिंहासनावर बसल्यानंतर प्रजेनें त्याजजवळ मागितलेलें एकेक मागणें व रामानें त्याची केलेली पूर्तता हा या काव्याचा विषय आहे. ही कल्पना काव्यांत मांडतांना वेणाबाई लिहिते—

" रघुराज सिंहासनीं सौख्यदाता ।
प्रजा कौल मागावयाला उदीता ।
प्रभू बोलिला रे अपेक्षीत मागा ।
नका हेत ठेऊं समस्तैक सांगा ॥ "

" रामगुहसंवाद " हे वेणाबाईचें दुसरें एक प्रकरण असून त्याची रचना पहिल्या इतकीच चांगली झालेली आहे. वेणाबाईचा पारमार्थिक अधिकार मोठा होता, हे दर्शविणारे तिचे कांहीं अभंग आहेत. परंतु त्यांमध्यें तिच्या नांवाचा उल्लेख " वेणीस्वामी " असा आलेला असल्यामुळें त्यावरून ते तिचेच निश्चित असावेत, असा कांहीं सबळ पुरावा अद्याप उपलब्ध झालेला नाहीं. म्हणून त्याबद्दल येथें विचार न करणेंच अधिक बरें.

वेणाबाईचा सर्वांत प्रमुख असा मोठा ग्रंथ " सीतास्वयंवर " हा आहे. रामायणांतील सीतास्वयंवर हें आख्यान बऱ्याच जुन्याकवींचें आवडतें दिसतें. कारण याच आख्यानावर विठ्ठल, नागेश, वामन इत्यादि कवींनीं फार सुंदर अशी श्लोकबद्ध रचना केलेली आहे. परंतु ओवीबद्ध सीतास्वयंवर फक्त वेणाबाईनेंच रचलेलें दिसतें. या ग्रंथांत एकूण १४ समास असून १५६८ ओव्या आलेल्या आहेत त्यावरून एकनाथाच्या " रुक्मिणी-स्वयंवरा "पेक्षां हा ग्रंथ कांहीं फारसा लहान नव्हे.

वेणाबाईचें भाषाप्रभुत्व आणि काव्यकौशल्य या काव्यांत ठळकपणें नजरेंत भरण्यासारखें आहे. या काव्याविषयीं श्री. शं. श्री. देव लिहितात, " सीतेचें स्वयंवर, वेणाबाईपूर्वी व नंतर पुष्कळांनीं वर्णिलें आहे. पण वेणाबाईच्या ग्रंथाची योग्यता कांहीं निराळी आहे. स्वयंवरासारख्या प्रसंगाची आवड स्वभावतः स्त्रियांना असावयाची आणि म्हणून त्यांच्या लेखणींतून तो प्रसंग जसा उतरेल तसा तो इतरांच्या लेखणींतून उतरणार नाहीं...माझ्या म्हणण्याचा भावार्थ इतकाच कीं, हा असला प्रसंग यथासांग वर्णन करण्याचा अधिकार जसा एखादा स्त्रीला असतो, तसा तो पुरुषाला नसतो. श्री एकनाथाचा रुक्मिणीस्वयंवर ग्रंथ वेणाबाईच्या सीतास्वयंवराशीं ताडून पाहिला म्हणजे माझ्या म्हणण्याची सत्यता वाचकांस पटेल...रुक्मिणीस्वयंवराचा प्रसंग वेगळा आहे. तो सोडून दिला तरी प्रत्यक्ष लग्न सोहळा एकनाथांनीं त्रोटक वर्णिला आहे. तो वेणाबाईनीं साद्यंत वर्णिला आहे व एकनाथांनीं अथपासून इतिपर्यंत आपली अध्यात्मदृष्टि अढळ ठेवली आहे, तर वेणाबाईनीं आपली भक्तिप्रेमाची दृष्टि कोठेंहि ढळूं दिली नाहीं. " *

श्री. देव यांचें हें विधान मान्य करण्यासारखें आहे. त्यांनीं या दोन ग्रंथांमधील जो साम्यभेद दर्शविला आहे, तसाच आणखी एक ठळक फरक येथें आढळून येतो. " एकनाथ हे मोठे व्युत्पन्न असल्यामुळें त्यांची भाषा जशी प्रगल्भ आणि संपन्न आहे तशी वेणाबाईची नाहीं. मात्र स्त्रियांनाच ज्या गोष्टींचा अनुभव अधिक अशा गोष्टी विस्तारेंकरून सांगण्यांत वेणाबाईनें विशेष कौशल्य दाखविलें आहे " † वेणाबाईचें हें वैशिष्ट्य पहावयाचें असेल तर उदाहरण म्हणून तिच्या

* श्री. शं. श्री. देव, प्रास्ताविक, " श्रीसीतास्वयंवर "

† श्री. आजगांवकर. महाराष्ट्र संत-कवयित्री. पान २०१

ग्रंथांमधील सीतेला रामाचे स्वाधीन करतांना जनकाची व त्याच्या पत्नीची मनः-स्थिति कशी झाली होती हा प्रसंग रंगविणारें पुढील वर्णन पहावें.

" करीं दुहिता मिथळापति । जानकी निखी भूपति ।
कन्या स्नेहाची थोर प्रीति । नेत्रोदक चालिले ॥
कनक पुतळी धरूनि हातीं । राजा निखी अयोध्या पती ।
ते समई गोत संपत्ति । सभेसहित गहिंवरे ॥
जानकी गुणें हृदय कृपण । राजा निरवितां उच्चारण ।
अष्ट वर्षे केलें ग्यां पाळण । आतां तुम्हीं करावें ॥
माझ्या प्राणाची प्राणकळा । सुखदायक सुसीळा ।
परम स्नेहें भूपाळा । ईचें पाळण करावें ॥
सकल कीर्तीची गजगजा । निरोपम्य हे अवनिजा ।
ईचें पाळण रायें वोजा । बहुप्रकारें करावें ॥
कौसल्यें निरवी जनक बाळा । जळ वाहे नेत्रांजळा ॥
म्हणे माझी हे सुसीळा । पाळण तुम्हीं करावें ॥

या वर्णनाप्रमाणेंच सीतेला तिच्या आईवडिलांनीं केलेला उपदेशहि चित्तवेधक झालेला आहे. त्याचप्रमाणें या काव्यांत ओघानें आलेलें " सीमांत-पूजन, हळद, पत्रिकापूजन, देवकप्रतिष्ठा, रुखवत, तेलवण, पायघड्या, कलशपूजा, गणेशपूजा, दागिन्याचें वर्णन, मधुपर्क, लाजाहोम, सुनमुख, उखाणे, हळदी उटणें, अक्षवाणें, भोजन पक्कानांचीं नांवें, साडेंसमर्पण, वरात, लक्ष्मीपूजन वगैरे लहानमोठ्या सोहळ्यांचें वर्णन फार बहारीचें आहे. " *

" वेणाबाईची कविता अगदीं साधी, घरगुती भाषेंत रचिलेली आहे. मुक्तेश्वरी उच्च दर्जाचें काव्य या कवितेंत फारसें नाहीं, पण स्त्रीस्वभावसहज मार्दव आणि सहृदयता या दोन गुणांच्या बाबतींत ही कविता दुसऱ्या कोणंत्याहि कवीच्या कवितेस हार जाणार नाहीं. " †

वेणाबाईचा पारमार्थिक अधिकार मोठा होता हे तिनें आपल्या शिष्यांना गुरुपदेश दिला होता यावरून दिसून येतें. तिच्या शिष्यांबद्दल गिरिधर स्वामींनीं "समर्थप्रतापां"त तिचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. वेणाबाईचें चरित्र वास्तव-स्वरूपांत उपलब्ध नसल्यानें तिचा जन्म अंदाजीं शके १५४९ मध्यें झाला असावा असें श्री. देव यांचें म्हणणें आहे. तेव्हां अधिक माहिती मिळेपर्यंत तेंच गृहीत धरावयास हवें.

---

* श्री. देव, प्रास्ताविक.

† महाराष्ट्र संतकवयित्री, पा. १८६

समाजांतील वेगवेगळ्या थरांमधील लक्षावधि लोकांना एकत्र आणण्याची महाराष्ट्रांतील संतांची मनीषा होती. परंतु या कामीं अंतरींचा जिव्हाळा जवळ भरपूर असला, तरी प्रत्येकाची कुवत सारखीच होती असें नाहीं. प्रत्येकाची प्रकृति निराळी होती. तथापि जातीभेद न मानतां सर्वांना एका विशिष्ट पंथाच्या विचारसरणीनें एकत्र आणून एकाच मनोभावाची उपासना करण्याची तीव्र तळमळ प्रत्येकाला होती. म्हणून सर्वांनीं वारकरी सांप्रदायाची जोपासना केली. भक्ति-मार्गाचा अवलंब केला, समाजांत नवें चैतन्य, नवा उत्साह निर्माण होईल, हें आवर्जून पाहिलें.

मराठी संतांच्या या वारकरी वा भक्ति सांप्रदायानें महाराष्ट्रांतील बहुजन समाजाच्या धर्मजीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान मिळवून दिलें. ग्रामजीवनामध्यें आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठीं संकुचित मनोवृत्तीच्या लोकांना अंतर्मुख बनविलें. त्यांचे ठायीं आत्मोन्नतीची प्रेरणा निर्माण केली. अठरापगड जातीच्या लोकांच्याकरितां ज्ञानदेवादिकांनीं मोक्षसुखाच्या प्राप्तीसाठीं मौलिक विचारांचें अन्नछत्र घातलें. त्याद्वारें उदार व प्रगतिशील विचारप्रणाली अस्तित्वांत येईल हें पाहिलें. आणि हें सर्व घडवून आणण्यासाठीं काव्याचें माध्यम स्वीकारलें.

मागें सांगितल्याप्रमाणें भक्ति हा या संतकाव्याचा स्थायिभाव आहे. म्हणजे हे सर्व संतकवि सुरवातीला भक्त होते. भगवंताचें नामस्मरण करणें हा त्यांच्या कार्याचा प्रमुख भाग होता, केवळ मोक्षप्राप्तीचें साधन म्हणून त्यांनीं आपल्या भक्तीचा पुरस्कार केला आहे. काव्य हें त्यांच्या या भक्तीचें साधन होतें इतकेंच. या सर्व संतकवींनीं आपले अभंग काव्य म्हणून इतरांसाठीं केलेले नसून ते आपली अंतरींची तळमळ देवापुढें मांडण्यासाठीं लिहिले आहेत. त्यांचे हे अभंग म्हणजे त्यांनीं केलेला देवापुढचा धावा आहे.

भक्तिमार्ग हा सर्व वर्णांतील सर्व स्त्री-पुरुषांना खुला होता. त्यामुळेंच त्याचा प्रसारहि झपाट्यानें झाला. परमेश्वराला ज्ञानानें ओळखून भक्तीनें भजण्यांतच नवीन भागवत सांप्रदायाचें सार सांठविलें होतें.

भक्तीचे सात्त्विक, राजस व तामस असे तीन प्रकार असून ती करण्याचे प्रकार नऊ आहेत.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

... या नवविधा भक्तीनें संत कवींची उज्ज्वल परंपरा सुरू झाली, त्या कवींच्या आत्मनिवेदनांतून संतकाव्याचा जन्म झाला ... संस्कृत काव्यांत जो आत्म-निवेदनाचा अभाव होता, तो संत कवींनीं ही नवी परंपरा चालू करून दूर केला. पहिल्या दर्जाचें भावगीत संत काव्यांतूनच मराठींत प्रथम उतरलें ...

नामदेव, जनाबाई, चोखामेळा यासारख्या संत कवींचे अभंग शुद्ध भावगीतें आहेत. तीं त्यांच्या अंतःकरणांत अंकुरतात, तिथेंच उमलतात आणि अखेर तिथेंच कोमेजतातहि. पण त्यांचा हा सुमनहार अंतःकरणांतल्या पांडुरंगाला पोंहोचत असे.

संस्कृत भाषेची तिजोरी राजरोसपणें व बेशकपणें फोडून तिच्यामधलें ब्रह्म-विद्येचें भांडार ज्ञानदेवांनीं "मराठीचिये नगरीं" आणून तें सर्वसामान्यांना वाटून टाकलें. म्हणजे जुन्या परंपरेविरुद्ध एक प्रकारचें भलें मोठें बंड करून त्यांनीं जुन्या संकेतांना झुगारून लावले ! त्यासाठीं त्यांना शब्दांची अडचण पडली नाहीं. भाषेचाहि अडथळा झाला नाहीं. उलट—

जैसें बिंब तरी बचकेचि एवढें ।
परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें ।
शब्दाची व्याप्ती तेणें पाडे । अनुभवावी ॥

या प्रकारें आपले हे मराठी बोल समुद्रापेक्षांहि खोल आणि अर्थभरित असल्याचा त्यांनीं निर्वाळा देऊन टाकला ! मराठीच्या प्रारंभ काळच्या तिच्या सामर्थ्याविषयींचा ज्ञानदेवांचा केवढा प्रचंड हा आत्मविश्वास !

सर्व संत कवींच्या काव्याची ही भूमिका आहे. ह्या कवितेनें महाराष्ट्रांत एक मोठी क्रांति केलेली आहे. आपल्या भक्तिमार्गानें समाजाला स्वतःच्या उन्नतीसाठीं झगडण्याचें सामर्थ्य या साहित्यानें निर्माण केलेलें आहे. त्यामुळेंच समाजाला आत्मपरीक्षण करणें शक्य झालें होतें. संतकवींनीं निर्माण केलेल्या या अंतर्मुख दृष्टीमुळें बाहेरून येणाऱ्या परक्या संस्कृतीची त्यांना भुरळ पडूं शकली नाहीं.

ज्ञानेश्वर, नामदेव किंवा तुकाराम ह्यांसारख्या संत कवींनीं समाजाच्या उन्नतीसाठीं बुद्धिप्रधान काव्यें लिहिलेलीं आहेत. स्वतःच्या दुःखापेक्षां सामाजिक दुःखाची आंचच त्यांना जास्त तीव्रतेनें जाणवलेली होती. ज्या ज्ञानेश्वरीच्या पायावर मराठी सारस्वताचें मंदिर उभारलेलें आहे असें आपण समजतों, ती ज्ञानेश्वरी लिहीत असतांना मराठीच्या प्रांतामध्यें ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची ज्ञानेश्वरांनीं प्रतिज्ञा केलेली होती.*

जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचें ॥
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तें तें लाहो । प्राणिजात ॥

या ध्येयासाठीं त्यांना ब्रह्मविद्येचा सुकाळ करावयाचा होता. ब्रह्मविद्येचा "थोर विचार" असा अर्थ होतो. ब्रह्म म्हणजे मोठी वस्तु. क्षुद्र वस्तूंचे विचार

* समीक्षण, कु. पां. कुलकर्णी.

त्यांना नको होते. मोठे विचार मांडून समाजांतील विषमता, अन्याय, पाप यांचा अंधार त्यांना दूर करावयाचा होता. प्रत्येकाला कर्तव्याचा पंथ दिसावा म्हणून त्यांची ही खटपट होती. त्यामुळें त्यांची काव्यरचनाहि त्याच मनोवृत्तीला साजेशी झालेली आहे. मागें दिलेल्या स्त्रीकवयित्रींची कविता या कवितेपेक्षां निराळी दिसते, याला कारण त्या कवयित्रींची मनाची बैठकच त्याहून निराळी होती. बुद्धिप्रधान ज्ञानापेक्षां भावपूर्ण भक्ति त्यांना अधिक प्रिय वाटत असावी, असें त्यांच्या कवितेवरून दिसून येतें. त्यामुळें काव्यकल्पनेची त्यांची भरारी संत कवींच्या मानानें कमी असलेली आढळून येते. स्वतःच्या भावनामध्येंच त्यांची कविता प्रामुख्यानें गुरफटून गेल्यामुळें बाहेरचें जग तिच्यांत फार थोडें आलेलें आहे.

" माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेंही पैजा जिंके। ऐशीं अक्षरें रसिकें। मेळवीन ॥ (ज्ञानेश्वरी, अध्याय ६, ओ. १४) असें ज्ञानेश्वरा-प्रमाणें आव्हान देऊन मराठी भाषेच्या अभिमानाबद्दल बोलण्याचें कारणच या कवयित्रींना कधीं वाटलेलें नव्हतें. " दळितां कांडितां तुज गाईन अनंता " अशीच त्यांची वृत्ति होती.सामाजिक अन्यायाची झळ सोसावी लागली,तरी तिचें स्वरूप त्यांना स्वतःपुरतेंच जाणवलें, असें कान्होपात्रेच्या अभंगावरून दिसून येईल. समाजाला स्वतःच्या नवविचारांनीं धक्का देऊन जागें करण्याचें काम त्यांची कविता करूं शकली नाहीं. हृदयांत उचंबळून येणारी प्रत्येक भावना या कवयित्रींनीं वैयक्तिक भूमिकेवरून पांडुरंगावर शिंपडलेली आहे. त्यामुळें त्यांची कविता उत्कृष्ट भावगीत म्हणून मात्र श्रेष्ठ दर्जाची झालेली आहे. त्यांच्या हृदयांतील भोळ्याभाबड्या बोलांनींच त्यांच्या भावगीतांचें मोल ठरविलेलें आहे.

देहीं देखिली पंढरी। आत्मा अविनाश विटेवरी।
तो हा पांडुरंग जाणा। शांति रुक्मिणी निजांगना ॥

चोखोबानें स्वतःच्या हृदयांत दिसूं लागलेला विठ्ठल या रूपकानें व्यक्त केला. तीच भावना जनाबाईनें " देव खाते देव पिते " या अभंगांत मोठ्या हळुवारपणें व्यक्त केलेली दिसून येते.

या संतकवींचा देवाकडे पहाण्याचा एक स्वतंत्र व ठराविक दृष्टिकोन होता. त्यांच्या काव्यांत भावनेची उत्कटता होती. नामजप करीत असतांना भक्तिभावानें मनाची एकाग्रता करावयाची आणि त्यामुळें पांडुरंगाशीं तदाकार होऊन त्याची मूर्ति आपल्या अंतःकरणांत पहावयाची व अशा रीतीनें सविकल्प समाधीचें परमोच्च सुख अनुभवावयाचें अशी त्यांच्या मनाची बैठक होती. हा आनंद किंवा हें अत्युत्कट सुख प्रत्येकाला अनुभवितां येण्याजोगें होतें. पण सर्वांना तें मिळविणें शक्य झालें नाहीं. जनाबाईसारख्या फार थोड्या भगवद्भक्तांना त्यांत यश आलेलें आहे. ऐहिकाऐवजीं बहुधा सारे संत अध्यात्मांतच अधिक रंगून जात.

संत कवि आणि कवयित्री यांच्या लेखनांत जो फरक आढळतो, त्याचें हेंच प्रमुख कारण होय.

तथापि आहे त्या अवस्थेंतील संत कवयित्रींची ही कविता त्यांचें म्हणून निराळें वैशिष्ट्य दर्शविणारी खासच आहे.

विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा

हा जनाबाईचा वत्सल भाव किंवा—

जेथ आहे तुलसीचें पान । तेथ वसे नारायण

हा बहिणाबाईचा भक्तिभाव केव्हांहि वैशिष्ट्यपूर्ण असाच आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठीं त्यांच्या मनांत प्रकटलेली आर्तता अपूर्वाईची आहे. ब्रह्मानंदांत निमग्न होण्याची त्यांची वृत्ति चित्तवेधक आहे. आणि म्हणूनच ज्ञानेश्वर-तुकारामां-सारखी अभिजात काव्यप्रतिभा त्यांच्या ठायींहि असल्याचें लक्षांत आल्याखेरीज रहात नाहीं.

★

. ३ .

स्त्रियांचें अलिखित वाङ्मय

अगदीं प्राचीन काळापासून तों थेट या घटकेपर्यंत सारख्याच आवडीनें निर्माण होत गेलेलें व केवळ पाठांतराच्या बळावर जिवंत राहिलेलें वाङ्मय " अलिखित वाङ्मय " या नांवानें ओळखलें जातें. याच वाङ्मयास 'बायकांचें वाङ्मय' किंवा 'लोकवाङ्मय' वा 'लोकसाहित्य' अशीहि संज्ञा दिली गेली आहे. हें वाङ्मय प्रामुख्यानें स्त्रियांनीं निर्माण केलेलें आहे. या वाङ्मयांत स्त्रियांनीं आपला जीव ओतलेला आहे. त्यामुळें त्याची रचना सहजस्फूर्त तशीच अभिजात सौंदर्यानें नटलेली अशी झालेली आहे. हें वाङ्मय ज्या स्वयंस्फूर्तीनें निर्माण झालें, त्याच स्वयंस्फूर्तीनें केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान् पिढ्या टिकून राहिलें ! मनांत आलें तें आणि जसें सुचलें तसें ह्या वाङ्मयांत आविष्कृत झालेलें आहे. एकाला सुचलें आणि दुसऱ्यानें तें ऐकतांक्षणींच त्यांत भर घातली, असें त्याचें निर्मितीचें गमक आहे. एकट्या दुकट्याचा असा कोणाचा त्यावर हक्क नाहीं व मुख्य म्हणजे कोणीहि तसें मानीत देखील नाहीं, हें विशेष होय. हें वाङ्मय सर्वांचें आहे. म्हणून तें लोकवाङ्मय लोकांचें वाङ्मय म्हणून ओळखलें जातें. बऱ्याच पिढ्यांनीं त्याचें जतन पाठांतर करूनच केवळ केलें. त्याचें लेखन केलें नाहीं. म्हणून तें अलिखित वाङ्मय होय. या वाङ्मयाच्या निर्मात्यांना लेखनकलाच अवगत नसल्यानें तें अलिखित स्वरूपांत राहिलें ! असें असूनहि तें लोकप्रिय ठरलें हा या वाङ्मयाचा प्रमुख विशेष होय आणि म्हणूनच त्यास 'अक्षर वाङ्मय' असेंहि म्हटलें जातें.

अशा प्रकारच्या वाङ्मयाबद्दल गौरवानें बोलतांना सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर सांगतात, " रणांगणावरील रक्ताचे पूर थोडे पावसाळे गेले नाहींत तोंच धुऊन जातात; पण कागदाच्या कपट्यावरील शाईचा थेंब शेंकडों उन्हाळे उलटले तरी ओलाच रहातो. सोन्याची तागडी मालकाच्या पश्चात् माती-मोल होऊन जाते; पण लांकडाच्या लेखणींतून प्रकट होणारें नारसिंहरूप देव्हाऱ्यांत जाऊन बसतें ! नांगरांचे तास चार दिवसांत बुजतात आणि त्यांच्या श्रमाचें पीक वर्षाभरांत दृष्टिआड होतें. पण लेखणीच्या रेखा कधींच पुसल्या जात नाहींत आणि तिचीं सोन्याचीं पिकें कधींच कमी होत नाहींत. फुलांत सुगंधी गुलाब कीं, निशिगंध, तीर्थांत श्रेष्ठ प्रयाग कीं काशी, हें एकवेळ सांगणें कठीण आहे, पण

मनुष्याच्या बुद्धीनें उभारलेल्या सर्व जयस्तंभांत काळाच्या जोराला न जुमानणारा एकच आहे आणि तो वाङ्मयाचा होय. "*

श्री. भाऊसाहेब (वि. स.) खांडेकर यांचें हें म्हणणें प्रामुख्यानें लिखित वाङ्मयांतील अक्षर वाङ्मयाला धरून आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणांत ज्याचा विचार करावयाचा आहे तें लोकवाङ्मय याहिपेक्षां श्रेष्ठ दर्जाचें आहे. श्रेष्ठ प्रकारच्या वाङ्मयाच्या कोणत्याहि कसोटीला तें उतरतें. एवढेंच नव्हे तर त्याहिपलीकडे लावाव्या लागणाऱ्या कसोट्यांना तें सहज उतरूं शकेल, याची खात्री श्रेष्ठ दर्जाच्या वाङ्मय सेवकांना आतां आलेली आहे ! त्यामुळेंच कीं काय अनेक संशोधक मंडळी अलिकडे या लोकवाङ्मयाची जमवाजमव करून त्याचें सौंदर्य पारखण्याची शिकस्त करतांना दिसून येत आहेत.

लोकवाङ्मय जमा करावयाचें म्हणजे एक फार मोठें कष्टाचें व जिकीरीचें काम आहे. वृद्ध मंडळींच्या कडून मोठ्या मिनतवारीनें तें मिळवावें लागतें. त्यांची लहर येण्यासाठीं अनेकदां त्यांची मनधरणी करावी लागते. त्यांचा विश्वास संपादन करावा लागतो. त्यांच्याइतकी मनाची उंची वाढवावी लागते ! ते सांगतील तें त्यांच्याच शब्दांत टिपून घेतलें पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो; आणि त्यांच्या ठायीं असलेला अर्थ हें वाङ्मय गोळा करणारांना माहीत असला पाहिजे अशीहि त्यांची इच्छा असते ! त्यामुळें श्रमाच्या मानानें कधीं कल्पनेबाहेर तर कधीं कल्पनेपेक्षांहि फार कमी असा या मौलिक साहित्याचा साठा संशोधकाच्या हातीं येतो. त्या कारणानें कधीं धीर खचतो तर कधीं खूप उत्साह येतो. तरीपण संशोधक मंडळी मोठ्या चिकाटीनें या कामीं खपत असतात. धीर न सोडता गांवोगांव फिरून हें साहित्य गोळा करतात. अनेकदां त्यांना वाईट अनुभव येतात. कोणी धड सांगत नाहीं, कोणी धड बोलत नाहीं अशी वेळ येते. म्हणून निराश होऊन चालत नाहीं. गुण्यागोविंदानेंच सारें घ्यावें लागतें. कारण या अभ्यासाचे सारे संदर्भ व आधारभूत ग्रंथ हीं बोलतीं चालतीं म्हातारी मंडळीच असतात ! आणि विशाल जग ही त्यासाठीं लागणारी ग्रंथशाला असते ! त्यामुळें या प्रांतांत वावरणाऱ्या सर्वांनाच यश येतें असें नाहीं. फार थोडी मंडळी या कामांत यशस्वी झाली आहेत.

अशा कामीं यश मिळवावयाचें म्हणजे मूळची आवड पाहिजे. विषयाबद्दलचा जिव्हाळा पाहिजे. सर्वसामान्य लोकांच्याबद्दल मनांत आदराची भावना पाहिजे. त्यांच्या चालीरीतींचा, संस्कृतीचा अभ्यास पाहिजे. आणि मुख्य म्हणजे ज्यांचेकडून हें साहित्य मिळवावयाचें त्यांच्याशीं एकजीव होतां आलें पाहिजे. त्यासाठीं ह्या लोकांचें मानसशास्त्र अभ्यासावें लागतें. त्यांची आपणाला व आपली

* गडकरी व्यक्ति वाङ्मय.

त्यांना पारख होऊन खात्री यावी लागते. तरच हें वाङ्मय थोडेंफार कां होईना हातीं येतें. एरव्हीं नाहीं ! कारण हीं म्हातारीं माणसें आपण होऊन कोणाकडे आमच्या जवळचें हें वाङ्मय घ्या व छापून काढा म्हणून जात नाहींत, जाणारहि नाहींत ! वाडवडिलांचें हें मौलिक धन आपल्याजवळ आहे एवढ्यांतच तीं समाधान पावतात ! कोणी शिकणारा भेटला कीं पोटभर सांगतातहि ! उगाच जवळ ठेवून तें कुजवीत नाहीत.

पण गेल्या चारसहा पिढ्यांमध्यें या प्रकारच्या वाङ्मयाची गोडी कमी होत चाललेली दिसून येते ! नव्या जगांतील नव्या शिक्षणाच्या आकर्षणामुळें या बाबतींत दुर्लक्ष होत चाललें आहे. ‘ हें बायकी वाङ्मय, करायचें काय ? ’ अशा रीतीनें त्याची अवहेलना होते आहे ! तेव्हां ही आबाळ थांबावी आणि या वाङ्मयाचें अमरत्व कायम टिकवावें, म्हणून कांहीं जाणती मंडळी या वाङ्मयाचें पालनपोषण करायला पुढें आली आहेत ! केवळ तोंडातोंडीं प्रचारानें जिवंत राहिलेल्या या वाङ्मयाची जुळणी करून तें छापून सुरक्षित ठेवण्याकडे अशा लोकांचा कल झुकूं पहात आहे. त्या दृष्टीनें जोराचे प्रयत्नहि सुरू झाले आहेत.

अशा प्रकारचा प्रयत्न पहिल्यांदां एकोणिसाव्या शतकामध्यें जर्मनींत झाला. ग्रीक बंधूंनीं या कामाला आरंभ केला. शास्त्र म्हणूनहि लोकवाङ्मयाकडे त्यावेळच्या विद्वानांचें लक्ष गेलें. “ याच सुमारास बाप्पप्रभृति विद्वानांच्या तौलनिक भाषाशास्त्र विचारांचाहि उत्कर्ष झाला. पौर्वात्य देश, त्यांतील जुन्या व विविध संस्कृति, तिकडील भाषा, वगैरेंच्या अभ्यासाची गोडी दिवसानुदिवस वाढत गेली आणि शब्दांची वंशपरंपरा कळून आल्यामुळें जसा मानवी इतिहासावर नवीनच प्रकाश पडूं लागला तसाच, लोककथांच्या तौलनिक अभ्यासापासूनहि नवीनच प्रकाश पडून, मनुष्याच्या ज्ञानांत मोठी महत्त्वाची व मनोरंजक भर पडत गेली. आणि गेल्या पन्नास वर्षांत तर लोककथा शोधक व अभ्यासक मंडळें देशोदेशीं स्थापन झालीं आहेत. ”* तसेंच “ शिंपल्याच्या जोडींतील इतस्ततः विखुरलेल्या, अर्ध मौक्तिकावस्थेंतील मलीन वालुका-कणिकांवर, चुनखडी सारख्या द्रवांचें संस्करण करून ‘ कालव ’ ज्याप्रमाणें त्यांचें तेजदार मोत्यांच्या जाळ्यांत रूपांतर करतो, तीच अव्वल दर्जाची कुशलता, या संकलनकारांनीं दाखविलेली आहे. ”‡

मराठी भाषेपुरतें बोलावयाचें झालें तर अशा प्रकारच्या लोकवाङ्मयाच्या संकलनाचें काम कै. सानेगुरुजी (स्त्रीजीवन), डॉ. कमलाबाई देशपांडे (स्त्रीगीतें), सौ. मालतीबाई दांडेकर (लोकसाहित्याचें लेणें), श्री. पां. श्री. गोरे (वऱ्हाडचीं लोकगीतें), श्री. महादेवशास्त्री जोशी (गोड स्त्री-गीतें), सौ. अनुसया लिमये

* म. म. दत्तो वामन पोतदार. प्रस्तावना. लोककथा (शं. ग. दाते)

‡ ना. गो. हूड, निवेदन, मऱ्हाडी लोकगीतें.

(घाटावरील श्रमिकांचीं लोकगीतें), डॉ. ना. गो. नांदापूरकर (माहेरचं मराठी, मराठीचा मोहोर), श्री. वामन चोरघडे (लोकसाहित्याचें मूळधन), श्रीमति दुर्गा भागवत (लोकसाहित्याची रूपरेखा), डॉ. सरोजिनी बाबर (मराठींतील स्त्रीधन)' मराठी लोककथा, सुंबरान मांडीलं, मंगलाक्षता, देवदर्शन, मायबोलीचा नवस;डॉ.नरेश कवडी, श्री. भानू शिरधनकर, सौ. कुमुदिनी रांगणेकर, सौ. लीला दुबे, श्री.सदाशिव माळी, श्री. बोरसे वगैरे अनेक स्त्री-पुरुषांनीं केलेलें आहे. त्याचप्रमाणें " दळतांना, कांडतांना, पाळणा हालवितांना, बाजारहाट करावयास जातांना, तसेंच कापणी पेरणीच्या वेळीं खेड्यांतील सर्व वातावरण असल्या वाङ्मयानें दरवळलेलें असतें."‡ याचा सतत अनुभव येत गेल्या कारणानें हें काम आतां अधिक नेटानें ही मंडळी करीत आहेत. अनेक नवीन होतकरू तरुण मंडळी त्यांच्या कामास हातभार लावीत आहेत.

याशिवाय सरकारच्या वतीनेंहि या कामीं अलिकडे नांव घेण्याजोगे प्रयत्न सुरू झाले आहेत हे विशेष होय. मराठी पुरतें बोलायचें झालें तर मुंबई सरकारनें व महाराष्ट्र सरकारनेंहि एक खास मंडळ या कामासाठीं नेमलेलें आहे. या मंडळांत या विषयाची तज्ञ मंडळी काम पहात आहेत. त्यांच्यावतीनें लोकसाहित्याचीं चार प्रकाशनें बाहेर पडलीं आहेत. पांचवें प्रकाशन प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. त्याचप्रमाणें या मंडळानें लोकगीतांच्या बऱ्याच ध्वनिमुद्रिका (टेप रेकॉर्डिंग) घेतल्या असून, परंपरेनें चालत आलेल्या लोकसंगीतालाहि जतन करण्याचा प्रयत्न केला आहे.

अलिकडे हा विषय लोलमान्य होत असल्याचा आणखी एक उल्लेखनीय पुरावा म्हणजे निरनिराळ्या विद्यापीठांनींहि ह्या विषयास संशोधनाचा एक विषय म्हणून मान्यता दिलेली असून, कांहीं मंडळींनीं विद्यापीठाकडून या विषयावर पीएच्. डी.ची पदवीहि मिळविलेली आहे !

लोकवाङ्मयाचें अंतरंग अनेक प्रकारांनीं सजलेलें आहे. ओव्या, उखाणे, म्हणी, गाणीं, कहाण्या, लोककथा, कोडीं इत्यादींचा लोकवाङ्मयांत प्रामुख्यानें समावेश होतो. या वाङ्मयाच्या सान्निध्यामुळें समाजाची संस्कृति, समाजाच्या भावना, समाजाच्या समजुती वगैरे बाबतची कल्पना निश्चित करणें सोयीचें होतें. त्याचप्रमाणें तत्कालीन सामाजिक स्थितीचा खराखुरा इतिहासहि पहावयास मिळतो. लोककथा व लोकगीतें हीं त्या त्या काळच्या अभ्यंतर जीवनाच्या शिल्पकृति आहेत. बहुजन समाजाच्या जिव्हेवर या शिल्पकृति कोरल्या गेल्या आहेत हें विशेष होय !

ह्या लोकवाङ्मयाची रचना प्रामुख्यानें स्त्रीवर्गाकडून झालेली असल्यामुळें त्याची भाषा अत्यंत घरगुती, साधीभोळी, जिव्हाळ्याची व जुन्या वळणाची अशी

‡ लोककथा व लोकगीतें. वि. वा. जोशी.

राहिलेली आहे. म्हणून अशा प्रकारच्या वाङ्मयास डॉ. कमलाबाई देशपांडे यांनीं "अपौरुषेय वाङ्मय" असें म्हटलें आहे. त्यांच्यामतें "स्त्रियांच्या जीवनावर आधारलेलें, स्त्रियांचेकडून खेळ, सण, उत्सव इत्यादि प्रसंगीं उपयोगांत आणलें जाणारें, स्त्रियांच्या दृष्टिकोनांतून व प्रामुख्यानें स्त्रियांनीं रचिलेलें वाङ्मय म्हणजे "अपौरुषेय वाङ्मय" होय. या वाङ्मयाला जुन्या संस्कृत अपौरुषेय वाङ्मयाच्या पाठीशीं असलेलें ईश्वरप्रणिततेचें आवरण, गूढ पावित्र्याचें संरक्षण, व नव्या लेखनमुद्रणादि शक्तींचें अवलंबन जरी मिळालें नाहीं, तरी आवडीनिवडींच्या नैसर्गिक चाळणींतून गळत गळत खालीं उरलेलें व म्हणून एक प्रकारें हें "अक्षर वाङ्मय" आहे असें म्हणतां येईल...हें वाङ्मय कागदावर लेखगत झालें नाहीं. पण वाणीवर खेळलें. त्याचप्रमाणें भूर्जपत्रें, शिला इत्यादिकांवर कोरलें गेलें नाहीं, पण स्त्रीहृदयावर कोरलें गेलें व त्यामुळें विस्मृत न होतां वाणीवर खेळत खेळत पिढ्यान्‌पिढ्या चालत आलें. म्हणून 'वाङ्मय'—वाचायुक्त—हा शब्द येथें यौगिक अर्थानें लागू पडतो." (स्त्रीगीतें.)

ओवी

"ज्या वाङ्मयांत स्त्रियांनीं आपला आत्मा संपूर्णपणें ओतला आहे असें वाङ्मय म्हणजे ओवी वाङ्मय. जात्यावर दळतांना, पाळणा हालवतांना, मुलांना खेळवतांना, थोपटतांना, झोपाळ्यावर झोके घेतांना या ओव्या सहज स्फूर्तीनें रचल्या गेल्या आहेत. या ओव्यांतील अकृत्रिम सहृदयता अपूर्व आहे. या ओव्यांत वत्सलतेचा सिंधु आहे. कोठें कोठें विनोदाची सुंदर छटाहि आहे. इतरहि रस इतस्ततः मर्यादेनें उभे आहेत." (सानेगुरुजी. स्त्रीजीवन).

या ओव्या एकमेकींकडून एकमेकींच्याकडे तोंडोतोंडीं आलेल्या आहेत. मनांत येईल तो प्रत्येक भाव त्यामध्यें मिसळलेला आहे. जिव्हाळ्याचें म्हणून जेवढें वाटेल तेवढें त्यांत सांगितलेलें आहे. त्या कारणानें ओव्यांचें जग अमर्याद झालें आहे ! ओव्या सांगाव्या तेवढ्या थोड्या आणि ऐकाव्या तेवढ्या कमीच अशी परिस्थिति आहे. एका दमांत दोनशें अडीचशें ओव्या तरी एखादी खेडूत भगिनी सहज सांगू शकते ! अशा वेळीं तिचें म्हणणें असतें कीं, जात्यावर बसल्याखेरीज, तान्हुलें मांडीवर आल्याखेरीज अगर घरांत मंगलकार्य निघाल्याखेरीज तिला ओवी नीटशी सुचत नाहीं ! जात्यावर तर तिचें ईश्वराप्रमाणें प्रेम असतें ! ह्या देवाजवळ ती आपलें काळीज उघडें करतें. ह्या देवाशीं बोलतांना तिच्याजवळची भावगंगा दुथडी भरून वहाते आणि ती स्वतः गानगंगा होऊन स्वतःलाहि अशा वेळीं विसरून जाते !

महाराष्ट्रामधील स्त्रिया दळतांना अगर कांडतांना ओव्या गात असत, असे सातव्या आठव्या शतकांतील उल्लेख सांपडतात. " मराठी पुरतें पाहिलें तर ओवी छंद सर्वांत जुना दिसतो. इतका कीं, त्याचें मूळ कांहीं विद्वान् अगदीं वेदांपर्यंत किंवा त्याचेंहि पाठीमागें नेऊन भिडवितात. ओवी मराठ्यांच्या अंगांत इतकी मुरलेली आहे कीं, दळतांना-कांडतांना ती आपोआप प्रकट होते. ' केळीचा खांब ग बाई । बत्तीस केळांवरी । बयाची माझ्या माया । सर्व्यां लेकरांवरी ॥ ' ही ओवी वाचून मला वाटतें कालिदासहि लवला असता; इतकें हें बायकांचें वाङ्मय सरस आहे. या ओव्यांत पुष्कळशा ओव्या साडेतीन चरणी आहेत. कांहीं चार चरणी आहेत. साडेतीन चरणींत दुसऱ्या व तिसऱ्या चरणांचे अंतीं यमक असतें. चार चरणींत दुसऱ्या व चौथ्या चरणांचे शेवटीं यमक असतें. या ओव्या म्हणण्याचे विशिष्ट प्रकार आहेत. ते बायकांपासूनच शिकावे व ऐकावे. " (सानेगुरुजी. स्त्रीजीवन).

स्त्रियांनीं आपल्या कवितेसाठीं वापरलेला हा ओवी छंद प्रामुख्यानें आत्मनिष्ठ भावना रंगवितांना वापरला आहे. स्वतःच्या माहेरच्या व कांहीं अंशीं सासरच्याहि नातेवाइकांसंबंधीं स्त्रियांनीं फार मोठ्या प्रमाणावर ओव्या रचलेल्या आहेत. त्या खालोखाल देवादिकांच्यासंबंधीं ओव्यांची रचना भरपूर झाली आहे. मनाची शुद्धि व्हावी व जिवाला शांति मिळावी ही ह्या देवादिकांसंबंधीं बोलण्यामागची भूमिका असते. आणि—

देवाच्या देवळांत दिवा जळतो लोण्यायाचा
आंत संदूक सोन्यायाचा
देवाच्या देवळांत झालं फुलांचं सारवान
रोज हरीचं कीरतन
देवाच्या देवळांत देव नकशीचा उभा
रंगाची बगा शोबा
देवाच्या देवळांत गोड साकरची पुडी
जळ कापराची वडी
देवाच्या देवळांत रोज चढतें पायरी
औक्ष मागीतें म्हायारीं

अशा प्रकारें देवाबद्दलचा भोळाभाव प्रकट होतो. आपल्या परीनें देवघराचें व देवालयाचें वर्णन केलें जातें, देवापुढें मागणीहि होते.

आई अंबाबाई पाव माझ्या ग नवसाला
सोनियाचं लिंबू वाहिन तुझ्या कळसाला
आई अंबाबाई गडावरचें रतन
शोबा एवडी देती अठरा भुजाला कांकण

आई अंबाबाई गडावरची पुतळी
शोबा एवडी देती अठरा भुजाला कांचोळी
आई अंबाबाई पाव माझ्या नवसाला
सर्पाचे कासरे वाघ जुंपीन गाडीला

कुलदैवताबद्दल बायका या प्रकारच्या ओव्या गातात. कुलदेवतेनें प्रसन्न व्हावें म्हणून अद्भुतरम्य बोलणीं करतात. आपलें सामर्थ्य देवीला प्रसन्न करण्याएवढें अजब असल्याचें सांगून मोकळ्या होतात ! ज्याचें त्याचें कुल दैवत असेल त्या मानानें ही भाषा वेगळी होते. या कुल दैवतापेक्षां पंढरीचा विठोबा, राम व सीता, श्रीकृष्ण, तुळस, एकादशी, सूर्यनारायण वगैरेंसंबंधीं बायका पुष्कळ ओव्या गातात. अशा वेळीं ह्या देवतांना त्यांनीं मानवी रूप देऊन टाकलेलें असतें! आणि तेवढ्यावरच न थांबता मानवाचीं सर्व सुखदुःखें त्यांना चिकटवून टाकलेलीं असतात !

पंढरी पंढरी माजं म्हायार साजनी
विठ्ठल शिवी चोळी हरीनामाची गजनी
शेजी जातीया पंढरीला पैसा देतें मी बुक्क्याला
माज्या घरची तारांबळ सांगा विठ्ठल सख्याला
भरली चंद्रभागा धोंडा बुडाला न्हानथोर
नऊ लाखांचा पितांबर जनी धुतीया पायांवर
विठ्ठल माजा पिता मला म्हायाराला नेतो
गिन्यानाची पोथी हातीं वाचायाला देतो

पंढरपूरच्या विठ्ठलाला आईबाप मानून माहेरचें सारें सुख त्याच्या करवीं उपभोगावयाची स्त्रियांची ही कल्पना मोठी विलोभनीय आहे. विठ्ठलावरच्या अशा ओव्या अमाप आहेत. ओव्यांनीं गुंफिलेलें रामायण तर अपूर्वाईचें आहे. तें ऐकतांना डोळ्यांत पाणी उभें राहतें. सीतेचा सासुरवास मनाला झोंबतो.

संक्रांतीचा सण सीताबाईला झाला वनीं
तिनं ववसील्या बोरीबाभळी मायाभैनी

आणि असें कांहीं ऐकलें कीं, जिवाला चुटपूट लागते. सांगणारानें खूप सांगावें व जिवाला रुखरुखींतच ठेवून चिक्कार ऐकावें, असा मोह मनाला होतो. तसेंच सीताएकीं रामाची गोष्ट सोडली, तर मग राम किती चांगला याचीहि वाच्यता होते—

राम ग म्हणूं राम राम माझ्या हुरद्यांत
आतां सांठयीलं लक्ष मोतीं करंड्यांत
रामाचं नांव शाना घेतो झोपमंदीं
साकरचा रवा त्येच्या पडल मुखामंदीं

तेव्हां कुठें मनाची शांति होते. आणि मग—

देवा मेघाजीनं	सूर्यासमोर डेर दिल
	पाऊस पावनं दारी आल
मेघरायाचं लगीन	ढगांचा बाजे डफ
	आली नवरी झपझप
पाऊस पडला	नका करूं गलबला
	धरनीबाईचा पति आला
पाऊस पडला	मोत्या पवळ्यांच्या धारा
	सुगी आलीया ग भरा
पडूंदे पाऊस	पिकूं दे ऊस मळा
	बाजूबंद लीन येळा

निसर्गाच्या किमयेची ही भव्यता मनाला समजूं शकते. शेंकडयांनीं अशा वेळीं निसर्गवर्णनाच्या ओव्या मुखांतून ओसंडूं लागतात. बायका निसर्गाशीं मोठ्या तन्मयतेनें एकजीव होऊन आपल्या जवळच्या कल्पनावैभवाची खैरात करून सोडतात. अशा वेळीं त्यांच्या ठायीं वसत असलेल्या काव्यशक्तीनें ऐकणाराचें देहभान हरपून जातें. जिनें कांहीं वाचलें नाहीं, घर सोडून जी कुठें गेली नाहीं, जिनें काव्यानंदाची कुणाशीं चर्चा केली नाहीं, जिनें कथापुराणें श्रवण केलीं नाहींत, जी पंडितांच्या सभेला कधीं गेली नाहीं, तिला हें सुचतें कसें याचा अचंबा वाटूं लागतो ! बाईच्या बुद्धिवैभवाची तारीफ करावी तेवढी अशा वेळीं कमी पडते. तिच्या स्वतंत्र विचारांनीं व ते विचार मांडण्याच्या पद्धतीनें सुशिक्षित मन भारावून जातें !

पालख पाळणा मोत्यांचा खेळणा
जोजवितें आंत माझा लाडका चिमणा
शिंपांचा मळा बाई स्वातीनं शिंपला
मोतीं मोतीं टिपुन तुझ्या छताला लावीला
सागर सांडूनी माणीक धुंडूनी,
चंद्रसूर्य जडविले इवल्याशा गगनीं

आमच्या भोळ्या भाबड्या बायकांनीं निसर्गाची भव्यता गोळा करून आपल्या सोनुल्याची अंगाई तर अशी किती प्रकारांनीं गावी ! जोंधळ्यांनीं ठचाचून भरलेलें पोतें भोंक पडतांच फुटावें आणि दाण्यांची समोर रास पडावी तसा प्रकार होतो ! उपमा दृष्टांतांनीं जीव वेडा होऊन जातो ! बाळाच्या मनाचा विकास होण्यासाठीं मनांत भरलेली ही विशालता बघून अडाणी मनाच्या भव्यतेची विचारपूस करायला सुशिक्षित मन राजी होत नाहीं ! भांबावून जातें !! जीवनाच्या पुस्तकांत

अनुभवानें माखलेलीं पानें एकामागून एक अशीं भराभर उलटूं लागलीं, म्हणजे तीं वाचणारांची तारांबळ उडून जाते ! वात्सल्याचा उमाळा किती प्रचंड असतो याची कल्पना आली म्हणजे लक्षांत येतें कीं, " तान्ह्या बाळाच्या रूपाचें वर्णन करतां करतां महाकाव्य जन्माला आलें आहे. वामन पंडितांची स्वभावोक्ति येथें फिकी पडेल. तें पांडित्य मातेच्या वात्सल्यांतून उत्पन्न झालेल्या प्रतिभेपुढें काळ-वंडेल... या ओव्यांतील काव्यशक्ति अतिशय उच्च दर्जाची आहे. अशा ओव्या शेंकडों आहेत. कांहीं ओव्या वाचून व्यास वाल्मिकी, कालिदास, भवभूति, यांनींहि माना डोलवाव्या...स्त्रियांनीं निरनिराळ्या प्रसंगीं, निरनिराळ्या स्थळीं-काळीं त्या रचलेल्या आहेत. रचलेल्या म्हणण्यापेक्षां त्यांच्या तोंडून सहज हे मंगल बालवेद, या मधुर श्रुति बाहेर पडल्या. " (सानेगुरुजी—स्त्रीजीवन) अशा प्रकारच्या या ओव्यांतून व्यक्त झालेलें वात्सल्यहि नितांत रमणीय आहे.

माझें तान्हें बाळ देवाचें मंगल
अमृताचें फळ संसाराचें
अंथरुण केलें जाई मोगऱ्याचें
सख्या गोजिऱ्याचें अंग मऊ
आकाशांत तारे त्यांचे ओठ का हालती
संगीत गाणीं गाती बाळराजा
पेरा झाला रानांतून मोड काढी वर मान
तसें हंसे माझें बाळ पाळण्यांत

किती सहृदय आणि समर्पक हे उपमा दृष्टांत आहेत ! त्यांची तोड कशाला म्हणून कशाला यायची नाहीं.

मध्यम वर्गांतील आईचें हें कौतुक आहे. खेड्यांतील आई यापेक्षां निराळें बोलते. तिच्यापरीनें तिचें वात्सल्य शिगोशीग भरून येतें, तें असें—

उगवल्या नारायणा आदीं उगव माज्या दारीं
माज्या त्या बाळासंगं दुधातुपाची कर न्हारी
पोथी पुस्तक वाचतांना बाई कानीचा डूल हाले
माजा त्यो बाळराज सये कागदासंगं बोले
सरी बिंदलीचं सोनं बाई सवाई सातरंग
इंद्र सभेच सोनार हरी घडवितां झाल दंग
आकाशीं वावडी ग चंग लावूनी सोडीली
माज्या ग बाळकानं नगरी मामाची येडीली

हेंहि कौतुक अपूर्वाईचें आहे. बाळराजावरच्या अशा ओव्या सरतां सरत नाहींत. गोड गळ्यावर त्या धा धावून बाहेर येतात. अनेक भावनांचा साज त्यांच्यावर

चढतो आणि मग भावाची आठवण येते. बहीणभावांवरच्या ओव्यांची संख्या मोजणारा थकेल एवढी असंख्य आहे.

भैन भावांडं जाऊं आपुन बाजाराला
नखी तुज्या धोतराला जर माज्या पदराला
भावाला भाऊबीज भैनी द्रुपदीला पुसा
आगाशीं चांदसूर्व्या हिनं ववाळीला कसा
चवघी आमी भैनी पांचवा बंदुराया
नांदती सुकायानं सोगऱ्याखालीं जाया
दिवाळीच्या दिशीं माज्या ताटामंदीं सोनं
आतां मीं ववाळीलं बयाबाई तुजं तानं
म्हायार मला केलं एका बिव्याचा वसुयलि
सया मला बोलत्याती बंदु समृत असयील
बंदुजी पावईना शेजी म्हणती कोण राजा
सावळे सीताबाई हिरवा मंदील तुरा ताजा
गहूं हरबऱ्याच्या गाड्या बाई येशींत थटल्या
सावळ्या बंदुजीनं दंडभुजांनीं रेटील्या
पांच माजे भाऊ देवळाच्या भिंती
गिलावा देऊं किती आयुष्याचा
भाऊ भैनीला भेटन्याची चाल निघाली देशामंदीं
माझ्या त्या राजसाच्या चोळी अंजिरी खिशामंदी

भावाचें बहिणीवर अपार प्रेम. भावासाठीं बहिणीचें काळीज तुटतें. भावाबद्दल बोलावयाचें म्हणजे तिचा जीव खुलतो. भाऊ म्हणजेच जणुं तिचें माहेर. त्यामुळें जगांतील सारें सौंदर्य ती आपल्या भावांत बघूं पहातें ! आपला भाऊ तिला श्रीमंत दिसूं लागतो. तरीपण भाऊबहीण म्हणजे एका आईचीं लेकरें. जिवाभावाचीं, रक्तामांसाचीं, एकमेकांच्या पाठचीं माणसें. म्हणून बहीण प्रेमानें म्हणते--

भावा बहिणीच्या प्रेमाला नाहीं सरी
गंगेच्या पाण्यापरी पवित्रता
नको धन नको मुद्रा नको मोतीयांचे हार
देई प्रेमाश्रूंची धार भाईराया
बहीण भावंडांची पोटांत त्यांची माया
हिरवं सीताफळ आंत साकरेची काया
माझ्या आयुष्याची भाईराया तुला कंठी
उरल्याची तुला आंगठी वैनी बाई

म्हणजे बहिणीनें भावाबद्दल किती बोलावें तेवढें कमी पडतें. जिवाभावाची खरी गोष्ट इथें समजते. निरपेक्ष प्रेमाची महति लक्षांत येते.

संसारांतील सारीं सुखदुःखें भावाशीं एकजीव होतात. त्या कारणानें अशा ओव्या वाचाव्यात तेव्हां बहीण-भावांमधील अपार प्रेम समजतं. खऱ्या जिव्हाळ्याची साक्ष पटते.

भाऊ म्हटला कीं, ओघानेंच आई वडिलांची आठवण येते. सासुरवाशिणीला आईबाप म्हणजे मोठा आधार. सासुरवासाची गोष्ट सासुरवाशिणीनें काढली कीं, जीव उडून जातो ! काळीज फाटून जातें. ऊर दाटून येतो.

अंतरींची गोष्ट सये हुरदीं सांठविली
बया मालनीवांचुनी कोन काडील त्येची किल्ली
जिवाला माझ्या जड कसं कळलं माझ्या बापा
अंगणीं होता चांफा कळ्या पडती झपाझपा

किती निर्मळ ही भावना ! किती सुंदर हे उपमा दृष्टांत ! ऐकणारा भुलून जातो. सांगणारा गहिंवरतो. तशांतच—

सासर एवडा वस नका करूसा सासूबाई
दारींच्या चांफ्यापाई दूर देशाची आली जाई
बंधुजी विचारीतो भैना सासुरवास कसा
सावळ्या बंदुराया बरम्या लिवून गेला तसा
आंब्याच्या सावलींत कोयाळ बोले राधा
घरीं उतरंडी आगाशीं उपाशी गेले दादा

अशीं बोलणीं निघाल्यावर तर मग विचारायलाच नको. रडूं कोसळतें. जीवनावरचा विश्वास उडून जातो ! स्त्रीजन्माबद्दल मनांत चीड येऊं लागते ! तरी पण दुःखांत सुख म्हणून नवरा धड वागत असेल तर मग हायसें वाटतें.

वाऱ्यानं हालती ग पानमळ्याची शेवरी
दिष्ट नि झाली म्हनूं माज्या कुंकवाच्या चिरी
माळ्याच्या मळ्यामंदीं केळी नारळी जावा जावा
मधें गुलाबा तुझी हवा वास घेणार गेले गांवा
गोड भ्रताराचं सूख सये सांगतां येतां जातां
भर दिवसां डोलला ग वर सूरव्या पाणी पितां

आणि जिवाला तेवढेंच निचिंत वाटूं लागतें. नवऱ्याबद्दल सारा भाव साजशिणगार लेवून आला म्हणजे मग तो रागीट असला तरी फिकीर वाटत नाहीं !

आपल्या जीवनांत येणाऱ्या हरघडीच्या अनुभवावर आणि विविध प्रकारच्या विषयांवर अशा हजारों ओव्या आहेत. त्यांपैकीं हा एक केवळ वानवळा

आहे. पण तेवढयावरूनहि स्त्रियांच्या खास भावना विकाराची व विचार-सौष्ठवाची कल्पना येते.

मराठींतील एक अभिजात छंद या दृष्टीनें ओवी या छंदाचें वैशिष्ट्य फार मोठें आहे. स्त्रियांनीं आपलीं सुखदुःखें याच छंदाचा उपयोग करून जशीं सांगितलीं, त्याचप्रमाणें मराठींतील महाकाव्येंहि याच छंदांत लिहिलीं आहेत.

ओवी छंदांतील " हीं स्त्री गीतें सहजसुंदर असून त्यांची भाषा प्रसादयुक्त आणि ओघवती आहे. या गीतांत आलेले उपमा दृष्टांत त्या समाजांत वावरणाऱ्या स्त्रियांच्या रोजच्या व्यवहारांत आढळणारे आहेत. या गीतांमधून आपणास कवीची व्युत्पन्नता दिसणार नाहीं. छंद, अलंकार, भाषा, रस इत्यादि साहित्याच्या अंगोपांगांचें, तारेवरील डोंबाऱ्याच्या कौशल्याप्रमाणें, अभ्यासानें आत्मसात् केलेली कुशलताहि आढळून येणार नाहीं. परंतु या गीतांमधून ओसंडलेली भावनेची उत्कटता पहातांच आपल्या अंतःकरणांत अगदीं सातां पडद्यांपलीकडे जाऊन बसलेल्या वृत्ति उचंबळून येतील. "*

" हा सर्व वाङ्मय प्रकार गेय आहे. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठीं स्त्रियांनीं अनेक प्रसंगांवर गाणीं रचिलीं आहेत...ओवी हें स्त्रियांनीं बनविलेलें वृत्त आहे आणि शुद्ध मराठी आहे. ह्याचें नांवहि मराठी आहे. ओवीचा अर्थ ओंवणें, गुंफणें, ग्रथन करणें असा आहे. संस्कृतांतील अनुष्टुभाच्या एका श्लोकास ' ग्रंथ ' म्हणतात. महाभारत एक लक्ष ग्रंथ आहे याचा अर्थ त्यांत एक लक्ष श्लोक ग्रथन केले आहेत. ग्रंथ म्हणजे एकत्रित केलेली शब्द संहति...प्रारंभीं जेव्हां मराठींत असें ग्रथन होऊं लागलें, विशिष्ट पद्धतीची बांधीव रचना होऊं लागली, तेव्हां तिला मराठीं शब्द ' ओंवी ' हा रूढ झाला. अर्थात् येथें ' ग्रंथ ' ह्या शब्दामागें जी बांधणीची आणि रचनावैशिष्ट्याची कल्पना आहे, तीच ओंवीच्याहि मागें दिसते...हें वृत्त प्राकृत आहे असें सर्व छंदशास्त्रकार सांगतात. ही रचना संस्कृतांत नाहीं. हें केवळ मराठीचेंच वैशिष्ट्य आहे. "†

ओवीची ही सारी रचना प्रामुख्यानें स्त्रियांची आहे. पुरुष लेखकांनीं आपल्या ग्रंथांत उपयोगांत आणलेली ओवी अशी गेय नाहीं. ग्रांथिक ओवी पाठ्य असते तर ही ओवी गेय असते. गेयता हें देखील हिचें एक प्रमुख वैशिष्ट्य असून स्त्रियांना त्याची कल्पना आहे. अगदीं जुन्या काळच्या वाङ्मयांतून लोकगीतांतील ओवीसंबंधीं मजकूर सांपडतो त्यांत स्त्रिया ओव्या गातात असाच उल्लेख वाचावयास मिळतो.

---

* य. खु. देशपांडे. प्रस्तावना, वऱ्हाडीं लोकगीतें.

† डॉ. ना. गो. नांदापूरकर. ' मराठीचा मोहोर ' प्रस्तावना, पा. १५

स्त्रियांची ही ओवी तशी फार पुरातन आहे. " ती मराठी भाषेंत ग्रंथ निर्मितीस आरंभ होण्यापूर्वींची आहे. चालुक्य वंशीय राजा सोमेश्वर ह्यानें शके १०५१ मध्यें 'मानसोल्लास' अथवा 'अभिलषितार्थ चिंतामणि' हा ग्रंथ लिहिला. त्यांत त्यानें 'महाराष्ट्रीय स्त्रिया कांडतांना ओव्या गातात' असें म्हटलें आहे. 'संगीत रत्नाकर' ह्या ग्रंथाचा कर्ता म्हणतो, 'महाराष्ट्रीय स्त्रिया देश-भाषेंत ओव्या गातात. ह्या ओव्या जनमनोहर असतात, आणि स्त्रिया त्या विविध छंदांत गातात....' " * म्हणजे दळतांना अगर कांडतांना त्या काळापूर्वींपासून ओव्या म्हणावयाची पद्धति परंपरेनें चालत आलेली दिसते.

परंतु त्या काळची ओवी आज त्याच थाटांत शिल्लक असेल असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कारण हें स्त्रियांचें वाङ्मय आहे. केवळ पाठ करून जतन केलेलें असेंहि तें आहे. त्यामुळें यांतील शब्द कालमानाप्रमाणें बदलत रहाणार. भावनाविष्कारांत फरक पडणार. तेव्हां एक पिढी दुसऱ्या पिढीला हें ज्ञानदान करीत असतांना त्यापैकीं कांहीं भाग मागें रेंगाळतो व कांहीं नवीन जोडला जातो. त्या कारणानें ओव्यांचा काळ निश्चित ठरविणें शक्य होत नाहीं.

काय बाई पुण्याची तारीफ
लवंगा निघाल्या बारीक
टोपीवाल्याचा मुलूख
आगीनगाडीला कुलूप

ह्या गीतावरून अगर—

कोलापूर गांव । गल्लोगल्लीं आले नळ ।
पाण्याचे केले खेळ । इंग्रजांनीं ॥
आगीनगाडी सुरू झाली । पुण्याला ऐकूं गेली ।
मुंबईला सुरू केली । इंग्रजांनीं ॥

ह्या गीतांवरून ही रचना इंग्रजी अंमल आपल्याकडे सुरू झाल्यानंतरची आहे असें म्हणतां येईल. पण असे अपवाद थोडे निघतील. बाकीच्या ओव्यांचा काल त्यामध्यें प्रकट झालेल्या चालीरीतींबरहुकूमच अनुमानानें ठरवावयाचा !

भरल्या बाजारात् । उच्च किराऱ्यामंदीं पेरू ।
साऱ्या गोतांत पिता थोरू ॥
जांवई राजइसू । परसदारीचा मोगयीरा ।
माजी बाळाबाई । जाई गुतली पदयीरा ॥

आणि अशा कांहीं ओव्यांवरून शब्दांच्या रचनेनुसार या ओव्या ज्ञानेश्वर-कालीन भाषेचें वैशिष्ठय दर्शवितात असें म्हणावयाचें इतकेंच !

---

* डॉ. ना. गो. नांदापूरकर. मराठीचा मोहोर. प्रस्तावना. पा. १८

डॉ. कमलाबाई देशपांडे यांनीं या ओव्यांच्या सहवासांत असतांना एक रूपक तयार केलेलें आहे. त्या म्हणतात, "गाणीं म्हणजे स्त्रियांचे वेद. 'दळण्याचें जातें' हें त्यांचें यज्ञकुण्ड व प्राचीन ऋषि ज्याप्रमाणें यज्ञकुंडांमध्यें हविर्भाग अर्पण करून त्यांचे जोडीला परमेश्वराच्या स्तुतिपर सूत्रें म्हणत व मनोवांछिताची याचनाहि करीत; त्याचप्रमाणें या जात्याच्या यज्ञकुण्डामध्यें 'दाण्याचा घास' हा हविर्भाग अर्पण करून त्याचे बरोबरच ईश्वरस्तुति व वांछित प्रार्थना ओव्याचे रूपानें करीत."‡

इ. स. १९४० मध्यें जानेवारीच्या ३१ तारखेस महाराष्ट्राचे एक थोर कलावंत कै. मा. विनायक यांनीं कै. सानेगुरुजींना एक पत्र लिहून या ओव्यांसंबंधीं आपला अभिप्राय कळविला होता. त्यावेळीं त्यांनीं म्हटलें आहे कीं—

"पोथी पुराणं वाचून पापंसुद्धां धुतलीं जातील असें आपण वाचतों. पण हें वाचतांना--या मंगल बाल वेदाच्या पठणानें तीं धुतलीं जातात असा प्रत्यक्ष अनुभव येऊं लागतो! वात्सल्यानें हृदय भरून येतें! आसमंतांत मांगल्य दरवळून येतें!

"विद्वत्तेनें भरलेल्या पुस्तकांतून—ग्रंथांतून जी कल्पना येत नाहीं ती हिंदुधर्माच्या संपन्न हृदयाची कल्पना आपणाला या ओव्यांतून येते. जिला आपण 'आपली संस्कृति, आपली संस्कृति' म्हणून डोक्यावर घेऊन नाचायला हवं ती ही!..."*

ह्या ओव्या अनेक दृष्टींनें महत्त्वाच्या आहेत. एक तर हें एक मौलिक स्त्रीधन असून माय मराठीच्या जन्मापासून आमच्या माउल्यांनीं तें सांभाळलें आहे. काळाच्या प्रवाहांत आलटापालट होतांनाहि आपलें वैशिष्ट्य अबाधित ठेवून व आपल्या परीनें त्यांत नवीन भर घालून त्यांनींच तें आजच्या स्त्रियांच्याहि हातीं दिलें आहे. या ओव्यांत आमची संस्कृति आहे, आमच्या रोजच्या बोलण्यांतील भाषा आहे. उत्कृष्ट काव्याला लागणारे प्रसाद आणि माधुर्य हे काव्यगुण या ओव्यांतून भरपूर प्रमाणांत प्रकट झाले आहेत. त्याचप्रमाणें रचनाचातुर्य, कल्पनाविलास, आलंकारिकता व शैली या दृष्टीनेंहि हें काव्य सरस आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर ही रचना अलंकार लेऊनच बाहेर पडते व अर्थाचा पदर धरून चालतांना मनांत मोकळ्या भोळ्या भावाचें चिंतन करते; आणि मुख्य म्हणजे कृत्रिमतेचा वासहि तिला लागलेला नाहीं. सारें कांहीं स्वाभाविक व सरळ आहे.

पितृसत्ताक कुटुंब प्रद्धति व त्यामुळें निर्माण झालेली मराठी मुलखांतील बालविवाहाची रूढी यांचेकडून मराठी सारस्वताला मिळालेलें हें एक सौभाग्याचें

‡ अपौरुषेय वाङ्मय. पा. ४

* स्त्रीहृदय-दोन शब्द. पा. ७, ८.

लेणें आहे. बालवयांत माहेरच्या माणसांच्या ताटातुटीमुळें मोठ्या कळवळ्यानें आविष्कृत झालेली ही एक हृदयंगम व पवित्र भावगंगा आहे.

● ● ●

प्रासंगिक गाणीं

नेहमींच्या रोजच्या कामांतून फावल्या वेळीं किंवा सणासुदीच्या प्रसंगीं अगर बारसें, डोहाळे, लग्न, मुंज अशा मंगलप्रसंगीं स्त्रिया एकत्र जमल्या म्हणजे गाणीं म्हणतात. ह्या गाण्यांचे प्रकार अनेक असतात. त्यांचे 'गळे' किंवा चाली मोठ्या देखण्या असतात. तसेंच ह्या गाण्यांच्यामधून प्रकट झालेल्या भावाचा रसपरिपोषहि मोठा सुंदर झालेला असतो.

अशीं हीं गाणीं कधीं लहान तर कधीं मोठीं असतात. तीं कधीं पांच-दहा मिनिटांतच संपतात तर कधीं तासन् तास रंगतात. आणि मुख्य म्हणजे एकटी-दुकटीकडून तीं फारशीं म्हटलीं जात नाहींत. अनेकजणी एकदम तीं म्हणतात किंवा एकदोघींनीं प्रथम सांगून नंतर बाकीच्या त्याबरहुकूम म्हणतात.

हीं गाणीं म्हणावयाचे व खुद्द गाण्यांचेहि प्रकार प्रामुख्यानें दोन आहेत. त्यांपैकीं एक असा कीं, झोपाळ्यावर किंवा जमिनीवर बसून म्हणावयाचीं गाणीं आणि दुसरा म्हणजे खेळ खेळतांना म्हणावयाचीं गाणीं. पैकीं खेळांच्या गाण्यांचा भरणा मोठा आहे. नागपंचमी, महालक्ष्मी (गंगागौरी), भोंडला व मंगळागौर या प्रसंगीं झिम्मा खेळतांना व फेर धरतांना स्त्रिया गाणीं म्हणतात. अशा वेळीं एखादी सुरस व चटकदार अशी लहान किंवा मोठी कथा ह्या गाण्यांच्यामधून गुंफलेली असते. त्यामुळें ह्या गाण्यांची रचना त्या त्या कथानकास अनुसरून केलेली असते. गाण्यांतील हें कथानक धावतें व ओघाओघानें आलेलें असतें. रोजच्या जीवनाशींहि तें विशेष निगडीत असतें. अशा गाण्यांत देवा-दिकांची व विशेषत: श्रीकृष्णाचीं गाणीं भरपूर प्रमाणांत समाविष्ट झालेलीं असतात.

लग्न, मुंज, बारसें अगर डोहाळे या प्रसंगीं किंवा झोपाळ्यावर बसून निवांत वेळीं म्हटलीं जाणारीं गाणीं त्या त्या प्रसंगानुरूप रचलेलीं अशीं असतात. त्या त्या विशिष्ट मंगल संस्कृतीचें अगर सोहळ्याचें प्रतिबिंब त्यांत पडलेलें दिसून येतें. अशा गाण्यांतहि देवादिकांना प्रमुख स्थान मिळालेलें असतें ! मात्र मानवी जीवनांतील सर्व संस्कार अशा वेळीं त्यांच्याहि जीवनाशीं निगडीत झालेले असतात !!

वाजे चौघडा रुणझुण
आला ग हादगा पावगा
दारीं तुळस दऊणा ॥
जाईजुई शेवंती दुपारी
फुले ग नाना परी
हार गुंफिते कुसरी
वहातें मी हादग्यापरी
हादगा देव मी पूजीतें ॥
लवंगा सुपाऱ्या वेलदोडे
करून ठेवले वीडे
आणखिन् दुधांतले दुधपेढे
वहातें मी हादग्यापुढें
हादगा देव मी पूजीतें ॥

हस्तनक्षत्राच्या वेळीं मुलीबाळींच्याकडून फेर धरून म्हटलें जाणारें हें गाणें आहे. या वेळीं महाराष्ट्रांत घरोघरीं मुली हादगा घालतात. खडूनें किंवा रांगोळीनें पाटावर हत्ती काढून त्याची पूजा करावयाची किंवा भिंतीवर हत्तीचें छापील चित्र लावून त्यास फळाफुलांची माळ घालून त्याची पूजा करावयाची, म्हणजे हादगा घालावयाचा. ही पूजा रोज होते. दररोज ह्या पूजेचा प्रसाद ' खिरापती-'च्या रूपानें सर्वांना दिला जातो.

अशा वेळीं अनेक गाणीं म्हटलीं जातात. वर दिलेलें गाणें त्यांपैकींच एक आहे. इथें हस्तनक्षत्राची पूजा केली जाते आहे. हस्ताची पूजा म्हणजे नव्या वर्षाच्या मांगल्याची, सधनतेची, सुखासमाधानाची पूजा; पावसाची पूजा. म्हणजे ह्या गीतामागें निसर्गाच्या शक्तीची उपासना तर आहेच, खेरीज संस्कृतीचाहि भाग आहे. दर वर्षीची ही पूजा असते आणि त्या पूजेचा प्रकारहि ह्या गाण्यांत सांगितल्याप्रमाणें असतो.

हादग्याच्या या गीतांत अनेक विषय सामावलेले असतात. खेळ असतो, संसार असतो, सुग्रीणपणा असतो, सासर माहेर असतें, हौस असते, कलाकुसर असते, कोडकौतुकहि असतें. त्यामुळें सर्वांना हीं गाणीं आवडतात. लहान मुलींच्या बरोबर मोठ्या बायकाहि त्यांत हौसेनें भाग घेतात. कुठें कुठें ह्या गीतांना भोंडल्याची गाणीं अशीहि संज्ञा दिली आहे.

विदर्भामध्यें याच वेळीं भुलाबाईची पूजा असते. पूजेचा प्रकार असाच पण गाणीं कांहीं सारखींच तर कांहीं वेगळीं असतात. भुलाबाईचीं गाणीं मुख्य नऊ मानलीं गेलीं आहेत. भुलाबाईची उपासना म्हणजे शिवशक्तीची उपासना. त्यांत एक शिव व लेकुरवाळी शक्ति अशा निरनिराळ्या मूर्ति असतात.

ह्या भुलाबाईचें एक गाणें नमुन्यादाखल इथें घेतां येईल तें असें—

काळा कोळसा कोरूबाई
शेर तूप मावे
आमची भुलाबाई पाटावा नेसे
पाटाखालून येऊं द्या
पाटाखालून जाऊं द्या
एक फूल घेऊं द्या
एक फूल उडालं
गंगेंत जाऊन बुडालं
गंगामाय खोल ग
भुलाबाई वहाती बेल ग
वहाता वहाता भागली
शंकराच्या पायीं लागली
शंकराचे पाय सोन्याचे
भुलाबाईचे पाय रुप्याचे

हादग्याप्रमाणेंच नागपंचमी व गौरी (महालक्ष्मी) ह्या सणांच्या वेळीं देखील भरपूर गाणीं स्त्रिया व मुली म्हणतात. मात्र या वेळीं केवळ फेर धरत नाहींत. फुगडी, झिम्मा, लाटणी, कळशी, सूप असले अनेक खेळ खेळतात व गाणीं म्हणतात.

नागपंचमीच्या वेळीं नागाची पूजा होते. नाग म्हणजे घरचा श्रेष्ठ महापुरुष. पूर्वज. घराचा रक्षणकर्ता. आणि गौर म्हणजे पार्वती. लेकीच्या रूपानें माहेरीं आलेली माहेरवाशीण. म्हणून ह्या सणांचें महत्त्व फार. श्रावण आणि भाद्रव म्हणजे सणांचे राजे. ह्याच काळांत सणासुदीला (नागपंचमी व गौर) बायका मुली खेळतात व गाणीं गातात.

ह्या वेळीं फेराचीं गाणीं फार मोठ्या प्रमाणावर म्हटलीं जातात. हीं गाणीं कथात्मक असून तालबद्ध घटनांनीं व ओघवत्या वाणीनें नटलेलीं असतात. त्यांची चालहि सुरेख असते. त्यामुळें रात्र-रात्रभर त्यांच्या निदानानें सारें गांव घुमत रहातें ! उदाहरण म्हणून इथें एक गौळण घेतां येईल.

लक्षपती गवळी एक
त्येला दोघीजणी लेकी
या लेकींचीं नांव काई
म्हाई चंद्रावळ बाई
म्हाई दिली गोविंदाला

चंद्रावळ गवळ्या घरीं
या ग गौळणीबाईनं
केला दह्याचा लई साठा
चांदीचा ग रवी दोर
सोन्याचा ग डेरा बाई
नेसली पिवळा पितांबर
मधुपका चोळी अंगीं
नाकीं सूरव्याची नथ
नेत्रीं काजळ भरलं
भांग भरीला गुलाली
शिरीं मोत्याची चुंबळ
घेतला दह्यायाचा माठ
चढे यमुनेचा घाट
पायीं जोडव्याचा थाट
निगाली मथुरा बाजारीं
बाजाराची लोक बोल
सुंद्रा कामीन कोनाची
गोविंदा म्हेवनी तुमची
गोविंदा तिथून निगाला
गेला आपल्या वाड्याला
अग अग न्हाई राणी
आपली भैन तूं आनावी
घरीं न्हाई लगीन वो
दारीं न्हाई लगीन वो
चंद्रावळ माजी कवळी
न्हाई तुमचं मन निर्मळ
तिथून गोविंदा निगाला
गेला आपल्या माडीला
अंतर मंतर झोकीयीतो
पिवळ जुंदळ फेकीयीतो
येर येर कवड्या नागा
येर येर बच्या नागा
माजा मैतर हुशील
डोहांत जाऊन बसशील

या ग गौळणी बाईच्या
दासी पाण्यायाला गेल्या
नाग घागरीं भरीला
आणून रांजणीं वतीला
या ग गौळणी बाईनं
घेतली सोन्यायाची झारी
ती ग रांजणीं बुडविली
नागा करंगळी फोडीली
गवळण मूर्छना पडली
या ग गौळणी बाईची
सासू भाईरनं आली
अग अग सून बाई
तोंड धुया पाणी न्हाई
गौळण शिणली भागली
गौळण उगीच निजली
या ग गौळणी बाईचा
सासरा भाईरनं आला
अग अग सूनबाई
आंघूळीला पाणी न्हाई
गौळण शिणली भागली
गौळण उगीच निजली
या ग गौळणीबाईचा
दीर भाईरन आला
अग अग वैनीबाई
धारला चरवी कशी न्हाई
गौळण शिणली भागली
गौळण उगीच निजली
सासू रोजन मांडली
बरी होती गौरीमाता
घराची हो शोभिवंता
सासरा रोजन मांडली
बरी होती गौरीमाता
घराची हो शोभिवंता
दीर रोजन मांडिली

वैनी नव्हती गवळण
कधीं न्हाई सोडीलें
आसचं कसलं बोलणं
एवढा गलबला ऐकीला
हरी भाईरुनी आला
कावो देवा येणं केलं
चंद्रावळी पान लागलं
गोविंदा तिथून निघाला
आपल्या वाड्यायाशीं आला
अग अग न्हाई राणी
चंद्रावळी पान लांगलं
न्हाईराणी रडूं लाग
केस कुरळ तोडीलं
ऊर दणादणा झोडलं
गोविंदा तिथून रागेला
गेला आपल्या माडीला
अंतर मंतर जोकीला
पिवळ जुंदळ फेकील
येर येर कवड्या नागा
येर येर बच्या नागा
माझा मैतर तूं हुशील
वीख पिवून वेशील
आळवण बोळवण करूनी
सहा महिने रात्र गेली
चंद्रावळ देवानं राणी केली

ही एक अद्भुतरम्य अशी कथा आहे. बायकांना तिची गोडी फार, त्यामुळें अशाच सुंदर गोष्टींनीं सजलेलीं गाणीं स्त्रियांना फार मोठ्या प्रमाणावर पाठ असतात. त्या कारणानें सणासुदीला तीं सांगतांना त्यांच्या त्यांच्यांतच मोठी चढाओढ लागते. अशांवेळीं कोणाची हार वा जीत होत नाहीं. सगळ्या गाणीं गायला खुशीनें राजी असतात. जवळचीं सारीं गीतें हौसेनें बाहेर काढतात.

गवरी ग बाई जागरान तुझं
जागतां जागतां पडल्या झापडी
एवढ्या निजची पिरत केवडी

सोन्याच्या चौकटी गौरी बाळातनी
नारळीच्या गोण्या लुटील्या अंगणीं
सुपारीच्या गोण्या लुटील्या अंगणीं
हळदीच्या गोण्या लुटील्या अंगणीं
साखरच्या गोण्या लुटील्या अंगणीं
तांबूळाच्या गोण्या लुटील्या अंगणी...

गौर जागवतांना म्हणावयाचें हें गाणें आहे. बाळंतिणीला लागणारें सर्व साहित्य जमा होईपर्यंत तें लांबतें. इथें गौरीला बाळंतीण मानलें आहे ! माहेरवाशिणीचें सोपस्कार चालू आहेत. लेकीचें कौतुक सांगितलें आहे. मानवी जीवनांतील सगळी हौस इथें जमा झाली आहे.

हें गाणें म्हणतांना पालथ्या परातीवर वस्त्रगाळ केलेली राख टाकून तिच्यावर आळीपाळीनें डाव व रवी फिरवतात. अशा वेळीं मोठें सुंदर पार्श्वसंगीत निर्माण होतें !

अशा कांहीं गाण्यांतून घरच्या वैभवाची वारेमाप खैरात केलेली दिसून येते. मनाचा मोठेपणा उघड होतो. घरचा दिमाख चारचौघींत प्रगट केला जातो.

रुण् झुण् पांखरा रे
जा माझ्या माहेरा
कमानी दरवाजा रे
त्यावरी बैसजा
घरच्या आईला रे
सांगावा सांग जा
दादाला सांग जा रे
ने मला माहेरा

झिम्मा खेळतांना म्हणावयाचें हें एक लोकप्रिय गाणें आहे. झिम्म्याचीं अशीं कितीतरी गाणीं आहेत. त्यांच्या चालीहि सुरेख असतात. झिम्मा खेळत व गाणीं गात बायका नाचूं लागल्या म्हणजे दृष्ट लागण्याजोगा देखावा असतो. अशा गाण्यांतून माहेरचें वैभव, माहेरची ओढ प्रामुख्यानें प्रकट होते. त्याचप्रमाणें दागिन्यांचीहि भरपूर नोंद होऊन देवादिकांच्या बायकांचें कौतुक व आपला उणेपणा प्रकट केला जातो.

मंगळा गौरीचीहि कांहीं वेगळीं गाणीं असतात. त्यांपैकीं नमुना म्हणून एखादें घेतां येईल तें असें—

तूं रडतेस कां गे बहिणी
तुला काय केलें कोणीं

तुला काय सांगूं दादा मी
माझी घागर गेली बुडुनी
माझी नथ घेरे दादा
माझी घागर दे काढुनी
तुझी नथ नको गे बहिणी
तुझी घागर गेली बुडुनी
माझा चंद्रहार घेरे दादा
माझी घागर दे काढुनी
तुझा चंद्रहार नको गे बहिणी
तुझी घागर गेली बुडुनी
(याप्रमाणें सर्व दागिने व प्रश्नोत्तरें होतात. नंतर)
माझें काळीज घेरे दादा
माझी घागर दे काढुनी
तुझें काळीज नको गे बहिणी
तुझी घागर देतों काढुनी

मंगळागौरीचीं गाणीं प्रामुख्यानें ब्राह्मण स्त्रिया म्हणतात. विवाहानंतर त्यांच्यामध्येंच मंगळागौरीची पूजा करण्याची चाल आहे.

माजघरांतील गाणीं म्हणून लोकगीतांचा एक वेगळा प्रकार आहे. या प्रकारांत पौराणिक कथागीतें, डोहाळे, विवाहगीतें व पाळणे येतात. त्या सर्वांचा विचार इथें या प्रकरणांत करण्याची गरज नाहीं. तथापि उदाहरण म्हणून लग्न-प्रसंगींचें एक 'झालीचें गाणें' इथें घेतां येईल—

दुरड्याच्या दुरड्या आणला भात
याही करी मात यिहिनीची
आतां माझी सखूबाई
असा कसा तुझा याही
गुलालाची दाटी न्हाई
होती त्याचे गोळे न्
याही करे सवळे न् यिहिनीचे

हें गाणें तसें मोठें आहे. परंतु मुख्य पालुपद म्हणून म्हणावयाचें तो भाग असा. या गाण्यांत सर्व पक्वान्नांचा समावेश होईतों तें लांबतें. येथें विनोदहि भरपूर निर्माण केलेला आहे !

स्त्रियांच्या अशा निरनिराळ्या प्रकारच्या गाण्यांत कांहीं 'गजगौरी व्रता'-सारखीं अगर 'ववश्या 'सारखीं इतर गाणींहि येतात. अशा गाण्यांतून पौराणिक भाग बराच आलेला असतो.

अशा लोकगीतांचे विषय अनेक तसेच प्रकारहि विविध आहेत. खेरीज स्त्रियांच्याप्रमाणें पुरुष मंडळींचींहि अशीं प्रासंगिक गाणीं अनेक आहेत. अशा गाण्यांत ढोलनाचाच्या वेळचीं धनगरांचीं बिरुबादेवाचीं गाणीं, वाघ्यामुरळींचीं गाणीं, गोंधळ्यांचीं गाणीं, निरनिराळ्या दैवतांच्या भक्तांचीं गाणीं, वाटेवरील भटक्या लोकांचीं भिक्षेच्या वेळीं म्हणावयाचीं गाणीं, शेतकऱ्यांचीं भलरी वगैरे वगैरे कितीतरी प्रकार आहेत. त्यांपैकीं केवळ एक प्रातिनिधिक म्हणून कोकेवाल्याचें 'जनाई' चें गीत इथें देत आहें—

दोन पार रात रं झाली
स्वारी विठ्ठला तुझी आली
देव गेला जनीच्या म्हालीं
जनाई म्हनून हांक दिली
जनाई आलों तुज्यासाठीं
जेवाय वाढ विठ्ठलासी
जनाई घरामंदीं गेली
कण्या कोंड्याचा मांडा केला
जेवा जेवा पांडुरंगा
दुबळ्याची लाज राखा
जनाई जेवलों तूपरोटी
जना झोप लाग मोटी
तीन पार रात देवा गमली
एक पार रात देवा उरली
नऊ लाखाचा हार पितांबर
ठेवला जनीच्या वाकळवर
फाटकी वाकळ घेतली
देव राऊळासी गेला
दिवस उगवुनी रामपार झाला
बडवे आले पुंजायाला
देवा अलंकार करीतां
वाकळ अंगावर पाहिली
देवाची दशा कुनीं केली
दादा चोरी कशी झाली
पंढरीची गोपाळपुरीची
झडती सर्व्यांनीं घेतीली
देवाचा शालू तिथं न्हाई

सर्व्ये गेले जनाई घरीं
अग अग माजे जनाबाई
देवाची चोरी केली काई ?
देवाची चोरी न्हाई केली
विठ्ठलाची शिपत तिनं घेतिली
तुझ्या घरची झडती आमी घेतों
पुंढरपुरीं मग आमी जातों
जनाई घरची झडती घेतिली
वाकळ शाल्ह तिथं घावला
जनाई देवा चोरटी
साऱ्या गांवची जना कारटी
रांडा रंडक्या देवा तुज्या झाल्या
बरमा आयेव चुडा लेल्या
रशा बांदल्या जनीच्या दंडाला
मार देल्याती पाठीला
चंद्रभागला रवला सूळ
जनाईला आलं मूळ
पैला फासा जनी लावीला
इठ्ठलाचं सुमरान तिनं केलं
फाशाचं तीन तुकडं झाल
दुसरा फासा जनी लावीला
धांवा विठ्ठलाचा तिनं केला
फाशाचा वर जाळ झाला
तिनव्यानं फासा लावीला
देवा तुज्यावीन कुणी न्हाई
फाशाचं झालं पानी
बडव्याचा कायदा सरून गेला
उतरा खालीं जनाईला
गांव लोक चरणीं लागी
कशी फाशी जनीला आली
विठ्ठलाची भक्ति न्हाई सोडिली
साडी चोळीचं म्हायार केलं
मोत्या पवळ्यांनीं वटी भरीली
जनाई माघारीं लावीली

धर्म केला वाया न्हाई गेला
धर्म तिच्या कामासी आला
धर्माविना न्हाई देवा गती
धर्म जलमाचा संगती
दोन पार रात रं झाली
स्वारी विठ्ठला तुझी आली

अशा गाण्यांच्यामधून कधीं शृंगार रस तर कधीं भक्तिरस दुथडी भरून वहातांना आढळतो. कधीं यामधील भावना वत्सलतेनें फुलते, तर कधीं कारुण्यानें काजळून जाते. केव्हां या गाण्यांतून विनोदी वातावरण खुलतें, तर कधीं चिडाचीडहि दिसून येते. मानवी मनांत येणारे सारे भाव इथें हात जोडून उभे रहातात.

प्रासंगिक गाण्यांची किंवा लोकगीतांची ही दुनिया मोठी आहे. असंख्य गाणीं या दुनियेंत नांदताहेत. या गाण्यांच्यापैकीं देवादिकांचीं गाणीं स्त्री आणि पुरुष दोघांच्याहि तोंडीं आहेत. तर कांहीं खास पुरुषांचीं व कांहीं खास स्त्रियांचींच म्हणूनहि आहेत. त्यांत स्त्रियांच्या गाण्यांचा भरणा अधिक.

या गाण्यांतून सारे शब्द कसे सहज सुलभतेनें गुंफले गेले आहेत. भावना प्रेमानें सर्वत्र खेळली आहे. सारें कसें शांत, सरळ आणि चित्ताकर्षक आहे. कुठें खटकत नाहीं. कुठें कांहीं अडत नाहीं. सगळीकडे रचना ओघवती आहे. या गीतांचा ताल आणि स्वर विलोभनीय आहे.

अशा ह्या लोकगीतांच्या बाबतींत पं. हजारीप्रसाद द्विवेदी यांनीं आपलें मत म्हणून सांगितलें आहे कीं—

" ग्रामगीतोंका समस्त महत्त्व उनके काव्यसौंदर्यतक ही सीमित नहीं है। इनका एक बहुतही महत्त्वपूर्ण कार्य एक विशाल सभ्यताका उद्‌घाटन जो अबतक या तो विस्मृतीके समुद्रमें डूबी है या गलत समज गई है। आर्य आगमन के पूर्व बहुतही समृद्ध आर्येतर सभ्यता भारत वर्ष में फैली हुई थी। उसके साथही औरभी बीसियों छोटी मोटी सभ्यताएं इस विशाल भूभागमें फैली हुई थीं। आर्योंने राजनीतिक रूपमें तो भारतवर्ष को जीत लिया था, पर वे सांस्कृतिक रूपमें पूर्ण रूपसे यहाँ के मूलनिवासियों के द्वारा प्रभावित हुए थे। यहाँ की मूल सभ्यता वैदिक सभ्यतासे एकदम भिन्न थी और आज भी लोकाचार, स्त्री आचार, पौराणिक परंपरा आदिके रूपमें विद्यमान है। ग्रामगीत इस सभ्यताके वेद (श्रुति) है। वेद भी तो अपने आरंभिक युगमें श्रुति कहलाते थे। वेद भी आर्यों की महान् जाति के गीत ही थे और ग्रामगीतोंकी भाँतिही सुनकर याद किये जाते थे। सौभाग्यवश वेदने बादमें श्रुतिसे उतरकर लिपिका रूप धारण किया, पर हमारे ग्रामगीत अब भी श्रुतिही है। इस प्रकार वेदों द्वारा आय

सभ्यताका ज्ञान होता है, उसी प्रकार ग्रामगीतों द्वारा आर्यपूर्व सभ्यता का ज्ञान होता है। ईंट-पत्थरके प्रेमी विद्वान् यदि धृष्टता न समझें, तो जोर दे कर कहा जा सकता है कि ग्रामगीत का महत्त्व ' मोहन-जो-दाडो ' से कहीं अधिक है। मोहन जो दाडो सरीखे भग्नस्तूप ग्रामगीतों के भाष्यकाम दे सकते है। "*

● ● ●

उखाणा

ओवीप्रमाणेंच स्त्रीजीवनांत हरघडी उपयोगांत येणारा लोकप्रिय वाङ्मय-प्रकार म्हणजे उखाणा होय. अगदीं थोडक्यांत पण वेचक शब्दांनीं चटकदारपणें आपल्या मनांतील गोष्ट सूचित करण्यासाठीं स्त्रियांना उखाणा फार उपयोगी पडतो. विशेषतः फुगडी खेळतांना व लग्नासारख्या घरांत निघणाऱ्या अनेक प्रकारच्या मंगलप्रसंगीं पतीचें नांव घेतांना आणि रुखवत उघडतांना उखाण्याचा उपयोग केला जातो. स्त्रीनें उघडपणें हांक मारून पतीचें नांव घ्यावयाचें नाहीं अशी जुनी चालरीत आहे. कारण अशा करण्यानें पतीचें आयुष्य कमी होतें, अशी भोळी समजूत सामान्य बायकांत रूढ झालेली आढळते. या उलट उखाणा घालून पतीचें नांव घेतलें, तर मात्र कसलाहि बाध येत नाहीं, असा परंपरागत समज आहे. त्यामुळें वेगवेगळ्या प्रकारचे चटकदार उखाणे घेत, आपलें बुद्धिवैभव चारचौघींत प्रकट करतेवेळीं पतीचें नांव घेण्याची चाल, महाराष्ट्रांत फार पूर्वींपासून पडलेली आहे. †

पांढरपेशा स्त्रीपेक्षां खेड्यांतील शेतकरी स्त्रियांच्यामध्यें पतीचें " नांव घेण्याचे " म्हणून जे खास उखाणे असतात ते मोठे वैशिष्ट्यपूर्ण आढळून येतात. लांबीच्या दृष्टीनें तर ते मोठे असतातच, पण शेवटच्या ओळींत नवऱ्याचें नांव गोवण्यापूर्वीं येणारी हकीकतहि इथें मोठी मजेदार असते. आपलीं

---

* वैदिक धर्म—अप्रैल १९५८—सिन्धी लोकगीत—ले. जगदीश सो. लछाणी. पृष्ठ १४६

† (१) जैसे न सांगणें वरी । बाळा पतीसी रूप करी ।
बोलु निमालेपणें विवरी । अचर्चा तें ॥
(अ. १५।४६८ ज्ञानेश्वरी, साखरेप्रत)

(२) रेवती म्हणे जी यादवा । आधिं घ्या ईचीया नांवा ।
हळदी मग ईसी लावा । देवाधिदेवा श्रीकृष्णा ॥
(एकनाथ-रुक्मिणी स्वयंवर)

नातींगोतीं, सणवार, चालीरीति, इतिहास-भूगोल, करणीधरणी वगैरे अनेक गोष्टींचा उठावदार संगम या उखाण्यांतील हकीकतींत गुंफलेला असतो. त्यामुळें सामाजिक जीवनाचें दर्शन घडविणारा एक श्रेष्ठ वाङ्मयप्रकार म्हणूनहि उखाणा महत्त्वपूर्ण ठरेल यांत शंका नाहीं.

उदाहरण म्हणून अशा प्रकारचे कांहीं उखाणे इथें पहावेत—

(१) कोलापुरी तपेलं आंगूळीला, चांदीचा पाट बसायला, जरीकाठी धोतर नेसायला, सान येवल्याचं, ग्वाड बह्राचं, केसरी गंध ल्याला, शिवपूजेला पानी गंगाभागीरथीचं, चांदीचं ताट, आंबेमोहराचा भात, वर केसरी वरण दाट, ताट बिंदलीचं, डबा म्हाउलीचा, डब्या गंजनीच्या, कात कोकणचा, चुना भोकरचा, पान रामाचं, जायपत्री जयगांवची, लवंग विजापूरची, चिकणी सुपारी सोलापूरची, लाल गादी मुंबईची, लोड सातारचं, उशी पुण्याची किनखापाची, पलंग कराडचा मोराचा, हिऱ्यामाणकांच्या झुंबरांचा लकलकाट ××× रावांच्या जिवावर हणदीकुंकवाचा गजर दाट.

(२) पाऊस लागला झिरीमिरी, मूठ धरली चाड्यावरी, शिवार झालं गार, शेतांत घातला विळा, बांधला पेंडीचा आळा, शिवार केला गोळा, बुचाड रचलं नानापरी, तिवडा रवला येसूसरी, बोलीवल्या नगरच्या नारी, तिवड्याला घालतें आकडी, आकडीला आकडी भिडं, मदनांत बैल बुडं, रास मोजतांना ××× रावांच्या हातांत चमाकलं सोन्याचं कडं.

(३) वटसावित्रीचा पुजतें वड, बेंदरानं केला चड (स्वारी), बेंदराची घेतें काव, नागपंचमीचा जाव, नागपंचमीच्या दिंडाची करतें न्हारी, आली गवराय गणपतीची स्वारी, गवराय गणपतीला वहातें दुर्वा, गवराय गणपतीचं घेतें दोरं, आलं म्हाळाचं म्हईनं म्होरं, म्हाळाच्या म्हईन्याची निवडतें डाळ, आली घटाची माळ, घटाच्या माळेला देतें गांठी, शिलंगनाची झाली दाटी, शिलंगनाचं घेतें सोनं, दोन्ही दिवाळ्यांनीं केलं येणं, दिवाळीची पाजळतें पंती, आली संक्रांत नेन्ती, संक्रांतीचं पुजतें सुगड, आली माही पुनव उघड, माही पुनवेची पुजतें वोंबी, शिमगा खेळे झोंबी, शिमग्याची करतें पोळी, आली रंगपंचीम भोळी, रंग-पंचमीचा उधळला रंग, पाडवा आला टोलेजंग, पाडव्याची उभारतें गुडी, आखितीनं मारली उडी, आखितीची पुजतें करा, दिवाळी दसरा होस्तोंवर दम धरा, मग येईन ××× राव तुमच्या घरा.

(४) पंढरपूरचा पुडा, काशीचा चुडा, मथुरेचं पान, खायला छान, कलमी आंबा, त्याच्या करतें फोडी, आईबापांची गोडी, सिताच्या काखला दुधाची कळशी, दुधाचं करतें दही, दह्याचं करतें ताक, ताकाचं काढतें लोणी, अशी मी अंतरीं शाणी की, ××× रावांच्या रागाचं तवाच करतें पाणी.

(५) गांवदरील पेरला वरा, उपडून बांधला भारा, आणून टाकला परसदारा, गाई आली हुंगून गेली, म्हैस आली खाऊन गेली, म्हशीच्या पोटीं रेडं, गाईच्या पोटीं चितार पाडं, आईबांनीं दिलं जांभळं घोडं, जांभळ्या घोड्याचं चुट्टक दावं, दुरून पाहिलीं वाडीगांवं, वाडी गांवांच्या रुंद रुंद वेशी, ठसं पडलं चौदेशी, चौदेशीच्या उंबराय गाजं, × × × रावांच्या मदिलाला जवा बगाल तवा तुरं दिसत्याल ताजं.

या लांबलचक उखाण्यांच्या जोडीलाच दोन तीन ओळींचे आटोपशीर व लहान लहान चुटक्यांचे उखाणे घेण्याची चालहि सर्वत्र आढळून येते. या प्रकारचे उखाणे असे असतात:—

(१) हातभर बांगडी, अंगभर पदर × × × रावांच्या सेवेला मी चोवीस तास हजर.

(२) मोत्यांनीं विणला पाळणा, रेशमानं विणली बाज × × × रावांच्या लेकीचं बारसं आज.

(३) जडिताचं मंगळसूत्र सोनारानं घडवलं × × × रावांच्या नांवासाठीं सर्वांनीं मला आडवलं.

(४) विठोबाच्या देवळाला सोन्याचा कळस × × × रावांच्या नांवाचा मला नाहीं आळस.

(५) सोन्यामोत्यांचे सागरगोटे, पडले माझ्या पातळाच्या घोळांत × × × रावांचं नांव घेतें मैत्रिणींच्या मेळ्यांत.

(६) नको पैठणी, नको शालू, नको मला भर्जरी शेला × × × रावांच्यासाठीं देह मीं अर्पण केला.

(७) पाडला पाटा, फोडला हिंग, दिली फोडणी, कडाडली ताकावर × × × रावांचं नांव घेतें सर्वांच्या नाकावर.

(८) गोदावरी कांठची मुलगी कृष्णाकांठीं आली × × × रावांच्या नांवचं मंगळसूत्र ल्याली.

(९) पाडाचा आंबा दिला दारींच्या पोपटाला × × × रावांचं नांव घेतें चंद्रसूर्या साक्षीला.

(१०) आत्तीसाब मायाच्या, मामासाब प्रेमाचे, बाईसाब सुगरीण, दीरभाऊजी हौशी × × × रावांचं नांव घेतें हळदीकुंकवाच्या दिवशीं.

पतीचें नांव घेण्यासाठीं वापरल्या जाणाऱ्या अशा लहानमोठ्या उखाण्यांतून ठराविक अक्षरगण, मात्रागण, अक्षरावलि किंवा मात्रावलीचें बंधन असलेलें दिसून येत नाहीं. त्याचप्रमाणें येथें ठराविक ओळींचेंहि बंधन आढळत नाहीं. यमकाचा वापर येथें भरपूर होत असला, तरी त्यासही बंधनात्मक स्वरूप आलेलें नाहीं.

अलीकडच्या काळांत रूढ होत चाललेल्या मुक्तछंदाचें आवरण मात्र ह्या उखाण्या· भोंवतीं आहे असें दिसतें. या प्रकारच्या उखाण्यांच्या जोडीलाच लग्न प्रसंगीं रुखवताचे वेळीं घेतले जाणारे उखाणेही मोठे चित्ताकर्षक असतात.

उदाहणादाखल म्हणून त्यांचा तोंडवळा कसा असतो तो पहावा—

(१) आला आला रुखवत, दनानलं जोतं, आंत उगडून बघतीया तर साकरचं पोतं.

(२) आला आला रुखवत, आंत हुती सान, ईनीबाई छान पण मधल्या आधल्यांनीं केली घाण.

(३) आला आला रुखवत मांडवाचे दारीं, आंत काय परी, शेवाया नाजूक, तेलच्या साजूक, पानाच्या पत्र्या, खोबऱ्याच्या वाट्या, गुळाच खड, उडदाच वड, पापडहार हारीं, घारी सजुरी, बुंदी बरफी झुलापझारी. जिर साकार न्हाईपुरी. शेंडीसिकट पांच नारळ, देटासकट पिकलीं केळं. दराक्ष हजार रामफळं. करनी केली धनसंपताच्या बळं. रुखवत उघडतें खडाखडी. पाइजे तर ××× रावांचं नांव घेतें, पन अगूदर चोळी पातळाची वर ठेवा घडी.

(४) कोरी तवली कुंभाराची. विहीन बोल टच्चकाऱ्याची. चितांगाचा फासा. ईनीबाई पलंगाव बसा. याह्यांनीं यीन घेतली कडला. नेली हलव्याच्या पेढीला. तिथं बांदली जिलेबीची पूड. यीनबाई फुंदुफुंदू रडं. मला तिकडंच न्या म्हणं. मग याह्यांनीं यीन घेतली कडला. नेली सोनाऱ्याच्या वाड्याला. तिथं घडलं तोड्याच जोड. यीन फुंदुफुंदू रडं. मला तिकडंच न्या म्हणं. याह्यांनीं मग यीन घेतली कडला. नेली अत्ताराच्या वाड्याला. तिथं बांदलं हळदीकुंकवाच पुड. यीन फुंदुफुंदू रडं. मला तिकडंच न्या म्हणं. याह्यांनीं मग यीन नेली आंब्याच्या बनीं. तिथं हातरला गंजीखाना. यीनीच्या याही आला मना. बसाया पाट. तोंड धुया घंगाळ. तवा मातूर यिहीन म्हटली की, याही लई वंगाळ.

(५) आला आला रुखवत, रुखवतांत हुतं कंबाळ. आमच्या नवरीचा करा नीट संबाळ, न्हाईतर ह्यो गांवचा पिंपळेशर लई हाय वंगाळ.

(६) आला आला रुखवत, रुखवतांत गाजराचा पाला. दीड दिवस झाला न्हाई सजुरी देऊन, तर एवढ्यांत कशाला आला ?

(७) आला आला रुखवत, त्यांत हुता गडवा; उकान्याला उकाना भिडवा न्हाईतर सांदीला त्वांड दडवा.

या प्रकारचे रुखवताचे उखाणे पुष्कळच असतात. इथें या उखाण्यांचा उपयोग लवंगी मिरचीसारखा होतो. मानापमान त्यामुळें निघतात. बोलण्यावरून बोलणें वाढतें. भांडणें निघतात. रुसारुशी होते. तरीपण भरपूर विनोद निर्माण करण्यासाठीं या पद्धतीच्या उखाण्यांचा उपयोग केला जातो. या उखाण्यांतून बाईची अक्कल फार चालते म्हणतात. जिभेला हाड नसावें त्याप्रमाणें इथें हवें तें बोललें जातें.

मोठ्या बायकांच्या या विविध प्रकारच्या उखाण्यांचे प्रमाणेंच लहान मुली फुगड्या खेळतांना उखाणे घालतात. हे उखाणे साधे, खेळाचे, म्हणून ओळखले जातात. या उखाण्यांतूनहि एकमेकींच्या उखाळ्यापाखाळ्या अधून मधून निघतात. कधींमधीं कौतुकाचीहि भाषा होते. फुगडींचे उखाणे असे असतात—

(१) तुझी माझी फुगडी बनांत ग, बनांत ग;चाफ्यांचीं फुलं माझ्या वेणींत ग.

(२) आपट्याचं पान माझ्या झपाट्याखालीं, झपाट्याखालीं; काळ्यांच्या मुली माझ्या डाव्या हाताखालीं.

(३) चिपाडबाई चिपाड जुंधळ्याचं चिपाड, दादानं बायको केली आपल्यापेक्षां धिप्पाड.

(४) चुनाबाई चुना परातभर चुना, चिंचपेट्या लेवूं आम्ही किर्लोस्करांच्या सुना.

(५) आलंगडीवर पलंगडी, पलंगडीवर हार, आज माझी मंगळागौर बोलूं नका फार.

(६) फुगडी खेळूं दणादणा, रुपये मोजूं खणाखणा, बाभळीची साल, माझा कंबरपट्टा लाल.

(७) एवढासा पाटा बाई जिरीमिरी वाटा, लाडक्या लेकीचा टमकारा मोठा.

(८) उंच उंच बुचडे पुणेकरणी, कासोट्याच्या पट्टया सातारकरणी.
नाकांत मोतीं बारामतीकरणी, डोक्यावर हांडे बोरगांवकरणी.
टाचा फुटक्या गोवेकरणी, भल्या ग दांडग्या फलटणकरणी.
फुगडी खेळूं दण्णा दण्णा, रुपये मोजूं खण्णा खण्णा.
भल्या बापाची लेक, माझी फुगडी पारखून देख.

(९) बस फुगडी बसूंगा, चतुरशिंगी लालुंगा.
एक पाय खोलीचा, सीताराम डोलीचा.

(१०) काथवट कणा, चौघीजणी सुना,
पाणी कां ग घ्याना, ×× कां ग प्याना.
पायांची माती नणंदेच्या हातीं
नणंदेनं दिली खोबऱ्याची वाटी;
खोबऱ्याची वाटी जळून गेली
नकटी नणंद पळून गेली .

अशा प्रकारच्या कितीक उखाण्यांचा उपयोग खेळांत पार्श्वसंगीताप्रमाणें करण्यांत येतो ! अर्थापेक्षां इथें यमकाचें प्राबल्य अधिक आढळून येतें. खेळांच्या साथींतून याचा जन्म झाल्याकारणानें अर्थपूर्णतेचें बंधन यावर नसतें. पहिल्या

ओळीला कांहीं अर्थ नसला व दुसऱ्या ओळीशीं पहिलीचा संबंध नसला, तरीहि इथें हरकत नसते. परंतु असें असून राग लोभाची भाषा इथें ठसक्यानें होते.

या उखाण्यांच्या वाङ्मयप्रकारास अपौरुषेय वाङ्मयांतील अनुष्टुभ छंद म्हटलें तरी वावगें होणार नाहीं. "अनुष्टुभ हा अभिजात वाङ्मयांतील पहिला छंद वाल्मिकी ऋषींना सहजस्फूर्त झालेला व पुढील वृत्त रचनेचा पाया. त्याप्रमाणेंच उखाणा हा बोलतां बोलतां सहजस्फूर्त झालेला असतो. चालीवर म्हणतां आला पाहिजे असें याचें नसतें व रचनाहि अत्यंत शिथील."* तरीपण स्त्रीजीवनांत याची अपूर्वाई फार मोठी असते.

● ● ●

म्हणी

जुन्या काळची बरीच वडीलधारी मंडळी ही उठतां बसतां आपल्या बोलण्यांतून कांहीं परंपरागत अशा वाक्प्रचारांचा उपयोग करतांना दिसून येतात. हे वाक्प्रचार दिसायला एखाद्या उखाण्यासारखे दिसत असले, तरी त्यांचे अंतरंग ठराविक प्रकारच्या विशिष्ट अशा अर्थानें भरलेलें असतें. म्हणून त्यास 'म्हणी' असें वेगळें नामाभिधान देण्यांत आलेलें आहे.

ह्या म्हणींचें स्वरूप संपूर्णतः गद्यमय असतें. परंतु त्यांचें स्मरण पक्कें रहावें एवढ्यासाठीं येथें यमकांचा उपयोग सर्वत्र केलेला असतो. निरर्थक शब्दांचा वापर म्हणीला खपत नाहीं, थोड्याच व मोजक्या शब्दांनीं जास्तींत जास्त अर्थ सांगणें हें म्हणींचें मुख्य वैशिष्ट्य असतें. त्यामुळें मुरलेल्या लोणच्याप्रमाणें अनुभवाचें शहाणपण सांगणें हें म्हणींचें मुख्य कार्य होय. म्हणून येथें मनोरंजनापेक्षां शहाणपण हेंच लोकांना प्रामुख्यानें अभिप्रेत असतें, हें तत्त्व म्हणींचा वापर करणारे व त्याचें श्रवण करणारें मनाशीं बाळगून असतात.

म्हणींचा उपयोग स्त्री आणि पुरुष या दोघांकडूनहि केला जातो. आणि अगदीं सहजगत्या त्या त्यांचे ओठांवर खेळत असतात. त्या कारणानें अमूक एक म्हण स्त्रियांच्या वापरांतील व अमुक एक पुरुषांच्या वापरांतील असा भेदभाव म्हणींचें ठायीं दाखवितां येत नाहीं. तरी परंतु त्यांतल्या त्यांत स्त्रियांचेकडूनच ज्यांचा अधिक वापर केला जातो, अशा कांहीं म्हणी इथें नमुन्यादाखल देत आहें:—

(१) सवत साहिना व मूल होईना.
(२) जिकडे गेली वांझ तिकडे आली सांज.

---

* अपौरुषेय वाङ्मय. पा. ४२—४६

(३) सून आली घरांत न् सासू पडली केरांत.
(४) दिसायला गरती न् भांवभर फिरती.
(५) नाजुक नार, मोत्यांचा हार, पण चाबकाचा मार.
(६) साप म्हणूं नये बापडा व नवरा म्हणूं नये आपला.
(७) पहिल्या वरा न् तूंच बरा.
(८) जाळावांचून कड नाहीं व मायेवांचून रड नाहीं.
(९) येरे माझ्या मागल्या न् ताककण्या चांगल्या.
(१०) आली भेटीला न् धरली वेठीला.
(११) आभाळाला गवसणी कोण घालील शाहाणी.
(१२) आई जेवायला वाढीना न् बाप भीक मागूं देईना.
(१३) बाजारांत तुरी न् भट भटणीला मारी.
(१४) झाकली मूठ सव्वा लाखाची.
(१५) हौसेनं केला वर, दिवसां खोकला न् रात्रीं ज्वर.
(१६) कोणाच्या गाई म्हशी न् कोणाला उठाबशी.
(१७) घर ना दार, देवळीं बिऱ्हाड.
(१८) शब्दांचा सुकाळ तिथं बुद्धीचा दुष्काळ.
(१९) मान सांगावा जनांत व अपमान ठेवावा मनांत.
(२०) वैद्याची मात्रा न् वैकुंठीचीं यात्रा.
(२१) म्हशीचीं शिंगं म्हशीला जड होत नाहींत.
(२२) पदरीं पडलें न् पवित्र झालें.
(२३) वाहिली ती गंगा न् राहिलं तें तीर्थ.
(२४) वकुब थोडा पण दिमाख बडा.
(२५) ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी.

अशा प्रकारच्या ह्या म्हणींची संख्या लोकसाहित्यांत भरपूर आहे. आकाशांत ढगांनीं गर्दी करावी, तशा या म्हणी एकेकाच्या मनांत तरंगत असतात ! त्यामुळें वेळप्रसंगानुरूप त्यांचा वापर केला म्हणजे माणसाचें बोलणें कसें बाळसेदार होतें. या बोलण्यांतून मग कधीं नीतितत्त्व बाहेर पडतें तर कधीं अनुभवानें नटलेला दृष्टांत बाहेर येतो. हें बोलणें त्रिकालाबाधित असें असल्यामुळें अक्षर-वाङ्मयांत त्याची गणना होते.

लघुता, व्यावहारिकता, चित्ताकर्षकता आणि लोकमान्यता हे या म्हणींचे प्रमुख गुण असतात. म्हणींचा बांधा आटोपशीर असतो, पण अंतरंग डौलदार असतें. त्या कारणानें व्यावहारिक जीवनांतील एक राजमान्य वा लोकमान्य असें चलनी नाणें म्हणूनंहि म्हणींचा लौकिक आहे. आणि म्हणूनच म्हणी म्हणजे

पिढ्या न् पिढ्यांच्या मंडळींनीं वापरांत ठेवलेला एक प्रभावी असा ज्ञानकोशच होय असें म्हणतां येईल.

● ● ●

कोडीं किंवा हुमाणा

आपल्या नेहमींच्या ऊठबशींतील मंडळी कांहीं कारणानें एकत्र आली म्हणजे एकमेकांची कधीं मधीं अशी परीक्षा घेत असतात. त्यांना एकमेकांच्या बुद्धीची पारख करून घ्यावीशी वाटते. म्हणून अशा वेळीं त्यांचें बोलणें प्रश्नोत्तर रूपाचें होतें. तेव्हां अशा या बोलण्यास कोडीं घालणें किंवा हुमाणा—हुमान—टाकणें असें म्हटलें जातें.

या प्रकारच्या बोलण्याचा सराव खेड्यांतील स्त्रीपुरुषांप्रमाणेंच लहान मुलांबाळांनाहि असतो. त्यामुळें अनेकदां ही मंडळी एकमेकांत याच प्रकारचें बोलणें करतांना आढळतात. घातलेल्या कोड्याचें—प्रश्नाचें—उत्तर लगोलग मिळालेंच पाहिजे, म्हणून अशा वेळीं फार मोठी ईर्षा चालू रहाते. एवढेंच नाहींतर, जो अधिक हुमाणे टाकील व ज्याचें उत्तर इतरांना सहजासहजीं गवसणार नाहीं, तो अक्कलवान् माणूस म्हणून गौरविला जातो !

एखाद्या माणसाच्या बुद्धीची तारीफ करायला लावणारीं हीं कोडीं कशीं असतात पहा; व कंसांत दिलेलें त्यांचें उत्तर बघून आपल्या देखील बुद्धीला कशी धार येते, याचें मोजमापहि घेऊन टाका:—

(१) पांढरं वावर काळं बीं, चतुर म्हणतो पेरीन मी. (लेखक)

(२) झुक झुक झोळणा, आकाशीं पाळणा, बायको बाळंतीण तर नवरा तान्हा. (चिंच व चिंचोका)

(३) आधीं गोल गोल, मंग लाल लाल, मंग थैय्यम थैय्या. (उखळ, मुसळ, मिरची)

(४) धा मांणसांत गोष्ट सांगावी खरी, बापाविना पुत्र जलमला आई पण नव्हती घरीं. (लव्हाळा)

(५) काळी कचुबाइ, हिरवी बचुबाई, पांढरा आजोबा न् उघडी सिताबाई. (कात, पान, चुना, सुपारी)

(६) जमिनीवर पडला, कोनीं कोपरीं दडला, हातीं तर येत नाहीं असा चमत्कार घडला. (प्रकाश व काळोख)

(७) घमघमाटा, विषाचा काटा, सोन्याच्या देवळांत रुप्याच्या घांटा. (पिकलेला फणस)

(८) पाणी नाहीं, पाऊस नाहीं, रान कसं हिरवं; कात नाहीं चुना नाहीं, तोंड कसं रंगलं. (पोपट)

(९) दोन जिभांची नारी, राही मेरूच्या शिखरीं, भल्याभल्यांची सेवा करी. (लेखणी)

(१०) घडघड चाले गाडा नव्हे, सुरसुर चाले सर्प नव्हे; कानीं मुद्रिका जोगी नव्हे, गळ्यांत जानवें ब्राह्मण नव्हे; नव्हे इंद्र, नव्हे चंद्र, नव्हे मासा; शहाण्यानें घातलें हुमान न् मूर्खाला पडला फासा. (पाणी काढण्याचा रहाट)

(११) पिता ज्याचा सावळा, मातेला नाहीं कान डोळा न् पुत्र जन्मला तोही निघाला सुंदर गोळा. (समुद्रांतील शिंपा व त्यांतील मोतीं)

(१२) ठिकठिकाणीं पान जसं कळकीचं रान, आमचा हुमाणा न जिंकेल त्याला वडिलांची आण. (आलें)

(१३) काळा खडक, भोवऱ्यावाणी पाणी, आंत खेळते चंपाराणी (रवी)

(१४) राजाच्या राज्यांत नाहीं, माळ्याच्या मळ्यांत नाहीं; खातात पण तोंडीत नाहींत. (गारा)

(१५) अख्ख्या दुनियेंत एकच तळं न् त्यांत दिसती दोनच रामफळं. (चंद्र व सूर्य)

अशा प्रकारच्या वा बोलण्याला कोणी कोणी उखाणा असेंहि म्हणतात. या परीच्या हुमाण्यांची संख्या कितीतरी आहे. एवढी मोठी कीं, ज्याचें गणीतच होऊं नये !

ह्या भाषेची एकंदर घडण आणि तिचें मिळणारें उत्तर मोठें मजेदार आहे. अशिक्षितांच्या बुद्धीनें दाखविलेला हा एक अपूर्वाईचा दिमाख आहे. इथें शिकलेलीं माणसें हात जोडून माघार घेतील व या लोकांच्या बुद्धीची तारीफ करीत जातील, असा हा शहाणपणाचा एक सुंदर व वैभवशाली खजिना आहे. हा खजिना उघडला कीं, जीवनाला चव येते. भाषेला घनसर अलंकार मिळतो आणि माणसाची तारीफ जगभर फिरूं लागते. म्हणून फावल्यावेळीं चारचौघांत बसून ग्रामधर्माचीं माणसें या बोलण्याची गोडी कशी वाढेल, याची ईर्षा बाळगूनच आपल्या मोठेपणाची बैठक उभारतात.

• • •

कहाणी वाङ्मय

कोणत्याहि काळांतील नव्या आणि जुन्या मानवी मनाला लोकप्रिय वाटणारा वाङ्मयप्रकार म्हणून कहाणीवाङ्मयाचें स्थान मराठी सारस्वतामध्यें फार

वरच्या दर्जाचें आहे. मानवाच्या स्वभावरचनेमध्येंच कहाणीचें उगमस्थान सांपडतें. गोष्टी सांगणारा भेटला कीं, ऐकणारांची वाण पडत नाहीं. अगदीं लहान मुलापासून तों वृद्ध मनुष्यापर्यंत प्रत्येकाला कथा ऐकण्याचें वेड असतें. घरांतील आजोबा-आजीनें गोष्ट सांगावी आणि लहान बालकांनीं ती काळजीपूर्वक ऐकून आपल्या कोंवळ्या मनांत टिपून घ्यावी, ही फार जुन्या काळापासून चालत आलेली प्रथा आहे. अगदीं पुरातन काळापासून सांगणाराची कुवत आणि ऐकणाराची संस्कृति या दोन मुख्य आधारांवर कहाणीची जोपासना होत गेली आहे.

मानवाच्या जीवनांतील विश्रांतीचें एक अपूर्व साधन म्हणून कहाणीचा लौकिक आहे. मनामधील विचारांना गति देणारें तें एक प्राचीन रसायन आहे. माणसाच्या मनामधील जो एक शाश्वत बालभाव आहे त्याची भाषा, त्याचें साहित्य, त्याचा भावनाविष्कार कहाणी आहे. त्यामुळें उभ्या दुनियेचा संसार कहाणीनें माखला आहे. आणि एकप्रकारें माणसाचें जीवन म्हणजेहि कहाणीचे एक सुंदर भांडार आहे, असें म्हटलें तर खास वावगें होणार नाहीं.

साध्यासुध्या घरगुती शब्दांनीं आणि सहजसुलभ रचनाविष्कारानें कहाणीचें अंतरंग सजलेलें आहे.

कहाणीवाङ्मयाचे सामान्यत: दोन प्रकार सर्वमान्य झालेले दिसून येतात. त्यांपैकीं पहिला प्रकार म्हणजे घरामधील मोठ्या स्त्रियांनीं आपल्या सुनालेकींना योग्य तें वळण लागावें व त्यांचे मनावर विशिष्ट प्रकारचा धार्मिक संस्कार व्हावा, म्हणून व्रतवैकल्याचे निमित्तानें सांगितलेली कहाणी. एथें गोष्टीरूपानें एखादें व्रत सांगून त्याचें माहात्म्य व तात्कालिक फलनिष्पत्ति यांचें वर्णन केलेलें असतें, तसेंच आपल्या आचारविचारास एक प्रकारचें इष्ट वळण लावण्यासाठीं स्त्रियांनीं हीं व्रतें श्रद्धायुक्त अंतःकरणानें आचरावींत, असाहि उपदेश ह्या कहाण्यांचे द्वारां केलेला असतो. यांपैकीं बहुतेक कहाण्या पुराणांतील कथांच्या आधारें कैक पिढ्यांपूर्वींच्या भाविक म्हाताऱ्या बायकांनीं रचलेल्या असून त्या विशिष्ट प्रकारच्या व्रताच्या प्रसंगीं कुटुंबांतील वृद्ध स्त्रिया आपल्या मुलीबाळींना सुनांना सांगत आलेल्या आहेत.

सामान्यत: व्रतवैकल्याचे वेळीं कोणतेंही व्रत कां करावयाचें याचा पौराणिक दाखला घेण्यासाठीं या कहाण्या रचलेल्या दिसतात. उदाहरणार्थ, सोमवारच्या शिवामुठीच्या कहाणीमधील वसा व त्याची फलश्रुति यासाठीं किती कडक व्रत अंगिकारिलें पाहिजे, याचें सुंदर वर्णन पहाण्यासारखें आहे—

" ...मूठभर तांदूळ घ्यावेत. शिवराईची सुपारी घ्यावी. गंध, फूल घ्यावं. दोन बेलाचीं पानें घ्यावींत. मनोभावें पूजा करावी. हातीं तांदूळ घ्यावे आणि तोंडानें ' शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरा देवा, सासूसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा, भ्रतारा, नावडती आहे ती आवडती कर रे देवा ' असें म्हणून तांदूळ वहावेत. संध्याकाळपर्यंत उपास करावा. उष्टमाष्ट खाऊं

नको. दिवसा निजूं नको. उपास नाहीं निभावला तर दूध प्यावं. संध्याकाळीं आंघोळ करावी. देवाला बेल वहावा आणि मुकाट्यानं जेवण करावं. हा वसा पांच वर्षे करावा. पहिल्या सोमवारीं तांदूळ, दुसऱ्यास तीळ, तिसऱ्यास मूग, चवथ्यास जव आणि पांचवा आला तर सातू शिवामुठीकरितां घेत जावे..."

या अशा कहाण्यांची भाषा मोठी सुबोध, चित्ताकर्षक, काळजाला जाऊन भिडणारी. महानुभावांच्या भाषेसारखी. इथें थोड्या शब्दांचीं तुटक वाक्यें असतात. वक्ता अगर श्रोता यांचा नामनिर्देश वरचेवर इथें येत नाहीं. तसेंच प्रस्तावना अगर उपसंहारहि आढळणार नाहीं. जो उपदेश वा बोध असेल तो थोडक्यांतच सांगितलेला असतो. तसेंच ज्या देवतेचें कहाणीनें स्तवन करावयाचें तिलाच एकदम संबोधून कहाणीस असा आरंभ व्हावयाचा—

"ऐका गोपद्मांनो तुमची कहाणी. स्वर्गलोकीं इंद्रसभा, चंद्रसभा, कौरव-सभा इत्यादि सभा बसल्या आहेत. तासें-तर्फे वाजत आहेत, रंभा नाचत आहेत." (कहाणी गोपद्माची.)

किंवा कित्येक कहाण्या 'आटपाट नगर होतं' या पद्धतीनेंहि सुरू झालेल्या दिसून येतील. सुरवातीप्रमाणेंच या कहाण्यांची अखेरहि मोठी मनोवेधक रीतीनें होते. 'ही सांठा उत्तरांची कहाणी, पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण" असें समाप्तिवजा वाक्य आल्याखेरीज तिचा शेवट होत नाहीं. एथें 'उत्तर' म्हणजे गाण्याचा अगर निबंधाचा एक भाग असा अर्थ घ्यावयाचा. म्हणजेच ही कथा फार सारांशानें एथें आलेली आहे, असा आशय एथें व्यक्त केलेला असतो.

या कहाण्यांमधून दिसून येणारें सामाजिक जीवन मोठें आकर्षक आहे. "करारे हाकारा, पिटारे डांगोरा, नगरांत कोणी उपाशी आहे का? याचा तपास करा." ही दवंडी जाहीर करून शोध करीत असतांना उपाशी कोणी नाहीं. माळ्याचा मळा पिकत नाहीं. विहिरीला पाणी लागत नाहीं. असा एक माळी बसला आहे." अशा प्रकारचें मिळालेलें उत्तर आणि त्यानंतर होणारी उपाययोजना मोठी परिणामकारक वाटते यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें देवाजवळ मागणें मागायचेंच तर तें "कांकणलेल्या लेकी दे, मुसळकांड्या दासी दे. नारा-यणासारखे पांच पुत्र दे, दोन कन्या दे, कुसुंबीच्या फुलासारखें स्थळ दे." (धरत्रीची कहाणी) ह्या पद्धतीनें मागावयाचें. सोमवारच्या कहाणींतील शंकरांनीं एका पोरक्या मुलीला अर्ध्या घटकेचें माहेर दिलेलें वर्णन मोठें अर्थपूर्ण आणि चटकदार झालेलें आहे. हा कथाभाग या कहाणींत कसा आलेला आहे पहाः—

"मनीं शंकराची प्रार्थना केली, अर्ध घटकेचें माहेर दे. तों वेळूचें बेट आलें. कोणी म्हणे माझा जांवई आला, कोणी म्हणे माझी नणंद आली, कोणी म्हणे माझी बहीण आली. दासी बटकी राबताहेब, शिपाई पहारा करताहेत, बसायला पाट दिला, भोजनाचा थाट केला......"

बालवाङ्मयांतल्याप्रमाणें या कहाण्यांतून जी शब्दांची आणि वाक्यांची सारखी पुनरावृत्ति होत असते, ती पूर्वींच्या न शिकलेल्या बायकांवर परिणाम होण्यासाठीं अगदीं आवश्यक अशींच होती. " उतशील, मातशील घेतला वसा टाकून देशील, उतत नाहीं, मातत नाहीं, घेतला वसा टाकत नाहीं. " यासारख्या स्थळीं प्रश्नांच्या शब्दांतच जीं उत्तरें दिलीं आहेत, तींहि परिणामाच्या दृष्टीनें योग्य आहेत असें म्हणतां येईल.

लहान लहान सोपीं वाक्यें, आंदोलन निर्माण करणारी लयबद्ध वाक्यरचना, ठराविक शब्दांची होणारी पुनरावृत्ति आणि मनाची पकड घेणारा भावनाविष्कार ही कहाणीची साधनसामुग्री असते. त्या दृष्टीनें शब्दरचनेचा सुंदर नमुना म्हणून " सोमवार " च्या कहाण्यांतील पुढील भाग पाहतां येईल.

" कोरान्न मागत असस. तेव्हां दर सोमवारीं उपास करीस. भिक्षेस जास. पांचच घरीं कोरान्न मागस. त्या स्वयंपाक करून महादेवास नैवेद्य दाखवीस. "

एथील क्रियापदांची ही ठेवण जुन्या काळच्या मराठीचें वैशिष्ट्य दाखवितें.

सचील स्नान (वस्त्रासहित स्नान), उतरंडीचा मोती (वेजी उतरलेला मोता), पाटाव (पैठणी), खुलभर (चुळकाभर), फसकी (पस्त), ताशामकें (ताशानगारे), पावा (खडावा), नागाणे (फुटाणे) इत्यादि या कहाण्यांतील अलंकारिक विशेषणेंहि फारं सूचक झालेलीं आहेत.

या कहाण्यामधील सामाजिक जीवनहि पाहाण्यासारखें आहे. त्यावेळचीं शहरें फार मोठीं म्हणजे आठ अथवा याहून अधिक पेठांचीं असत. कहाणींतील राजे गरिबांच्या मुली करीत व राण्या स्वतः घरकाम करीत ! प्रा. म. म. दत्तो वामन पोतदार यांनीं एकदां या कहाण्यांना ' स्त्रियांचें उपनिषद् ' असें गौरवानें संबोधिलें आहे. सुश्राव्य कथांच्याद्वारां आपल्या अशिक्षित स्त्रियांना नीतिमान् करण्यासाठीं या कहाण्या रचिल्या गेल्या आहेत व त्याचें मनावर दडपण राहाण्यासाठीं त्या धार्मिक व्रतांशीं निगडित केलेल्या आहेत.

कहाणी–वाङ्मय हें परंपरेनें केवळ आठवणींच्या बळावर चालत आलेलें असल्यानें त्याचा निश्चित काळ ठरविणें कठीण आहे. तथापि मराठी भाषेंतील सर्वांत उपलब्ध असा जो जुना महानुभाव वाङ्मयाचा पुरावा सांपडतो, तेथपर्यंत कहाणीचा मागोवा लागतो, असें श्री. चक्रधरस्वामींनीं सारंगपंडिताची मुलगी " धानाई " हिला " लीलाचरित्रा " मध्यें सांगितलेल्या पुढील गोष्टीवरून दिसून येतें—

" सर्वज्ञ भणितलें: बाईः तथा धाइयाः हें तुम्हां कहाणी साधैलः आलीः पासी बैसलीः साळैचें घर मेणाचें: कावळेयाचें घर सेणाचें: पाउसाळा काउळ्याचें घर पुरें जायः साळैचे घर वांचेः मग उगीची राहिली:... "

या कहाणी-वाङ्मयाचा दुसरा भाग म्हणजे वर दिल्या प्रकारची चिऊकाऊची कथा अगर राजाराणींच्या गोष्टी. लोककथा असेंहि या दुसऱ्या प्रकारच्या कहाणीचें एक दुसरें नामाभिधान आहे. ही लोककथा घरांतील वडीलधारे स्त्री पुरुष आपल्या नातवंडांना सांगतांना आढळून येतात. लहान मुलांना चांगलें वळण लागावें या भावनेनें या कथेची निर्मिति झालेली असते. पशुपक्षी, सर्वसामान्य स्त्री–पुरुष आणि नगरांतील राजेरजवाडे यांच्या जीवनावर ही लोककथा आधारलेली असते.

माणसाचें मन हें या प्रकारच्या कथेचें जन्मस्थान आहे आणि ती सांगणाराच्या चेहऱ्यावर तिच्यामध्यें व्यक्त केलेल्या भावनांचें त्यामुळेंच प्रतिबिंब पडत असलेलें दिसून येतें. या कहाण्यांचा व लोककथांचा विशेष हा कीं, सर्व पिढींतील मानवजातीला त्यांचें आकर्षण असून, त्याचा कर्ता स्त्री वा पुरुष कोणीहि असला तरी कर्तेपणाचा वास त्यांना लागलेला नसतो.

आपल्या दैनंदिन जीवनामध्यें अशा कांहीं घटना घडत असतात कीं, ज्यांच्या मुळें मानवी जीवनाला कांहीं वैशिष्ट्य प्राप्त होतें. त्या वैशिष्ट्यपूर्ण घटनांचा उल्लेख लोककथांमध्यें वारंवार येत असतो. मनोरंजनाबरोबरच कांहीं बोधहि निश्चितपणें घेतां यावा, हा या लोककथांच्या मागचा हेतु आहे.

लहान-मोठ्या कोणत्याहि आकाराच्या कथेमध्यें मानवी संस्कृतीच्या उगमाची आणि विकासाची छटा अगर रहस्य दडलेलें दिसून येतें. उदाहरण म्हणून शंकर आणि पार्वती यांच्यामध्यें चर्चा चालू असतांना मानवी मनाची जी चांचणी-परीक्षा झाली, तिची पुढील कथा पाहण्यासारखी आहे.

आटपाट नगर होतं. गंगामाईला हसूं फुटलं होतं. वाऱ्यानं पायांत पैंजण घातले होते. कोकिळेला कंठ फुटला होता. धरणीचं अंगण झाडाझुडांना खेळायला पुरत नव्हतं. अशा वेळीं पुण्य पदरांत पडावं म्हणूण गंगेच्या स्नानाला माणसाची रीघ लागली होती. पार्वतीनं हें पाहिलं. तिला पापपुण्याचा अर्थ ही माणसांची गर्दी बघून कळेना. तिनं शंकराला विचारलं, " देवा, इकडे एक विचारूं का? " शंकर हंसला, कौतुकला. म्हणाला कसा, " विचार. वाटेल तें विचार देवी. " तशी ती म्हणाली, " देवा, पुण्य पदरांत पडावं म्हणून गंगेचं स्नान हीं माणसं रोज कां बरं करतात? "

त्यावर शंकरांनीं शब्दांनीं उत्तर दिलें नाहीं. "चल, प्रत्यक्ष तुला दाखवतोंच" असें म्हणून त्यांनीं तिला धरणीवर आणली. गंगेच्या कांठाला पार्वती बसून राहिली. तिला शंकरांनीं सगळें नीट पारखून घ्यायला सांगितलं. स्वत: भिकाऱ्याचा वेष घेतला. एका खोल खड्डयांत त्यांनीं आपलं अंग झोकून दिलं. केविलवाण्या नजरेनं जो येईल त्याला हांक दिली, " मला वर काढ; देव तुझं भलं करील. " पण ती हांक ना कुणीं ऐकली ना कुणीं तिकडे लक्ष दिलं. पुष्कळ तेथून आले-गेले. तुसडेपणानंच सर्वांच्या नजरा माखलेल्या. अखेरीस एक तरुण माणूस नदीवर

स्नानाला निघाला होता. त्यानं शंकराची हांक ऐकली. हातांतलं धोतर तिथंच टाकून त्यानं त्या खड्डयांत उडी टाकली. भिकाऱ्याच्या वेषांतल्या शंकरांना त्यानं वर काढलं. त्या घटकेला शंकरांनीं मूळ रूप घेतलं आणि त्या भल्या माणसाला अशीर्वाद दिला, " तुझं चांगलं होऊं दे. "

त्यावेळीं पार्वतीला जवळ बोलून ते म्हणाले, " हा माणूस खरा पुण्यवान्. याचं नांव पुरुषोत्तम. बाकीचे सारे ढोंगी. समजला पापपुण्याचा अर्थ देवी ? " पार्वतीनं सर्व समजल्याचं मान हालवून सांगितलं. तिला आनंद झाला. तसा तो तुम्हां आम्हांला होवो. आमची कहाणी संपली. तुमची तहानभूक हरली.

लोककथांमध्यें राजाराणींच्या गोष्टी फार आणि सारें वातावरणहि अद्‌भुत रम्य ! तशांत जुन्या काळीं राजाराणींचें वेड लोकांच्या मनांत भरपूर आणि आजच्या काळांतहि ती ओढ अद्याप फारशी कमी झालेली नाहीं ! त्यामुळें घरगुती भाषेंत जिव्हाळ्यानें सांगितलेली राजाराणीची कथा ऐकणाराच्या मनाची पकड घेते आणि ऐकतां ऐकतांच त्याच्या मनांत पक्की राहून जाते.

उदाहरण म्हणून " एक होता राजा " ही पुढील लोककथा या संदर्भात पाहण्यासारखी आहे—

आटपाट नगर होतं. तिथं एक राजा होता. तो मोठा विद्वान, उदार मनाचा आणि पराक्रमी होता. तरुण होता. देखणा होता. पण त्याला गादीवर येऊन बरेच दिवस झाले तरी तो विवाह करण्यास राजी नव्हता. लोकांना मोठी चिंता वाटली, ' राज्याला वारस कसा मिळणार ? " राजाची त्यांनीं फार समजूत घातली. ' होय ' ' नाहीं ' करतां करतां शेवटीं तो तयार झाला. पण त्यानं एक अट घातली कीं, ' मला आवडेल त्याच मुलीशीं लग्न करीन ' लोकांना ही अट मंजूर नव्हती. आजवर तसं कुणीं केलं नव्हतं. पण त्यांनीं होकार दिला.

राजानं सर्वांना हुकूम दिला. लग्नाचा थाट सुरू झाला. दरबारचे मानकरी नटून सजून जमा झाले. हत्ती, घोडे शृंगारले. राजा अंबारींत बसला, म्हणाला, ' चला. ' कुठं जायचं हें कुणाला माहीत नव्हतं. तरीपण चालले. पुढं निम्मे लोक. मध्यें राजा. मागं उरलेले. असे सगळेजण निघाले.

होतां होतां राजा अरण्यांतून चालला. लोकांना नवल वाटलं. ते म्हणाले, ' हा काय झाडाशीं का लग्न करणार ? त्यांना चिंता वाटली. पण बोलायची सोय नव्हती. राजा जाईल तिकडे जाणें भाग होतें. शेवटीं एका मोठ्या सरोवराजवळ ते आले. तिथं एक चांगली बाग होती. झाडाला झोपाळा टांगला होता. त्यावर एक म्हातारा बसलेला. लोक म्हणाले, ' राजा याच्याशीं लग्न करणार कीं काय ? ' म्हणून पुढंच निघाले. पण राजा तिथं थांबला.

एवढ्यांत एक मुलगी त्या म्हाताऱ्याजवळ आली. नक्षत्रासारखी होती. गुणाची खाण होती. बापाची सेवा करीत होती. राजाला तें माहीत होतं.

शिकारीच्या निमित्तानं तिथं तो आला होता. त्यानं तिला लाखदां बघितली होती. त्या कारणानें राजानें म्हाताऱ्याला साष्टांग नमस्कार घातला. हात जोडून म्हणाला, " तुमचा जावई व्हावं ही इच्छा आहे. आशिर्वाद द्यावा. "

म्हाताऱ्याला परम हर्ष झाला. पण तो कोणी फाटका माणूस नव्हता. मोठा साधुपुरुष होता. त्यानं धर्मांचा अभ्यास केलेला. राजाची परीक्षा घ्यावी म्हणून त्यानं विचारलं, " मी गरीब, माझी मुलगी तुला कशी शोभावी राजा ? " तसा राजा म्हणाला, " माझं तुमच्या मुलीवर प्रेम जडलं आहे. करीन तर हिच्याशींच लग्न करीन. याउप्पर आपली मर्जी."

म्हाताऱ्यानं राजाची विनंती मान्य केली. त्याच्याच तालमींत तयार झालेल्या मुलीनंहि होकार दिला. म्हाताऱ्यानं राजाला आपली मुलगी अर्पण केली. पण कन्यादानाला जवळ कांहीं नव्हतं. त्यानं राजानं आणलेलीं उंची वस्त्रं व दागिने घालून आणलेल्या करंड्यांत मुलीचे पहिले फाटके तुटके कपडे तेवढे बरोबर घालून दिले. मुलगी नवी राजदरबारी वस्त्रं व अलंकार घालून राजाबरोबर निघाली. राजाचा आनंद गगनांत मावेना. एक नोकर म्हाताऱ्याच्या सेवेला ठेवून तो राजधानींत परत आला.

राजानं ह्या सुंदर मुलीशीं लग्न केलं. पण इतर राजेरजवाड्यांना तें पसंत पडलं नाहीं. ' भिकाऱ्याची मुलगी केली ' म्हणून सर्वांचा रागराग.

पण नवी राणी देखणी होती. स्वभावानं गुणी होती. सदा शांत, नेहमीं हंसतमुख, बघावं तेव्हां हुषारींत. आळस कसला तो नाहींच. तिनं लोकांचीं मनं तेव्हांच काबीज केलीं. तरी पण आपल्या भोंवतीं कसलीहि परिस्थिती निर्माण झाली, तरी राणीनं आपल्या मनाचा तोल ढळूं द्यायचा नाहीं असा बेत पक्का केला.

त्यानंतर एक दोन वर्षानंतरची गोष्ट. राणीला मुलगी झाली. दिसायला फारच सुरेख. राजाराणीला आस्मान ठेंगणं झालं. त्यांचा आनंद पोटांत मावेना.

पण ती मुलगी चार पांच वर्षांची झाली नाहीं तोंच राज्यावर संकट आलं. राजा काळजींत पडला. ही मुलगी इतर राजांच्या डोळ्यांत खुपतेय असं त्याला वाटलं. तिला मारून टाकली नाहींतर धडगत नाहीं असं त्याला दिसून आलं. त्यानं भीत भीत राणीजवळ ही गोष्ट काढली. त्याची समजूत, राणी घाबरेल. ' नाहीं ' म्हणेल. पण तसं झालं नाहीं. तिनं बापाजवळ वेदांताचं शिक्षण घेतलं होतं. तिची वृत्ति थोडीसुद्धां बदलली नाहीं. उलट हंसतमुखानं ती राजाला म्हणाली, " ज्या मंगल दिवशीं मी आपली झालें त्याच वेळीं तुमच्या इच्छेला मान दिला. आपल्या शब्दाबाहेर मी नाहीं. "

राजानं रातोरात आपली मुलगी मारेकऱ्यांच्या हवाली करून जंगलांत नेऊन मारण्याचा हुकूम दिला !

त्यानंतर तीनचार वर्षांत राजाला एकामागून एक असे दोन मुलगे झाले. त्यांचीहि त्या मुलीसारखीच गत झाली. पण तेवढ्यानं भागलं नाहीं. आसपासच्या लोकांचा असंतोष कायमचा थांबावा म्हणून त्या राजानं राणीला देखील राज्याबाहेर हाकलून देऊन दुसरं लग्न करण्याची गोष्ट राणीला ऐकवली. आतां मात्र राणीच्या सहनशीलतेनं कमालमर्यादा गांठली. राजाला वाटलं ती आकांत करील. पण नाहीं. ती एवढं होऊनहि प्रसन्नच राहिली. वडिलांच्या घरचे फाटके कपडे घालून ती सरळ बापाकडे निघून आली. बापाला तिनं झाला प्रकार सांगितला. ‘ हरकत नाहीं. तू इथं ऐस. मी आहें. ’ बापानं असं बोलून आनंदानं तिचं स्वागत केलं. राजाचा नोकर परत धाडला. दोघेजण पहिल्यासारखे सुखांत राहूं लागले.

त्यानंतर कितीतरी दिवस आले आणि गेले. मग मात्र राजानं दुसरी राणी घरांत आणायचा बेत केला. पण त्या देशाची चाल होती कीं, नव्या राणीनं पहिल्यांदां पहिल्या राणीच्या समोर जायचं, उंची वस्त्रालंकारांची तिला भेट द्यायची आणि तिच्या संमतीनं लग्न करायचं. राजानं हा बेत आंखला. नव्या राणीला पसंत केली. पहिलीच्या स्वागताची तयारी केली. आणि मग तो पहिल्या राणीला भेटायला गेला. तिची क्षमा मागायला गेला. पण पहातो तों ती पूर्वीइतकीच आनंदांत ! त्याला नवल वाटलं. त्यानं अशानं अशी गोष्ट आहे हें वर्तमान तिच्या कानावर घातलं. राणी आनंदानं त्याच्याबरोबर आली. ती खरी पतिव्रता होती. राजाचा शब्द तिनं झेलला.

राजधानींत नव्या राणीकडून मोठ्या थाटानं जुन्या राणीचं स्वागत झालं. जुन्या राणीनं मोठ्या प्रेमानं नव्या राणीला आलिंगन दिलं. एकीपेक्षां एक दिसायला सरस होती. म्हणून कुणी कुणाचा हेवा केला नाहीं. दोघी आनंदानं वाड्यांत आल्या.

त्यावेळीं लग्न लागायच्या आधीं समस्त राजेलोकांना एक थाटाची मेजवानी राजानं दिली. जुनी राणी आपुलकीनं सर्वत्र वावरली. मायेनं तिनं सर्वांचं आगत स्वागत केलं. तिची माया बघून जमलेल्या लोकांच्या मनांत तिच्याविषयीं आदर निर्माण झाला. ह्या सोन्यासारख्या राणीला आपण उगाच छळलं असा पस्तावा होऊन ते कष्टी झाले; पण राणीनं त्यांची समजूत घातली.

एवढ्यांत नव्या राणीचा पिता उठून उभा राहिला. म्हणाला, “ लोक हो, ऐका. ही राणीच या राज्याची खरी राणी आहे. नवी राणी ही तिची मुलगी आहे. ऐका हो ऐका... ” हें ऐकून राजालाच काय पण सर्वांनाच मोठा चमत्कार वाटला. प्रत्येकानं एकमेकांकडं आश्चर्यानं बघितलं. तोंडांत बोट घालून सर्वांनीं म्हाताऱ्याला कान दिला. नव्या राणीचा बाप पुढं म्हणाला, “ लोक हो, राजानं तुमच्या आमच्या वेड्या कल्पनेसाठीं आपलीं जीं मुलं ठार मारण्यासाठीं मारेकऱ्याजवळ दिलीं तीं मीं सांभाळलीं आहेत ! ही नवी राणी ही राजाची

पहिली मुलगी, हे दोन तिचे भाऊ, राणीच्या हवालीं या सर्वांना करतांना मी धन्य होत आहें. माझं काम संपलं. "

झाला प्रकार सर्वांना उमजला. राजाराणीनं मोठ्या प्रेमानं मुलांना आलिंगन दिलं. सर्वांचा आशीर्वाद घेतला. ते सगळे सुखानं एकत्र राहूं लागले. राजाला वारस मिळाला. लोकांना पराकोटीचा आनंद झाला. राणीचं सर्वांनीं कौतुक केलं. सगळीकडे आनंदी आनंद झाला. हा आनंद तुम्हां आम्हालाहि मिळो.

अशा प्रकारच्या अनेक लोककथांचें जर आपण विश्लेषण करावयाचें म्हटलें तर एक गोष्ट ठळकपणें आपल्या ध्यानांत येते ती अशी कीं, अशा कथांच्यामधून अद्भुत चमत्कारांना भरपूर वाव दिला गेलेला आहे. आणि त्यामुळेंच कीं काय अशा कथांची गोडी पिढ्यान् पिढ्यांना वाटते आहे. एवढेंच नाही तर एकदां ऐकलें कीं, या कथा ऐकणाराच्या मनांत पक्क्या घर करून राहिल्या आहेत. मानवी मनाला त्यांनीं चटका लावून सोडला आहे.

धनगर मंडळींच्याकडून मोठ्या ढंगदार रीतीनें वरचेवर ऐकायला मिळणारी " मल्हारीची बानू " ही लोककथा एक अद्भुतरम्य कथा म्हणून इथें अवश्य पहाण्याजोगी आहे. ही कथा अशी—

तशी ही कहाणी जुनी. कितीक डुयांनीं ऐकलेली. लाख मुखांनीं सांगितलेली. आभाळांतल्या देवाघरची. देवांच्या राजाची. इंद्राची न् त्याच्या धाकल्या लेकीची.

एकदां काय झालं, इन्द्र देवानं आपल्या साती लेकींना जवळ बोलावलं. शेजारीं बसवून घेतलं. एकेकीला म्हणाला, " बाईग, तुझा जन्म कुणाच्या जिवावर ? " तशी पहिल्या सहाजणी आपापली पाळी आल्यावर म्हटल्या कशा, ' बाबा, आम्ही सगळ्याजणी तुमच्याच जिवावर जगायच्या कीं ! ' पण सातवी धाकली लेक मोठी बिलंदर. खाड्दिशी म्हणाली, ' अंहं ! मी कुणाच्या जिवावर नाहीं जगायची. माझी मी एकली जगीन. स्वतःच्या शिरावर जगीन. '

धाकल्या लेकीचं असं बोलणं इंद्राला झोंबलं. त्याच्या अंगाची लाही झाली. संतापानं त्याचं मस्तक भडकलं. अंगाचा थरकांप उडाला. त्यानं फाडकन् तिच्या मुस्काटांत दिली. म्हणाला, " कार्टे ऽऽ एकली जगणार काय ? " आणि दांतओठ खात त्यानं तिला शाप दिला. एकाएकीं आभाळ दणाणलं. वीज कडाडली. चांदण्या लकाकल्या. धाकली लेक चार महिन्यांचं मूल झाली. उभी होती ती अवचितच हाताच्या मुठी चोखीत पाळण्यांत पडली. टकामकां बघूं लागली.

पण इंद्राचं तेवढ्यानं भागलं नाहीं. चार महिन्यांच्या या पोरीला त्यानं एका पेटींत घातली. पेटीला मोहोर ठोकली. जासुदाला ती घेऊन जा म्हणाला. चंदनपूरच्या जंगलांत सोडून दे म्हणाला. तशी जासूद घाबरला. पण करतोय काय ? हुकूम झाल्याला पाळलाच पाहिजे. मुकाट्यानं ती मोहोर केलेली पेटी घेऊन

तो निघाला. ढगांची लाखों पायऱ्यांची शिडी उतरून धरणीवर आला. सात सागर ओलांडले. वनामागून वनं ओलांडलीं. अठींग्या वनांतलं चंदनपूरचं जंगल त्याला गवसलं. त्यानं विचार केला, " एवढी बारकी पोर ह्या जंगलांत सोडावी तरी कशी ? " त्याचं मन पोरीभोंवतीं घुटमळलं. त्या पेटीकडं बघत राहिला. एवढ्यांत माणसांची चाहूल त्यानं ऐकली. मन घट्ट केलं. पेटीला पोटाशीं धरून खालीं ठेवली. " म्हातारी हो " म्हणाला. आणिक जड मन बाळगूनच आला तसा माघारीं वळला.

इकडे तोंवर धनगर मंडळी मेंढ्या चारायला घेऊन आलीं. "बें बें" करीत इकडे तिकडे अवखळपणानं हुंदडणाऱ्या मेंढरांना त्यांनीं आपापल्या टोळक्यांत जमा केलं. आणि आतां ठराविक ठिकाणीं त्यांना चरायला सोडून स्वतः एखाद्या झाडाखालीं विसांवा घेणार, तर त्यांच्यापैकीं एकानं ती पेटी पाहिली. झालं. एकामागून एक हांका देत त्यानं सगळे लोक जमा केले. सर्वांना त्या पेटीबद्दल कुतूहल वाटलं. ' होय ' ' नाहीं ' करीत, शंकाकुशंका काढीत, त्यांनीं अखेरीस ती पेटी जवळ घेतली. देवाचं नांव घेऊन तिची मोहोर काढली. उघडून बघितलं. पहातात तर आंत एक सुंदर बाळ. गोजिरवाणं. देखणं पोर. त्याचं तेज त्यांच्या डोळ्यांत मावेना. पहिल्यांदां सगळीजणं ' हा काय चमत्कार ' म्हणून टकामकां एकमेकांकडे बघत राहिलीं. पण नंतर त्यांना फार आनंद झाला. देवाची देणगी वाटली. मनांतून ते भारी हारखले. त्यांनीं ढोलनाच करीत वाजत गाजत तें बाळ आपल्या म्होरक्याच्या घरीं नेलं. मोठा उत्सव केला. दाबून जेवणं खावणं घातलीं.

होतां होतां तें बाळ लहानाचं मोठं होत गेलं. सर्वांची त्याच्यावर माया. प्रत्येकाचा त्याच्यावर लोभ. त्यांनींच बाळाचं नांव ठेवलं बानू. पोटच्या मुलासारखी तिची सर्वांनीं जोपा केली.

आणिक मग एक दिवस बानू मोठी झाली, तेव्हां तिच्या लग्नाचा विचार सर्वांच्या मनांत आला. जो तो आपल्या ओळखीनं तिला नवरा बघूं लागला. एकदां तर त्यांनीं देवाचं ' सुंबरान ' मांडलं ! रात्रभर ढोलनाच केला. ' हिला चांगला नवरा मिळवून दे ' असा बिरुबा देवाला वर मागितला. पण बानू मोठी हुषार. सगळ्यांला गोळा करून म्हटली कशी, " तुम्हांला माझी काळजी नको. माझं लगीन आपोआप होईल. वेळ येऊं दे. मी तोंवर शंकराची पूजा बांधतें. " लोक गप्प बसले. तिचं म्हणणं त्यांनीं डावललं नाहीं.

त्यानंतर चांगलीं बारा वर्षं तरी तशींच आलीं आणिक निघून गेलीं ! बानूची पूजा अखंड चालू होती. पण त्याच्या पुढच्या वर्षी शंकर बानूला प्रसन्न झाला. माणसाच्या रूपानं तिच्यासमोर उभा राहिला. तिनं शंकराला पाहिलं. ती हारखली. देहभान विसरली. देवाच्या पायावर तिनं लोळण घेतली. शंकर म्हणाला, " वर माग. तुझी इच्छा पुरी होईल." तशी ही म्हणाली, " चांगला

नवरा दे. गुणानं चांगला. मनानं चांगला. रूपानं चांगला. सगळ्यांत सगळा. असा नवरा दे." देव म्हणाला, "तथास्तु. तुझी इच्छा पुरी होईल." आणि त्यानं तिला सांगितलं, "समोरच्या खडावांवर उभी रहा. तुला पाहिजे त्या ठिकाणीं चल म्हण. माझं नांव घे. खडाव तुला घेऊन जातील."

शंकराच्या म्हणण्याप्रमाणं झालं. बानू खडावांवर उभी राहिली. तिनं त्याचं नांव घेतलं. कायसंसं पुटपुटली. खडावांनीं तिला एकदम उचलली. आभाळांत नेली. सात वनं ओलांडलीं. सात नद्या ओलांडल्या. आणि जेजुरीला ते तिला घेऊन आले.

त्यावेळीं मल्हारी आणिक म्हाळसा आपल्या रंगमहालांत निजले होते. बानूनं तें पाहिलं. विचार केला. घटकाभर तिथंच उभी राहिली. लुगड्याचा पांढरा पदर फाडला. हाताच्या बोटानं डोळ्यांचं काजळ काढलं. पत्रिका लिहिली. मल्हारीला निरोप ठेवला. भेटायला ये म्हणाली. पुन्हां खडावांवर पाय ठेवले. माघारीं गेली.

इकडे तोंवर मल्हारी उठला. त्याच्या हातांत ती पत्रिका आली. त्यानं बघितली, वाचली. तो हारखून दुम्म झाला. मोत्यासारखं अक्षर. मनाला भुरळ पाडणारी भाषा. एवढा मोठा जेजुरीचा देव पण वेडा झाला. 'बानू...बानू' करीत सुटला. खुळाभैरा झाला. परंतु त्यानं विचार केला कीं, ह्या म्हाळसाचा डोळा चुकवून जावं कसं? पण युक्ति सांपडली. सारीपाट खेळायचा त्यानं बेत केला. आणि म्हाळसाला अट घालीत म्हणाला कसा, "माझ्यासारखे फासे पडले तर तूं बारा वर्षं कच्च्या घागरीनं माझ्या घरीं पाणी भरलं पाहिजेस. आणि तुझ्यासारखे फासे पडले तर मी बारा वर्षं वनवास भोगीन. जंगलांत जाईन." म्हाळसा सारीपाट खेळण्यांत पट्टीची होती. तिनं ही अट कबूल केली. खेळायला बसली. आणि तिनं डाव पण जिंकला! सारखे तिचेच फासे पडत गेले!

झालं. ठरला शब्द मल्हारीनं पाळला. तो बारा वर्षं वनवासाला निघून गेला. म्हाळसा कष्टी झाली. पण मल्हारी आनंदाला. बानूला भेटायला उत्सुक झाला. त्याच्या मनासारखं झालं.

वनवास भोगायला म्हणून मल्हारी निघाला तर भुलेश्वराचं त्याला वाटेंत दर्शन झालं. थांबला. त्यानं भुलेश्वराला दंडवत घातला. नव्हे तो भुलेश्वर म्हणजे देवांचा गुरु. त्याला सोडून हा पुढं जाईल कसा? मनची गोष्ट त्याला सांगितल्याबिगर राहील कसा? भुलेश्वरानं ह्याचं म्हणणं ऐकलं. आशीर्वाद दिला. म्हणाला, "हा राजवेष सोडून दे. चाळीस पंचेचाळीस वर्षांचा हो. धनगराकडे चाकरी कर. इमानानं वाग. मनासारखं होईल."

मल्हारीनं भुलेश्वराचा शब्द पाळला. टाकोटाक चंदनपूरला आला. धनगराकडे चाकरी धरली. सातशें मेंढ्या न् सातशें शेळ्या सांभाळीत राहिला.

या शेळ्यामेंढ्यांची मालकीण बानू होती. त्याला पाहिजे तें मिळालं. दैवी लीला तो खेळूं लागला. भंडारा पणाला लावून हां हां म्हणस्तोंवर एवढं मोठं काम एकटा करूं लागला. सगळ्यांनीं तोंडांत बोटं घातलीं. पण कुणाला कांहीं उमजलं नाहीं. समजलं नाहीं.

पुढं मग एकदां काय झालं कीं, मल्हारी हीं एवढीं भल्या संख्येची शेळ्या मेंढरें घेऊन नदीवर धुवायला गेला. तिथं एकाचीं दोन, दोनीचीं चार अशीं होतां होतां नऊ लाख मेंढरं जमलीं ! ह्यानं त्या सगळ्यांना जिवंत सोलून काढलं ! मांस एकीकडं केलं. रक्त एकीकडं ठेवलंन्, हाडं एकीकडं मांडलीं !

इतक्यांत बानूला ही बातमी कळल्या कारणानं ती मोठ्या रागारागानं तिथं आली. तिनं मल्हारीला बोल बोल बोलून घेतलं. रागानं तिच्या अंगाचा थरकांप उडाला. तशी मल्हारी तिला म्हणाला, "तुझं सारं होतं तस्सं करतों. पण एक अट कबूल कर." त्यावर ती म्हणाली, "अट कसली ?" हा म्हणाला, "माझ्याशीं लग्न कर." तशी ही हाबकलीच ! न्हवं नाहीं त्याच्याशीं ती लग्न करील तरी कशी ? पण एवढं मोठं नुकसान होण्यापेक्षां तिनं ही अट कबूल करावी म्हणून कितीकांनीं तिला गळ घातली. आणि तिच्या कानांत त्यांनीं हळूंच सांगितलं, "आतां हो म्हण. मेंढरं मिळालीं कीं देऊं त्याला हाकलून."

अखेर शेवटीं बानूनं मल्हारीची अट मानली. तेव्हां हां हां म्हणतां मेंढरं जशींच्या तशीं अगदीं उगळीं निगळीं, पहिल्याप्रमाणं झालीं ! आणि मग लगोलग मल्हारी तिचा हात धरून म्हणाला, "चल आतां माझ्या बरोबर !" तशी बानूनं ढीग त्याची समजूत घातली. पण ह्याचा हेका कायम. शेवटाला तिचा नाइलाज झाला. ती त्याच्याबरोबर जायला कबूल झाली.

आणि काय चमत्कार बघा ! मल्हारीनं आपलं खरं रूप धारण करून तिला जेव्हां कां आपल्या घोड्यावर घेतली, तेव्हां तिला कोण आनंद झाला म्हणतां ! सगळ्या धनगरांना बोलावून तिनं लग्नाची तयारी करा म्हटलं. रहात होती त्या वाड्यांत राजीखुषीनं मल्हारीशीं तिनं लग्न लावून घेतलं. मोठं थाटांत लग्न झालं. लोकरीच्या माळेनं, तांदळाच्या अक्षतेनं सर्वांसमक्ष लग्न लागलं.

नंतर थोडे दिवसांनीं मल्हारीनं बानूला पहिल्यांदां भुलेश्वराकडे आणली. आणि शेवटीं तिला जेजुरीला घेऊन आला. मल्हारीला बघून म्हाळसा हारखली. पंचारती घेऊन ओवाळायला धांवली. पण मल्हारीच्या पाठीशीं असलेली बानू बघून ती थबकली. तिच्या हातांतलं तबक ढासळलं. तशी मल्हारी म्हणाला, "ही माझी बायको न् तुझी सवत आहे." म्हाळसाच्या अंगाचा तिळपापड उडाला. रागानं ती लाल झाली, आणि डोंगरावर जाऊन मोठी शिळा होऊन पडली ! मल्हारीनं तिची खूप समजूत घातली पण उपयोग झाला नाहीं. शेवटीं त्यानं तिला अर्ध्या डोंगराची मालकीण केली. अर्धा डोंगर बानूला दिला; आणि स्वतः वर देवळांत

राहिला. दोघींच्या अंगावर आपला भंडार त्यानं उधळला, आणि बानू मिळाली या आनंदांत तिच्याशीं सुखाचा संसार केला.

आमची कहाणी संपली. तुमची तहानभूक हारपली.

आजच्या काळांतहि माणसांना कहाणीचें वेड आहे. परंतु आजचा काळ पूर्वीच्या मानानें फार बदललेला आहे. त्यामुळें माणसांची कहाणीबद्दलची अभिरुची बदलत चालली आहे. नव्या युगमानाप्रमाणें सभ्यतेच्या कल्पना आज बदलत चालल्या आहेत. सुधारणांच्या गर्दीत माणूस गुरफटून गेला आहे. त्यामुळें जुन्या काळच्या कहाणींचें महत्त्व या नव्या युगांतील मानवी मनाला तितकेसें वाटत नाहीं, असें म्हणावें लागतें. अद्‌भुतरम्य वातावरणाचा पगडा मानवी मनावर अजूनहि असला तरी दिवसेंदिवस सत्यसृष्टीकडे त्याचा कल झुकतो आहे. रोजच्या जीवनावर आधारलेल्या लघुकथा आणि चारसहा ओळींत संपणारी लघुतम कथा आज विशेष लोकप्रिय होत चालली आहे.

पूर्वीच्या जमान्यांतील मानवी मनाला गोंधळ्यांचेकडून, शाहिरांचेकडून, हरदासांचेकडून अगर रोजच्या बैठकींतील माणसांकडून रात्ररात्रभर कथा वा कहाणी ऐकण्याची चटक लागलेली असे; परंतु आज जीवनाबद्दच्याच कल्पना निराळ्या झाल्यानें ती शक्ति मानवांत उरलेली दिसत नाहीं. सारें कांहीं आज आटोपशीर हवें आहे. पूर्वीच्या दीर्घ काळ अखंडपणें चालणाऱ्या कथा आज नाहींशा होत चालल्या आहेत; आणि ज्यांच्या कंठामध्यें साहित्यलक्ष्मीचें नवमांगल्य दृष्टोत्पत्तीस येत होतें, त्या व्यक्तिदेखील आज दिनप्रतिदिन कमी होत चाललेल्या आढळून येतात. पांढऱ्या कागदावर लिखित झालेल्या भावनाविष्काराची मिजास आज एवढी वाढली आहे कीं, पाठांतराचे बळावर जन्मोंजन्मीं टिकलेलें अलिखित वाङ्मय त्यापुढें फार फिकें पडतें आहे ! त्यामुळें आमची जुनी संस्कृति, चालरीत आणि वाडवडिलांचें भावधन आमच्या चालू पिढीलाहि म्हणावें तसें अवगत होऊं शकत नाहीं. नव्या युगामधील नवकल्पनांचा अवश्य स्वीकार व्हावा; परंतु त्याजबरोबर जुनें साहित्यिक धनहि भरघोसपणें जवळ असावें यांत शंका नाहीं.

स्त्रियांच्या अलिखित वाङ्मयाचें स्वरूप हें असें आहे. गद्य आणि पद्य हे दोन्ही प्रकार या वाङ्मयांत समाविष्ट झालेले आहेत. स्त्रियांच्या भावना या अलिखित वाङ्मयांत अतिशय मोकळ्या मनानें आविष्कृत झालेल्या आहेत. ओवीमध्यें तर स्त्रीनें आपल्या अंतःकरणांतील सारी भावना ओतलेली आहे. मनांतील भावनेचा होणारा सहजसुंदर आणि उत्कट आविष्कार इतक्या आत्मियतेनें प्रकट झालेला इतरत्र क्वचितच आढळून येईल. उत्तम काव्याचे सारे गुण या ओवींत ओतप्रोत भरलेले दिसून येतात. या ओव्या हें मराठीचें एक अभिनव लेणें आहे यांत शंका नाहीं. स्वतःच्या भावना स्वतःच्याच भाषेंत आणि कल्पनेंत गोवून

महाराष्ट्राच्या संस्कृतीचें प्रतिबिंब दर्शविण्याचें महान् कार्य स्त्रियांनीं या ओव्यांच्या द्वारें पार पाडलेलें आहे.

उखाणा हा स्त्रीजीवनांतील एक महत्त्वाचा भाग आहे. कोणतीहि अभिमानाची अगर आनंदाची गोष्ट दुसऱ्याला; सांगण्यांत आपला आनंद दुणावतो; आणि त्यामुळेंच आपल्या पतीचें नांव दुसऱ्याला सांगण्यांत बायकांना आनंद वाटतो. हा आनंद स्त्रियांनीं उखाण्यांच्या द्वारें पुष्कळ उपभोगला आहे असें दिसून येतें. त्याचप्रमाणें उखाणा घेणाऱ्या स्त्रीची कल्पकता, समयसूचकता, धीटपणा, मनावरील संस्कारक्षमता आणि पतीबद्दलची आदराची भावनाहि अतिशय मोकळ्या मनानें ह्या उखाण्यांतून प्रकट झालेली आहे. "उखाण्याच्या द्वारें आपण आपल्या सर्वांत प्रिय माणसाची जमलेल्या मंडळींना ओळख करून देत असतों आणि या कामाला लागणारी सर्वांगीण सामुग्री हिंदुस्थानच्या मराठी खजिन्यांत ओतप्रोत भरलेली आहे. त्याकरितां परकीय भाषेची जरूरी नाहीं.*" अशीच स्त्रीची भावना असते व तिचा प्रत्यय अशावेळीं आल्याविना रहात नाहीं.

कहाण्यांच्या द्वारां स्त्रियांच्या धार्मिक व सामाजिक भावनांचा चित्ताकर्षक आविष्कार झालेला आहे. रोजच्या जीवनाशीं मोठ्या कौशल्यानें या कहाण्यांची सांगता करण्यांत आलेली आहे. त्यांत कसल्याहि प्रकारची कृत्रिमता आढळत नाहीं. सारें कांहीं सहजसुलभ झालेलें आहे. स्त्रियांच्या अंतःकरणांतील मृदुभाव येथें सर्वत्र विखुरलेला आहे. देवाची प्रार्थना करतांना मनाचा दिसून येणारा हळुवारपणा व जिव्हाळा, अंतःकरणांतील खरी तळमळ व सर्वोत्कृष्ट काव्यशक्ति हीं येथें प्रतीत झालेलीं दिसून येतात. ललित वाङ्मयाचा हा एक वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे.

जुन्या काळच्या स्त्रियांच्या ओठांवर खेळणारें हें अलिखित वाङ्मय म्हणजे त्यांच्या अंतःकरणांतून प्रामाणिकपणें व सहजसुंदर रीतीनें आविष्कृत होणारें असें मनोवेधक भावगीतच आहे. या भावगीताचें सौंदर्य शतकानुशतकें टिकणारें असून त्याची गोडीहि अवर्णनीय आहे. आपल्या भोळ्या भाबड्या कल्पनांनीं मराठी भाषेला भूषविणारी स्त्रियांची ही देणगी खरोखरच अभिमानास्पद आहे. मराठींत या वाङ्मयाला दुसरी तोड नाहीं इतकें तें वैशिष्ट्यपूर्णहि आहे, हें मागील विवेचनावरून ध्यानांत आल्याविना रहाणार नाहीं. मराठीचें खरें सौंदर्य व अभिजातता या वाङ्मयांत पहावयास मिळते आणि तेंच याचें प्रमुख वैशिष्ट्य होय.

प्रत्येक देशाला आणि त्या देशांतील प्रत्येक प्रांताला त्याचें स्वतःचें म्हणून लोकवाङ्मय असतें. या वाङ्मयांतून त्या प्रांताच्या लोकांच्या चालीरीती, त्यांचें

---

* सौ. पार्वतीबाई चितळे, उखाणे, गृहलक्ष्मी, १९२९ ऑगस्ट.

दैनंदिन जीवन आणि त्यांच्या संस्कृतीचीं वैशिष्ट्यें व्यक्त होतात. रोजच्या जीवनांतील सुखदुःखांना या वाङ्मयामुळें जिवाभावाची वाचा फुटते. काम करतां करतां, घाम गाळतां गाळतां आणि अश्रु ढाळतां ढाळतां ही भाषा जन्माला येते. आणि कधीं कधीं मनाला विरंगुळा म्हणून खदखदां हंसतांनाहि तिला सोहोर येतो. त्या कारणानें तिचें वास्तव्य जन्मोंजन्मींचें ठरतें. आणि म्हणूनच लोकगीतांतील कांहीं रूढींचा व आचार विचारांचा उगम वेदांत सांपडतो व त्या त्या चालीरीती त्या काळापासून कमी जास्त प्रमाणांत आजहि चालत आलेल्या दिसून येतात ! !

★

. ४ .

इतिहासकालीन पत्रव्यवहार

आपल्या पराक्रमी व कर्तबगार पूर्वजांचा वैभवशाली इतिहास समजावून घेण्यासाठीं आणि त्या काळची सामाजिक व राजकीय माहिती मिळविण्यासाठीं अनेक संशोधकांनीं आजवर परिश्रमपूर्वक प्रयत्न करून अनेक प्रकारचीं साधनें उपलब्ध केलेलीं आहेत. अद्यापहि हें काम चालू आहे आणि पुढेंहि तें चालूच राहील. तथापि उपलब्ध झालेल्या विविध साधनांच्यापैकीं सर्वांत महत्त्वाचें साधन म्हणजे त्या त्या वेळचा इतिहास घडविणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं केलेला पत्रव्यवहार होय. ह्या पत्रांच्यामधून वेळोवेळीं त्या वेळच्या सामाजिक व राजकीय घडामोडींचें दिग्दर्शन घडविणारी सत्य स्वरूपांतील माहिती आलेली आहे.

" राष्ट्राचा उत्कर्ष व्हावयाचा म्हणजे त्यास सर्व वर्गांचें भरपूर सहाय्य पाहिजे. इंग्रजी अंमलांत याविषयीं हिंदी राष्ट्राची मोठी आबाळ झाली. स्त्री वर्गाचा राष्ट्रकार्यांत उपयोग करून घेणें आवश्यक आहे. याची जाणीवच कोणासहि नव्हती ... पण मराठी राज्याच्या दोनशें वर्षांत स्त्रीवर्ग सर्वथा निश्चल होता असें मात्र कोणी समजूं नये. नुसतीं दोन ठळक नांवें जिजाबाई व झाशीवाली राणी लक्ष्मीबाई एवढ्यांनींच शंकितांची खात्री पटूं शकेल. जिजाबाईनें राष्ट्रास शिवाजी दिला. आणि लक्ष्मीबाईनें शिकस्तीचें शौर्य रणांगणावर गाजवून राष्ट्रोद्धारार्थ प्राणार्पण केलें. या दोन व्यक्तींमध्यें दोनशें वर्षांचें कालांतर असून तेवढ्या अवधींत आणखी शेंकडों स्त्रियांनीं भाग घेतला असें इतिहास सांगतो*."

आपल्या भारत देशाचा इतिहास तसा फार मोठा आहे. त्याचें स्वरूप उज्ज्वल आहे. अंतरंग स्फूर्तिदायी आहे. त्यामधील पराक्रम स्वाभिमानानें तळपणारा व तेजस्वी आहे. प्रचंड वीरश्रीनें भरून गेलेला आहे. हा इतिहास घडविण्याचें श्रेय प्रामुख्यानें पुरुष वर्गाकडे जात असलें, तरी त्यास कांहीं पराक्रमी स्त्रीयांनींहि हातभार लावलेला आहे. या पराक्रमी स्त्रियांनीं त्या काळांत जो पत्रव्यवहार केला आहे, त्याचाच प्रस्तुत प्रकरणामध्यें विचार करावयाचा आहे.

---

* गो. स. सरदेसाई. छत्रपति कुटुंबांतील नामांकित स्त्रिया. स्वराज्य. ८ जून १९५७.

" गेल्या शतकांतील स्त्रियांच्या इतिहासाचें अवलोकन केल्यास देश, काल, परिस्थितीप्रमाणें त्या कार्यतत्पर होत्या. हें सिद्धकरण्याला इतिहासाचा पुरावा भरपूर आहे. त्या कालीं घोड्यावर बसतां येणें ही एक प्रमुख कला समजली जात असे; व त्यांत उच्च घराण्यापासून सामान्य परिस्थितींतील स्त्रियांनाहि प्रवासांत घोड्याचा उपयोग करावा लागे. त्या काळीं सामान्य देशी भाषा व मोडी लिपी येवढ्यावर साहित्याचें कार्य भागत असे. याशिवाय राज्यकर्ता ज्यावेळीं जो असेल त्याची भाषाहि शिकावी लागत असे. कथा पुराणांच्या रूपानें राजकारण व समाजबंधनें स्त्रियांच्या कानीं पडत असत व पुरुषांना पराक्रमाची संधि मिळत असल्यामुळें नकळतच वीरपत्नीत्वाची जबाबदारी स्त्रियांवर पडत असे हें सिद्ध होतें !* "

याखेरीज कोल्हापूरची महाराणी ताराबाई, इंदूरची अहिल्याबाई होळकर, पेशवेकालीन सुप्रसिद्ध आनंदीबाई वगैरे अनेक स्त्रियांनीं स्वतःच्या पराक्रमानें इतिहासाचीं कितीक पानें रंगविलेलीं आहेत. ह्या स्त्रियांचे आचार व विचार कोणत्या प्रकारचे होते, याची कल्पना त्यांनीं लिहिलेल्या पत्रांवरून येते. त्या दृष्टीनेंच त्यांच्या पत्रांचा इथें विचार केलेला आहे.

जिजाबाई

शककर्त्या शिवाजी महाराजांची मातोश्री जिजाबाई हिची एक सनद सांपडली असल्याचा उल्लेख इतिहासांत आला आहे.‡ ही सनद जर खरी असेल तर त्या सनदेवरून जिजाबाईची दयार्द्रता दिसून येते. या थोर स्त्रीनें या सनदेंत व्यक्त केलेला भाव असा आहे—

" आज्ञापत्र सौभाग्यवती मातुश्री जिजाबाई भोसली मोकदम, कसबे जिंती परगणे श्रीगोंदे, कडेवलीत यांनीं दानपत्रें वतनावर वतनभाऊ आणि पुरातन चाकर एकनिष्ठ याजवर कृपाळु होऊन, इनाम जमीन सवा चावर बिघे १५० दीडशें राजश्री विसाजी रंगनाथ सोनटके कुळकर्णी कसबे मजकूर यांची स्त्री सौभाग्यवती भानाबाई यांजवर कृपाळु होऊन चोळी कांकणांस म्हणून जमीन नेहर शेरी नजीक शीव बाभुलगांव जमीन बिघे १२० एकशेंवीस वंशपरंपरेनें अनुभऊन सुखरूप राहणें. एकूण येणेंप्रमाणें दानपत्रें अजरामऱ्हामत निधि जल, तरु, पाषाण, चंद्र, सूर्य पावेतों अनभवीत जाणें.

* सौ. कमलाबाई किबे—प्रस्तावना, होळकर शाहींतील ऐतिहासिक स्त्रियांचा पत्रव्यवहार. खंड २२.

‡ सनदा पत्रें पृ. १०२, ३१ जाने. १६०५

राजश्री रंगो गणेश सोनटक्के कुळकर्णी कसबे मजकूर हे हिशेब मोहसब ह्मावयास किल्ले कोंडाणा, राजश्री दादो कोंडदेव यांचे घरीं भोजणास बोलाविले. भोजन करून खोलीमध्यें बिछाना करून निद्रा केली. पांचसहा घटका जाहलीयावर, अंगाची आगी जाहली. पाणी पाणी करून खोलींत प्राण गेला. खोलीस बाहेरून कुलूप होतें. दुसरे दिवशीं खोलीचें कुलूप काढून पाहिलें तों मृत पावले. प्राण निघोन गेला. असें वर्तमान जाहलें. याजकरितां साहेब कृपाळु होऊन, दान-पत्रें इनाम करून दिल्हीं असे. कदीम सेवा केली आहे. भोंसले यांचे वंशीं कुटुंब दाखल यांचें चालवोन, जे कोणी अंतर करील त्यास श्रीवाराणसीची शपथ असे.

शके १५२६ सिध्यर्थीनाम संवत्सरे, माघ शुद्ध सप्तमी रविवार लेखन सीमा."

जिजाबाईच्या या भाषेवरून स्त्रियांच्या जीवनांत असलेली देवादिकांच्या शपथेची किंमत व चोळीबांगडीच्या तरतुदीचें महत्त्व, त्या काळांतहि किती असे, याची कल्पना येते. शिवाजीसारखा महान् पराक्रमी पुरुष महाराष्ट्राला देणारी जिजाबाई आपल्या राज्यांतील मंडळीची किती आपुलकीनें विचारपूस करीत असे व त्यांना किती जिव्हाळ्यानें वागवीत असे, हेंहि यावरून आढळून येतें.

• • •

येसूबाई

छत्रपति शिवाजी महाराजांच्या सुना—संभाजीची पत्नी येसूबाई व राजारामाची पत्नी ताराबाई--या दोघी छत्रपतींच्या घराण्यांतील दोन विशेष पराक्रमी स्त्रिया होऊन गेल्या. त्या दोघीहि राजकारणांत प्रामुख्यानें चमकल्या आहेत. "त्यांच्या कर्तृत्वानेंच मराठ्यांनीं औरंगजेबाचा संपूर्ण उच्छेद करून कठीण प्रसंगांतून राज्य बचाविलें. येसूबाईची योग्यता मोठी आहे. संभाजीच्या कोपास आळा घालून या थोर बाईनीं बहुमोल राष्ट्रसेवा केली. स्वतः भीषण कष्ट सोसून केवळ राज्याचें हित साधणें हा तिचा कित्ता राष्ट्राला चिरंतन मार्ग दाखवील. स्वतः ती अत्यंत निरहंकार, आपल्या जिवाची किंवा हाल अपेष्टांची क्षिति तिनें कधीं बाळगली नाहीं. अठरा वर्षें तिनें तीनशेंचा परिवार घेऊन बादशाही कैदेंत निभावलीं. इकडे बादशहाची मर्जी सांभाळणें आणि दुसरीकडे मराठी राज्य टिकविणें हीं दोन्ही विरोधी कृत्यें तिनें मोठ्या शिताफीनें सिद्धीस नेलीं. जन्मभर यातना भोगल्या. रायगड किल्ला मोंगलांच्या हातीं पडणार असें दिसतांच तिनें स्वहिताचीहि पर्वा न ठेवतां दीर राजारामास जिंजीस रवाना केलें आणि मराठा मंडळास उत्तेजन देऊन बादशहाचा अप्रत्यक्षपणें पाडाव करविला. आकाश कोसळलें तरी धीर सोडला नाहीं. मोठी युक्तिबाज बाई. संकटास तोंड देण्याची तिची हिंमत अप्रतिम म्हटली पाहिजे...तिचें समग्र जीवन राष्ट्रकाजांत खर्च झालें. औरंगजेबाच्या मृत्यूनंतरहि

दहाबारा वर्षें तिला ओलीस म्हणून दिल्ली येथें कष्टांतच काढावीं लागलीं. शेवटीं पेशवा बाळाजी विश्वनाथ व पुत्र बाजीराव यांनीं दिल्लीवर स्वारी करून या थोर बाईला सोडवून परत मायभूमींत आणली, हाच एकंदर मराठा मंडळाचा पहिला ऐतिहासिक विजय होय. ‡"

अशा थोर व पराक्रमी येसूबाईनें बादशाही कैदेंत असतांना चिंचवडचे मोरया देवास लिहून पाठविलेली करुण कहाणी उपलब्ध झाली आहे. ही कहाणी वाचतांना वाचणाराचें अंतःकरण गहिंवरतें. डोळे अश्रूंनीं न्हाऊन निघतात. या पत्रामध्यें तिनें केवळ निर्वाहासाठीं पांच हजार कर्ज मागितलें आहे ! शिवाजी-राजांच्या प्रत्यक्ष सुनेवर आलेला हा प्रसंग मनाला चटका लावणारा आहे.

येसूबाईचें हें पत्र असें आहे—

इ. स. १९-४-१७०५

श्री शंकर

राजश्री श्री देवस्वामीचे सेवेसी.

श्रीमत् परमपूज्य तपोनिधी मुक्तिदायक सकल गुणालंकरण देवमान्य वरद मूर्तिपरायण राजमान्य राजश्री.

आज्ञाधारक सेवेसी मातुश्री येसूबाईसाहेब दोनीकरकमल जोडून चरणावरी मस्तक ठेवून सा. नमस्कार विनंति उपरि. येथील क्षेम तागाईत वैशाख शुद्ध सप्तमी गुरुवार जाणऊन मुक्काम असदानगरीं दुर्गांत स्वामीच्या आशीर्वादेंकरून यथास्थित असे. स्वकीय कुशल-लेखन-आज्ञा केली पाहिजे. विशेष. बहुत दिवस जाले. स्वामींनीं आशीर्वाद पत्र पाठवून बालकाचा परामृश केला नाहीं. याकरितां चित्तास स्वस्थता होत नाहीं तें देव जाणें. तरी स्वामींनीं येणारा मनुष्याबरोबरी प्रतिक्षणीं आशीर्वाद पत्र पाठवीत गेलें पाहिजे. विशेष आमचे वर्तमानतरी स्वामीपाशी सत्यच लेखन केले पाहिजे. चिरंजीव[1] दाजी तो पृथ्वीपती[2] समागमें गेले. आम्हास सार्वभोमाची आज्ञा जाली कीं, ‘ अहमदनगरास जावें. ’ आज्ञेप्रमाणें आम्हांस अहमदनगरास घेऊन आलें. तेथें आलियावरी आजी पांच मास जाले. परंतु खर्चाची बहुत तंगचाई जाली. काय निमित्य तरी सार्वभौम दूर गेले. आमचा तनखा जो दिल्हा तेथें ताम्रांनीं व हरिभक्तांनीं व काळानें (प्रतिकूल परिस्थिति)

‡ गो. स. सरदेसाई. छत्रपति कुटुंबांतील नामांकित स्त्रिया. स्वराज्य. ८ जून १९५७.

१ शाहू. २ औरंगजेब.

करून प्रतिकूल जाली. (मोगल, राजपूत व दुर्दैव हीं आडवीं आलीं.) यामुळें द्रव्य येणें राहिलें. येथें अंमदानगरीं साहुकाराचें पांच सात सहस्त्र ब्रह्मस्व[1] जालें. आतां कोण्ही देत नाहीं. मागिल्याच पैकियास तगादे लावले आहेत. त्याच्यामुळें बहुत कष्टी होतों. तो दुःसागर स्वामीस काय म्हणऊन ल्याहाव ? स्वामीच्या सेवेसी रायाजी जाधव पाठविला असे. तरी माहाराज कैलासवासी स्वामी गेल्या तागाईत आपणावरी हा कसाला[2] प्राप्त आला इंगळास वोळंबे लागले. बरें, होणार भविष्य त्यास यत्न काय आहे ? आतां एक स्वामीवितरिक्त आणिक कोणाचा भरवसा या समयांत नाहीं. एक स्वामीच क्लेश परिहार करतील. इतरांच्यानें कांहीं होणें नाहीं. तरी सारांश गोष्ट कीं ब्रह्मस्वापासून मुक्त केलियानें बहुत कीर्ति स्वामीची आहे. आणि पाऊस पाणी जालियावरी स्वामी ज्यापासून देवितील त्यास प्रविष्ट करून....(स्वामी ज्याच्यापासून कर्ज देववितील त्यास ते परत देऊं)...माझी उपेक्षा न केली पाहिजे. वरकड चिरंजिवाकडील सामराज[3] व आमचे वर्तमान रायाजी मुखांतरीं चरणापाशीं विनंति करितां श्रुत होईल तें सत्यच मानणें. विशेष ल्याहावें तरी आपण अज्ञान, मूढ असे. लिहितां येत नाहीं. अथवा ज्ञानहि नाहीं. त्याहिवरी आपणाजवळी कोण्ही शाहाणा कारकून नाहीं. आवाक्षराची क्षमा केली पाहिजे. कृपा आशीर्वाद निरंतर करीत गेलें पाहिजे. कृपा असो दीजे. जाणीजे मोर्तबसुद.

" ता छ ११ माहे मोहरम सन ४९ हे विज्ञापना. "*

राजमाता येसूबाईचीं आणखीहि कांहीं पत्रें उपलब्ध झालीं असणें अगर उपलब्ध होणें शक्य आहे. माझ्या माहितींत मिळालेलें हें एकच पत्र आहे. एवढ्या एका पत्रावरूनहि येसूबाईच्या स्वाभिमानी जीवनाची व कर्तृत्वाची कल्पना येते. तिच्या जवळच्या स्त्रीमनाचें उत्कृष्ट प्रतिबिंब या पत्रांत पडलेलें दिसून येतें. कर्ज मागण्याची वेळ आली तरीहि आपली उपेक्षा होतां कामा नये हा तिनें या पत्रांत प्रकट केलेला भाव तिच्या थोर योग्यतेची व स्वाभिमानाची साक्ष देत आहे. त्याचप्रमाणें " मी अज्ञ आहें. कोणाचा आधार नाहीं. लिहितां येत नाहीं. सांभाळ केल्यानें पुण्य घडेल. " अशी तिनें केलेली या पत्रांतील भाषाहि त्यावेळच्या स्त्रीच्या भावनेची वैशिष्ट्यपूर्ण कल्पना देत आहे. मोरया देवासमोर येसूबाईसारख्या महान् पराक्रमी स्त्रीनें आपल्या खाजगी जीवनांतील प्रकट केलेला हा भावनाविष्कार संकटसमयीं तिनें दाखविलेल्या मनोधैर्याची साक्ष देत आहे, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

● ● ●

---

१ कर्ज २ संकट ३ समाचार.

* महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास-पत्र ६५. पा. ९३, ९४, ९५.

ताराबाई

येसूबाईची जाऊ व छत्रपति राजारामाची बायको ताराबाई ही एक फार महत्त्वाकांक्षी व कारस्थानी स्त्री होऊन गेली. हंबीरराव मोहिते सेनापतीची ही कन्या. हिचें एकंदर जीवन मोठें विचित्र होऊन गेलें आहे.

" नवऱ्याच्या हयातींत ती केवळ पडद्यांत वागणारी, काम नसलेली राणी होती. जिंजीच्या वेढ्यांत नवऱ्याचे सान्निध्यांत तिचीं पांच सात वर्षें परदेशांत गेलीं व नोकरांच्या घोळक्यांत परदेशगमन घडलें. त्यांत तिला स्वातंत्र्य नव्हतें. पंचविशीच्या वयांत तिचा नवरा वारला तेव्हां तीच राज्याची मालकीण मुख्य झाली आणि हा अधिकार तिनें पुरेपूर गाजवून युद्ध, राजकारण, राष्ट्रीय हालचाली हे विषय अनुभवून मोठा लौकिक मिळविला. पण हा तिचा उत्कर्षकाल सहा सात वर्षांहून जास्त काल टिकला नाहीं. या काळांत तिनें अप्रतीम धडाडी दाखवून औरंगजेबास नामोहरम केलें. हा पराक्रम इतिहासांत सदैव गाजत राहील. " *

ताराबाईनें आपल्या स्वतःच्या कर्तबगारीवरच कोल्हापूरचा राज्यकारभार पाहिला. यावेळीं आपलें वर्चस्व कायम टिकविण्यासाठीं ती कोणत्या धोरणानें वागत असे, याची कल्पना तिनें बाळाजी बाजीराव पेशवे यांस लिहिलेल्या पत्रावरून येते. या पत्रांत ताराबाईनें बाळाजी बाजीरावास निरुत्तर केलें आहे. हें पत्र असें आहे—

श्री

इ. स. १७५१

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांचीं राजमान्य राजश्री बाळाजी बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसिजे:—तुम्ही विनंति पत्र पाठविलें, तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला. कैलासवासी चिरंजीव यांणीं एकच तालुका सांगोन सेवा घेतली. त्यामागें साहेबी सेवकावर कृपा करून सर्व राज्यभाराचा एखतियार दिल्हा. सेवकानें दीड वर्षें जीं जीं कार्यें केलीं, तीं आज्ञेनेंच केलीं. तेणें करून सर्व स्नेहतेसी आज्ञेच्या वर्तणुकेमुळें विक्षेप वाढले. या प्रसंगीं सेवक हुजूर आला असतां सहा महिन्यांत विक्षेप वाटला असेल त्याचा अर्थ करावयाबद्दल साहेबीं इतबारी कोण्ही पाठवावा, अगर सेवकास आज्ञा केलीयानें आपलेतर्फें कोण्ही पाठवून देऊं. यासी तुम्ही एकनिष्ठ सेवक व्हाल तर

* गो. स. सरदेसाई, छत्रपति कुटुंबांतील नामांकित स्त्रिया. स्वराज्य ८ जून १९५७.

राज्यकारभाराचा अखत्यार तुम्हांस आहे...जाणीजे. छ. १७ जमादिलाखर[1] बहुत काय लिहिणें सुज्ञ असा. ”

आपल्या सर्व राज्याच्या बंदोबस्ताच्या दृष्टीनें ताराबाई कशा प्रकारची दक्षता घेत असे, याचा एक नमुना म्हणून मेणवली दप्तरामधील एका पत्रांतील पुढील भाग जरूर पहाण्यासारखा आहे. हें पत्र ताराबाईनें बाळाजी पंडित प्रधान यांना लिहिलेलें आहे.

“ ...उत्तरेकडे पठाणांनीं दंगा केला. अंतरवेद वगैरे अंमल उठविला. तमाम साहुकारा लुटोन पैका बेमबलग केला. मथुरा वृंदावन इत्यादि तमाम शहरें मारून कत्तल केली पुढें नर्मदा ऐलतीरीं दक्षण प्रांतें यावें, इकडील तमाम किल्लेकोट हस्तगत करून आपला बंदोबस्त करावा, वगैरे कित्येक मनसुब्याची गुर्मी धरून मजल दरमजल येत असे. समागमें दिल्लीपतीहि आहेत. याचा उपमर्द करावा, उठला अंमल पुन्हां बसवावा, घेतलीं ठाणीं घालावीं, या उद्देशें राजश्री अंताजी माणकेश्वर व राजश्री नारोशंकर व राजश्री समशेर बहाद्दर रवाना जालेच होते. हल्लींही चिरंजीव राजश्री रघुनाथपंत यांची फौजसुद्धां रवानगी केली. नर्मदातीरीं पावेतों जाऊन पोहोंचले. हे त्याचें पारिपत्य करतीलच. ऐसेंही करितां त्यांनीं लईच गुर्मी केली, तरी आम्हांसही जावें लागेल...पत्र पावतेक्षणीं स्वार होऊन येणें. एक घडीची विलंब न लावणें....”

इ. स. १७४५ त ताराबाईनें शाहूस एक आज्ञापत्र धाडलें होतें. या आज्ञापत्रांत ताराबाईनें शाहूस घरगुती वाद मिटवून गादीच्या वारसाच्या दृष्टीनें कांहीं सुचविलें आहे. हें प्रकरण शिवाजी व शाहू यांच्या भांडणांतून उद्‌भवलें. शिवाजी व संभाजी या सावत्र भावाचें भांडणहि त्याच वेळीं निघालें. शिवाजी व ताराबाई हीं यावेळीं कैद झालीं. संभाजी गादीवर बसला. पुढें शिवाजीस दोन पुत्र झाले. त्यापैकीं एक मरण पावला. दुसरा संभाजी-राजसबाईकडून मारला जाईल या भीतीनें गुप्त रीतीनें लपविला गेला. तो जन्मतांच कुणीतरी भवानी बाई बाळंत झाली होती तिच्याकडे धाडला. तिचें मूल इकडे आणलें गेलें. आदलाबदल झाली. पुढें बदला पुत्र मारला गेला. म्हणजे शिवाजीचा पुत्र जिवंत राहिला. त्याचें नांव रामराजा. तेव्हां शाहूनें त्यास दत्तक घ्यावें असें या आज्ञापत्रांत ताराबाई सुचवितें. तेव्हां घराण्याचें बाबतींत इथें ताराबाई किती चाणाक्षपणें वागली आहे, हें पुढील मजकुरावरून ध्यानांत येतें.

“ समस्त कार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री सरकारकुनांनीं व समस्त सैना हिंदुपति सरदारानी यासी आज्ञा केली ऐसीजे—

---

१ इतिहास संग्रह, ऐतिहासिक टिपणें भाग १ पा. ५२

कालपरते आमचा प्रसंग विस्कळित होऊन चिरंजीव राजश्री संभाजीराजे व राजसबाई यांणीं गिरजोजी यादव व अंताजी त्रिमळ व लोक खासकेल[1] गडकरी व तुळाजी सितोळे यासी पुढें करून किल्ले पनाळा येथें चिरंजीव राजश्री संभाजी-राजे यांसि राजपदास बैसविले. आम्हांस संकटीं घातलें. बहुत निकड[2] केली. ते प्रसंगीं चिरंजीव राजश्री शिवाजी राजे यांसि संतान सौभाग्यवती पार्वतीबाई यांसी दोघे पुत्र झाले. त्यापैकीं पहिला पुत्र क्रमला. दुसरा पुत्र त्यासी देवी सगर्भ होती. प्रसूत जाली. त्याचा फेरमोबदला करून हा मूल देवीच्या स्वाधीन केला. पाळग्रहण करविलें. सौभाग्यवती भवानीबाई सगर्भ होती. त्यानंतर चिरंजीवास देवी काळवशें समात झाले. समागमें पार्वतीबाईनीं सहगमन केलें. त्यांचा पुत्र देवीच्या स्वाधीन केला. तो अद्यापवर तिजपाशी सुखरूप आहे. सौभाग्यवती भवानीबाई पोटोसी होती. ती प्रसूत झाली. पुत्र जाहला. तो चिरंजीव संभाजी राजे व राजसबाई यांणीं कपट बुद्धी करून मारिला. काय निमित्य म्हणून पुसिलें. त्यास त्यांनीं उत्तर दिलें जे—राजश्री शाहू राजे यांची आज्ञा आपणास आहे, त्यावरून आपण अपाय केला. ऐसे जनांत सांगो लागले. कांहीं दिवस तैसेच गेले. त्या उपरि उभयतां चिरंजीवांचा[3] विवेक होऊन भेटी जाल्या...''*

ताराबाईचीं अशीं आणखी कांहीं पत्रें उपलब्ध झालीं आहेत. तथापि या पत्रांवरूनहि तिच्या खंबीर व मुत्सद्दी मनाची कल्पना येते. तिची भाषा आकर्षक व काळाला साजेलशी आहे. विचारांची मांडणीहि लक्षांत घेण्याजोगी आहे.

राधाबाई

राधाबाई ही बाळाजी विश्वनाथ यांची बायको व नानासाहेब पेशवे यांची आजी होय. ती फार शहाणी व चतुर स्त्री होती. पेशव्यांचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी यांचे चरणीं तिची फार दृढ भक्ति होती. सर्वसामान्य स्त्रीप्रमाणें तिच्याठायीं देवभोळे-पणा होता, हें तिनें श्रीमत् महाराज श्री परमहंस ब्रह्मेंद्रस्वामी यांना लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसून येतें—

"...येथील क्षेम माघ शुद्ध नवमी पावेतों स्वामींचे कृपावलोकनें करून समस्त क्षेम असों विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन परम संतोष जाहला. असेंच सदैव आशीर्वाद पत्र पाठवून परामर्ष केला पाहिजे. स्वामींचें आज्ञापत्र

१ सेनापति, २ तगादा, ३ शाहू, संभाजी.

* महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास. पत्र ७२ वें. इ. स. १७४५ पा. १०३, १०४.

सादर जाहलें. तेथें आज्ञा कीं, सोवळ्यांत पांघरावयास दुलई सोवळ्याची उत्तम. हिवाळा प्रावर्णास पाठवून देणें म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणें पशमी दुलई, अस्तर ताफत्याचें, संजाब ताफत्याचा सोमाजीचे गुजारतीनें तयार करून सेवेसी पाठविली आहे. अंगीकार करावयासी स्वामी समर्थ आहेत. चिरंजीवास तिळगूळ व पत्रें पाठविलीं तें आज्ञेप्रमाणें. अहोरात्र आसीर्वाद द्यावा, आणि शत्रुपराभव होय तो अर्थ करावा...." *

या पत्रावरुन स्वामींच्या आशीर्वादाची योग्यता पेशव्यांच्या स्त्रियांना देखील किती वाटत असे याचा पुरावा सांपडतो. तसेंच या पत्रांतील 'चिरंजीवास अहोरात्र आसीर्वाद द्यावा' ही कल्पनाहि स्त्रीमनाचें खास वैशिष्ट्य दर्शवीत आहे. शिवाय या पत्रांत आलेला घरगुती व कलाकौशल्याचा भाग चित्ताकर्षक आहे.

राधाबाईच्या अंगीं नीतिधैर्य केवढें प्रचंड होतें, याची कल्पना तिनें प्रायश्चित्ताबाबत दिलेल्या आज्ञापत्रावरून दिसून येतें. हें आज्ञापत्र तिनें नानासाहेब पेशवे यास दिलें असून त्याचें अंतरंग असें आहे—

श्री

"छ १ रजब

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यांस—

प्रति राधाबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ आषाढ वद्य अमावास्या इंदुवार जाणोन स्वकीय लिहित गेलें पाहिजे. विशेष—राजश्री गोविंद हरी यांचे घरीं बटीक महारीण निघाली. त्याचें वृत्त काल राजश्री अंतोबांनीं तुम्हांस लेहून पाठविलें आहे. त्यावरून सविस्तर कळलेंच असेल. त्यांचे घरीं मुलामाणसांचा उपोषणानें आट[1] जाला. त्यांणीं ब्राह्मणांस व पंडितास बोलावूं पाठविल्यास जमा न होत. याकरितां आम्ही व राजश्री अंताजीपंत, राजश्री शिवाजी पंतांचे घरीं जाऊन जितके ब्राह्मण थोर थोर पंडित व वैदिक जमा करून बाळंभट यांस प्रायश्चित द्यावयाची आज्ञा प्रभूची पाहिजे. त्यास आम्ही सर्व पंडितांस व ब्राह्मणांस आज्ञा केली कीं, तुम्ही प्रायश्चित्त देणें. आम्ही आज्ञा केली, तेच आज्ञा प्रभूची आहे. दुसरा धर्म चित्तांत न आणणें यावरून आजच प्रायश्चित्त दिलें. तेथील विचार पंडितराव यांस कळलिया उपरी, उपद्व्याप करून राजश्रीचे[2] कानावर घालून फंद[3] फैलाव[4] होईल या करितां अगोदर जो बंदोबस्त

---

* श्रीमहापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर, चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक २० पा. १७.

१ त्रास. २ शाहू. ३ कारस्थान. ४ विस्तार

करणें तो केला पाहिजे. यासाठीं ताबडतोब हें पत्र लिहिलें आहे...बहुत काय लिहिणें हा आशीर्वाद. "‡

या पत्रावरून सुमारें दोन शतकांमागें मराठ्यांची सामाजिक परिस्थिति कोणत्या प्रकारची होती याची माहिती मिळते. या पत्राची भाषाहि बऱ्याच जुन्या वळणाची असल्याचें दिसून येतें.

आनंदीबाई

इतिहास प्रसिद्ध आनंदीबाई ही श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब यांची पत्नी होय. एक महाकारस्थानी बायको म्हणून तिची विशेष प्रसिद्धि आहे. श्रीमंत नारायणराव पेशव्यांच्या वधामुळें तिचें नांव कलंकित झालें आहे. तथापि ज्यावेळीं रघुनाथराव दादासाहेब हे इंग्रजांस जाऊन मिळाले, त्यावेळीं ह्या राजकारणी स्त्रीनें सखारामबापू व नाना फडणवीस यांना गुप्तरीतीनेंच पण जोरदारपणें लिहिलेलीं पत्रें पहाण्यासारखीं आहेत. ह्या पत्रांतून ब्राह्मणी राज्य बुडूं देऊं नका असा तिनें उपदेश केलेला आहे. हीं पत्रें राघोबादादा इंग्रजास मिळून पहिल्या मराठी युद्धास प्रारंभ होण्याच्या सुमाराचीं आहेत व तीं खुद्द आनंदीबाईच्या हातचीं आहेत.

आनंदीबाई ही स्वभावानें फार मानी होती. स्वतःच्या शहाणपणाचा तिला अभिमान होता. तिच्या या स्वभाववैशिष्ट्याचें प्रतिबिंब सवाई माधवरावांच्या जन्मानंतर तिनें २९ एप्रिल १७७४ मध्यें नानास लिहिलेल्या पत्रांतील पुढील मजकुरांत पडलेलें दिसून येतें. या पत्रांत आनंदीबाईनें लिहिलें आहे कीं—

"....किल्ल्याची हवा[1] बहुत सरद आहे. लेकरूं लहान, यास्तव तुम्ही व राजश्री सखारामबापू उभयता विचार करून, ज्या जाग्यास या गोष्टीनें लेकरास दुःख पडे तें करावें. तुम्हासही याजविसीं काळजी आहेच. आम्ही ल्याहावें असें नाहीं. थोरपणाची रीत हीच आहे कीं, कोणासीं कोण्याही गोष्टीविसीं बहुत वेढूं नये. चुणूक दाखविण्यांत चमत्कार आहे आम्हांस वाटतें. परंपरा पाहावे, योग्य असेल तो अर्थ समजून घ्यावा. सूचना मात्र दिली आहे...."*

पुढील दोन पत्रें आनंदीबाईनें नाना फडणीस व सखारामबापू यांना दोन मुख्य कारभारी या दृष्टीनें लिहिलेलीं आहेत. या पत्रांत तिनें गृहकलहामुळें ब्राह्मणी

‡ महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास. पत्र ११४ पा. १५७, १५८

१ पुरंदर येथें सवाई माधवरावाचा जन्म झाला. तेथील हवा सर्द.

* इतिहाससंग्रह, ऐतिहासिक टिपणें, भाग १, पान ४९.

राज्य कसें बुडणार याची मोठी मार्मिक मीमांसा केली आहे. आनंदीबाईच्या ठायीं असलेली दूरदृष्टि व हुषारी या पत्रांतून प्रकट झालेली दिसून येते. या दोन पत्रांपैकीं नाना फडणिसास लिहिलेल्या पत्रांत आनंदीबाई ब्राह्मणी दौलतीच्या संरक्षणासाठीं उपदेशात्मक मजकूर लिहिते, तो असा आहे—

..." हल्लीं पत्राचें कारण कीं, तुम्ही तीन पिढ्यांचे दौलतींतील फडणीस असोन, दौलतेची तों गति झाली ती झाली. हल्लीं यवनाक्रांत ब्राह्मणी दौलत फितुरांनीं होऊं पाहाते. तुमच्या चित्तांतील उगीच आटी[1] जात नाहीं, आणि ब्राह्मणी तों बुडत चालली ! या दौलतेंत पूर्वीं कारभारी झाले. त्यांणीं ब्राह्मणी स्थापली व दौलतेची वृद्धि केली. हा काळ प्रस्तुत श्रीसत्तेनें असा आला !! इंग्रेज बुंदेलखंडापर्यंत दोन कंपू आले, आणीकही मागून येणार. याचा बारीक मोठा विचार जो करणें तो तुम्हीच करणें. आम्हांस म्हणाल तर आपला जीव कोणास नकोसा नाहीं. त्यापक्षीं दोन्ही गोष्टींचा आंदेशा करून, ब्राह्मणपण राहे तें करणें. आम्ही येथें तुमच्या स्वाधीन. पावणे दोन वर्षें जाहलीं. कार्यसिद्धी तुमची कांहींच न जाहाली. नुकसान पांच हजार फौजेचे सरंजामी गुंतले, ही झाली. विशेष कांहींच न झालें. तुमची फौज गुंतून, आमचा धन्याचे पायासीं वियोग, हें उभयपक्षीं नुकसान आहे.... " *

या पत्रांतील ' आमचा धन्याचे पायासीं वियोग ' हा भाग आनंदीबाईच्या स्त्रीमनाचें खास वैशिष्ट्य दर्शविणारा आहे.

राजश्री सखारामबापूस लिहिलेल्या पत्रांत ब्राम्हणी दौलतीबद्दल आनंदीबाई लिहिते—

"...हल्लीं इंग्रेज घरांत येऊं पाहतात. तमाम अंमल उठवून आपले अंमल बसवितात. आमचे निमित्य करून सर्व दौलतेस गिराईक होतील. सुजादौले व महमदअल्ली यांच्या घरांतून प्रथम चाकरीस येतो म्हणून नम्रतेनें पायरव[2] करून घेतली, आणि आतां उभयतांस पोटापुरतें देऊन सर्व दौलतीचे धनी जाले आहेत. या सर्व गोष्टी तुम्हांस ठाऊक आहेत, तसेंच आमच्या घरांत होईल. ते जातीनें खबरदार व मनुष्यें जवळ चांगलीं, असें असोन, उभयतांच्या गती या प्रमाणें जाल्या, आमचे येथें तों कारभारी जवळ मातबर कोण आहे, पायरव कोणाची आहे, व मर्जीही कोणत्या तऱ्हेची आहे, ह्या सर्व गोष्टी तुम्हांस ठाऊक असोन, तुम्ही तिहीं पिढ्यांचे कारभारी ही ब्राम्हणी दौलत बुडायाजोगी करितां, हें तुम्हांस करणें ठीक दिसत नाहीं. तुम्हांस हुजूरची मर्जी कोण्या तऱ्हेनें समजावल्यानें नीट

---

१ तेढ

* इतिहास संग्रह, ऐतिहासिक टिपणें भाग १ पान २८, २९.

२ प्रवेश.

राहते हें सर्व, कोण्या तऱ्हेनें विनंति केल्यास बिघडते यास तुम्ही माहीत आहां. पहिल्यापासून आम्हाकडील दिमतीचे तुम्हीच कारभारी. मर्जी राखून सर्व गोष्टी करीत गेलां, आणि हल्लीं या तऱ्हा दिसतात...तरी ब्राम्हणी दौलत नीट राहून, हुजूराचाही संतोश राहून सर्व गोष्टी बऱ्या होतील त्या कराव्या. न केल्यास जन्मभर चांगलें केलें आणि शेवटीं म्हातारपणीं इंग्रेजांच्या घरांत ब्राम्हणी दौलत घातली, हें अपेश येई, तो अर्थ न करावा...''* (ऐ. टि. भा. १. ले. १९, २ सप्टें. १७७८)

याच पत्रांत शेवटच्या भागामध्यें स्त्रीस्वभावाला अनुसरून आनंदीबाईनें सखारामबापूनें वृद्धपणीं लग्न केलें म्हणून जो टोमणा मारला आहे तो मोठा वाचण्याजोगा आहे, तो असा—

"....पूर्वीं तुम्हांस दोन पत्रें पाठविलीं होतीं, व नवी भावजय लाडकी केली, तिचें नांव काय ठेविलें, व दुसरी करावयाची कधीं, हा मजकूर विशेष लिहिला होता, त्याचें उत्तर कांहींच आलें नाहीं. पत्रें पोहोंचलीं कीं नाहीं हें न कळे. तर उत्तर पाठविणें... ''

आनंदीबाईच्या स्त्रीसुलभ भावनांचा या प्रकारें झालेला आविष्कार आणखी एका पत्रांत पहावयास सांपडतो. हें पत्र तिनें सखारामबापूस २९ एप्रिल १७७४ला लिहिलें असून त्यांत ती लिहिते—

"...आम्हांस नातू जाहला म्हणून पत्रें घेऊन खिजमतगार आले. त्यास येथें इनाम सोन्याचीं कडीं द्यावीं. परंतु येथें तयार नवतीं. करून द्यावीं तर दर मजलीमुळें फावत नाहीं. यास्तव तुम्हीं तेथें दोन कडीं सोन्याचीं आमचेवरचीं द्यावीं. बहुत काय लिहिणें. चिरंजीव बाळाचा समाचार नित्य घेत जावा...''‡

राजकारणांत आनंदीबाई ही मोठी तरबेज स्त्री होती. वरचेवर ती आपल्या पक्षाचे सरदारांना सल्लामसलत देत असे. १४ फेब्रुवारी १७७५ रोजीं तिनें सदाशीव रामचंद्र, आबाजी महादेव आणि सखाराम हरी या तिघां सरदारांना उद्देशून लिहिलेल्या पत्रांत जो फितुरीबाबतचा सल्ला दिलेला आहे, तो उल्लेखनीय आहे. या ठिकाणीं आनंदीबाई सांगते—

"...होळकराजवळ, फितुरीयांकडील वकील आहेत. तो फितुरीयांकडे ज्याचें पत्र आलें; त्याचीं नांवें लिहितो. येणेंकरून बंदोबस्त रहात नाहीं. तेथें होळकर व शिंदे यांचे कारकून आहेत. त्यांस बोलावून साफ ताकीद करणें कीं, वर्तमान लिहिणें तें मोघम लिहीत जाणें. नांवें न लिहिणें आणि आपले लष्करांत

* ऐतिहासिक पत्रबोध, पा. ८२, ८३.

‡ ऐतिहासिक संग्रह, ऐतिहासिक टिपणें, भाग १, पा. ४९-५०.

कोणीएक पत्र पाठवीत असतील त्याचे नांवाचा बोभाट होऊं न देणें. बोभाट जाल्यास फितुरी त्यास खटपट करितात... "*

आनंदीबाईच्या पत्रांपैकीं येथें दिलेल्या या निवडक पत्रांतील भाषा सोपी, घरगुती व वेंचक शब्दांनीं नटलेली असून तिची धाटणी खास जुन्या पद्धतीची आहे.

• • •

गोपिकाबाई

नारायणराव पेशव्यांचा मुलगा सवाई माधवराव हा ता. १८ एप्रिल १७७४ रोजीं पुरंदरावर जन्माला आला. त्यावेळीं त्याची आजी गोपिकाबाई ही नाशीकजवळ गंगापूर येथें रहात असे. या ठिकाणीं तिचें कायमचें वास्तव्य असे. या गोपिकाबाईनें आपल्या होतकरू नातवाला आपल्या घराण्याचे कांहीं रीतरिवाज व शिक्षण याची कल्पना असावी म्हणून आपलें मनोगत एका पत्रांतून कळविलें. या पत्रांत तिनें आपल्या नातवाला चांगलें वळण लागावें म्हणून तेरा कलमी उपदेश केला आहे तो असा—

[८ जाने. १७८३.]

" श्रियासह चिरंजीव राजश्री माधवराव प्रधान यांसी प्रति गोपिकाबाई मुक्काम नाशिक, आशिर्वाद उपरी येथील तागायत छ ४ माहे सफर जाणून स्वकीय कुशल वर्तमान यथास्तित असे विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें.

'मी लहान, वडिलीं सर्वत्याग करून श्रीक्षेत्रीं वास केला आहे, त्यास सर्व माहीत वडिलांस, यास्तव कोणे रीतीनें चालावें हें सर्व ल्याहावयास आज्ञा व्हावी,' म्हणोन लिहिलें त्यास सूर्यग्रहण संधि अन्वयें कृष्णपक्ष होऊन लोप जाहला होता. तो हल्लीं पुण्योदयें करून दुष्टांचा संहार व सुष्टांचे पालग्रहणार्थ तुम्ही या कुळांत जन्म घेऊन पुरंदर येथें उदयास आलां; त्या पक्षीं इकडून लिहावयाचें कारण दिसत नाहीं. परंतु मानवी देह आणि तुम्हीं लिहिलें, त्यापेक्षां तूर्त चालावयाचें जें सुचलें तें लिहिलें. तपसील कलमबंदी—

प्रातःकालचे घटका रात्रौ उठोन दिशेस जाऊन पाद प्रक्षालन मुख-प्रक्षालन करून दिवाणखान्यांतील श्रीमृत्तिका गणपतीचें दर्शन घेऊन प्रातःस्मरणाचे श्लोक म्हणावे. नंतर सूर्योदयाबरोबर वैद्यांनीं येऊन हात पहावा. प्रकृति अन्वयें औषध घ्यावें. नंतर लिहावयास बसावें. कित्त्यांत हात फिरवून मग ज्या कागदावर

* ऐतिहासिक संग्रह, ऐतिहासिक टिपणें, भाग १. पा. ८८,८९.

निशाणें[1] व्हावयाची असतील ते लिखितान्वयेंच वाचावे. ते समयीं जवळ गुरुजी[2] व आणखी एक दोघे संभावित योग्य असतील ते असावे. जास्त असो नये. येणें प्रमाणें घटिका तीन एकूण घटिका...कलम १.

तालीमखान्यांत जाऊन दंड काढावे. दिवसेंदिवस शक्ति अन्वयें चढते दंड असावे. बरोबर समवयी मुलें पांच चार संभावित असावीं; व जेठी एक दोघे व नेहमीं विश्वासुक गृहस्थ बरोबर असावयाचे ते असावे. खिजमतगार कार्याकारण असावे. जेठी यांनीं कुस्तीचे डाव शिकवावे. नंतर समवयी मुलांसुद्धां प्रकृतीस जो खुराक मानेल तो नेमें करून घेत जावा. येणें प्रमाणें घटिका दीड एकूण साडेचार घटिका ...कलम २

स्नान करावयाचे समयीं पंचांग जोशी वाचून संकल्प सांगावा. नंतर गंगाष्टक म्हणावें; संध्या थोडकी, परंतु न बोलतां करावी. तर्पण करावें. उपाध्ये यांणीं पूजा करावी. तें समयीं पुराण देवघरांत व बाहेर गायन होत असावें. आपण तुळशीपुढें माळा वहावी. नंतर नित्य दानें देऊन क्षणभर बसावें ते समयीं शास्त्री व वैदिक महान् शिष्ट आल्यास नमस्कार करून योग्यतेनुरूप उत्थापन देऊन कांहीं भाषण करावें. नंतर उपहार करावयास जावें. येणें प्रमाणें घटी साडेतीन. येकूण घटी आठ...कलम ३

कचेरीस यावें ते समयीं सर्वांस देऊन योग्यतेनुरूप नेत्रलाभ व भाषण होत असावें. कचेरींत लघुशब्द बोलूं नये व गैर नि ही (?) बोलूं नये. मनुष्य परीक्षा असावी. गैरवाखा एखाद्यानें समजाविलेस पक्केपणीं विचार करून अपराध ठरल्यास दुसऱ्याकडून त्यास निषिद्ध करवावें. आपण नेत्रकटाक्ष करून पहावें. अपराधानुरूप पारपत्य करावें, परंतु संभावित गृहस्थ बहुत दिवस पदरींचा प्रामाणिक, अज्ञानें रदबदली केली असतां क्षमा करावी. दुसऱ्याचें क्षुद्र काढूं नये. येणें करून त्याचा अपमान होतो, आणि तो त्याचे मनांत दंश राहतो, साधल्यानुरूप नाश करील, आणि आपल्यास लघुपणा येईल. संन्निधानी लोभांत लघु मनुष्य राखल्यास जें केलें त्यास ते रुकार देतात, परंतु जन लोक वाईट म्हणतात, थोरपणास हानि होती...कलम ४

भोजनाचेपूर्वीं सोंवळे जाहले नंतर थोरल्या देवघरांत जाऊन फुलें घालून, नमस्कार करून, ब्राह्मणास उदक सोडून, भोजनास बसावें. ते समयीं भाषण करावें तें राजसूय यज्ञांतील ब्राह्मण भोजन प्रकरणीं वगैरे योग्य सर्वांस दिसेल तें बोलावें. पाक करणार व शिष्यमंडळी सुशिक्षित विश्वासुक असतील ते बाळगावे...कलम ५

---

१ शेवटचीं अक्षरें. २ महादजी बल्लाळ गुरुजी. थोरल्या माधवरावाचा इतबारी. उपनाम करकरे.

भोजनोत्तर आचमन करून शतपदी करून तांबूल घ्यावा. नंतर दोन घटिका राजविलास खेळ खेळावे...कलम ६

शास्त्री यांजवळ विराटपर्वापासून भारतांतील चिंतनिका करीत असावी; व वृद्ध मनुष्यें पदरचीं बहुत दिवशीं व अन्य शहाणे असतील त्यांशीं दिल्ली प्रकरणीं व महाराज प्रकरणीं गोष्टी कशा जाहल्या त्या ऐकण्यांत असाव्या. आपले वडिलांच्या गोष्टी कारभारी यांसी एकांत स्थळीं विचारीत असावें; व तसबिरा, नकाशे अनेक पहात असावे. ते समयीं शहाणें बुद्धिमान् असतील ते जवळ असावे...कलम ७.

खर्डे लिहावयास बसावें, ते समयीं एक दोन मुलें संभावित गृहस्थांची बुद्धिमान पहावयास असावीं. करदन, बस्तन, गुणाकार, भागाकार करावयाचा सराव बहुत असावा. गुरुजी यांनीं विद्याभ्यासाकरितां बोलणें प्राप्त आहे. परंतु लिहावयाचे जागींच बोलणें. तेथें विशेष कोणी असों नये....कलम ८

लिहिणें जाहले नंतर कांहीं उपहार थोडासा मर्जी असल्यास मुलांसमवेत घेऊन करावा. नंतर तांबूल घ्यावा ...कलम ९

घोडीं फिरावयास चार रोजांनीं जात असावें. ते समयीं बरोबर पटवर्धन मंडळी व अन्यत्र सरदार असावे. त्यांशीं भाषण करणें तें संतोषवृत्तीनें करावें. परंतु अत्यंत लोभही नसावा व विरुद्धही न दाखवावें. कांहीं अंतर जाहल्यास क्षमा होणार नाहीं असें भय असावें. योग्यता बघून त्याशीं भाषण संतोषें करून करावें. आठां दिवशीं बाग पहावयास गेल्यास जिन्नस तेथें फुलें व फळें जीं आणून पुढें ठेवतील तीं योग्यायोग्य बघून त्यांस देववावीं व आपण घ्यावयाचीं असतील त्यांस आपण देऊन मग यावें. ज्या दिवशीं स्वारी जावयाची नाहीं, त्या दिवशीं कागदपत्र दवलत प्रकरणीं असतील ते कारभारी यांणीं समजावीत असावें. ते समयीं कोणी असो नये. गंगा भागीरथी ताईसाठीं* यांची भेटी चार रोजीं एक वेळ घेत असावी. त्यांसच वाड्यांत यावयाची बेत व्हावा. नंतर त्यांस बहुत संतोषें करून बोलावें व मूलपणानें बोलण्याचा डौल दाखवावा. वाड्यांतच आज रहावें असा आग्रह करून ठेवून घेत जावी. दिवाण यांचीं राजकारणाचें वर्तमान व पुढील योजना करावयाचा विचार करून विनंति करीत असावी. ते समयीं अन्यत्र कोणी असों नये. व त्यांतील अभिप्राय दुसऱ्यापाशीं निघों नये. म्हणजे मसलती असाध्य होत नाहींत. बातमी हरतऱ्हेची राखावी, म्हणजे मसलतीस बल बहुत आहे. पदरच्या मनुष्यांचें चालवावयाचें त्यास जिकीर करूं नये....कलम. १०

तिरंदाजी करावयास जावें. तेथें बरोबर सरदार व पागे व मानकरी बरोबर असल्यास तीर कोण कसे मारताहेत ध्यानांत असावें व हरएक खेळ पहावयाचे ते सर्वत्र समवेत पहावे...कलम ११

---

* मातुश्रीची आई.

दीपदर्शन जाहल्या नंतर संध्येस वस्त्रांतर करून बसावें. संध्या जाहलेनंतर स्तोत्र पाठ म्हणावा. नंतर पुरुषसूक्त अथवा पवमानांतील अध्याय म्हणावे. ते समयीं आश्रितांनीं जवळ असावे. नंतर भोजनास जावें...कलम १२

भोजनोत्तर तांबूल खावयास दिवाणखान्यांत क्षणभर बसून तांबूल घ्यावें. नंतर कार्याकारण मंडळी जवळ असावी. ते समयीं बातमीदार यांणीं वर्तमान गुप्त सांगत असावें; व हरएक बातमीचीं पत्रें आलेलीं पहावयाजोगीं असतील तीं पहावीं, बाकीचीं पत्रें विश्वासुक मनुष्य कोण असेल त्याजकडे काम योजावें, त्यांणीं सांगावें व त्यावर ही बातमी प्रमाण अथवा अप्रमाण सांगतात याची चौकशी असावी. नंतर निद्रेस जावें.....

एकूण कलमें तेरा लिहिलीं आहेत तीं ध्यानीं आणोन चालल्यास उपयोगीं पडतील. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. "*

गोपिकाबाईचें हें पत्र भाषेच्या दृष्टीनें आकर्षक असून अंतरंगाच्या दृष्टीनें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. आपला नातू सर्वोत्तम पुरुष म्हणून तयार व्हावा यासाठीं आजीच्या खऱ्या जिव्हाळ्यानें तिनें इथें उपदेश केलेला आहे. तिचा इथें प्रकट झालेला बारकावा, व्यवहारचातुर्य, बुद्धिवैभव, सामाजिक बंधनें वगैरे भाग चिंतनीय आहे. उत्कृष्ट प्रकारचें राजकारण करण्यासाठीं लागणारी पार्श्वभूमि तिनें एवढ्या चटकदारपणानें व आपलेपणानें तयार करूं पाहिली आहे कीं, तिला दुसरी तोड अन्यत्र असूं नये. आपल्या नातवाचा सर्वांगीण विकास करीत असतांनाच एकंदर सामाजिक जीवनाच्या विकासाबद्दलहि गोपिकाबाईनें इथें विशेष काळजी घेतली असून त्या दृष्टीनें हें तिचें पत्र वैशिष्ट्यपूर्ण ठरेल.

तुळजाबाई शिंदे

तोरगळकर तुळजाबाई शिंदे हिचें पुढील पत्र भाषेच्या व राज्यकारभाराच्या दृष्टीनें महत्त्वाचें असें आहे. तुळजाबाईसारख्या स्त्रिया त्या वेळीं राज्य संरक्षणाचे कामीं किती आवडीनें व उत्सुकतेनें विचार करीत असत; व छत्रपति आणि पेशवे यांच्याबद्दल सरदारांची भावना कोणत्या प्रकारची असे, याची कल्पना या पत्रावरून येते. हें पत्र असें आहे--

श्री शंकर

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी,

श्रीमंत अखंडित लक्ष्मी अलंकरण राजमान्य विराजित स्नो तुळजाबाई सिंदे दंडवत विनंती उपरी–येथील कुशल जाऊन स्वकीये कुशल लेखनाज्ञा करून

* ऐतिहासिक पत्रबोध. पा. ९५, ९६, ९७, ९८, ९९.

आसीर्वाद पत्री सांभाळावे विशेष. आपणाकडील आसीरवादपत्र बहुत दिवस येत नव्हतें. याजकरितां अमृतोतराची प्रतीक्षा सदैव सापेक्षित असतां सांप्रत आनंदरूप आसीरवाद (पत्र स्वामीने आम)चे नावे पाठविले ते (मस्तकीं वंदून) चित्तास परम आल्हा * * * पत्रावलोकनी आपले चरणाविंदच अवलेकनांत आले. आज्ञापत्री अज्ञोत्तरे लिहिली कीं नवाब अमीरुल उमराव निजामनमुलक गाजुदीखान बाहादर फेरोजंग दक्षणेस सुबेदा होऊन औरंगाबादेस दाखल जाले. सारी पातशाही मनसबदार दक्षणेच्या सुबियाचे ताबे आहात. आपले जमियेतीनिसी पत्रदर्शनी औरंगाबादेस जाऊन नवाबाची मुलाजमात करणें यांत तुमचा गौर-सरफाराजी व बेहबुदी[1] असे, तरी जलदीनें येणें म्हणऊन आज्ञापिलें. त्याजवरून परम संतोष जाला. येसियासी आम्हास आपली आज्ञा वंद्य. आमचे मुरबी सर्व प्रकारे पूर्वींपासून गोसांवी समर्थ आपले सिरी आहेत; आणि सर्वस्वे आपल्या सांभालाचा अभिमान गोसावियांसीच वडील वडिलापासून आमचा सांभाल होत आला. आपल्या आज्ञेप्रमाणें जमियेत सुद्धां चिरंजीवास यावया विलंब नाहीं. आमचे वर्तमान राजश्री धोंडाजी आकदेव सेवेत निवेदन करितां अवगत होईल, आणि पत्रीही विज्ञप्ति कीं चिरंजीवास गत वरषी न्यामतुलाखांजीचे हामराह करनोलच्या मोहिमेस रवाना केले ते करनोलची मोहिम करून न्यामतुलाखांजी बराबरीच भागानगरास दाखल जाले. आम्हीही चिरंजीवास गोसावियांच्या आज्ञापत्रा अगो-धरींच पत्रें लेहून पाठविली की तुम्ही लवकर येणें. इकडे नवाब निजामनमुलक फेरोजंग बाहादर औरंगाबादेस दाखल जाले म्हणऊन पहिलेंही पत्रें लिहिली आहे तीं आणि तेही लवकरीच येऊन पोहचतील.

विशेष विस्तार काय लिहिणें ही विनंती. ×

या पत्रांत तुळजाबाईनें स्त्रिया घरगुती बोलण्यांत जी भाषा वापरतात तिचाहि वापर केलेला दिसून येतो. त्यामुळें भाषेच्या दृष्टीनें हें पत्र थोडें वैशिष्ट्यपूर्ण झालें आहे असें म्हणतां येईल.

● ● ●

अहिल्याबाई होळकर

अहिल्याबाई ही मल्हारराव होळकर यांची सून. हिनें कोणावरहि अवलंबून न राहतां अगर स्वतः बाईमाणूस म्हणून कोणाकडे मदतीची भीक न मागतां स्वतःच्या कर्तबगारीवर विसंबून इंदूरचें राज्य चालविलें. राज्यकारभार करीत

१ भरभराट.

× ऐतिहासिक पत्रबोध. पा. ४३, ४४.

असतांना तिला अनेकांकडून विविध प्रकारचा उपद्रव झाला. परंतु तिनें कशालाहि दाद न देतां धिम्मेपणानें सर्व राज्यकारभार पाहिला व येईल त्या परिस्थितीला धैर्यानें तोंड दिलें.

अहिल्याबाई किती बाणेदारपणें वागत असे याची कल्पना "महेश्वर दरबारच्या बातमीपत्रां"तील पहिल्या भागांतील (कारकीर्द अहिल्याबाई होळकर भाग १) २३ व्या लेखांकामधील पुढील उद्गारावरून लक्षांत येते—

"...तुमचें मानस असेल कीं, बाईस चहूंकडून उपद्रव जाल्यानें, सारेच बंदोबस्त आपण केल्यावर बाईनीं काय करावयाचें आहे? परंतु तुम्हासहि कळलें असूं द्या, मी सुभेदाराची सून आहें. केवळ तुकोजीबाबाच दौलतीचे धनी आणि मी कशांत कांहीं नाहीं असें समजूं नका. तुकोजीबावा हे माझ्या हातचे कामास लावलेले आहेत, त्यांनीं निमकहरामीचे फंद आम्हांसी केल्यास पुढें सुखरूप दौलत करूं म्हणतील, तर त्या गोष्टी दुरापास्त आहेत. फार खराब होतील. आजकाल पाटीलबावांचा दम तुकोजीबावा फार राखितात. आणि पाटीलबावांच्याहि चित्तांत फार फंद असेल, तर उभयतांहि फौजसुद्धां मजवर चालून यावें. सुभेदारांचे पुण्य-प्रतापें येथेंहि कोणी बांगड्या लेवून बसलें नाहीं. श्रीमार्तण्ड समर्थ आहे. जें ईश्वर घडवील तें खरें..."*

अशाच एका दुसऱ्या पत्रामध्यें अहिल्याबाईस नानासाहेब यांचेकडून आलेली जासूद जोडी किती दिवस ठेवावी असें विचारलें असतां तिनें चिडून त्यांना उत्तर दिलें आहे कीं—

..."पत्रें हजारों ऐशीं येतात मी काय करावें? उकळांत डोकें घातलें, यास कोठवर भिऊं?..."

मल्हारराव होळकरांचे मृत्यूनंतर अहिल्याबाई शोकमग्न आहे, असें बघून गंगाधर यशवंत याचे बुद्धीस विपर्यास झाला व त्यानें राज्यांत सर्वत्र अंदाधुंदी असल्याचें दादासाहेब पेशवे यांस कळविलें; आणि ताबडतोब निघून येण्यास विनंती केली. ही गोष्ट सुभेदाराच्या दोन कन्या सखूबाई व उदाबाई यांनीं अहिल्याबाईच्या कानावर घातली. त्यावेळीं दुःख बाजूला फेकून देऊन अहिल्या-बाईनें मोठ्या तडफेनें व धनीपणाचे जरबेनें दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यावेळीं अहिल्याबाई पेशव्यांना उद्देशून म्हणते—

* राजश्री बाळाराव गोविंद आणि अहिल्याबाई यांच्यामध्यें जीं बोलणीं झालीं त्यावेळीं अहिल्याबाई जें बोलली तें ह्या पत्रांत तिच्याच शब्दांत अवतरण देऊन येथें नमूद केलेलें आहे. हें पत्र श्रीमंत नानासाहेब यांस लिहिलेलें असून त्याची तारीख २८ ऑक्टोबर इ. स. १७८० अशी आहे.

" मेल्या ब्राह्मणानें हरामखोरी आरंभिली आहे. परंतु मी बायको असें मानूं नका. खांद्यावर बांसडा ठोकून उभी राहीन, तेव्हां श्रीमंताचे दौलतीस अवघड पडेल ! आमचे वडिलांनीं भांडभबई करून दौलत मिळविली नाहीं; तर तरवारीचे अनुमानें शरीर खर्च घातले आहे. आम्ही शिलेदार वडिलांचे चाकरी प्रमाणें चाकरी घेतल्यास हजर आहोंत. धुणीपाणी[1] सरली असल्यास मोंगलाईची चाकरी करूं अथवा फिरंग्याची करूं अगर पाहिजे ते करूं. ब्राह्मण म्हणतील[2] दौलतीचा अभिलाष करूं तर हें होणार नाहीं."†

अहिल्याबाईंचीं अशी स्वाभिमानाचीं बोलणीं नेहमीं ऐकल्यामुळें एकदां महादजी शिंद्यानें अहिल्याबाईस प्रश्न केला. " बाईसाहेब आपण इतकी अंगवळणीं बोलतां परंतु आम्हीं पुरुष आहोंत. आपले ढंगावर आलों असतां आपण काय कराल ? " त्यावेळीं अहिल्याबाईनें त्यास तात्काळ उत्तर देऊन टाकलें कीं—

" जसें तुम्हीं आपल्या बाया सुपारीच्या खांडासारख्या तोंडांत गिळून गेला, तोच बोध तुकोजी होळकरास करून उभयतां फौजबंदीनें येण्याचें करावें. इंदुरीहून तुमचें कूच, त्याच दिवशीं हत्तीचे पायांत अंदू[3] घालून तुमची खात्री करीन, तरच मल्हारजी होळकराची सून. तुमचे मनांत गुबार[4] होता तो तुम्हीं बाहेर काढला. या गोष्टीस चुकाल तर तुम्हांस मार्तंडाची शपथ. "‡

अहिल्याबाईच्या या प्रकारच्या भाषेवरून व विशेषत: ' येथेंही कोणी बांगड्या लेवून बसलें नाहीं ' या बोलण्यावरून तिच्या तडफदार विचारसरणीची तर कल्पना येतेच; परंतु तिनें स्वतःच्या कर्तबगारीबद्दल केलेला उल्लेख स्त्रीमनाच्या दृष्टीनें विशेष उल्लेखनीय, अभिमानास्पद व वैशिष्टयपूर्ण असाच असल्याचें दिसून येतें. वास्तविक बांगड्या नेहमीं बायका भरतात आणि नालायकी दाखवावयाची तेव्हां पुरुषांना 'बांगड्या भरा मग' असा टोमणा मारला जातो. अहिल्याबाईनें याचें मोठें सुंदर निराकरण येथें केलें आहे यांत शंका नाहीं. अशा प्रकारें भाषा करणारी इति हासकालीन अशी ही पहिलीच स्त्री बहुधा असावी.

आपल्या राज्यांतील जमाखर्चाची व्यवस्था अहिल्याबाई मोठ्या चोख-रीतीनें ठेवीत असे. तिच्या या वैशिष्ट्याची कल्पना तिनें तुकोबास लिहिलेल्या पुढील पत्रावरून येते.

---

* महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें भा. २ पा १०, पत्र १२.

१ ऋणानुबंध. २ पेशवे म्हणतील.

† होळकरांची कैफियत पा. ४४.

३ लढाईचे वेळीं हत्ती जाग्यावरून पळूं नये म्हणून त्याच्या पायांत जो साखळदंड घालतात तो. ४ दुष्ट हेतु.

‡ होळकरांची कैफियत. पा. ७५, ७६.

श्री

६ जानेवारी १७९१.

चिरंजीव राजश्री तुकोबास

प्रति अहिल्याबाई होळकर आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे. विशेष. प्रगणे टोंक प्रांत धुंडाड येथें परकी आसाम्या सरकारांतून पेशजीपासून येणें प्रो.

४०० मजमू खासगीकडे मा. (मार्फत) गोविंद रघुनाथ
५०० फडणीसी गोविंद रघुनाथ
३०० पोतनिसी व्यंकोजी बाबूराव
२०० दत्फरदारी सदाशीव रामचंद्र

१४००

येकूण च्यार आसाम्या मिळोन चौदासे रुपये चालत आले असता हल्ली तेथील मामलता तुम्ही कृपाळसिंग याजकडे सांगोन माहाली त्यांचे बंधु विश्वंभरदास याजला रवाना केले. त्याजला नेमणुकीचा बयाहाडा करून दिल्हा त्यांत या आसाम्या दिल्ह्या नाहींत म्हणोन विदित जाले. त्याजवरून हें पत्र तुम्हांस लेखन केलें असे. तरी तुम्ही सदरहू चौदासे रुपयेचे आसाम्याचे सालाबाद प्रो लिहून देऊन ज्याचे काम त्याचे हस्ते ध्यावे. विसी मामलेदारास लिहून कोणे विसी दिकत न पडे ते करणें. रवाना छ. १ जमा दिलाख सुा हहिदे तिसैन मया-व-अलफ. बहुत काय लिहिणें हा आसीर्वाद.*

मोर्तुब
सुद

अहिल्याबाईची लेखनपद्धति व भाषासौष्ठव लक्षांत येण्यासाठीं म्हणून नमुन्यादाखल हें पत्र येथें जसेच्या तसें दिलें आहे.

खुद्द अहिल्याबाईसंबंधीं तिचा स्वभाव विशेष दर्शविणारी इतरांनीं लिहिलेलीं अनेक पत्रें इतिहासांत सांपडतात.

अहिल्याबाई गायकवाड

बडोद्याचे फत्तेसिंगराव गायकवाड यांची पत्नी अहिल्याबाई हिची तिच्या नवऱ्याचे पश्चात् हैराणगत कशी झाली याची करुणरम्य हकीकत तिनें राजश्री

* होळकर शाहीच्या इतिहासाचीं साधनें. पत्रव्यवहार, पूर्वार्ध खंड १ ला. (फडणीसीचे नकलेवरून) पत्र नं. १०१. पा. १५५

दवलतराव बाबा शिंदे यांना लिहिलेल्या पत्रांत आलेली आहे. त्या काळीं अशा प्रकारच्या स्त्रियांची कशी आबाळ होत असे याची कल्पना ह्या अहिल्याबाईंच्या पुढील पत्रावरुन येते—

"...आमचें वर्तमान. आमचे धणी कैलासवासी जालेनंतर मानाजीराव गायकवाड यांनीं पंचवीस तीस लक्षांचें वितें (वित्त) घरांत होतें तें दरोबस्त लुटून नेलें. आम्हांस एक वस्त्रानिसी एक घर लहानसें होतें तेथेंच टाकून ठेविलें, आण मानाजीराव देव लोकास गेले, तदनंतर गोविंदराव गायकवाड आले. त्यांनीं येतांच प्रथम आमची खायाखर्चाची नेमणूक दहा हजारांची होती ते बंद केली, आण घरास खणतें लाऊन एक लक्षाचें वितें नेलें. मग तेथें आमचे चुलते नारोजी देशमुख होते त्यांजपाशीं आम्हीं डागिने चवलक्षाचे ठेविले, आण आम्ही श्री मार्तंडाचे दर्शनास जेजुरीकडे निघालों. आमचे मागें देशमुख मजकुर यांणी गोविंदराव बावास सांगून डागिने चवलक्षाचे त्यांस दिल्हे, आण आपण मासलत करून गेले. आम्ही ये प्रांतीं आलों तेव्हां आम्हांस वारीस एक श्रीमार्तंड किंवा आपण आहेत यास्तव विनंति लिहिली आहे तर आमचा बंदोबस्त करून ठेविला पाहिजे. आम्हीं भेटसी यावें, तर येथें आम्हांस खर्चाची आबळ आहे, यास्तव हें पत्र लिहिलें...

...आमचे धन्यास एकशें साठ बायका होत्या. त्यांत चौघी खाशा. गोविंदराव गायकवाड याणी बायका दरोबस्त काढून दिल्या आणि आमची चौघींची हे गत केली...आमचे धण्यानी कोस्यानकोट पैका असोन, त्यांचें देऊळ कोणें बांधलें नाहीं, हें आपल्यास श्रुत होयें. आपण पाटीलसाहेबाचे पोटीं कुलदीप आहेत. मी धर्माची बहीण जाणोन हें कार्य केलें पाहिजे. आण हें न जाल्यास आपले पायापाशीं बोलाऊन घ्यावें. आपण शेर पीठ द्याल तर खाऊन बसूं. यादो भास्कर यांणीं सर्व बंदोबस्त करून घरोघर लाविले. दामाजी बावाचे हातचे दोनचार गांव पाटिलकीचे आहेत, त्यांत सर्वपरी काल यांचा आहे. आमचें कोठें चालू देत नाहींत. आम्हांस पत्रें आणून दाखवितात कीं, आम्हांस धण्यांनीं सांगितलें. मग खरें किंवा खोटें न कळो...सर्व कारभार सोडून बायकांस लुटितात. सेवेसीं श्रुत होय. हेतूप्रमाणें भरंवसा जाणून, हें पत्र कोणास न दाखवणें आण उत्तर पाठविलें पाहिजे..."*

अहिल्याबाईंच्या या पत्राची धाटणी व भाषा इतर स्त्रियांच्या मानानें थोडी वेगळी आहे. तिनें 'आणि' ऐवजीं 'आण' असा शब्द वापरलेला आहे! आणि आपलें पत्र कोणासहि न दाखविण्याची सूचना करून झाला प्रकार सविस्तर कळवून टाकला आहे हें विशेष होय.

---

* राज० खं. १० ले० ३८७. ऐतिहासिक पत्रबोध. पा. ११६,११७.

राजघराण्यांतील या थोर स्त्रियांच्या प्रमाणेंच त्यांच्या दासींनीं लिहिलेलीं कांहीं पत्रेंहि उपलब्ध झालेलीं आहेत. त्यांपैकीं एकदोन येथें नमुन्यादाखल घेतां येतील.

अहिल्याबाई होळकर यांची दासी संती हिनें अहिल्याबाईस एक पत्र लिहिलें आहे. संती अहिल्याबाईकडे कुणबीण म्हणून होती. हें पत्र स्वत: तिनें लिहिलें असून त्यांतील अक्षर वेडें वांकडें आहे. या पत्राचा मजकूर असा—

श्री

श्रीमंत गंगाजल निर्मल मातुश्री बाईसाहेब
साहेबाचे सेवेसी.

आज्ञाधारक संतीनें चेरनावर मस्तक ठेऊन सा।। दंडवत विनंति विज्ञापना येथील कुशल ता।। पौश शु।। ५ पर्यंत माहाराजांचे प्रतापें करोन येथास्थित असो विशेष. को। इंदूरपैकी उगाई हर जिन्नस येणे प्रो। पाठविली आहे.

ऽ=।।ऽ वजणी जिन्नस
ऽ१।। मेंथी भाजी वाल
ऽ।।। वांगीयाची उसरी
ऽ।। मिरच्या
ऽऽ८ आल व लसन

ऽ=।।।८

सदरहू पावणेतीन मण आठ सेर वजन—कसू कुंजडा याज समागमे पो. आहे. हु।।र प्रविष्ट होईल. पावली याचे उत्तर सादर केले पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना."*

ह्या पत्राची भाषा अगदींच सामान्य असून मजकूर फारच घरगुती असा आलेला आहे. या पत्रावरून त्या वेळच्या दासींनाहि लेखन वाचन येत असावें असें दिसतें.

राजघराण्यांतील एका स्त्रीनें बाजीरावास एक पत्र लिहिलें असून त्यांत छत्रपतीकडील स्वयंपाकघराची दुरुस्ती करण्याबद्दल विनंति केली आहे. या पत्रांत या स्त्रीच्या नांवाचा उल्लेख आलेला दिसत नाहीं. हें पत्र असें आहे—

" छ १ साबान

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी—

प्रति सौभाग्यादि संपन्न उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन कारणें विषेस. सातारा माहालांतील मुदबखचे घर (स्वयंपाकघर) तुम्हाकडून बांधिवले होत. प्रस्तुत सोप्याचे खांब जागाजागा ढलले व काही किडीने जाया

* होळकर शाहींतील ऐतिहासिक स्त्रियांचा पत्रव्यवहार, खंड १२ पा. ६७

जाले. मोहास्या—(ओसरीची छपरे) कीठ (नादुरुस्त) जाया जाहल्या व काही पाडिल्या. यास्तव नीट करावे लागते. तरी तुम्ही राजश्री माहादाजी अंबाजी व राजश्री दादोपंता सांगोन मुदबखचे घर सोपा नीट करवणे. दिवसगतीवर न घालणे. अविलंबे तयार करविले पाहिजे. जामिजे. छ १९ रजब. बहुत काय लिहिणें. "*

या पत्राची भाषा अगदींच साधी व सामान्य लोकांच्या व्यवहारांतील दिसतें. तसेंच मजकूरहि अगदींच घरगुती आहे.

इतिहासकालीन अशी हीं सर्व पत्रें त्या वेळच्या पद्धतीनुसार मोडी लिपींत लिहिलेलीं आहेत असें त्यांच्या मूळ पुराव्यावरून आढळून येतें. मोडी लिपीस त्यावेळीं राजदरबारी मोठा मान असे.

या पत्रांपैकीं कांहीं पत्रांच्या शेवटीं किंवा 'श्री' काराजवळ विशिष्ट कुलदेवतेचें नांव अगर विशिष्ट खूण घातली असून कोठेंहि पत्र लेखिकेच्या नांवची सही आलेली नाहीं. या पत्रांचे मायने मात्र वैशिष्ट्यपूर्ण व विविध आहेत. भाषा देखील त्या त्या पत्र लेखिकेच्या मानानें वेगवेगळी आली आहे. आणि मुख्य म्हणजे या पत्रांतून सर्वत्र विखुरलेलें खाजगी, घरगुती व राजकीय जीवन ज्या पद्धतीनें रेखाटलें गेलें आहे ती पद्धति फारच छान आहे.

येथें दिलेल्या निरनिराळ्या पत्रांतून त्या त्या विशिष्ट व्यक्तीचें स्वभाव-चित्र व त्या व्यक्तीभोंवतीं घडलेल्या घडामोडी प्रतिबिंबित झालेल्या आहेत. त्यावरून पूर्वींचे सर्व प्रकारचे व्यवहार व रीतरिवाज काय असत याची चांगली कल्पना येते. त्याचबरोबर भाषाशैलींतील विविधता व खास जुन्या शब्दांचा वापर यांचाहि परिचय चांगला होता. सामाजिक व धार्मिक व्यवहार, लोकांचे शिक्षण व उमेद, राष्ट्रीय जीवनांत स्त्रियांचा कार्यभाग वगैरेचीहि यावरून बरीच माहिती मिळते.

पुरुषांच्या पत्रलेखनाच्या मानानें स्त्रियांनीं लिहिलेल्या पत्रांची संख्या फार कमी आहे. त्यांतून इथें अगदींच निवडक पत्रांचा उल्लेख आलेला आहे. तथापि तेवढ्यावरूनहि एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते ती अशी कीं, त्यावेळच्या राज स्त्रियांना व दासींना शिक्षण मिळत असे ! राजकारणाविषयीं त्या आवडीनें विचार करीत असत !

दुसरें असें कीं, या पत्रांतील कांहीं अपवाद सोडला तर बराचसा भाग विशेष घरगुती असा आलेला आहे. राजपुरुषांप्रमाणें घडामोडींचें व युक्तीचें राज-घराण्यांतील कारण फारसें त्यांत आलेलें नाहीं तथापि स्वाभिमान मात्र कोठेंहि लोप पावला नाहीं हें विशेष होय.

★

* महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास. पत्र १०८ पा. १५१, १५२

.५.

ललित वाङ्मयाची सुरवात

मराठी वाङ्मयाची भावगंगा मुळांत प्राकृताच्या पर्वतांतून निघालेली असली तरी तिला तीर्थाचें माहात्म्य ज्ञानदेवांनीं प्राप्त करून दिलें. या असामान्य प्रतिभेच्या संताच्या प्रभावामुळें मराठी भाषेनें अमृतालाहि जिंकणारी गोडी अंगिकारिली. परंतु ज्ञानदेवांच्या या उदयकालाच्या वेळची महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाची परिस्थिति मोठी विचित्र होती. त्यामुळें त्या वेळच्या संतकवींच्या हातून फक्त काव्याची व तीहि निवृत्ति प्रधान काव्याची अशीच वेल फुलली. वाङ्मयांतील इतर सर्व प्रकारच्या वृक्षवेलींना मानवणारी हवाच त्यावेळीं महाराष्ट्रांत नव्हती. त्या कारणानें संस्कृत वाङ्मयांत सुंदर फुलांनीं नटलेली निरनिराळ्या प्रकारची वाङ्मयीन कल्पलता मराठीच्या उद्यानांत आरंभीं आरंभीं अदृश्य झाली ! त्याचा परिणाम मराठी वाङ्मयावर झाला.

वाङ्मयीन कलेचा उदय आणि उत्कर्ष हा देशकाल परिस्थितीवर अवलंबून असला, तरीहि अशी कला एखाद्या देशांत शतकानुशतकें पडदानशीन होऊंच शकत नाहीं. या ना त्या प्रकारें तिचा आविष्कार होत जातो व त्यावरून त्या देशाची पारख केली जाते.

कारण वाङ्मय म्हणजे मानवी मनांतील वैचारिक व खाजगी भावभावांना लाभलेलें लिखित स्वरूप होय. त्यामुळें वाङ्मयाच्या द्वारें एखाद्या विशिष्ट देशांतील आदर्श जीवनाची नोंद केली जाते. राष्ट्राच्या चरित्राचा इतिहास सांगितला जातो. तिथल्या माणसांच्या बुद्धीची पारख केली जाते. त्या वाङ्मयांतून प्रकट होणाऱ्या भावनाविष्कारावरून राष्ट्राचें आरोग्य तपासलें जातें. म्हणून वाङ्मय हा त्या राष्ट्राचा एक सुंदर असा आरसा होय. *

---

* " A National literature, it is generally recognised is a reflection of the national history. "

Worlds Literature, Page 431, Moulton

" राष्ट्राच्या मनाची, बुद्धीची व कर्तृत्वाची लांबी रुंदी व उंची जाडी या वाङ्मयाच्या मापानें बिनचूक मापतां येते. इंग्रजी अंमलाच्या सुरवातीपासून आमच्या समाजाची स्थिति गति आमच्या तत्कालीन वाङ्मयावरून उत्कृष्ट कळून येते. स्वराज्य गेलें आणि पाठोपाठ सरस्वतीहि आम्हांस विन्मुख झाली ! नव्या परकी सरकारला आपली माया लावून आपल्या लगामीं राहील असा नवीन सुशिक्षितांचा एक वर्ग निर्माण करावा लागला. या नवीन वर्गात बहुतेक भरती नवीन् बुभिक्षितांची होती. जुने खानदानी, राज्य भोगलेले मुत्सद्दी, सरदार वगैरे सर्व अंतर्धान पावल्याप्रमाणें झाले ! राष्ट्राची वाचाच बसली ! ! ती दांतखिळी उचकटण्याचा पहिला प्रयत्न विष्णुशास्त्री यांनीं केला व नवीन सुशिक्षितांचें मोहपटल त्यांनीं दूर केलें. "* इतकेंच नव्हे तर विष्णुशास्त्र्यांनीं आपलें " महत्कृत्य जें निबंधमाला लेखन, ज्याचे योगानें त्यांनीं महाराष्ट्र भाषेचे स्वरूपांत इतकें अंतर पाडिलें, व तींत उत्तम ग्रंथरचना करितां येईल असा विद्वान् लोकांस भरंवसा आणिला, व ज्याचे द्वारें त्यांनीं आपले लोकांचे अनेक विषयांवरील समजुतींत बदल केला, त्याची उत्पत्ति सहज होऊन त्याची प्रथम कल्पना अगदीं साधी व अपूर्व होती. " ××

इंग्रजी राजवट महाराष्ट्रांत सुरूं झाल्यानंतर स्वाभाविकच राजभाषा म्हणून इंग्रजी भाषेचाहि प्रचार इकडे सुरू झाला. त्यामुळें इंग्रजींतील उत्तमोत्तम ग्रंथांचें अध्ययन आपल्याकडील लोकांनीं सुरू ठेविलें. त्याचा परिणाम म्हणून आपल्याकडे इंग्रजींतील विविध वाङ्मयप्रकारहि सुरू झाले. इ. स. १८१८ ते १८७४ पर्यंतचा काळ प्रामुख्यानें भाषांतरित काळ म्हणून समजला जातो. संस्कृत आणि इंग्रजी भाषेंतील ग्रंथांचें भाषांतर या काळांत बरेंच झालें. या वाङ्मयाचें स्वरूप बरेचसें अद्भुतरम्य आणि कल्पित होतें. त्याविषयीं लिहितांना श्री. काशिनाथपंत नातू यांनीं इ. स. १८७२ सालीं प्रसिद्ध केलेल्या विजयसिंग (शेक्सपियरच्या ज्युलियस सीझरचें हें भाषांतर आहे.) या नाटकाचें प्रस्तावांत म्हटलें आहे कीं, " अलीकडे कल्पित कादंबऱ्या आणि नाटकें इत्यादि पुस्तकांचा मोठा पूर आला आहे हें वस्तुतः पाहिलें असतां आपल्या देशाला एक वैभवच आहे, पण त्याची जशा प्रकारची भाषा असावी तशी नसते व कल्पित कादंबऱ्यांतील गोष्टी एकाच तोडीवर लिहिलेल्या असतात. " पण निबंधमालेचें युग सुरूं झाल्यानंतर ही परिस्थिति पालटली. मराठींतून स्वतंत्र अशी ग्रंथरचना होऊं लागली व या ग्रंथांतून महाराष्ट्राचें अंतःकरण चित्रित होऊं लागलें.

इंग्रजीमधून मराठींत आलेले विविध वाङ्मयप्रकार आपल्याकडे अगदींच

---

* मराठी गद्याचा इंग्रजी उपोद्घात, पा. १६

×× विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र पा. १०९

नवे होते असें मात्र नव्हे. मराठी वाङ्मयाचा विकास त्यामुळें आपल्याकडे झाला हें मान्य केलें तरी असें म्हणतां येईल कीं, आपल्या जुन्या मराठींत ह्या विविध वाङ्मय-प्रकारांचा गाभा निःसंशय होता. या काळांत त्याची वाढ झपाट्यानें झाली आणि त्यास ठसठशीत असें वेगळें स्वरूप आलें एवढें मात्र निश्चित. हा जो बदल झाला त्याविषयीं लिहितांना विष्णुशास्त्र्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "इंग्रजी ग्रंथांचें ज्ञान चोहोंकडे फैलावल्यानें नवा सुरू झालेला प्रकार आणखी एक सांगणें आहे. तो सृष्टिवर्णन हा होय. हा जुना मराठी कवींच्या ग्रंथांत क्वचितच आढळतो, व संस्कृतांतहि त्याची एक निराळीच तऱ्हा आहे. इंग्रजी कवितेंत व गद्य ग्रंथांत मात्र तो अलीकडे मोठ्या पूर्ण दशेस येऊं लागला आहे." *

कथा, कादंबरी, नाटक, निबंध, चरित्र, आत्मचरित्र इत्यादि अनेक वाङ्मयीन कलाप्रकार मराठीमध्यें नव्यानें रूढ होऊं लागले होते. या काळांत जे अनेक लहानमोठे लेखक उदयाला आले त्यांनीं हे कलाप्रकार लहानमोठ्या प्रमाणांत हाताळण्याचा प्रयत्न केला. अर्थात् हें सर्व वाङ्मय हें मराठींतील ललित वाङ्मयाची सुरुवात या दृष्टीनेंच पडताळून पहावें लागेल. आजची वाङ्मयीन कसोटी त्यास लावून चालावयाचें नाहीं. कारण त्यावेळीं कथेची किंवा कादंबरीची रचना कशी करावी याबद्दलची शास्त्रीय माहिती लोकांना फारशी नव्हती. कला व तंत्र या दृष्टीनें या वाङ्मय प्रकारांचा कुणीं फारसा अभ्यास केलेला नव्हता. "मनुष्य समाजाची मार्मिक परीक्षा करून त्याच्या अंतःकरणांत खोल बुडी घेऊन तेथली तळचीं महार्ह रत्नें बाहेर प्रकटून त्या प्रभेनें जगाला थक्क करणारे ग्रंथकार अद्यापि मराठी कादंबऱ्या लिहूं लागले नव्हते." † तीच गोष्ट इतर वाङ्मय-प्रकारांचीहि होती. उदाहरणार्थ श्री. रिसबूड यांची 'मंजुघोषा' किंवा श्री. हळबेशास्त्री यांची "मुक्तामाला" या मराठींतील सुरवातीच्या कादंबऱ्या यांची सजावट बेताबाताचीच झाली आहे.

विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेनें आणि हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांनीं राजकीय क्षेत्रांत व सामाजिक क्षेत्रांत एक प्रकारची क्रांति घडवून आणलेली आहे. इ. स. १८७० मध्यें महाराष्ट्रांत मोठी खळबळ उडाली होती. उद्धारक आणि सुधारक अशा जुन्या व नव्या मतप्रणालींनीं भारून गेलेल्या लोकांमध्यें एक प्रकारचा उघड तट पडला होता. स्त्रीशिक्षण किंवा विधवांचा पुनर्विवाह इत्यादि विषयांवर सभासंमेलनांतून भाषणें व लेख यांची नुसती गर्दी उसळून गेलेली होती. या विचार क्रांतीमधूनच खरें ललितवाङ्मय निर्माण झालें. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांनीं स्त्रीजीवनाची सहृदय बाजू मांडली, विष्णुशास्त्र्यांच्या निबंधांनीं

* निबंधमाला, भाग १, पान १७५.

† मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, पान ८१.

त्यांना " मराठी भाषेचे शिवाजी " होण्याचें भाग्य मिळवून दिलें, शिवरामपंत परांजपे यांच्या लेखणींतून जळजळीत देशाभिमान प्रगट झाला आणि केशवसुतांच्या कवितेनें क्रांतीची तुतारी वाजविली.

इ. स. १८७४ ते १९२० हा कालखंड अशा प्रकारें एक प्रकारचा क्रांतिकाल होता. यावेळच्या वाङ्मयाचा प्रमुख हेतु राजकारण, व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजसुधारणा या दृष्टिकोनांतून लेखन करून समाजांत जागृति निर्माण करण्याचा होता.

या कालखंडांतील स्त्रीशिक्षणाचा प्रसार अतिशय बेताचा असा झाल्यामुळें व स्त्री वर्गाकडे सहानुभूतीनें पहाणारे लोक त्या वेळीं फार थोडे असल्यामुळें पुरुष लेखकांच्या बरोबरीनें सर्व प्रकारचे वाङ्मयीन कलाप्रकार स्त्रियांनीं हाताळलेले दिसत नाहींत. प्रस्तुत प्रकरणांत याच कालखंडांतील स्त्रियांच्या वाङ्मयाचा विचार करावयाचा आहे.

साळूबाई तांबवेकर

मराठी कादंबरीचा आरंभ करणाऱ्या लेखकांचा संस्कृताशीं फार निकटचा संबंध होता. बाणभट्टाची " कादंबरी " आदर्श मानून त्यावेळच्या लेखकांनीं लेखनास आरंभ केलेला असल्यामुळें त्यांच्या कादंबऱ्यांमधून अद्‌भुतरम्य कथानकें आढळणें स्वाभाविक होतें. असें कथानक असणें हा त्या वेळच्या कादंबरीचा एक आवश्यक भाग होऊन बसला होता ! शिवाय " रूढीच्या चाकोरींतून समाजाचा गाडा शतकानुशतकें जात असल्यामुळें स्वातंत्र्य, ऐश्वर्य व प्रणय हे मानवी मनाला मोहिनी घालणारें त्रिभुवन त्याला सर्वस्वीं पारखें झालें होतें. कादंबरीचें विमान मिळतांच समाजाचें मन या त्रिभूवनांत स्वच्छंद विहार करूं लागलें.*" या कादंबऱ्या प्रामुख्यानें राजा-राण्यांच्या अद्‌भुतरम्य जीवनाचें चित्रण करीत असत आणि बाह्यतः दिसणारा विरोध, आकस्मिक प्रसंग व योगायोग यांवरच मुख्यतः त्यांचें कथानक उभारलेलें असे. १८७३ मध्यें प्रसिद्ध झालेली साळूबाई तांबवेकर यांची " चंद्रप्रभा विरह वर्णन " ही कादंबरी याच पद्धतीची आहे.

साळूबाईंची ही कादंबरी म्हणजे मनःकल्पित अशी एक मनोरंजक गोष्ट आहे. हें पुस्तक कांहीं अंशीं " हातीमताई "च्या जातीचें आहे. त्यावेळच्या इतर कांहीं कादंबऱ्यांप्रमाणेंच येथेंहि अधून मधून साक्या, दोहे व आर्या घातलेल्या दिसतात. या कादंबरींतील चंद्रप्रभा ही जादूगार असल्याचें दिसून

---

* वि. स. खांडेकर, धुंधुर्मास, पा. १२३

येतें. कारण जादूनें स्त्रियांचे पक्षी आणि पुन्हां पक्ष्यांच्या स्त्रिया ती बनवीत असते ! स्वतः लेखिकेनें या पुस्तकाच्या प्रस्तावांत म्हटलें आहे कीं, "स्त्री शिक्षणांत असलेल्या स्त्रियांचा व लहान मुलींचा कांहीं वेळ करमणुकींत जाईल व सुबोधानें मनहि रंजन होईल अशा प्रकारचें एक पुस्तक करून त्यांना यथाशक्ति सादर करावें असा हेतु माझे मनांत उत्पन्न झाला." आणि त्याच हेतूनें या पुस्तकाची रचनाहि झालेली आहे. त्यावेळच्या रीतीप्रमाणें येथें चतुरंग शहराचें वर्णन आलेलें आहे.

स्त्रीनें लिहिलेली अशी मराठींतील ही पहिलीच कादंबरी होय. यापूर्वी मिसेस् फरार व मिस् विल्सन् या लेखिकांनीं ख्रिस्तीधर्माचे प्रसारार्थ मराठींतून लेखन केलें होतें. परंतु ही ग्रंथरचना ललित स्वरूपाची नसल्यामुळें प्रस्तुत प्रबंधांत तिचा विचार करण्याचें कारण नाहीं.

• • •

पंडिता रमाबाई

विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेच्या सुमारासच पंडिता रमाबाई यांनीं आपलीं "स्त्रीधर्मनीति" (१८८२) व "युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिति आणि प्रवास-वृत्त" (१८८९) हीं पुस्तकें भगिनीवर्गासाठीं म्हणून लिहिलीं. आपले विचार स्पष्टमतानें व्यक्त करण्यासाठीं पंडिता रमाबाई यांनीं हातांत लेखणी घेऊन त्यावेळच्या काळाच्या मानानें एक प्रकारची क्रांति केली असें म्हणावें लागेल.

"स्त्री-धर्मनीति" या पुस्तकांत स्त्रियांच्या जीवनाविषयीं लिहितांना त्या म्हणतात, "...चिंचोक्या एवढें किंबहुना त्यापेक्षांहि लहानसें बीं जमिनींत रोविलें असतां, कालक्रमानें त्यापासून जसे मोठमोठे वृक्ष होतात व त्यापासून देशभर मनुष्यांवर महदुपकार होतात, तसेंच प्रत्येक स्त्री जर आपआपलें उद्योगरूपी लहानसें "बीं" कृत्यरूपी जमिनींत रोवील तर कालक्रमानें आमच्या जातीवर महदुपकार होतील.

"...उद्योग करा हेंच मी वारंवार सांगतें. तुमच्या शरीरांत जें रक्त आहे तें मनाच्या उत्साहामुळें उष्ण होऊन प्रत्येक धमनीवाटें मोठ्या मोठ्या वेगानें वाहूं द्या. तुमचें सजीवत्व लोकांस समजूं द्या. तुमच्या जातीचा उद्योग, ज्ञान, तेजस्विता, सत्य, ईश्वरपरायणता, सतीधर्म इत्यादि गुण सर्वांच्या दृष्टीपुढें येऊन त्यांचीं मनें स्तब्ध होऊं द्या. आमच्या ह्या भारत वर्षांतील पूर्व काळच्या साध्वी स्त्रियांचा महिमा पुनरुज्जीवित करा. तुम्हांस कोठें समरांगणांत जाऊन युद्ध करणें नलगे, तुम्ही आपल्या आळसरूपी शत्रूबरोबर निकरानें युद्ध करून त्यास जिंकिलें म्हणजे त्रैलोक्य जिंकिलें..." यापुढें आपल्या देशांतील स्त्रियांनीं समुद्राच्या

मर्यादा ओळखून त्या दृष्टीनें आपल्या मनाची विशालता वाढवावी असें लेखिकेनें सुचविलें आहे. शिवाय आपल्या धन्याची, आपल्या परिस्थितीची कुवत न ओळखतां दागिन्यांचा हव्यास धरून संसारांत भांडणतंटे उत्पन्न करणें म्हणजे साध्वी स्त्रीनें नीतीविरुद्ध वागणें होय असें त्यांनीं स्पष्टपणें सांगून टाकलें आहे. गृहकृत्याविषयीं लिहितांना त्या सांगतात, " गृहकृत्य हें स्त्रियांचेंच काम आहे. तें करण्यास त्यांनीं कधीं हयगय करूं नये. ज्या घरांत स्त्रिया आपल्या घरचें काम करीत नाहींत तेथें सुख नसतें. ज्ञानी लोकांनीं ' गृहिणीच घर ' असें म्हटलें आहे.... "

पंडिता रमाबाईंचें हें पुस्तक म्हणजे स्त्रीजीवनांतील दोषांचें एका स्त्रीकडून पहिल्यांदांच प्रकटपणें केलेलें दिग्दर्शन होय. त्या दृष्टीनें या पुस्तकाचा दर्जा केव्हांहि उल्लेखनीय असाच राहील.

"युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिति" या पुस्तकांत रमाबाईंनीं दिलेली माहिती त्यांच्या सखोल अध्ययनाची साक्ष पटविते. परक्या देशांत गेल्यानंतर त्या देशाचें नैसर्गिक सौंदर्य पहात असतांनाच रामाबाईंनीं तेथील इतिहासाची व भूगोलाची भरपूर माहिती मिळविली. त्या माहितीच्या आधारावरच त्यांनीं या पुस्तकांत अमेरिकेंतील शासनपद्धति, लोकस्थिति, गृहस्थिति, विद्याव्यासंग, धर्ममतें आणि दानधर्म, स्त्रियांची स्थिति आणि व्यापारधंदे इत्यादि विषयीं सुंदर विवेचन केलेलें आहे. तेथील स्त्रियांच्या फॅशनविषयीं बोलतांना त्यांनीं वापरलेला " नखरा " हा शब्द वाचकाच्या मनांत दुहेरी दृष्टीनें लक्षांत रहाण्यासारखा असा योग्य स्थळीं पडलेला आहे. एखाद्या विषयावर स्त्रीनें व्यासंग करून केलेलें लेखन म्हणून सुरवातीच्या काळांतील या पुस्तकाचें महत्त्व विशेष आहे. याच पुस्तकांत लेखिकेनें " लिवरपूलपासून फिलाडेल्फिया " पर्यंतच्या आपल्या प्रवासाचें वर्णन दिलेलें आहे. त्यावेळीं पंडिता रमाबाई ह्या इंग्लंडमधील चल्टन्‌हम् शहराच्या स्त्री विद्यालयांत अध्ययन व अध्यापन करीत होत्या. १८८६ च्या मार्च महिन्यांत डॉ. आनंदीबाई जोशी यांना वैद्यकीय पदवी देण्याचा जो समारंभ होणार होता, त्यासाठीं त्यांना निमंत्रण आल्यावरून त्या फिलाडेल्फियास गेल्या होत्या. त्यावेळीं प्रवासांत झालेला समुद्रांतील वादळाचा त्रास त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केला आहे.–

" समुद्राच्या पर्वतप्राय लाटांच्या जोरानें आमची नाव एकदां आकाशांत आणि एकदां पाताळांत जाई तेव्हां ती आतां बुडते कीं क्षणांत बुडते असा संशय सहज मनांत येई. त्या अफाट पारावारशून्य समुद्रांत वरच्या बाजूस कधीं स्वच्छ, कधीं आभ्राच्छादित असा गोल चांदवा, खालीं हिमालयाच्या लहान लहान टेकड्यांएवढाले कल्लोळ आणि त्यावर आपटत असलेली आमची नाव... भोंवतालच्या देखाव्याशीं तुलना केल्यास आमची नाव पाण्यावर तरंगत असलेल्या लहानशा उडत्या माशासारखी दिसत होती म्हटल्यास चिंता नाहीं...."

अमेरिकेंत पडणाऱ्या बर्फाचें आकर्षण फार लेखकांनीं मोठ्या उत्सुकतेनें आजवर रंगविलेलें आहे. त्याच आकर्षणानें मोहित झालेल्या पंडिता रमाबाई लिहितात, " तुषार पडतांना शब्द मुळींच होत नाहीं. कोणी उभें राहून बारीक सपीट चाळींत असतां तें जसें हलकेंच जमिनीवर पडतें व तें खालीं पडल्याचा शब्द कोणाला ऐकूं येत नाहीं, त्याप्रमाणें तुषारहि कोणाला नकळत पडतो. त्याचे कण आकाशांतून खालीं येतात, तेव्हां ते पांढऱ्या जाईचे फुलांच्या नाजूक पाकळ्यांसारखे नाचत बागडत, उडत पडत, गोंधळत मोठ्या घाईनें धावत येत असलेल्या अणुरेणू एवढाल्या आनंदी पऱ्यांप्रमाणें सुरेख दिसतात. "

पंडिता रमाबाईंच्या ह्या उपमा स्त्री हृदयांतून निघालेल्या असल्यानें येथें विशेष हृद्य झालेल्या आहेत. त्यांची वर्णनाची हातोटीहि चित्ताकर्षक असून त्यांचे ठायींच्या स्त्रीस्वभावाचा सुंदर आविष्कार येथें झालेला दिसून येतो.

● ● ●

काशीबाई कानिटकर

काशीबाई कानिटकर ह्या हरिभाऊ आपट्यांच्या समकालीन अशा लेखिका होत. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांची छाप त्यांच्या वाङ्मयावर बरींच पडलेली दिसते. " जेन ऑस्टेन व डिकन्स या दोघांनीं इंग्रजी कादंबरीला जें वळण लावलें, तेंच हरिभाऊंच्या लेखणीनें मराठी कादंबरीला लावलें. मानवी सुखदुःखें राज्यक्रांत्यांपेक्षांहि हृदयांत घडून येणाऱ्या परिवर्तनावर अवलंबून असतात. घरोघर आणि गांवोगांव जुनीं मतें व नवीं मतें यांच्यांत जी रस्सीखेंच चालली आहे तीच सर्व बऱ्यावाईट सामाजिक प्रसंगांच्या मुळाशीं आहे. रूढी, शिक्षण, मनुष्यस्वभाव इत्यादिकांच्या मिश्रणानेंच कौटुंबिक व सामाजिक जीवन निर्मळ अथवा गढूळ होतें, हें लक्षांत घेऊन हरिभाऊंनीं आपल्या सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. "* हरिभाऊंच्या कादंबऱ्यांनीं मराठींतील कादंबरीचें नवें युग निर्माण केलें आहे.

हरिभाऊंनीं आपलें लेखन जोरानें सुरू केलें, त्यावेळीं स्त्रीशिक्षणाचा पाया भक्कमपणें घातला जात होता. त्यामुळेंच एका विशिष्ट दृष्टिकोनांतून त्यावेळच्या सुशिक्षित स्त्रीचें चित्र पुरुष कादंबरीकारांनीं चित्रित करण्यास आरंभ केला. पण सुदैवानें याच वेळीं मराठी कादंबरीच्या परिसरांत एक अभिनव प्रयोग करण्यांत आलेला दिसून येतो. स्वतःच्या भावना स्वतःच्याच शब्दांत रंगविण्याची अभिनव कल्पना काशीबाई कानिटकरांनीं अमलांत आणली. हरिभाऊंच्या उत्तेजनानें त्यांनीं आपलें कादंबरीलेखन सुरू केलें. त्यावेळच्या समाजाच्या दृष्टीनें हा प्रयोग खरो-

* वि. स. खांडेकर, धुंधुर्मास, पान १२८.

खरच उल्लेखनीय होता यांत शंका नाहीं. पण हरिभाऊंसारख्या खंद्या लेखकाच्या निकटच्या सहवासांतील प्रोत्साहनामुळें काशीताईंना या प्रयत्नांत यश येत गेलें. " रंगराव " ही काशीताईंची पहिली कादंबरी. ही कादंबरी म्हणजे रंगरावचें जसें घडलें तसें लिहिलेलें एक जीवनचरित्र आहे. त्यामुळें पुष्कळ ठिकाणीं हें पुस्तक वाचतांना वाचकांच्या मनांत निर्माण होणारी उत्कंठा इथें फार वेळ टिकत नाहीं. मराठी भाषेची ठाकठीक घडण होत असलेला हा काळ होता. त्यामुळें कादंबरीच्या लेखनांत सुटसुटीत वाक्यांचा भरणा विशेष आढळतो; आणि ह्या कादंबरीचें हेंच प्रमुख वैशिष्ट्य आहे. या कादंबरीची भाषा साधी, सोपी आणि घरगुती आहे. तथापि येथें काशीताईंची लेखणी घरगुती प्रसंगांपेक्षां सृष्टिवर्णनाकडेच विशेष झुकलेली दिसून येते. त्यावेळीं माणसाच्या अंतरंगांत चाललेलें भावनेचें तांडव नृत्य मनोविश्लेषणाच्या पद्धतीनें रंगविण्याची चाल फारशी नव्हतीच. बाह्य जग रंगविण्याकडेच लेखकाचें विशेष लक्ष असे. अर्थात् या गोष्टीला काशीताई तरी अपवाद कशा ठरणार ? काशीताईंची वर्णनशैली मात्र या पहिल्याच कलाकृतींत उल्लेखनीय अशी उतरलेली आहे. त्या दृष्टीनें " सीमोल्लंघन " या प्रकरणांतील पुढील भाग अवश्य पहावा:—

" पर्जन्यकाळाचे दिवस संपून थंडीच्या दिवसांना आरंभ झाला आहे. हे दिवस हंगामाचे असल्यामुळें श्रीनगरच्या सभोंवतालच्या रानांत लग्नघरासारखीं शोभा आली आहे. रानांतील बाजऱ्या कापून गहूं, हरभरा, ज्वारी यांच्या पेरण्या चालल्या आहेत. तिळांना फुलें आल्यामुळें जमिनीचा कांहीं भाग पिवळा व कांहीं भाग मखमलीच्या तांबड्या व केशरासारख्या रंगाच्या फुलांनीं शोभायमान दिसत आहे. रानांत मधून मधून धोतऱ्यासारखीं रानवट फुलें पसरलेलीं आहेत. शेतांमधील कांहीं ठिकाणच्या गहूं हरभऱ्यांच्या पेरण्या लौकर झाल्यामुळें त्या ठिकाणीं रोपें वर येऊं लागलीं आहेत. कांहीं शेतांत बाजरीचीं कणसें हिकडून तिकडे हेलकावे खात असल्यामुळें बघणारास असा भास होई कीं, हीं निस्सीम भगवद्भक्त असून परमेश्वराच्या भजनांत निमग्न होऊन त्या भक्तिरसांतच डोलत आहेत कीं काय कोण जाणें ! इकडे शेतांमधून कोणी गवत कापीत आहे, कोणी कोळपीत आहे, तिकडे पहावें तों बाजरीच्या कापणीकरितां पोटार्थी स्त्रीपुरुषांच्या व पोराबाळांच्या झुंडीच्या झुंडी डोकीवर भाकरीच्या पाट्या, पाण्याच्या घागरी वगैरे घेऊन चालल्या आहेत. कोठें कोठें भुईमूग काढण्यासारखा झाल्यामुळें तेथेंच कांहीं माणसें शेंगा वेचीत आहेत. ज्या स्त्रियांचीं तान्हीं मुलें होतीं त्यांनीं तीं पाट्यांतून घालून त्या पाट्या झाडांच्या व गुडाच्या केलेल्या कोपीच्या सावलींत ठेविल्या आहेत... "

काशीताईंनीं घराबाहेरचें हें दृश्य जितक्या जिव्हाळ्यानें रंगविलें तितक्याच आत्मीयतेनें सैंपाकघरालाहि वाङ्मयांत अमर केलें आहे. सैंपाकघराशीं स्त्रीचा

संबंध अत्यंत निकटचा असल्यामुळें काशीताईंची लेखणी हें दृश्य अधिक आत्मीयतेनें कशी रंगवूं शकली हें पुढील वर्णनावरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

... " ती पहा त्या घरांत स्वयंपाकघराच्या जवळच धुरानें काळी झालेली एक खोली आहे. दाराजवळच्या एका भिंतीशीं तो गळ्याइतक्या उंचीचा शिसवी बारीक व गुळगुळीत एक खांब आहे, ती पहा वरच्या बाजूला कांहीं लहानमोठीं शिंकीं आहेत. आणखी पलीकडच्या बाजूला एकदोन फडताळें उघडीं पडलेलीं आहेत. त्या शिंक्यावर व फडताळांत तऱ्हेतऱ्हेचीं भांडीं आहेत. दगडया, नवीन चिनी बरण्या, कांहीं झाकणाचे पेले, तपेल्या, कथल्या, बकमें, कासंडया वगैरे मोठ्या व्यवस्थेनें फडताळांत व शिंक्यावर ठेवलेलीं आहेत. घुसळ खांब्याजवळ सरासरी घागर पाणी मावण्याजोगी एक कथली आहे. आणि ताकाचा शिल्...शिल्ल्...शिल्ल्...शिल्लल् असा शब्द निघत असून, त्यांतच ताक करणारीचे बांगडयांचा मंजुळ ध्वनि मजेनें मिळतो आहे...."

काशीताईंनीं " रंगराव "मध्यें जेवढें वर्णनाचें कौशल्य दर्शविलें तेवढेंच कल्पनेचें सौंदर्यहि खुलविलेलें आहे. " आनंद करा " या प्रकरणांतील पुढील भाग या दृष्टीनें फारच चांगला झालेला आहे.

" प्रथम डोंगराच्या पायथ्याशीं जाऊन पोहोंचल्याबरोबर वरून एका झुळझुळ वाहणाऱ्या स्वच्छ अशा ओढ्यानें ह्या अतिथ्यांचें पादप्रक्षालन केलें; नंतर पुढें जातात तों मोठमोठाल्या वृक्षांच्या पडलेल्या पाचोळारूपी रुमालानें त्यांचे पाय कोरडे केले, अतिथि थकून भागून आले असतील, म्हणून झाडांच्या शाखारूपी विंझण्यांनीं त्यांस मंद मंद वारा घातला; त्यांस मोठमोठीं शिलारूपीं आसनें दिलीं. त्या आसनांवर कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर कोंवळ्या कैऱ्या, हिरवीं करवंदें, आणखी कुठें क्वचित् तांबूस झालेल्या जांभळाचे दोडे या पक्वान्नांनीं त्या पाहुण्यांची क्षुधा शांत केली..."

काशीताईंनीं संस्कृताचें अध्ययन केलें होतें. त्यामुळें या कादंबरींत बऱ्याचशा संस्कृत शब्दांचाहि भरणा झालेला दिसून येतो. त्यांचीं हीं वर्णनें वाचायला लागलें म्हणजे शिवरामपंत परांजप्यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. निसर्गाशीं एकरूप होण्यांत शिवरामपंतांना त्या हार जाणार नाहींत असें म्हणावयास हरकत नाहीं ! त्यावेळच्या मानानें काशीताईंनीं स्वतंत्र रीतीनें लेखन करून क्रांति केली खरी, परंतु आपलें लेखन लोकांना कितपत आवडेल ह्या मनावरच्या दडपणामुळें यावा तसा घरगुती मोकळेपणा मात्र सर्वत्र आलेला दिसत नाहीं. त्यामुळें पुष्कळदां असें झालें आहे कीं, कादंबरींत येणारी सर्व हकीकत कांहीं प्रकरणांच्या सुरवातीला आणि वाचक कंटाळतील या भीतीनें कांहीं प्रकरणांच्या अखेरीस आलेली आहे. उदा. भाग ११ ची ही सुरवात पहा—

"...आज आपल्याला आतां नव्याच एका गावांत जावयाचें आहे. अनोळखी म्हणून तेथें गेल्यावर कदाचित् आपला अपमान होईल, याची काळजी नको. नाहीं कोणी आपल्याला विचारलें तर नाहीं. आपण जी ओळख व्हावी म्हणून जातों आहों, ती करून घेऊंच घेऊं......"

आणि भाग ९ चा हा शेवट याच संदर्भात पहावा—

"....हें कुटुंब कोणाचें होतें, हें आजच आमच्यानें सांगवत नाहीं. ह्या दुःखकारक गोष्टीचा अंमळ विसर पडला म्हणजे मग स्वस्थपणानें दुसऱ्या एखाद्या भागांत सांगूं..."

निवेदनाच्या ह्या पद्धतीमुळें कित्येकदां वाचकाला खटकल्यासारखें होतें. कांहींतरी पेच प्रसंगानें पुढें येणाऱ्या हकीकतीचा उत्साह यामुळें मावळून गेल्यासारखा होतो!

संवाद लेखनाच्या बाबतींत काशीताई बऱ्याच यशस्वी झालेल्या दिसतात. घरगुती प्रसंगांवर आधारलेलें त्यांचे संवादलेखन जिव्हाळ्यानें झालेलें आहे. त्यामधून त्यावेळच्या समाज रचनेचेंहि बरेंचसें दर्शन घडतें. उदाहरणार्थ 'अंतःप्रवेश' या विभागांतील पुढील संवाद या दृष्टीनें सुंदर आहेत.

"राधाबाई:—ती मुलगी पाहिलीत का?...तिच्या त्या गुलाबी गालावर गोंदलेली टिकली पहा! संध्याकाळच्या तांबूस आभाळांत एकादा लहान काळा ढग असावा, आणखी तो जसा शोभतो, तशी ती शोभते आहे!...कपाळीं आडव्या चंद्राकार कुंकवाची बारीक चिरी; तिचे खालीं अगदीं बारीक लहानशी टिकली लावली आहे; खोप्यामध्यें सोन्याची मूद, अग्रफूल, फिरकीचीं दोन फुलें, एक आंत आणि एक बाहेर उफराटें घातलेलें आहे; वेणीच्या वरच्या बाजूला पानासुद्धां गुलाबाचें एक फूल झोकांत ठेविलेलें आहे; लुगडेंहि बऱ्याच मोठ्या किंमतीचें असून तें अगदीं चापूनचोपून पट्टेदार नेसली आहे. अंगावर दागिने, कानांत मोत्यांची कुडीं, कुरडूं; नाकांत झुपकेदार नथ, हातांत गोटपाटल्या; गळ्यांत सरी आणि अवश्य त्या गळसऱ्या घातल्या आहेत; अंगांत तंग चोळी असून, पदर आडवा बांधलेला, सुमारें पंधरा सोळा वर्षांच्या वयाची, तारुण्यानें ओतप्रोत भरलेली, अशी आंब्याची मंजरी रसानें भरलेली असावी, तशी ही स्त्री आहे...

राधाबाई:—आमच्या सासूबाई माझ्या अंगावर घर टाकून खुशाल दोन दोन चार चार महिने माहेरीं जाऊन रहात असत. तर मी बघा घरांत त्यांच्यासारखं जिथल्या तिथं करावं, कोणचं कमी पडून दिलं नाहीं. नाहींतर ह्या मुली!...एखादा जर पदार्थ करायला सांगितला तर, त्यांना जसं बुजल्या बुजल्यासारखं होतं. कालच मी दोन प्रहरीं अंमळ निजलें होतें. म्हणून हिला सांगितलं कीं, तेवढं दूध विरज, तर तिनं आपलं सारं दूध एका ठिकाणीं ओतलन्! मी संध्याकाळीं जों मुलांना कालवणाकरितां दूध पाहूं लागलें, तों आपलं सारं

विरजलेलं ! ! इतकं कां बरं आतां लक्षांत येऊं नये ? बुकं नि पत्रं हीं सारा दिवसभर आहेतच. पण सकाळीं दोन घटका संध्याकाळीं दोन घटका नको कां बघायला ? आपला बाई हा बायकांचा जन्म. किती जरी शहाणपण असलं, किती जरी श्रीमंती असली तरी अगोदर हें शहाणपण नी त्याच्यामागून तें, तेंही राहिल्या-साहिल्या वेळांतलं. कां मी खरं म्हणतें कीं, खोटं म्हणतें सगुणाबाई ? तुम्ही सांगा.

सगुणा:—खरंच आहे तें. बायकांना ढीग लिहिणं आलं तरी त्यांच्या कपाळचीं मडकीं खरडायचीं चुकतील कां ? तीं त्यांना खरडलींच पाहिजेत.

राधाबाई:—अस्सं, कसं बरं बोललांत ? दूध दुभ्तं, पक्वान्नं बिक्वान्नं हीं बायकांना आलींच पाहिजेत; आणखी तीं त्यांतून येणं म्हणजे भूषणहि आहे. तसंच कांहीं झालं केलं म्हणजे पानं वाढणं, चांगला सैंपाक करणं हें सुद्धां आलं पाहिजे.... "

या कादंबरींत याशिवाय नारायण पेठी लुगड्यांचा वापर सांगणारा किंवा " तीन आणे किंमतीची गुलाली किंवा पारव्या खणाची चोळी जाऊन वीत वीत काठाची रेशमी धारवाडी खणाची चोळी आली. भिवंडीचा बांड जाऊन नारायणपेठी काळी चंद्रकळा झळकूं लागली. " असा त्यावेळचें समाज जीवन सांगणाराहि उल्लेख आढळतो.

त्याचप्रमाणें येथें " आतां तिच्या (रंगूताईच्या) पोटांत दगड उभा राहिला आहे. " (काळजी) किंवा " एकदां डोकीवरचं खांद्यावर येऊं दे बाबा " (सखूठकूच्या लग्नांतून मुक्त होण्यासाठीं मथूताई) अशा विविध घरगुती म्हणींचा वापरहि आढळतो.

" रंगराव "पेक्षां " पालखीचा गोंडा " ही काशीबाई कानिटकरांची दुसरी कादंबरी जास्त घरगुती आहे. " ही कादंबरी १८९७ सालीं मला मिळाली. " असें खुद्द काशीबाईंनींच या कादंबरीच्या प्रस्तावादाखल लिहिलेल्या " दोन शब्दांत "त म्हटलें आहे. त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीचें सुंदर चित्र येथें पहावयास सांपडतें. लेखिकेनें स्वतःच म्हटलें आहे कीं, " त्यावेळच्या परिस्थितीचें चित्र या कादंबरींत पहावयास सांपडेल. " तेव्हां या कादंबरीच्या यशापयशाचें मूल्य मापन करतांना हीच गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत घ्यावी लागेल.

" हत्तीची अंबारी मिळो कीं न मिळो पण जिथें पालखीचा गोंडा, मोत्याचा कंठा असेल अशाच घरीं मुली द्यायचा हा तर बाई माझा पण आहे " असा जिच्या आईनें निश्चय केला होता अशा रिऊताईचें हें एक जीवनचित्र आहे. एका वेडसर युवराजाशीं फसवणुकीनें रिऊताईचें लग्न होतें. त्यामुळें तिला व तिच्या आईवडिलांनाहि मनस्वी ताप होतो. पण याहि मनःस्थितींतून स्वतःच्या कर्तबगारीवर ती आपल्या राज्याची व्यवस्था पाहाते व शेवटीं तीर्थयात्रेस निघून जाते, असें या कादंबरीचें अगदीं थोडक्यांत कथानक आहे. कथानकाची एकंदर

गुंफण चांगली झालेली आहे हें मान्य केलें तरी त्याहिपेक्षां स्वभावलेखनाची कला काशीबाईंना चांगलीच अवगत होती या गोष्टीची कल्पना येथें प्रामुख्यानें आल्याविना रहात नाहीं. नानासाहेबांसारख्या वेडसर मुलाच्या स्वभावलेखनाची चुणूक अगदीं पहिल्याच प्रकरणांत आलेली आहे. सुरवातीपासून अखेरपर्यंत नानासाहेबांच्या वेडसर लीलांचें वर्णन काशीबाईंनीं मोठ्या कुशलतेनें चितारलेलें आहे. सुरवातीला दिसणारे व्यक्तीमधील गुणदोष प्रसंगांतून जसेच्या तसे फिरते ठेवणें ही एक मोठी कला आहे. कादंबरींतील स्वभावलेखनाचा हाच विशेष होय. हरिभाऊ आपट्यांचें लेखनांतील यश आज त्यांच्या अशाच प्रकारच्या स्वभाव लेखनाच्या तेजस्वी हाताळणीमुळें चिरंतन झालेलें दिसून येतें. त्यांच्या संगतीमुळेंच काशीताईंनीं या कलेंत यश मिळविलें असावें असें म्हणावयास हरकत नाहीं.

रिऊताई, तिचे आईवडील, भाऊ नाना व भगिनी मनुताई आणि तिच्या सासूबाई–राणीसाहेब–यांच्या स्वभावरेखा एकापेक्षां एक सरस वठलेल्या येथें दिसून येतील.

या कादंबरीमध्यें सामाजिक जीवनाचें दर्शन घडवितांना काशीबाईंची लेखणी स्त्रीस्वभावाला धरूनच विशेषत: चालतांना दिसते. कादंबरीची सुरवातच मुळीं अशा घरगुती प्रसंगानें झालेली आहे कीं, ती वाचतांक्षणींच येथें आतां भरपूर घरगुती प्रसंगांचें रम्य दर्शन घडावें अशी वाचकांच्या मनांत कल्पना उभी रहावी. हा प्रसंग असा:—

" एकदां तिसऱ्या प्रहरीच्या वेळीं आमची आई, नारूकाकांची लक्ष्मीकाकू, परसूकाकांची अंपूकाकू, आणखी आमची मोठी मामी अशा सगळ्या जणी आपापल्या घरची डाळ, तांदूळ निवडावयाला बसल्या होत्या. आईनें मला आणि ताईला चिपटें चिपटें डाळ निवडावयाला दिली होती. ती झाल्याशिवाय खेळावयाला जायचें नाहीं, असें तिनें सांगितलें होतें, म्हणून आम्ही दोघी त्यांच्यांत होतों, नाहींतर आम्हांला मोठ्या बायकांत फारशी बसूं देत नसे.

" ते दिवस पावसाळा संपण्याचे होते. नवरात्राची सहावी माळ होती. डाळ निवडून झाल्यावर देवीला जायचा सगळ्यांचा बेत होता.

" त्या आपल्या एकमेकींत इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत असतां लग्नकार्यांच्या गोष्टी निघाल्या. अंपूकाकू म्हणाल्या, " रमाकाकू तुमच्या रिऊताईंचं नाहीं का लग्न यंदां ? " तेव्हां आई म्हणाली, " नाहीं कसं !, यंदां नाहीं बाई ठेवायचं, यंदां केलं म्हणजे कशी ठीक नवरी दिसेल. बिंदीपट्टा शोभेल. नाहींतर तो मोठ्या मुलींना नाहीं बाई शोभत... "

त्यावेळीं अधिकारी नवऱ्याबरोबर कुठें फिरतीवर जावयाचें म्हणजे आपणांला दररोजच्या सैंपाकाला लागेल एवढ्या जिनसा स्त्रिया बरोबर घेऊन जात असत. दोनचार महिन्यांची साधारणतः ही फिरती असे. तेव्हां पंचाईत पडूं नये म्हणून

स्त्रीस्वभावानुसार स्त्रिया पाट्या-वरंवट्यासह सामान नेत! असाच एक प्रसंग रंगवितांना " आमचा बेत ठरला " या प्रकरणांत काशीताईंनीं लिहिलें आहे—

"आई:—अण्णा, परवां रे कसं निघणं होईल? सारा पसाराबिसारा आवरून बरोबर काय घ्यायचें तें घेऊन व्हायला नको का ?

मामा:—व्हायचं व्हायचं तें काय? दोन लुगडीं घ्यावीं आणि निघावं झालं. आज काय नव्यानं कां जायचं आहे फिरतीवर ?

आई:—अण्णा, मला तुमचं पुरुषांचं मोठं नवल वाटतं. तुम्हांला कांहीं लागत नाहीं, काय लागतं तें आम्हा बायकांना, अशी आपली तुमची समजूतच नाहीं बरं!

मामा:—अक्का, तुला राग येऊं देऊं नको. पण आम्ही पुरुष जर गांवाला जायला निघालों तर आमची एक ट्रंक आणि वळकटी झाली कीं, झालं आटपला कारभार. आणि तुमचं म्हटलं कीं, आपलं पर्वतप्राय ओझं. आवरतां आवरतां पुरे वाट! कुठें पाटाच घेतील, कुठें जातंच घेतील, मिठाचा रांजण घेतल्याशिवाय कसं बाई चालेल? स्वयंपाक घराची मोरी घेतल्याशिवाय हात कुठं धुवावेत अशा तुमच्या अडचणी निघतात!

आई:—पुरे रे तुझं! मोरीन्, जातन् मिठाचा रांजण कां मी बरोबर घेत असतें दर खेपेला! आतां पाटा म्हणशील तर तो बरीक लहानसा बरोबर लागतो. तो तरी आमच्यासाठीं कां लागतो! तुम्हां पुरुषांच्या पानावरचं वाढायला कुठें मीठ चटणी लागते, तेवढ्यांसाठींच घ्यावा लागतो. नुसतं पान वाढलं तर तें चांगलं दिसणार नाहीं म्हणूनच ना? जें लागतं तें तुमच्या पुरुषासाठींच. आम्हांला कांहींच लागत नाहीं. आचारी बुंदीमोतीचुराचे झारे बाळगतो तो कां बाळगतो? तसंच आम्हाला डोंगराएवढं सामान लागतं तें तुमच्यासाठीं लागतं बरं..."

" मामा:—पण फैटण ठरवायला हवी ना? कां आगगाडीनें जाण्याचा विचार करतां?

आई:—आगगाडीची नको बाबा कटकट. इथून तितकं जाऊन तरी पुढें टांग्यांतच जायचं ना? तीनतीनदां चढा उतरायला तरी नको. इथं एकदां सामान भरलं कीं आपल्या दारापाशीं जाऊन उतरलं. तें सुखाचं होईल.

मामा:—बरं तर पाहातों फैटण, पण सामान फैटणीच्या बेताचेंच घ्या हो? नाहींतर घ्याल बैलगाडी सारखं!......."

अशा प्रकारचे संवादहि येथें मधून मधून आढळतात. त्यांत सूक्ष्म विनोद, सहज सुंदरता आणि ओघवती घरगुती भाषा आलेली आहे. शिवाय हे संवाद वाचनाच्या दृष्टीनें चटकदारहि आहेत यांत शंका नाहीं.

मुलींना भावल्यांचा विशेष नाद असतो. भातुकलीचा खेळ मांडून जणूं त्या आपल्या भावी जीवनाचें स्वप्नच साकार करण्याचा प्रयत्न करीत असतात.

मुलींचा हा भावल्यांबद्दलचा स्वभावविशेष काशीताईनीं पुढील शब्दांतून व्यक्त केलेला आहे.

" ...आज देईल ते दोन पैसेसुद्धां त्यांतच घालून पहिल्यांदां एकच चांगली बाहुली घ्यावयाची, आणि समाइकीनें दोघींनीं खेळावयाचें, असा बेत करून आम्ही आपले सागरगोटे, कवड्या ठेवण्याचे झोळणे काढिले. त्यांतल्या चिंध्याचांध्यांच्या पुरचुंडया गाठोडया शोधतां शोधतां पया-पैसे मिळून दोघींचे दोन दोन आणे जमले. इतके पैसे जमल्यावर मग समाईक बाहुली आणण्याचें कारणच उरलें नाहीं. दोघींनीं निरनिराळ्या बाहुल्या दोन दोन सव्वादोन दोन आण्यापर्यंत आजच आणण्याचें ठरलें.

... आमचा बेत ठरला....आम्ही लागलीच त्या बाहुल्यांना आणल्याबरोबर साडया कोणत्या नेसवाव्या, त्यांच्या अंगावर पहिल्या दिवशीं दागिने काय घालावे, याचे बेत करीत बसलों...

....मीं म्हटलें, "मी आपल्या बाहुलीस भरगच्ची शालू नेसवीन !" वारी म्हणाली, "मी बुट्टयाचा शालू नेसवीन !" ताई म्हणाली, "माझ्याजवळ बाई एक चांगलंसं जरीचं पातळच आहे, तें नेसवीन." हे आमचे बेत चालले होते. "नव्या बाहुलीला छान छान पोशाख, छान छान दागिने घालून आपण नटवूं, आणखी उद्यां भातुकलीला घेऊन पुष्कळ मुली जमवून त्यांना आपल्या राजाच्या राण्यासारख्या बाहुल्या दाखवूं. ती आपली द्वारकी ती ! तिनें कबूल केलें तर आपण तिच्या बाहुलीशीं लगीन करूं गडे. अंतू, तूं एक तुतारी नाहींतर घोडा असंच घे बरं का." असें आम्हीं त्याला सांगितलें. तो म्हणाला, "त्यांतलंच काय म्हणून घ्यायचं ग ताई ?" ताई म्हणाली, "अरे, आम्ही जेव्हां भावलीचं लगीन लावूं, तेव्हां तुझी तुतारी वाजंत्र्यासारखी वाजवायला होईल. घोडा आणलास तर नवरा मुलगा न्यायला आणखी वरात आणायला उपयोगीं पडेल." हें बोलणें ऐकून वारी म्हणाली, "इश्श ! वरातीला घोडा कसला ? खेडेगांवसारखी चांगली पालखी नाहींतर हत्तीची अंबारी असावी, नाहीं का ग माई ?" मी म्हटलें, "अग वारे, हवं सगळं, पण आपल्याला मिळायला पाहिजे ना ?" वारी म्हणाली, "न मिळायला ग झालं काय ? आपल्या शिताकाकूंच्या द्वारकीच्या आतेबहिणीची मागं श्रावणपाटी आली त्यांत सगळें आहे. पालखी, मेणा, घोडे, त्यांतलं आणूं आपण मागून. नाहींतर द्वारकीलाच आणायला सांगू." ताई म्हणाली, "हो हो गडे, ही बरी युक्ति काढलीस. आपण आपली तिलाच करूं नवऱ्याकडली. म्हणजे ती आपल्या मुलीला दागिने आणखी साड्या चांगल्या घालील. झालंच म्हटलं तर लगीनसुद्धां थाटामाटानं करील."

मी म्हटलं, "त्यांत बाई दोन नडी आहेत. एक आपली बाहुली तिला द्यावी लागेल, आणखी तिची सत्रांदां आर्जवं करावीं लागतील. ती होणार

मुलाकडली मग आपण आपलं तिच्यापुढें नाक घासायला तयार झालं पाहिजे. आपली बाहुली तिला दिली म्हणजे मग ती कांहीं परत घेणार नाहीं. मग आपल्याला पुन्हां एकच बाहुली ! " ताई म्हणाली, " आपण आपली तिच्याशीं बोलीच करूं कीं, लगीन झालं म्हणजे आठ दिवसांनीं आमची बाहुली आम्हांला परत दे म्हणून ! " वारी म्हणाली, " असं कसं ग होईल ? एकदां लगीन करून दिलेली बाहुली परत कां कुणी आणतात ? लगीन झालं कीं, मुलीवर सासरचा हक्क असतो म्हणतात महाराज बरं कां ! " ताई म्हणाली, " हें कांहीं खरंच माणसाचं लगीन आहे वाटतं ?... "

आणि अशा या भावलीच्या लग्नाची हकीकत देऊन पुढें काशीताई सांगतात–" रुखवत नेलें, आणखी नानानें खरोखरच मारती गड्याला सांगून बाबांच्या घोड्यावर खोगीर घालवून आणलें. नवरा मुलगा घोड्यावर बसविला. दोन पावलें घोडा चालला नाहीं तोंच नवरा मुलगा खालीं घोड्याच्या पायाशीं पडला...हा सारा खेळ या नानिटल्यानें केला...(घोडा मोडला नाहीं !)

झालें. अशा कांहीं गमतीच गमती होऊन आमच्या बाहुलीचें लगीन पडलें एकदांचें पार. मांडव परतण्याला आईनें मोठी भातुकली केली. खूप मुली आल्या होत्या. मागल्या परसांत पुष्कळ जणी गिळून फुगड्या, झिम्मा, गोफ विणणें, आठजणींचा झिम्मा, असे पुष्कळ खेळ खेळलों. मग आमचे फराळ झाले. फराळ करितांना आम्ही द्वारकीला खूप उखाणे घातले. पण भांडण बिंडण कांहीं झालें नाहीं. हळदीकुंकू, विडे, ओट्या झाल्यावर सर्व मुली आपापल्या घरीं गेल्या... "

बाहुलीच्या लग्नाच्या या हकीकतीमधून काशीताईंनीं त्यांच्या काळच्या खरोखरीच्या लग्नाच्या चालींतील बारकावा सांगितला असून, एक प्रकारें जुन्या काळच्या सामाजिक इतिहासाचीहि नोंद केली आहे, असें या ठिकाणीं अवश्य म्हणतां येईल.

मुलगी सासरीं जात असतांना तिच्या वियोगाचें स्त्रीला होणारें दुःख अवर्णनीय असतें. मुलगी जन्मल्यापासून तिच्या आईच्या रक्तांतील अणुरेणू तिच्या वाढीसाठीं खर्चीं पडलेला असतो. त्यामुळें मुलगी सासरीं जात असतां ती आतां परक्याची झाली या भावनेनेंच तिच्या मनाला विलक्षण यातना होत असतात. त्या यातनांचा आविष्कार काशीताईंनीं पुढीलप्रमाणें केला आहे—

" अंबा शिंपून गौरीहराजवळचा विधी झाल्यावर आईकडे ताई गेली. आईनें तिला पोटाशीं घट्ट धरलें व आज चार दिवस जे अश्रु दाबून ठेविले होते त्यांना तिनें डोळ्यावाटें मोकळी वाट करून दिली. ती आपले सर्व विकार, सर्व दुःख पाण्याबरोबरच बाहेर व्यक्त करीत होती, तिच्यानें एक शब्दहि बोलवला नाहीं. फक्त ती आपल्या पदरानें आईचे डोळे पुशीत होती. मधून मधून तिच्या तोंडावरून व पाठीवरून हात फिरवीत होती. त्याचप्रमाणें ताईहि करीत होती. ती आपली

ते नाजूक, कमळाच्या देंठासारखे हात आईच्या गळ्यांत घाली; केव्हां त्या हातांनीं आईच्या कमरेला विळखा घाली. या कृतींवर त्यांच्या अंतःकरणांतील भाव व्यक्त होत होता. ''

आणि अशा वेळीं आजवर आपल्याशीं घडोघडी खेळलेली! आपली ताई सासरीं जात आहे, या कल्पनेनें तिच्या बहिणीच्या मनांत उडालेला गोंधळ काशी-ताईनीं मोठ्या कुशलतेनें कसा व्यक्त केला आहे पहावा—

" ताईचं शुभ लग्न सावधान " झालं त्याच वेळेपासून तिचा पुन्हां जन्म झाला. आमची पहिली ताई त्या दिवशीं इहलोक सोडून त्याच देहांत ही दुसरी ताई अवतरली. आतां आम्ही सर्व तिच्या हाडामांसांचीं, एका रक्ताचीं माणसं दुरावून संपत्तीनं वश झालेलीं माणसं आतां तिला जवळचीं झालीं. मी आतां एकटी झालें... " ही कल्पना मनांत येतांच मला अशी उत्कंटा कीं, या आपल्या ताईच्या–ती फारशी अजून आपल्याला परकी झाली नाहीं, तोंच–गळ्याला घट्ट मिठी मारून भेटून घ्यावें. आपल्या मनाशीं तिच्या मनाची गांठ एके ठिकाणीं बांधून टाकावी. तिचा स्पर्श आपल्या अंगांत सांठवून ठेवावा. तिचे सुंदर शब्द आपल्या कानांत भरून घ्यावे. असें मनांत येऊन मी आपले हात पसरून ताईला मिठी मारण्याकरितां पुढें केले तोंच ठकीनें मला दंडाला धरून हालविली व ती म्हणाली, "चल, आपण तिकडे बायका बसल्या आहेत तिकडे जाऊं. " मी शुद्धीवर आल्यासारखी होऊन इकडे तिकडे पाहिलें; मला अतिशय गहिंवर आला; माझें रडें मला आवरेना आणि मी डोळे पुशीत पुशीतच ठकी, वारी यांच्यामागून कांहीं एक न बोलतां बायकांमध्यें जाऊन बसलें " (वरातीची धांदल).

पुष्कळदां असें आढळून येतें कीं, सुरवातीला सर्वांच्या मतें पसंत पडलेलें चांगलें स्थळ बघून समाधानानें मुलगी देतात. पण त्यानंतर कांहीं दिवसांनीं दुर्दैवानें असें घडतें कीं, तेंच चांगलें स्थळ म्हणजे नुसता कैदखाना होऊन बसतो. आणि अशा कैदखान्यांत नाइलाज म्हणून शेंकडों नववधूंना डांबून घ्यावें लागतें. आजवरच्या रूढीप्रमाणें " पदरीं पडलें नि पवित्र झालें " अशा समजुतीवर " हेंच आपलें घर ", इथंच आपला घास मापला आहे ", " इथंच आपला देह झिजवा-यचा आहे", "आपल्या नशिबानं खैर करून आपल्या वांट्याला दिलेली ती हीच जागा आणि म्हणूनच हेंच आपलं सारं कांहीं " अशा प्रकारच्या समजुतीनं सासरीं कितीहि त्रास होत असला, तरी स्त्रीला तिथें दिवस काढावे लागतात. अशा परिस्थितींत तिच्या मनाचा होणारा कोंडमारा काशीताईनीं पुढील शब्दांतून व्यक्त केला आहे.

" ठकी म्हणाली, " थोडं थोडं उजाडल्यापासून माध्यानीपर्यंत आणखी चार वाजल्यापासून ते दिवे लागणीपर्यंत सारखं पाण्यांत असायचं ! पाह्यला गेलं

तर घरांत आम्ही तीनचार माणसं आहों; पण पाणी किती लागतं त्याचा कांहीं सुमार ! ! अग, सकाळीं उठून केर काढायचा झाला तरी नदीच्या ताज्या पाण्याच्या दोन घागरी जेव्हां केरसुणीवर ओताव्या तेव्हां केर काढावा; तें झालं कीं सोप्या धुवायच्या; पहिल्यांदां साध्या केरसुणीनं, मग खराट्यानं, आणखी तिसऱ्यांदां काथ्याच्या घासणीनं घासून काढायची; त्या प्रत्येक धुण्याला चारचार घागरी पाणी ओतायचं; मग धुणीं वाळत घालायची काठी धुवायची, घासणी घेऊन घासून घासून तिच्यावर दोन घागरी पाणी ओतायचं म्हणजे ती धुणीं पसरायच्या योग्यतेची सोवळीं झालीं ! ! " मी म्हटलें, " रोज कशाला काठ्या सोडायच्या आणखी बांधायच्या ? " त्यावर टकी म्हणाली, " अग बांधलेल्या किंवा पक्क्या बसविलेल्या काठ्यांची नाहीं का प्रक्षाळपूजा करायची !"... "...रोजचीं धुणीं सात वेळ पाणी घालून, आपण ओलं नेसून आणखी अनश्पोटीं वाळत घालावीं लागतात. इतक्या सोंवळ्यांत अगदीं जवळ करण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, त्यांना भट्टीवरचे डाळे चिरमुरे चालतात ! ! चिवडा खाण्यास हरकत किंवा सोंवळं आड येत नाहीं. मला बरीक पाणी आणतां आणतां पुरेवाट होते. दिवसांतून कमींत कमी शंभर घागरी पाणी लागतं. बिचारा माळणीचा बैल आणखी मी सारख्या नदीच्या खेपा करीत असतों. सैंपाकाला आणखी प्यायला पाणी आणायचं असतं त्याचीहि अशीच गंमत आहे. जातांना घरांतलं पाणी एका कळशीनं घ्यायचं, कमरेवर रिकामी घागर घ्यायची, आणखी हातांतल्या कळशीनं प्रत्येक वेळीं पाय द्यायच्या जागीं पाणी टाकून त्यावर पाय द्यायचा ! ! असं करीत करीत नदीवर जायचं आणखी तसंच करीत परत यायचं "...

या कादंबरीच्या उत्तरार्धांत या प्रकारच्या पूर्वार्धापेक्षां अगदीं वेगळें असें संस्थानी वातावरण विशेष आलेलें आहे. त्यामध्यें रिऊताईसारख्या राणीनें स्त्रियांच्यासाठीं खास असें जें कार्य अंगिकारिलें त्यास विशेष स्थान आहे. " पालखीचा गोंडा " हें कादंबरीचें नांव शेवटीं संस्थानच्या नामाभिनाशीं निगडित झालें आहे. त्याबद्दल काशीताई लिहितात—

" शिबिका विद्यालयांत ज्या स्त्रियांना किंवा मुलींना घेतल्या जातात, त्या बहुतेक लहानपणीं लग्न होऊन पुढं नवऱ्यांनीं आवडत नाहीं म्हणून टाकलेल्या, नवऱ्यांनीं आवडीच्या बायका करुन पहिलीचा छळ होत असलेल्या, नवरे पळून गेले असल्यामुळं अनाथ झालेल्या, नवरा व्यसनात्मक झाल्यामुळं नित्य मारहाण करून घरांतून बाहेर घालवून दिलेल्या अशाच तरुण होतकरू अब्रूदार मुलींच्यासाठीं शिबिका विद्यालय काढलं... "

या कादंबरींतहि काशीताईंची वर्णनशैली अपूर्व अशी झालेली आहे. समोर दिसेल त्या प्रसंगाचे वा व्यक्तीचें हुबेहूब चित्र वाचकांच्या मनावर ठसेल

याची त्यांनीं विशेष दक्षता घेतली असावी, असें कांहीं वर्णनावरून दिसून येतें. आजच्या वाङ्मयांत स्वतंत्र रीतीनें रूढ होऊं पहात असलेल्या शब्दचित्राची सुरवात लेखिकांच्या वाङ्मयाच्या दृष्टीनें काशीताईंच्या या कादंबरीमधून झालेली दिसते ! हरिभाऊंच्या सहवासानें काशीताईंची लेखणी किती वास्तव चित्रें रंगवूं शकली याचें हें उत्तम उदाहरण आहे. वर्णन करायला लागल्या म्हणजे काशीताई आपल्या लेखणीशीं त्यांतील वर्ण्यविषयाशीं, किती एकजीव होऊन जात हें पहावयाचें असेल, तर पुढील भाग उदाहरणादाखल घेतां येईल :—

" ताई त्या दिवशीं पांढरं शुभ्र जरी कांठाचं रेशमी पातळ नेसली होती, अंगांत तसाच लांब बाह्याचा जरी फीत लावलेला शिवणीला मोतीं जडवलेला असा लांब टोणा घातला होता. कंबरेला हिरे-मोतीं वगैरे बसवलेला पट्टा घालून ज्याला मधून मधून सोन्याच्या शेंब्या आहेत अशा म्यान्याची व जडीत मुठीची चिमुकली तरवार लटकावली होती. डोकीस हिरे बसविलेली मुकुटवजा टोपी घातली होती; व तिच्यावर मोत्यांचा तुरा लटकत होता. कपाळाला कस्तुरी टिळा व केशराची चिरींहि, कुंकूं लहान दोन्ही भिवयां-मध्येंच लावलं होतं. कानांत लांब लांब पाचेचे लोलक लोंबत होते. अगोदरच ताई फार सुंदर, त्यांतून् तो आजचा पोशाख फारच नामी दिसत होता. तिचं तें सरळ नाक, विस्तीर्ण भालप्रदेश, आकर्ण नयन, पोवळ्याच्या सरासारखे ओठ आणि कमलाच्या पाकळीप्रमाणं गुलाबी छटादार कपोल, याला तो पोषाख अनु-रूपच दिसत होता. खरोखरच ताई त्या दिवशीं साक्षात् सरस्वति किंवा लक्ष्मीच आहे असा भास होई..." ...(दरबार पहिला)...

" सूर्य खालीं जाऊन लालभडक झाला होता. त्याचा तो वाटोळा गरगरीत डोळा, जसा चेंडू उड्या मारतों तसा उड्या मारीत होता. आभाळ वरती अगदीं मोरपिशी बांगड्यांच्या रंगाचें झालें होतें. जशी कांहीं दोन रंगांच्या कापडांची एक रेशमी दुलईच शिवावी, असें दिसत होतें. किंवा दोन रंगाचे शालू एक ठिकाणीं जोडून त्यांचा पडदा सूर्यानें आपल्या विश्रांति घेण्याच्या खोलीच्या दाराला लाविला आहे, असें मला वाटलें...

...या ज्या सर्वत्र पसरलेल्या चांदण्या आहेत, त्या कांहीं तरी युक्ति करून वर जावें आणि आपल्या साडीच्या ओच्यांत गोळा कराव्या. म्हणजे मग आप-ल्याला रत्नेंच रत्नें होतील. एकदां वाटे कीं, तीं सगळीं रत्नें गोळा करून एक ढीग करावा. आणखी मग आपल्या मैत्रिणींना गंमत दाखवायला बोलावून सग-ळ्यांनीं मनःपूत उडवावीं. तीं खूप उंच उंच फेंकून, सागरगोट्यासारखीं झेलावीं. त्यांचे सागरगोटे करून या आकाशांतच बसून एकमेकींवर आटक्या लावाव्या..." ...(आमचा प्रवास)

अशा प्रकारचें काशीताईचें हें कल्पनावैभव खास स्त्रीस्वभावाला उठून दिसेल असें वैशिष्ट्यपूर्ण झालें आहे. कारण इथें प्रकट झालेले उपमा दृष्टांत आणि वर्णनें ही स्त्रीच्या लेखणींतूनच निघूं शकतील अशीं आहेत.

या कादंबरींत मधून मधून प्रसंगानुरूप—" खरंच बाई, ताईच्या गुणारूपासारखा जर नवरा मिळाला असता, तर मला वाटतें आज हा जो तिला आईच्या म्हणण्याप्रमाणें पालखीचा " गोंडा " मिळाला आहे, त्याचं कौतुक झालं असतं. पण अशा या प्रकारामुळें तो " गोंडा " नसता मिळाला तरी पुरवता. पण मुख्य सणंग नीट पाहिजे होतं. " आत्याबाई म्हणाल्या, " तिणेन् देवापाशीं पुष्कळ दौलत दिलीन् पण शंकर चांगला पुजला नाहीं, त्यास काय करावें ? " असें या प्रकारें लिहिलेलें संवादलेखन चित्तवेधक आहे.

काशीताईची या कादंबरींतील भाषा अतिशय साधी, घरगुती, ओघवती आणि चित्तवेधक आहे. मधून मधून तींत आढळणारे कांहीं तुरळक संस्कृत शब्द सोडले तर जुन्या मराठीचा एक चांगला नमुना म्हणून तिच्याकडे पहावयास कांहींच हरकत नसावी. स्त्रीस्वभावाचें वैशिष्ट्यपूर्ण दिग्दर्शन घडविणारी कादंबरी म्हणून या कादंबरीचें स्थान मराठी सारस्वतांत बरेंच मानाचें राहील. अर्थात् आजच्या कादंबरीच्या तंत्राच्या मोजमापानें त्याच्याकडे पाहून चालणार नाहीं. स्त्रीलेखिकांनीं कादंबरीच्या प्रांतांत शिरून आपला मार्ग सुकर केल्याची ही पहिली वहिलीच निशाणी आहे. त्या दृष्टीनें पाहिलें तर काशीताईनीं कमालीचें यश मिळविलें असें म्हणावें लागेल. येथें घोडनवरी, कापडचोपड, चौघडी, फैटण, मूठभर भात, बिछाईत, समया, गव्हल्यांच्या राशी, लगीनसाडी, घांस देणें, सुनमुखाचा दिवस, बोंगाडा, प्रक्षाळ पूजा इत्यादि कांहीं शब्दप्रयोग त्या काळच्या समाजाचा इतिहास दर्शवितात.

आत्मवृत्तपर कादंबरी लेखनाची सुरवात श्री. हरिभाऊ आपटे यांनीं केली. तशीच ती काशीबाईनींहि केली. त्याचप्रमाणें त्यावेळच्या काळांत जें कोणी बोलून दाखवत नसे व जें कृतींत घडणें अशक्य होत असे अशा गोष्टींना हरिभाऊंनीं आपल्या लेखनांतून वाचा फोडली. तसेंच काम थोड्या प्रमाणांत कां होईना काशीताईनींहि केलें. त्या काळांतहि मुलगी अविवाहित राहूं शकते, संस्कृताचें अध्ययन करूं शकते, स्वतः राज्यकारभार पाहूं शकते इत्यादि गोष्टींचें ओझरतें दिग्दर्शन काशी-ताईच्या " पालखीच्या गोंडयां " त झालेलें आहे.

" रंगराव " आणि " पालखीचा गोंडा " या दोन कादंबऱ्यांप्रमाणें काशी ताईनीं लघुकथाहि लिहिलेल्या आहेत. " चांदण्यांतील गप्पा " (१८९८) ह्या त्यांच्या कथासंग्रहामधील कथांवर हरिभाऊंच्या कथालेखनाची छाप पडलेली दिसते.

आज आपण ज्या कथेला लघुकथा म्हणतो तिचा आजचा साजशृंगार हरि-भाऊंच्या वेळीं नव्हता. त्या वेळच्या गोष्टी म्हणजे एखाद्या लहानशा कादंबरी

एवढ्या मोठ्या असत. त्या वेळचें कथेचें एकंदर स्वरूपच निराळें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. परिणामकारक कथानक, भावनेची उत्कटता, रचनेंतील कुशलता, प्रसंगांची निवड आणि त्यांचा कथानकांत होणारा योग्य तो उपयोग वगैरे प्रकारची आजच्या कथेची आवश्यक अशी सजावट हरिभाऊंच्या वेळच्या कथांमधून तितकीशी आढळत नाहीं. तथापि ह्या कथा घरगुती प्रसंगावर आणि सामाजिक पार्श्वभूमीवर आधारलेल्या असल्यामुळें वास्तवतेच्या दृष्टीनें त्यांत कुठेंच कमतरता दिसत नाहीं. शिवाय या कथांची घाटणी उपदेशप्रधान असल्यामुळें कलाविलासाच्या आजच्या कल्पना त्या वेळीं ध्यानांत घेतल्या जात असत, असें म्हणतां येणार नाहीं. समाजसुधारणा हाच हरिभाऊंचा मुख्य हेतु त्यांच्या कथा-लेखनाच्या बुडाशीं होता, आणि तो त्यांनीं उत्तम रीतीनें पार पडला, असें " दुर्गाताईची ओवाळणी " ह्या कथेसारख्या त्यांच्या कथांवरून म्हणावयास हरकत नाहीं.

काशीबाई कानिटकर यांनीं आपल्या कथांमधून नीति आणि धर्म यांचीं तत्त्वें वाचकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कथावर जुन्या कहाणींची जी छाप पडलेली दिसते तिचें कारणहि तेंच असावें. स्त्रीस्वभावाला अनुसरूनच काशीबाईनीं आपल्या ह्या कथा देवावर विश्वास ठेवून आणि दैवावर हवाला टाकून लिहिलेल्या दिसतात. त्यामुळें त्यांच्या कित्येक पात्रांचा तोंडावळा सारखा झाला आहे ! स्वभाववैचित्र्य त्यामधून फारसें आढळत नाहीं. रचनेच्या दृष्टीनेंहि त्यांच्या कथा आजच्या कथेच्या मानानें ढिल्या झालेल्या आहेत. लघु-कथेऐवजीं त्यांनीं हरिभाऊंच्या दीर्घ कथांप्रमाणें त्या लिहिलेल्या आहेत. त्यामुळें त्यांच्या " शिळोप्याच्या गोष्टी " किंवा " चांदण्यांतील गप्पा " यांमधील कथांना लघुकथेची संज्ञा देतां येणार नाहीं. गोष्ट लिहितांना त्यांनीं वापरलेली कथनकला ही एका ठिकाणीं जमलेल्या मंडळींनीं एकामागून एकानें गोष्ट सांगावी तशी आहे. या पद्धतीस चौसरची पद्धति असें मानण्यांत येतें. काशीबाईनीं सर्रास याच पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

काशीबाईची कथा म्हणजे जशी घडेल तशी माहिती देणारी एक दीर्घ कहाणी आहे. अंतरंग सजविण्यापेक्षां बाह्यांग सजविण्याकडेच काशीबाईचा ओढा अधिक दिसतो. सूक्ष्म अवलोकन, निसर्गाची मानवी मनोगतांशीं होणारी संगति, आकर्षक वर्णनशैली आणि हृदयंगम भाषा हीं त्यांच्या कथेचीं वैशिष्ट्यें आहेत.

काशीबाईची कल्पनाशक्ति आणि वर्णनशैली मात्र अपूर्व अशी आहे. स्त्रीहृदयाला शोभेल अशा विशिष्ट उपमादृष्टांतांनीं त्यांनीं खुलविलेलीं वर्णनें त्या करायला लागल्या म्हणजे मागें सांगितल्याप्रमाणें शिवरामपंत परांजपे यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. " मारुतीचा प्रसाद " या कथेंत मकर संक्रांतीच्या वेळीं आकाशांत दिसून येणारें निसर्गाचें वैभव रंगवितांना त्या लिहितातः—

" त्या दिवशीं मकरसंक्रांत होती. सकाळचे पांच वाजले होते. सागरगडच्या डोक्यावर शुक्र चांदणी नुकतीच वर आली होती. ती पाहून असें वाटे कीं, जणुं काय एखाद्या भव्य स्त्रीनें वेणीफणी करून आपल्या काळ्याभोर केशकलापांत हा हिरेजडित असा सुंदर दागिनाच घातला आहे. पलीकडचा पूर्वेकडील भाग अरुणप्रभेमुळें तांबडालाल झाला आहे...जणुं ती स्त्री कुंकूं लावीत असतां लगबगींत पिंजरेचा करंडा खालीं लवंडला व त्यामुळें तो भाग लालभडक झाला! अथवा, नैष्ठिकांनीं रक्तचंदन व तांबडीं फुलें घेऊन भगवान् दिनमणीला अर्घ्य दिलें व त्यामुळें ती दिशा लाल झाली. पश्चिमेकडे सर्व नक्षत्रगण खालीं सरकत होता. जणुं काय हा नवरत्नांचा हार तुटून त्यांतील रत्नें खालीं ओघळत आहेत!"

सामान्यतः बहुधा सर्व स्त्रियांना आपल्या माहेरचें वेड फार असतें. सासर कितीहि चांगलें असूं दे आणि तेथील माणसें कितीहि प्रेमळ असूं देत, स्त्रीला माहेराचें सारेंच आगळें वाटायला लागतें. आपल्या ह्या मनोवृत्तीचा त्या ठाव घ्यायला लागल्या कीं, त्यांच्यासमोर येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला त्या अवस्थेप्रत नेऊन भिडविण्याचा मोह त्यांना होत जातो. काशीताई तरी ह्या मनोवृत्तीला कशा अपवाद ठरणार? " वनवास " या कथेमध्यें वहाणाऱ्या नदीच्या प्रवाहाला उद्देशून त्या लिहितातः—

" तिचा प्रवाह खालीं चालला होता. त्यामुळें असें वाटे कीं, एखादी लाडकी माहेरवाशीण सासरीं जातांना जशी खिन्नवदन, अश्रुपूरित नेत्रांनीं मातापित्याचें घर सोडतें, व जोंपर्यंत माहेरचीं माणसें, तें घर, निदान तो गांव दिसत असतो तोंपर्यंत मागें वळून पहात असते. त्याप्रमाणें ती जणूं पितृगृहाकडे वारंवार पहात आहे व खिन्नवदन करून मार्ग आक्रमीत आहे!.... राजकन्या असो वा रंक-कन्या असो, पितृगृह सोडतांना वाटणारें दुःख दोघींनाहि सारखेंच. बायकांचें अंतःकरण बायकांनाच ठाऊक व त्यांनाच मुलीच्या मनाची स्थिति जास्त ठाऊक. म्हणूनच कीं काय दऱ्यारूप स्त्रिया नदीला पोटाशीं कवटाळून धरीत व कडेरूपी निर्दय पुरुष मोठ्या निष्ठुरतेनें तिला फराफरा ओढीत!... "

काशीबाईंचे हे उपमादृष्टांत स्त्रीच्या अनुभवांतून निघणाऱ्या भावनांचें बोल आहेत. परकाया प्रवेश करून स्त्रीचें चित्र रेखाटणाऱ्या पुरुषाला स्त्रीच्या स्वाभावांतील एवढा बारकावा कथेंत आणणें कठीण होईल! बाईंची भावना बाईच चांगली रंगविते असें म्हणायला हा आधार पुरेसा होईल.

स्वभावचित्रणाच्या बाबतींतहि काशीबाईंनीं बरेंच यश मिळविलेलें आहे. हरिभाऊंच्या स्वभावलेखन कलेचें सौंदर्य इथें आढळत नसलें, तरी प्रामाणिकपणानें रंगविलेलीं वास्तवचित्रें म्हणून केव्हांहि या स्वभावचित्रांची किंमत राहीलच. या स्वभावचित्रांत वैचित्र्य फारसें नसलें तरी वास्तवता मात्र बरीच आलेली आहे.

" सारसबाग " या कथेंत काशीबाईनीं नवऱ्यानें सोडून दिलेल्या मथुराबाई या स्त्रीची हृदयभेदक कहाणी सांगितलेली आहे. हें स्वभावचित्र करुण रसानें ओथंबलेलें आहे. " हृदयावर दुःखाचा भार अतिशय होऊन तो असह्य झाला म्हणजे त्या दुःखाला, देवासमोर बसून, नेत्रावाटें बाहेर लावतात. त्यांच्या मनांतील विचार, कल्पना वगैरे कांहीं एक मनुष्याला कळत नाहीं.... " अशी ही मथुराबाईची मनःस्थिति लेखिकेनें उत्कृष्ट रीतीनें रंगविली आहे. गणपती मंदिरांत सन्यस्तवृत्तीनें देवाचें गुणगान करीत जीवन घालविणाऱ्या ह्या मथुराबाईच्या दर्शनानें वाचकाला बाणाच्या कादंबरींतील महाश्वेतेची आठवण आल्याशिवाय रहात नाहीं. " लावण्यवती " या कथेंत प्रियकराबरोबर पळून गेलेली विधवा राजकुमारी अखेरीस विरक्त जीवन घालवीत असलेली दिसते. " वनवास ' मध्यें मानवी जीवन आणि निसर्ग यांची सुंदर संगति दाखवून लेखिकेनें अद्भुत आणि शृंगार या रसांच्या परिपोषाच्या पार्श्वभूमीवर चंपी व मानाजीराव यांचीं सुंदर स्वभावचित्रें रेखाटलेलीं आहेत. " मारुतीचा प्रसाद " या कथेंत दारूचे दुष्परिणाम चांगल्या रीतीनें दाखवीत असतांनाच आनंदा व तुळशीराम या परस्पर विरोधी पात्रांचें स्वभावलेखनहि लेखिकेनें मोठ्या कौशल्यानें केलेलें आहे.

काशीबाईच्या बहुतेक सर्व कथांमधून स्त्रीजीवनाचेंच चित्रण प्रामुख्यानें आलेलें आहे. या सर्व चित्रणांमधून कल्पनेपेक्षां लेखिकेनें वस्तुस्थितीचेंच विशेष चित्रण केलेलें दिसून येतें. त्यावेळच्या काळांत स्त्रीला एखाद्या दासीप्रमाणें समाजांत स्थान दिलें जात असे. या परिस्थितीचें वास्तवचित्र रेखाटण्याचा लेखिकेनें येथें यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येईल.

कथा आणि कादंबरी यांच्या जोडीलाच काशीबाईनीं चरित्र लेखनासहि हातभार लावलेला आहे. चरित्र वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीनें पाहिलें तर महानुभाव पंथांतील महींद्रव्यासाचें " लीळा चरित्र " हें पुस्तक म्हणजे मराठींतील चरित्र वाङ्मयाची सुरवात असें म्हणावयास हरकत नाहीं.

" राष्ट्राचा इतिहास, राष्ट्राचें जीवन यांचा आदरयुक्त अभिमान प्रत्येकास वाटतो. तद्वतच राष्ट्राचें जीवन ज्यांनीं निर्माण केलें त्यांच्या चरित्राविषयींहि आदर आणि अभिमान वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. या आदर भावनेच्या पोटींच चरित्र वाङ्मयाचा जन्म होतो. चरित्र लिहितांना, कीर्तिरूपानें उरलेल्या लोकमान्यांच्या कीर्तिरूपास चिरंतनता देण्याचा चरित्रकाराचा उद्देश असतो. केवड्याचा पानाचा सुगंध वाऱ्यावर विरून जाण्यापूर्वीं स्त्रिया नाहीं का तो आपल्या कुंकवाच्या करंड्यांत सामावून ठेवीत !

इटालीचा कवि ॲरिओस्टो यानें या संबंधीं एक रूपक रचलें आहे. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्याच्या दोरीला एक रूपक बांधलेलें असतें. त्यावर त्याचें नांव कोरलेलें असतें. जेव्हां मृत्यु ही आयुष्याची दोरी तोडतो त्यावेळीं काळ हें पदक

घेऊन विस्मृतीच्या नदींत फेंकून देतो; परंतु यांपैकीं कांहीं—अगदीं थोडीं पदकें—विस्मृति नदींत पडतां पडतांना हंस तीं झेलतात आणि चिरंतनतेच्या मंदिरांत नेऊन तेथें त्यांची प्राणप्रतिष्ठा करितात. ॲरिओस्टोनें सांगितलेले हंस म्हणजे आपले चरित्रकार होत. "*

चरित्र आणि चरित्रकार यांची ही भूमिका लक्षांत घेतां असें दिसून येतें कीं, रामायणमहाभारतांतूनहि चरित्रवाङ्मयाचें अस्तित्व असलेलें पहावयास मिळतें. मात्र त्यावेळचीं हीं चरित्रें म्हणजे सामान्य माणसापेक्षां उच्च कोटींतील अशा थोर विभूतींचीं चरित्रें होतीं. विशेषतः या चरित्रांमधून देवादिकांचीच चरित्र नायकाचे जागीं निवड होत असे. ही परिस्थिति शके १६०० च्या सुमारास झालेल्या नाभाजीच्या ग्वालेरी-भाषेंतील " भक्तमाले " पासून बदलली. आपल्या सभोंवतालीं वावरणाऱ्या थोर विभूतींना देवादिकांच्या बरोबरीचें समजून चरित्रलेखन करण्याची प्रथा पडत गेली. महिपतीनें लिहिलेलीं संतांचीं चरित्रें याच मनोवृत्तीनें लिहिलेलीं आहेत. महिपतीची चरित्र नायकाकडे पहाण्याची दृष्टि आदराची आणि विभूति-पूजेची होती. शाहीर कवींनीं थोर पुरुषांवर जे पोवाडे रचिले त्यांच्या बुडाशीं मात्र विभूतिपूजेशिवाय पुरुषार्थांचा गौरव करण्याची आणि स्फूर्ति मिळवून राष्ट्राच्या कार्यासाठीं प्रवृत्त होण्याची लौकिक दृष्टि दिसून येते.

त्यावेळीं चरित्रलेखनाकडे कला या दृष्टीनें फारसें पाहिलें जात नसे. " चरित्रलेखनाचा कला या दृष्टीनें विचार करून चरित्रनायकाचें व्यक्तित्व आणि त्याचें जीवनरहस्य हृदयंगम रीतीनें वाचकांच्या मनावर ज्या योगानें ठसवितां येईल, अशा पद्धति चरित्रलेखनासाठीं आपण अवलंबिल्या पाहिजेत, अशी जाणीवहि फार काळपर्यंत कोणाच्या मनांत उत्पन्न झाली नव्हती. "‡ पण इंग्रजी वाङ्मयाच्या अवलोकनानंतर विष्णुशास्त्री चिपळोणकरांनीं लिहिलेल्या ' डॉ. जॉन्सन् ' या चरित्र ग्रंथानंतर ही स्थिति बदलली. आधुनिक दृष्टीनें लिहिलेलें मराठींतील हेंच खरें खुरें पहिलें चरित्र आहे.

" याच सुमारास एक चरित्रलेखनाचा अपूर्व प्रयत्न झाला. तो एका स्त्रीकडून झाला. हीच त्याची अपूर्वता आहे, असें नव्हे. चरित्र विषयीभूत व्यक्तीची माहिती तिच्याशीं निकट संबंध आलेल्या व्यक्तींकडूनच मिळवून व तिचीं पत्रें संपादन करून तिचें चरित्र लिहिण्याचा केलेला प्रयत्न, या दृष्टीनेंच त्याची अपूर्वता मुख्य आहे. कारण अशा यथाविधि लिहिलेल्या चरित्रांमध्यें श्री. काशीबाई कानिटकर यांनीं लिहिलेलें " डॉ. आनंदीबाई जोशी " (१९१२ द्वितीयावृत्ति) हेंच बहुधा पहिलें होय. सहजसुंदर भाषा, हृदयास जाऊन

* " मराठींतील चरित्रवाङ्मय ", प्रदक्षिणा—प्रा. र. श्री. जोगळेकर

‡ चरित्रवाङ्मय, अर्वाचीन मराठी साहित्य पा. २५९ प्रो. श्री. ना. बनहट्टी.

भिडणारीं वर्णनें व चरित्र लेखिकेनें मधून मधून काढलेले भावनात्मक उद्गार या योगानें हें चरित्र रमणीय झालें आहे. " (अर्वाचीन मराठी साहित्य)

डॉ. आनंदीबाई जोशी यांच्याबद्दल काशीबाईंना विलक्षण आदर आणि किंवा आपुलकी वाटत असावी इतका घरगुतीपणा या चरित्राला आलेला आहे. चरित्रनायिकेच्या जीवनांतील सर्व बारीकसारीक गोष्टींची माहिती येथें काळजी-पूर्वक नमूद केलेली दिसून येईल.

" यमू लहान, दोनतीन वर्षांची होती, तेव्हां फारच गोजिरवाणी दिसे. तिचा वर्ण साधारण गोरा होता. गाल लाल होते. केश काळेभोर असून कुरळे होते. आणखी पोर मोठी खिलाड्ड आणि स्वच्छ होती...झोंपाळ्यावर बसून ओव्या म्हणणें, त्याप्रमाणें घरें बांधणें, देव मांडून त्यांचा उत्साह करणें, असें खेळ खेळे..." अशा लहानपणाच्या हकीकतीपासून तो अमेरिकेंत उच्च शिक्षणा-साठीं गेल्यानंतर त्यांनी तेथील लोकांना हिंदी पद्धतीची मेजवानी देऊन आणि आपली डॉक्टरची पदवी मिळवून परत मायदेशीं आल्यापर्यंतची हकीकत येथें सविस्तरपणें आलेली आहे. अमेरिकेंतील मेजवानीचा हिंदी थाट वर्णन करतांना काशीबाई लिहितातः—" आनंदीबाईंनीं त्या दिवशीं, स्वतःच सैंपाक केला होता. पात्रें अठरा होतीं. पक्वान्नें वगैरे थाट इकडच्यासारखा. सर्व स्त्रियांना आनंदी-बाईंनीं आपलीं लुगडीं नेसावयास दिलीं होतीं. त्यांच्या हातांत बांगड्या घातल्या होत्या; कपाळाला कुंकवाचे टिळे लाविले होते. त्यांना अगदीं आपल्यासारख्या बनविल्या होत्या. जेवावयास वडाच्या व पळसाच्या पत्रावळी लाविल्या होत्या. बसावयाला पाट मांडिले होते. गुलाल रांगोळीसुद्धां सर्व थाट !! पानसुपारी खावयास बसावयाला भुईवर बैठक घातली होती. अत्तर गुलाब व फुलें दिलीं. पण खरेंच, मी हें जें आपल्या नीरस शब्दांनीं सांगत बसल्यें, ती काय म्हणून ? कार्पेंटर मावशीनें या संबंधानें जें वर्णन केलें आहे, तें दिल्यानें किती मौज होईल ? आतां तसेंच करितें. म्हणजे आपल्या पदार्थांचीं नांवें घेण्यास त्यांना कसें जड जातें, भोजन करण्याच्या पद्धति त्यांना कशा जड जातात, आणखी आपलें अन्न त्यांना किती उत्तम वाटतें, वगैरे गोष्टी चांगल्या कळतील..."

कार्पेंटरबाईंना लिहिलेल्या अगदीं सुरवातीच्या पत्रांतील पुढील मजकुरा-प्रमाणें—" हेतु हा कीं, अज्ञानांधकारांत गढून गेलेल्या व संसार यातनांनीं त्रस्त होऊन सदैव निराश व निरुत्साह झालेल्या माझ्या असंख्य स्वदेश भगिनींनीं त्यापासून स्वदेशप्रीति, दृढनिश्चय, दीर्घोद्योग, विद्यानंद, अनेकविध उदात्त कल्पना, इत्यादि गोष्टी शिकाव्या..." एका विशिष्ट हेतूनें काशीबाईंनीं या चरित्राचें लेखन केलेलें आहे, हें उघड आहे. त्यावेळच्या काळाच्या मानानें आनंदीबाईंनीं घेतलेलें शिक्षण आणि त्यासाठीं सोसलेले कष्ट खरोखरच विशेष आहेत. जुन्या काळच्या हिंदु समाजांतील एक स्त्री जननिंदेची पर्वा न करितां

उच्च शिक्षण घेते ही कल्पनाच मुळीं एखाद्या अद्‌भुतरम्य कथेसारखी आहे. त्यावेळच्या स्त्रिया साधें प्राथमिक शिक्षण घेण्यास देखील राजी नसत किंवा त्यांनीं तें घ्यावें अशी अनुकूल परिस्थिति त्यांच्याभोंवतीं नसे. स्त्री म्हणजे कुणी एक दासी अशीच जणुं प्रत्येकीची भावना. नवऱ्याला देव मानून तो सांगेल त्या आदेशानुसार वागण्यांत परमसौख्य लाभतें, अशी त्यांची कल्पना झालेली. स्त्रीचा दर्जा पुरुषापेक्षां खालच्या प्रतीचा अशी रूढीनें त्यांच्या मनावर पकड बसविलेली ! आणि अशा परिस्थितींत स्वतःच्या मानसिक सामर्थ्याच्या बळावर आणि कष्टाळू जीवनावर विसंबून शिक्षण घेणारी एक महिला इतरांनाहि आदर्शभूत व्हावी या हेतूनें लेखिकेनें हें लेखन केलेलें आहे. त्या दृष्टीनें चरित्र नायिकेची थोरवी कोणासहि अमान्य होण्याचें कारण नाहीं.

डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या एकंदर जीवनाकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकला तर त्यांच्या चरित्रावरून, एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत येते ती म्हणजे त्यांना सुरवातीपासूनच आपल्या भोंवतालच्या परिस्थितीशीं एकसारखी झुंज खेळावी लागली ही होय.

" माझ्या आईनें देखील ममतेच्या शब्दांचा उपयोग केला नाहीं. मला शिक्षा करावयाची ती लहानशा दोरीनें किंवा वादीनें नव्हे, तिनें नेहमीं दगड, लांकडें व विस्तव यांच्याशीं गांठ ठेवली होती..." आपलें लहानपण खुद्द चरित्र नायिकेनेंच या शब्दांतून व्यक्त केलेलें आहे. त्यानंतर मुंबईस त्या शाळेंत जात असतांना लोकांनीं त्यांना दिलेला त्रास काशीबाईंनीं पुढीलप्रमाणें सांगितला आहे—

" एस्. पी. जी. खिस्ती—धर्म-प्रचारक मंडळीच्या शाळेंत दुसऱ्या ज्या हिंदु मुली अर्धवट इंग्रजी पोशाक करून जात, त्या मुंबईस मोठ्यांत मोडणाऱ्या लोकांच्या होत्या, म्हणून त्यांच्याबद्दल निंदेचा शब्दहि कोणी उच्चारीत नव्हते. पण आनंदीबाई तशा पोषाकानें शाळेंत जात असता लोकांनीं त्यांची निंदा करावी, त्यांच्याकडे पाहून हंसावें, त्या शाळेंत जाऊं लागल्या म्हणजे आपल्या घराच्या खिडक्या मुद्दाम उघडून त्यांच्याकडे पहात रहावें, आणि कोणीं कोणीं तर निंदास्पद शब्द उच्चारून त्यांजवर खडेहि फेंकावे ! वाणी, तांबोळी, उदमी अशा जातींचे लोक त्यांच्याकडे पाहून खांकरत..." कलकत्त्याला जाऊन तेथें आनंदीबाई स्थिर झाल्या. परंतु तेथेंहि त्यांना अशाच प्रकारचा अगदीं वाईट अनुभव आला. तथापि मनानें त्या अतिशय खंबीर असल्यामुळें त्यांनीं सगळें निभाऊन नेलें इतकेंच काय तें. आनंदीबाईंनीं अशा प्रकारचा इतरांपासून होणारा त्रास सहन केला. पण त्या अमेरिकेंत गेल्यानंतर त्यांच्या पतींनींच जेव्हां अधून मधून त्यांच्यावर कांहीं आरोप केले व त्यामुळें गैरसमज निर्माण झाला तेव्हां मात्र त्यांना कल्पनातीत दुःख झालें. आपली ही मनःस्थिति रंगवितांना एका पत्रांत त्या म्हणतात, "... आपल्या अंतःकरणास इतका त्रास झाला, त्याबद्दल

दंड देण्यास अश्रु देखील मजजवळ राहिले नाहींत. तसेंच एखादा उसासा टाकीन म्हटलें, तर त्याला देखील मी समर्थ नाहीं. आपल्या गरम अथवा थंड अशा बोलण्यानें, वितळणारें किंवा थिजणारें असें फक्त " काळीज " मात्र मजजवळ उरलें आहे..."

मधून मधून या पुस्तकांत घातलेलीं चरित्र नायकेचीं, त्यांचे पति गोपाळराव यांचीं व कार्पेंटर मावशी यांचीं जीं पत्रें आहेत तीं विशेष उल्लेखनीय असून तोच या पुस्तकाचा प्रमुख विशेष आहे. त्या त्या वेळचीं विशिष्ट अशी सामाजिक परिस्थिति या पत्रांवरून फारच चांगल्या रीतीनें प्रतीत झालेली आहे. एखाद्या व[illegible] मनांतील भावना ओळखून त्याबद्दल इतरांनीं कांहीं लेखन करणें यापेक्षां खु[illegible] व्यक्तीनेंच आपल्या भावना शब्दांमधून खेळवणें यांत जमीन अस्मानाइतका फरक असतो ! आणि तेंच काम या पत्रांनीं येथें केलेलें आहे. काशीबाईनीं ही विविध पत्रें गोळा करून योग्य जागीं त्यांचें संपादन केलें ही फार महत्त्वाची गोष्ट होय.

या चरित्र लेखनाचा काशीबाईचा म्हणून चटकन् डोळ्यांत भरणारा असा वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे त्यांनीं वापरलेलीं अगदीं घरगुती अशी भाषा. स्त्रीची म्हणून खास अशी विशिष्ट भाषा या ठिकाणीं पदोपदीं आढळून येते. या संदर्भात पुढील भाग पहाण्यासारखा आहे.

" आनंदीबाई मावशीला पोंहोंचवून, परत आपल्या बिऱ्हाडीं आल्यावर त्यांना अगदीं उदास वाटूं लागलें. मावशी गेल्यावर दोन तीन दिवसांत त्यांना जेवणखाण किंवा कोणाशीं बोलणें चालणें कांहीं एक गोड लागेना. बापड्या आपल्या हातांनींच सैंपाक करीत व एकट्या टुकटुक जेवायला बसत ! "...

त्या दृष्टीनेंच उपसंहारांतील पुढील भाषाहि पहावी :—

" बये आर्यमाते ! किती ग बाई तूं फुटक्या नशिबाची तरी ? अग, अशा कोणत्या सटीची तुला बाधा झाली तरी ? कीं, ज्यामुळें तुझीं चांगलीं मुलें वाचेनातशीं झालीं आहेत !... "

" माझ्या वाचनांत चरित्रें आलीं नव्हतीं, त्यामुळें मला चरित्र लिहावें कसें हें कळण्याला मार्ग नव्हता. " असें प्रस्तावनेंत काशीबाई म्हणतात. परंतु त्यांनीं आपल्या पतीच्या मदतीनें इंग्रजींतील चरित्रलेखनाची कल्पना आत्मसात् करून आपली ही पहिली वहिलीच कलाकृति इतकी सुंदर चित्रित करून ठेवलेली आहे. आनंदीबाई ह्या शिक्षणप्रेमी व स्वदेशाभिमानी होत्या हें दर्शविण्यासाठीं काशीबाईनीं अनेक पानें इथें खर्ची घातलेलीं आहेत. संधि सांपडेल तेथें त्यांनीं चरित्र नायिकेच्या या गुणांचा उठाव केलेला असल्यामुळें सुरवातीपासून अखेरपर्यंत आनंदीबाईची व्यक्तिरेखा वाचकाच्या मनावर कायमचा ठसा कोरीत जातांना दिसून येते. अशा ह्या आनंदीबाई अमेरिकेंत असतांना देशी माल कसा वापरीत हें लेखिकेनें मोठ्या खुबीनें सांगितलें असून अखेरीस त्या अमेरिकेहून

परत आल्यानंतरचें वर्णन अशा रीतीनें केलेलें आहे....“ ...अमेरिकेंत त्यांचा गुजराथी पोषाख असे, परंतु त्या जेव्हां उतरल्या (बोटींतून) तेव्हां नारायण पेठी काळी चंद्रकळा नेसल्या होत्या. कपाळास साधारण कोकणस्थांच्या बायकांप्रमाणें कुंकवाची टिकली लाविली होती. अंगांत खणाची चोळी, पायांत बूट व स्टॉकिंग, नाकांत नथ, आणि कानांत कुडी अशा थाटानें त्या खालीं उतरल्या...”

उच्च दर्जाचा कादंबरीकार ज्याप्रमाणें एखादी जिवंत माणसाची भूमिका निर्माण करतो व त्या भूमिकेशीं समरस होऊन आपलें लेखन करतो, त्याप्रमाणेंच चरित्र नायकाच्या भूमिकेशीं चरित्रकारास एकजीव व्हावें लागतें. तो चरित्र नायकाच्या जीवनाशीं तन्मय झाला तरच त्याच्या हातून निर्माण होणारें चरित्र सर्वांगीण व जिवंत होतें. काशीबाईनीं ही भूमिका अतिशय यशस्वीपणें पार पाडली आहे यांत शंका नाहीं.

रमाबाई रानडे

काशीबाई कानिटकरांच्या नंतर मराठी साहित्यांत नांव मिळविलेल्या अशा लेखिका म्हणजे श्रीमती रमाबाई रानडे या होत. “ आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी ” या त्यांच्या आत्मचरित्रानें मराठी सारस्वतांत मानाचें स्थान मिळविलेलें आहे. इ. स. १९१० सालीं रमाबाई रानडे यांनीं लिहिलेलें हें पुस्तक म्हणजे स्त्रीनें लिहिलेलें असें मराठींतील बहुधा पहिलेंच आत्मचरित्र होय.

उतार वयांत मनाला विरंगुळा मिळावा म्हणून माणूस ज्या गोष्टी करीत रहातो, त्यांपैकीं आजवरच्या जीवनाचा मागोवा घेत रहाणें हा एक त्याच्या आवडीचा छंद होऊन बसतो. आपलें आयुष्य कोणत्या परिस्थितींत आपण कसें घालविलें याचा हिशोब कुणापुढें तरी मांडला कीं त्याला आनंद होतो. श्रीमती रमाबाई रानडे यांनीं आपल्या आत्मचरित्रांत हाच आनंद भरपूर लुटलेला आहे आणि तो लुटत असतांना अत्यंत मोकळ्या मनानें जें घडलें तें प्रामाणिकपणें सांगून टाकलें आहे. स्वतःच्या जीवनाविषयीं बोलतांनाच त्यांनीं समाज जीवनाच्या इतिहासाचेंहि जातां जातां दर्शन घडविलें आहे.

“ आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी ” या पुस्तकांत त्यावेळच्या स्त्रीशिक्षणाबद्दलची माहिती देतांना व आपली काय अवस्था झाली हें सांगतांना रमाबाई लिहितात—

“...ते (माझे वडील) गेले (आपल्या घरीं) त्या दिवशीं संध्याकाळीं सुमारें ६॥ वाजतां कोर्टांतून घरीं आल्यावर मला गच्चीवर बोलावून नेऊन विचारलें, “ गेले कां तुझे वडील ? ” मी “ होय ” म्हणून सांगितलें. पुन्हां

विचारलें, " तुझें माझ्याशीं लग्न करून दिलें आहे. पण मी कोण, माझें नांव काय ? वगैरे तुला माहीत आहे काय ? "

मी " होय " म्हणून मानेनें सांगितलें.

" मग सांग पाहूं माझें नांव काय तें ? " अशी आज्ञा होतांच मी सर्व नांव जसें लोक म्हणत होते तसें सांगितलें. (लाजेचा भाग जसा समजावा तसा समजत नव्हता. कांहीं कां असेना पण तें ऐकून एक प्रकारचें समाधान झाल्या-सारखें दिसलें असें मला पक्कें आठवतें.) नंतर माझ्या माहेरची सर्व हकीकत विचारली, व मीहि ती मला माहीत होती तशी सर्व सांगितली. लिहिण्या-वाचण्याची चौकशी केली पण मला कांहीं येत नव्हतें. (माहेरची हकीकतः— माझ्या माहेरचीं माणसें म्हणजे जुने मराठमोळा ठेवणारे जाहागीरदार. त्यांच्या घरीं माहेरवासीणी व आठ वर्षांवरच्या मुलींनीं वडिलांचे समोर ओटीवर सुद्धां जावयाचें नाहीं; मग खेळणें, अगर गाणीं वगैरे म्हणणें कसलें ? लिहिण्याचें तर नांव नाहीं ? माझी एक वडील आत्या, जिचें सासर ब्रह्मावर्तांत होतें, ती मात्र व्यंकटेश स्तोत्र वगैरे वाचावयास शिकली होती. तिला पुढें दुर्दैवानें वैधव्य आल्यापासून आमच्या वडील चुलत्यांनीं ठरविलें कीं , आमच्या घरांत बायकांनीं लिहिणें, वाचणें, शिकणें धार्जिणेंच नाहीं. झालें. असें ऐकल्यावर नुसता लिहिण्या-वाचण्याचा विचारहि मनांत आणला तर पाप लागेल कीं काय अशी घरांतील सर्व बायकांची समजूत होण्यास काय उशीर?... त्यामुळें आम्हां मुलींना लिहिण्या-वाचण्याचा गंधहि नसणें स्वाभाविकच होतें......) म्हणून त्याच रात्रीं एक पाटी व पेन्सिल आणवून श्रीगणेशाचा पहिला सात अक्षरीं धडा घालवून दिला. हा वेळपर्यंत मला पाटीची अगर अक्षरांची ओळख नसल्यामुळें तेवढीं सात अक्षरें न पाहतां काढण्यास व ओळखण्यास जवळ जवळ दोन तास लागले, तेव्हां ती कोठ पक्की झाली. दुसरे दिवसापासून दररोज रात्रीं दोन तास मला शिकविण्याकडे घालावयाचा क्रम ठेविला, व मुळाक्षरें, बाराखड्या वगैरे शिकवून सुमारें पंधरावे दिवशीं माझ्याकडून पहिल्या पुस्तकाचा पहिला धडा वाचविला व त्या दिवशीं पुष्कळ बरें बरें वाटलेसें दिसलें...

आमच्या घरीं पुरुषांना बायकांनीं लिहिणें वाचणें शिकावें अशी आवड असल्यामुळें वन्संना व सासूबाईंना मामंजींनीं स्वतः लिहिणें वाचणें व जमाखर्च मांडणें हें कामापुरतें शिकविलें होतें. याबद्दल त्या दोघींना भूषण व अभिमान वाटे......असें असून माझ्या शिकण्याच्या वेळीं त्यांना त्यांची सहानुभूति तर नव्हतीच पण उलट त्या अतिशय रागावत व तिटकारा करीत...रोज रात्रीं मी माडीवर गेल्याबरोबर वाचनास आरंभ व्हावयाचा. यावेळीं दक्षिणा प्राइझ कमिटीचीं पुस्तकें व मराठी दुसरें सर्व वाचनाचें काम मजकडेच असल्यामुळें पुस्तक गद्यात्मक असेल तर कांहीं नाहीं, सहज वाचून जाई, पण पद्यात्मक असलें

म्हणजे तें वाचण्यास संकोच वाटे. कारण पदें, आर्या श्लोक, वगैरे जें कांहीं असेल तें गळ्यावर मोठ्यानें वाचावें लागे. तसें वाचलें नाहीं, संकोचानें हळूहळू वाचलें, तर राग येई, व मोठ्यानें वाचावें तर सांगितलेल्या बायकांपैकीं (नातलग, पाहुण्या) कोणीना कोणी तरी जिन्याशीं अगर दाराशीं उभ्या असावयाच्याच, ह्या दुसरे दिवशीं, रात्रीं वाचलेली चाल अगर कडवीं लक्षांत ठेवून, तसेंच हेल काढून वडील बायकांच्या देखत मला वेडावून दाखवावयाच्या, चिडवावयाच्या व लाजवावयाच्या "....

इंग्रजी शिक्षणास आरंभ केल्यानंतरची माहिती देतांना रमाबाई सांगतात— " मी माजघरांतील केर काढीत होतें. अर्धा मुर्धा केर काढून झाल्यावर केरांत इंग्रजी वर्तमानपत्राचा एक कपटा सांपडला. आधींच माझा पोरपणा, त्यामुळें कोणत्याहि गोष्टीला आरंभ केला नाहीं तोंच ती साध्य झाली असें वाटून त्याबद्दल उतावीळपणानें मी हातांतील केरसुणी खालीं ठेवून तो कपटा वाचीत उभी राहिलें...नुसतीं अक्षरेंच पहात उभी राहिलें. आपण खालीं आहोंत ही मला आठवणच नाहीं. ह्यावेळीं आजे सासूबाईंची (सासूबाईंच्या आईची) नजर मजकडे गेली व त्यांनीं जवळ असलेल्या बायकांना हळूच खूण केली. त्याबरोबर दोघी तिघींनीं दारांत येऊन मला पाहिली, पण मला याचा पत्ताहि नव्हता ! मी आपली तशीच नादांत आहें, हें पाहून वन्संना फारच राग आला व त्या मोठ्यानें ओरडून म्हणाल्या, " तुमचें हापीस माडीवर आहे, तेथें तुम्ही वाचा कीं नाचा, आमचा अपमान केला तर खबरदार ! तीच आमची पहिली वहिनी नव्हती का ? तिला दादांनीं लिहिण्यास वाचण्यास सर्व शिकविलें होतें. ती आमच्या बरोबरीची होती, तरी देखील तिनें आमच्या देखत एक अक्षरहि वाचलें नाहीं. तिला इंग्रजी शिकण्याबद्दल त्यांनीं जंग जंग पछाडलें, पण त्या माउलीनें तिकडे लक्षच दिलें नाहीं. आतां तीहि त्यांची बायको होती. तिला दहा गोष्टी सांगितल्या तर एखादी तरी करावी लागेल; पण असा नाचरेपणा नव्हता !..."

इ. स. १८७५ च्या सुमारची ही स्त्रीशिक्षणाची अवस्था पाहिली म्हणजे आज नवल वाटतें. पण त्यावेळीं स्त्रियांनीं शिकावयाचें मनांत आणलें तर किती अडीअडचणींतून तिला जावें लागे, याची कल्पना या हकीकतीवरून येते. रमाबाई रानडे ह्या स्वत: आपल्या पतींना देवाप्रमाणें अक्षरश: मान देत. त्यामुळें त्यांच्या इच्छेसाठीं त्यांनीं हें सर्व सहन केलें आणि आपला शिक्षणक्रम अखंड चालू ठेवला. त्याबद्दल त्या लिहितात, "...या शिकण्याच्या पायीं मला घरांतील सर्वच बायकांकडून प्रत्यक्षाप्रत्यक्ष पुष्कळच जाच सोसावा लागला; पण मी अभ्यासक्रम सोडला नाहीं....स्वत: कडून शांत, गंभीर व अतिशय प्रेमानें केलेला उपदेश, या सर्व गोष्टी सोसण्यास मला आधारभूत झाल्या...."

काळ जसजसा बदलत गेला तसतसा स्त्री शिक्षणाचा पसारा व्यापक

होत गेला. इंग्रजांच्या चालीरीति आणि वाङ्मय यांच्याशीं परिचय झाल्यानंतर स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न पुरुषवर्गानें नेटानें हातीं घेतला. त्यांत महात्मा जोतिबा फुले, आगरकर वगैरे मंडळींनीं पुढाकार घेऊन स्त्रियांसाठीं स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. पण त्या संधीचा फायदा कांहीं सर्व स्त्रियांनीं घेतलाच असें नाहीं. समाजसुधारकांच्या टीकेचे घाव अंगावर घेण्याइतपत सर्वांची ताकद ह्या लोकांना अजमावयाची संधीच कांहीं स्त्रियांनीं येऊं दिली नाहीं. त्यामुळें पुन्हां घरगुती शिक्षण होईल तेवढेंच पदरीं पाडण्याची स्त्रियांनीं तयारी दर्शविली. मात्र ही गोष्ट समाजरचनेच्या एकंदर ठेवणीकडे लक्ष देऊन स्त्रिया आपल्या नवऱ्याखेरीज इतरांजवळ व्यक्त करीत नसत. रमाबाई रानड्यांच्या वरील हकीकतीवरूनहि हेंच प्रत्ययास येतें.

रमाबाई रानडे यांनीं 'असे पति देवाचि ललनांना' या काव्य पंक्तीप्रमाणें स्वत:चें सारें आयुष्य घालविलें. त्यांच्या आयुष्यांतील आठवणी या पुस्तकाच्या पानापानांवर याची सत्यता पटवितात. रानड्यांचेबद्दल त्यांना नितांत आदर होता. एकदां रानडे आजारी झाले त्यावेळीं रमाबाईंच्या मनानें धीर सोडला. त्यावेळची मन:स्थिति सांगतांना त्या लिहितात:—

...."आतां पटकीचीं सर्व लक्षणें स्पष्ट दिसूं लागलीं. आवाज अतिशय खोल गेला. बोललेला शब्द तोंडाशीं कान लाविल्याखेरीज ऐकूं येत नसे. बोलावयाचें तें काय? दिवसभरांत "तूं घाबरूं नकोस, भिऊं नकोस लक्ष लावून बाटलीवरची अक्षरें नीट वाचून मग औषध देत जा, घाबरेपणानें भलतेंच देशील," वगैरे धीर देण्याचें बोलणें, दिवसांतून किती एक वेळां चाललें होतें. प्रकृतीचें मान धडधडीत उघड दिसत होतें, त्यामुळें माझा जीव अगदीं भेदरून गेला होता व वारा प्याल्यासारखा झाला होता.

वर लिहिल्याप्रमाणें स्वत:चें धीराचें बोलणें ऐकिलें कीं माझ्या जीवांत नवीन जीव आल्यासारखें होऊन तशा स्थितींतहि मला त्यांतल्या त्यांत हुषारी वाटे, पण तें बोलणेंहि आतां बंद पडल्यामुळें माझा सर्वस्वीं धीर सुटला. धरणी आणि आकाश याशिवाय आपलेपाशीं आतां दुसरें कोणी नाहीं. दयाळू आणि सर्वांच्या धांवणीला धांवणारा तो कनवाळू परमेश्वर यावेळीं कोठें आहे? माझा विश्वास आजपर्यंत सर्वस्वीं त्याच्यावर आहे. त्याच्यावांचून यावेळीं मला दुसरें कोणी नाहीं, हें त्याला समजत नाहीं काय? वगैरे मी आपल्या मनाशीं पुष्कळ बोलून रडलें व कारकून बसले होते त्यांना 'मी जरा आंत जाऊन येतें' असें सांगून ज्या देवळांत आम्ही उतरलों होतों, त्याच महादेवाच्या गाभाऱ्यांत देवासमोर जाऊन बसलें.

ही वेळ रात्रींची तीन वाजण्याची होती. आंत एक म्हातारी गुरवीण निजली होती, तिला बाहेर जाण्यास सांगितलें. पणतींतील नंदादीप अगदीं मंद

अशा प्रकारचें काशीताईंचें हें कल्पनावैभव खास स्त्रीस्वभावाला उठून दिसेल असें वैशिष्ट्यपूर्ण झालें आहे. कारण इथें प्रकट झालेले उपमा दृष्टांत आणि वर्णनें ही स्त्रीच्या लेखणींतूनच निघूं शकतील अशीं आहेत.

या कादंबरींत मधून मधून प्रसंगानुरूप—" खरंच बाई, ताईच्या गुणारूपासारखा जर नवरा मिळाला असता, तर मला वाटतें आज हा जो तिला आईच्या म्हणण्याप्रमाणें पालखीचा " गोंडा " मिळाला आहे, त्याचं कौतुक झालं असतं. पण अशा या प्रकारामुळें तो " गोंडा " नसता मिळाला तरी पुरवता. पण मुख्य सणंग नीट पाहिजे होतं. " आत्याबाई म्हणाल्या, " तिणेन् देवापाशीं पुष्कळ दौलत दिलीन् पण शंकर चांगला पुजला नाहीं, त्यास काय करावें ? " असें या प्रकारें लिहिलेलें संवादलेखन चित्तवेधक आहे.

काशीताईंची या कादंबरींतील भाषा अतिशय साधी, घरगुती, ओघवती आणि चित्तवेधक आहे. मधून मधून तींत आढळणारे कांहीं तुरळक संस्कृत शब्द सोडले तर जुन्या मराठीचा एक चांगला नमुना म्हणून तिच्याकडे पहावयास कांहींच हरकत नसावी. स्त्रीस्वभावाचें वैशिष्ट्यपूर्ण दिग्दर्शन घडविणारी कादंबरी म्हणून या कादंबरीचें स्थान मराठी सारस्वतांत बरेंच मानाचें राहील. अर्थात् आजच्या कादंबरीच्या तंत्राच्या मोजमापानें त्याच्याकडे पाहून चालणार नाहीं. स्त्रीलेखिकांनीं कादंबरीच्या प्रांतांत शिरून आपला मार्ग मुकर केल्याची ही पहिली वहिलीच निशाणी आहे. त्या दृष्टीनें पाहिलें तर काशीताईंनीं कमालीचें यश मिळविलें असें म्हणावें लागेल. येथें घोडनवरी, कापडचोपड, चौघडी, फैटण, मूठभर भात, बिछाईत, समया, गव्हल्यांच्या राशी, लगीनसाडी, घांस देणें, सुनमुखाचा दिवस, बोंगाडा, प्रक्षाळ पूजा इत्यादि कांहीं शब्दप्रयोग त्या काळच्या समाजाचा इतिहास दर्शवितात.

आत्मवृत्तपर कादंबरी लेखनाची सुरवात श्री. हरिभाऊ आपटे यांनीं केली. तशीच ती काशीबाईंनींहि केली. त्याचप्रमाणें त्यावेळच्या काळांत जें कोणी बोलून दाखवत नसे व जें कृतींत घडणें अशक्य होत असे अशा गोष्टींना हरिभाऊंनीं आपल्या लेखनांतून वाचा फोडली. तसेंच काम थोड्या प्रमाणांत कां होईना काशीताईंनींहि केलें. त्या काळांतहि मुलगी अविवाहित राहूं शकते, संस्कृताचें अध्ययन करूं शकते, स्वतः राज्यकारभार पाहूं शकते इत्यादि गोष्टींचें ओझरतें दिग्दर्शन काशी-ताईंच्या " पालखीच्या गोंड्यां " त झालेलें आहे.

" रंगराव " आणि " पालखीचा गोंडा " या दोन कादंबऱ्यांप्रमाणें काशी ताईंनीं लघुकथाहि लिहिलेल्या आहेत. " चांदण्यांतील गप्पा " (१८९८) ह्या त्यांच्या कथासंग्रहामधील कथांवर हरिभाऊंच्या कथालेखनाची छाप पडलेली दिसते.

आज आपण ज्या कथेला लघुकथा म्हणतो तिचा आजचा साजशृंगार हरि-भाऊंच्या वेळीं नव्हता. त्या वेळच्या गोष्टी म्हणजे एखाद्या लहानशा कादंबरी

एवढ्या मोठ्या असत. त्या वेळचें कथेचें एकंदर स्वरूपच निराळें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. परिणामकारक कथानक, भावनेची उत्कटता, रचनेंतील कुशलता, प्रसंगांची निवड आणि त्यांचा कथानकांत होणारा योग्य तो उपयोग वगैरे प्रकारची आजच्या कथेची आवश्यक अशी सजावट हरिभाऊंच्या वेळच्या कथांमधून तितकीशी आढळत नाहीं. तथापि ह्या कथा घरगुती प्रसंगावर आणि सामाजिक पार्श्वभूमीवर आधारलेल्या असल्यामुळें वास्तवतेच्या दृष्टीनें त्यांत कुठेंच कमतरता दिसत नाहीं. शिवाय या कथांची धाटणी उपदेशप्रधान असल्यामुळें कलाविलासाच्या आजच्या कल्पना त्या वेळीं ध्यानांत घेतल्या जात असत, असें म्हणतां येणार नाहीं. समाजसुधारणा हाच हरिभाऊंचा मुख्य हेतु त्यांच्या कथा-लेखनाच्या बुडाशीं होता, आणि तो त्यांनीं उत्तम रीतीनें पार पडला, असें "दुर्गाताईची ओवाळणी" ह्या कथेसारख्या त्यांच्या कथांवरून म्हणावयास हरकत नाहीं.

काशीबाई कानिटकर यांनीं आपल्या कथांमधून नीति आणि धर्म यांचीं तत्त्वें वाचकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कथावर जुन्या कहाणींची जी छाप पडलेली दिसते तिचें कारणहि तेंच असावें. स्त्रीस्वभावाला अनुसरूनच काशीबाईनीं आपल्या ह्या कथा देवावर विश्वास ठेवून आणि दैवावर हवाला टाकून लिहिलेल्या दिसतात. त्यामुळें त्यांच्या कित्येक पात्रांचा तोंडावळा सारखा झाला आहे ! स्वभाववैचित्र्य त्यामधून फारसें आढळत नाहीं. रचनेच्या दृष्टीनेंहि त्यांच्या कथा आजच्या कथेच्या मानानें ढिल्या झालेल्या आहेत. लघु-कथेऐवजीं त्यांनीं हरिभाऊंच्या दीर्घ कथांप्रमाणें त्या लिहिलेल्या आहेत. त्यामुळें त्यांच्या "शिळोप्याच्या गोष्टी" किंवा "चांदण्यांतील गप्पा" यांमधील कथांना लघुकथेची संज्ञा देतां येणार नाहीं. गोष्ट लिहितांना त्यांनीं वापरलेली कथनकला ही एका ठिकाणीं जमलेल्या मंडळींनीं एकामागून एकानें गोष्ट सांगावी तशी आहे. या पद्धतीस चौसरची पद्धति असें मानण्यांत येतें. काशीबाईनीं सर्रास याच पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

काशीबाईंची कथा म्हणजे जशी घडेल तशी माहिती देणारी एक दीर्घ कहाणी आहे. अंतरंग सजविण्यापेक्षां बाह्यांग सजविण्याकडेच काशीबाईंचा ओढा अधिक दिसतो. सूक्ष्म अवलोकन, निसर्गाची मानवी मनोगतांशीं होणारी संगति, आकर्षक वर्णनशैली आणि हृदयंगम भाषा हीं त्यांच्या कथेचीं वैशिष्ट्यें आहेत.

काशीबाईंची कल्पनाशक्ति आणि वर्णनशैली मात्र अपूर्व अशी आहे. स्त्रीहृदयाला शोभेल अशा विशिष्ट उपमादृष्टांतांनीं त्यांनीं खुलविलेलीं वर्णनें त्या करायला लागल्या म्हणजे मागें सांगितल्याप्रमाणें शिवरामपंत परांजपे यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. "मारुतीचा प्रसाद" या कथेंत मकर संक्रांतीच्या वेळीं आकाशांत दिसून येणारें निसर्गाचें वैभव रंगवितांना त्या लिहितातः—

" त्या दिवशीं मकरसंक्रांत होती. सकाळचे पांच वाजले होते. सागरगडच्या डोक्यावर शुक्र चांदणी नुकतीच वर आली होती. ती पाहून असें वाटे कीं, जणुं काय एखाद्या भव्य स्त्रीनें वेणीफणी करून आपल्या काळ्याभोर केशकलापांत हा हिरेजडित असा सुंदर दागिनाच घातला आहे. पलीकडचा पूर्वेकडील भाग अरुणप्रभेमुळें तांबडालाल झाला आहे...जणुं ती स्त्री कुंकूं लावीत असतां लगबगींत पिंजरेचा करंडा खालीं लवंडला व त्यामुळें तो भाग लालभडक झाला! अथवा, नैष्ठिकांनीं रक्तचंदन व तांबडीं फुलें घेऊन भगवान् दिनमणीला अर्घ्य दिलें व त्यामुळें ती दिशा लाल झाली. पश्चिमेकडे सर्व नक्षत्रगण खालीं सरकत होता. जणुं काय हा नवरत्नांचा हार तुटून त्यांतील रत्नें खालीं ओघळत आहेत!"

सामान्यतः बहुधा सर्व स्त्रियांना आपल्या माहेरचें वेड फार असतें. सासर कितीहि चांगलें असू दे आणि तेथील माणसें कितीहि प्रेमळ असू देत, स्त्रीला माहेराचें सारेंच आगळें वाटायला लागतें. आपल्या ह्या मनोवृत्तीचा त्या ठाव घ्यायला लागल्या कीं, त्यांच्यासमोर येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला त्या अवस्थेप्रत नेऊन भिडविण्याचा मोह त्यांना होत जातो. काशीताई तरी ह्या मनोवृत्तीला कशा अपवाद ठरणार? " वनवास " या कथेमध्यें वहाणाऱ्या नदीच्या प्रवाहाला उद्देशून त्या लिहितातः—

" तिचा प्रवाह खालीं चालला होता. त्यामुळें असें वाटे कीं, एखादी लाडकी माहेरवाशीण सासरीं जातांना जशी खिन्नवदन, अश्रुपूरित नेत्रांनीं मातापित्यांचें घर सोडतें, व जोंपर्यंत माहेरचीं माणसें, तें घर, निदान तो गांव दिसत असतो तोंपर्यंत मागें वळून पहात असते. त्याप्रमाणें ती जणूं पितृगृहाकडे वारंवार पहात आहे व खिन्नवदन करून मार्ग आक्रमीत आहे!.... राजकन्या असो वा रंक-कन्या असो, पितृगृह सोडतांना वाटणारें दुःख दोघींनाहि सारखेंच. बायकांचें अंतःकरण बायकांनाच ठाऊक व त्यांनाच मुलीच्या मनाची स्थिति जास्त ठाऊक. म्हणूनच कीं काय दऱ्यारूप स्त्रिया नदीला पोटाशीं कवटाळून धरीत व कडेरूपी निर्दय पुरुष मोठ्या निष्ठुरतेनें तिला फराफरा ओढीत!... "

काशीबाईंचे हे उपमादृष्टांत स्त्रीच्या अनुभवांतून निघणाऱ्या भावनांचें बोल आहेत. परकाया प्रवेश करून स्त्रीचें चित्र रेखाटणाऱ्या पुरुषाला स्त्रीच्या स्वाभावांतील एवढा बारकावा कथेंत आणणें कठीण होईल! बाईंची भावना बाईच चांगली रंगविते असें म्हणायला हा आधार पुरेसा होईल.

स्वभावचित्रणाच्या बाबतींतहि काशीबाईंनीं बरेंच यश मिळविलेलें आहे. हरिभाऊंच्या स्वभावलेखन कलेचें सौंदर्य इथें आढळत नसलें, तरी प्रामाणिकपणानें रंगविलेलीं वास्तवचित्रें म्हणून केव्हांहि या स्वभावचित्रांची किंमत राहीलच. या स्वभावचित्रांत वैचित्र्य फारसें नसलें तरी वास्तवता मात्र बरीच आलेली आहे.

" सारसबाग " या कथेंत काशीबाईंनीं नवऱ्यानें सोडून दिलेल्या मथुराबाई या स्त्रीची हृदयभेदक कहाणी सांगितलेली आहे. हें स्वभावचित्र करुण रसानें ओथंबलेलें आहे. " हृदयावर दुःखाचा भार अतिशय होऊन तो असह्य झाला म्हणजे त्या दुःखाला, देवासमोर बसून, नेत्रावाटें बाहेर लावतात. त्यांच्या मनांतील विचार, कल्पना वगैरे कांहीं एक मनुष्याला कळत नाहीं.... " अशी ही मथुराबाईंची मनःस्थिति लेखिकेनें उत्कृष्ट रीतीनें रंगविली आहे. गणपती मंदिरांत सन्यस्तवृत्तीनें देवाचें गुणगान करीत जीवन घालविणाऱ्या ह्या मथुराबाईंच्या दर्शनानें वाचकाला बाणाच्या कादंबरींतील महाश्वेतेची आठवण आल्याशिवाय रहात नाहीं. " लावण्यवती " या कथेंत प्रियकराबरोबर पळून गेलेली विधवा राजकुमारी अखेरीस विरक्त जीवन घालवीत असलेली दिसते. " वनवास ' मध्यें मानवी जीवन आणि निसर्ग यांची सुंदर संगति दाखवून लेखिकेनें अद्‌भुत आणि शृंगार या रसांच्या परिपोषाच्या पार्श्वभूमीवर चंपी व मानाजीराव यांचीं सुंदर स्वभावचित्रें रेखाटलेलीं आहेत. " मारुतीचा प्रसाद " या कथेंत दारूचे दुष्परिणाम चांगल्या रीतीनें दाखवीत असतांनाच आनंदा व तुळशीराम या परस्पर विरोधी पात्रांचें स्वभावलेखनहि लेखिकेनें मोठ्या कौशल्यानें केलेलें आहे.

काशीबाईंच्या बहुतेक सर्व कथांमधून स्त्रीजीवनाचेंच चित्रण प्रामुख्यानें आलेलें आहे. या सर्व चित्रणांमधून कल्पनेपेक्षां लेखिकेनें वस्तुस्थितीचेंच विशेष चित्रण केलेलें दिसून येतें. त्यावेळच्या काळांत स्त्रीला एखाद्या दासीप्रमाणें समाजांत स्थान दिलें जात असे. या परिस्थितीचें वास्तवचित्र रेखाटण्याचा लेखिकेनें येथें यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येईल.

कथा आणि कादंबरी यांच्या जोडीलाच काशीबाईंनीं चरित्र लेखनासहि हातभार लावलेला आहे. चरित्र वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीनें पाहिलें तर महानुभाव पंथांतील महींद्रव्यासाचें " लीळा चरित्र " हें पुस्तक म्हणजे मराठींतील चरित्र वाङ्मयाची सुरवात असें म्हणावयास हरकत नाहीं.

" राष्ट्राचा इतिहास, राष्ट्राचें जीवन यांचा आदरयुक्त अभिमान प्रत्येकास वाटतो. तद्वतच राष्ट्राचें जीवन ज्यांनीं निर्माण केलें त्यांच्या चरित्राविषयींहि आदर आणि अभिमान वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. या आदर भावनेच्या पोटींच चरित्र वाङ्मयाचा जन्म होतो. चरित्र लिहितांना, कीर्तिरूपानें उरलेल्या लोकमान्यांच्या कीर्तिरूपास चिरंतनता देण्याचा चरित्रकाराचा उद्देश असतो. केवड्याचा पानाचा सुगंध वाऱ्यावर विरून जाण्यापूर्वी स्त्रिया नाहीं का तो आपल्या कुंकवाच्या करंड्यांत सामावून ठेवीत !

इटालीचा कवि ॲरिओस्टो यानें या संबंधीं एक रूपक रचलें आहे. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्याच्या दोरीला एक रूपक बांधलेलें असतें. त्यावर त्याचें नांव कोरलेलें असतें. जेव्हां मृत्यु ही आयुष्याची दोरी तोडतो त्यावेळीं काळ हें पदक

घेऊन विस्मृतीच्या नदींत फेंकून देतो; परंतु यांपैकीं कांहीं—अगदीं थोडीं पदकें—विस्मृति नदींत पडतां पडतांना हंस तीं झेलतात आणि चिरंतनतेच्या मंदिरांत नेऊन तेथें त्यांची प्राणप्रतिष्ठा करितात. ॲरिओस्टोनें सांगितलेले हंस म्हणजे आपले चरित्रकार होत. "*

चरित्र आणि चरित्रकार यांची ही भूमिका लक्षांत घेतां असें दिसून येतें कीं, रामायणमहाभारतांतूनहि चरित्रवाङ्मयाचें अस्तित्व असलेलें पहावयास मिळतें. मात्र त्यावेळचीं हीं चरित्रें म्हणजे सामान्य माणसापेक्षां उच्च कोटींतील अशा थोर विभूतींचीं चरित्रें होतीं. विशेषतः या चरित्रांमधून देवादिकांचीच चरित्र नायकाचे जागीं निवड होत असे. ही परिस्थिति शके १६०० च्या सुमारास झालेल्या नाभाजीच्या ग्वालेरी-भाषेंतील " भक्तमाले " पासून बदलली. आपल्या सभोंवतालीं वावरणाऱ्या थोर विभूतींना देवादिकांच्या बरोबरीचें समजून चरित्रलेखन करण्याची प्रथा पडत गेली. महिपतीनें लिहिलेलीं संतांचीं चरित्रें याच मनोवृत्तीनें लिहिलेलीं आहेत. महिपतीची चरित्र नायकाकडे पहाण्याची दृष्टि आदराची आणि विभूति-पूजेची होती. शाहीर कवींनीं थोर पुरुषांवर जे पोवाडे रचिले त्यांच्या बुडाशीं मात्र विभूतिपूजेशिवाय पुरुषार्थाचा गौरव करण्याची आणि स्फूर्ति मिळवून राष्ट्राच्या कार्यासाठीं प्रवृत्त होण्याची लौकिक दृष्टि दिसून येते.

त्यावेळीं चरित्रलेखनाकडे कला या दृष्टीनें फारसें पाहिलें जात नसे. " चरित्रलेखनाचा कला या दृष्टीनें विचार करून चरित्रनायकाचें व्यक्तित्व आणि त्याचें जीवनरहस्य हृदयंगम रीतीनें वाचकांच्या मनावर ज्या योगानें ठसवितां येईल, अशा पद्धति चरित्रलेखनासाठीं आपण अवलंबिल्या पाहिजेत, अशी जाणीवहि फार काळपर्यंत कोणाच्या मनांत उत्पन्न झाली नव्हती. "‡ पण इंग्रजी वाङ्मयाच्या अवलोकनानंतर विष्णुशास्त्री चिपळोणकरांनीं लिहिलेल्या ' डॉ. जॉन्सन् ' या चरित्र ग्रंथानंतर ही स्थिति बदलली. आधुनिक दृष्टीनें लिहिलेलें मराठींतील हेंच खरें खुरें पहिलें चरित्र आहे.

" याच सुमारास एक चरित्रलेखनाचा अपूर्व प्रयत्न झाला. तो एका स्त्रीकडून झाला. हीच त्याची अपूर्वता आहे, असें नव्हे. चरित्र विषयीभूत व्यक्तीची माहिती तिच्याशीं निकट संबंध आलेल्या व्यक्तींकडूनच मिळवून व तिचीं पत्रें संपादन करून तिचें चरित्र लिहिण्याचा केलेला प्रयत्न, या दृष्टीनेंच त्याची अपूर्वता मुख्य आहे. कारण अशा यथाविधि लिहिलेल्या चरित्रांमध्यें श्री. काशीबाई कानिटकर यांनीं लिहिलेलें " डॉ. आनंदीबाई जोशी " (१९१२ द्वितीयावृत्ति) हेंच बहुधा पहिलें होय. सहजसुंदर भाषा, हृदयास जाऊन

---

* " मराठींतील चरित्रवाङ्मय ", प्रदक्षिणा—प्रा. र. श्री. जोगळेकर

‡ चरित्रवाङ्मय, अर्वाचीन मराठी साहित्य पा. २५९ प्रो. श्री. ना. बनहट्टी.

भिडणारीं वर्णनें व चरित्र लेखिकेनें मधून मधून काढलेले भावनात्मक उद्‌गार या योगानें हें चरित्र रमणीय झालें आहे." (अर्वाचीन मराठी साहित्य)

डॉ. आनंदीबाई जोशी यांच्याबद्दल काशीबाईंना विलक्षण आदर आणि किंवा आपुलकी वाटत असावी इतका घरगुतीपणा या चरित्राला आलेला आहे. चरित्रनायिकेच्या जीवनांतील सर्व बारीकसारीक गोष्टींची माहिती येथें काळजीपूर्वक नमूद केलेली दिसून येईल.

"यमू लहान, दोनतीन वर्षांची होती, तेव्हां फारच गोजिरवाणी दिसे. तिचा वर्ण साधारण गोरा होता. गाल लाल होते. केश काळेभोर असून कुरळे होते. आणखी पोर मोठी खिलाड्र आणि स्वच्छ होती...झोंपाळ्यावर बसून ओव्या म्हणणें, त्याप्रमाणें घरें बांधणें, देव मांडून त्यांचा उत्साह करणें, असें खेळ खेळे..." अशा लहानपणाच्या हकीकतीपासून तो अमेरिकेंत उच्च शिक्षणासाठीं गेल्यानंतर त्यांनी तेथील लोकांना हिंदी पद्धतीची मेजवानी देऊन आणि आपली डॉक्टरची पदवी मिळवून परत मायदेशीं आल्यापर्यंतची हकीकत येथें सविस्तरपणें आलेली आहे. अमेरिकेंतील मेजवानीचा हिंदी थाट वर्णन करतांना काशीबाई लिहितात:—" आनंदीबाईनीं त्या दिवशीं, स्वतःच सैंपाक केला होता. पात्रें अठरा होतीं. पक्वान्नें वगैरे थाट इकडच्यासारखा. सर्व स्त्रियांना आनंदीबाईनीं आपलीं लुगडीं नेसावयास दिलीं होतीं. त्यांच्या हातांत बांगड्या घातल्या होत्या; कपाळाला कुंकवाचे टिळे लाविले होते. त्यांना अगदीं आपल्यासारख्या बनविल्या होत्या. जेवावयास वडाच्या व पळसाच्या पत्रावळी लाविल्या होत्या. बसावयाला पाट मांडिले होते. गुलाल रांगोळीसुद्धां सर्व थाट!! पानसुपारी खावयास बसावयाला भुईवर बैठक घातली होती. अत्तर गुलाब व फुलें दिलीं. पण खरेंच, मी हें जें आपल्या नीरस शब्दांनीं सांगत बसल्यें, ती काय म्हणून? कार्पेंटर मावशीनें या संबंधानें जें वर्णन केलें आहे, तें दिल्यानें किती मौज होईल? आतां तसेंच करितें. म्हणजे आपल्या पदार्थांचीं नांवें घेण्यास त्यांना कसें जड जातें, भोजन करण्याच्या पद्धति त्यांना कशा जड जातात, आणखी आपलें अन्न त्यांना किती उत्तम वाटतें, वगैरे गोष्टी चांगल्या कळतील..."

कार्पेंटरबाईंना लिहिलेल्या अगदीं सुरवातीच्या पत्रांतील पुढील मजकुराप्रमाणें—" हेतु हा कीं, अज्ञानांधकारांत गढून गेलेल्या व संसार यातनांनीं त्रस्त होऊन सदैव निराश व निरुत्साह झालेल्या माझ्या असंख्य स्वदेश भगिनींनीं त्यापासून स्वदेशप्रीति, दृढनिश्चय, दीर्घोद्योग, विद्यानंद, अनेकविध उदात्त कल्पना, इत्यादि गोष्टी शिकाव्या..." एका विशिष्ट हेतूनें काशीबाईनीं या चरित्राचें लेखन केलेलें आहे, हें उघड आहे. त्यावेळच्या काळाच्या मानानें आनंदीबाईनीं घेतलेलें शिक्षण आणि त्यासाठीं सोसलेले कष्ट खरोखरच विशेष आहेत. जुन्या काळच्या हिंदु समाजांतील एक स्त्री जननिंदेची पर्वा न करितां

उच्च शिक्षण घेते ही कल्पनाच मुळीं एखाद्या अद्‌भुतरम्य कथेसारखी आहे. त्यावेळच्या स्त्रिया साधें प्राथमिक शिक्षण घेण्यास देखील राजी नसत किंवा त्यांनीं तें घ्यावें अशी अनुकूल परिस्थिति त्यांच्याभोंवतीं नसे. स्त्री म्हणजे कुणी एक दासी अशीच जणुं प्रत्येकीची भावना. नवऱ्याला देव मानून तो सांगेल त्या आदेशा-नुसार वागण्यांत परमसौख्य लाभतें, अशी त्यांची कल्पना झालेली. स्त्रीचा दर्जा पुरुषापेक्षां खालच्या प्रतीचा अशी रूढीनें त्यांच्या मनावर पकड बसविलेली ! आणि अशा परिस्थितींत स्वतःच्या मानसिक सामर्थ्याच्या बळावर आणि कष्टाळू जीवनावर विसंबून शिक्षण घेणारी एक महिला इतरांनाहि आदर्शभूत व्हावी या हेतूनें लेखिकेनें हें लेखन केलेलें आहे. त्या दृष्टीनें चरित्र नायिकेची थोरवी कोणासहि अमान्य होण्याचें कारण नाहीं.

डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या एकंदर जीवनाकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकला तर त्यांच्या चरित्रावरुन, एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत येते ती म्हणजे त्यांना सुरवातीपासूनच आपल्या भोंवतालच्या परिस्थितीशीं एकसारखी झुंज खेळावी लागली ही होय.

" माझ्या आईनें देखील ममतेच्या शब्दांचा उपयोग केला नाहीं. मला शिक्षा करावयाची ती लहानशा दोरीनें किंवा वादीनें नव्हे, तिनें नेहमीं दगड, लांकडें व विस्तव यांच्याशीं गांठ ठेवली होती..." आपलें लहानपण खुद्द चरित्र नायिकेनेंच या शब्दांतून व्यक्त केलेलें आहे. त्यानंतर मुंबईस त्या शाळेंत जात असतांना लोकांनीं त्यांना दिलेला त्रास काशीबाईनीं पुढीलप्रमाणें सांगितला आहे—

" एस्. पी. जी. खिस्ती—धर्म-प्रचारक मंडळीच्या शाळेंत दुसऱ्या ज्या हिंदु मुली अर्धवट इंग्रजी पोशाक करुन जात, त्या मुंबईस मोठ्यांत मोडणाऱ्या लोकांच्या होत्या, म्हणून त्यांच्याबद्दल निंदेचा शब्दहि कोणी उच्चारीत नव्हते. पण आनंदीबाई तशा पोषाकानें शाळेंत जात असता लोकांनीं त्यांची निंदा करावी, त्यांच्याकडे पाहून हंसावें, त्या शाळेंत जाऊं लागल्या म्हणजे आपल्या घराच्या खिडक्या मुद्दाम उघडून त्यांच्याकडे पहात रहावें, आणि कोणीं कोणीं तर निंदास्पद शब्द उच्चारुन त्यांजवर खडेहि फेंकावे ! वाणी, तांबोळी, उदमी अशा जातींचे लोक त्यांच्याकडे पाहून खांकरत..." कलकत्त्याला जाऊन तेथें आनंदीबाई स्थिर झाल्या. परंतु तेथेंहि त्यांना अशाच प्रकारचा अगदीं वाईट अनुभव आला. तथापि मनानें त्या अतिशय खंबीर असल्यामुळें त्यांनीं सगळें निभाऊन नेलें इतकेंच काय तें. आनंदीबाईनीं अशा प्रकारचा इतरांपासून होणारा त्रास सहन केला. पण त्या अमेरिकेंत गेल्यानंतर त्यांच्या पतींनींच जेव्हां अधून मधून त्यांच्यावर कांहीं आरोप केले व त्यामुळें गैरसज निर्माण झाला तेव्हां मात्र त्यांना कल्पनातीत दुःख झालें. आपली ही मनःस्थिति रंगवितांना एका पत्रांत त्या म्हणतात, "... आपल्या अंतःकरणास इतका त्रास झाला, त्याबद्दल

दंड देण्यास अश्रु देखील मजजवळ राहिले नाहींत. तसेंच एखादा उसासा टाकीन म्हटलें, तर त्याला देखील मी समर्थ नाहीं. आपल्या गरम अथवा थंड अशा बोलण्यानें, वितळणारें किंवा थिजणारें असें फक्त " काळीज " मात्र मजजवळ उरलें आहे..."

मधून मधून या पुस्तकांत घातलेलीं चरित्र नायकेचीं, त्यांचे पति गोपाळराव यांचीं व कार्पेंटर मावशी यांचीं जीं पत्रें आहेत तीं विशेष उल्लेखनीय असून तोच या पुस्तकाचा प्रमुख विशेष आहे. त्या त्या वेळचीं विशिष्ट अशी सामाजिक परिस्थिति या पत्रांवरून फारच चांगल्या रीतीनें प्रतीत झालेली आहे. एखाद्या व्यक्तीच्या मनांतील भावना ओळखून त्याबद्दल इतरांनीं कांहीं लेखन करणें यापेक्षां खुद्द त्या व्यक्तीनेंच आपल्या भावना शब्दांमधून खेळवणें यांत जमीन अस्मानाइतका फरक असतो ! आणि तेंच काम या पत्रांनीं येथें केलेलें आहे. काशीबाईनीं ही विविध पत्रें गोळा करून योग्य जागीं त्यांचें संपादन केलें ही फार महत्त्वाची गोष्ट होय.

या चरित्र लेखनाचा काशीबाईंचा म्हणून चटकन् डोळ्यांत भरणारा असा वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे त्यांनीं वापरलेलीं अगदीं घरगुती अशी भाषा. स्त्रीची म्हणून खास अशी विशिष्ट भाषा या ठिकाणीं पदोपदीं आढळून येते. या संदर्भांत पुढील भाग पहाण्यासारखा आहे.

" आनंदीबाई मावशीला पोंहोंचवून, परत आपल्या बिऱ्हाडीं आल्यावर त्यांना अगदीं उदास वाटूं लागलें. मावशी गेल्यावर दोन तीन दिवसांत त्यांना जेवणखाण किंवा कोणाशीं बोलणें चालणें कांहीं एक गोड लागेना. बापड्या आपल्या हातांनींच सैंपाक करीत व एकट्या टुकटुक जेवायला बसत ! "...

त्या दृष्टीनेंच उपसंहारांतील पुढील भाषाहि पहावी :—

" बये आर्यमाते ! किती ग बाई तूं फुटक्या नशिबाची तरी ? अग, अशा कोणत्या सटीची तुला बाधा झाली तरी ? कीं, ज्यामुळें तुझीं चांगलीं मुलें वाचेनातशीं झालीं आहेत !... "

" माझ्या वाचनांत चरित्रें आलीं नव्हतीं, त्यामुळें मला चरित्र लिहावें कसें हें कळण्याला मार्ग नव्हता. " असें प्रस्तावनेंत काशीबाई म्हणतात. परंतु त्यांनीं आपल्या पतीच्या मदतीनें इंग्रजींतील चरित्रलेखनाची कल्पना आत्मसात् करून आपली ही पहिली वहिलीच कलाकृति इतकी सुंदर चित्रित करून ठेवलेली आहे. आनंदीबाई ह्या शिक्षणप्रेमी व स्वदेशाभिमानी होत्या हें दर्शविण्यासाठीं काशीबाईनीं अनेक पानें इथें खर्चीं घातलेलीं आहेत. संधि सांपडेल तेथें त्यांनीं चरित्र नायिकेच्या या गुणांचा उठाव केलेला असल्यामुळें सुरवातीपासून अखेरपर्यंत आनंदीबाईंची व्यक्तिरेखा वाचकाच्या मनावर कायमचा ठसा कोरीत जातांना दिसून येते. अशा ह्या आनंदीबाई अमेरिकेंत असतांना देशी माल कसा वापरीत हें लेखिकेनें मोठ्या खुबीनें सांगितलें असून अखेरीस त्या अमेरिकेहून

परत आल्यानंतरचें वर्णन अशा रीतीनें केलेलें आहे...." ...अमेरिकेंत त्यांचा गुजराथी पोषाख असे, परंतु त्या जेव्हां उतरल्या (बोटींतून) तेव्हां नारायण पेठी काळी चंद्रकळा नेसल्या होत्या. कपाळास साधारण कोकणस्थांच्या बायकांप्रमाणें कुंकवाची टिकली लाविली होती. अंगांत खणाची चोळी, पायांत बूट व स्टॉकिंग, नाकांत नथ, आणि कानांत कुडी अशा थाटानें त्या खालीं उतरल्या..."

उच्च दर्जाचा कादंबरीकार ज्याप्रमाणें एखादी जिवंत माणसाची भूमिका निर्माण करतो व त्या भूमिकेशीं समरस होऊन आपलें लेखन करतो, त्याप्रमाणेंच चरित्र नायकाच्या भूमिकेशीं चरित्रकारास एकजीव व्हावें लागतें. तो चरित्र नायकाच्या जीवनाशीं तन्मय झाला तरच त्याच्या हातून निर्माण होणारें चरित्र सर्वांगीण व जिवंत होतें. काशीबाईंनीं ही भूमिका अतिशय यशस्वीपणें पार पाडली आहे यांत शंका नाहीं.

रमाबाई रानडे

काशीबाई कानिटकरांच्या नंतर मराठी साहित्यांत नांव मिळविलेल्या अशा लेखिका म्हणजे श्रीमती रमाबाई रानडे या होत. " आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी " या त्यांच्या आत्मचरित्रानें मराठी सारस्वतांत मानाचें स्थान मिळविलेलें आहे. इ. स. १९१० सालीं रमाबाई रानडे यांनीं लिहिलेलें हें पुस्तक म्हणजे स्त्रीनें लिहिलेलें असें मराठींतील बहुधा पहिलेंच आत्मचरित्र होय.

उतार वयांत मनाला विरंगुळा मिळावा म्हणून माणूस ज्या गोष्टी करीत रहातो, त्यांपैकीं आजवरच्या जीवनाचा मागोवा घेत रहाणें हा एक त्याच्या आवडीचा छंद होऊन बसतो. आपलें आयुष्य कोणत्या परिस्थितींत आपण कसें घालविलें याचा हिशोब कुणापुढें तरी मांडला कीं त्याला आनंद होतो. श्रीमती रमाबाई रानडे यांनीं आपल्या आत्मचरित्रांत हाच आनंद भरपूर लुटलेला आहे आणि तो लुटत असतांना अत्यंत मोकळ्या मनानें जें घडलें तें प्रामाणिकपणें सांगून टाकलें आहे. स्वतःच्या जीवनाविषयीं बोलतांनाच त्यांनीं समाज जीवनाच्या इतिहासाचेंहि जातां जातां दर्शन घडविलें आहे.

" आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी " या पुस्तकांत त्यावेळच्या स्त्रीशिक्षणाबद्दलची माहिती देतांना व आपली काय अवस्था झाली हें सांगतांना रमाबाई लिहितात—

"...ते (माझे वडील) गेले (आपल्या घरीं) त्या दिवशीं संध्याकाळीं सुमारें ६॥ वाजतां कोर्टांतून घरीं आल्यावर मला गच्चीवर बोलावून नेऊन विचारलें, " गेले कां तुझे वडील ? " मी " होय " म्हणून सांगितलें. पुन्हां

विचारलें, " तुझें माझ्याशीं लग्न करून दिलें आहे. पण मी कोण, माझें नांव काय ? वगैरे तुला माहीत आहे काय ? "

मी " होय " म्हणून मानेनें सांगितलें.

" मग सांग पाहूं माझें नांव काय तें ? " अशी आज्ञा होतांच मी सर्व नांव जसें लोक म्हणत होते तसें सांगितलें. (लाजेचा भाग जसा समजावा तसा समजत नव्हता. कांहीं कां असेना पण तें ऐकून एक प्रकारचें समाधान झाल्यासारखें दिसलें असें मला पक्कें आठवतें.) नंतर माझ्या माहेरची सर्व हकीकत विचारली, व मीहि ती मला माहीत होती तशी सर्व सांगितली. लिहिण्यावाचण्याची चौकशी केली पण मला कांहीं येत नव्हतें. (माहेरची हकीकतः— माझ्या माहेरचीं माणसें म्हणजे जुने मराठमोळा ठेवणारे जाहागीरदार. त्यांच्या घरीं माहेरवासीणी व आठ वर्षांवरच्या मुलींनीं वडिलांचे समोर ओटीवर सुद्धां जावयाचें नाहीं; मग खेळणें, अगर गाणीं वगैरे म्हणणें कसलें ? लिहिण्याचें तर नांव नाहीं ? माझी एक वडील आत्या, जिचें सासर ब्रह्मावर्तांत होतें, ती मात्र व्यंकटेश स्तोत्र वगैरे वाचावयास शिकली होती. तिला पुढें दुर्दैवानें वैधव्य आल्यापासून आमच्या वडील चुलत्यांनीं ठरविलें कीं , आमच्या घरांत बायकांनीं लिहिणें, वाचणें, शिकणें धार्जिणेंच नाहीं. झालें. असें ऐकल्यावर नुसता लिहिण्यावाचण्याचा विचारहि मनांत आणला तर पाप लागेल कीं काय अशी घरांतील सर्व बायकांची समजूत होण्यास काय उशीर?... त्यामुळें आम्हां मुलींना लिहिण्यावाचण्याचा गंधहि नसणें स्वाभाविकच होतें......) म्हणून त्याच रात्रीं एक पाटी व पेन्सिल आणवून श्रीगणेशाचा पहिला सात अक्षरीं धडा घालवून दिला. हा वेळपर्यंत मला पाटीची अगर अक्षरांची ओळख नसल्यामुळें तेवढीं सात अक्षरें न पाहतां काढण्यास व ओळखण्यास जवळ जवळ दोन तास लागले, तेव्हां ती कोठ पक्की झाली. दुसरे दिवसापासून दररोज रात्रीं दोन तास मला शिकविण्याकडे घालावयाचा क्रम ठेविला, व मुळाक्षरें, बाराखड्या वगैरे शिकवून सुमारें पंधरावे दिवशीं माझ्याकडून पहिल्या पुस्तकाचा पहिला धडा वाचविला व त्या दिवशीं पुष्कळ बरें बरें वाटलेसें दिसलें...

आमच्या घरीं पुरुषांना बायकांनीं लिहिणें वाचणें शिकावें अशी आवड असल्यामुळें वन्संना व सासूबाईंना मामंजींनीं स्वतः लिहिणें वाचणें व जमाखर्च मांडणें हें कामापुरतें शिकविलें होतें. याबद्दल त्या दोघींना भूषण व अभिमान वाटे......असें असून माझ्या शिकण्याच्या वेळीं त्यांना त्यांची सहानुभूति तर नव्हतीच पण उलट त्या अतिशय रागावत व तिटकारा करीत...रोज रात्रीं मी माडीवर गेल्याबरोबर वाचनास आरंभ व्हावयाचा. यावेळीं दक्षिणा प्राइझ कमिटीचीं पुस्तकें व मराठी दुसरें सर्व वाचनाचें काम मजकडेच असल्यामुळें पुस्तक गद्यात्मक असेल तर कांहीं नाहीं, सहज वाचून जाई, पण पद्यात्मक असलें

म्हणजे तें वाचण्यास संकोच वाटे. कारण पदें, आर्या श्लोक, वगैरे जें कांहीं असेल तें गळ्यावर मोठ्यानें वाचावें लागे. तसें वाचलें नाहीं, संकोचानें हळूहळू वाचलें, तर राग येई, व मोठ्यानें वाचावें तर सांगितलेल्या बायकांपैकीं (नातलग, पाहुण्या) कोणीना कोणी तरी जिन्याशीं अगर दाराशीं उभ्या असावयाच्याच, ह्या दुसरे दिवशीं, रात्रीं वाचलेली चाल अगर कडवीं लक्षांत ठेवून, तसेंच हेल काढून वडील बायकांच्या देखत मला वेडावून दाखवावयाच्या, चिडवावयाच्या व लाजवावयाच्या "....

इंग्रजी शिक्षणास आरंभ केल्यानंतरची माहिती देतांना रमाबाई सांगतात— " मी साजघरांतील केर काढीत होतें. अर्धा मुर्धा केर काढून झाल्यावर केरांत इंग्रजी वर्तमानपत्राचा एक कपटा सांपडला. आधींच माझा पोरपणा, त्यामुळें कोणत्याहि गोष्टीला आरंभ केला नाहीं तोंच ती साध्य झाली असें वाटून त्याबद्दल उतावीळपणानें मी हातांतील केरसुणी खालीं ठेवून तो कपटा वाचीत उभी राहिलें...नुसतीं अक्षरेंच पहात उभी राहिलें. आपण खालीं आहोंत ही मला आठवणच नाहीं. ह्यावेळीं आजे सासूबाईंची (सासूबाईंच्या आईची) नजर मजकडे गेली व त्यांनीं जवळ असलेल्या बायकांना हळूच खूण केली. त्याबरोबर दोघी तिघींनीं दारांत येऊन मला पाहिली, पण मला याचा पत्ताहि नव्हता ! मी आपली तशीच नादांत आहें, हें पाहून वन्संना फारच राग आला व त्या मोठ्यानें ओरडून म्हणाल्या, " तुमचें हापीस माडीवर आहे, तेथें तुम्ही वाचा कीं नाचा, आमचा अपमान केला तर खबरदार ! तीच आमची पहिली वहिनी नव्हती का ? तिला दादांनीं लिहिण्यास वाचण्यास सर्व शिकविलें होतें. ती आमच्या बरोबरीची होती, तरी देखील तिनें आमच्या देखत एक अक्षरहि वाचलें नाहीं. तिला इंग्रजी शिकण्याबद्दल त्यांनीं जंग जंग पछाडलें, पण त्या माउलीनें तिकडे लक्षच दिलें नाहीं. आतां तीहि त्यांची बायको होती. तिला दहा गोष्टी सांगितल्या तर एखादी तरी करावी लागेल; पण असा नाचरेपणा नव्हता !..."

इ. स. १८७५ च्या सुमारची ही स्त्रीशिक्षणाची अवस्था पाहिली म्हणजे आज नवल वाटतें. पण त्यावेळीं स्त्रियांनीं शिकावयाचें मनांत आणलें तर किती अडीअडचणींतून तिला जावें लागे, याची कल्पना या हकीकतीवरून येते. रमाबाई रानडे ह्या स्वतः आपल्या पतींना देवाप्रमाणें अक्षरशः मान देत. त्यामुळें त्यांच्या इच्छेसाठीं त्यांनीं हें सर्व सहन केलें आणि आपला शिक्षणक्रम अखंड चालू ठेवला. त्याबद्दल त्या लिहितात, "...या शिकण्याच्या पायीं मला घरांतील सर्वच बायकांकडून प्रत्यक्षाप्रत्यक्ष पुष्कळच जाच सोसावा लागला; पण मी अभ्यासक्रम सोडला नाहीं....स्वतः कडून शांत, गंभीर व अतिशय प्रेमानें केलेला उपदेश, या सर्व गोष्टी सोसण्यास मला आधारभूत झाल्या...."

काळ जसजसा बदलत गेला तसतसा स्त्री शिक्षणाचा पसारा व्यापक

होत गेला. इंग्रजांच्या चालीरीति आणि वाङ्मय यांच्याशीं परिचय झाल्या-नंतर स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न पुरुषवर्गानें नेटानें हातीं घेतला. त्यांत महात्मा जोतिबा फुले, आगरकर वगैरे मंडळींनीं पुढाकार घेऊन स्त्रियांसाठीं स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. पण त्या संधीचा फायदा कांहीं सर्व स्त्रियांनीं घेतलाच असें नाहीं. समाजसुधारकांच्या टीकेचे घाव अंगावर घेण्याइतपत सर्वांची ताकद ह्या लोकांना अजमावयाची संधीच कांहीं स्त्रियांनीं येऊं दिली नाहीं. त्यामुळें पुन्हां घरगुती शिक्षण होईल तेवढेंच पदरीं पाडण्याची स्त्रियांनीं तयारी दर्शविली. मात्र ही गोष्ट समाजरचनेच्या एकंदर ठेवणीकडे लक्ष देऊन स्त्रिया आपल्या नवऱ्याखेरीज इतरांजवळ व्यक्त करीत नसत. रमाबाई रानड्यांच्या वरील हकीकतीवरूनहि हेंच प्रत्ययास येतें.

रमाबाई रानडे यांनीं ‘ असे पति देवचि ललनांना ’ या काव्य पंक्तीप्रमाणें स्वतःचें सारें आयुष्य घालविलें. त्यांच्या आयुष्यांतील आठवणी या पुस्तकाच्या पानापानांवर याची सत्यता पटवितात. रानड्यांचेबद्दल त्यांना नितांत आदर होता. एकदां रानडे आजारी झाले त्यावेळीं रमाबाईंच्या मनानें धीर सोडला. त्यावेळची मनःस्थिति सांगतांना त्या लिहितात:—

....“ आतां पटकीचीं सर्व लक्षणें स्पष्ट दिसूं लागली. आवाज अतिशय खोल गेला. बोललेला शब्द तोंडाशीं कान लाविल्याखेरीज ऐकूं येत नसे. बोला-वयाचें तें काय ? दिवसभरांत “ तूं घाबरूं नकोस, भिऊं नकोस लक्ष लावून बाटलीवरची अक्षरें नीट वाचून मग औषध देत जा, घाबरेपणानें भलतेंच देशील,” वगैरे धीर देण्याचें बोलणें, दिवसांतून किती एक वेळां चाललें होतें. प्रकृतीचें मान धडधडीत उघड दिसत होतें, त्यामुळें माझा जीव अगदीं भेदरून गेला होता व वारा प्याल्यासारखा झाला होता.

वर लिहिल्याप्रमाणें स्वतःचें धीराचें बोलणें ऐकिलें कीं माझ्या जीवांत नवीन जीव आल्यासारखें होऊन तशा स्थितींतहि मला त्यांतल्या त्यांत हुषारी वाटे, पण तें बोलणेंहि आतां बंद पडल्यामुळें माझा सर्वस्वीं धीर सुटला. धरणी आणि आकाश याशिवाय आपलेपाशीं आतां दुसरें कोणी नाहीं. दयाळू आणि सर्वांच्या धांवणीला धांवणारा तो कनवाळू परमेश्वर यावेळीं कोठें आहे ? माझा विश्वास आजपर्यंत सर्वस्वीं त्याच्यावर आहे. त्याच्यावांचून यावेळीं मला दुसरें कोणी नाहीं, हें त्याला समजत नाहीं काय ? वगैरे मी आपल्या मनाशीं पुष्कळ बोलून रडलें व कारकून बसले होते त्यांना ‘ मी जरा आंत जाऊन येतें ’ असें सांगून ज्या देवळांत आम्ही उतरलों होतों, त्याच महादेवाच्या गाभाऱ्यांत देवा-समोर जाऊन बसलें.

ही वेळ रात्रींची तीन वाजण्याची होती. आंत एक म्हातारी गुरवीण निजली होती, तिला बाहेर जाण्यास सांगितलें. पणतींतील नंदादीप अगदीं मंद

जळत होता. तेंहि मला बरेंच वाटलें. कारण, यावेळेस मनाची वृत्ति अशी झाली होती कीं, देव आणि आपण यांशिवाय तिसरें येथें कोणी नको, दिवासुद्धां नसता तर बरें झालें असतें, असें वाटलें. होता तो मात्र मालविण्यास हात धजेना. तसें मनांतसुद्धां आणणें अशुभ आहे, असें वाटून मी देवापुढें थोडी भ्रमिष्टासारखी बसलें. तोंडांतून कसला उच्चार होईना म्हणून डोकें टेंकून हळूच पण पुष्कळ मन मोकळें करुन रडलें... "

एकदां रानडयांच्या प्रबळ इच्छेमुळें रमाबाईनीं तासगांवच्या मुलींच्या शाळेंतील बक्षिस समारंभाचेवेळीं भाषण करण्याचें ठरविलें. त्यावेळची आपल्या मनाची झालेली परिस्थिति रंगवितांना त्यांनीं म्हटलें आहे—

"....बक्षिस समारंभाची जागा तासगांवकर ताईसाहेब यांचे दिवाणखान्यांत केली होती. त्या व गांवांतील पन्नास पाऊणशें बायका हजर होत्या. नेमलेल्या वेळीं मी तेथें गेलें मुलींनीं कांहीं कविता म्हटल्या व मास्तरांनीं रिपोर्ट वाचल्यावर मुलींना उपदेशपर दोन शब्द सांगण्याची माझी वेळ आली. मी उठून उभी तर राहिलेंच, पण दम लागल्यासारखें होऊन हातपाय कापूं लागले. अशी स्थिति दोन तीन मिनिटें झालीं, तरीहि मी बोलावयास सुरुवात केली व कोण जाणें कसें झालें तें पांचपंचवीस वाक्यें मी झपाट्यानें व न अडखळतां बोलून गेलें खरी. सभेंत उभें राहून प्रमुखपणानें बोलण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता... "

" स्वभाव दर्शन " किंवा " व्यक्ति दर्शन " हा वाङ्मयांतील एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या स्वभावछटा त्या व्यक्तीच्या मनोविकारांतून सूचक व परिणामकारक रीतीनें रेखाटणें ही एक कला आहे. या आत्मचरित्रांतून ह्या कलेचा आविष्कार अतिशय सुंदर रीतीनें झालेला आहे.

न्यायमूर्ति रानडयांचे स्वभावाबद्दल लिहितांना रमाबाई म्हणतातः—

" ...नाशकाला गेल्यावर पहातों, तों बाई लवकर मिळेना. बाई शोधण्यांत महिना दीड महिना गेला. तोंपर्यंत संवय नसल्यामुळें संसारासंबंधीं प्रत्येक काम मला अवघड जाऊं लागलें व त्यामुळें माझ्या मनाचा अगदीं गोंधळ उडे, व सोईचें कामसुद्धां अशा धांदलींत बिघडून जाई. माझी ही स्थिति पाहूनच कीं काय, पदार्थ खारट, तिखट कसेहि झाले तरी स्वतः नांवें म्हणून ठेवावयाचीं नाहींत व रागवावयाचें नाहीं. स्वयंपाकाची संवय नसल्यामुळें, तो बिघडेल म्हणून भीतीनें जी माझी धांदल उडे त्यांत कधीं कधीं मीठच घालण्यास विसरावयाचें व कधीं कधीं तर विसरुन दोन वेळां घालावयाचें, तरीसुद्धां स्वतः कधीं राग किंवा तिरस्कार करावयाचा नाहीं...स्वतः जेवण होऊन कोर्टांत गेल्यावर मी जेवायला बसें, तेव्हां खारट किंवा आळणी जें काय झालें असेल त्याबद्दल मनांतल्या मनांत वाईट वाटे व संध्याकाळचा स्वयंपाक मी अगदीं लक्ष देऊन करीन, विसरणार नाहीं असा निश्चय करी. त्यामुळें खरोखरीच बरा स्वैंपाक झाला असला तर

मात्र स्वतः विनोदानें म्हणावयाचें कीं, " कां रे आबा, आतां भाजी खातोस, आणि दुपारीं दोन पदार्थ जास्त असूनसुद्धां कां बरें खाल्ले नाहींस? त्यांत कांहीं बिघडलें होतें कीं काय ? "

त्यावर ते हंसून म्हणत, " दुपारची भाजी काय? त्यांतली एक तर आळणीच होती. भजीं खारट खारट, एक आमटी व भाजी मात्र बरी होती, तेवढी खाल्ली ! "

तेव्हां म्हणावयाचें कीं, " विद्यार्थ्यांचें लक्ष खारट, तिखट, आळणी ह्यांकडे असूं नये; जें काय मिळेल तें मुकाट्यानें खाऊन जावें; मी बघ कधीं काय नांवें ठेवितों कीं काय ? मुकाट्यानें जें काय मिळेल तें खाऊन जातों. "

अशा एखाद्या वेळीं मी धीर करून म्हणे कीं, " मला वेळेलाच कळलें तर आळणी पदार्थांत मीठ तरी घालतां येतें पण मी जेवावयास बसतें तेव्हां काय तें कळतें व भारी लाज वाटते."

तेव्हां म्हणावयाचें कीं, " त्याला काय उपाय आहे ? असल्या गोष्टी सांगत बसण्यापेक्षां ज्याच्या त्यालाच अनुभवानें समजलेल्या बऱ्या. मनुष्य सावध राहून जास्त लक्ष ठेवितें. आज मी तुझ्याकरितां एक सूप शास्त्राचें पुस्तक आणविलें आहे. तें सर्व वाचून पहा व त्यांत लिहिलेल्या कृतीप्रमाणें रोज एक एक पदार्थ करून पहा म्हणजे झालें. त्याला लागणारे पदार्थ नीट मोजून घेऊन स्वस्थ मनानें करावें. जिन्नस करावयाचा साधला तर बरेंच, नाहींतर करमणूक होईल, मनुष्यानें पूर्ण लक्ष दिलें तर सर्व कांहीं होईल... "

..." दुपारीं जेवण झाल्यावर व तिसरे प्रहरीं ताजीं फळें, बदाम, पिस्ते, खाण्याचा स्वतःचा पाठ असे व तीं रोज तिसरे प्रहरीं ताजीं फळें, बदाम मीच घेऊन गेलें पाहिजे, असें असल्यामुळें, मीच नेऊन देत असें. ज्या दिवशीं शनिवार असेल, त्या दिवशीं दोन वाजल्यापासून मला स्वतः बजवावयाचें कीं, ' पहा तुला सभेला जावयाचें आहे, आज शनिवार आहे, त्याची तुला आठवण आहे ना ? वेळ चुकवूं नकोस; नाहीं तर विसरलें, खालीं कोणीं कांहीं काम सांगितलें, अशी सबब सांगितलीस तर मला खपावयाचें नाहीं. एकदां नेमलेल्या कामाकडे दुर्लक्ष करूं नये, त्याबद्दल पहिल्यानें त्रास हा होणारच, तो सोसला पाहिजे. " वगैरे सांगितल्यावर मी लागलीच खालीं येऊन सभेची वेळ चुकूं नये म्हणून सभेची वेळ झाली कीं, " मी जाऊन येतें " असें मुठींत जीव धरून भीत भीत वन्संना सांगून त्यांची होय म्हणण्याची वाट न पाहातां, एकदम बाहेर पडावयाची"....

एकदां सातारा जिल्ह्यांत रानड्यांच्याबरोबर रमाबाईहि दौऱ्यावर होत्या. त्यावेळीं नदीवर सकाळचे प्रातर्विधि उरकल्यानंतर उशीर झाला म्हणून गाडींतून न जातां रानड्यांनीं पायीं जायचें ठरविलें. त्याविषयीं रमाबाई लिहितात—

..." इतक्यांत सांगितलें कीं, " आज उशीर झाल्यामुळें चालणें झालें नाहीं, तर असा थोडा सडकेनें पुढें होतों. तीं माणसें आलीं म्हणजे तूं गाडी जोडवून लवकर ये. "

" पुढें जाणें झाल्यावर मी करमणुकीकरितां म्हणून तेथें असलेला घोड्याचा चाबूक हातांत घेऊन जवळच एक आंब्याचें ठेंगणें झाड होतें तेथें गेलें व चाबकानें दोन तीन फटकारे मारले. त्यांत पांच पंचवीस कैऱ्या पडल्या, तेवढ्यानें तृप्ति न होतां आणखी पडाव्यात म्हणून जोरानें जो फटकारा मारला, त्यासरशीं चाबकाचा बारीक शेवट हातांतील छंदाला अडकून चाबकाच्या जोरानें छंदहि वर उडून गेला, लागलीच समजून आला; पण वरून तो कोठें पडला हें दिसलें नाहीं. मीं आणि शिपायांनीं झाडाखालीं आसपास पुष्कळ शोध केला, पण आमचा शोधणाराचाच कीं काय, त्याजवर चुकून पाय पडून तो वाळूंत गेला किंवा झाडावर कोठें अडकून राहिला,'काय झालें कोण जाणें ? पुष्कळ शोधला, पण सांपडला नाहीं खरा ?

" इतक्यांत गाडी तयार होऊन आली. तींत बसून मी पुढें चाललें. आतां ज्वळ काय सांगावें ? छंद हरवल्याबद्दल काय वाटेल, आपण आंबे काढण्याचा लोभ धरला हें चांगलें केलें नाहीं, असा पश्चात्ताप पावून भीति वाटली. इतक्यांत एक बैलगाडी आली, तरी स्वतःची गांठ पडली नाहीं. तेव्हां मी घाबरलें व माझ्या वेडेपणामुळें व नादिष्टपणामुळें स्वतःला अशा उन्हाच्या वेळीं कितीतरी चालावें लागलें, याबद्दल मला फार वाईट वाटलें. पण उपयोग काय ? दुसऱ्या मैलावर स्वतःची गांठ पडली व गाडींत बसणें झालें. गाडी चालू झाल्यावर " आज माझ्याकडून एक मोठी चूक झाली आहे, " वगैरे छंदाची हकीकत मी सांगितली. सर्व ऐकून घेतल्यावर बऱ्याच वेळानें व शांतपणानें म्हटलें " लोकांचे आंबे तूं न विचारतां पाडलेस हें वाईट केलेंस. याबद्दल तुझी तुला शिक्षा व्हावी व आठवण रहावी, कीं पुनः असें करूं नये, म्हणून तुझा छंद हरवला आहे. मी त्या छंदाचा शोध करणार नाहीं व पुनः नवाही करणार नाहीं; म्हणजे आठवण राहील. "

" हें बोलणें अगदीं नेहमींसारखें चाललें होतें; पण ही गोष्ट आवडली नाहीं, असें मुद्रेवरून दिसत असल्यामुळें हें साधें भासणारें बोलणें मला शिक्षेसारखें वाटलें. जास्त राग येण्यास जागा होऊं नये, म्हणून तो सर्व दिवस आपलें नित्याचें काम न चुकतां खिन्न मनानें मी करीत होतें. रात्रीं जेवावयास बसल्यावर नेहमींसारखें पण ब्राह्मणाला हांक मारून म्हटलें, " बजाबा, आज सकाळच्या पाऊणशें रुपयांचें लोणचें वाढावयास तरी आण ! "

" तो बिचारा काय आणील ! येवढेसें तोंड करून उगीच उभा राहिला. लोणचें केलें होतें कोणीं ? कैऱ्या सकाळपासून जागच्या जागीं पडल्या होत्या.

सकाळपासून त्या आंब्याकडे नुसतें पहाणेंदेखील शिक्षेप्रमाणें वाटे. कोणीच कांहीं बोलत नाहीं व लोणचेंहि कोणी आणीत नाहीं, हें पाहून मला सांगितलें, " दुसऱ्या गोष्टी ध्यानांत ठेवाव्या पण छंद हरवला यांत इतकें खिन्न होण्याचें कारण नाहीं. माझ्याकडूनहि आज तुझ्यासारखीच गोष्ट घडून आली आहे. आज दुपारीं माझी तपकिरीची डबी कोठें पडून हरवली. माझा एक जिन्नस हरवला. व तुझा एक जिन्नस हरवला. तूं म्हणशील ती जस्ताचीच होती, तिची किंमत काय ? किंमतीचा विचार यावेळीं न करतां उपयोगाचे दृष्टीनें माझा जिन्नस जास्त होता, कारण त्यावांचून अडेल, जिन्नस हरवणें म्हणजे सावधपणा व हुषारी कमी, एवढाच दोष येतो. तो येण्यास जपावें हें बरें. पण त्यावांचून सगळा दिवस इतकें खिन्न कां व्हावें ! हंसून खेळून समाधानानें रहावें म्हणजे दुसऱ्यालाहि बरें वाटतें. "

"झालें. यावर पुनः त्या हरवलेल्या जिनसाबद्दल नांवहि काढलें नाहीं...."

रमाबाईंच्या या पुस्तकाची मांडणी अतिशय आकर्षक झालेली आहे. त्यांची भाषाशैली आणि वर्णनशैली इतकी चटकदार झाली आहे कीं, हें पुस्तक वाचीत असतांना त्यावेळचा काळ, समाजामधील स्त्रियांची परिस्थिति, त्यांचें शिक्षण व रानड्यांसारख्या थोर व्यक्तीचें जीवनदर्शन घडल्याविना रहात नाहीं. वाचकाला त्या काळांत खेंचून नेण्याचें सामर्थ्य या पुस्तकांत आहे. स्वभावलेखनाच्या कलेंत रमाबाई निष्णात असलेल्या दिसतात. तसेंच स्वतःच्या आयुष्याचें त्यांनीं केलेलें हें चित्रणहि त्यांच्या प्रामाणिक मनोवृत्तीची साक्ष पटवितें.

या पुस्तकांत मधून मधून आलेलीं "डॉक्टरास बोलावूं पाठविलें." " मला बसते करा, " "गाडींत बसणें झालें," "तेव्हां म्हणावयाचें कीं," " पुढें जाणें झाल्यावर " इत्यादि वाक्यरचना आणि रानड्यांबद्दल सर्वत्र आलेला " स्वतः" हा शब्द रमाबाईंच्या स्त्रीहृदयाची कल्पना देणारा आहे. भाषेचा जुनेपणाहि या वाक्यांवरून दिसून येतो.

रमाबाईंच्या स्त्रीहृदयाचा हळवेपणा, संकोचवृत्ति, सोशीकपणा व पतीचें मन सांभाळण्यासाठीं केलेली पराकाष्ठेची धडपड या पुस्तकांत त्यांनीं स्वतःच अतिशय जिव्हाळ्यानें व्यक्त केलेली आहे. त्यामुळें वास्तवतेच्या दृष्टीनेंहि हें पुस्तक परिणामकारक झालेलें आहे.

● ● ●

सौ. गिरजाबाई केळकर

हरिभाऊ आपट्यांच्या पद्धतीनें लेखन करणाऱ्या काशीबाई कानिटकरांसारख्याच आणखी एक लेखिका म्हणजे गिरिजाबाई केळकर या होत. काशीबाई

कानिटकरांच्या या समकालीन लेखिका. या दोघींच्या लेखनाची पद्धति एकाच प्रकारची असली, तरी त्यांनीं केलेलें प्रतिपादन मात्र भिन्न आहे. काशीबाईप्रमाणें निसर्गाचीं वर्णनें करण्याकडे गिरिजाबाईंच्या मनाचा कल मुळींच नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. वर्णनाची त्यांनाहीं हौस आहे; पण त्या शैलीचा उपयोग त्यांनीं घरगुती चालीरीति, जुन्या काळची समाजरचना आणि त्यावेळच्या माणसांच्या कल्पना रंगविण्याकडे केलेला आहे.

आपल्या आयुष्यांत स्वतःला आलेला जुना बाळबोध अनुभव जमेस धरून स्त्रीजीवनाविषयीं सडेतोडपणें आपले विचार मांडणें हें सौ. केळकरांचें वैशिष्ट्य आहे.

" गृहिणी-भूषण " (१९१०) या पुस्तकांत सौ. केळकरांनीं स्त्री-शिक्षण विषयक आपले विचार मांडणारी स्फुट विचारमाला गुंफिलेली आहे. स्त्रीला जें शिक्षण द्यावयाचें तें केवळ स्त्रियांची थोरवी गावयाची म्हणून न देतांना सामाजिक जीवनाचा अभ्यास करून व्यावहारिक जीवनाला उपयोगी पडणारें असें तें दिलें जावें, हा आपला विचार मांडतांना या पुस्तकांत त्या स्पष्टपणें सांगतात की—

" माता सुशिक्षित असल्याशिवाय कोणत्याहि देशाची खरी उन्नति होणें शक्य नाहीं, असें माझें ठाम मत आहे...स्त्रियांनीं जें शिकावयाचें तें नोकरी मिळविण्याकरितां नव्हे, पण आपल्या मुलाबाळांना सुशिक्षित करण्याकरितां व संसार उत्तम तऱ्हेनें पार पाडण्याकरितां. "

या प्रकारचे असे विचार मांडतांना या पुस्तकांत इंग्रजी राजवट व त्यांचे शिक्षण आणि चालरीति यांचा परिणाम म्हणून आपल्याकडील नीतिशिक्षण कमी झाल्याचा व आपले रीतरिवाज आपल्या लोकांतून कमी होत चालल्याचा दावा लेखिकेनें केला आहे.

स्त्रीशिक्षणाविषयीं लिहितांना सौ. केळकर पुढें म्हणतात, " स्त्रियांना आवश्यक असें अवघड शिक्षण देण्याचा प्रयत्न केला म्हणजे मेंदूचें स्वास्थ्य नाहींसें होतें; व त्यांत गृहव्यवस्थेची जोखीमदारी शिरावर पडली म्हणजे स्त्रियांस करावे लागणारे शारीरिक व मानसिक श्रम व त्यांतच पुरुषांप्रमाणें इतर व्यवसाय करण्याची जाज्वल्य उत्सुकता ह्या दुहेरी श्रमांचा परिणाम त्यांच्या शारीरिक स्वास्थ्यावर होतो व त्यामुळें निपजणारी प्रजा अशक्त होते....आम्ही जर पुरुषांप्रमाणें नोकऱ्या करण्यास जाऊं लागलों किंवा सभेचीं कामें करूं लागलों, तर घरांत येणाऱ्या पैशाचा योग्य व्यय कोणीं करावयाचा ? पुरुषांना सुग्रास अन्न शिजवून घालण्याची काळजी कोणीं करावयाची ? बालकांचें पोषण कोण करणार ? धर्माचें रक्षण कसें होणार ?...स्वयंपाकघर हें गृहिणीची परीक्षा पहाण्याची जागा आहे... "

लग्न झाल्यानंतर प्रत्येक मुलीनें सासर हें आपलें घर आहे, असें समजून तेथील माणसांवर प्रेम करावें असें लेखिकेनें मोठ्या आस्थेनें व आपुलकीनें येथें सुचविलें आहे. अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आधारलेलें हें लेखन असल्यामुळें त्यास

विशेष महत्त्व आहे. त्यावेळीं स्त्रिया फारशा शिकलेल्या नव्हत्या. त्यामुळ परंपरेन चालत आलेल्या समजुतींना अनुसरून त्या वागत असत. हिंदु संस्कृतीचा पगडा त्यांच्या मनावर बसलेला असे. त्याला अनुसरूनच लेखिकेनें सासरीं कसें वागावें याचें उदाहरण म्हणून पुढीलप्रमाणें दिग्दर्शन केलेलें आहे:—

" नणंद म्हणजे माहेरवाशीण. ती चार दिवस आपल्या घरीं आली म्हणजे तिच्या मर्जीनुसार वागलें म्हणजे झालें. ती वेणी घालायला बसली म्हणजे कुठें तोंड पुसायला पाणी दिलें, अंग धुण्याचें पाणी उपसलें, लुगड्याच्या निऱ्या करून ठेविल्या, जेवायला बसतांना एखादा चांगलासा पाट मांडला, मोठें ताट ठेविलें, भांडें घासून पुसून ठेविलें, जेवून उठल्यावर विडा सुपारी काय तें दिलें म्हणजे झालें. इतकेंहि करून जर एखादी नणंद चांगली वागली नाहीं तर आपण आपलें कर्तव्य करीत आहोंत असें समजून मनांत संतोष ठेवावा. पण किती झालें तरी वांकडेंच, असें म्हणून आपलें कर्तव्य सोडूं नये. "

गिरजाबाईंची या पुस्तकांतील भाषा प्रौढ व घरगुती असून त्यांनीं आपले विचारहि स्पष्टपणें मांडलेले आहेत. त्यांच्या विचारसरणींत स्त्रीजीवनाविषयीं एक प्रकारचा जिव्हाळा आहे असें दिसून येतें. घरगुती प्रसंगांचा उठाव त्यांनीं चांगला केलेला आहे. तसेंच उपदेशात्मक असे मांडलेले त्यांचे विचारहि वाचनीय झालेले आहेत.

१९१२ मध्यें गिरिजाबाईनीं " पुरुषांचें बंड " हें एक सामाजिक नाटक लिहिलेलें आहे. एखाद्या लेखिकेनें मराठींत लिहिलेलें असें हें पहिलेंच गद्य नाटक होय. स्त्रियांनीं पुरुषांना सोडून दिलें तर संसार एखाद्या स्मशानासारखा वाटूं लागेल, जिकडे तिकडे शून्य आणि उदास वातावरण निर्माण होईल; व संसार-चक्रच बंद पडेल, हें तत्त्व प्रतिपादण्याकडेच या नाटकाचा प्रमुख रोख आहे. स्वभाव परिपोषापेक्षां येथें लेखिकेनें संविधानकाकडेच विशेष लक्ष दिलेलें दिसतें. एका प्रवेशामध्यें तर स्त्री पुरुषांचा परस्पराशीं येणारा संबंध हा दोषी आहे किंवा नाहीं याची शास्त्रीय चर्चा गिरिजाबाईनीं केली आहे ! संवादलेखन चांगलें साधलेलें आहे.

आपल्याकडील लोकांना इंग्रजांचा सहवास जसा घडत गेला, तसा त्यांच्या विचारसरणीचा फैलावहि इकडे होऊं लागला. आपल्या लोकांना त्यांचें अनुकरण करण्यांत धन्यता वाटूं लागली. इंग्रजांच्या चालीरीति उचलतांना त्यांनीं ज्या सुधारणा घडवून आणल्या त्या सुधारणांचे आपल्या समाजावर जे दुष्परिणाम घडत गेले, तें गिरिजाबाईनीं प्रामुख्यानें आपल्या कथांमधून गोंवून दाखविलेलें आहेत. " समाजचित्रें " (भाग १ व २) व " केवळ विश्रांतीसाठीं " हे त्यांचे कथासंग्रह याच विचारसरणीनें लिहिलेले आढळून येतील.

गिरिजाबाईंच्या कित्येक कथा लांबीच्या दृष्टीनें पाहिल्या, तर एखाद्या लहानशा कादंबरीसारख्या झालेल्या दिसून येतात. कादंबरीप्रमाणेंच या कथांमधून त्यांनीं प्रकरणेंहि पाडलेलीं आहेत. तथापि अतिशय वास्तव व परिणामकारी घरगुती वातावरण त्यांनीं कौशल्यानें चित्रित केलें असल्यामुळें, या कथांना आकर्षकता प्राप्त झालेली आहे.

इ. स. १९२३ सालीं सौ. केळकरांचें "समाज–चित्रें" हें पुस्तक प्रकाशित झालें. या पुस्तकाची दुसरी आवृत्ति इ. स. १९२९ मध्यें व तिसरी इ. स. १९५५ मध्यें प्रकाशित झाली. या पुस्तकांत लेखिकेनें स्त्रीजीवनाबद्दल लिहितांना दोन्ही दृष्टींनीं विचार केलेला आहे. संसारी स्त्री व समाज जीवनांतील स्त्री या स्त्रीजीवनांतील भूमिका लक्षांत घेतांना त्यांनीं स्त्रियांना आपल्या पायांतील वहाण समजणाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला आहे, तर कारण नसतांना स्त्रियांना डोक्यावर घेऊन नाचणारांचीहि कान उघाडणी केलेली आहे ! त्याचप्रमाणें स्त्रीला स्वतंत्र व्यक्तित्वाची जाणीव करून देतांना त्यांनीं जेवढ्या जिव्हाळ्यानें उत्तेजनाची गोष्ट काढली आहे, तेवढ्याच चिडीनें त्यांनीं विवाह व संसार या विरुद्ध बंड उभारणाऱ्या सुशिक्षित स्त्रियांना फटके मारले आहेत. त्यांच्या मतें स्त्रियांना स्वतंत्रता हवी पण ती स्त्रीनें आंखून घेतलेल्या कार्यक्षेत्रापुरतीच मर्यादित हवी आहे. म्हणजे पुरुषांच्या राज्यांत स्त्रियांची ढवळाढवळ जशी त्यांना खपत नाहीं, तशीच स्त्रियांच्या स्वराज्यांतील पुरुषांचा चोंबडेपणाहि त्यांना चालत नाहीं ! सुधारणेच्या काळांत, अनेक सामाजिक स्थित्यंतरांचा व मतमतांतरांचा सुळसुळाट झालेल्या काळांत, सौ. केळकर या प्रकारें नव्याजुन्याच्या सीमारेषेवर भक्कम विचारांनीं उभ्या आहेत. त्यासाठीं त्यांच्या लेखणीनें अगदीं घरगुती वातावरणांत संचार केलेला आहे. बारीकसारीक बोलणीं केलेलीं आहेत. खेळीमेळीचीच पण चटकदार भाषा वापरली आहे. त्या दृष्टीनें "चतुर्थीचा चंद्र" या समाजचित्राची पुढील सुरवात पहाण्याजोगी होईल—

"पावसाळी दिवस. भरपूर पाऊस पडून संतोषित झाल्यामुळें वसुंधरेनें उल्हासित मुखानें सर्वांकडे बघितलें होतें. आनंदित वसुंधरा आपल्या सर्व अलंकारांनीं एकजात नटली होती. नवजीवनानें प्राप्त झालेल्या आनंदांत वृक्षवेली गुरफटल्यामुळें त्या अतिशय शोभायमान दिसत होत्या. माणसांना जीवन देणारीं धनधान्यांनीं भरलेलीं शेतेंही त्यांच्याशीं आपली स्पर्धा करण्याकरितां मोठ्या डौलानें डोलत होतीं आणि तो पिकांचा आनंद त्यांचा मालक शेतकरी त्याच्याही तोंडावर दृग्गोचर होत होता....''

"माझा प्रवास" या कथेंत लेखिकेनें विनोदाला बराच वाव दिलेला दिसून येतो. स्त्रियांनीं तोंडाला साबण लावल्यामुळें आश्चर्य वाटणें, स्टोव्हमुळें मनांत गोंधळ निर्माण होणें आणि सोड्याच्या बाटलीच्या आवाजाला बंदुकीचा

आवाज समजून तो घरांत कसा निघावा याबद्दल विस्मय वाटणें इ. जुन्या माणसांच्या मनाला धक्का देणाऱ्या गोष्टी, विनोदी वातावरण निर्माण करून लेखिकेनें मोठ्या युक्तीनें मांडलेल्या आहेत. उदा. म्हणून भाच्याकडे जातांना करावी लागणारी तयारी लेखिकेनें कशी सांगितली आहे ती पहा:—

" भाचा श्रीमंत तेव्हां आपणहि तेथें नीटनेटकेपणानें जावें, असा विचार करून मी माझी ठेवणीचीं दोन लुगडीं, पांच पांच, सहा सहा रुपये किंमतीचीं, बरोबर घेतलीं. गळ्यांत ठुशी, वीस पुतळ्यांची मध्यें कारलें घातलेली माळ, टिक्का, हातांत एकेक गोट वगैरे सगळे दागिनेहि बरोबर घेतले. नको नको म्हणत असतां हट्टानें जवळून माझी थोरली दोनशें रुपयांची नथ मागून घेतली. बबीचेहि गळ्यांत गाठलें व गोदीच्या गळ्यांत हसळी लटकावून दिली... "

जुन्या काळच्या स्त्रीच्या या अशा प्रकारच्या कल्पना लेखिकेनें येथें मोठ्या गंमतीनें मांडलेल्या आहेत. गिरिजाबाईंच्या बहुतेक सर्व कथांमधून स्त्रीस्वभावाला अनुसरून " सांदणें, खांडपोळ्या " इत्यादि पदार्थ करण्याची पद्धति, सणावारांच्या गोष्टी, माघारपणाला जाणें, बाळंतविडा तयार करणें इत्यादि प्रकारच्या विविध चालीरीति व त्यांच्या भोंवतालचें घरगुती वातावरण सर्वत्र पसरलेलें आहे. लेखिका या चालीरीति रंगवितांना त्या घरगुती वातावरणांत विशेष रंगून गेलेली दिसून येते. त्या दृष्टीनें " पुरी हौस फिटली " या कथेंत लेखिकेनें मंगळागौरीच्या प्रसंगाचें केलेलें पुढील वर्णन एका स्त्रीहृदयाचा आविष्कार म्हणून पहाण्यासारखें आहे:—

" श्रावणाचा महिना. झिम् झिम् पाऊस पडत आहे. रस्त्यांत चोहोंकडे रिप् रिप्. जिकडे पहावें तिकडे चिखल. सूर्यनारायण आपलें दर्शन केव्हा देईल म्हणून सगळेजण आशेनें वाट पहात आहेत. त्यांतून आज सोमवार. मग काय विचारावयाचें ? सांबाच्या देवळांत जाणाऱ्या स्त्रियांच्या दाटीकडे तर पहावयाची सोयच नाहीं. तशांतून नववधूंची धांदल तर पुसूंच नका. सोंवळ्या पैठ-ण्यांच्या बोजांत, दागदागिन्यांच्या ओझ्यांत, जपून पडणारा तो तोरड्याचा पाय, आपल्या मधुर आवाजानें त्या वधूंचा मानीपणा दाखवीत होता. नागगोंड्यांच्या वेढ्यांनीं नटलेल्या बालिका हातांत पूजेचें साहित्य घेऊन चालतांना चिखलांत पाय घसरूं नये म्हणून एकसारख्या जपत होत्या व बरोबरीच्या मुलींना तुझें शिवामुठीचें कितवें वर्ष म्हणून विचारीत चालल्या होत्या. बरोबर येणाऱ्या पोक्त बायका त्यांना समोर पाहून लवकर चला म्हणून आग्रह करीत होत्या... "

गिरिजाबाईंनीं " प्रेमाचें रूपांतर " सारख्या मनोरंजक गोष्टी आणि "अंगठीचा प्रभाव" सारख्या बोधपर गोष्टीहि लिहिलेल्या आहेत. मात्र त्यांच्या लेखनांत इतरांहून अगदीं वैशिष्ट्यपूर्ण असें कांहीं आढळत नाहीं. घरगुती प्रसंगांची सुंदर सजावट हा एक भाग नाहीं म्हणायला वैशिष्ट्यपूर्ण आहे. पण

त्यापलीकडे त्यांच्या कथेचें दुसरें ठळक वैशिष्ट्य सांगतां येणें कठीण आहे. त्यांच्या कथांमधून येणारीं कित्येक पात्रें अगदीं ठराविक साचांचीं आहेत. त्यांत विविधता एकंदरींनें कमीच. त्याप्रमाणें कलात्मक लेखनाला हानिकारक होणारा त्यांचा तत्त्वबोधाकडे असलेला ओढा येथें ध्वनिरूपानें त्यांना मांडतां आला नाहीं. उलट, त्यामुळें रचनेच्या दृष्टीनें विस्कळीतपणा झालेला दिसून येईल. याच कारणामुळें गिरिजाबाईंच्या कथा आजच्या कथांच्या मानानें कलेच्या दृष्टीनें कमी प्रतीच्या आहेत असें दिसून येईल.

या कथांमधून " वाचकहो, आतां आपण असुक एक करूं या " अशा प्रकारची आलेली निवेदन पद्धति सकृद्दर्शनीं फारच चमत्कारिक आहे असें दिसून येते. वास्तविक गोष्ट जशी घडत गेली तशी सांगण्याची पद्धति लेखिकेनें एकदां स्वीकारल्यानंतर अशा प्रयोगांची त्यांना आणखी काय म्हणून जरूरी भासावी कळत नाहीं.

गिरिजाबाईंची भाषा मात्र बरीचशी घगुरती असून सोपी आणि सुटसुटीत झालेली आहे. तसेंच " भीड भिकेची बहीण, " " आधींच तारं त्यांत शिरलं वारं ", अशा वाक्प्रचारांचा मोह त्यांना बराच झालेला दिसतो. त्याचप्रमाणें " मला सांगावयाला झालें कीं ", " तिकडे म्हणावयाचें झालें, " हट्टानें जवळून नथ मागून घेतली " अशा प्रकारच्या जुन्या काळच्या घरगुती बोलीचाहि वापर त्यांनीं येथें यशस्वीपणें केलेला आहे—

● ● ●

सौ. काशीबाई हेर्लेकर

यानंतरच्या काळांत स्त्रियांच्या लेखणीनें थोड्या वेगळ्या दृष्टीनें आपलें पाऊल टाकायला सुरवात केली. केवळ आदर्श गृहिणीचें अगर प्रेमळ मातेचें चित्रण न करतांना संसारांतील विविध प्रश्न लेखनाद्वारें हाताळण्यास आरंभ केला. इ. स. १९१७ मध्यें चवथी आवृत्ति म्हणून प्रकाशित झालेलें " संसारांतील गोष्टी " हें सौ. काशीबाई हेर्लेकर यांचें पुस्तक त्या दृष्टीनें लक्षांत घेण्याजोगें असें अगदीं सुरवातीचें पुस्तक होय. येथें एकूण २६ प्रकरणांमध्यें लेखिकेनें आपले विचार मांडलेले आहेत. एका सुखी कुटुंबाचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून लेखिकेनें संसारांतील विविध प्रश्नांची येथें छाननी केली आहे. घराविषयींच्या आपल्या कल्पना मांडतांना लेखिका इथें म्हणते—

" गरीबाची खोली जरी दिसण्यांत अशी होती, तरी तिच्यामुळें तेथें जमलेल्या त्या आनंदी मुलांच्या आनंदाचा विरस झाला नव्हता. उलट त्यांच्य त्या परस्परांवर असलेल्या निष्कपट प्रेमामुळें व त्या लहान मुलांच्या हंसण्या-

खेळण्यानें व उडण्याबागडण्यानें तिला मोठी रमणीय शोभा आली होती. खरेंच, कुटुंबांतील माणसें परस्परांशीं शुद्ध प्रेमभावानें वागत असतील तेथें बाह्य सौंदर्याची कांहीं गरज असते असें नाहीं. अशालाच घर हें नांव शोभतें. नाहींतर चांगला सुरेख सात मजली वाडा आहे, पण आंत रहाणारांचा नेहमीं बारावा बृहस्पति असें असलें तर त्याला कोणी घर म्हणेल का ?

"...मुलें बाळें आहेत त्या घरांतील माणसांनीं कांकणभर अधिक मेहनत करावी पण खाण्यांत कंजुषाई कधींहि करूं नये....घरांतील रहाणाऱ्या माणसांनीं घराची चांगली ओज ठेवून, ती साफसूफ ठेविल्यावांचून घरें कधींहि चांगलीं दिसत नाहींत....शेजार चांगला असावा...."

या पुस्तकाचें एकंदर वातावरण अतिशय घरगुती असून मधून मधून या सुखी कुटुंबांतील वडीलधाऱ्या मंडळींकडून लहानांना केलेलें मार्गदर्शनहि वाखाणण्यासारखें आहे. अगदीं नव्यानें संसारांत पडणाऱ्या मुलींना या लेखनाचा उपयोग खात्रीनें होईल इतका उपदेशहि यांत आलेला आहे. वाढावें कसें, सैंपाक कसा करावा, विविध पदार्थ नव्यानें कसे तयार करावेत, घरचा हिशेब कसा ठेवावा, काटकसरीनें कसें वागावें, धुणेंपाणी कसें पहावें, घरगुती औषधोपचार कसा करावा इत्यादि प्रकारची सविस्तर माहिती येथें देण्यांत आलेली आहे.

त्याचप्रमाणें "मायेचा बोल, सुखाचा शब्द आणि खायला प्यायला पोटभर असल्यावर कामानें शरीरावर चांगलाच परिणाम होतो." अशा विचारांची पखरणहि येथें आढळून येते. म्हणजे या पुस्तकाची रचना केवळ स्त्रियांसाठींच झालेली आहे असें येथें पानापानांवर आलेल्या मजकुरावरून म्हणावयास बिलकूल हरकत वाटत नाहीं.

कौटुंबिक जीवनाचें ओझरतें दिग्दर्शन घडवीत असतांनाच स्त्रियांचा ज्याच्याशीं पदोपदीं संबंध येतो अशा सैंपाक घराचें वर्णन लेखिकेनें पुढीलप्रमाणें विशेष जिव्हाळ्यानें केलेलें आहे:—

" स्वयंपाक घर चांगलें स्वच्छ दिसत आहे व त्यांतहि उजेड आहे. चुलीच्या वरच्या अंगास छप्पर काळे होऊन घरोसा लागलेला दिसत नाहीं. चुलीवर रात्रीं उजेड चांगला पडावा म्हणून डाव्या बाजूला कंदील आहे. चूल मातीनें सारवलेली असून पोतेरें नुकतेंच दिलेलें असल्यानें जिकडे तिकडे स्वच्छ दिसत आहे. पाण्याचीं भांडीं नीट लावून ठेविलीं आहेत, तींहिं स्वच्छ आहेत. एका फडताळांत दहीं, दूध वगैरे ठेवलेलें आहे व त्याच्यासमोर चुलीच्या डाव्या अंगास फडताळ आहे त्यांत तिखट, मीठ, मसाला वगैरे सामानाचे कित्येक डबे आहेत. स्वयंपाकाचीं भांडीं ह्याच्याजवळ मजलेदार फळ्यांवर रांगेनें ठेविलीं आहेत. पलिकडे चहाचीं भांडीं दिसत आहेत व दोन तीन मोठीं स्वयंपाकाचीं भांडीं राख लावून फळ्यावर तयार ठेवलेलीं आहेत..."

हें वर्णन वाचीत असतांना काशीबाई कानिटकरांनीं " रंगराव " मध्यें दिलेलें घराचें वर्णन लक्षांत आल्याखेरीज रहात नाहीं.

● ● ●

सौ. जानकीबाई देसाई

जानकीबाई देसाई यांनीं वैवाहिक जीवनावर आधारलेल्या अशा चार–सहा कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. " गृहलक्ष्मी " (१९१५) ही त्यांची सुरवातीची कादंबरी. या कादंबरींत त्यांनीं यमुना नांवाच्या एका तरुण गतभर्तृकेची कहाणी करुण रसाचा सुंदर आविष्कार करून सांगितलेली आहे. येथें अनेकदां संकटें आलीं असता दारिद्र्याच्या पराकाष्टेस पोंचलेल्या स्त्रिया सदाचारापासून ढळत नसल्याचें नायिकेच्या व तिच्या बहिणीच्याद्वारें फार चांगल्या रीतीनें दाखविलेलें आहे. या कादंबरीची भाषा साधी, सहजसुंदर व आकर्षक झालेली असून एका असहाय स्थितींतील गरीब हिंदु कुटुंबाच्या रहाणीचें मनोरम चित्र लेखिकेनें येथें सहृदयतेनें चित्रित केलेलें आहे.

जानकीबाईच्या विचारसरणींत त्यावेळच्या मानानें क्रांतिकारक विचारांची गुंफण झालेली आढळून येते. " सौभाग्यतिलक " (१९१७) मध्यें आपल्या पसंतीस उतरलेल्या वधूशीं विवाहबद्ध झाल्यामुळें वडिलांचा रोष पत्करावा लागणाऱ्या नायकास घर सोडावें लागल्याची कल्पना आलेली आहे. तसेंच "चारुगात्री" (१९२०) मध्यें मद्रासी नायक आणि वंग नायिका यांच्या मीलनाची कहाणी लेखिकेनें सांगितलेली आहे ! जुन्या संस्कृतीचा पगडा मनावर असणाऱ्या स्त्रीच्या लेखणींतून त्या काळांत इतकी क्रांतिकारक विचारसरणी बाहेर पडावी, ही कल्पनाच मुळीं आश्चर्यकारक आहे, असें म्हणावें लागेल. स्त्री शिक्षणाच्या फैलावाबरोबरच स्त्रिया स्वतंत्र रीतीनें विचार करूं लागल्याचा हा प्रारंभ होय ! त्या दृष्टीनें जानकीबाईच्या कादंबऱ्या वैशिष्ट्यपूर्ण होत.

स्त्रियांनीं लिहिलेल्या या कालखंडांतील या प्रकारच्या गद्यलेखनाबरोबरच त्यांच्यापैकीं कांहींजणींनीं केलेलें काव्यलेखनहि येथें अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे.

काव्य

सामान्यतः १८८५ ते १९२० पर्यंतचा काल म्हणजे काव्याच्या दृष्टीनें क्रांतीचा काल असें समजतात. " कारण या कालांत मराठीचें जुनें वळण जाऊन इंग्रजी कवितेचें वळण या काव्यास संपूर्णपणें लागलें असें दिसून येतें. १९२०पर्यंत हें वळण लावण्यास कमीअधिक हातभार लावणारे सारे लोक म्हणजे केशवसुत, दत्त, विनायक, माधवानुज, गडकरी, बालकवि आणि टिळक हे एकामागून एक

आपापलें कार्य करून अस्त पावलें. " * या कालामध्यें पुरुषांनीं लिहिलेल्या काव्यांत असा बदल झाला असला व त्यास नवें वळण मिळालेलें असलें तरी स्त्रियांनीं जें काव्य लिहिलें त्यांत मात्र याहि कालांत काव्याचें जुनेंच वळण जास्त राहिलेलें दिसून येतें.

सरस्वतीबाई टिपणीस यांचीं " अंतर्गृहांतील गीतें " (१९१५), राधाबाई आपटे यांचें "कीर्तनसुधा" (१९१८), मनूबाई भोरकर यांची "फेरांचीं गाणीं" (१९१२), राधाबाई महेश्वरकर यांची " बायकांच्या सभेंतील गाणीं "(१९०८) गंगाबाई विजापूरकर यांचें " सावित्रीचें गाणें " (१९१३) इत्यादि अनेक कवयित्रींची ही कामगिरी लक्षांत घेतां मराठी काव्यांत घडून आलेल्या क्रांतीचा त्यांना मागमूसहि नव्हता असें दिसून येतें. आपल्या धार्मिक रूढि आणि जुन्या चालीरीति यांच्याबाहेर त्यांचे काव्याचे विषय जाऊं शकत नव्हते. कारण त्यावेळीं स्त्रीशिक्षणाचा प्रसार फारसा झालेला नव्हता आणि दुसरें म्हणजे त्यावेळच्या स्त्रियांनीं आपल्या शिक्षणाच्या मानानें काव्याचा अभ्यासहि केला नसावा. तथापि वर दिलेल्या कवितेप्रमाणेंच काव्यलेखन करणाऱ्या कांहीं कवयित्रींच्या काव्याचें स्वरूप कसें आहे तें आतां पहावयाचें आहे.

पार्वतीबाई गोखले

" स्त्रीगीत रत्नाकर " (१९०३) या पुस्तकांत पार्वतीबाई गोखले यांनीं अप्रकाशित अशीं कांहीं गाणीं दिलेलीं आहेत. हीं गाणीं लहान मोठ्या स्त्रियांनीं म्हणावयास व ऐकावयास योग्य अशीं असून तीं देवादिकांवर रचलेलीं आहेत. उदाहरणार्थ या पुस्तकांतील खालील "गौळण" या संदर्भात पहावी:—

" गौळणी सांगती गाऱ्हाणी, रात्रीं आले चक्रपाणी ॥
खातो दहिं, दुध, तुप, लोणी, फोडिल्या अवघ्या विरजणी ॥
हरि बाई कोणास आवरेना ॥ यशोदे बाळ तुझा कान्हा ॥
कुठवर सोसुं मी धिंगाणा ॥..."

या गौळणींत कृष्णाच्या किती तरी लीला याचप्रकारें वर्णिलेल्या आहेत. त्याचप्रमाणें ' रासक्रीडा ' मधील कृष्णाची लीला कशी रंगविली आहे पहा—

" वृंदावनीं सह गोपि हरी, रास मंडळीं क्रीडा करी ॥ध्रु०॥
चिमणी वाजवि सारंगी, सगुणि थाप दे मृदंगीं ॥
सन्मुख गायन करि रंगी, चांगुणि डोळे चवरंगी ॥

* रा. श्री. जोग, मराठी साहित्य, पा. २

गुलाल झोकिति नारंगी, खेळति टिपऱ्या सारंगी ॥
उडे रंगाची पिचकारी ॥ "

या गीतांची भाषा जुन्या थाटाची व रचनाहि जुन्या पद्धतीचीच आहे. स्त्री स्वभावांतील भावनाविष्कारापेक्षां येथें भाबड्या अंतःकरणांतून निघणारे देवा-विषयींचे बोलच अधिक आढळतात.

○ ○ ○

कृष्णाबाई गाडगीळ

" मानसगीत सरोवर " (१९१३) या पुस्तकांत कृष्णाबाई गाडगीळ यांनीं भगवंताच्या गुणलीलांवर रचलेलीं गाणीं दिलेलीं आहेत. कोल्हापूरच्या देवीवर रचलेलें त्यांचें गाणें त्या दृष्टीनें उदाहरण म्हणून येथें पहाण्यासारखें आहे—

" चला सख्यांनो करविर क्षेत्रीं जगदंबा पाहूं ॥
हळदी कुंकू ताटिं भरोनी आनंदे वाहूं ॥ धृ. ॥...
लाल पैठणी नेसुन ल्याली कंचूकी अंगा । कंचूकी. ॥
नेत्रीं अंजन कुंकुम मळवट भरि शेंदूर भांगा । केशर कस्तुरि चंदन
मिश्रित सुगंध सर्वांगा ॥ सु. ॥ कुसुमहार तो गळा घालुनी शोभे धवलंगा ।
सागरतनया श्रीविष्णूचे त्यागुनि अर्धांगा ॥ दीन अनाथा
उद्धारास्तव आली असे वेगा ॥ लक्ष चौऱ्यांशि योनि हिंडुनी किती
तरि जिव श्रमवूं ॥ कि. ॥ पुरे पुरे या प्रपंच लाटा कवणे परि साहूं ॥
चला. ॥ वेणि शेषसम गोंडे फुलांची पाठिवरी लोळे ॥ पाठि. ॥
बिंदि बिजवरा काप बुगड्या नथ नाकी डोले । मंगळसूत्र तन्मणि
लफ्फा पुतळ्या कारलें ॥ पुत. ॥ चंद्रहार सरि झगझग चमके कटिं पट्टा
आवळे । गोठ पाटल्या छंद बांगड्या पुढें ताशिव तोडे ॥ पुढें ॥ दंडीं
वांकी बाजूबंदाचे लोंबति लाल गोंडे । कृष्णेच्या करिं ज्ञानकांकडा उजळुनिया
पाहूं ॥ उ. ॥ मम कुलदैवत श्री जगदंबा पदकमलीं वाहूं ॥ २ ॥

कृष्णाबाईच्या या गाण्यांत स्त्रीस्वभावाचें वैशिष्ट्य सुंदर रीतीनें आविष्कृत झालेलें आहे. अशीं किती तरी गाणीं व आरत्या त्यांनीं या पुस्तकांत दिलेल्या असून त्या आकर्षक झालेल्या आहेत. त्यांच्या लेखनांत जिव्हाळा असला तरी त्यांच्या लेखनावर संस्कृताची बरीच छाप पडलेली दिसून येते. " सागरतनया " " धवलांगा ", असे किती तरी संस्कृत शब्द त्यांनीं येथें योजिलेले आहेत. त्यांच्या काव्यांत प्रसाद व माधुर्य हे काव्य गुणहि चांगल्याप्रकारें प्रकट झालेले आहेत.

○ ○ ○

लक्ष्मीबाई बेहेरे

इ.स.१८९६ ते १९१४ या कालखंडांत लिहिलेल्या लक्ष्मीबाईच्या कविता "सुमन माळ" या काव्यसंग्रहांत समाविष्ट झालेल्या आहेत. या कविता मात्र देवादिकांचें मनावरचें मोहपटल बाजूला झुगारुन वैयक्तिक सुखदुःखांनीं नटलेल्या आहेत. एकनिष्ठ व उत्कट प्रेमाची भावना या कवितांमधून अतिशय कौशल्यानें सूचित झालेली असून तोच या काव्याचा प्रमुख विशेष आहे. हा विशेष दर्शविणाऱ्या "प्रियकरा!" या कवितेंत प्रेमपत्राबद्दलची आपली अपेक्षा व्यक्त करतांना कवयित्री म्हणते:—

अपराध काय मीं केले ?
कां त्यजुनी जाणें झालें ॥ प्रियकरा ॥
सोडुनी सर्व रागातें ।
पाठवा प्रेमपत्रातें ॥ प्रियकरा ॥
जो प्रेम-तरू लावियला ।
सुकुनी कां आज तो गेला ॥ प्रियकरा ॥
सिंचुनी प्रेम-जल वरतें ।
वाढवा तया वृक्षातें ॥ प्रियकरा ॥ ... "

म्हणजे इंग्रजी कवितेची छाप या काव्यावर पडलेली असली तरी "असे पति देवचि ललनांना" ही भूमिका मात्र येथें कवयित्रीनें सोडलेली नाहीं हें विशेष होय.

इ. स. १८७४ ते १९२० या कालखंडामधील स्त्रियांनीं लिहिलेलें वाङ्मय हें अशा प्रकारचें आहे. संख्येच्या मानानें तें फारच कमी आहे, अशी वस्तुस्थिति दिसत असली तरी तो दोष काळाचा आहे असें म्हणावें लागेल. कारण त्यावेळची सामाजिक परिस्थिति आणि स्त्रीशिक्षण यांचा समन्वय घातला तर त्यामानानें हें वाङ्मय बरेंच आहे असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं.

वास्तविक हा काल एक प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय क्रांतीनें भरून गेलेला असा आहे. त्याचे पडसाद पुरुष लेखकांच्या लेखनांत भरपूर उमटलेले दिसून येतात. त्याच्या अगदीं उलट स्थिति या स्त्रियांच्या लेखनांत आढळून येते. या काळांतील हें स्त्रियांचें वाङ्मय अतिशय मर्यादित क्षेत्रांतून निर्माण झालेलें दिसतें. अनेक लेखन प्रकार स्त्रियांनीं हाताळलेले असले तरी--" शिवरामपंत ही एक व्यक्ति नव्हती. शिवरामपंत ही स्फूर्ति होती. शिवरामपंत ही शक्ति होती. शिवरामपंत ही चेतना होती. शिवरामपंत ही विचारांची सुवर्ण खाणी होती. शिवरामपंतांची मोठी मर्दुमकी म्हणजे सर्व महाराष्ट्रभर त्यांनीं उत्पन्न केलेली स्वातंत्र्याची प्रीति होय ! शिव-

रामपंतांच्या पूर्वीं राजकारण सत्तेशीं संगनमत करणारें होतें. शिवरामपंतांच्यापूर्वीं स्वातंत्र्य हा शब्द महाराष्ट्राला नवखा होता.......स्वातंत्र्याची कल्पना प्रथम शिवरामपंतांनीं पुढें मांडली...प्रत्येकाच्या रसनेस त्यांनीं स्वातंत्र्याची चटक लावली..." (अच्युतराव कोल्हटकर) असे वैशिष्ट्यपूर्ण उद्‍गार कोणत्याहि लेखिकेबद्दल निघालेले नाहींत ! तथापि येथें एक गोष्ट प्रामुख्यानें सांगावी लागेल कीं, स्त्रियांनीं स्वतःच्या म्हणून ज्या भावना आहेत त्या ज्या उपमादृष्टांतांनीं व ज्या कल्पनांनीं चित्रित केल्या त्यांची सर कोणत्याहि पुरुष लेखकाला न येण्यासारखीच आहे ! अर्थात् हा भाग अगदीं अल्पप्रमाणांत आहे हें कबूल केलें, तरी तो आहे त्याच मोजक्या प्रमाणांत कां असेना पण आपलें वैशिष्ट्य दर्शविणारा आहे, यांत शंका नाहीं.

हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें वैशिष्ट्य, त्यांची स्वभाव--लेखनाची अप्रतिम कला किंवा विषय मांडण्याची अवर्णनीय हातोटी आणि विषयांतील विविधता, काशीबाईच्या लेखणींत तितक्या उत्कटत्वानें आढळत नसली, तरी काशीबाईच्या कादंबऱ्यांतून झालेला स्त्री हृदयाचा आविष्कार केव्हांहि वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि म्हणूनच त्यांना लिहिलेल्या एका पत्रांत खुद्द हरिभाऊच लिहितात कीं:—

"आपली कादंबरी वाचून मला आपल्यास प्रख्यात इंग्रजी कादंबरी लिहिणाऱ्या ज्या मिस् ऑस्टेनबाई, किंवा फ्रेंच कादंबऱ्या लिहिणाऱ्या जॉर्ज सॉबाई, त्यांच्या जोडीला बसवाव्या असें वाटतें. मि. रा. गोविंदराव यांचा हेतू आपण जॉर्ज ईलिअट व्हावें असा दिसतो; परंतु माझ्या पामर बुद्धीला असें वाटतें कीं, आपण जेन ऑस्टेनचेंच अनुकरण करावें. जॉर्ज ईलिअटचें अनुकरण करणें इष्ट नाहीं. खरोखर साधेपणांत जी काय मौज आहे ती कशांत नाहीं. अव्याज मनोहरत्व हें कांहीं निराळेंच आहे. त्याची बरोबरी कशासहि यावयाची नाहीं. मी आपणांस जेन ऑस्टेनची उपमा देतों याचें कारण तरी आपल्या भाषेचें अव्याज मनोहरत्व, हेंच होय...माझी तर आजमितीला अशी खात्री आहे कीं, "गृहसौख्य" व "सुखकरदरीं" हे दोन भाग जसे तुम्हांला साधले आहेत तसे मला कधींहि साधले नसते...राधाबाईचें पात्र...जर जुन्या काळच्या प्रेमळ, सुशील अशा पोक्त स्त्रीचें चित्र मला दाखवा असें कोणी म्हणेल तर मी त्यास चटकन् आपली कादंबरी वाच म्हणून सांगेन......अहाहा ! काय ह्या राधाबाईची बोलणीं !......" (डेक्कन कॉलेज, पुणें, ६ मे १८८५.)

शिवरामपंतांच्या काव्यमय भाषाशैलीचें व वर्णनशैलीचें सौंदर्यहि काशी-ताईच्या लेखणींतून पुष्कळ ठिकाणीं दिसून येतें.

रमाबाई रानडे यांच्या आत्मचरित्राचें वैशिष्ट्यहि अपूर्व आहे. त्याकाळच्या स्त्रींच्या सामाजिक इतिहासाचा तो अतिशय सुंदर व वास्तव असा चित्रपटच आहे.

अतिशय मोकळ्या मनानें स्त्री लिहावयास बसली, तर तें लेखन किती परिणामकारी होऊं शकतें, याचा तो एक आदर्श नमुनाच होय.

काव्याच्या आणि निबंधाच्या बाबतींत मात्र स्त्रियांची या कालांतील लेखणी फारच मर्यादित क्षेत्रांतून वावरत असलेली दिसून येते. १९२० नंतर ही परिस्थिति पालटून गेली. पहिल्या महायुद्धानंतर आपल्या देशांत स्थित्यंतरें घडून आलीं; त्यांचा परिणाम विशेषतः स्त्रीजीवनावर फारच मोठ्या प्रमाणांत झाला. त्यामुळेंच् त्यांच्या वाङ्मयाचेंहि स्वरूप बदलत गेलें. काळाच्या गतीबरोबर जाण्याचें सामर्थ्य त्यांच्या लेखनांतहि येत गेलें. पुढील प्रकरणांत त्याचाच विचार करावयाचा आहे.

☆

रामपंतांच्या पूर्वी राजकारण सत्तेशीं संगनमत करणारें होतें. शिवरामपंतांच्यापूर्वी स्वातंत्र्य हा शब्द महाराष्ट्राला नवखा होता.......स्वातंत्र्याची कल्पना प्रथम शिवरामपंतांनीं पुढें मांडली...प्रत्येकाच्या रसनेस त्यांनीं स्वातंत्र्याची चटक लावली..." (अच्युतराव कोल्हटकर) असे वैशिष्ट्यपूर्ण उद्‌गार कोणत्याहि लेखिकेबद्दल निघालेले नाहींत ! तथापि येथें एक गोष्ट प्रामुख्यानें सांगावी लागेल कीं, स्त्रियांनीं स्वतःच्या म्हणून ज्या भावना आहेत त्या ज्या उपसादृष्टांतांनीं व ज्या कल्पनांनीं चित्रित केल्या त्यांची सर कोणत्याहि पुरुष लेखकाला न येण्यासारखीच आहे ! अर्थात् हा भाग अगदीं अल्पप्रमाणांत आहे हें कबूल केलें, तरी तो आहे त्याच मोजक्या प्रमाणांत कां असेना पण आपलें वैशिष्ट्य दर्शविणारा आहे, यांत शंका नाहीं.

हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें वैशिष्ट्य, त्यांची स्वभाव--लेखनाची अप्रतिम कला किंवा विषय मांडण्याची अवर्णनीय हातोटी आणि विषयांतील विविधता, काशीबाईंच्या लेखणींत तितक्या उत्कटत्वानें आढळत नसली, तरी काशीबाईंच्या कादंबऱ्यांतून झालेला स्त्री हृदयाचा आविष्कार केव्हांहि वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि म्हणूनच त्यांना लिहिलेल्या एका पत्रांत खुद्द हरिभाऊच लिहितात कीं:—

"आपली कादंबरी वाचून मला आपल्यास प्रख्यात इंग्रजी कादंबरी लिहिणाऱ्या ज्या मिस् ऑस्टेनबाई, किंवा फ्रेंच कादंबऱ्या लिहिणाऱ्या जॉर्ज सॉबाई, त्यांच्या जोडीला बसवाव्या असें वाटतें. सि. रा. गोविंदराव यांचा हेतू आपण जॉर्ज ईलिअट व्हावें असा दिसतो; परंतु माझ्या पामर बुद्धीला असें वाटतें कीं, आपण जेन ऑस्टेनचेंच अनुकरण करावें. जॉर्ज ईलिअटचें अनुकरण करणें इष्ट नाहीं. खरोखर साधेपणांत जी काय मौज आहे ती कशांत नाहीं. अव्याज मनोहरत्व हें कांहीं निराळेंच आहे. त्याची बरोबरी कशासहि यावयाची नाहीं. मी आपणांस जेन ऑस्टेनची उपमा देतों याचें कारण तरी आपल्या भाषेचें अव्याज मनोहरत्व, हेंच होय...माझी तर आजमितीला अशी खात्री आहे कीं, "गृहसौख्य" व "सुखकरदरीं" हे दोन भाग जसे तुम्हांला साधले आहेत तसे मला कधींहि साधले नसते...राधाबाईचें पात्र...जर जुन्या काळच्या प्रेमळ, सुशील अशा पोक्त स्त्रीचें चित्र मला दाखवा असें कोणी म्हणेल तर मी त्यास चटकन् आपली कादंबरी वाच म्हणून सांगेन......अहाहा ! काय ह्या राधाबाईची बोलणीं !......" (डेक्कन कॉलेज, पुणें, ६ मे १८८५.)

शिवरामपंतांच्या काव्यमय भाषाशैलीचें व वर्णनशैलीचें सौंदर्यहि काशी-ताईंच्या लेखणींतून पुष्कळ ठिकाणीं दिसून येतें.

रमाबाई रानडे यांच्या आत्मचरित्राचें वैशिष्ट्यहि अपूर्व आहे. त्याकाळच्या स्त्रीच्या सामाजिक इतिहासाचा तो अतिशय सुंदर व वास्तव असा चित्रपटच आहे.

अतिशय मोकळ्या मनानें स्त्री लिहावयास बसली, तर तें लेखन किती परिणामकारी होऊं शकतें, याचा तो एक आदर्श नमुनाच होय.

काव्याच्या आणि निबंधाच्या बाबतींत मात्र स्त्रियांची या कालांतील लेखणी फारच मर्यादित क्षेत्रांतून वावरत असलेली दिसून येते. १९२० नंतर ही परिस्थिति पालटून गेली. पहिल्या महायुद्धानंतर आपल्या देशांत स्थित्यंतरें घडून आलीं; त्यांचा परिणाम विशेषत: स्त्रीजीवनावर फारच मोठ्या प्रमाणांत झाला. त्यामुळेंच् त्यांच्या वाङ्मयाचेंहि स्वरूप बदलत गेलें. काळाच्या गतीबरोबर जाण्याचें सामर्थ्य त्यांच्या लेखनांतहि येत गेलें. पुढील प्रकरणांत त्याचाच विचार करावयाचा आहे.

☆

. ६ .

ललित वाङ्मयाचा विकास

मागील प्रकरणांत ललित वाङ्मयाच्या प्रारंभ कालांतील स्त्रियांच्या लेखनाचें कांहींशा विस्तारानें विवेचन केलें. या प्रकरणांत इ. स. १९२० ते १९६० या कालखंडांतील ललित वाङ्मयाच्या विकासाचें मूल्यमापन करावयाचें आहे. म्हणजे या कालखंडांतील स्त्रियांनीं जी लेखननिर्मिति केली तिचें स्वरूप या प्रकरणांत लक्षांत घ्यावयाचें आहे. या कालखंडांत स्त्रियांच्या शिक्षणाची वाढ झाली असून त्यांचें लेखनहि बरेचसें विकसित झालेलें आहे. नवीन नवीन लेखिका या काळांत उदयाला येऊन मान्यवर झालेल्या आहेत. त्यांचें लेखनहि पूर्वीच्या स्त्रियांच्या मानानें भरपूर झालेलें आहे. त्या कारणानें जुन्या काळच्या लेखिकांच्या मानानें या कालांतील लेखिकांच्या लेखनाचा विचार कांहींशा संक्षेपानेंच करण्याचा विचार आहे.

इ. स. १९२० नंतरच्या स्त्रियांच्या सामाजिक जीवनांत व पूर्वीच्या मानानें शिक्षणांत बराचसा फरक पडत गेला. इंग्रजांच्या सहवासानें व शिक्षण पद्धतीमुळें दिवसेंदिवस भारतामधील लोक अधिक सुशिक्षित होत गेले. त्यांच्या अंगीं समाज सुधारणा बाणली गेली. स्वातंत्र्याचा विचार त्यांच्या मनांत फोफावत गेला. नव्या विचारांची सर्वत्र पेरणी होत गेली. त्याचा परिणाम लेखनावरहि होत गेला. इंग्रजींतील साहित्याच्या वाचनानें व पठणानें मराठी साहित्यांत अनेक वाङ्मय प्रकार नव्यानें जन्माला आले. जुन्या लेखनप्रकाराला नवजीवन लाभलें, बहर येत गेला. आणखी मुख्य म्हणजे समाज-सुधारणा वाढीस लागल्या. बदलत्या जगाचे पडसाद स्वाभाविकपणेंच वाङ्मयाच्या प्रांतांत उमटूं लागले. ह्या परिस्थितीचा परिणाम स्त्रीजीवनावर चांगलाच झाला. म. ज्योतिराव फुले, आगरकर यांच्या सामाजिक सुधारणेमुळें स्त्रीशिक्षण वाढीला लागलें आणि हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांच्या वाचनामुळें स्त्रीजीवनाला खरी वाचा फुटली. स्त्रियांची लेखणी अधिक स्वतंत्रपणें विचार करूं लागली. आपलें म्हणून वेगळें कांहीं मांडण्याकडे तिच्या मनाचा कल झुकूं लागला. त्यांच्या विचा-रास वेगळें वळत मिळत गेलें. स्वतःची प्रत्येक भावना घरगुती वातावरणांत कां होईना, पण निःसंकोचपणें मांडण्याचें व्रत स्त्रीच्या लेखणीनें अंगिकारिलें. त्याचा

आविष्कार त्यांच्या लेखनांत होत गेला. आणि हिंदुस्थानांतील स्त्री ही एकलकोंडी, दुबळी, खुळ्या धार्मिक समजुतींनीं बुरसटलेली, पुरुषांच्या इच्छाआकांक्षांना बळी पडणारी, अशी जी समजूत समाजांत कितीक वर्षें रूढ झाली होती तिला एकदम भगदाड पडलें. अशिक्षितपणामुळें तिच्या ठायीं वसणारें न्यूनगंडत्व लय पावूं लागलें. शिक्षणामुळें तिला एक प्रकारचें आगळें सौंदर्य लाभलें. तिचें मानसिक परिवर्तन घडत चाललें. मनांत येईल तें बेधडक लिहिण्याची मोकळीक तिला लाभली. विभावरी शिरूरकरनीं आपल्या लेखनद्वारें या परिवर्तनाची नांदी गाइली. स्त्रीजीवनांत नवा प्रकाश येत चालला. स्त्री ही पुरुषाच्या दृष्टिकोनांतून त्यांच्या लेखनांत प्रकट व्हायची ती तिच्याच जीवाभावांच्या लेखणीच्या माध्यमांतून खरीखुरी अशी प्रकट होत चालली. खऱ्या स्त्रीच्या जीवनाचा साक्षात्कार घडविण्याचें सामर्थ्य स्त्रियांच्या लेखणीला आलें ! नव्या जगांतील नवी स्त्री व तिचें जीवन कसें असतें याचा चमत्कार मराठी रसिकांनीं उपभोगला !! स्त्रियांची लेखणी अधिक मोकळ्या मनानें आपला व जगाचा विचार करायला शिकली, ही घटनाच या कालखंडाच्या प्रारंभाला मोठी क्रांतिकारक अशी ठरली.

इंग्रजी व इतर परभाषेंतील वाङ्मयाच्या परिचयामुळें मराठींत जसे वेगवेगळे वाङ्मयप्रकार नव्यानें रूढ झाले व जुने वाढीला लागले, तसेच वाङ्मयांतील कलाप्रकारांचा तंत्र म्हणून अभ्यासहि आपल्याकडे सुरू झाला. इ. स. १९२० नंतरच्या कालखंडांतील ही उल्लेखनीय गोष्ट होय. या कालखंडांत परभाषेंतील वाङ्मयाच्या भाषांतरांची पैदास जशी झपाट्यानें झाली तशीच ती स्वतंत्रपणें होणाऱ्या लेखनाचीहि झाली. तंत्रात्मक अभ्यास होऊन हें लेखन होत गेलें हें इथें अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे.

कथा, काव्य, कादंबरी, निबंध, नाटक इत्यादि अनेक प्रकारचे वाङ्मयीन कलाप्रकार या कालखंडांतील लेखिकांनीं हाताळले व आपलें लेखन कलेच्या दृष्टीनें देखील सरस होईल याबद्दल दक्षता राखली. संख्येच्या दृष्टीनें हे विविध प्रकारचें वाङ्मय विपुल असल्यामुळें विभागशः त्यांचा पुढें विचार केलेला आहे. त्याचप्रमाणें कवयित्री व लेखिका यांचाहि स्वतंत्रपणें त्यांच्या लेखनासहित इथें उल्लेख करण्याचें ठरविलें आहे.

● ● ●

काव्य

मराठी कवितेला जशी सात शतकांची उज्ज्वल परंपरा लाभलेली आहे, तशीच ती मानवजातीच्या भावनेचा आविष्कार करणारी पहिलीच श्रेष्ठ अशी वाङ्मयीन कलाकृति होय. माणूस पहिल्यांदां बोलूं लागला तें प्रामुख्यानें काव्यांत !

त्या कारणानें कवितेचा म्हणून असा इतिहासहि तसा फार जुना आहे. पण म्हणून कविता कधीं तशी जुनी होणारी नसते. कारण काव्य हें नेहमींच नित्य नवें असतें, ताजें असतें, त्याची वृत्ति प्रफुल्लित असते व म्हणून तें कधींच जुने होऊं शकत नाहीं.

आचार्य अत्रे यांनीं म्हटल्याप्रमाणें " काव्य म्हणजे कांहीं छंद नव्हे, किंवा शब्द नव्हेत. छंदांत आणि शब्दांत नवेजुनेपणा होऊं शकतो. काव्य म्हणजे कल्पना नव्हे. कालमानाप्रमाणें कल्पनाही जुन्या होतात. काव्य म्हणजे रस. काव्य म्हणजे गंध. काव्य म्हणजे तेज. काव्य म्हणजे ध्वनि. आणि ह्या सर्व गुणांचा हृदयस्पर्शी समन्वय म्हणजे सुद्धां काव्यच. प्रस्तर युगापासून तो अणु युगापर्यंत मानवाची केवढी उत्क्रांति झाली ? जीवन आमूलाग्र बदललें. म्हणून मनुष्याचें हृदय बदललें का ? निसर्ग जसा बदलला नाहीं तसें मनुष्याचें हृदयही बदललें नाहीं. लक्षावधि वर्षें झालीं तरी फूल, मूल, झरा, सकाळ अन् चांदणें होतें तसेंच आहे. त्यांना बघून माणसाचें हृदय पूर्वीं जसें नाचत होतें तसें तें आजही पण नाचतें आहे. वसंत ऋतूंतील कोकिळेचा कुहूरव ऐकून जगाच्या प्रारंभीं त्याच्या हृदयांत जी हुरहुर उत्पन्न होत होती, तशी ती आजही पण होत आहे...जगांतलें सौंदर्य, सुगंध आणि संगीत ह्यांचा आस्वाद घेण्याचें मनुष्याच्या भावनेंतलें सामर्थ्य जोंपर्यंत जुनें होत नाहीं, तोंपर्यंत काव्य हें नेहमींच नवें राहाणार."*

कविता ही एखाद्या नदीप्रमाणें मानवी संस्कृतीची जननी तशीच धरिणीहि आहे. गद्याचें तसें नाहीं. गद्याचा विकास हा मानवी विचारांच्या प्रगतीबरोबर होत गेलेला आहे. " त्यामुळें राष्ट्राच्या वैचारिक परंपरेचें वैशिष्ट्य आणि सातत्य हें जितकें त्याच्या कवितेंत प्रगट झालेलें असतें आणि प्रत्ययाला येतें, तितकें तें गद्यांत दिसून येत नाहीं. "†

आधुनिक मराठी कवितेचा उदय झाला त्यावेळीं आपल्या देशाचा काळ एक प्रकारच्या राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचा होता. राजकारणाच्या काळवंडून गेलेल्या क्षितिजावर मानवी अंतःकरणांतील प्रक्षोभक विचारांनीं उभारलेल्या ध्येयांचीं उषःप्रभा नुकतीच पसरूं लागलेली होती. पण त्याचे पडसाद म्हणावे तसे केशवसुतांच्या काव्यांत देखील उमटलेले दिसत नाहींत ! इंग्रजांच्या भौतिक संस्कृतीच्या प्रभावानें आपल्या लोकांचीं अंतःकरणें त्यावेळीं दिपून गेलीं होतीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, इंग्रजांचें अनुकरण करण्याशिवाय आपल्या उन्नतीचा दुसरा कोणताच मार्ग आपल्या लोकांना दिसेना. या अनुकरणाच्या भावनेमधूनच अखेरीस आधुनिक कवितेचा उदय झाला. तिचें पूर्वीचें आंतर्बाह्य स्वरूप पार बदलून गेलें.

* तापीतीर, प्रस्तावना. पा. ५

† ग. त्र्यं. माडखोलकर, अर्वाचीन मराठी साहित्य पा. ५

जुन्या काळच्या कवितेचें वळण जुनें होतें, घडणहि जुनी होती. पण बहुजनसमाजाच्या काळजाला हात घालण्याचें सामर्थ्य तिच्यांत होतें. आधुनिक कवितेचें मात्र तसें नाहीं. " तिची हांक फक्त इंग्रजी शिकलेल्या पांढरपेशा सुशिक्षितांपुरतीच मर्यादित आहे. किंबहुना त्या वर्गांतल्याहि शेले प्रभृतींच्या कवितेंत रंगलेल्या आणि प्रणयकेलींच्या कल्पनांत गुंतलेल्या फक्त तरुण, स्वप्नाळू जीवांनाच तिची ती प्रीतीची भाषा उमजते, आवडते."* त्यामुळें बहुजन समाजाच्या हृदयांत ती भावनांचीं कारंजीं उडवूं शकत नाहीं. कारण आधुनिक कवींच्या भावना ह्या स्वतःपुरत्या मर्यादित झालेल्या दिसतात ! त्या कवींच्या दृष्टीनें सहजस्फूर्त आणि प्रामाणिक असल्या तरी बहुजनसमाजाच्या त्या ओळखीच्या वाटत नाहींत एवढें खरें. श्री. माडखोलकरांनीं म्हटल्याप्रमाणें " आधुनिक कवितेंतील सर्वांत मोठीं उणीव किंबहुना वैगुण्य जर कोणतें असेल तर तें हें आहे कीं, तिच्यांत देश्य असें वातावरण अगदीं कमी आहे; तिच्यांतून व्यक्त होणाऱ्या कल्पना आणि कामना, विचार आणि विकार, संकेत आणि संप्रदाय हीं परभृत असतात. कुठल्या तरी अगदीं परकीय वातावरणांतून उचलून आणलेलीं असतात. आधुनिक कवी समाजसुधारक आहेत आणि देशाभिमानीहि आहेत. पण ज्या समाजाच्या सुधारणेची ते चिंता वाहतात त्यांच्या राहणीची त्यांना जाणीव नाहीं आणि ज्या देशाच्या ऊर्जिततेचा ते अभिमान वाहतात तोहि त्यांच्या डोळ्यापुढें नसतो. " अशी आधुनिक कवितेची पार्श्वभूमि आहे. श्री. माडखोलकरांचें हें म्हणणें प्रामुख्यानें पुरुषांच्या काव्यनिर्मितीस धरून असें आहे. स्त्रियांच्या कवितेचें स्वरूप याहूनहि मर्यादित असें दिसून येतें. "

काव्याच्या याबतींत वेगवेगळी वृत्तरचना स्त्रियांनीं हाताळलेली असली तरी वैचारिकदृष्ट्या प्रामुख्यानें त्यांत त्यांच्या स्वतःच्या वैयक्तिक जीवनाचीच बाजू अधिक आलेली आहे. स्त्रीशिक्षण वाढत गेलें तसें स्त्रियांचें मतपरिवर्तनहि घडत गेलें. स्वतंत्रपणें त्या विचार करूं लागल्या व त्या विचारांचे पडसाद स्वाभाविकच त्यांच्या लेखनांत उमटूं लागले.

• • •

लक्ष्मीबाई टिळक

एखाद्या कवीच्या काव्यांत त्याचें जीवन भरलेलें असतें आणि त्याच्य जीवनांतच त्याचें काव्यहि फुललेलें असतें, असें कांहीं बोलावयाचा मोह एखाद्याच कवीकडे बघून रसिकाला होतो. श्रीमती लक्ष्मीबाई टिळक ह्या याच प्रकारचें

* श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, अर्वाचीन मराठी साहित्य, पा. ७

बोलणें ज्यांचेबद्दल करावेसें वाटावें, अशा भाग्यवान कवयित्री आहेत. वास्तविक इ. स. १८९४ त यांची पहिली कविता जन्माला आली. परंतु कवयित्री म्हणून जगापुढें त्यांचें नांव यायला पुढें १९०७ साल उजाडलें. इ. स. १८९२ च्या सुमारास त्यांना अक्षर ओळख झाली. आणि त्यांच्या ओठांवर त्यांच्या मनांतील भाव धडाधड बोलता होत गेला. परंतु घरगुती शिक्षण घेतलेल्या ह्या स्त्रीनें मराठी वाचकाला व आतां परभाषेंतील वाचकालाहि थक्क करून सोडणारें लेखन केलें. लक्ष्मीबाईच्या 'स्मृतिचित्रांनीं' मराठी शारदेला जणुं हिऱ्यामाणकांचा साज घातला ! आणि त्यांच्या कवितेनें मराठी काव्यांत एक नवीनच पायंडा घालून दिला. आर्य पतिव्रता म्हणून जन्म काढला पाहिजे अशा भावनेनें सजविलेल्या हिंदू संस्कृतींत बालपणीं वाढलेल्या लक्ष्मीबाईंनीं सुधारणेच्या नव्या जगांतील बऱ्याचशा गोष्टी आत्मसात् केल्या आणि मनांत येईल तें बेधडकपणें आपल्या लेखनांत मांडायला सुरवात केली. जीवनांत येणाऱ्या सुखदुःखांना निर्भयपणानें अंगाखांद्यावर झेललें आणि स्त्रीजीवनाचा एक वेगळाच साक्षात्कार मराठी मुलखाला घडविला. त्यांचे ठायीं मुळांतच असलेलें प्रतिभासंपन्न मन त्यांचे पति रे. टिळक यांच्या सहवासांत पालवलें. अधिक सुसंस्कृत बनलें. धीट झालें. स्वाभिमानानें बोलत राहिलें.

लक्ष्मीबाईची कविता संख्येच्या दृष्टीनें कमी आहे, परंतु गुणाच्या दृष्टीनें भारी आहे. तिचे विषय अनेक आहेत आणि वृत्ति चोखंदळ आहे. तिचा भाव साधाभोळा घरगुती असा आहे. परंतु आशय प्रतिभावंतांनीं लक्षांत घेण्याजोगा आहे. या कवितांचीं पुस्तकरूपानें जुळणी झाली ती "भरली घागर"च्या रूपानें इ. स. १९५१ सालीं. यावेळीं मराठी रसिकांच्या लक्षांत एक गोष्ट प्रामुख्यानें आली. ती अशी कीं, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत निर्माण झालेली लक्ष्मीबाईची कविता ही चालू काळांतहि कांहीं नाविन्य बाळगून आहे. आणि हाच या कवितेचा प्रमुख गुणविशेष होय.

लक्ष्मीबाईंनीं मराठी काव्याच्या प्रांगणांत पाऊल टाकलें त्यावेळीं एक वेगळेंच नवल घडलें. त्यांच्या पूर्वींच्या पिढीनें—स्त्रियांनीं—कविता रचली ती रामाचें गाणें, द्रौपदीचा धावा, सीतेचे डोहाळे, निरनिराळ्या प्रकारच्या झोपाळ्यावरील ओव्या वगैरे पुराण्या प्रकारची अशी रचली. परंतु लक्ष्मीबाईंनीं आपल्या कवितेला नव्या नव्या तऱ्हा व चाली शिकविल्या. काव्याचे प्रांतांत धडाडी दाखविली. त्या कारणानें इतर भगिनींना मोठा धीर आला. त्यांचे मुकें व लाजरें मन बोलकें झालें ! त्यामुळें लक्ष्मीतनया, लक्ष्मीबाई बेहेरे, शारदाबाई परांजपे, हिराबाई पेडणेकर, शांताबाई फणसे, मनोरमाबाई रानडे इत्यादि कवयित्री पुढें आल्या. अर्वाचीन कवयित्रींच्या परंपरेचा आरंभ हा त्यामुळेंच लक्ष्मीबाई टिळकांपासून होतो.

मनोरंजन मासिकाच्या इ. स. १९०९ च्या दिवाळी अंकांत लक्ष्मीबाईची

" करंज्यांतला मोदक " ही प्रेम मीमांसापर व कल्पनापूर्ण भावकविता प्रकाशित झाली आणि उभ्या महाराष्ट्राला त्यांची ओळख घडली. पापड व लाटी, कान-वला व करंजी या खाद्यपदार्थांच्या जोडीला पाहूनच " नरनारी संगम जिकडे तिकडे बाई !' असले तात्त्विक विचार लक्ष्मीबाईंना सुचले व ते त्यांनीं आपल्या कवितेंत गोवून टाकले.

लक्ष्मीबाईंच्या कवितेंत भक्ति, करुण आणि वात्सल्य या रसांचा सुंदर आविष्कार आढळून येतो. त्यांच्या 'खिस्तायनां'त त्यांचा भक्तिभाव जेवढ्या प्रकर्षानें आढळून येतो, तेवढ्याच जोमानें त्यांच्या 'सौभाग्य लयाला गेलें' किंवा 'मी तुझी मावशी' या कवितांतून करुणरस फुललेला दिसून येतो. आणि त्यांच्या 'वसंता' मध्यें वात्सल्य कसें उरीं दाटल्या पान्ह्यासारखें उफाळून वर आलेलें आढळून येतें.

" काव्य म्हणजे व्याकरण नव्हे, काव्य म्हणजे शुद्धलेखन नव्हे, काव्य म्हणजे अलंकार नव्हे. काव्य म्हणजे काव्यच. आधीं सौंदर्य व मग उपचार. सौंदर्य असलें म्हणजे सारें आलें." ही काव्यासंबंधींची रे. टिळकांची कल्पना लक्ष्मीबाईंच्या कवितेला चांगलीच लागू पडते.

दारुण दुःखानें माणसाचें मन कसें काजळून जातें व सुकें बनतें. परंतु लक्ष्मीबाईंच्या मनानें खंबीरपणें वागणूक ठेवली व आपल्या भावनेला वाचा फोडली. रे. टिळकांनीं धर्मांतर केल्यानें त्यांना विलक्षण यातना झाल्या. अशा-वेळीं त्यांनीं आपल्या मनाची समजूत घालतांना जी भाषा केली ती " नवरा " या कवितेंत पुढीलप्रमाणें प्रकट झालेली दिसून येते—

" गुणरूपानें मनासारखा परंतु झाला पिसा
साजणी हा तरि नवरा कसा ॥ ध्रु० ॥
आशा, मनिशा, तृष्णा, जावा ह्या माझ्या तिघिजणी
ममता सासू करिती माझ्या जीवाची खेळणी
हा क्रोध खाटिक सुरा
हा निर्दय मम सासरा
नाहिं विसांवा षड्रिपु दारां गांजिति रात्रंदिनीं
तरी नच पाहति पति ढुंकुनी
माय बाप तर दूर राहिलीं विवेक नवरा असा
न कळे माझा जीव वांचला आजवरी गे कसा ? "

घरगुती जीवनाचें हें एक रम्य संमेलनच लक्ष्मीबाईंनीं अशा रीतीनें आपल्या या प्रकारच्या भावनांतून व्यक्त केलें आहे.

वैधव्य प्राप्त झाल्यानंतरची मनाची व्याकुलता कवयित्रीनें पुढीलप्रमाणें चित्त थरारून सोडणाऱ्या भावनेंतून हृदयंगमपणें व्यक्त केली आहे. टिळक

गेल्यानंतर सांत्वनपर आलेल्या पत्रांवर श्रीमती हें नांव त्यांच्या नांवामागें चिकटलेलें बघून वाटणारें दुःख या काव्यांत आलेलें आहे.

" श्रीमती नांव मज आलें । सौभाग्य लयाला गेलें ॥ ध्रु० ॥
या माझ्या दुर्दैवानें । हा कसा साधिला दावा
हा ओघ काव्यगंगेचा । निमिषांत कोरडा व्हावा
तें जीवन मम जीवाचें । मी मत्सी त्यांतिल देवा
जीवनाविणें ही बाई
देहाची झाली लाही
जीवांत जीवही नाहीं
दिन माझे संपत आले । सौभाग्य लयाला गेलें ॥ "

आणि ह्या प्रसंगानंतर जेव्हां लक्ष्मीबाईंना नातू झाला तेव्हां आपल्या दुःखांत सुख मानून आजीच्या भूमिकेवरून त्या म्हणतात,

...वंशवृक्ष हा माझा फुलला, बघुनी त्याच्याकडे
शिंपिलें अश्रूंचे मी सडे
सुखदुःखाचा वांटेकरी मम माझ्याजवळीं नसे
पाहुनी मजला स्वर्गीं हंसे
हंसे फुलांचें सदा जयाच्या हृदयामध्यें वसे
तयाला दुःख पहावें कसें ?
तो देवाजवळीं काय विनंती करी
ही रिती जहाली जागा परतुनि भरी
जगिं सेवा माझी नाहिं जहाली पुरी
म्हणुन धाडली जोड नवी ही माझ्या बाळाकडे
चिमुकलें बालक माझ्यापुढें

लहान मुलें लक्ष्मीबाईंना फार आवडत. स्वतःच्या पोराप्रमाणेंच अनेक पोरक्या पोरांचेंहि त्यांनीं मोठ्या आपुलकीनें पालनपोषण केलें. या संदर्भात " मी तुझी मावशी तुला न्यायला आलें " ही लक्ष्मीबाईंची कविता अवश्य विचारांत घेण्यासारखी आहे.

लक्ष्मीबाईंची कविता जेवढी हृद्य, जेवढी घरगुती आणि जेवढी जिव्हाळ्याची तेवढीच प्रामाणिकहि आहे. नाशिकच्या कविसंमेलनाच्या स्वागताध्यक्षाच्या भाषणास सुरवात करतांना व्यासपीठावर उभ्या राहून त्या म्हणाल्या,

" आपण आला बरें जाहलें, मन्मन पाहुनि धालें !
कविरसिकांचें स्वागत करण्या, सरसावुनि मी आलें !
खरें सांगतें, मला ह्यांतलें ज्ञान मुळीं तें नाहीं,
चुकेन तेथें क्षमाहि करितिल भगिनी माझे भाई ॥ "

सामाजिक जीवनांतील सुखदु:खांचा विचार करतांना पतिता स्त्रीबद्दलची वाटणारी तळमळ लक्ष्मीबाईनीं "बहिष्कृत याला आधीं करा" या कवितेंत मोठ्या कठोरपणानें व्यक्त केली आहे.

" नाना रंगीं खेळ खेळुनी जगांत रमता असे ।
ईश्वरा येई तुमचें हंसें ॥
ही पतिता म्हणुनि हिला दूर लोटितां ।
ती पतित पावन पावे अधिकारतां ।
हा न्याय कोठला, परि तुमची मान्यता ।
उघडा डोळे, पुरा ओळखा कोण पतित हा खरा ।
बहिष्कृत याला आधीं करा ॥ " *

लक्ष्मीबाईनीं आपल्या काव्यकौशल्यानें श्री. टिळकांच्या हयातींत त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या " ख्रिस्तायना "सहि हातभार लावलेला असून तो प्रयत्नदेखील उल्लेखनीय असा झालेला आहे.

● ● ●

बहिणाबाई चौधरी

लक्ष्मीबाई टिळकांच्या समकालीन परंतु अगदीं अलिकडे ज्यांच्या नांवाचा बोलबाला सगळीकडे झाला, अशा एक नामवंत कवयित्री म्हणजे बहिणाबाई चौधरी या होत. मराठींतील एक प्रसिद्ध कवि श्री. सोपानदेव चौधरी यांच्या या मातोश्री. पण त्यांचा ठावठिकाणा १९५१ च्या दिवाळींत महाराष्ट्राला अचानकपणें कळला. एखाद्या भूमीचें उत्खनन व्हावें आणि जुन्या परंपरेचा रत्नां माणकांना लाजवणारा वारसा संशोधकाच्या हातीं यावा तसें बहिणाबाईच्या कवितेचें झालें. त्यांच्या सुपुत्रानें आचार्य अत्र्यांच्या करवीं आपल्या आईच्या काव्याची गोणी मराठी रसिकांना उघडून दाखविली. आणि मग अवचीतच एक सुंदर काव्य मराठींत अवतीर्ण झालें ! त्याची अपूर्वाई मी मी म्हणणारांनीं चाखली. तोंडांत बोट घालायला लावणारा चमत्कार मराठीच्या साहित्यक्षेत्रांत दिसून आला.

बहिणाबाई म्हणजे एक साधी, शेतकरी खानदेशी स्त्री पण तिच्या काव्यांतील शब्दाशब्दांमधून तिची प्रतिभा जणुं झिरपते आहे. लोकगीतांनीं पिढ्यानूपिढ्या सजविलेल्या अमृतकुंभाची याद करून देते आहे. जिवाभावाच्या पण सुंदर विचारांनीं नटलेली बोलणीं करते आहे.

* गृहलक्ष्मी पतिता अंक १९२८ जून.

प्रतिभा ही कवीला लाभलेली निसर्गाची देणगी असते आणि म्हणून तिच्या फुलोऱ्यासाठीं प्रयत्नांची गरज फारशी भासत नाहीं, याची प्रचीति बहिणाबाईंच्या काव्यानें येते. इथें बहिणाबाईंनीं फार सुंदर असा जिवाभावाचा हुंकार घातलेला आहे. कवितेनें त्यांच्या काळजांतून उसळी मारलेली आहे. ही साधी निरक्षर बाई. पण तिनें घरच्या विद्यापीठांत आणि देवादिकांच्या मंदिरांत माणुसकीच्या गाथा वाचल्या. त्यावर आपल्या भावनांची शिंपण केली; आणि मग आपल्या कल्पनांची भराभर पेरणी सुरू केली. तिच्या दर श्वासागणिक काव्य बाहेर आलें ! काम करतांना त्या काव्याचा तिनें शिडकावा केला. धरित्रीला जणुं वाण दिलें !

येहरींत दोन मोटा
दोन्हींमधीं पानी एक
मोट हाकलती एक
जीव पोसतो कितीक !....
वसांडली मोट
करे धो धो थायन्यांत
हुंदडत पानी
जसं तान्हं पाळण्यांत !

बहिणाबाईंच्या प्रतिभेनें या प्रकारचें सुंदर चित्र रेखाटलें आणि अहिराणींतील काव्यांत मोलाची भर घातली. त्यांचे उपमादृष्टांत एकदम निराळे ठरले. त्यांची भाषा खेडेगांवच्या वातावरणांत सुखावली. आणि तिनें जी कल्पनेची भरारी मारली ती—

ऊन वाऱ्याशीं खेयता
एका एका कोंबांतून
पर्गटलें दोन पानं
जसे हात जोडीसन
टाया वाजविती पानं
दंग देवाच्या भजनीं

या पद्धतीनें ! स्त्रीच्या लेखणीला एकदम हें केवढें ऐश्वर्य लाभलें ! लोकगीतांच्या सावलींत वाढलेल्या बहिणाबाईंनीं साध्याभोळ्या शब्दांची पेरणी करीत मोठ्या सुंदर काव्याला जन्म दिला. जानपद काव्य कसें असावें तें मराठीच्या लेकरांना शिकविलें ! आणि या संदर्भात आपल्या कवितेच्या जन्माची कहाणी सांगितली ती कशा थाटांत पहा:—

अरे घरोटा घरोटा
तुझ्यांतून पडे पीठी

तसं तसं माझं गानं
पोटांतून येतं व्होटीं !

आणि आपल्या संसारांतील कर्मकथा सांगतांना स्त्रीस्वभावाला धरून भाषा केली कीं—

पेट पेट धुक्कयेला --
किती घेसी माझा जीव
आरे इस्तवाच्या धन्या
कसं आलं तुले हींव !

घरच्याबरोबरच नंतर बाहेरच्या निसर्गाशींहि बोलणें केलें. शेतावर जातांना दिसणाऱ्या झाडाझुडपांचा देखणेपणा बोलून दाखविला—

हिरवीं हिरवीं पानं
लाल फळ जशी चोंच
आलें वडाच्या झाडाला
जसं पीक पोपटाचं !

जुन्या काळच्या स्त्रियांच्या कवितेपेक्षां त्यांच्या कवितेनें वेगळें जग दाखविलें. नव्या कल्पना सांगितल्या. कथापुराणांच्या श्रवणानें बुद्धीला आलेली धार मोजक्याच पण वेंचक शब्दांतून दाखविली. बाळबोध वळणाचें काव्य कसें असावें त्याचा दाखला दिला आणि असें करतांना आपल्या मनाची अवस्था काय होते, तें आगळेपणानें सांगितलें—

मन पांखरूं पांखरूं
त्याची काय सांगूं मात ?
आतां व्हतं भुईवर
गेलं गेलं आभाळांत !

रचनेच्या, कल्पनेच्या आणि भाषेच्या दृष्टीनें बहिणाबाईंचें काव्य आधुनिक आहे. खानदेशांतील अहिराणींत घाटावरील मराठीमाय त्यांनीं जिव्हाळ्यानें मिसळली आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक कवितेंत एक वेगळा विचार दिला आहे. त्यांच्या कवितेंत विस्तार असा कसलाच नाहीं. ती कशी अगदीं आटोपशीर आहे. पण तिनें मोठा आशय ऐकवला आहे. त्या कारणानें त्यांची कविता वाचतांना लक्षांत येतें कीं, ह्या बाईंची आपल्या भाषेवर केवढी मालकी आहे ! आणि सारे रस त्यांच्यापुढें कसे हात जोडून उभे आहेत ! !

साध्याच पण सुंदर शब्दांची पेरणी, सहजसुलभ भावनाविष्कार, जातिवंत जिव्हाळा, कल्पना वैभव आणि असामान्य प्रतिभासंपन्नता हे बहिणाबाईंच्या काव्याचे विशेष होत. त्या कारणानें त्यांनीं—

मानसा, मानसा,
कधीं व्हशील मानूस

या प्रकारचें मानव जातीला केलेलें हृदयस्पर्शी आवाहन वैशिष्ट्यपूर्ण वाटतें. एवढेंच नाहींतर स्त्रीच्या लेखणीला असले तात्विक विचार देखील पेलूं शकतात याचें प्रत्यंतर येतें. त्याच बरोबर—

लपे करमाची रेखा
साझ्या कुंकवाच्या खालीं
पुसोनिया गेलं कुंकू
रेखा उघडी पडली

असलें हृदयभेदक करुण काव्यहि या स्त्रीच्या लेखणीनें जगापुढें केवढ्या कल्पकतेनें ठेवलें याचा अचंबा वाटूं लागतो.

बहिणाबाईंच्या या काव्यानें मराठी मनाला मोहिनी घातली आणि भाषेचा, विचारांचा व कल्पनेचा स्तिमित करून टाकणारा गोडवा मराठी सारस्वतांत असूं शकतो, याचा उल्लेखनीय दाखला दिला.

● ● ●

सौ. मनोरमा रानडे

रविकिरण मंडळाच्या एक प्रमुख सदस्या या नात्यानें सौ. मनोरमा रानडे यांनीं इ. स. १९१२ ते १९२५ या कालमर्यादेंत आपलें काव्यलेखन केलें. मनोरमाबाई ह्या रविकिरण मंडळाच्या एक प्रकारें सात्त्विक शक्ति होत्या. त्यांचें जीवन आणि काव्य ह्यांत निराळेपणा नव्हता. परस्परांच्या पडछाया एकमेकांत पडाव्यात एवढें त्यांचें काव्य व जीवन एकत्र आलें होतें.

मनोरमाबाईंनीं स्वत: प्रेमविवाह केलेला असल्यामुळें त्यांची अशी उत्कट श्रद्धा होती कीं, माणूस हा एकदांच व एकाच माणसावर प्रेम करूं शकतो. त्यांच्या कवितेनें त्यांचा हाच भाव उचलून प्रीतिरसाला खेळविलें.

" जीवाचें सार्थक " या कवितेंत आपल्या पतीबद्दल लिहितांना त्या म्हणतात—

" तुझी थोरवी कशी गाऊं मी ! मूक तुझी कांता
हृदय उघडुनी सत्तेचें बघ, प्रीति रची गाथा "

नवऱ्याच्या वैभवांत आपलें वैभव पाहणाऱ्या व स्वतःच्या कुटुंबांतच आपलें सौख्य शोधणाऱ्या मनोरमाबाई आपल्या कल्पनेप्रमाणेंच आपलें जीवन जगत होत्या.

" मोहना " या कवितेंत त्या लिहितात:—

" मोहना ! राजीव नयना ! देइ आतां दर्शना
तापलें विरहानलानें पुरे झाल्या यातना !
प्रेम अपुलें सांधलें दृढ हेतु आला जीवना
लपुनी बससी दूर देशीं काय मनिं तव योजना !
" पीडलों तव विरह-तापें " गोड वच हें बोलना !
" त्यजुनी नाहीं जात " स्वप्नीं येउनी तर सांग ना ! "

स्वतःच्या मुलांविषयींदेखील मनोरमाबाईंनीं विशेष जिव्हाळ्यानें अनेक कविता लिहिल्या आहेत. या मनोभावनेनें सजलेली त्यांची कविता सुंदर आहे. आई म्हणून त्यांच्या उरीं दाटलेलें वात्सल्य प्रकट करतांना " छबुडी " या कवितेंत त्या लिहितात—

"...छबुडी माझी राजसबाळी सोनी ही छकुली...
...यांतच साऱ्या उपमा घे तुज सरस्वती थकली..."

आपणावर सरस्वतीचा वरदहस्त आहे असें मानणाऱ्या मनोरमाबाईंनीं स्त्रीजीवनाचें वैशिष्ट्य सांगणाऱ्यादेखील कांहीं कविता लिहिल्या. त्यांपैकीं " सागरगोटा " ही कविता उल्लेखनीय आहे. ही कविता म्हणजे एक नाट्यगीत असून लहान मुलींच्या जीवनांत पदोपदीं हर्षयुक्त अंतःकरणानें संगत देणारा सागरगोट्यांचा खेळ त्यांत वर्णन केलेला आहे. या कवितेंत मनोरमाबाई सांगतात—

" दुरखाइ बने ! अजुन ग ! " " हप्पी ! चुकलं तुजं गं ! "
टाळ्या ऐकुनी जागी झालें ! जिन्यावरुनी हळूं पाहिलें
सागरगोटे खेळत होती यमी आमुची माडीवरती
पाय न वाजवितां वर गेलें पाठीमागें उभी राहिलें !
" दुरखाइचा...तिरखाईशीं " बोलत होती अशी कायशी
खडा टाकिला वांकुनि खालीं " बने ! खडा ? " वर बघूं लागली
बंधमुक्त खग उडे जसा नभीं पळाला खडा तसा
" गंमत करण्या छान वेळ ही " ऐसें माझ्या मनांत येई
हळुंच झेलला सागरगोटा " दे रे नाना ! लबाड मोठा ! "
मागें वळुनी रागें पाही " हें ग काय ? अं – बघ ग आई ! "
" यश्शा " – उठली, सोंगे धरिले ! पाय उंच – छे वाया गेलें
" बघ हं ताई तूं ! दे बरं कां ? आई मारते बघ तुज हाका ! "
" पुराणास कधिं गेली आई जसें काय हं – माहित नाहीं !
परत हवा कां सागरगोटा ऐकशील कां पण – वाः ताठा ! "
" हं तर म्हणुंया ? " मान हलविली. खेळासाठीं अधीर झाली,
" सांग सांग ना लवकर आतां बनी थांबली माझ्याकरितां "
" कांहीं नाहीं; पापा गोड – " " अं–अं–उं-उं–हं–हं–सोड "

बळेंच वरती तोंड करोनी मुका घेतला चुंबचुंबुनी !
' गालीं स्मित मधु बघुनि लाजरे लज्जित झाले गुलाब सारे !

रविकिरण मंडळाच्या भरभराटीच्या काळांत " **अभिनव काव्यमाला** " हा स्त्रियांच्या कवितांचा एक स्वतंत्र संग्रहच (१९२२) प्रकाशित झाला. या संग्रहांत अनेक कवयित्रींच्या कविता आलेल्या असून त्याचें संपादन **सौ. इंदिराबाई भिडे** यांनीं केलें आहे. या कवितांनीं स्त्रियांच्या अंतःकरणांतील नाजुक मनोभावांचा आविष्कार केला असून आपलें म्हणून कांहीं वेगळें वैशिष्ट्य जगापुढें ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदाहरण म्हणून या संदर्भात **सौ. राधाबाई आपटे** यांच्या " मृतबालका "स या कवितेंतील पुढील स्त्रीसुलभ व हृदयस्पर्शी भावाविष्कार लक्षांत घ्यावयास हरकत नाहीं:—

" येइनासि अजुनी सखया, वाट तूं पाहसी कैची ॥
जा जाईं निज धामातें, तृप्तता करुनि नयनाची ॥
एकदां धरुनि हृदयासी, मुक्तता करिन कायमची ॥
रुदनादिक शब्द खुणेचे,
गोड हेतु हे कर्णाचे,
ऐकणें बाल मधुगोष्टी,
ये फुला मम बाळा, दे अखेर मजला भेटी ॥"

ज्यांना काव्यकल्पलता असें संबोधण्यांत येतें त्या **सारजाबाई बापट** यांची काव्यरचना " **काव्यकुसुमा** " द्वारें याच सुमारास प्रकट झाली (१९२३). करुण रसाचा उत्तम परिपोष करण्यांत या कवियित्री वाकबगार आहेत. त्या स्वतः विधवेचें दुःख अनुभवित असल्यामुळें या जीवनांत येणाऱ्या दुःखाचें चित्रण त्यांनीं " मोगऱ्याची कळी पाहून ", " वेणुधमनी ", " पुष्पें कां विखुरलीं " " माझें ध्येय " इ. कवितांमधून अनुभवाच्या हृदयस्पर्शी प्रसंगांतून केलेलें आहे.

स्वतःच्या दुःखानें होरपळून गेलेल्या सारजाबाईंना सगळ्या जगांत त्या दुःखाची छाया पसरलेली दिसणें स्वाभाविक आहे. अशा मनःस्थितींत असलेली कवियित्री—

" देवाच्या दरबारिंही गमतसे बेबंदशाही खरी ।
आपत्तींत फिरे त्रिखंड जग हें कामास कोणी न ये ॥ "

अशाप्रकारचे अंतःकरणाला जाऊन भिडणारें काव्य निर्माण करतांना दिसते.

इ. स. १९२० नंतरच्या काळांत स्त्री शिक्षणाची प्रगति विशेष झपाट्यानें होत गेल्यामुळें स्त्रियांच्या लेखणीला घरदार, पै पाहुणे व आप्तेष्ट यांच्या पलीकडेहि जग आहे ही नजर लाभली. त्यामुळें घरच्या माणसांच्या इतक्या आपुलकीनें त्या बाहेरचें जग न्याहाळूं लागल्या. त्यांचे ठायीं जग समजावून घेण्याचें कुतूहल वाढलें. जगांतील निसर्गाच्या भव्यतेनें त्यांचीं मनें भारून गेलीं. त्याचा परिणाम त्यांच्या

कवितेवर झाला. त्या दृष्टीनें सौ. **मथुराबाई पंडित** यांचा " **गीतकूजन** " हा काव्य संग्रह अवश्य लक्षांत घ्यावा लागेल. "सिंहगडास पाहून" ही सौ. **इंदिराबाई देवधरांची** कविताहि याच प्रकारची आहे. या कवितांमधून कलाविलासाची पेरणी झालेली नसली तरीहि भावनांची उत्कटता मात्र भरपूर आहे.

सौ. **राधाबाई साठये** यांनीं आपल्या '**कन्या विलापांत**' याच सुमाराला चरित्रवजा हकीकत सांगण्याचा प्रयत्न केला. आपल्या वडिलांविषयींची भावना त्यांनीं इथें प्रकट केली. ही कविता त्यामुळें जिव्हाळ्यानें माखलेली अशी आहे. परंतु तिच्यांत संस्कृत शब्दांचा भडिमार झाल्यानें ती बोजड मात्र झालेली आहे.

" **गीत द्विदल** " (१९२५) मध्यें **कमलाबाई देशपांडे** यांनीं जी थोडीशी कविता दिली आहे ती आहे त्या स्वरूपांतच मोठी आकर्षक आहे. घरगुती प्रसंगांवर त्यांनीं जसें जिव्हाळ्यानें काव्य केलें तितक्याच आपुलकीनें अनुवादहि केलेला आहे.

" बालकास पाहून " या कवितेमधील—

" सान बाळ मम राहूं दे ।
असाचि सजला पाहूं दे ।
राहो याचा आनंद ।
खेळो ऐसा स्वच्छंद ।
दुःखी जगताचा वारा ।
नसो तया या सुकुमारा ।
अर्धस्फुट जरि ।
पुरे मला तरि ।
सौख्याची खरि ।
वेळ कुमारा हीच असे ।
थोरपणांतरि सौख्य नसे ।

कमलाबाईंची ही कल्पना स्त्रीहृदयांतील वात्सल्याचा उत्तम आविष्कार दर्शविणारी आहे असें इथें अवश्य म्हणतां येईल.

सौ. मनोरमा नावलेकर

काव्याच्या प्रांतांत स्त्रियांच्या लेखणीनें वैयक्तिक भावनोत्कटतेबरोबरच निसर्गालाहि स्थान मिळवून दिलें, असें सौ. मनोरमा नावेलकर यांच्य

" **भावकुसुमांजली** " (१९३१) वरून दिसून येतें. मनोरमाबाईंची ही कविता भावपूर्ण असून मुख्यत: सौख्यमय प्रीतीचा सूर तिला लाभलेला आहे. मनोरमाबाईंस सारें विश्वच प्रेमाच्या साम्राज्यांत सुखानें डुंबत असलेलें दिसत असावें, असें त्यांच्या पुढील कवितेवरून म्हणावयास हरकत नाहीं—

" प्रेम साम्राज्य ! प्रत्यक्ष पसरलें चहूंकडे अव्याज ।
आकाश फुलांनीं भरलेलें । मी हुंगुनिया गुंगुनी गेलें ।
प्रेमाचें साम्राज्य पसरिलें चोंहिकडे भूतलीं । मेदिनी आनंदी झाली ।
प्रेमाविण जगतीं शून्य दिसे । "

किंवा

" अवनिवरि स्वर्ग दिसे । प्रेमाचें जग भासे ।
प्रणयाचें रम्य पिसें । हंसवि कां फुला । स्वर्ग थाटला ! "

इंद्रायणीचा वेग बघत असतांनाहि याच दृष्टीनें आपल्या मनाची ठेवण ठेवून त्या म्हणतात—

" अविरल प्रेमें मानस भरलें । दडपित असतां अधिक उसळलें ।
कणकण उन्मादानें भरलें । मग बंधन कसलें त्या राही ।
इंद्रायणि ! कां इतुकी घाई ! "

एक स्त्री या नात्यानें मनोरमाबाईंच्या प्रकट झालेल्या खालील भावना अतिशय हृद्य आहेत. आईचें हृदय व्यक्त करतांना,

" हीं फुलें विकसलीं चोहीकडे
चल उचलुनि चुंबूं त्यांसि गडे "

असें त्या म्हणतात तर बालमातांना बघून,

कोंवळी । अजुनि ही कळी
लाल पोंवळीं । जिच्या अधरींची
उमललीं न पुरती तोंच घाई खुडण्याची

अशी हळहळ त्या व्यक्त करतात. एक स्त्री निवर्तल्यानंतर पतीनें दुसरें लग्न केलेलें बघून मनोरमाबाईंच्या अंतर्वेदनेमधून पुढील उद्‌गार बाहेर पडतात.

" पाण्यावरचे काय बुडबुडे प्रेम तसें हें दिसे
मनाची लाजहि गेली असे । "

मनोरमाबाईंची ही कविता शुद्ध व कोमल आहे आणि तिच्यांत स्त्रीसुलभ मार्दवताहि आहे.

• • •

सौ. विमलाबाई देशपांडे

विमलाबाई देशपांडे यांनीं आपले पति श्री. पु. य. देशपांडे यांच्या समवेत प्रकाशित केलेल्या "**निर्माल्य–माला**" (१९३३) मधील "माला" भावनामय स्वरूपांत गुंफिली आहे. पतिप्रेमाची अतिशय नाजुक परंतु उन्मादक अशी तन्मयता येथें दिसून येते. निस्सीम भक्ताला वाटणारी एकतान भक्ति, स्वतःच्या पामरपणाविषयीं होणारी जाणीव, आपणांतलें जें जें चांगलें तें पतीच्या प्रसादाचें फल असल्याची भावना, आणि शेवटीं त्या भक्तींतच जीवनसर्वस्व मिळाल्याची वृत्ति या कवितांना व्यापून राहिली आहे.

" वाढते ही विश्ववेली प्रीतिचैतन्यामुळें
सुकुनि ती जाईल सारी, तोडिलें जरि मूळ तें
जीवितार्चे भ्रमण सारें मावळे प्रीतीमधें "

परस्परांच्या गाढ प्रेमसागरांत बुडून जाऊन मिळविलेल्या अशा एकतानतेचा हा अद्वितीय नमुना या कवयित्रीच्या काव्यांत आढळून येतो.

● ● ●

काशीताई नाटेकर

काशीताई नाटेकर यांच्या १९३३ मध्यें प्रकाशित झालेल्या '**गवाक्षगीतां**'-तील बालगीतें मनोरम आहेत. लहान मुलांशीं हितगुज करण्यांत स्त्रीस्वभाव जात्याच कुशल असतो. काशीताईंना ही अशा काव्याची देणगी निसर्गतःच प्राप्त झालेली असून सोपी व आटोपशीर भाषा हा त्यांच्या काव्याचा विशेष होय. त्यांच्या " भजनी बाहुली ", " नव्या बाहुलीचें लग्न " इत्यादि कविता चटकदार आहेत. " पूर्वपश्चिमेचें भांडण " या काव्यांतील सूर्याला चेंडू समजून त्याच्या प्राप्तीसाठीं दोन दिशांचें भांडण लागल्याची काशीताईंची कल्पना अप्रतीम आहे.

" शिल्पकार तेथें आला । अवचित ।
देखुनी । शिला घेउनी । गृहा नेउनी ।
मूर्ति घडविली । मूर्ति घडवीली ।
प्रत्यक्ष राम ती झाली । नवल हें ।
सामर्थ्य येतसे मग त्यां । दुसऱ्यासी उद्धाराया । भाग्य हें । "

शीळेच्या उद्धाराची ही काशीताईंची कल्पना जेवढी नाविन्यपूर्ण आहे तेवढीच चमत्कृतिपूर्णहि आहे. काशीताईंचें हें कल्पनावैभव जसें आल्हादकारक आहे तसेंच तें चटकदारहि आहे.

● ● ●

शांतादेवी परदेशी (तडवी)

गेलीं तीस पस्तीस वर्षें वेगवेगळ्या नियतकालिकांतून काव्यलेखन करणाऱ्या शांतादेवी परदेशी–तडवी–यांच्या कवितेची ओळख मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना परिचयाची आहे. **शांता-गीतें** (१९२८), **सुमनमाला** (बालगीतें), **महिला रत्नमाला, राजेन्द्रशतक** व **मंगल ज्योति** (१९५५) हे शांतादेवींचे काव्यसंग्रह आहेत. त्यांच्या कवितेवर त्यांच्या जीवनांत घडलेल्या जुन्या संस्कारांचें वळण पडलेलें आहे. परंतु त्यांचे काव्यविषय मात्र अभिजात कवीच्या धाटणीचे आहेत. त्यांची कविता वैयक्तिक भाषा न करतांना आपल्या वैयक्तिक भावना ही सामाजिक स्वरूपाची अशी करून मगच त्या भावनेबद्दल बोलणीं करते. शांतादेवींना लहानपणापासूनच काव्याचा नाद असल्यानें व सामाजिक जीवनाकडे जिव्हाळ्यानें पहावयाची सवय असल्यामुळें त्यांच्या कवितेनें दुःखी स्त्रियांचा सहानुभूतीनें विचार केलेला आहे. त्याचप्रमाणें समाजांतील भोंदूपणावर व फसवेगिरीवर तिनें कडक प्रहार केलेले आहेत.

शांतादेवींच्या काव्यांत कल्पनेची भरारी किंवा भावनांची खोली फारशी आढळत नाहीं किंवा तिचें ठळक असें कोणतेंहि वैशिष्ट्य सांगतां येणार नाहीं. परंतु त्यांच्या भाषेंत प्रसाद आहे. हिंदी काव्यांतील रहस्यवाद, छायावाद व प्रगतिवादहि त्यांची कविता हाताळते. तिचा ओघ सरळ आहे. अनेक विषय तिनें हाताळले आहेत. जीवनाचा तिनें निष्ठेनें विचार केला आहे व प्रामाणिकपणानें मनांत घोळेल तें सांगितलें आहे.

ही परवशतेची झोंप, कधीं सरणार ?
हे आर्य भगिनींनो, सुवीर माता तुम्ही कधीं होणार ?

'वंद्यमाता' कवितेमधील शांतादेवींची ही कल्पना चटकदार तशीच उल्लेखनीयहि आहे. देशप्रीतीच्या या प्रकारच्या अनेक भावना शांतादेवींच्या कवितेनें सांगितलेल्या आहेत. त्याचप्रमाणें अधून मधून निसर्गाचीं वर्णनेंहि—

रम्य चांदणें पडे भू–वरी, शुभ्र दुधाचे परी ।
बैसलों आपण सौधावरी
निळसर शालू जरीबुट्यांचा लेवुनिया यामिनी ।
जातसे अमृत कीं शिंपुनी ॥
वसुंधरा या पीयुष–पानें, शांत जणूं जाहली ।
शांतता भरली अवघ्या स्थळीं ॥
तारा-बाला चंद्रासंगें, लपंडाव खेळती ।
फेर कीं धरूनीया नाचती ॥

या पद्धतीनें करून स्त्रियांच्या कल्पकतेची चुणूक दाखविली आहे. आणि—

महाराष्ट्र मंगला ! स्वीकारी प्रणाम करितों तुला
दिशां-दिशांतुन, सदैव फांको, कीर्ति तुझी उज्वला

या प्रकारचा स्वाभिमानी साहित्यिक महाराष्ट्र व पुण्याच्या शिंद्यांच्या छत्रीसारखीं रम्य स्थळें स्वाभिमानानें वर्णन करण्याची हौसहि त्या आपल्या परीनें भागवितात. त्याचप्रमाणें—

तुझें रूप माझ्या नयनांत ठसो, सुख असो नसो, पांडुरंगा !
तुझ्या गुणगानीं, रमो माझें मन–असो नसो मान, पांडुरंगा !
तुझ्या भजनांत, नित्य रमो चित्त, असो नसो वित्त, पांडुरंगा !
तूंच बा ! असावा, जिवाचा विसांवा–अन्य न दिसावा, तुजवीण !

स्त्रियांना प्रिय असलेल्या देवपूजेचीहि त्या अशी मांडणी करतात. शांतादेवींची कविता अशी निर्मळ आहे, सरळ आहे, साधी आहे.

• • •

इंदिरा संत

इंग्रजी अमदान भारतांत सुरू झाल्यानंतर येथील लोकांच्या जीवनांत बराचसा फेरबदल झाला. परिस्थितीनें नवें रूप धारण केलें. जीवनांतील सुख-दु:खाच्या समस्यांनीं अगदींच वेगळीं रूपें प्रकट केलीं. त्यामुळें ज्ञानदेव नामदेवांनीं हातीं घेतलेल्या माणुसकीच्या धर्माची पुन्हां शोधाशोध सुरू झाली. केशवसुतांपासून तों मर्ढेकरांपर्यंतच्या सर्व प्रमुख आधुनिक कवींचा तो एक महत्त्वाचा काव्य-विषय ठरला. भारतीय जीवनाला व साहित्याला त्यामुळें नवें वळण लागलें.

मराठी कविता ही ओवी अभंगाकडून उद्धव व पादाकुलक या नव्या वृत्तरचनेकडे वळली. तेथून तिनें मुक्तछंदापर्यंत लांबचा पल्ला गांठला. पूर्वींच्या काव्याला न आवडणारे शब्द तिनें आत्मसात् केले. तिच्या वेषभूषेंत किंवा अलंकारांत जो बदल झाला, त्याहिपेक्षां तिची वृत्ति पार बदलून गेली. तिच्या आत्म्यानें नवें तेज प्रकट केलें. ज्ञानानुभूतीच्या तिच्या कक्षा विकास पावल्या. तरीपण जुन्याकाळचें सौंदर्य तिनें फेकून दिलें नाहीं. मात्र मनाच्या सर्व वेदना व संवेदना प्रामाणिकपणें सांगण्याची चाल तिनें पाडली. त्या कारणानें तिला सामान्यांच्या अंत:करणांत प्रवेश करतां आला. दैनंदिन जीवनांतलें उपेक्षित सौंदर्य व सामर्थ्य बोलून दाखविणें शक्य झालें. अर्थ, कल्पना, भावना चित्रण आणि चिंतन यांचें कांहीं आगळेंच सौंदर्य ती लेवूं शकली.

कवितेच्या या नव्या स्वरूपाचा ज्यांनीं स्वीकार केल्या त्या कविमंडळां त इंदिरा संत यांनीं आपलें महत्त्वाचें स्थान मिळविलें. त्यांची कविता कौटुंबिक जीवनांत रेंगाळूं लागली. वैयक्तिक सुखदु:खाच्या गोष्टी तिनें केल्या आणि मानवी

जीवन हें केवढें करुणरम्य महाकाव्य असतें याची कल्पना यशवंतांच्या कवितेप्रमाणेंच तिनेंहि दिली.

सुमारें इ. स. १९२९ पासून आज तागायत इंदिरा संतांचें काव्यलेखन अखंडपणें चालू आहे. **शेला, मृगजळ** आणि **मेंदी** हे त्यांचें काव्यसंग्रह आहेत.

" इंदिराबाईंच्या काव्यांत जीवनांतला विशाल विरोध दर्शविणारी किंवा त्यांत खोल बुडी मारून तळाचीं मोक्तिकें वेंचून आणणारी चिंतनशीलता नाहीं. पण त्यांची अनुभूतिसुद्धां अत्यंत दाहक आहे. निसर्ग आणि मनुष्य यांचा आंतरिक नात्याचा मोठ्या कुशलतेनें उपयोग करून या कवितेंतील आर्तता त्यांनीं वृद्धिंगत केली आहे. त्यांच्या कवितेंत झंझावाताचे आणि त्यांच्या खांद्यावर बसून क्रीडा करण्याकरतां पृथ्वीवर उतरणाऱ्या पर्जन्याचें वर्णन आहे. पण या कवितेच्या पुनर्वाचनाच्यावेळीं ओळींतून मनाला बसणारे चटके कांहीं त्या त्या पावसानें कमी होत नाहींत. उलट त्याच्या पार्श्वभूमीवर ते अधिकच दाहक वाटूं लागतात. "*

इतर आधुनिक कवयित्रींच्याप्रमाणेंच इंदिराबाईंच्या कवितेचा " प्रेम " हा प्रमुख विषय आहे. पण हें प्रेम विविधतेनें नटणारें आहे. मुग्ध व रसिकवृत्तीनें वावरणारें आहे. साधी, सोपी व सुटसुटीत रचना करतांना ती संयमानें वावरते आहे. आपण पाहिलेल्या व अनुभवलेल्या स्त्रीहृदयांतील मनोभावांचा प्रामाणिकपणें उमाळ्यानें आविष्कार करणें हें तिचें वैशिष्ट्य आहे. ती स्वानुभवाची भाषा करते. प्रसाद हा तिचा मोठा गुण आहे.

आपल्या जीवनांत प्रीतिविवाहाचें सौख्य भोगल्यानंतर आपल्या प्रियकराविषयीं व स्वतःविषयीं इंदिराबाई अगदीं निःसंकोच मनानें सांगतात कीं—

" तुझा माझा सहवास
    जसा पहाटेचा वारा
    फुले फूल झर झरा
तुझा माझा सहवास
    झिरीझिरी चांदण्याचा
    मधुरसा उन्मादाचा
तुझा माझा सहवास
    तुझ्या हृदयींची तार
    काढीतसे गोड सूर "

परंतु दुर्दैवानें इंदिराबाईंना हें सौख्य फार काळ लाभलें नाहीं. श्री. संत यांनीं मधेंच संसाराचा खेळ मोडला व ते स्वर्गवासी झाले. त्यामुळें इंदिराबाई

* वि. स. खांडेकर तारका. प्रास्ताविक, पा. १७

दुःखाच्या खाईत लोटल्या गेल्या. त्यांचें प्रीतिपुष्प जळून खाक झालें. जीवनाला काजळी चढली. आणि अशा असह्य विरहवेदना उपभोगतांना त्यांच्या कवितेनें म्हटलें कीं--

" ठरवितें किती मी यावें तुझियाकडे
मन निघे घेऊनी वाऱ्याचें रूपडें
लगबगा निघोनी येतें दाराकडे
अन् पुढें सुचेना जावें कोणीकडे
अंगणीं उभे हे तुझे किती सोबती
" ही तुझ्या सख्याची वाट " मला सांगती.
हें निळें पांखरूं म्हणते " ये इकडुनी "...
हें इंद्रधनू तर वरुनी मज बोलवी
ही पाऊसधारा हातानें पालवी
हा समोर येऊन कानाशीं लागतो
चल तुझ्या सख्याची वाट तुला दावितो.
हा चंद्रकिरण ये धरावया अंगुली
अन् निशा म्हणे " मम सोबत तुज चांगली "
...मीं सांवरिलें मन सांवरिला अंचल
अन् पुढें निघाया उचलें हें पाउल.
अडखळे उंबरा, होऊन काया लुळी
कोसळे खालती—कांहीं न कळतें मुळीं ! "

इंदिरबाईनीं आपल्या पतीप्रमाणेंच आपल्या मुलांच्यासंबंधींहि अनेकदां काव्यलेखन केलेलें आहे. त्यांचीं हीं वत्सलगीतें मोठीं सुंदर आहेत. त्यांनीं आईच्या मनाचा गाभा उकलून दाखविला आहे. आपलें बाळ शाळेला जाणार म्हणून सुखावलेली त्यांच्यामधली ' आई ' तो प्रत्यक्ष शाळेला गेल्यावर त्याचें तिथें कसें होईल या काळजीनें व त्याच्या विरहानें व्याकळून जात म्हणते कीं—

घर वाटे ओकें, नाहीं आज घरांत लडिवाळ
झालें अंतर व्याकुळ
घेई घास मुखीं, येई परी बाळाची आठवण
घास पडे मुखांतुन
" आई दूध ताक घालूं " चाले आग्रह बाळाचा
आज आग्रह कोणाचा ?
करी कामधाम परी कांहीं जुळे न सारखें
वाटे चुकल्यासारखें

बाळ नाहीं आज, मधें मधें कराया लुडबूड
नाहीं हांसणें तें गोड
कसें करमेना कुठें, अंग टाकी विसाव्याला
गाल अश्रूंनीं नाहला
आज बाळ नाहीं अंगावरी लोळाया मस्तीनं
झोंप येणार कोठून ?

असे घरगुती प्रसंग रंगवितांनाच रेखीव व उठावदार शब्दचित्रांची उभारणी करणें हा इंदिराबाईंचा आणखी एक काव्यगुण आहे. सांडगे घालत असलेल्या नववधूचें वर्णन सांगणारी त्यांची कविता किंवा ‘ तुझ्या घराला ’ ही त्यांची दुसरी कविता या संदर्भांत जरूर पहातां येईल.

“ दाराशीं तूं उभी नेसुचें लुगडें गुंजेपरी
लालभडक अन् तंग नेसणी तशीच गुडघ्यावरी
उभार उघडी, नुसती चोळी तारुण्यासावरीं
लाल मण्यांच्या गळ्यांत पोती, मधें रुप्याची सरी ”

हें वर्णन मोठें रेखीव आहे. इंदिराबाईंच्या या काव्यांतून त्यांची रंगांची आवड व बाभळी कांटेरी ओढणी पांघरण्याच्या आवडत्या कल्पनाहि एकाच वेळीं लक्षांत येतात.

सामान्य स्त्रीच्या उपमा दृष्टांतांच्या कल्पना पुष्कळदां सांसारिक जीवनांतील असतात. इंदिराबाईंनींहि त्यांचा वापर मोठ्या कुशलतेनें केला आहे. “ बंगली ” मध्यें त्या सांगतात की,

निवांत दूर एकली सुबक छान बंगली
बालिकाच कटिवरी घेइ तटिनी सुंदरी

त्याचप्रमाणें “ ही निळी पांढरी ” या कवितेंत शरदांतील दुपारीचें वर्णन करतांना त्यांनीं दुपारच्या उन्हाला गरोदर स्त्रीची दिलेली उपमा कशी उल्लेखनीय आहे पहा:—

कां गोड जाड्य हें पसरे धरणीवरती
रेंगाळत कां हें सौख्य तरी गर्भार
टाकीत पावलें चाले रम्य दुपार

“ गूढ ” ह्या कवितेंत सूचित होणारी कवयित्रीची कल्पना स्त्रीहृदयांतील एक नाजूक भाव मोठ्या खुबीनें दर्शवीत आहे. तो विशिष्ट भाव सूचित करतांना इंदिराबाई लिहितात—

पहिला वहिला वेलीला बहर
कळ्या मनोहर घोसावती
त्याच वेलीला, जा, जाऊनी विचार

काय हुरहूर तुझ्या मनीं
घेऊनी चोंचींत सूत, पीस, काडी
पांखरांची जोडी विहरते
राणी पांखरांची करी चिवचिव
नाजूक राजीव शोभतसे.
तिला एकटीला गांठून विचार
काय हुरहूर तुझ्या मनीं...
कशी सांगू तुला माझी हुरहूर
कशानें अंतर उजळलें
नाहीं ती भावना शब्दीं मावणार
कशी सांगणार तुला तरी ?...

सूर्योदयाचें स्वागत करतेवेळीं इंदिराबाईंच्या स्त्रीसुलभ भावनांनीं खालील कल्पना रंगविली आणि स्त्रीला स्वतःच्या घराइतकें व मुलांइतकें दुसरें कांहींहि प्रिय नसतें ही गोष्ट जणूं पटवून दिली—

याहो सूर्य नारायणा या हो या लौकर
सोन्याच्या पावलांनीं भूषवा हें घर...
सोन्याच्या वेशींतून निरोप घेतांना
याहो या अंगणांत सूर्यनारायणा.
आईच्या मायेहून कोमलकरांनीं
गोंजारा बालकांना खेळती अंगणीं.
रंगवा तावदान शिणलें अंतर
गुलाबी आनंदांत न्हाऊं दे संसार

अशा प्रकारची इंदिराबाईंची ही कविता कोमलतेचें व सूक्ष्मतेचें आवरण पांघरून जगासमोर झालेली आहे. प्रीतीनें पोसलेल्या हृदयाचा भावमधुर नाद-तरंग जसा तिनें घुमविला तसाच जीवनाच्या जलाशयावर घडोघडीं उठणारा जल-तरंगहि हळुवार मनानें गोंवून दाखविला आहे. ही कविता दिसायला साधी असली तरी खेडेगांवच्या माणसांत आढळणारा उमाप जिव्हाळा तिच्या ठायीं आहे. स्वानुभवाच्या कक्षेबाहेर ती फारशी गेली नाहीं आणि म्हणूनच तिचें स्थान या मर्यादित जगापुरतें कां होईना हृद्य ठरेल. भावना, कल्पना, रचना आणि शब्दयोजना ह्या सर्व दृष्टींनीं इंदिराबाईंची कविता हृदयंगम झाली असून स्त्रीहृदयाचा आविष्कारहि तिनें उत्तम रीतीनें केलेला आहे.

परंतु इंदिराबाईंच्याकडून याहिपेक्षां कांहीं वेगळ्या कवितेची अपेक्षा आहे. " आजच्या मराठी कवितेनें प्रेमाचं आणि माणुसकीचं वतन अजून सुरक्षित आहे याची ग्वाही दिली तरी पुष्कळ आहे " असें त्या सांगतात. पण त्यांच्या

लेखणींत देशप्रीतीची गाथा निर्माण करण्याचेंहि सामर्थ्य आहे हें त्यांनीं लक्षांत घेतलें पाहिजे; आणि त्यांनीं उगाच नव-काव्याच्या जोपासनेच्या भानगडींत पडून आपल्या काव्याचें सौंदर्यहि घालवितां कामा नये. आजच्या काळाचा कांहीं आणखी वेगळा महिमा आहे. याची जाणीव इंदिराबाईंच्या कवितेनें राखली पाहिजे असेंहि वाटतें. कारण आजच्या काळांत सामाजिक व राजकीय अशीं क्रांतिकारी स्थित्यंतरें होऊन राहिलीं आहेत, याचा विसर कोणत्याहि जाणत्या कवीला पडतां कामा नये अशी रसिकांची अपेक्षा आहे.

सौ. संजीवनी मराठे

मराठींतील काव्याचीं लक्षणें अभ्यासतांना व त्यांचा पडताळा घेतांना ज्या अनेक गोष्टींनीं काव्याचें सौंदर्य लक्षांत येतें त्यापैकींच गेयता ही एक प्रमुख गोष्ट आहे. निदान अलिकडे अलिकडे तरी या गेयतेचा अधिक विचार रसिक मंडळी करूं लागली आहेत. इ. स. १९३२ मध्यें कोल्हापूर येथें भरलेल्या साहित्यिकांच्या मेळाव्यांत संजीवनी मराठे ह्या आपल्या काव्याच्या याच प्रमुख लक्षणामुळें रसिकांच्या ओळखीच्या झाल्या. तेव्हां त्यांच्या काव्याच्या दृष्टीनें तरी ही गेयता विशेष महत्त्वाची मानावयास हरकत नाहीं. कारण आपल्या कवितेबद्दल बोलतांना " गाण्याला कांहीं शब्द असावेत म्हणून हीं गीतें मीं लिहिलीं आहेत." असें संजीवनीबाईंचेंच म्हणणें आहे. आणि एक उत्कृष्ट भावगीत गायिका वा काव्यगायिका म्हणून त्यांचा लौकिकहि आहे. त्यांची कविता प्रथम भावरूपानें त्यांच्या मनांत जन्मली व नंतर अभिव्यक्तीच्या वेळीं ती शब्द स्वरांतून पाझरत कागदावर आली असेंहि तिचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. एवढेंच नाहींतर संजीवनी-बाईंचें काव्य हें जणुं त्यांचें खरें जीवनच आहे असें त्यांच्या काव्याचे वाचनानंतर लक्षांत येतें. प्रसंगानुरूप जे जे भाव मनांतून उफाळून वर आले ते ते त्यांनीं आपल्या कवितेचे विषय म्हणून मानले. त्याप्रमाणेंच काव्यलेखनहि केलें.

संसार, रांका, छाया, भावपुष्प आणि **चित्रा** हे संजीवनीबाईंचे काव्य-संग्रह आहेत आणि प्रेम हा त्यांच्याकवितेचा जणुं स्थायिभाव झालेला आहे. प्रीति-विषयक सुखदुःखांचीं बोलणीं करतांनाच त्यांच्या कवितेनें वत्सलरस मोठा सुरेख आळविला आहे. त्याचप्रमाणें प्रार्थना, गीतें, भजनें, गौळणी, निसर्गगीतें, राष्ट्रीय गीतें व मंगल संस्कार घडविणारीं संस्कृतिविषयक गीतेंहि संजीवनीबाईंनीं लिहिलीं आहेत.

भाषा व रचना—कौशल्य या दृष्टीनें संजीवनीबाईंची कविता सफाईदार आहे; तशीच ती नादमधुर व ठसठशीतहि आहे.

संजीवनीबाईंच्या " संसारां " त प्रामुख्यानें प्रणयपर कवितांचाच भरणा अधिक झालेला आहे. मात्र या प्रणयपर कवितांचें अंतरंग त्या प्रांतांतील नानाविध रंग खुलविण्यांत सजविलेलें आहे हें विशेष होय. " नव-संमोहन " मध्यें प्रणयराग आळविणाऱ्या कवियित्रीची पहिलीवहिली भावना आलेली आहे. प्रथम परिचयाचा हा अनुभव संजीवनीबाईंनीं एखादा मनोभाव अतिशय नाजुक कलाकुसरींतून व्यक्त व्हावा तसा व्यक्त केला आहे. जीवनाला नंदनवनाचें सौख्य अनुभवायला मिळून अंतरंग उजळून गेल्याचें येथें कवियित्री सांगते. " वसंता " मध्यें तर कवियित्रीनें स्पष्ट सांगून टाकलें आहे कीं,

" आज माझ्या अंगणांत वसंताचा खेळ
पानोपान बहरली माझी मनोवेल "

आणि " संधिकाल "मधेंहि

"संधिकाल पातला जवळि घे सख्या मला
जें कधीं न गायिलें
गीत मन्मनांतलें
सूर सूर आळवून ऐकवीन रे तुला ! "

अशी स्पष्ट भाषा केली आहे.

कवयित्रींचे हे विचार वाचीत असतांना स्त्रीचें प्रेम तिला किती धीट बनवितें याची कल्पना वाचकांच्या मनांत डोकावून जाते, आणि त्यानंतर लगेच सहवासाच्या स्मृति घोळवीत:बसणाऱ्या प्रेमी मनाचें अंतरंगहि पहावयास मिळतें.

" नयनांत नीज मी सांठवितें
तें स्वप्न गोड मनिं आठवितें ! "

अशी कै. तांब्यांची आठवण देणारी कल्पना ह्या कवियित्रीच्या लेखणींतूनहि बाहेर पडलेली दिसते. त्यानंतर आणि थोडें पुढें जाऊन पाहिलें तर स्त्रीलाहि स्वतःचें मन असल्याची ग्वाही " प्राणपांखरू"मध्यें कवियित्रीनें दिली असल्याचें दिसून येते. कोणाच्याहि हातांतील बाहुली बनायची तिची तयारी नसते आणि त्याचवेळीं

नका सावरूं नका आवरूं
हें रस–लोलुप प्राणपांखरूं ! !

असेंहि ती सांगून टाकते.

" शांतसागरीं कशास उठविलीस वादळें ?
हृदय–कोट भेदिला कशास, कोणत्या बळें ?
काय हें तुझ्यामुळें
देहभान हरपलें ?
युगसमान भासतात आज नाचरीं पळें ! "

संजीवनीबाईंनीं प्रीतीचें हें रूपकहि मोठ्या हृदयंगम रीतीनें वर्णन केलेलें आहे. स्त्रीजीवनांत डोकावणाऱ्या अनेक प्रीतिकथा ह्या विविध कवितांतून कवियित्रीनें सांगून टाकल्या आहेत.

संजीवनीबाईंचें खरें वैशिष्ट्य त्यांच्या वत्सलगीतांमधून आढळतें. आईच्या भूमिकेवरून त्यांनीं लिहिलेली "स्वागत" ही कविता स्त्रीजीवनांतील वात्सल्याचा एक सुंदर आविष्कार म्हणून पहाण्यासारखी आहे.

"जन्मजन्मीं गुंतलेले पाश बाळा आपुले
आज म्हणुनी गेह माझें मंगलानें नाहलें...
ये गृहाला बाळराणा जीवनाचा माझिया
स्वागताची सिद्धता ना काय अर्पूं मी तया ?
हृदय माझें अंथरोनी घालूं का शय्या सऊ ?
दाटलें वात्सल्य पोटीं पाजुनी कां शांतवूं ?..."

"बाळ करीं झोंपला" हें काव्यहि याच मनोवृत्तीचें द्योतक म्हणून पहातां येईल.

मज नको अर्पिलीं कुणीं
नव सौख्यें पदिं आणुनी
मज एक हवें निशिदिनीं असावा बाळ करीं झोंपला.

आईच्या अंतःकरणांतील हा भाव खरोखरच नितांत रम्य आणि वास्तव आहे.

"शिशुपाठ"मधील पुढील उपमा आईच्या हृदयाची द्योतक म्हणूनच ध्यानांत घेण्यासारखी आहे—

"पलिकडे पहा तो बागडतो निर्झर
धांवेल तसा मम तान्हा दुडदुड उभ्या घर भर."

"छाया"मधील कांहीं कविता गृहिणी जीवनाच्या दृष्टीनें मोलाच्या ठरतील. स्त्रीला स्वतःच्या घराबद्दल वाटणारी श्रद्धा संजीवनीबाईंनीं,

"गृहिणी येथ मी, हें माझें घर
ये घडिभरि अंतरीं मुशाफिर।"

अशाप्रकारें व्यक्त केलेली आहे.

आपली आई आपल्या घरीं यावयाची आहे ह्या कल्पनेनें स्त्रियांच्या मनाचा बराच गोंधळ उडून जात असतो. यावेळीं त्यांचें मन आनंदानें हुरळून गेलेलें असतें; आणि म्हणूनच आई आल्यावर आपलें घर नीटनेटकें दिसावें यासाठीं त्यांच्या जिवाची धांदल उडून जाते. आपल्या मनाची ही स्थिति व्यक्त करतांना संजीवनीबाई लिहितात—

आज घरास यायची माझी माउली मायेची
माझ्या संसारावरती तिची दृष्टी फिरायाची

माझा जीव आनंदानें आला बाई मोहरून
उत्साहाचें गीत माझ्या मुखीं आलें ओथंबून
सारे पसारे ठेविले आवरून सावरून
घरकूल ठेवियेलें नटवून सजवून
माझ्या माहेराची रीत वठवीतें रहाणींत
माते ! तुझी शिकवण आहे माझ्या स्मरणांत...
पडो माझ्या संसारांत माझ्या मायेचें पाऊल
माझ्या सुखसर्वस्वाची तिला घेऊं दे चाहूल."

"छाये" मधील या कवियित्रीचें दुसरें प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तिनें भारत स्वतंत्र झाल्यानंतर प्रकट केलेली देशप्रीति हें होय. स्वतःच्या भावनांना काव्यांतून गुंफित असतांना कालाचें वैशिष्ट्य आविष्कृत करण्याचें स्त्रीच्या लेखणींतील सामर्थ्य येथें प्रकट झालेलें आहे. संसार करीत असतांनाच देशसेवा करणें किंवा संसाराबाहेरच्या जगांतहि आपलें कार्यक्षेत्र निर्माण करणें, ही अलीकडच्या स्त्रीची मनोवृत्ति संजीवनीबाईंच्या लेखणीनें कशी सांगितलेली आहे पहा—

"माझ्या प्रतिभे ! घेऊं नको गऽ कोमल हळवी तान
सरसावुनि हो सज्ज गावया कडक रांगडें गान
प्रणयाकुल युगुलास गुंगुं दे फुलत्या कुंजांतुन
वत्सलतेचा झरा उसळुं दे जननी कंठामधुन
सृष्टीचें सौंदर्य यापुढें कुंचलीस प्रकटुं दे
माझ्या प्रतिभे ! चल ये आतां नाचत सर्वांपुढें..."

या भावनाविष्कारावरून एवढें दिसून येईल कीं, देशप्रीति व्यक्त करतांना देखील स्त्रीला आपल्या नेहमींच्या आवडत्या भावनांनाच आवाहन करावें असें वाटतें आहे.

गांधीजींचा मृत्यु ही भारतांतील एक अतिशय शोकदायी अशी घटना आहे. भारताच्या या सुपुत्राचा वध झाला, त्यावेळीं अनेक कवींनीं आपल्या हृदयांतील शोकाकुल भाव व्यक्त केला. संजीवनीबाईंनींहि या घटनेवर कविता-लेखन केलें; आणि

"नभोवाणीवर घुमूं लागली शोकाकुल गाथा
आणि अचानक वसुंधरेचा नत झाला माथा
भारतभूमिचा लाल लाडका गतप्राण झाला
सुतरुधिरानें पदर तियेचा ओलावून गेला..."

अशा प्रकारें स्त्री हृदयांतील दुःखाचा वैशिष्ट्यपूर्ण अविष्कार केला आहे.

संजीवनीबाईंनीं या भावगीतांप्रमाणेंच रागदारीला अनुकूल अशीं पदेंही लिहिलेलीं आहेत. या पदाची रचना गायनानुकूल झालेली आहे. तांब्यांच्या

काव्याची छाप संजीवनीबाईंच्या काव्यावर बरीच पडलेली दिसते. तांब्यांच्या प्रणयप्रभेचें दर्शनहि अधूनमधून येथें घडतें. "काव्यानुकूल विषयांची निवड, आवश्यक तो भावनास्पर्श व रचनेचा बराचसा साक्षेप या तीन गुणांनीं आधुनिक कवयित्रींमध्यें संजीवनीबाईंनीं आपलें स्थान अगदीं वरचें करून ठेवलें असलें, तरी विचारांचा किंवा विषयांचा त्यांचा आटोप मर्यादित आहे....त्यांची कविता बहुतेक सारी आत्मनिष्ठ असल्यानें तांबे यांचीं नाट्यगीतें त्यांना साधलेलीं नाहींत."*

संजीवनीबाईंचें काव्य दिवसेंदिवस मनानें मोकळें व अनुभवानें उत्कट होत आहे. संजीवनीबाईंच्या गीतांतील शब्द कोमल असतात व रचना रेखीव असते...भावनानुकूल चालीमुळें त्यांचीं काव्यें ऐकायला गोड वाटतात ...'‡ तसेंच त्यांच्या काव्यांत प्रसाद व माधुर्य हे काव्यगुण भरपूर आढळून येतात.

सौ. अपर्णा देशपांडे

"पर्णकुटी" (१९४६) या काव्यसंग्रहांत प्रकाशित झालेली अपर्णा देशपांडे यांची कविता जुन्या वृत्तीच्या प्रामाणिक, प्रेमळ आणि प्रगतिपर मनोधर्मांचें दर्शन घडविणारी अशी उतरलेली आहे. पतिपत्नीमधील प्रेमापेक्षां इतर कौटुंबिक प्रेमबंधनांचाच आविष्कार येथें कवयित्रीनें प्रामुख्यानें केलेला आहे. विशेषत: "कन्यादाना" पासून तौ "तान्हुलीस पाहून" या कवितेपर्यंत कवयित्रीनें रंगविलेलें संसारदृश्य मनोहर झालेलें आहे.

"मम कंठींची मोहनमाळ
असे बाळी ही प्रिय वेल्हाळ
माया ममतेच्या मखमल पोटीं
केली पितयानें जपणूक मोठी
नव्या तेजानें उजळून कांहीं । दिली पदरांत ध्या वरमाई ॥"

आईनें विहिणीला दिलेला हा निरोप कवयित्रीनें जेवढ्या जिव्हाळ्यानें येथें मांडला, तेवढ्याच जिव्हाळ्यानें :तान्हुलीच्या दर्शनानें उत्सुक होणाऱ्या मातेचीहि भावना तिनें रंगविली आहे.

अपर्णाबाईंच्या कवितेचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांनीं लिहिलेली विडंबन काव्यें. या काव्यांत सर्वत्र विखुरलेला विनोद मोठा रम्य आहे. उदाहरणार्थ त्यांची पुढील कल्पना पहा—

---

* रा. श्री. जोग, अर्वाचीन मराठी काव्य, पान ३११.
‡ भ. श्री. पंडित, इंग्रजी राजवटींतील मराठी कविता.

" आतां रिकामी मी कोठली ? आतां बाई " पेन्सल " " घरिं " घेतली ॥
लवकर उठणें जळलें मेलें । बरें भालिंचें म्हटलें चुकलें
परि नशिबाला उलटें आलें । " झोंपच उडूं लागली " ॥ १ ॥ "

स्त्रियांच्या मनाचें अगदीं हुबेहूब चित्र येथें उमटलेलें दिसून येतें.

अपर्णाबाईंच्या कवितेचें आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे आपल्या कवितेंत कवयित्रीनें देशांतील चालू परिस्थितीवरील कल्पनांचा केलेला आविष्कार. बडोद्याच्या माणिकरावांच्या संग्रहीं असलेलीं पुरातनकालचीं शस्त्रास्त्रें बघून मनांत उचंबळून येणाऱ्या भावनेमधून कवयित्रीची देशप्रीति पुढीलप्रमाणें व्यक्त झाली आहे—

" हे दुर्दैवी शस्त्रांनो ! तुम्हां बघुनि दाटतो ऊर !
शिवकरींची असिलता ही
तळपतां, विद्युल्लताही—

* * *

गडप भूमीच्या उदरीं होई ती लाजेनें मनिं चूर..."

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि महात्मा गांधी यांच्याविषयीं कवयित्रीनें वाहिलेली काव्यकुसुमांजलीहि अशीच हृद्य आहे.

अशा रीतीनें अपर्णाबाईंच्या पर्णकुटींतील कवितेंत " साधेपणा आहे पण बेडौलपणा नाहीं; शृंगार आहे पण नखरा नाहीं; भावना आहेत पण विवशता नाहीं...तथापि खऱ्या रसिकाला ह्यांत नव्या चालीच्या पण जुन्या वृत्तीच्या प्रामाणिक, प्रेमळ व प्रगतीपर मनोधर्मांचें सुंदर प्रतिबिंब आढळेल. " * तसेंच त्यांच्या कवितेची भाषा सोपी व चटकदार असून स्त्रीहृदयाच्या वैशिष्ट्यपूर्ण भावनांची उकल करण्याचें सामर्थ्यहि तिच्यांत आहे, याची जाणीव होईल.

" निवारा " (१९५३) हा अपर्णाबाईंचा दुसरा काव्यसंग्रह. या संग्रहांतील काव्याच्या प्रतिभेचें तेज हें एखाद्या दीपकळीसारखें शांत, स्नेहमयी व सजीव आहे. तसेंच ह्या कवितेचें अंतरंग हें जुन्या काळच्या लोकगीतांसारखें जिव्हाळ्यानें नटलेलें आहे. ही कविता सर्वत्र जेवढी गोडवा घेऊन आली आहे तेवढाच अधून मधून अभिजात विनोदहि घेऊन आलेली आहे.

" हिंदलक्ष्मीस ", " हे अमोल हीरक मम सदनीं " किंवा " राष्ट्रवीरांना पंचारती " या कवितांतून अपर्णाबाईंनीं आजच्या काळाला शोभेल अशी राष्ट्रभक्ति प्रकट केलेली आहे.

अपर्णाबाईंच्या या संग्रहांतील काव्यांत वात्सल्य आहे, सात्त्विक भाव आहे, जिव्हाळा आहे व निरागस हृदयांतील आनंदाची लकेरहि आहे. आणि मुख्य म्हणजे इथें निराशा नाहीं हें विशेष होय.

" नवीं मंगल गीतें " हें या संग्रहाचें आणखी एक वैशिष्ट्य होय. आपल्याकडील संस्कार गीतांत या गीतांनीं मोठी चांगली भर टाकली आहे. लग्न मुंजीसारख्या मंगलप्रसंगीं जुन्या रूढीनुसार म्हणावयाचीं हीं नवीन गीतें आहेत. जुनीं गीतें – लोकगीतें – जुन्या पिढीबरोबरच मागें सरत चालल्यानें ती उणीव भरून काढण्याचें काम या गीतांनीं केलेलें आहे.

ऋद्धिसिद्धि घरा येई । हिच्या पुण्यपावलांनीं
झाकेल घर माझं । सोनियाच्या कवलांनीं
कुलवंताची ही बाळ । माझं उजळील कुल
सत्यवानाची सावित्री । घाली ज्ञानवंता भूल

" घरभरणी " मधील या ओळी या संदर्भात अवश्य लक्षांत घेतां येतील. ह्या काव्यांतील भावना सुसंस्कृत मनोवृत्तीची, सहजरम्य भाषाशैलीची व सद्भावनांची अपर्णाबाईच्या ठायीं किती जोपासना झाली आहे याची साक्ष देते.

अपर्णाबाईनीं या प्रौढ काव्याप्रमाणेंच कांहीं शिशुगीतें मोठीं परिणामकारी अशीं लिहिलेलीं आहेत. त्यांचा विचार बालवाङ्मयाच्या विभागांत पुढें स्वतंत्रपणें केलेला आहे.

सौ. पद्मा गोळे

कवितेच्या अंतरंगांचा तपास लावतांना जगाच्या पाठीवर असलेल्या श्रेष्ठ साहित्याचा आधार जेव्हां घेण्यांत येतो, तेव्हां परभाषेंतील कवींच्या काव्यविषयक विचारांची पुढ्यांत पेरणी होते. अशा वेळीं काव्य नेहमीं दिसतें त्यापेक्षां कांहींसें भव्यदिव्य असें रूप धारण करून नजरेंत भरतें. मनाला त्यामुळें एक प्रकारचा भक्कम दिलासा येतो. भवितव्याबद्दलची चिंता क्षणार्धांत दूर होते. नजरेसमोर आशेचे दीप पाजळूं लागतात. आणखी वर्डस्वर्थनें जगप्रसिद्धपणा मिळवितांना सांगितलें आहे त्याप्रमाणें " कविता हें सर्व ज्ञानपुष्पांचें अत्तर आहे" याचा अर्थ समजून येतो. त्याचा सुवास विचारी मनाला भुलवून टाकतो. ह्या सुगंधापासून निर्माण होणारें तेज जीवनाला उभारी आणून टाकतें.

याच पार्श्वभूमीवर आधुनिक कवि जीवनांतल्या अतिसूक्ष्म व सुप्तावस्थेंत असणाऱ्या सौंदर्याची उकल करून दाखवीत असतो. पण याचवेळीं ह्या सौंदर्याच्या पूजेला आजच्या काळांत किंमत नसल्याचें कटु सत्य तो लपवून ठेवूं इच्छित नाहीं. कारण चालू युगांत केवळ सौंदर्याच्या निष्क्रिय अशा उपासनेपेक्षांहि त्यास सामर्थ्याची व सभ्यतेची जोड द्यावी असें त्यास मनापासून वाटतें.

केशवसुतांच्या ' तुतारी ' पासून तों कुसुमाग्रजांच्या कोलंबसाच्या ' गर्वगीता ' पर्यंत आधुनिक काव्याच्या झुंझार वृत्तीच्या सामाजिक पण प्रभावी परिवर्तनाच्या छटा निदान तरी दहापंधरा कवितांमधून दिसून येतात. कविमनाचा कोमलपणा व त्याचें शूरत्व यांचें प्रतिबिंब या कवितांतून आढळून येतें. माधव ज्यूलियन, सावरकर, कुसुमाग्रज, कवि अनिल इत्यादि या प्रकारच्या काव्याचे पुरस्कर्ते होत. स्त्रियांच्या दृष्टीनें विचार करावयाचा तर या मालिकेंत पद्मा गोळेंचा कांहीं प्रमाणांत समावेश करतां येईल.

पद्माबाईंचें काव्य हें विषयाच्या दृष्टीनें विविध प्रकारचें आहे. भावनाविष्काराच्या दृष्टीनें वैचित्र्यपूर्ण आहे. प्रभावी विचारांच्या दृष्टीनें सामर्थ्यवान आहे. त्यामुळें त्यांचें काव्य वाचलें म्हणजे उद्यांच्या भारतांतील स्त्रीच्या आशा-आकांक्षांची व जीवनांतील कार्यक्षेत्रांची त्यांना जरूर जाणीव आहे असें लक्षांत येतें. त्यांचें आयुष्य एका खानदानी व श्रीमंत कुटुंबांत गेलेलें असल्यानें त्यांचें काव्य शालीनतेतें रुबाबदार झालें आहे. संयमानें प्रभावी ठरलें आहे. कांहींशा मुग्धतेनें सुसंस्कृत बनलें आहे. त्याची साक्ष त्यांची " आम्ही कुलीनांच्या कन्या " ही कविता जरूर देते आहे.

प्रणयी जीवनाचीं विविध चित्रें त्यांनीं आपल्या काव्यांत पेरलेलीं असलीं तरी त्यांनीं या चित्रांतून प्रणयाची चिरनूतन व चिरयौवन प्रेमभावनाच प्रकट होईल हें आवर्जून पाहिलें आहे. आणि मुख्य म्हणजे सफल होणाऱ्या प्रेमाचीच आराधना त्या करीत बसल्या नाहींत तर—

प्रेम जरी माझ्यावर
सोडी धिक्काराचे शर
जावोत भेदून माझी नीच दुर्बलता

अशा कांहींशा लढाऊ वृत्तीचा त्यांनीं अंगिकार केला आहे ! प्रेमभावनेचें हें नवेंच दर्शन घडविण्याचें धैर्य पत्करल्यामुळें त्यांची कविता एकदम उठून दिसतें.

नव्या युगांतील स्त्रीजीवनाचें वैशिष्ट्य दर्शविणारे सौ. पद्मा गोळे यांचे " प्रीतिपथावर " (१९४७) व " नीहार " (१९५४) हे काव्यसंग्रह चित्तवेधक भावनाविष्काराचें एक उत्तम चित्र या दृष्टीनें सरस झालेले आहेत. या संग्रहांतील जवळजवळ निम्मी कविता प्रेमगीतांनीं नटलेली असून तिचें स्वरूप भावगीतांसारखें आहे. सौ. पद्मा गोळे यांच्या कवितांत नव्या युगांतील स्त्रीचा जो आदर्श ठेवण्यांत आला आहे, तो वस्तुनिष्ठ, पण विलोभनीय आहे." ही स्त्री सर्वसाधारण स्त्रीप्रमाणें प्रेमांत पडते आणि—

" तूंच मला शिकविलेंस प्रेम कराया
तूंच अर्थ निर्मिलास जीवनांत या "

असेंहि म्हणते.

स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेऊं इच्छिणारें तिचें मन अभिमानानें उफाळून येऊन स्वतंत्रतेला आवाहन देतें कीं—

" सर्वस्वहि लाविन आज पणा
आणीन तुला परि निजसदना "

शतकानुशतकें परदास्यांत असलेल्या स्त्रीच्या मनाची केवढी ही तयारी ?

सौ. पद्मा गोळे यांनीं लिहिलेलीं, वत्सलरसानें भरलेलीं गीतेंहि अप्रतिम आहेत. स्वतःला लवकरच होणाऱ्या मुलाचें स्वागत करणाऱ्या मातेचे भाव रंगवितांना व स्त्रीच्या मनांतील आनंदोर्मि वर्णन करतांना, कवयित्री म्हणते—

" अमूर्त कोणी हृदयीं माझ्या गाइ सुमंगल गान्
अपूर्व हुरहूर वाटे कसली
नव भावोर्मि हृदयिं उसळली
तनु भीतीनें कांपे तरि ये आनंदास उधाण "

त्यानंतरची स्वतःची भूमिका कशी राहील याचेंहि स्पष्ट उत्तर ती देऊन टाकते—

" युगंधरा मी नव्या युगाची
मानवतेचा ध्वज करिं धरुनी
उंच स्वरानें स्वतंत्रतेचीं
गाइन उज्ज्वल मंगल गाणीं "

पण अशा स्थितींतहि स्वतःच्या मुलांचा विसर न पडतां उलट

" बाळें चिमणीं गृहरत्नें मम
परि न शृंखला त्या पायींच्या
विकास त्यांचा, विकास माझा
विकास यांतचि मम राष्ट्राचा "

असेंच ती अभिमानानें म्हणते आहे.

अशा प्रकारचें नव्या स्त्रीचें चित्रण मोठ्या दमदारपणानें व कणखरपणानें करीत असतांनाच " कधीं कधीं "सारख्या कवितेंत त्या प्रेमभावनांचींहि चित्रें काढूं इच्छितात. आपल्या शृंगारानें आपण आपल्या पतीला भुलवून टाकावें व तपस्येनें वेडें करून सोडावें असेंहि त्यांना वाटतें !

परंतु इतर कवयित्रींच्याप्रमाणें केवळ घरांतच त्यांचें मन रमत नाहीं. संसारी जीवनाची बारीकसारीक चित्रें रेखाटूनहि त्यांना

" वाटे अंतरीं या अजूनि जगूंदे
ध्येयात्म तें जीवन ।
जेथें शैशवीं यौवनीं विहरलें सौंदर्यवेडें मन ।
तूंते शांति कुठनि दुर्बल जिवा, लाभेल या जीवनीं ? "

असा प्रश्न करावासा वाटतो. त्यामुळें त्यांच्या ठायींच्या चिंतनशील मनाची कल्पना येते.

‘ अभिलाषा ’ व ‘ मी माणूस ’ या त्यांच्या कवितांनीं ज्वालामुखीसारखा स्फोट केला आहे ! स्त्रीकडे उपभोगाची दृष्टि ठेवणाऱ्या पुरुषीमनाची त्यांनीं सडेतोडपणें व कलात्मक अशी ‘ अभिलाषा ’मध्यें मांडणी केली आहे. इथें कवयित्रीच्या मनाला होणारा अनावर क्षोभ प्रकट झालेला आहे. ‘ मी माणूस ’ या कवितेंत त्यांनीं जीवनाकडे किती निर्भयतेनें पाहिलें आहे याची कल्पना येते. ही कविता पराक्रम दर्शविणारी आहे. जगांतील दंभ, खोटेपणा व स्वार्थ यांचें हें एक सुंदर व रेखीव चित्रण आहे.

सौ. पद्माबाईंची अशी ही कविता मोठी ओघवती व सहज सुंदर भाषेनें नटलेली आहे. अलिकडे नवकाव्यांत ती शिरूं पहाते आहे. परंतु तरीहि तिची वर्णनशैली आकर्षक आहे. तिनें जुन्या छंदांचा स्वीकार केलेला असला तरी ती विविध अंगांनीं नटलेली आहे. मात्र अधून मधून कुठें तरी यतिभंगाचाहि दोष तिनें स्वीकारला आहे ! तरी परंतु तिच्याठायीं प्रसाद आहे, माधुर्यहि आहे.

● ● ●

शांता ज. शेळके

एखाद्या झाडाला जशीं पानें येतात तशी कवीला कविता सुचली पाहिजे असें प्रसिद्ध आंग्लकवि कीट्स् याचें म्हणणें आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणें कवीच्या जीवनांतून कविता स्फुरली पाहिजे. नव्या जीवनाला तिनें स्फूर्ति दिली पाहिजे. ज्ञानदेवादि जुन्या काळच्या कवींनीं कीट्सची अपेक्षा पुरी केली आहे; नव्हे त्याहिपेक्षां अधिक असें असामान्यत्व त्यांनीं आपल्या कवितेंतून प्रकट केलें आहे. त्यामुळें त्यावेळच्या व आजच्याहि जगाला स्फूर्ति मिळाली आहे, मिळते आहे. आजच्या जगांतहि असे कांहीं कवि आहेत कीं, ज्यांच्या जीवनांतून काव्य उमलतें, फुलतें. अशाच कांहीं कवींच्या मेळाव्यांत शांता ज. शेळके यांचें नांव घेण्यासारखें आहे. कारण——

प्रिय सखये ! तव संगतींत मीं
रंगविलें अवघें मम जीवन
स्निग्ध जिव्हाळा तुझा लाभतां
पाझर फुटले पाषाणांतून
हर्ष उरीं दाटून जेधवा
मधुर भाव उसळले मन्मनीं

त्या भावांची अखिल माधुरी
तुझ्यामध्यें मीं दिली ओतुनी ?

अशी त्यांनीं आपल्या कवितेशींच बोलणीं केलीं आहेत !

वर्षा (१९४७) व रूपसी हे शांताबाईंचे दोन कवितासंग्रह. या कवितांतून त्यांनीं स्वतःच्या जीवनांतील सुखदुःखांचा प्रामाणिकपणें आविष्कार केलेला आहे. त्यामुळें आजच्या कविमंडळांत त्यांना मानाचें स्थान मिळालेलें आहे. त्यांची कविता ही बरीचशी आत्मलेखनपर अशी झालेली असून " विशिष्ट अनुभूतींचीं स्मारकें म्हणून आणि विशिष्ट आकांक्षांचीं चित्रें म्हणून माझ्या कविता मला आवडतात " असें खुद्द शांताबाईंचेंच म्हणणें आहे. शांताबाईंची ही कविता म्हणजे केवळ शुद्ध, सरळ आणि निरागस असा आत्माविष्कार आहे. त्यामुळें ही कविता सर्वसामान्य लोकांनाहि समजेल अशी सोपी झालेली आहे. तिच्यामध्यें " असामान्य " असें कांहींहि नाहीं.

..." गगनोदरांतील मेघांचीं पटलें भेदून संचार करणारा गरुड आपण नसून, हिरवळींत जेथें कोमल फुलें बहरतात तेथें झुलणारें फुलपाखरूं असल्याचें " त्यांची कविता सांगत आहे. " आपल्या तळपण्यानें घन तिमिराला उजळून टाकणारी विद्युल्लतिका आपण नसून गगनांगणांत दिसणाऱ्या ढगाच्या आडून चमकणारी इवलीशी चांदणी आपण आहोंत " असें तिचें म्हणणें आहे. " उद्दाम सुगंध उधळणाऱ्या गुलाबकलिकेपेक्षां पर्णांतरीं लपून राहणारी तुळशी मंजरी"ती आहे. दुदुंभीप्रमाणें आसमन्त घुमविणारे हें सागरगर्जित नसून तो निर्झराचा अस्फुट कलरव आहे. तें द्वेषाचें तांडव नसून चिमण्या गालावरील अकारण हास्याची ती माधुरी आहे. स्वतःच्या आणि स्वतःच्या काव्याच्या मर्यादा आणि गुण विशेष दुसऱ्या कोणाहि कवीस इतक्या नेमक्या आणि सुंदर रीतीनें सांगतां आल्या नसत्या.*

शांताबाईंनीं स्वतःचें आत्मनिरीक्षण आणखी एका कवितेंत केलें आहे.

" माझिया हृदयाचें पांखरूं
अस्थिर, चंचल भारी बाई कसें तया आंवरूं ?
निळें निळें नभ येतां दिसुनी
फडफड करिते अधीर होउनि
इवल्या पंखांनींच आपुल्या गगन पाहतें भरूं ?
कुठें ताटवा दिसे बहरला;
हर्ष तरी या होई आगळा
मंजुळ, अस्फुट, कोमल गुंजन याचें होई सुरूं

* रा. श्री. जोग, वर्षा, प्रस्तावना.

निज जातीचें दिसतां कोणी
खुळें तयाला बसे बिलगुनी
शब्दहीन भाषेंत आपुल्या हितगुज लागे करूं ? ”

असें शांताबाईंनीं स्पष्टपणें म्हटलें आहे. या हृदयपांखराच्या डोळ्यांमधून अनंत स्वप्नें फुलून लपून बसलीं आहेत; आणि त्या स्वप्नांच्या सुखद माधुर्यांत जीवनांमधील दुःख तें विसरून जातें, असा या कवितेचा शेवट आहे.

“ कांहीं अमूर्त ध्येयांचा, वेध सारखा घेऊन ! कापितसे जीव उगा वाळवंट हैराण ” असें आपलें जीवन चाललें असल्याची जाणीव कवयित्रीला होते आहे ! “ माझें मींच घेतलें हो मरण हें ओढवून ” असें सांगून त्या दुःखी जीवनाची जबाबदारी आपणावरच आहे असें ती म्हणतेहि. त्यामुळें कित्येकदां

“ सदाच मी एकली, जीवनीं सदाच मी एकली ”

अशी इखरुख मात्र तिच्या मनाला लागून रहाते. तथापि शांताबाईंच्या काव्यांत निर्भेळ निराशा मात्र बिलकूल आढळत नाहीं. उलट “ नैराश्यांतहि त्यांना एक आधार वाटतो व तो म्हणजे ईश्वरावरील श्रद्धेचा. कविजनांच्या अलीकडील पिढीमध्यें न आढळणारी परमेश्वरावरील श्रद्धा त्यांच्या काव्यांत प्रकट झाली आहे. बुद्धीपेक्षां श्रद्धेवर त्यांचा अधिक भर आहे. मूर्तिभंजकांच्या या युगांत मूर्तिपूजेचें आणि ती पाठीमागील भावनेचें त्यांनीं समर्थन केलें आहे. तेजोनिधि भास्कर, पर्जन्याच्या धारा, वसन्ताचें आगमन, सुमनांचा सुगंध, भव्य सागर या गोष्टींमध्यें प्रभूचा साक्षात्कार त्यांना होतो, व त्यामुळेंच क्वचित् “ आज सारे मम एकाकीपण ” असेंहि त्यांना वाटतें. ”

शांताबाईंना निसर्गाचें प्रेम फार आहे. निळें आकाश तर त्यांचें अत्यंत प्रिय असें समाधानाचें स्थान आहे. रातराणीचें त्यांना फार वेड आहे असें त्यांच्या विविध प्रकारच्या लेखनांत येणाऱ्या तिच्या उल्लेखांवरून दिसून येतें.

“ पाऊस ” “ हिरवळ ” आणि “ पावसानंतर ” या कवितांमधूनहि त्यांचें निसर्ग प्रेम असेंच व्यक्त झालेलें आहे. शांताबाईंचें हें निसर्ग प्रेम त्यांच्या मनांतील मूळच्या जिव्हाळ्यानें निर्माण झालेलें आहे; आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या एका काव्यसंग्रहास “ वर्षा ” असें नांव दिलें असावें.

शांताबाईंच्या काव्याचें स्वरूप हें असें आहे. त्यांच्या काव्यांत स्वतःच्या जीवनांतील सुखदुःखांचें लेखन आहे. पण तें स्वयंकेंद्रित व पुनरुक्ति यांपासून अलिप्त आहे. त्यांत कोठेंहि अतिरंजन, आधिक्य अथवा उसनेपणा नाहीं. त्याचें स्वरूप निर्मळ व निरामय आहे.

शांताबाईंच्याजवळ असणारी शब्दार्थांची उपस्थिति व त्यांचें पद्यरचनेवरील प्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे. आधुनिक कवयित्रींमध्यें कोणाहिमध्यें हें प्रभुत्व इतक्या प्रमाणांत मला दिसलें नाहीं, एवढेंच नव्हे तर अनेक कवींमध्येंहि तें दिसत

नाहीं. " उत्कट भावनेच्या जिव्हाळ्याची देणगी शांताबाईंना लाभलेली असल्यामुळें आदळआपट किंवा धांदल गडबड न करतां त्यांची कविता रेखीव आणि चटका लावणारी झाली आहे.

● ● ●

सौ. शांताबाई जोशी

घरगुती वळणाच्या आणि देवादिकांना आळवण्याच्या कविता लिहिणाऱ्या शांताबाई जोशी यांची प्रसिद्धि ध्वनिमुद्रिकांसाठीं काव्य लिहिणाऱ्या म्हणून विशेष आहे. त्यांच्या कवितांचें गायन अनेक नामवंत व होतकरू गायिकांनीं व गायकांनीं केलेलें आहे.

चंद्रकला (१९४५) व बंधरेषा (१९५८) हे शांताबाईंचे दोन कविता-संग्रह आहेत. त्यांच्या कवितेनें अतिशय चिकाटीनें, संयमानें व हौसेनें मराठीची सेवा केलेली आहे. " भावनांचा पाळणा फारच हेलकावे खाऊं लागला कीं, आपोआपच कवितेचा जन्म होतो " अशी माहिती शांताबाईंनीं स्वतःच आपल्या काव्यनिर्मितीबद्दल दिलेली आहे.

मन माझें वेडें भारी धांवतें कल्पनांमागून
कधिं असतां निवडित दाणे
चिउताई पुढें चिवचिवते
ते तिचे पंख चोरुनिया
मन वाऱ्यामागें जातें...

आणखी असा खुलासा करतांना बंधरेषा घालून घेतली आहे.

सोज्ज्वल प्रेमभावनेचा आविष्कार, ईश्वरविषयक भक्तिभाव, निसर्गाचा स्नेह, लहान मुलांच्याबद्दलचें वात्सल्य आणि थोरामोठ्यांच्या विषयीं आदरभाव हें शांताबाईंच्या कवितेचें वैशिष्ट्य आहे. त्यामुळें—

आभाळींचा चांद माझ्या आज अंगणांत
पंढरीचा राया दळी जनीच्या घरांत

अशा कृष्णदेवाच्या व जनाबाईंच्या सहकारी जीवनाचें कौतुक त्यांनीं मोठ्या तन्मयतेनें केलेलें आहे. त्यांची कविता अशी साधी आहे. घरगुती आहे.

● ● ●

स्फुट काव्यलेखन

या कालखंडांतील ज्या कवयित्रींचा विचार येथवर झाला त्यांच्याखेरीज आणखीहि इतर कवयित्रींनीं मराठी काव्यास हातभार लावलेला आहे.

उमाबाई सहस्रबुद्धे, सुशीला मराठे, उषा लिमये, सरिता पत्की, शिरीष पै, पद्मा लोकूर, योगिनी जोगळेकर, लीलाराजे पटवर्धन, ललितकुमारी भट इत्यादींचा समावेश या कवयित्रींच्यामध्यें होतो त्यांचेपैकीं कांहीं जणींचें काव्य ग्रंथरूपानें प्रकाशित झालेलें आहे तर कांहींजणींचें वेगवेगळ्या नियतकालिकांतून वाचकांचे समोर आलेलें आहे. संख्येच्या मानानेंहि तें बरेचसें झालेलें आहे. परंतु यापूर्वींच्या कवयित्रींच्यापेक्षां कांहीं खास असें वेगळें वैशिष्ट्य त्यांत दिसून न आल्यामुळें त्यांचा येथें निराळा विचार केलेला नाहीं. तरीपण या संदर्भांत नमुन्यादाखल म्हणून "गृहलक्ष्मी"च्या १९२८ सालच्या अंकांत आलेली उमाबाई सहस्रबुद्धे यांची 'सायंकाळ' ही कविता इथें देत आहे. स्त्रीस्वभावाला धरून उमाबाईंनीं संध्यादेवीच्या अंगावर चढविलेले अलंकार या कवितेंत कसे गोविले आहेत तें पहाण्याजोगें आहे—

"मुग्ध बालिका संध्यादेवी खुलली अनुरागानें
उत्सुक झाली निशा सखीला भेटाया मोदानें
यौवन पूरित आल्हादाची छटा विराजे वदनीं
उभी ठाकली हांसत हांसत रम्य वसंतोद्यानीं
चकमक वलयें करांत ल्याली सुंदर रविकिरणांचीं
भूमितलावर प्रभा फांकली अतुल अशा स्वरूपाची
इंद्रधनूचा नवरत्नाचा दाब खुले कमरेला
हेमवर्ण तो गगन-मंडळीं पांघरिला जणुं शेला
शालुबुट्याचा रंग जांभळा शोभवि केतकी-तनुला
धवल यशाची हालत कंठीं सुंदर मौक्तिक माला
वन-पुष्पांचा हार करामधिं फिरवि चहुकडे डोळे
सुवर्ण रंग परि कुणीं शिंपिला विश्वावरती नकळे."

ललितवाङ्मयाच्या विकासकाळीं स्त्रियांच्या लेखणीनें कशा प्रकारचें काव्य लिहिलें याचा हा धांवता इतिहास आहे. तो लक्षांत घेतां एक ठळक गोष्ट लक्षात येतें ती अशी कीं हें काव्य बहुतांशी व्यक्तिनिष्ठ आहे. स्वतःच्या भाव भावनांपलीकडे त्याची मर्यादा फारशी गेलेली नाहीं. आणि स्त्रियांच्या गद्य लेखनाच्या मानानें त्याचा पसाराहि मर्यादित आहे. खेरीज आणखी एका ठळक गोष्टीचा उल्लेख करावयाचा म्हणजे तो असा कीं कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीच्या प्रेम गीता'सारखी कविता लिहिणें स्त्रियांना अद्याप जमलेलें नाहीं! प्रतिभासंपन्न अशा त्यांच्या काव्याचा कांहीं थोडा भाग सोडला, तर अद्यापहि स्त्री ही काव्याचा विषय म्हणूनच अधिक लोकप्रिय आहे!!

याच कालखंडांतील पुरुषांनीं लिहिलेलें काव्य लक्षांत घेतां असें दिसून येतें कीं, स्त्रियांचें काव्य हें अगदींच मर्यादित वातावरणांतून भटकतें आहे. वैयक्तिक

सुखदुःखाच्याच गोष्टींची विशेष वाच्यता करते आहे. त्यामुळें " कविता ही कालाबरोबरच प्रगमन करीत असते. कविता ही चेतना आहे. कविता ही गति आहे, कविता हें कृतीचें अंतस्तेज आहे, भविष्याचा मार्ग प्रकाशित करणारी ती दिव्य चांदणी आहे. घोर अरण्यांतून पलीकडे जाणाऱ्या वाटसरूंस वाट दाखविणारी ती ज्वलद्दीपमाला आहे!! कविता ही विस्तवाच्या पंखांनीं युक्त अशी धमक आहे. उदात्त विचारांची– आत्मत्यागाचें बल अंगांत संचरविणाऱ्या उदात्त विचारांची– ती दिव्य मूर्ति आहे;" हें जोसेफ मॅझिनींचें म्हणणें स्त्रियांच्या कवितेला न पेलणारें आहे! ही धमक त्यांच्या कवितेंत येण्यासाठीं त्यांच्या कल्पनेला अजूनहि विशाल दृष्टिकोन लाभणें अगत्याचें आहे.

देशभक्तीनें प्रेरित झालेल्या भावना या कालखंडांत विशेष प्रमाणांत उफाळून वर आल्या असतांनाहि फारच थोडे अपवाद सोडले, तर स्त्रीच्या लेखणीनें काव्य-लेखनाचे वेळीं त्यांचा विचार करूं नये याचें मोठें आश्चर्य वाटतें. स्त्रीशिक्षणें वाढलें, स्त्रिया वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांत भाग घेऊं लागल्या, त्यांच्या कार्याचीं क्षितिजें विस्तारलीं, घराबाहेरच्या जगांत त्यांनीं प्रवेश करून स्थान मिळविलें, तरीहि त्यांच्या कल्पनेला म्हणावी तशी विशाल नजर न मिळाल्यामुळें त्यांचें काव्य बऱ्याच अंशीं घरांतच घुटमळलें. स्वतःविषयींच बोलत राहिलें. त्यामुळें पुरुषांच्या व त्यांच्या काव्यलेखनांत बरीचशी तफावत राहिली! त्याचा परिणाम काव्याच्या इतिहास लेखनांत किंवा आढाव्यांत स्त्रियांच्या लेखनाचा विचार जाणत्या टीकाकारांनीं न करण्याकडे झाला. कदाचित् असें घडण्याचें आणखीहि कारण असूं शकेल. परंतु ही गोष्टहि नजरेआड करण्यासारखी खचितच नाहीं.

वास्तविक इंदिरा संत, पद्मा गोळे, शांता शेळके वगैरे कवयित्रींच्या ठायीं कालमानाप्रमाणें स्फूर्ति घेऊन उठणारें काव्य निर्माण करण्याची शक्ति जरूर आहे. त्यांचें शिक्षणहि पुष्कळ झालें असल्यानें परभाषेंतील व स्वभाषेंतीलहि काव्य त्यांनीं अभ्यासिलें आहे. तंत्र म्हणूनहि त्यांनीं काव्याचा विचार केला आहे. परंतु " स्त्री ही स्फूर्ति देवता आहे " हें सिद्ध करणारी कविता त्यांनीं थोडासा अपवाद सोडला, तर कां लिहूं नये याचें नवल वाटूं लागतें.

स्त्रियांनीं लिहिलेल्या काव्याचा आणखी एक प्रकर्षानें जाणवणारा दोष म्हणजे त्यांनीं जानपद जीवनाला बिलकूलच हात न घालतांना आपलें काव्य लिहिलें हा होय! अर्थात् एकट्या बहिणाबाई चौधरी या गोष्टीला अपवाद आहेत. त्यांचें जीवनच वेगळें. परंतु इतरांनीं अजिबातच हा जानपद भाव कां डावलावा आणि ग. दि. माडगूळकर किंवा नामदेव व्हटकरांसारखें खास ग्रामीण काव्य लिहायचा प्रयत्न त्यांनीं कां करूं नये कळत नाहीं. कारण शांता शेळके, संजीवनी मराठे किंवा इंदिरा संत यांनीं ग्रामीण जीवन जवळून पाहिलेलें आहे! फार काय त्या खेड्यांत राहिलेल्याहि आहेत.

मराठी भाषेबद्दल बोलतांना खेड्यांतील स्त्रियांनीं तिची अजूनहि चांगली जोपा केली आहे असें अभिमानानें बोललें जातें. आणि अशिक्षित किंवा शिक्षित स्त्रियांच्या बोलण्यांत मायबोलीचाच वापर अधिक असतो ही वस्तुस्थिति आहे.

एवढेंच नाहींतर आपल्या मायबोलींतच आपल्या जीविताचें वेड किंवा अंतरींची ओढ आहे हें माडगूळकरांप्रमाणें त्यांच्या लक्षांत येऊनहि तसें बोलायचें त्यांना जमलें नाहीं. किंवा मराठीच्या नगरींत फेरफटका करून तिच्या घरचा जातीवंत खजिना सांगण्याचाहि मोह कुणाला झाला नाहीं, ही माझ्या मतें मोठीच दुर्दैवाची गोष्ट होय.

या कालखंडांत "रविकिरण मंडळानें" मराठींत विविध काव्यकलाप्रकार आणण्याची यशस्वी कामगिरी केली. तशा प्रकारची—नवें वृत्तप्रकार मराठीला देण्याची—कामगिरी स्त्रीनें केलेली नाहीं, असें या कवितेच्या एकंदर थाटावरून दिसून येतें. गिरीशांप्रमाणें खंडकाव्याची रचना, माधव ज्यूलियनप्रमाणें प्रीति-रसाचा उठाव किंवा यशवंतासारखी "आई" कोणत्याहि कवयित्रीनें कां निर्माण करूं नये, याचें आश्चर्य वाटतें !

संजीवनी मराठे यांनीं तांब्यांच्याप्रमाणें भावगीतें लिहिलेलीं असलीं तरी तांब्यांच्या ठिकाणीं असलेलीं "मनाला सृष्टींतील सौंदर्याचे साक्षात्कार व्हावे, त्या साक्षात्कारांच्या चिंतनांत बुद्धि रंगून जावी व त्या उन्मनी स्थितींत प्रतिभेला गीतांचा फुलोरा फुटावा, या गोष्टी घडावयाला जी सूक्ष्मग्राही, सौंदर्यप्रवण पण शुचि मनोवृत्ति असावी लागते"* ती मात्र त्यांच्याजवळ तितक्या उत्कटत्वानें असलेली दिसत नाहीं.

हें सर्व मान्य करूनहि या सर्व पुरुषांचे जवळ नाहीं तें या कवियित्रींनीं यशस्वीपणें कमाविलेलें आहे, असें मात्र बिनदिक्कतपणें म्हणावयास हरकत वाटत नाहीं. वत्सलरस स्त्रियांनीं इतक्या उत्कटत्वानें हाताळलेला आहे कीं, त्याची सर कोणत्याहि कवीच्या त्या पद्धतीच्या काव्याला येऊं नये ! तीच गोष्ट स्त्रीसुलभ अशा इतर प्रामाणिक भावनाविष्काराच्या बाबतींतहि म्हणतां येईल. स्त्रियांचें काव्य एकदम डोळ्यांत भरणारें नसलें तरी त्यास लाभलेली स्त्रीसुलभ शालीनता आणि शुचिता हृदयंगम आहे.

शेवटीं या काव्यासंबंधीं अच्युतराव कोल्हटकर यांनीं म्हटल्याप्रमाणें असें म्हणतां येईल कीं, "कवितेचें खरें लक्षण म्हटलें म्हणजे, हृदयांतील तरंगाचें रूप व्यक्त करून दाखविणें...कवितेस काल लागत नाहीं, चाल लागत नाहीं अथवा अलंकाराची शालहि लागत नाहीं...मानवी अंतःकरणाच्या किनखापी पिशव्या

---

* श्री. माडखोलकर, अर्वाचीन मराठी साहित्य, पा. २२

रसिक समाजापुढें भरभरून ओतून दाखविणें म्हणजेच काव्य "* आणि त्या दृष्टीनें स्त्रियांचें हें काव्यलेखन केव्हांहि मराठीला भूषणावह होईल यांत शंका नाहीं.

● ● ●

लघुकथा

मराठी वाङ्मयांतील लघुकथा हा कलाप्रकार एका बाजूनें आधुनिक म्हणून जेवढा लक्षांत येतो, तेवढाच तो दुसऱ्या बाजूनें विशेष प्राचीन असल्याचें ध्यानांत येतें. माणूस जन्माला आला आणि दुसऱ्याशीं बोलण्याची कला त्याला प्राप्त झाली तेव्हांपासूनच कथेचा जन्म झाला व गोष्टीवेल्हाळ म्हणून माणसाची जगाला ओळख झाली. एवढेंच नाहीं तर सांगणाराची कुवत आणि ऐकणाराची संस्कृति या दोन मुख्य बाबींबर कथेचें संगोपन होत गेलें. तिची उभारणी झाली ती सामाजिक जीवनांतील सुखदुःखावर, त्यामुळें उंचंबळून येणाऱ्या भावनांवर आणि त्या संबंधित झालेल्या चिंतनावर. त्या कारणानें कधीं ती आकारानें प्रदीर्घ होई तर कधीं आटोपशीर होई. आजकालचें लघुकथेचें वाङ्मयीन प्रकाराचें तंत्र त्यावेळीं तिला ठाऊक नव्हतें. परंतु त्याकाळचें तिचें स्वरूप या नवीन तंत्राच्या दृष्टीनें अगदीं अस्सल असल्याचें दिसून येतें. या संदर्भात इसापनीति, पंचतंत्र, हितोपदेश यांमधील कथा अवश्य पडताळून पहाण्यासारख्या आहेत.

मराठींतील कथेचा प्रारंभ संस्कृत मधील हितोपदेशांत आलेल्या कथांमधून आढळतो. आख्यायिका, लोककथा, सुरस गोष्टी, नवलकथा, चातुर्याच्या गोष्टी वगैरे सर्व प्रकार याच वाङ्मयप्रकारांत मोडतात. मानवाच्या कल्पनेला, भावनेला, रचनेला आणि विचाराच्या मोडणीला जें जें म्हणून गम्य होईल तें तें सगळें या कथेच्या कक्षेंत येतें. त्यामुळेंच कथा सुंदरीनें होमर व्हर्जिलसारख्यांच्या इलियड–ओडिसीमधून अगर व्यास–वाल्मिकींच्या महाभारत रामायणांतून आपलें पद्य स्वरूप; बायबलाच्या जुन्या नव्या करारांतून गद्य स्वरूप; पंचतंत्र, हितोपदेश, इसापनीति वगैरेंतून बोधस्वरूप; ठकसेन राजपुत्राच्या व बिरबल आणि बादशहाच्या गोष्टींतुन चतुरस्वरूप; लावण्या--पोवाडे, क्रॉनिकल्स, बॅलेड्स वगैरेंतून आपलें रंगेल मर्दानी स्वरूप वेळोवेळीं निरनिराळ्या समाजस्थितीला हरतऱ्हेनें आतांपर्यंत पटवून दिलेलें आढळून येतें.

अगदीं सुरवातीच्या कथा देवादिकांच्या व उच्च कोटींतील लोकांच्या पराक्रमावर उभारलेल्या असत. या कथांमधून प्रामुख्यानें बोधवादाचा किंवा

* मराठी काव्याची प्रभात.

तात्पर्याचा पुरस्कार केला जात असे. त्याचप्रमाणें या कथेचा आणखी एक विशेष म्हणजे तिचें कथानक अद्‌भुतरम्य घटनांनीं घडविण्यांत येत असे.

इंग्रजी राजवट सुरू झाल्यानंतर मात्र लघुकथेच्या आंतर्बाह्य स्वरूपांत बदल होत गेला. तिला एक प्रकारचें कलात्मक स्वरूप प्राप्त होऊं लागलें आणि ती पुष्कळशी आटोपशीर होत चालली. तरीपण पंचतंत्र किंवा इसापनीतीमधील कथा कांहीं या नव्या स्वरूपाला हार गेल्या नाहींत. उलट एच्. ई. बेट्स या सुप्रसिद्ध इंग्रज कथालेखकानें तर मोपाँसा, चेकॉव्ह, गॉर्की व जॉइस यांच्या उत्कृष्ट गोष्टींच्या जोडीनें बायबलमधील गोष्टी व अँडरसनच्या परीकथांचा विचार केला आहे !

आजकालच्या लघुकथेचें प्राचीनकाळच्या लघुकथेशीं असें साम्य आढळत असलें तरी बदलत्या कालमानानुसार तिचें अंतरंग व बहिरंगहि पार बदलून गेलें आहे. इंग्रजांच्या राज्याबरोबरच शिक्षण, साहित्य, राजकारण, समाजकारण व मानवी जीवन याकडे पहाण्याचा दृष्टिकोनच बदलला. अद्‌भुतरम्यता जाऊन वस्तु-स्थिति अधिक मानली जाऊं लागली. बहिरंगापेक्षां अंतरंग वर्णन करण्याकडेच मानवी मनाचा कल झुकूं लागला. म्हणजे थोडक्यांत बोलावयाचें तर मराठी मनाचा मोहरा हा पारमार्थिकाकडून ऐहिकाकडे वळत गेला. जीवनमूल्येंच त्यामुळें वेगळीं झालीं व त्याचा परिणाम स्वाभाविकच साहित्यावर होत गेला. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत व विशेषतः अखेरीच्या पंचवीस एक वर्षांत निबंध, नाटक, कादंबरी, कविता आणि कथा या सर्वांनीं अगदींच नवीन स्वरूपें धारण केलीं. परभाषेंतील वाङ्मयाचें मराठींत भाषांतर झालें व त्याप्रमाणें नव-निर्मितिहि होऊं लागली.

तरीपण इ. स. १९२० पावेतों एक कलात्मक वाङ्मयप्रकार म्हणून मराठींतील लघुकथेचा विचार झाला नाहीं. मात्र हरिभाऊ आपट्यांच्या कथांनीं आपली लोकप्रियता एव्हांना निश्चितपणेंच मिळवून ठेवली होती. त्यामुळें १९२० नंतर कथेचा विकास व्हायला ही गोष्ट विशेष उपयोगी पडली. टागोर, ओ. हेन्री, मोपाँसा, चेकॉव्ह इत्यादींचा आदर्श नजरेपुढें ठेवून दिवाकर कृष्ण, फडके, खांडेकर, दौंडकर, मांजरेकर वगैरे लेखकांनीं आपल्या कथा लिहिल्या.

लघुकथेच्या विकासाला या पुरुष लेखकांच्या प्रमाणेंच स्त्रियांनींहि आपला घवघवीत हातभार लावलेला आहे. १९३२ नंतर लघुकथेला एक नवी पिढी मिळाली असें म्हणतात. त्या दृष्टीनेंहि स्त्रियांनीं लिहिलेली कथा लक्षांत घेण्याजोगी आहे. या नव्या कथेची ओळख "प्रतिभा-साधनांत" प्रा. ना. सी. फडके यांनीं "शक्य तितक्या परिणामकारक रीतीनें आणि शक्य तितक्या कमी पात्र प्रसंगांच्या

सहाय्यानें सांगितलेली एकच एक गोष्ट म्हणजे लघुकथा " † या कल्पनेमधून केली व त्याप्रमाणें स्वतः तिची निर्मितीहि केली.

परंतु लघुकथेची ही कल्पना तिच्यामधून होणाऱ्या एकाच प्रमुख संस्काराच्या परिणामाच्या दृष्टीनें, वातावरण किंवा पात्रें यांचें बंधन घालून भागण्यासारखी अनेकांना वाटली नाहीं. कारण त्यांच्या मतें अशा बंधनांना जखडून घेऊन लेखक लिहायला बसत नसून उलट तंत्रच त्याच्या मागून धांवतें ! तरी परंतु या मतभेदांतून एक गोष्ट निश्चितपणें साध्य झाली ती अशी कीं, कलेच्या दृष्टीनें लघुकथा ही पूर्वीपेक्षां अधिक आकर्षक होत गेली. विशेषतः १९४० च्या आसपास या गोष्टीचा अधिक उलगडा होत गेला. ही दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभींची वेळ होती. ज्या मध्यमवर्गांतून आपले बहुतेक लेखक निर्माण होत आले होते, त्याच्या अंशतः सुस्थिर अशा जीवनमंदिराला या काळानंतर एकामागून एक असे नवे सुरुंग लागूं लागले. गेल्या आठनऊ वर्षांत या वर्गाचें जीवन किती उध्वस्त झालें आहे, त्यानें पिढ्यान् पिढ्या उराशीं कवटाळून धरलेल्या जीवनमूल्यांचें वास्तव स्वरूप त्याला कसें प्रतीत होऊं लागलें आहे, हें कांहीं कुणाला सांगायला नको ! या नव्या जाणिवेचा परिणाम गेल्या सात आठ वर्षांतील वाङ्मयांतल्या काव्य व कथा या दोन क्षेत्रांत अधिक स्पष्टपणें दिसून येत आहे.*

लघुकथेच्या या जडणघडणीचें अलिकडचें हें स्वरूप या परीनें कसकसें क्रमशः विकसित होत गेलें त्याचा आतां स्त्रियांच्या कथेच्या दृष्टीनें येथें विचार करावयाचा आहे. या कालखंडांतील कथा ही अधिक कलात्मक, आटोपशीर, जिव्हाळ्याची, वास्तव, संयमी, भावनापूर्ण अंतःकरणाची व नव्या पिढीचे विचार सांगणारी अशी झालेली आहे आणि तिनें आपली पार्श्वभूमि ही राजापासून रंकापर्यंतच्या वातावरणांतून उभारलेली आहे. त्यासाठीं दिवाकरकृष्ण, फडके, खांडेकर, चोरघडे, दौंडकर, मांजरेकर, लक्ष्मणराव सरदेसाई, य. गो. जोशी, काणेकर, माटे, ठोकळ, व्हटकर, दि. द. पाटील, दिघे इत्यादींनीं आपली शक्ति वेचलेली आहे. तेव्हां या संदर्भात स्त्रियांच्या कथेचा विचार करतांना जो प्रारंभ आढळून येतो तो सौ. आनंदीबाई शिर्के यांच्या कथेपासून होय.

• • •

---

† " The aim of a short story is to produce a single narrative effect with the greatest economy of means that is consistent with the utmost emphasis. " (The Art of Fiction p. 177.)

क्लेटन हॅमिल्टन

* वि. स. खांडेकर. पांच कथाकार. प्रस्तावना. पा. ३७

श्री. आनंदीबाई शिर्के

१९२० नंतरच्या काळांत स्त्रीशिक्षणांत बरीच प्रगति होत चालली. स्त्रियांचें वाचन वाढतें राहिलें. समाजांतील कामकाजांत त्या लक्ष घालूं लागल्या. स्वतः कांहीं काम करण्याची त्यांना इच्छा झाली. सामाजिक जीवनाचा अभ्यास त्यांनीं सुरू केला. त्यांची विचारशक्ति विकसित होत चालली. स्वतःची भावना प्रामाणिकपणें बोलून दाखविण्याचें धारिष्ट्य त्यांनीं बाळगलें. त्यामुळें स्वाभाविकच त्यांच्या लेखनाला वेगळें वळण मिळत गेलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, संसार चित्रांचे बरोबरच इतर कांहीं वेगळ्या कल्पनांचाहि त्या वापर करूं लागल्या. जुन्या रूढींतील बेंगरूळपणा किंवा मागासलेपणा बाजूला सारून नवीन विचार सामाजिक जीवनांत पेरण्याला त्यांनीं सुरवात केली.

सौ. आनंदीबाई शिर्के यांनीं या पार्श्वभूमीवर आपल्या लेखनाला प्रारंभ केला. आपल्या अनुभवांच्या जोडीला त्यांनीं कालमानाप्रमाणें नवीन विचारांचा स्वीकार केला. वास्तविक त्या तशा जुन्या पिढींतल्याच लेखिका. परंतु त्यांनीं आपलें लेखन मात्र काळ बदलेल त्याप्रमाणें निर्माण होणाऱ्या विविध प्रसंगांवर आधारित असें ठेविलें. त्या कारणानें जुन्या काळचें "शारदाबाईंचें संसारचित्र" त्यांनीं जेवढ्या जिव्हाळ्यानें रेखाटलें, तेवढाच जिव्हाळा अगदीं अलिकडच्या त्यांच्या "कुछ नहीं समझते!" मध्येंहि आलेला आहे.

"कथाकुंज", "कुंजविकास" (१९३३) "भावनांचे खेळ" "जुईच्या कळ्या" (१९३९) आणि "तृणपुष्पें" (१९५८) हे आनंदीबाईंचे चार कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. या सर्व कथांचें वातावरण प्रौढ आहे. लहान मुलाची धांदल अथवा गडबडीची किंवा थिल्लरपणाची वृत्ति त्यांत नाहीं. सारें कांहीं सहज-सुलभ आणि शांत आहे. नुसत्या कलाविलासापेक्षां कला आणि जीवन यांच्या सीमारेषा त्यांनीं मोठ्या कुशलतेनें आपल्या कथेंत मिसळलेल्या अशा दाखविल्या आहेत. विशेषतः स्त्रीहृदयांतील खऱ्याखुऱ्या भावनांचे पडसाद सहृदयतेनें उमटविण्यांत त्या बऱ्याच वाकबगार झाल्या आहेत. त्यांच्या लेखणींतून उतरणारी भाषा साधी, सोपी आणि सहजसुलभ आहे. त्यांच्या कथेबद्दल लिहितांना "कथा-कुंजा"च्या प्रस्तावनेंत श्री. कोल्हटकर यांनीं म्हटलें आहे कीं—

"त्यांच्या लेखनांतील सूक्ष्म अवलोकन, कथानकांची चमत्कृतिपूर्ण व रहस्यमय घडण, उत्तरोत्तर रसोत्कर्ष होत जाण्यास अनुकूल अशी कथाभागांची गुंफण, कथानकाचा व स्वभावांचा विकास पायऱ्या पायऱ्यांनीं झालेला दाखविण्याची कुशल हातोटी, क्षुल्लक दिसणारे पण हृदयस्पर्शी प्रसंग, कथानुरोधानें गोंविलेला बोध, भाषेचा सरळपणा व गांभीर्य इत्यादि गुणांमुळें या कथा चित्ताकर्षक व

वाचनीय झाल्या आहेत. इतर कथालेखिकांच्या कथांत जें पवित्र व निरागस वातावरण दिसून येतें, तें याहि कथांत दिसून येईल... "

जुन्या वळणाच्या आणि परभाषेशीं फारसा संबंध न येणाऱ्या स्त्रीची मराठी भाषा अधिक चांगली असते, असें कै. वा. म. जोशी यांनीं अनेकदां बोलून दाखविलें होतें. सौ. शिर्के यांची ही मराठी भाषा या कसोटीस चांगली उतरेल असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांच्या " शारदाबाईचें संसारचित्र " या कथेमधील पुढील भाग या दृष्टीनें पहाण्यासारखा आहे:—

"....मावशी म्हणाल्या, 'सकाळीं हपिसांत उपाशींच जायचं झालं. सरूला चुलीवर चहासुद्धां करतां येईना. मग " टो " वर (स्टोव्हवर) करून दिला." मीं म्हटलं, " डब्यांतून फराळाचं तरी काढून खायचं " पण नाहीं. तिकडे गोडाचा अगदीं कंटाळा. म्हणून म्हटलं, पिठलंभात तरी कर. येऊन दोन घास खातील तरी. पण तेवढंसुद्धां तिला धड करवेना. लहान का ती ? सासरीं सासू, नाहीं तरी कोणी तरी वडील मनुष्य असल्याशिवाय मुलींना वळण लागत नाहीं म्हणतात तेंच खरें !' एवढें बोलून मावशी दिवाणखान्यांत जाऊन बसल्या..."

सौ. शिर्के यांच्या कथांमधून जुन्या काळच्या कथेप्रमाणें सदुपदेशहि आलेला आहे. " टी पार्टी " या कथेंत त्यांनीं स्त्रियांचा अत्यंत आवडीचा असा जो हळद कुंकवाचा समारंभ, तो स्नेहवर्धनाच्या दृष्टीनें कसा उपयोगी आहे हें दर्शविलें आहे. " बांगड्यावर बहिष्कार " या कथेंत कासारणीकडूनच बांगड्या भरवून घ्याव्यात, कासाराकडून त्या भरवून घेण्यांत स्त्रीच्या चारित्र्यास धोका असल्याचें दर्शविलें आहे. मात्र हा धोका दर्शवीत असतांना एखाद्या पापी मुसलमानानें जबरदस्तीनें कांहीं अतिप्रसंग आणल्यास आपण भ्रष्ट झालों, या समजुतीनें हिंदु स्त्रीनें आत्महत्या करूं नये, ही कल्पना येथें अस्पष्टरीत्या मांडली आहे. तिचा व्हावा तसा उत्कट आविष्कार न झाल्यानें मात्र येथें थोडें खटकल्यासारखें होतें. शिर्केबाईंची " वटसावित्री "ची कल्पना मात्र अपूर्व आहे असें म्हणावें लागेल. आजवरच्या या विषयावरील कथांमधून हाच पति जन्मोजन्मीं लाभावा हें रूढीनें चालत आलेलें तत्त्व गोविलें गेलें होतें.

" पत्नीनें आपला पति आजारी असतां वटसावित्रीची पूजा करण्यांत किंवा वटसावित्रीविषयीचें व्याख्यान ऐकण्यांत वेळ न घालवितां त्याची सेवा केली, तर ती त्याला यमाच्या पाशांतून सोडवून आणूं शकेल, " हें तत्त्व या गोष्टींत रस परिपोषक प्रसंगाच्या व मार्मिक विधानांच्या कोंदणांत बसवून मधुरतेनें सादर केलें आहे.

" सुशीलेचा विचार " या कथेंत नवऱ्यानें टाकलेल्या बाईच्या दुःखाचे पडसाद लेखिकेनें उमटविलेले आहेत. नवऱ्यानें दुसरी बायको केली व आपणाला सोडून दिलें या कल्पनेचें दुःख होण्यापेक्षां, आपलीं मुलें आपणाकडे कोणत्या

दृष्टीनें पहातील, याचेंच या स्त्रीला येथें कल्पनातीत दुःख होत आहे. त्या स्त्रीचे हेच विचार लेखिकेनें या कथेंत व्यक्त केले आहेत.

वत्सल रस रंगवितांना शिर्केबाईंची लेखणी विशेष प्रभावी ठरते असें म्हणावें लागेल. ग्रामीण जीवनाचें दर्शन घडविणारी त्यांची " छोटा जगू " ही कथा या दृष्टीनें अत्यंत सुंदर झालेली आहे. आजी आणि तिचा पोरका नातू यांच्यामधील परस्परांवरील प्रेम अत्यंत उत्कटतेनें येथें चित्रित झालेलें आहे. त्यामुळें स्त्रीच्या स्वभावाचें वास्तव दर्शन येथें घडल्याविना रहात नाहीं. विशेषतः " आई ग, तूं मला फसवतेस ! तूं नाहीं जा माझी आई. दगू म्हणतो तूं आजी आहेस. अन् दगूची आईपण तसंच म्हणते. मग दगूच्या आईसारखी कुंकू लावणारी माझी आई अन् बाबा कुठं आहेत ? सांग ना ! " असें हट्टाला पेटून रडत रडत विचारणारा जगू आणि " सगळ्यांना निर्दाळून बसला... " " दळभद्री मेला " असें एकसारखें त्याला म्हणणारी त्याची आजी त्याचे हे प्रश्न ऐकतांच किती भांबावून जाते, तिच्या हृदयाच्या कशा चिंधड्या उडतात, या संबंधींचें हें हृदयस्पर्शी लिखाण अत्यंत परिणामकारक झालेलें आहे.

"स्त्री " या कथेंत मातृहृदयाची फार सुंदर कल्पना लेखिकेनें मांडलेली आहे. या कथेचें स्वरूप स्वप्नमय आहे. त्यामुळें स्त्री जीवनांतील विविध दृश्यांचें दर्शन येथें घडतें.

" बेगम दिल आरा " सारख्या विस्मयकारक प्रीतिकथाहि आनंदीबाईंनीं अतिशय जिव्हाळ्यानें लिहिलेल्या आहेत. त्यांची कथा म्हणजे नव्या आणि जुन्या संसाराचें दिग्दर्शन उत्तम रीतीनें घडविणारा एक हृदयंगम दुवाच आहे.

● ● ●

कृष्णाबाई

स्त्रीशिक्षणाची वाढ झपाट्यानें होत गेली तशा अनेक स्त्रिया पदवीधर होऊं लागल्या. परकीय भाषेंतील वाङ्मय त्यांनीं आपल्या ओळखीचें करून घेण्यास सुरवात केली. विशेषतः इंग्रजी भाषेंतील कथा–कादंबऱ्यांचा अभ्यास झाल्यामुळें त्या पद्धतीचें लेखन करण्यास त्यांनीं सुरवात केली. त्यामुळें आपल्याकडील कथेला आपोआपच इंग्रजींमधील कथेचें वळण मिळत गेलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, सुचत गेलें तसें किंवा घडत गेलें तसें न लिहितां, एखाद्या विशिष्ट तंत्राच्या दृष्टीनेंच पण चित्ताकर्षक कथालेखनाचें नवें युग आपल्याकडे सुरू झालें.

" कृष्णाबाई " या पदवीधर लेखिकेनें या नव्या धाटणीचें कथालेखन आपल्या " मानसलहरी " या कथासंग्रहांत सुरू केलें. १९३३ सालीं हा कथा-

संग्रह प्रसिद्ध झाला आहे. येथें त्यावेळच्या काळानुसार लेखिकेनें समाजांत दिसून येणारें स्त्रीजीवन चित्रित केलेलें दिसून येतें.

भरीव कथानकाची निवड हा "कृष्णाबाईंचा" प्रमुख विशेष होय. त्याचप्रमाणें मानसशास्त्राचा आधार घेऊन त्यांनीं आपल्या कथेमधील पात्रांचें स्वभावचित्रणहि केलेलें दिसून येईल.

"आमचे दास" या कथेंत लेखिकेनें समानहक्कानें जगूं पहाणाऱ्या एका स्त्रीची कहाणी सांगितलेली आहे. आपल्या प्राध्यापक पतीचें घर सोडून त्याच्या इच्छेविरुद्ध पदवीधर होण्याच्या ईर्षेनें ही स्त्री माहेरीं जाते. तिचे वडील सुधारणावादी असल्यामुळें ती माहेरीं राहून पदवीधरहि होते. पण त्या आनंदानें हुरळून जाण्याऐवजीं ती म्हणते "...चार वर्षे आनंदांत काढलीं. पण काय असेल तें असो, अलीकडे माझ्या मनाला कसली तरी टोंचणी लागली होती. ज्या स्वातंत्र्याच्या व बुद्धिमत्तेच्या अभिमानावर मी बी. ए. झालें, त्याचा आनंद मला दिवसेंदिवस सोडून जाऊं लागला होता. बाबांच्या, स्त्री स्वातंत्र्याच्या भोक्त्यांच्या, दृष्टीनें मी पतीच्या दास्याला न जुमानतां ज्ञानार्जन केलेली बाणेदार स्त्री होतें. पण घराच्या मर्यादा सोडून जगाच्या आखाड्यांत पाऊल घातल्यापासूनच माझा दुबळेपणा मला जास्त जाणवत चालला होता..."

एका सुशिक्षित स्त्रीच्या मनांतील हें आंदोलन लेखिकेनें मोठ्या कौशल्यानें येथें नमूद केलेलें आहे. मात्र ह्या घटनेबरोबरच एका रांगत्या मुलाला बघून संसाराकडे धांव घेण्याची व पायाची दासी होण्याची त्याच स्त्रीची मनोवृत्ति जी येथें दाखविली आहे ती तितकीशी स्वाभाविक दिसत नाहीं. कारण हेंच दृश्य तिनें गेल्या चार वर्षांच्या कालांत अनेकदां पहाणें शक्य होतें. मग असें असतांना शिक्षणक्रम पुरा झाल्यावरच तिच्या या भावना एकाएकीं एवढ्या प्रकर्षानें कशा उचंबळून येतात हें कळत नाहीं. समान हक्काच्या जोडीलाच स्त्रीची गृहिणीपदाची जाणीवहि लेखिकेनें एकत्र दाखविल्यामुळें, तशी अस्वाभाविकता आली असावी असें दिसतें.

"वर्षाव" ह्या कथेंत लेखिकेनें सुशिक्षित स्त्रीच्या जीवनाची आणखी एक वेगळी बाजू रंगविली आहे. येथें आपल्या अध्ययनांतच गढून गेलेली गणित विषयाची एक प्राध्यापिका स्वतःच्या लग्नाबद्दल बेफिकीर असलेली अशी लेखिकेनें दाखविली आहे. पण ह्याच प्राध्यापिकेला जेव्हां तिच्याच कॉलेजमधील भाषाविषयाचा प्राध्यापक आपल्या बाहुपाशांत ओढतो, तेव्हां ती त्यास अजिबात प्रतिकार न करतांना दाखविलेली आहे! उलट तिची प्रतिकार शक्ति अजिबात नाहींशी झाल्याचें सांगितलें आहे. या प्रसंगामुळें जीवनाचा खरा अर्थ तिला समजतो आणि बाहेरच्या सृष्टींत पावसाच्या वर्षावामुळें येणारा गारवा तिच्या जीवनांतहि निर्माण होतो, असा या कथेचा शेवट आहे.

" अनिरुद्ध प्रवाह " हा याच लेखिकेचा दुसरा कथासंग्रह पहिल्या कथा-संग्रहाच्या मानानें बराच श्रेष्ठ ठरेल. या पुस्तकांत स्त्रीच्या अंतःकरणामधून होणारा वैशिष्ट्यपूर्ण भावनाविष्कार पुष्कळसा आढळतो. या पूर्वीच्या संग्रहांत लेखिकेचें हें वैशिष्ट्य ठळकपणें आढळत नाहीं. मनांत आलेली भावना निःसंकोच-पणें येथें " संरक्षक " या कथेंत प्रकट झालेली दिसून येते. या ठिकाणीं एका अविवाहित पण एकाकी जीवन घालविणाऱ्या स्त्रीचें स्वभावचित्रण लेखिकेनें फार सुंदर रीतीनें केलेलें आहे.

" पावित्र्य विडंबन " या कथेंत विवाहाचे वेळीं भटजींकडून म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांच्या श्रवणानें पावित्र्य निर्माण होतें, ही परंपरेनें रूढ झालेली पावित्र्याची कल्पना लेखिकेनें झुगारून दिली आहे. आपली ही कल्पना मांडतांना या कथेची नायिका म्हणते, " ही निष्ठा माझी नाहीं, माझ्यावर ती लादली आहे, संस्कारांनीं लादली आहे ! ज्या संस्कारांत मी वाढलें, त्या संस्कारांनीं सत्याच्या समोर छातीठोकपणानं उभं राहायला मला शिकवलंच नाहीं; डोळ्यावर कातडं ओढून स्वतःची फसवणूक करायला शिकवलं...लग्नाच्या वेळीं मला वाटलं आपण त्यागाचं समाधान तरी मिळवूं...कुठला त्याग ! प्रतिकाराचं सामर्थ्य नसलेल्या दुबळ्या जीवांनीं निर्माण केलेले शब्दांचे कोटकिल्ले ! पण त्यांत माझी तरी काय चूक ?... "

स्त्रीच्या अंतःकरणांतील एखादी विशिष्ट भावना कृष्णाबाईंनीं अशा रीतीनें अतिशय सहृदयतेनें मांडलेली आहे. त्यामुळें या कथांमधील भाषाहि चटकदार झालेली आहे.

● ● ●

विभावरी शिरूरकर

१९३४च्या ऑक्टोबरांत "कळ्यांचे निःश्वास" हें पुस्तक प्रकाशित झालें; आणि एखादी अवर्णनीय अशी अद्‌भुतरम्य गोष्ट घडून तिजविषयीं कुतूहल निर्माण व्हावें, त्याप्रमाणें मराठीच्या साहित्यभक्तांत या पुस्तकाबद्दल कुतूहल निर्माण झालें. " विभावरी शिरूरकर " ह्या लेखिकेच्या टोपण नांवानेंच समाजाला पहिला धक्का दिला ! आणि या पुस्तकांतील सडेतोड आणि निर्भय विचारसरणीनें समाजाला दुसरा धक्का दिला ! कारण आजवर स्त्रीनें जें जें लिहिलें होतें, तें तें आजवरच्या संस्कारांनीं मनाभोंवतीं निर्माण केलेल्या बंधनांना झुगारून न देतां लिहिलें होतें. चारचौघांत बोललें तर स्त्रीस्वभावाला सहज शोभून दिसेल अशाच कल्पना स्त्रियांनीं आपल्या लेखनांतून रंगविल्या होत्या; त्यामुळें स्त्रीच्या भावनांची व्हावी तशी उकल या कल्पनांमधून झालेली नव्हती ! आणि पुरुषवर्गानें स्त्रीचें

जें चित्र रंगविलें होतें, तें परकाया प्रवेश करून लिहिलेलें असल्यामुळें, यावी तशी स्वाभाविकता त्याहि भावनांना आलेली नव्हतीच ! त्यामुळें विभावरीचें पुस्तक वाचून होतांक्षणींच वाचणाराच्या मनाला जबरदस्त धक्का बसला ! सारें कांहीं जगावेगळें घडत आहे, अशीच जणुं सर्वांची समजूत झाली. आणि मराठी साहित्याच्या प्रांतांत एक प्रकारची जबरदस्त अशी खळबळच उडून गेली.

अनुभूतीचा स्पर्श झाल्याशिवाय चित्तवृत्ति उत्कटत्वानें थरारून सोडणारें ललितवाङ्मय कधींहि पैदा होत नाहीं. त्या दृष्टीनेंहि प्रौढ कुमारिकेला परिस्थितीनुसार सोसाव्या लागणाऱ्या अनेक प्रकारच्या यातना " कळ्यांच्या निःश्वासांनीं " प्रतिध्वनित केल्यामुळें या पुस्तकाची किंमत मोठी आहे. ललित साहित्याला लागणारा गाभा येथें अतिशय उत्कृष्ट रीतीनें वापरलेला दिसून येईल आणि हेंच या पुस्तकाचें खरें वैशिष्ट्य.

" विभावरी शिरूरकर " हें नांव एखाद्या स्त्रीचेंच आहे कीं, या नांवामागें बुरखा घेतलेला कुणी पुरुष आहे, अशी दाट शंका या पुस्तकाबद्दल कित्येकांनीं व्यक्त केली होती. इतक्या मोकळ्या मनानें एखादी बाई लिहिणेंच शक्य नाहीं अशी या लोकांची समजूत ! पण अगदीं अलिकडे हा भ्रमाचा भोपळा फुटला आणि विभावरी शिरूरकर म्हणजेच सौ. मालती बेडेकर (बाळूताई खरे) असें खुद्द लेखिकेनेंच जाहीर केलें ! ! अर्थात् त्यामुळें एका स्त्रीची कलाकृति म्हणून या पुस्तकाकडे पहावयाचा मार्ग आपोआपच खुला झाला.

विभावरींच्या या पुस्तकांबद्दल अनेकांनीं आपापलीं मतें त्यावेळीं प्रकट केलेलीं आहेत. त्यांच्या या कथांची घडण उकलून दाखवितांना साहित्यसम्राट कै. तात्यासाहेब केळकर म्हणतात, " चिनी कंदिलाप्रमाणें या लेखिकेनें मनाच्या अनेक घड्या आपल्या नाजूक लेखणीनें उकलून त्यांतील भावना स्पष्टपणें दाखविलेल्या आहेत. "*

१९३४ सालीं मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांत भाषण करतेवेळीं श्री. मामासाहेब वरेरकर यांनीं या पुस्तकासंबंधीं म्हटलें आहे कीं, " स्त्रियांच्या मनोभावना ह्या पुस्तकांत आहेत. त्या भावना पुरुषांस सांगतां येणार नाहींत. महाराष्ट्रांतील बड्या बड्या लेखकांस आजपर्यंत रेखाटतां आले नाहींत, असे अनेक विषय या पुस्तकांत आलेले आहेत.

या पुस्तकास लिहिलेल्या प्रस्तावांत डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीं म्हटलें आहे कीं—

" स्त्री आणि पुरुष यांच्यामध्यें जो जातितः भेद आहे, त्यामुळें पुरुषांना स्त्रियांचें मन केवळ आपल्या मनावरून तर्क काढीत गेल्यानें समजणार नाहीं.

---

* विभावरीचे टीकाकार.

स्त्रियांचें मन समजावून देण्यास स्त्रियाच पाहिजेत...प्रस्तुत संग्रहांत आलेली लेखिकेची प्रत्येक गोष्ट स्त्रीस्वभाव परिचयाच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे."

या सर्व अभिप्रायांवरून एकच प्रमुख गोष्ट नजरेसमोर येते आणि ती म्हणजे या पुस्तकांत स्त्रीहृदयाचा अत्यंत वास्तव असा आविष्कार झालेला आहे ही होय. त्या दृष्टीनेंच या कथांचें मोल मापावयास हवें.

"कळ्यांचे निःश्वास" या कथेंत लेकिकेनें आपल्या या लेखनाची पार्श्व-भूमि रंगविलेली आहे. आपल्या भावनाशील हृदयाचें चित्रण करतांना लेखिका म्हणते—

"सुकलेल्या कळ्या ! त्यांना पाण्यांत थिजत घालून मी मोठ्या आशेनें त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागलें. माझा नित्याचा हा क्रम असे. सहानुभूतीचा सुखमय स्पर्श झाला म्हणजे अंग थरारतें. त्याप्रमाणें शीतल जीवनानें होरपळलेल्या त्या कळ्यांना किंचित् टवटवी येत असे. त्यांचीं कोमेजलेलीं तोंडें पाहून मला अगदीं गहिंवर येई. नेत्रांतील अश्रू कळ्यांना भिजवून पाण्यांत मिसळून जात...

....दुःखानें वेधून ज्यांना मुक्याच बनवल्या, अशा कळ्या कुठल्या दिवसभर बोलणार ? त्यांचीं दुःखें त्यांच्या चेहेऱ्यावर मुद्रित झालेलीं असतात. त्यांच्याकडे पाहून माझ्या पोटांत कालवाकालव होते. वाटतं, मुक्या दुःखानें या कळ्या कायमच्या करपतील.' त्यांनीं एक तरी अश्रू गाळावा, एक तरी शब्द बोलावा.

...पण हें पहा ! मी पाण्यांत टाकलेल्या या कळ्या निःश्वास टाकूं लागल्या ! तुम्हांला नाहीं एकायला येत ? अगबाई, त्या बोलायला पण लागल्या !!"

तरुण स्त्रीच्या आशा आकांक्षांचा झालेला भंग येथें प्रत्येक कथेंत लेखिकेनें सहृदयतेनें व्यक्त केलेला आहे.

"बाबांचा संसार माझा कसा होणार ?" ही कथा वस्तुस्थितीचें एक उत्कट चित्र आहे. प्रत्येक स्त्रीला स्वतःचा संसार प्रिय असतो. पण लग्नापूर्वी जेव्हां ती माहेरीं असते तेव्हां तिला आपल्या वडिलांचा संसार हा आपला वाटत नाहीं. पण तिला तसें वाटावें असें तिच्या आई वडिलांना वाटत असतें ! ही कल्पना आणि त्यामुळें दोन पिढ्यांच्या मनोवृत्तींत चालणारा संघर्ष दाखवितांना लेखिका म्हणते, "हे त्यांना कळत नाहीं म्हणूनच मला कधीं कधीं वाटतं कीं, आईबापाचें प्रेमहि व्यापारी प्रेम असतं. मुलांकडून मोबदला न मिळाला तर तें प्रेमाचें नाणेंहि खणखणीत वाजत नाहीं. मग त्याला हवं तर व्यवहार म्हणा; पण त्या मोबदल्या-करितां मन थोडेंतर विकृत होईलच होईल. माझ्या भवितव्याचा विचार करूं लागलें कीं, बाबा मला स्वार्थी म्हणतात, पण त्यांच्या संसाराकरितां कां होईना, माझ्या भावना झुगारून देणारे बाबासुद्धां त्याच दोषांचे मालक होत नाहींत काय ?"

अशा प्रकारें या कथेंत दारिद्र्यामुळें मिळवत्या मुलीच्या विवाहाच्या आड तिचा बापच कसा येतो व त्यामुळें तिच्या अंतःकरणाची कशी लाही लाही होत जाते, याचें दारुण चित्र लेखिकेनें अतिशय सहृदयतेनें रेखाटलें आहे.

" अंतःकरणाचे रत्नदीप " या कथेंत एका कुरूप मुलीच्या द्वारें आंतर-जातीय विवाहाचा प्रश्न सांगोपांगरीत्या सोडविण्याचा लेखिकेनें प्रयत्न केला आहे. ही मुलगी स्वतःच्या भावना प्रकट करतांना म्हणते,

" नसेल माझ्या ठिकाणीं रूप, पण अंतःकरणाचा पवित्र दीप तर आहे ना ? माझ्या नेत्राच्या पुष्करणींत अंतःकरणाचें कांहींच आकर्षक प्रतिबिंब पडणार नाहीं का ? तें पाहून ज्याचें अंतःश्चक्षू माझ्याकडे येतील, त्यालाच मी पत्करीन. माझ्या अंतःकरणाच्या दीपाच्या उजेडांत, ज्यालां आपल्या आयुष्याचा मार्ग स्वच्छ व स्पष्ट दिसेल त्यानेंच मला पत्करावें. ज्याच्या अंतःकरणाचे नेत्र मला खेंचतील, त्यालाच मी ' माझा ' म्हणेन. "

विभावरीबाईंनीं तरुण स्त्रीच्या मनाचे असे कितीतरी धागे हळुवार मनानें उकलून दाखविलेले आहेत. त्यांच्या कथा मनोविश्लेषणाच्या दृष्टीनें फारच उत्तम झालेल्या आहेत. या कथांची भाषा चटकदार असून विषय प्रतिपादनांतहि नाविन्य आहे. सोप्या आणि सुटसुटीत शब्दरचनेमुळें भाषेला येणारें मार्दव येथें अनेकदां आढळतें.

उपमादृष्टांतांचा लेखिकेनें जो वापर केलेला आहे तो देखील तिचें वैशिष्ट्य ठळकपणें नजरेंत भरविणारा आहे. उदाहरणार्थ—" न कळत धक्का लागून रुईचें बोंड फुटावें व आंतील कापूस भरभर उकलून बाहेर यावा, तशी त्यांच्या या प्रश्नानें माझ्या मनाची अवस्था झाली. "

विभावरीचें हें वाङ्मय म्हणजे स्त्रीच्या बंडखोर मनानें जगाला निर्भयपणें केलेलें एक अभिनव आव्हानच होय.

सौ. कमलाबाई टिळक

उच्च प्रकारचें महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर परभाषेंतील वाङ्मयाचा अभ्यास माणसाच्या हातून स्वाभाविकपणेंच घडतो. शिवाय या अभ्यासामुळें परक्या संस्कृतीची व परदेशांतील लेखन पद्धतीचीहि त्यांस ओळख होते. त्यामुळें अशा माणसाच्या लेखनावरहि कळत वा नकळत त्याचा बरावाईट परिणाम होतो. आपलें लेखन शक्यतोंवर रेखीव करण्यासाठीं त्याची धडपड चालू रहाते. सौ. कमलाबाई टिळक या लेखिका याच प्रकारच्या माणसांत मोडतात.

रचनेचा रेखीवपणा हा आधुनिक लघुकथेचा एक प्रमुख विशेष मानला जातो. त्या कारणानें सुप्रसिद्ध आंग्ल लेखक श्री. गॅल्सवर्दी यांनीं आधुनिक लघुकथेला एखाद्या कोळ्यानें विणलेल्या नाजूक पण आकर्षक जाळ्याची मोठी सार्थ उपमा दिली आहे. ‡ आजकालच्या लघुकथेंत केवळ बौद्धिक चमत्कृतीच्या बळावर हें जाळें कोणी विणूं म्हणेल तर तें त्यास जमणार नाहीं. कारण त्यासाठीं बुद्धिमत्तेबरोबरच उत्कट अशा भावनात्मक अनुभूतीचीहि अत्यंत आवश्यकता असते. शिवाय या कथेसाठीं बाह्यांगापेक्षां मानसिक आंदोलनें दर्शविणाऱ्या अंतरंगाची व प्रसंग लेखनापेक्षां स्वभावलेखनाची अधिक गरज असते. त्याखेरीज मानवी जीवनांत येणाऱ्या आकस्मिक घटनांच्यापेक्षां इथें चिरकाल टिकणारी सहृदयता विशेष मोलाची असते. आणखी मुख्य म्हणजे ही लघुकथा लिहिण्याची जाणीव लेखकाला विशेष प्रकर्षानें झाली पाहिजे.

सौ. कमलाबाई टिळक यांनीं लिहिलेल्या लघुकथा ह्या आधुनिक लघुकथेच्या कसोटीला उतरतील इतक्या रेखीव झालेल्या आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. आपल्या कथेला त्यांनीं अगदीं साधें, सरळ आणि बाळबोध थाटाचें वळण दिलेलें आहे. त्यांच्या कथेचें एकंदर स्वरूप अगदीं स्वाभाविक आहे. त्यांत कसलीहि ओढाताण आढळावयाची नाहीं.

दिवसेंदिवस स्त्रिया कथालेखनाला विशेष प्रवृत्त झालेल्या बघून कै. वा. म. जोशी यांनीं म्हटलें आहेः—

" लघुकथा लेखिकांच्या लघुकथा वाचून माझ्या मनाला मीं असा प्रश्न केला कीं, " इतर बाबतींत कांहींहि असो लघुकथांच्या बाबतींत तरी स्त्रियांची कामगिरी पुरुषांच्या कामगिरीच्या जोडीला न शरमतां ठरवितां येण्याजोगी किंबहुना " कांकणभर अधिकच " आहे किंवा नाहीं ? " आणि या प्रश्नाचें प्रांजलपणें मनाला उत्तर द्यावें लागलें, " होय " आहे यांत शंकाच नाहीं " * आणि कमलाबाईच्या कथा वाचून तर त्यांनीं स्पष्टच म्हटलें आहे कीं, " लहान मुलींची व बायकांचीं वर्णनें तर बायकानींच करावींत...असें वाटूं लागलें आहे..." तिच्या कानांतील सोन्याच्या बेडौल बुगड्या चांगल्या झांकल्या जातील अशा बेतानें मीं तिचीं कर्णाग्रें केसांनीं झांकून टाकलीं " ‡अशा प्रकारची अनुभवप्रेरित वाक्यें पुरुषांच्या वर्णनांत कशीं येणार ?......."

---

‡ As the untaught spider spins his delicate rose-window and assures it against wind and rain by sneer adjustment-not a thread too many or too few--so let us writers try to spin out the round and threaded marvel (Caravan).

* प्रस्तावना – हृदयशारदा. ‡ हृदयशारदा – नजर पा. ६

कमलाबाईंच्या अनेक कथांमधून स्त्रीस्वभावाचीं वैशिष्ट्यें पहावयास मिळतील. वास्तविक त्यांनीं उच्च शिक्षण घेतलेलें आहे. तेव्हां खरें म्हणजे परभाषेंतील कथांच्या वाचनानें त्यांच्या कथांवर परकीय संस्कृतीची किंवा लेखनाच्या धाटणीची छाप पडणें स्वाभाविक होतें. परंतु तसें घडलें नाहीं, हें विशेष होय. हिंदु संस्कृतीचे संस्कार परंपरेनें मनावर घडत गेलेली एक स्त्री या नात्यानेंच त्यांनीं आपल्या कथा लिहिलेल्या दिसतात.

" नजर " या कथेमध्यें स्त्रीहृदयांतील वात्सल्याचा झालेला आविष्कार अप्रतिम आहे. स्त्री सुशिक्षित असो कीं अशिक्षित असो आपल्या तान्हुल्याला कुणाची दृष्ट होऊं नये असें तिला अंतःकरणापासून वाटत असतें.

कमलाबाईंचा "आकाशगंगा" हा १९४४ मध्यें प्रसिद्ध झालेला कथासंग्रह पूर्वींच्या त्यांच्या कथा लेखनाइतकाच चटकदार झालेला आहे. या संग्रहांत पूर्वीपेक्षां विषयांची विविधता भरपूर आहे. त्याचप्रमाणें वास्तवतेचें प्रमाणहि अधिक आहे.

" पूर्वस्मृति " ही कथा अतिशय नाविन्यपूर्ण असून हृदय थरारून सोडणारी आहे. मृत्युशय्येवर पडलेल्या म्हातारीच्या आपल्या बाळपणापासूनच्या आठवणीच्या स्मृति येथें मोठ्या खुबीनें एकत्र आणलेल्या आहेत. भाषेचा सहज सुलभ वापर या कथेंत अत्यंत कौशल्यानें झाला असून भावनावश स्त्रीनें कुणाशीं तरी हितगुज करावें इतकें हें स्वभावचित्र जिवंत झालेलें आहे.

मध्यमवर्गाबरोबरच बहुजनसमाजांतील कथाविषयहि लेखिकेनें तितक्याच जिव्हाळ्यानें हाताळलेले आहेत. " शांति " या कथेंत शांतीची सासरीं जातांना उडालेली गडबड या संदर्भात अवश्य पाहतां येईल.

कमलाबाईंची भाषा साधी, सरळ आणि आकर्षक आहे. त्या भाषेंत एक प्रकारचा जिव्हाळा आहे. त्यांच्या कथेंत ' लुगडें पालटणें " व " छोटेसें खपरेल " इत्यादि प्रादेशिक थाटाचे अधून मधून आलेले वाक्प्रचारहि मनोरम असून योग्य जागीं पडलेले आहेत. मात्र " हा फोटो माझ्या सपत्नीचा होता " (पान ८०) अशी संस्कृत प्रचुर शब्दांची पेरणी मधून मधून क्वचित् प्रसंगीं कमलाबाईंनीं केल्यामुळें त्यांच्या भाषेला कांहींशी कृत्रिमतेची झांक आलेली आहे. परंतु असलीं वाक्यें फार थोडीं असल्यामुळें त्यांचा हा दोष सहज डोळ्याआड होण्यासारखा आहे. मनोविश्लेषणाची कला मात्र त्यांना उत्तम साधलेली आहे.

कु. पिरोज आनंदकर

स्त्रीजीवनांतील गुणदोष निर्भयपणें सांगणाऱ्या लेखिका म्हणून पिरोज आनंदकर यांचा लौकिक आहे. संख्येच्या मानानें त्यांचा कथाप्रपंच अगदींच

छोटासा दिसेल. पण त्या लहानशा पसाऱ्यांतच त्यांनीं आपल्या कथेला एक विशिष्ट ध्येय नजरेसमोर ठेवून वागायला प्रवृत्त केली आहे. त्याचप्रमाणें आपल्या कथेसाठीं त्यांनीं विषयालाहि बरेंच मोठें क्षेत्र मोकळें ठेविलेलें दिसतें. लघुकथेला कोणताहि विषय चालतो. " रोमांचकारक घटनांपासून ज्याच्या त्यालासुद्धां स्पष्टपणें न कळणाऱ्या संवेदनापर्यंत सर्व अनुभूतींतून लघुकथा निर्माण होऊं शकते. " असें बेटस् म्हणतो तेंहि याच दृष्टीनें.❦

" फुलमाळीण "० या कथेंत पिरोजबाईनीं द्वितीय विवाहाचा प्रश्न चर्चिलेला आहे. नवऱ्यानें सोडून दिलेली निरपराधी राधा स्वतःचें पोट भरण्यासाठीं फुलमाळिणीचा धंदा पत्करते. पण दुर्दैवानें याच धंद्यामुळें ती न कळत आपल्या सवतीशीं—पद्मेशीं—मोठ्या आपुलकीनें वागते. रोजरोज तिला ताजी वेणी आणून देण्यांत तिला आनंद होतो. परंतु कांहीं दिवसांनीं पद्माला राधा म्हणजे आपली सवत आहे असें जेव्हां समजतें, तेव्हां ती आपल्या पतीविरुद्ध बड पुकारण्यास तयार होते. त्यामुळें ती आपल्या नवऱ्याला स्पष्ट विचारते, " आपल्या पत्नीच्या संसाराची चिता धाड्धाड् जळत असतांना इतक्या स्वस्थ चित्तानें माझ्याबरोबर संसार तरी कसा करवला ? कां साऱ्याच पुरुषांचीं मनं पाषाणाचीं बनविलेलीं आहेत ? "...पण राधेला जेव्हां पद्मेचें आणि तिचें नातें समजतें तेव्हां पदर पसरून पोटांत अपराध घालण्याची मनाची तयारी करून ती पद्मेला कळवळून म्हणते, " ताई, त्यांची माझी दृष्टिभेट घडवून द्याल ? एका स्त्रीला तिचं हरवलेलं धन मिळवून देण्याचं पुण्य तुमच्या पदरांत पडेल ! तुम्हीहि एक स्त्रीच आहांत... "

पिरोजबाईंची ही कथा खरोखर विचार करण्यासारखी आहे. स्त्री–जीवनाकडे किती वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून त्या बघूं शकतात याचेंच हें द्योतक नव्हे का ?

" १५ मे " सारख्या प्रीतिकथाहि लेखिकेनें लिहिलेल्या आहेत. या कथांमधील प्रणय अप्रतिम आहे यांत वाद नाहीं. योगायोगानें एकत्र येणारे सुरेंद्र व मंदाकिनी कसे विवाहबद्ध होतात याची सुंदर खुलावट लेखिकेनें येथें केलेली आहे. तथापि " माझं सुखस्वप्न "* या कथेंत येणारा प्रीतिरसाचा ध्येयवादी आविष्कार यापेक्षां कितीतरी सरस आहे यांत वाद नाहीं. योगायोगानें जमणाऱ्या प्रीतीपेक्षां स्त्री ही पराक्रमाला प्रीतिमाला अर्पण करते हा या कथेचा गाभाच मुळांत आकर्षक आहे. या कथेची नायिका मालती हिला मनोहर हवा असतो. पण त्यासाठीं त्यानें कांहीं पराक्रम करून वीराचें जीवन जगावें, अशी तिची उत्कट

❦ Modern Short Story – Page 15.

० रशना (कथासंग्रह)

* स्त्री, नोव्हेंबर १९४८

इच्छा असते. त्याबद्दल ती त्याला तसें बजावतेहि. त्यामुळें मनोहर तिचें प्रेम जिंकण्यासाठीं मोठ्या दिव्यांतून पार पडतो. त्यावेळीं मालती म्हणते, " त्याच्याकडे पाहतांना मला अभिमान वाटत होता. देशाच्या आकांक्षा अल्प काळांत सफल करणारा हाच तो माझा मनोहर ! आणि मी त्याची पत्नी हेंच माझं सुखस्वप्न आतां प्रत्यक्षांत उतरलं होतं ! "

स्वतंत्र भारतांतील सुशिक्षित व जाणत्या स्त्रीनें काढलेले उद्गार खरोखरच महत्त्वाचे आहेत. स्वतःच्या अपेक्षा आणि त्याहि पतीच्या निवडीच्या वेळीं प्रकट झालेल्या, निर्भयपणें बोलून दाखविण्याचें स्त्रीमध्यें आलेलें धैर्य पिरोजबाईनीं या कथेंत मोठ्या कौशल्यानें खुलविलें आहे यांत वाद नाहीं.

स्त्रीजीवनाकडे अतिशय जिव्हाळ्यानें पहावयाचें आणि स्त्रीच्या सर्व भावना मोकळेपणानें मांडावयाच्या हें पिरोजबाईंचें व त्यांच्या कथांचें प्रमुख वैशिष्ट्य आहे. त्यांची भाषा सफाईदार आहे व विचारांची मांडणीहि ठसठशीत आहे. स्त्रीजीवनाप्रमाणेंच पुरुषांच्या जीवनाकडेहि लेखिकेनें सहृदयतेनें पाहिलें आहे, हें त्यांच्या " बोलका चित्रपट " या कथेवरून दिसून येईल.

सौ. कुसुमावती देशपांडे

मराठी लघुकथा बाळसेदार व्हायला लागली तेव्हां अनेक स्त्री-पुरुष लेखकांनीं तिच्या विकासासाठीं अविश्रांत श्रम घेतले. विकासाबरोबरच तिला कांहीं स्थैर्य प्राप्त व्हावें यासाठींहि त्यांनीं जिवापाड मेहनत घेतली. आणि हें सर्व करीत असतांना या मंडळींनीं केवळ कथा-लेखनच केलें नाहीं तर लघुकथेबद्दल आपले विचार प्रकट करणारें टीकालेखनहि केलें. त्यासाठीं मराठींतील लेखकांचा व लघुकथांचा आढावा त्यांनीं घेतला. त्यावेळीं प्रत्येक कथाकाराचा प्रामाणिकपणें विचार झालाच असें मात्र घडलें नाहीं. व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें ज्याला जें आवडेल तें त्यानें निवडलें व त्यासंबंधीं बोलून दाखविलें. त्यामुळें यांपैकीं कांहीं लेखकांनीं कथाकाराची व टीकाकाराची अशी दुहेरी भूमिका पार पाडली.

प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे या अशाच प्रकारच्या एक लेखिका आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेऊन त्यांनीं महाविद्यालयांत अध्यापनाचें काम केलें आहे. त्या कारणानें त्यांचा अभ्यास विशेष झाला. वाचन विस्तृत झालें. मनन व चिंतनहि त्यामुळें घडलें. त्या कारणानें त्यांच्या लिखाणाला एक प्रकारची निराळी धार आली. आणि मुख्य म्हणजे मराठींतील नामवंत लेखकांत त्यांची गणना केली जाईल हें त्यांच्या लेखनाच्या चाहात्यांनीं अवश्य पाहिलें. त्या कारणानें त्यांची कथा एकदम उठावदारपणें वाचकांच्यासमोर आली. मराठींतील एक प्रसिद्ध लेखक

श्री. वि. स. खांडेकर यांनीं "साहित्या"च्या ऑगस्ट १९४८ च्या अंकांत कुसुमावतींच्या कथांबद्दल लिहितांना म्हटलें कीं,

"कथा विषय निवडतांना त्यांचा सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोन जसा स्पष्टपणें दृष्टीला पडतो तसा त्याचा विकास होतांना त्यांचें कविमन, त्यांचा कलापूर्ण संयम, अनुभूतीकडे आत्मनिष्ठेबरोबर वस्तुनिष्ठेनें पाहण्याची दृष्टि, त्यांची मानवतेवरली श्रद्धा इत्यादींचाहि वाचकाला परिणामकारक प्रत्यय येतो."

"त्यांच्या कथा ह्या जाईजुईच्या फुलांसारख्या आहेत. त्या जशा आकारानें लहान आहेत, तसा त्यांचा सुगंधहि सौम्य आहे. त्यांच्या आकर्षपणांत कुठल्याहि प्रकारची उग्रता नाहीं, भपकारा नाहीं, भडकपणा नाहीं, अतिरेक नाहीं...आपण ज्या दृष्टीनें कविता वाचतों त्या वृत्तीनें त्यांच्या कथा वाचल्या पाहिजेत. तरच त्यांचा रसास्वाद आपणांस घेतां येईल. कवितेंत व्यक्त सौंदर्यापेक्षां सूचित सौंदर्य अधिक असतें. कुसुमावतींच्या कथांचें असेंच आहे...जीवनांतला हरतऱ्हेचा विरोध त्या मोठ्या कुशलतेनें टिपून घेतात आणि त्याची कल्पनाचित्रें अथवा विचारचित्रें जवळजवळ ठेवून त्या त्याला कथारूप देतात...."

"दीपकळी", "दीपदान" व "मोळी" हे कुसुमावतींचे तीन कथासंग्रह १९३५ ते १९४७ या कालखंडांतील आहेत. प्रत्यक्षांतील अनुभवाचें अधिष्ठान त्यांच्या कथेला लाभलेलें असतें, हाच त्यांच्या कथांचा प्रमुख विशेष म्हणतां येईल. स्वतःच्या किंवा इतरांच्या सहानुभूतीपूर्व अनुभवांचे धागे वाचकांना उकलून दाखवून व त्यांची कलात्मक मांडणी करून कुसुमावतींनीं आपलें कथेचें मंदिर उभारलें आहे.

काव्यमय वर्णनशैली हें कुसुमावतींच्या कथांचें आणखी एक प्रमुख आकर्षण आहे. सृष्टिसौंदर्याची खुलावट करीत असतांना त्यांची लेखणी जणुं त्या विशिष्ट वातावरणांत धुंदच होऊन जाते, इतकीं हीं वर्णनें चटकदार आहेत.

काव्याच्या थाटानें कथालेखन करूनहि कुसुमावतींनीं सामाजिक तसाच वैयक्तिक जीवनांतला हरतऱ्हेचा विरोधदेखील मोठ्या कौशल्यानें आपल्या मनांत सांठवून कथेच्याद्वारां आविष्कृत केलेला आहे. अशा वेळीं कित्येकदां त्यांची कथा लघुनिबंधाच्या तर कित्येकदां शब्दचित्र व निबंध यांचें मिश्रण झालेल्या कथेंत अवतीर्ण झालेली दिसून येते. "मोळी" मधील "जांभईऽऽ" ही त्यांची कथा या पद्धतीची आहे.

कुसुमावतींच्या आविष्काराच्या या विशिष्ट पद्धतीबरोबरच त्यांच्या मनांत वसत असलेली विशालता व सूक्ष्मता आणि चमत्कृति व अनुभूति मोठी कलापूर्ण आहे. "मध्याह्न", "चंद्रास्त" किंवा "मध्यरात्र" हे त्यांचे लघुनिबंध या दृष्टीनें पहाण्यासारखे आहेत.

कुसुमावतींचे हे तीन कथासंग्रह वाचीत असतांना बदलत्या काळाप्रमाणें लेखिकेच्या मनोवृत्तींत पडणारा फरक निश्चित दिसून येतो. त्यांच्या कथांमधून होणारा सामाजिक जीवनाचा आविष्कार हा सहजस्फूर्त आहे, " अनुभवाची उत्कटता, तो अनुभव समग्रतया व्यक्त करण्याचें तंत्र, आणि त्यांतून होणाऱ्या अभिव्यक्तीचा आनंद हे " दीपकळी "तल्या कथांचे विशेष आहेत... " दीपदानांत " स्वतः लेखिका व वाचक ह्यांच्या निराळ्या अस्तित्वाची जाणीवच दिसत नाहीं. कवीच्या मनांत जशी कविता सहज स्फुरते, तसाच प्रकार " दीपदानां "तील कथांचा आहे " दीपकळी " दैनंदिन व्यक्तित्वाच्या त्या पातळीवरच्या अनुभवांच्या कोंडींत होती. "दीपदाना"मध्यें त्या व्यक्तित्वाच्या मर्यादा व त्यांतील जडता ह्यांचा निर्बंध उरलेला नाहीं. एका सूक्ष्म अनुभूतींतून प्रतिसृष्टि निर्माण झाली आहे.

" मोळी " मध्यें लोकजीवनाविषयीं दृष्टि अभिमुख झाली आहे. हलक्या मानलेल्यांच्या जीवनांतील प्रामाणिकपणा, धडाडी, हिंमत ह्यांची साक्ष पटली आहे.... "*

कुसुमावतींची भाषा जशी काव्यत्मक तशीच घरगुती उपमा दृष्टांतांनींहि ती आलंकृत झालेली आहे. " उफाळून वर येणाऱ्या दुधावर पाण्याचा हबका दिला म्हणजे तें कसें एकदम खालीं बसतं ! पर्वणीच्या आनंदानं लगबगून जाणारीं तीं एवढीशीं पोरं, आपल्या मोकळ्या डोक्याच्या, घासट चेहेऱ्याच्या जाणिवेनं पार हिरमुसून गेलीं...." कुसुमावतींनीं योजिलेली ही कल्पना त्यांच्या ठिकाणीं असलेल्या स्त्रीमनाचीच साक्ष देत आहे.

" एकटीच ", " चिमणी " या कथांतून कुसुमावतींनीं स्त्रीमनांतील शल्यें चित्रित केलेलीं आहेत व दलितांच्या बद्दलचा जिव्हाळा सांगितला आहे. या कथांची काव्यात्मक मांडणी व त्यासाठीं वापरलेलें अभिनव तंत्र उठावदार आहे.

" अप्सरांची भेट ' माऊली व ' पिसारा ' या तीन कथांतून कुसुमावतींनीं स्त्रीजीवनांतील तीन अंगांची मांडणी मोठी आकर्षक रीतीनें केलेली आहे. यांपैकीं पहिलींत सामाजिक परिस्थितीवर विदारक प्रकाश टाकलेला असून दुसरींत नव्या काळच्या स्त्रीमनाचा पैलू प्रकट केला आहे.

कुसुमावतींच्या कथा या अशा प्रकारें वाचनीय आहेत. काव्यात्मक मांडणी, स्त्रीजीवनांतील समस्यांचें चिंतन व सामाजिक विषमतेची तीव्रता हें त्यांच्या कथेचे विशेष गुण आहेत. तसेंच त्यांच्या कथेंतून सूचित होणारा जीवनविषयक आशावादहि उल्लेखनीय आहे. तरीपण कुसुमावतींच्या कथांनीं सामान्य वाचकाचें मन जिंकलेलें नाहीं, हें इथें अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे. याचें कारण असें कीं, अनेक

* सुलभा पाणंदीकर—साहित्य, कुसुमावतींच्या कथा, आक्टो. १९४९

ठिकाणीं बुद्धीनें भावनेवर केलेली कुरघोडी किंवा काव्यात्मतेंतला कठोर संयम सामान्यांच्या आवाजांत येऊं शकला नाहीं.

● ● ●

सौ. शांताबाई नाशिककर

शांताबाई नाशिककर यांनीं आपल्या कादंबरी लेखनाच्या मानानें कथा-लेखन बरेंच कमी केलेलें आहे. तथापि त्यांनीं ज्या थोड्या फार कथा लिहिलेल्या आहेत, त्यांमधून कलाविलासापेक्षां जीवनदर्शन घडविण्याचा विशेष प्रयत्न केलेला आहे. स्त्री आपल्या जीवनाबद्दल अलीकडे विशेष विचार करूं लागली आहे, असें शांताबाईच्या कथांवरून म्हणतां येईल.

" काळसर्पाचा विळखा " या कथेंत एखाद्या सर्वसामान्य स्त्रीला स्वतःच्या प्राणाहून प्रिय वाटणाऱ्या मंगलसूत्रास लेखिकेनें काळसर्पाचा विळखा असें संबोधिलें आहे ! येथें अनुताई व डॉक्टर यांच्या प्रेमभंगाची गोष्ट सांगितलेली असून घटस्फोटाच्या प्रश्नाकडे कांहींशीं वेगळ्या रीतीनें पाहिलें आहे. " बनविलेलीं बाहुली " या कथेंत नवऱ्याच्या प्रतिष्ठेवरून आणि पैशावरून बायकोची किंमत जग ओळखतें, म्हणजे अशा वेळीं पुरुष आपल्या बायकोच्या आयुष्याशीं खेळतो असें स्पष्टपणें नमूद केलेलें आहे. " प्राणदान " या कथेंत स्त्रीच्या ठायीं निसर्गतःच वसत असलेल्या त्यागाची कल्पना फारच विस्मयकारक अशा घटनेनें दिलेली आहे. स्वतःचा नवरा घरांत आजारी असतांना केवळ कर्तव्य म्हणून डॉक्टराच्या भूमिकेवरून उर्मिलाबाई दवाखान्यांतील रोगी वांचविण्याची पराकाष्ठा करतात. त्यामुळें पतीकडे त्यांचें स्वाभाविकच दुर्लक्ष होतें ! त्याचा परिणाम म्हणून विधवेचें जीवन त्यांच्या वांट्याला येतें ! यावेळीं उर्मिलाबाई म्हणतात, " माझ्या सुखाची होळी झाली, पण गणूच्या कुटुंबांत तरी आनंदाची वृष्टि झाली ना ? " स्वार्थत्यागाचें केवढें अप्रतिम समाधान येथें प्रकट झालें आहे !

● ● ●

आनंदीबाई जयवंत

जुन्या काळच्या कथेचें वैशिष्ट्य कायम ठेवून आजच्या बदलत्या काळांत कथालेखन करणारी जी अनेक लेखक मंडळी सांपडतात, त्यांच्यापैकींच आनंदीबाई जयवंत याहि एक लेखिका होत.

" पारंब्या " आणि " मेघयन्ती " हे आनंदीबाईचे दोन कथासंग्रह

आहेत. त्यांच्या लेखनाचा काल बराच मागचा आहे. तरीपण या संग्रहांतील कथांनीं त्यांची चांगली ओळख मराठी रसिकांना करून दिलेली आहे.

आनंदीबाईंची कथा ही तशी साधी पण मनाची मोकळी आहे. वैवाहिक जीवनांतील अनेक प्रसंगे तिनें मोठया परिणामकारक रीतीनें वाचकांच्या समोर मांडलीं असून त्यांच्या विचारांना चालना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच-प्रमाणें जीवनाचें अवगाहन करून त्यांतलीं सूक्ष्म सत्यें शोधून काढणाऱ्या लेखकाच्या दृष्टीबरोबरच तीं सत्यें थोड्याच परंतु परिणामकारक रेघांनीं रेखाटणारी चित्रकाराची कलाहि आनंदीबाईंच्या कथेला साधली आहे. त्यांच्या कथेंतील निरनिराळीं पात्रें रेखीव तशींच मनोज्ञ असून जिवंतहि आहेत. त्यांची वाणी रसाळ तशीच सुबोध व जिव्हाळ्यानें माखलेली आहे. सहृदयता व सहजता हा आनंदीबाईंच्या लेखनाचा प्रमुख विशेष होय.

आनंदीबाईंनीं आपल्या कथेंतून प्रकट केलेली " मालती, मंजू, सुमित्रा, विद्या व इंदिरा " हीं स्वभावचित्रें स्त्रीजीवनांतील विविध रूपांचा आविष्कार करणारीं आहेत. त्यांच्यामुळें लेखिकेच्या मनुष्य स्वभावाच्या सखोल अभ्यासाची व त्या गहन स्वभावांतील सूक्ष्म धागेदोरे हळुवारपणें उकलून दाखविण्याच्या कौशल्याची वाचकांना चांगलीच कल्पना येते.

सौ. कमलाबाई बंबेवाले

बदलत्या काळानुसार स्त्रीच्या मनांत डोकावणारी ध्येयनिष्ठा सौ. कमला बंबेवाले यांनींहि आपल्या कथांमधून रंगविलेली आहे. आपल्या आयुष्याचा जोडी-दार निवडतांना पौराणिक काळांतील राजकुमारींचा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर असावा, असें त्यांच्या " अपमान कीं सन्मान " + या कथेवरून दिसून येईल. या कथेंत लेखिकेनें एका शूर वैमानिकाची प्रीतिकथा रंगविलेली आहे. मोहिनी नांवाच्या एका उद्दाम पण सौंदर्यशालिनी तरुणीच्या प्रीतिला जिंकण्यासाठीं जयसिंगानें पत्करलेल्या अग्निदिव्याची ही चित्ताकर्षक कथा आहे. कॉलेजमध्यें असतांना क्रिकेटच्या सामन्यांत विजयी झालेल्या जयसिंगाचा मोहिनीनें सन्मान करण्याचें नाकारलें, ही गोष्ट त्याला फार अपमानकारक वाटत असते. त्यामुळें एका क्षणापूर्वीं " जवळच एका टेबलावर गौरवाच्या व कृतज्ञतेच्या तारांचा आणि पत्रांचा ढीग पडला होता ! प्रातःकाळचीं सुंदर सोनेरी किरणें हीं जणुं आमच्या वीराचें अभिनंदन करण्याकरितां त्याच्या खोलींतून हळूच आंत शिरत होतीं. "

+ कमळाच्या पाकळ्या.

अशा अवस्थेत असलेला जयसिंग सेविकेनें दूध पाजल्यावर कृतज्ञतेनें तिला म्हणतो, लेडी जेसमिन् मी आपले किती आभार मानूं ?—पण खरंच, आपण मला जगविण्याकरितां एवढे श्रम कां बरें घेतां ? मीं आपल्याला सांगितलं कीं, मला मुळींच जगायचं नाहीं .... " पण त्यानंतर लगेच " हिंदी पुरुषोत्तमाला मोहिनीचे शतशः धन्यवाद मान्य असोत ! बाबा म्हणतात कीं, व्हिक्टोरिया क्रॉस तीन पिढ्यांना विभूषित करितो. उद्दाम मोहिनी असल्या सन्मानाला पात्र होईल काय ? " ही केवल वाचतांच तो आनंदानें बेहोष होत असल्याचें चित्र लेखिकेनें रेखाटलेलें आहे. स्त्री ही पराक्रमावर प्रेम करते हें तत्त्व पिरोजबाई आनंदकरांप्रमाणेंच कमलाबाईनींहि मोठ्या कौशल्यानें येथें मांडून दाखविलें आहे.

" अठरा धान्याचीं कडबोळीं " या कथेंत लेखिकेनें विवाहित स्त्रीनें आपल्या पतीशीं समरस होऊन संसार करणें किती इष्ट आहे हें चांगलें दाखविलें आहे, समाजसेवा अंगिकारीत असतांनाच घरच्या मुलांबाळांची व पतीची सेवा अगोदर होणें इष्ट आहे हा कथाभाग येथें आलेला आहे.

संसारांत पति आणि पत्नी यांच्यामध्यें तडजोड असणें किती आवश्यक आहे. हें या लेखिकेनें विविध प्रसंगांनीं परिणामकारक रीतीनें रंगविलेलें आहे. स्त्रीच्या मनाची ही एक अगदीं वेगळी बाजू आहे. घरगुती वातावरणाचा सुंदर उपयोग करून लेखिकेनें आपलें हें विशिष्ट मनोगत उत्तम प्रकारें प्रकट केलेलें दिसून येतें.

सौ. मालतीबाई दांडेकर

सौ. मालतीबाई दांडेकर यांनीं " विसाव्याचे क्षण ", " कथामालती ", " मी तुझीच का ? ", " प्रतिमा ", " चंद्रज्योति ", " विवाहानंतर ", " आशांकुर " या कथासंग्रहांमधून अनेक कथा लिहिलेल्या आहेत. १९३५ ते १९५० या कालखंडांतील त्यांचें हें लेखन आहे.

मालतीबाईच्या कथांमधील प्रसंग नित्य परिचयाचे असल्यामुळें सर्वसामान्य वाचकांच्याहि ते ओळखीचे असतात. त्यांच्या बहुतेक सर्व गोष्टींमधून बायकांची दुःखें त्यांनीं अतिशय तन्मयतेनें ओळखून व जाणून घेऊन सहृदयतेनें चित्रित केलेलीं आहेत. त्यांची दृष्टि मात्र केवळ मध्यमवर्गापुरतीच मर्यादित असल्यामुळें एकांगीपणाचा दोष त्यांच्या वांट्याला येणें स्वाभाविक आहे. तथापि कै. वा. म. जोशी यांनीं म्हटल्याप्रमाणें मालतीबाईची भाषा साधी, सरळ व सुबोध आहे. त्याचप्रमाणें यथार्थ निरीक्षण, सहानुभव, सद्विचार व सद्भावनांचें वातावरण, उचित भाषा पद्धति इत्यादि गुणांनीं त्यांच्या कथा गुंफल्या गेल्या आहेत. स्त्री

जीवनांतील विविध प्रश्नांवर मालतीबाईंची लेखणी वावरत असून पुरोगामी विचारसरणीचाहि त्यांनीं अवलंब केलेला आहे. संख्येच्या मानानें पाहिलें तर त्यांच्या कथा इतर लेखिकांच्या मानानें कदाचित् सर्वांत जास्त भरतील !

"बाटलींतलीं फुलं" या कथेंत स्त्रीचें जीवन हें एखाद्या बाटलींतील शोभेच्या फुलांसारखें आहे, असें मालतीबाईंनीं दाखविलेलें आहे. "रेखा" या गोष्टींत स्त्रीचें खरें सौंदर्य हें सुदृढ शरीरयष्टींत सामावलेलें असून तें नाजुकपणांत नव्हे याचें मोठें मार्मिक प्रतिपादन त्यांनीं केलेलें आहे.

"अहिल्या" ही कथा एका गणिकेच्या जीवनावर आधारलेली आहे. गणिका समजली गेलेली स्त्रीदेखील मनांत आणील तर अतिशय तापसी वृत्तीनें राहूं शकते. ती गाण्यावर जगत असली तरी तिच्यांत माणुसकी असते. तेव्हां स्त्रीला केवळ ती गणिका आहे म्हणून समाजानें दूर न करतां सावरून धरून माणसांत येऊं देणारेहि रघुवीरासारखे लोक जगांत असतात, अशी एक स्वागतार्ह कल्पना लेखिकेनें मोठ्या हळुवार मनानें येथें चित्रित केली आहे.

मालतीबाईंचीं कथानकें आटोपशीर असलीं, तरी त्यांत क्षणिक प्रसंगांची निर्मितीच अधिक आहे असें म्हणावें लागेल. त्यामुळें माणसाच्या सुप्त मनाला डिवचून, जागें करून, त्यास विचार करावयास लावणारी खोली या कथांमधून आढळत नाहीं. आपल्या कादंबऱ्यांमधून आलेल्या कथाविषयांशीं त्या जेवढ्या जिव्हाळ्यानें समरस झालेल्या आहेत, तेवढा जिव्हाळा त्यांनीं या कथाप्रांतांत वापरलेला नाहीं असें म्हटलें तर फारसें वावगें होणार नाहीं. तथापि मालतीबाईंनीं ज्या कथा लिहिलेल्या आहेत त्यांत वर्णित विषयाबद्दलची त्यांची सहानुभूति मात्र भरपूर दिसून येते. त्यांच्या कथांना एक प्रकारचें बालबोध वळण आलेलें आहे, तो या सहानुभूतीच्या पार्श्वभूमीचाच परिणाम असला पाहिजे.

"दूरदेशच्या प्रीतिकथा" हा मालतीबाईंचा अगदीं अलिकडचा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहांत त्यांनीं अनेक देशांमधील प्रीतिकथा त्या त्या देशाच्या स्थलकालाच्या परिस्थितीनुसार सांगितलेल्या आहेत. मूळ कथाविषय परकीय असला तरी त्याची मांडणी मात्र लेखिकेनें अतिशय कलापूर्ण रीतीनें केलेली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्या त्या विशिष्ट देशांच्या चालीरीतींचा मालतीबाईंनीं अतिशय सूक्ष्मतेनें अभ्यास केलेला आहे, हें या पुस्तकावरून दिसून येईल. लेखिकेनें येथें योजिलेली भाषाहि चटकदार आहे.

सौ. आनंदीबाई किर्लोस्कर

सौ. आनंदीबाई किर्लोस्कर ह्या अलिकडच्या काळांतील एक नामवंत लेखिका होऊन गेल्या. प्रतिबिंब, अंतरंग व ज्योति हे त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध

झालेले आहेत. स्त्रीजीवनांतील एखाद्या हृद्य प्रसंगावर आधारलेली कथा अगदीं स्वाभाविक आणि वास्तववादी वातावरणांत रंगविण्यांत आनंदीबाई वाकबगार आहेत. थोडक्यांत भरपूर आशय ध्वनित करण्याची त्यांची हातोटी उत्कृष्ट असून स्त्रीच्या मनांतील भाव नाजुक पद्धतीनें वर्णन करण्यांत तर त्यांनी बरेंच यश मिळविलेलें आहे.

" सावत्र आई " या कथेंत बालमनावर शेजाऱ्याच्या सांगण्यावरून आपली नवी आई म्हणजे कोणी भयंकर बाई आहे अशी एका लहान मुलीला धास्ती पडते. परंतु प्रत्यक्षांत मात्र तसें न घडल्यामुळें त्या बालमनास कल्पनातीत आनंद झाल्याचें येथें दर्शविलेलें आहे. मनाला चटका लावणारा हा प्रसंग लेखिकेनें या कथेंत फारच आकर्षक रीतीनें रंगविला आहे.

आनंदीबाईंच्या कथांत प्रेमकथांचा भरणा अधिक आहे. " खळबळ " ह्या कथेंत प्रौढ कुमारिकेच्या मनांत आपल्या प्रियकराविषयीं चाललेलीं आंदोलनें लेखिकेनें मोठ्या कौशल्यानें विचित्र केलीं आहेत.

" खानदान " ही आनंदीबाईंची कथा प्रीतिकथांच्या दृष्टीनें आकर्षक झालेली आहे. खानदानी घराण्यांतील एका विधवेच्या प्रेमाचा आविष्कार येथें झालेला आहे आणि तो वस्तुस्थितीला धरूनहि उत्तम रीतीनें सजविलेला दिसून येतो. पद्मावती आणि तिच्या वडिलांचे घरांतील तरुण कारकून वामन यांच्या परस्परांच्या विवाहाबद्दल झालेल्या चांदण्या रात्रींतील आणाभाका रंगविणारा प्रसंग अप्रतिम आहे.

आनंदीबाईंच्या कथांचें स्वरूप हें असें आहे. स्त्रीच्या मनांत खुपणारें दुःख त्यांनीं जितक्या तन्मयतेनें रंगविलें, तितक्याच तन्मयतेनें स्त्रीची धडाडीहि त्यांनीं रंगवायला हवी होती, असें मात्र कांहीं वाचकांना वाटल्याशिवाय राहत नाहीं. त्यामुळें त्यांच्या या कथा पुष्कळशा प्रमाणांत एकांगी झालेल्या दिसून येतात.

सुशीला शिंदे

" चित्ररेखा " ह्या आपल्या कथासंग्रहांत सुशीला शिंदे यांनीं स्त्रीजीवनाची वास्तव बाजू रंगविणाऱ्या कथा लिहिलेल्या आहेत. विभावरी शिरूरकरांनीं स्त्रीच्या मनांत आजवर सुप्तावस्थेंत वसत असलेल्या भावनांना वाचा फोडली होती. त्याच मनोवृत्तींमधून सुशीलाबाईंच्या कथांचाहि उठाव झालेला आहे. आपल्या वर्णित विषयाशीं त्या अतिशय जिव्हाळ्यानें एकजीव झालेल्या दिसून येतात.

" उफाळलेल्या भावना " ही त्यांची एकच कथा घेतली तरी त्यांच्या कथालेखनाचें वैशिष्ट्य सहज पडताळून पहातां येईल. ही कथा अतिशय हृदय-

स्पर्शी आहे. विधवेच्या मनांत उचंबळून येणाऱ्या भावनांचें हें उल्लेखनीय असें एक दारुण चित्र आहे. घरांतील नातेवाईकांचीं "वैवाहिक सुखें बघून अस्वस्थ झालेली मालती पुनर्विवाहास प्रवृत्त होतांच तिची आई तिला म्हणते, 'बेशरम कार्टे ! उलथली कां नाहींस या परीस ? यासाठीं कां ग तुला शिकायला घातली ? नवऱ्याला गिळलंस आणि आतां वर आमची बेअब्रू करायला निघालीस?...' हें ऐकून मालतीच्या भावना बंड पुकारायला प्रवृत्त होतात. जिनें आपल्याला नऊ महिने आपल्या उदरांत सांभाळली आणि जी सत्तावीस वर्षें अव्याहतपणें संसार-सुखाची अवीट गोडी अनुभवीत होती, त्या आईच्या ह्या उद्‌गारानें मालतीस आपल्या मनाचे भावबंध आवरणें कठिण झालें. घरांतील दादा वहनींचें प्रेम आणि रमेशचा प्रेमळ सहवास या दुहेरी भावनांनीं तिला पुनर्विवाहाच्या मार्गानें मनाला सुख मिळविण्याची दिशा दाखविली.

घरगुती वातावरणाचा उत्तम परिपोष, विषयाबद्दलची आत्मीयता आणि सहानुभूतीनें प्रकट होणारे स्त्रीजीवनाबद्दलचे विचारप्रवाह हें सुशीलाबाईच्या कथेचें विशेष होत. त्यांची भाषा अतिशय चटकदार आणि ओघवती आहे.

सौ. सिंधु गाडगीळ

सौ. सिंधु गाडगीळ यांचा "अंतरिक्षा" कथासंग्रह आजवरच्या सर्व स्त्री लेखिकांपेक्षां अगदीं निराळा असा आहे. काळाच्या वाढत्या ओघाबरोबर सुशिक्षित महिलेनें विविध प्रकारची विद्या आत्मसात् करण्याचा चालविलेला यशस्वी प्रयत्न या पुस्तकाच्या रीतीनें आविष्कृत झाला आहे. विमान विद्येमधील विविध घडा-मोडींचें धांवतें दर्शन घडविणारा हा एक चित्तवेधक चित्रपटच आहे, असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं.

आकर्षक वर्णनें, विमानविद्येची सूक्ष्म माहिती, विस्मयाचा धक्का देणारी विविध स्थळें आणि त्यामुळें कथानकाला येणारें सौंदर्य, घरगुती प्रसंगांची सुंदर पार्श्वभूमि आणि तरुणांच्या भावनांची वेचक शब्दांत झालेली उकल हे या कथा-संग्रहाचें वैशिष्ट्य आहे.

"स्टुवरडेस" ही एक प्रीतिकथा आहे. येथें विमानाच्या घडणाऱ्या अपघाताचें चित्त थरारून सोडणारें दृश्य लेखिकेनें रेखाटलें आहे.

वैमानिकाच्या आयुष्याचीं विविध अंगें दाखवीत असतांनाच लेखिकेनें वैमानिकाच्या पत्नीचा करून दिलेला परिचय स्त्रीच्या अंतःकरणाची साक्ष पटवितो. "स्टुवरडेस" मधील वीणा आपल्या वैमानिक पतीस म्हणते, "विनू, तूं गेलास म्हणजे फार काळजी वाटते तुझ्याबद्दल. नुसत्या

काळजीनं अर्धमेला होतो माझा जीव व करमत नाहीं. इतके दिवस एकटं एकटं ! कंटाळा यायला लागला आहे मला या एकलकोंड्या आयुष्याचा. एवढं सगळं वैभव आहे, नोकरचाकर आहेत, सर्व साधनं उभीं आहेत हात जोडून माझ्या चाकरीला. पण तूं !...तूं आतां खूप खूप रहा ना माझ्याजवळ. कधीं रहाशील ? कां नाहींच रहायचास कधीं ?... "

● ● ●

शांता ज. शेळके

शांता ज. शेळके यांच्या "मुक्ता" आणि "गुलमोहर" या दोन लोकप्रिय कथासंग्रहांतून विविध विषयांवरच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. भावनेची उत्कटता, प्रणयाची रसभरित वर्णनें, आकर्षक निवेदन आणि वाचकांच्या मनाला भुरळ पाडणारी भाषाशैली हे शांताबाईंच्या कथेचे विशेष होत. त्यांच्या कवितेप्रमाणेंच त्यांची कथाहि प्रामाणिक आहे. जें कांहीं सांगावयाचें असेल त्यांत गडबड-गोंधळ, आदळआपट कांहीं नाहीं. सारें कांहीं ओघाओघानेंच जातांना दिसून येतें.

प्रणयाचा विकास आणि भंग हें शांताबाईंच्या अनेक कथांचे विषय आहेत. या एकाच विषयाच्या विविध छटा दाखविण्यांत त्या मोठ्या वाकबगार आहेत. "गुलमोहोर "मध्यें प्रेमभंगाचें दर्शन घडवितांना लगेच त्यांनीं " यौवनांत" त्याचा विकास दर्शविला आहे. प्रणयाचीं चित्रें रंगवितांना त्यांची लेखणी धुंद होऊन जाते. जें सांगायला एखादी सर्वसामान्य बाई मनांत चरकेल, तें सांगायला शांताबाईची लेखणी निर्भयपणें पुढें सरसावते.

" सतीचा वाडा " ही शांताबाईंची कथा खानदानी घराण्यांत पिचून गेलेल्या हिरा नांवाच्या एका सौंदर्य–संपन्न स्त्रीची कहाणी आहे. स्त्रीहृदयाचा होणारा कोंडमारा लेखिकेनें येथें उत्कृष्ट रीतीनें दाखविला आहे.

शांताबाईंनीं आपल्या कथांमधून विविध प्रकारचीं स्वभाववैशिष्ट्यें दर्शविलेलीं आहेत. अगदीं अवखळ मुलापासून तों जख्खड म्हाताऱ्यापर्यंत त्यांच्या कथांतून निरनिराळीं पात्रें आलेलीं आहेत. "राधाराणीची साडी" या बंगालमध्यें पूर्वींच चालू असलेल्या हिंदुमुसलमानांच्या दंग्याच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या कथेमधील बापलेकीचीं स्वभावचित्रें लेखिकेनें फारच परिणामकारक रीतीनें लिहिलेलीं आहेत.

● ● ●

सौ. कमला फडके

प्रा. ना. सी. फडके यांच्या भाषाशैलीचें ज्या अनेकांनीं अनुकरण करण्याचा प्रयत्न केला त्यांच्यामध्यें सौ. कमलाबाई फडके या प्रमुख होत. कमला-

बाईंनीं बरेंचसें लेखन परभाषेंतील वाङ्मयीन कलाकृति अनुवादित करतांना केलें आहे. परंतु त्यांच्या या अनुवादाचा येथें विचार करावयाचा नसून त्यांच्या स्वतंत्र कथालेखनाचाच तेवढा विचार करावयाचा आहे.

"गुलमोहोर", "एक होता राजा", "तेरी चूप मेरी चूप" व "तीन उणे दोन = शून्य" हे कमलाबाईंचे कथासंग्रह आहेत. गेल्या दहा-पंधरा वर्षांतील त्यांचें हें कथालेखन आहे.

कमलाबाईंच्या लेखनाचा एक ठळक व प्रमुख असा विशेष सांगावयाचा म्हणजे त्यांनीं आपल्या कथांमधून केलेली विनोदाची पेरणी हा होय. कमला-बाईंचें हें वैशिष्ट्य इतर स्त्रियांना फारसें साधलेलें नाहीं. तरी परंतु कमलाबाईंच्या कथेनें फार वैशिष्ट्यपूर्ण असें स्थान मराठी साहित्यांत मिळविलें आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं.

कमलाबाईंच्या कथेंतील कांहीं विनोदाचा भाग सोडला, तर त्यांच्या कथेनें आणखी ठळक असें कांहीं सांगितलेलें नाहीं. मध्यमवर्गीय कुटुंबामधील सामान्य स्त्रीप्रमाणेंच ती आहे. परंतु एका स्त्रीच्या लेखणींतून तिचा जन्म होत असूनहि त्या दृष्टीनेंसुद्धां ती फारसें वैशिष्ट्य दाखवीत नाहीं. तथापि स्त्रीमनाचा म्हणून तिनें जो थोडाफार उलगडा केला आहे त्याचें उदाहरण म्हणून १९४९ च्या "स्त्री" च्या दिवाळी अंकांतील कमलाबाईंची "हारजीत" ही कथा घेतां येईल.

"मग आम्हांला हवं तरी काय?" ही कमलाबाईंची गोष्ट अशीच चित्तवेधक आहे. स्वतंत्र रीतीनें जगूं इच्छिणारी स्त्री इच्छित स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं कशी झगडते व तें मिळाल्यावर पुन्हां बंधनांत पडण्यासाठीं तिची कोण धडपड चालते, या स्त्रीसुलभ मनोवृत्तीची ही एक रोमहर्षक कथा आहे. "बायका त्या बायकाच !" या कथेंत ग्रामीण जीवन उपभोगणाऱ्या स्त्रीच्या पतीबद्दलच्या आकांक्षा लेखिकेनें सांगितल्या आहेत.

कमलाबाईंच्या कथेंतील असा कांहीं भाग सोडला आणि त्यांच्या इतर कथा वाचनांत आल्या, म्हणजे मग एक ठळक गोष्ट लक्षांत येते ती अशी कीं, आधुनिक काळांतील वाढत्या स्त्रीस्वातंत्र्याचा व स्त्रीपुरुषांनीं एकमेकांचें अनुकरण करण्यांत नव्यानेंच पडत चाललेल्या पायंड्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झाला असावा. नाहीं तर भरघोस स्त्रीजीवनाचा तरी आविष्कार त्यांच्या कथेनें केला असतां किंवा विभावरी शिरूरकरांसारखें कांहीं भव्य दिव्य तरी बोलून दाखविलें असतें.

प्रा. ना. सी. फडके यांची कथा त्यांच्या उतारवयांतहि कांहीं तरी नवीन सांगत असतांना व उत्तम भाषाशैलीनें आपला वाचकवर्ग वाढतां ठेवीत असतांना कमलाबाईंच्या कथेनें अगदींच सामान्य कां रहावें याचा अचंबा वाटतो.

वसुंधरा पटवर्धन

गेल्या पांच दहा वर्षांत दरवर्षी निघणाऱ्या दिवाळी अंकांतून चिक्कार लेखन करणाऱ्या लेखिका सौ. वसुंधराबाई पटवर्धन यांनीं मराठींत थोड्या वेगळ्या धर्तीच्या कथा लिहिलेल्या आहेत. त्यांची कथा बांध्याच्या दृष्टीनें जुन्या काळचा पेहराव करते आहे व विचारांच्या दृष्टीनें अगदींच आधुनिक रीतीनें वागते आहे. अधूनमधून तिनें बरीचशी बंडखोरीहि दाखविली आहे. तसेंच मानवी मनाचें सूक्ष्म अवलोकन करून मानसशास्त्रीय अशी स्त्रीमनाची उकलहि करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यामुळें ही बाई पुरुषासारखें लिहिते असा आरोप वसुंधराबाईंच्या बाबतींत अनेकदां केला जातो! आणि त्यासाठीं त्यांच्या कथांचे विषय, त्यांची मांडणी, भाषेची धाटणी व वर्णनशैली यांचा दाखला देण्यांत येतो. परंतु एक गोष्ट खरी कीं, वसुंधराबाईंच्या लेखणीनें पोटतिडकीची भाषा केली आहे. प्रखर पण मार्मिक असें व नेमकेंच तेवढें बोलूनहि दाखविलें आहे.

" एकेकाचा स्वभाव " व " चेहरा " हे वसुंधराबाईंचे दोन कथासंग्रह. याखेरीज अलीकडील दोन तीन वर्षांतील त्यांच्या इतरहि अनेक कथा वेगवेगळ्या मासिकांतून प्रकाशित झालेल्या आहेत.

वसुंधराबाईंच्या कांहीं कथांचें वैशिष्ट्य हें कीं, क्वचित प्रसंगीं पट्टीच्या लेखकाला लेखन करतांना जमणार नाहीं असें स्त्रीमनाचें वेगळें वैशिष्ट्य त्यांनीं सांगितलेलें आहे. या संदर्भात त्यांची " कां झालं असं— ? " ही कथा अवश्य पहावी.

वटसावित्रीचा युगानुयुगें चालणारा सर्वांच्या परिचयाचा प्रश्न येथें हाताळला आहे. आईवडिलांच्या अखेरच्या इच्छेसाठीं प्रेमभंगाचें दुःख सहन करणाऱ्या चंद्रावतीच्या अंत:करणाचें प्रतिबिंब येथें जणुं आरशांत दिसावें तसें हुबेहूब उमटलेलें आहे. दिलीपशीं, जिवाभावाच्या मित्राशीं, विवाहबद्ध होतां आलें नाहीं म्हणून दुःखी झालेल्या चंद्रावतीची कहाणी सांगतांना अखेरीस लेखिका म्हणते— " आदर्श संसार करण्याचा तिचा ध्येयवाद, दिलीपशीं समरस होण्याचीं तिचीं सुखस्वप्नें हीं सारीं आतां हातांतून निसटून उडालेल्या पक्ष्याप्रमाणें झालीं होतीं. त्या पक्ष्याप्रमाणें धावणं तिला अशक्य होतं. आणि तो परत येईल म्हणून वाट पहात बसण्यासारखी परिस्थितीच उरली नव्हती.

" वटपौर्णिमेचं पहिलं वर्ष म्हणून चंद्रावतीची पूजनाची सर्व तयारी झाली. पण श्रीमंतांच्या घरचा भरजरी शालू ती नेसली नाहीं. कोणतेहि दागिने तिनें घातले नाहींत. दिलीपनें वाढदिवसाला दिलेलें साधेंसुधें पातळ ती नेसली आणि वटवृक्षाची पूजा करूं लागली. भटजी मंत्र म्हणत होते. ती तंत्र करीत होती. पण

तिचें अंतःकरण वटवृक्षाशीं निराळेंच हितगुज करीत होतें. ती त्याला विचारीत होती, ‘ वृक्षराज, आज शेंकडों वर्षे तूं पाहतो आहेस, आणि आम्ही तुझी किती तरी वर्षे पूजा करीत आहोंत. पण खरं सांग, इथें येणाऱ्या सर्व स्त्रिया “ जन्मोजन्मीं हाच पति लाभो ” अशी तुझी खरीच प्रार्थना करतात काय ? तूं वयानं वृद्ध असलास तरी दरवर्षी पिकल्या पानांच्या रूपानं तूं आपलीं चुकीचीं जुनीं मतं बदलतोस आणि नव्या, चांगल्या कल्पनांची पालवी आपल्या फांद्यांवर खेळूं देतोस. तुला माझं म्हणणं समजणार नाहीं का ? दिलीपच्या आठवणीनें करपून जाणाऱ्या या दुर्दैवी मुलीच्या अंतःकरणाची तुला दया येत नाहीं का ? प्रियकरासाठीं जीव टाकणाऱ्या सर्वच मुली उल्लू असतात, एखादीहि श्रद्धेनं प्रेम करणारी नसते असं आम्हां माणसांप्रमाणंच तुलासुद्धां वाटतं काय ? इतकीं वर्षे अनुभव घेऊन समंजस, प्रेमळ झालेल्या तुझ्या मनाला माझी प्रार्थना आहे कीं, श्रीमंतांचं चांगलं होऊं दे. पण देवा, पुढल्या जन्मीं दिलीपची, माझ्या आवडत्या दिलीपची, राणी होण्याचा आशीर्वाद मला दे. देशील का ? ’

आणि तिनें डोळे उघडले, इतर बाया आपल्याकडेच पहात असल्याचें ध्यानांत येतांच ती चपापली. धडधडत्या छातीवर डावा हात दाबून धरीत ती मनाशींच म्हणाली, “ माझ्या मनांतली गोष्ट यांना समजली तर नाहीं ? ” या शंकेनें ती धीट मुलगी कावरीबावरी झाली. गोंधळून गेली. कां झालं असं ?... ”

ग्रामीण जीवनावरहि लेखिकेनें “ वहिनी ? मग कोण ? ” या सारख्या सुंदर प्रीतिकथा लिहिल्या असून बोलीभाषेंतील खटकेबाज संवादहि आत्मसात् करून लिहिलेले आहेत.

“ एकेकाचा स्वभाव ” ही वसुंधराबाईंची एक अभिनव कथा आहे. घरगुती प्रसंगांतून अगदीं साध्या गोष्टींना कलात्मक घडण लाभली असतां, त्या किती आकर्षक होऊं शकतात याचें हें एक उत्तम चित्रण आहे. नणंद, जाऊ, दीर, पति व स्वतः आपण अशा विविध मनोवृत्तींच्या माणसांच्या स्वभावाचें मोठें मार्मिक विवेचन या कथेंत लेखिकेनें केलें असून तें अतिशय चटकदारहि झालें आहे.

वसुंधराबाईंची विचारसरणी बरीचशी पुरोगामी थाटाची आहे. “ शोभा गेली ” या कथेंत त्यांनीं आपल्या विधवा सुनेचा सासू सासऱ्यांनीं समाधानानें पुनर्विवाह घडवून आणल्याची माहिती दिली आहे ! वास्तविक सर्वसामान्य स्त्री-स्वभावाला ही गोष्ट पटण्यासारखी नाहीं. परंतु काळाचा महिमा लक्षांत घेऊन लेखिकेनें मांडलेली ही अशा प्रकारची विचारसरणीहि पुष्कळांना पटण्यासारखी आहे. वाचकांना कथेंत संसाराचें वास्तवचित्र किंवा निदान घडूं शकेल असें सत्याभास निर्माण करणारें चित्र तरी हवें असतें. त्या दृष्टीनें पाहिलें तर वसुंधरा-बाईंच्या कित्येक भावकथा अपवादात्मक कथेच्या सदरांत मोडतील असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं.

पुरोगामी विचारसरणीच्या जोडीलाच लेखिकेनें जुन्या काळच्या चालीरीतींनाहि जवळ केलेलें आहे. पुष्कळशा म्हाताऱ्या बायकांना उठतां बसतां म्हणींचा वापर करण्याची संवय असते. अशाच एका प्रेमळ म्हाताऱ्याबाईचें जीवनचित्र लेखिकेनें " सोडीव रे नारायणा ! " या कथेंत चित्रित केलेलें आहे.

भरीव कथानक, पुरोगामी विचारसरणी, जुन्या चालीरीतींचा समर्पक उठाव, विषयाची विविधता, वास्तव चित्रण आणि चटकदार भाषाशैली हें या लेखिकेच्या कथेचें उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. परंतु अगदीं अलीकडच्या काळांतील त्यांची कथा हे गुण सोडून अगदींच सामान्य होत चालली आहे.

गेल्या दहा-बारा वर्षांमध्यें येथवर विचार केलेल्या निरनिराळ्या लेखिकांच्याप्रमाणेंच कांहीं जुन्या व नव्या लेखिकांनींहि आणखी बरेंचसें कथालेखन केलेलें आहे. अशा लेखिकांच्यामध्यें यमुनाबाई शेवडे, इंदिरा संत, सुमती क्षेत्रमाडे, नलिनी सुखटणकर, योगिनी जोगळेकर, शिरीष अत्रे, स्नेहलता दसनूरकर, चारुशीला गुप्ते, सुशीला चिकटे, तारा रेड्डी, नलिनी शहा, लता सप्रे, अंबुजा सोनटक्के इत्यादींचा समावेश होतो. यांपैकीं बहुतेक सर्वांचे कथासंग्रह प्रकाशित झालेले असून वेगवेगळ्या नियतकालिकांतूनहि त्यांचें लेखन पुष्कळशा प्रमाणांत प्रकाशित झालेलें आहे.

परंतु कांहीं अपवाद सोडले तर स्वातंत्र्यकाळांतील लेखन म्हणून या कथांनीं कांहीं घवघवीत भर मराठी साहित्यामध्यें टाकली आहे अशांतली मात्र गोष्ट नाहीं. राजकीय वातावरणाची पार्श्वभूमि फार तर कोणी घेतली असेल, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं किंवा स्वतंत्र विचारांच्या पेरणीसाठीं म्हणून खास असें कथालेखन स्त्रियांनीं केलेलें नाहीं, हें तितकेंच खरें आहे.

वास्तविक या कालखंडांत स्त्रिया नोकरीच्या निमित्तानें, समाजकार्याच्या निमित्तानें, राजकारणाच्या निमित्तानें अशा घराबाहेर पडूं शकल्या आहेत. बाहेरचें जीवन त्यांनीं अभ्यासिलें आहे. महिला मंडळांच्या किंवा इतर सामाजिक वा राजकीय व्यासपीठावरून वक्तव्य करण्याची संधि त्यांना मिळालेली आहे. कित्येकींच्या घरांत समाजकारण किंवा राजकारण शिजलें असण्याचीहि शक्यता आहे. तरीपण त्या वातावरणाचा ठसा पार्श्वभूमीपलीकडे त्यांच्या कथांतून उमटूं नये याचें आश्चर्य वाटतें.

कथाविषयांचें क्षेत्र अलीकडे एवढें व्यापक झालें असूनहि त्याचा ठसा फारसा या लेखनांत कुठें उमटलेला असूं नये हेंहि नवलच होय. नाहीं म्हणायला नलिनी सुखटणकरांनीं पत्नीची बाजू मांडतांना कांहींसा बंडखोरपणा व्यक्त केला आहे. आणि तारा रेड्डींनीं दलितांचीं चित्रें काढतांना समाजवादी वास्तववादाचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नलिनी शहा किंवा अंबुजा सोनटक्के यांनीं खेड्यांतील जीवन आपल्या कथांतून आणलें, परंतु योगिनी जोगळेकरांच्या 'सरूआक्काचें

लगीन ' या कथेचें यश त्यांना मिळालेलें नाहीं. त्याचप्रमाणें ' अनुराधे ' च्या १९६० च्या दिवाळी अंकांतील अंबादास अग्निहोत्रींनीं चितारलेली " मानिनी " पण कोणाला साधलेली दिसत नाहीं !

स्त्रियांनीं लिहिलेल्या लघुकथेचा अशा पद्धतीनें येथवर विचार केल्यानंतर एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते ती अशी कीं, हा वाङ्मय प्रकार स्त्रियांनीं अधिक मोठ्या प्रमाणांत हाताळलेला आहे. तसेंच फारसें शिक्षण न घेतलेल्या स्त्रीपासून तों उच्च प्रकारचें शिक्षण घेतलेल्या स्त्रीपर्यंत सर्वांनीं या प्रांतांत लेखन केलेलें आहे. तसेंच मनांत येईल त्या भावनेला कलात्मक वळण देऊन तिचा आविष्कार करण्यासाठीं लघुकथेचें माध्यम स्त्रियांच्या लेखणीनें प्रामुख्यानें स्वीकारलेलें आहे, असेंहि म्हणावयास हरकत नाहीं.

मराठींतील लघुकथेची जोपासना स्त्रियांच्यापेक्षांहि अधिक मोठ्या प्रमाणावर पुरुष लेखकांनीं केलेली आहे. तसेंच विषयाच्या दृष्टीनें व कल्पकतेच्या दृष्टीनें त्यांची कथा ही अधिक विशाल क्षेत्रांतून वावरते आहे. त्याचबरोबर शंकर पाटील, रणजित देसाई, व्यंकटेश माडगूळकर, ग. ल. ठोकळ, दिनकर द. पाटील, शंकरराव खरात किंवा नामदेव व्हटकर व द. मा. मिरासदार यांच्या सारख्यांनीं भरघोस ग्रामीण कथालेखन केलेलें आहे. त्याचा स्त्रियांच्या कथालेखनांत मोठाच अभाव दिसून येतो. तसेंच पु. ल. देशपांडे यांच्या कथेसारखा सहजसुंदर विनोदहि स्त्रियांच्या लेखनांत फारसा आढळत नाहीं.

आजपर्यंत स्त्रियांनीं जें कथालेखन केलें आहे, त्यांमध्यें विषयाच्या दृष्टीनें पाहिलें तर असें दिसून येतें कीं, बहुतेक सर्व स्त्रियांनीं आपल्या कथेचा विषय म्हणून स्त्रीजीवनांतील विविध अंगें आणि आपलें कुटुंब यांचीच प्रामुख्यानें निवड केली आहे. आणि त्याला कारण शोधावयाचें झालें तर स्त्रीचा मूळचा स्वभावधर्मच तसा आहे, असें म्हणतां येईल. स्त्री आणि पुरुष हीं एकमेकांना पूरक असलीं तरी संसारामध्यें त्यांच्यावर पडणारी जबाबदारी मात्र भिन्न असते. पुरुष हा घराबाहेरचे उद्योग करून आपल्या कुटुंबाच्या पोषणासाठीं कमावीत असतो आणि आपलें घर मुलेंबाळें सांभाळून स्त्री ही गृहिणीचें कर्तव्य पार पाडीत असते. म्हणून साहजिकच तिचा ओढा घरकामाकडे अधिक असतो. त्यामुळें तिच्या स्वभावाची घडण त्याच मार्गानें झाली असली, तर नवल नाहीं.*

* Women evinced a distinctive interest in domestic affairs and aesthetic objects and occupations; they distinctively prefer more sedentary and indoor occupations, and occupations more directly ministrative, particularly to the young, helpless, the distressed. "

Psychometric Tests : L. M Terman and C. C. Miles.

सामान्यतः उत्कृष्ट प्रकारच्या ललित वाङ्मयाच्या निर्मितीला अनुभूतीचा पहिला स्पर्श व्हावा लागतो. प्रसिद्ध हिंदी साहित्यिक स्वर्गीय श्री. प्रेमचंद यांनीं तर "साहित्यका उद्देश"‡ या आपल्या निबंधांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, "कवि या साहित्यकारमें अनुभूतिकी जितनी तीव्रता होती है, उसकी रचना उतनी ही आकर्षक और उंचे दरजेकी होती है!" त्यामुळेंच स्वानुभवाच्या लेखनाला केव्हांहि अधिक किंमत आहे; आणि दुसरें म्हणजे ज्या एका विशिष्ट परिस्थितींत लेखकाच्या मनाची वाढ झालेली असते, त्याच परिस्थितीचे पडसाद त्या लेखकाच्या लेखणींतून उमटणें अगदीं स्वाभाविक असते. त्या दृष्टीनें पाहिलें तर मागें आलेल्या अनेक कथांमध्यें गुंफिलेले स्त्री–जीवनांतील विविध अनुभव हे औरस संततीप्रमाणें त्यांचें स्वतःचे आहेत; आणि तशा प्रकारच्या अनुभवांची पुरुषांनीं आपल्या कथेंत केलेली गुंफण ही दत्तक घेतलेल्या मुलाप्रमाणें आहे, असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं!

स्त्रियांनीं लिहिलेल्या या कथांचें वैशिष्ट्य साकल्यानें सांगावयाचें म्हटलें तर असें सांगतां येईल कीं, कौटुंबिक जिव्हाळा, स्त्री-जीवनाकडे विशेष सहानुभूतीनें पहावयाची दृष्टि, स्त्री स्वभावानुसार होणारा उपमा दृष्टांतांचा उपयोग, स्त्रीबद्दलचा समाजाचा विकृत दृष्टिकोन पाहून तिच्या मनांत उत्पन्न होणारी अन्यायाची तीव्र जाणीव व तदनुसार झालेली विषयाची निवड आणि सहजसुलभ अशी घरगुती पण सफाईदार भाषाशैली, इत्यादि या कथांचे विशेष होत. त्यामुळें असें झालेलें आहे कीं, या कथा एक प्रकारचें एकांगी जीवनदर्शनच घडवितांना दिसतात. सौ. सिंधु गाडगीळ यांच्या वैमानिक जीवनावरील कथांसारख्या कांहीं थोड्या कथा सोडल्या, तर घराबाहेरचें जीवन फारसें कोठेंच आढळत नाहीं.

घरगुती जीवनाचा मात्र स्त्रियांनीं उत्तम रीतीनें आविष्कार केलेला आहे. अर्थात् हें मान्य केलें तरी पुरुषांनीं आपल्या कथांमधून घरगुती जीवन अजिबातच रंगविलें नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. श्री. य. गो. जोशी यांची "शेवग्याच्या शेंगा" ही कथा उदाहरण म्हणून घेतां येईल. या कथेंत एकत्र कुटुंबांत दिसून येणारा जिव्हाळा फारच सुंदर रीतीनें लेखकानें दर्शविला आहे. शेवग्याच्या शेंगामुळें बरेच दिवस दुरावलेलीं भावंडें येथें एकत्र आल्याचीं दाखविलीं आहेत.

"वटसावित्री" सारख्या आख्यायिकेवर आजवर अनेकांनीं लिहिलें. पण त्या सर्वांमधूच "हाच पति जन्मोजन्मीं लाभावा" असाच सूर प्रामुख्यानें निघाला. पण वसुंधरा पटवर्धन यांनीं आपल्या "कां झालं असं?" या कथेंत मागें सांगितल्याप्रमाणें या विषयाला दिलेली कलाटणी अत्यंत अभिनव आहे.

‡ साहित्यका उद्देश, साहित्य–शिक्षा पान १०

वटवृक्षाला त्यांनीं विचारलेला सडेतोड प्रश्न खरोखरच फक्त स्त्रीहृदयालाच जाणवणारा आहे. स्वानुभवाचें अधिष्ठान या भावनेच्या बुडाशीं आहे. नुसत्या कल्पनेनें मनांत डोकावणारा हा प्रश्न नव्हे. तीच गोष्ट प्रो. ना. सी. फडके यांच्या "कश्मीर कहाणी"* बद्दलहि म्हणतां येईल. या कथेंत काश्मीरच्या प्रवासांत असतांना घडलेल्या प्रसंगांना फडक्यांनीं अतिशय जिव्हाळ्यानें एकत्र गुंफिलेले आहे. स्त्रियांच्या लेखणींतून असलीं प्रसंगवर्णनें अनुभवाच्या अभावीं सहसा बाहेर पडावयाचीं नाहींत.

स्त्री आणि पुरुष यांच्या अवलोकन क्षेत्राच्या भिन्न स्वरूपाचें द्योतक म्हणून हे दोन प्रसंग पहाण्यासारखे आहेत. श्री. वि. स. खांडेकर यांच्या "नवा खिसा" या कथेंमधील कल्पना देखील अशीच अभिनव आहे. पारिजातकाच्या नाजुक पण मोहक फुलांची जोपासना तितक्याच सहृदयतेनें व्हावी अशी कल्पना खांडेकरांनीं येथें मांडली असून, त्यासाठीं ह्या फुलांचें सौंदर्य रतिभरहि कमी होऊं नये म्हणून एक नवा खिसा हवा असल्याचें म्हटलें आहे. हीच गोष्ट जर स्त्रीनें लिहिली असती तर या फुलांची रवानगी पुष्कळ अंशीं हातांतल्या चिमुकल्या रुमालांत ठेवण्यासाठीं नाहींतर वेणी माळण्यासाठींच होण्याचा संभव अधिक !

कलाविलासाच्या दृष्टीनें पाहिलें तर स्त्री आणि पुरुष या दोघांनींहि लिहिलेल्या कथांमधून गुणदोष हे सारख्याच प्रमाणांत निघणें शक्य आहे. तथापि स्त्रियांनीं लिहिलेल्या या लघुकथांमधील कलात्मकता व तंत्राचा अभ्यासच पहावयाचा म्हटला तर तो भाग पुरुषांच्या मानानें कांहींसा कमी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण पुरुषांप्रमाणें स्त्रियांना कलेचा स्वतंत्र अभ्यास करावयास म्हणावी जशी सवड मिळत नाहीं हें एक आणि दुसरें म्हणजे एखादा वाङ्मयीन कलाप्रकार अभ्यासून तो हाताळण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति अजून म्हणावी तशी वळलेलीहि नसावी ! शिवाय सर्वस्वीं भिन्न अशा परिस्थितीची गुंफण करणाऱ्या या कथांना पुरुषांच्या कथेला लागणारी कसोटी लावून तरी कसें चालेल ? फार तर एवढें म्हणतां येईल कीं, मराठींतील लघुकथेची तिच्या भिन्न लिंगी साहित्य भक्तांकडून होणारी जोपासना समाधानकारक रीतीनें प्रगतिपथावर आहे.

कादंबरी

गोष्टीवेल्हाळपणा हा मानवी स्वभावाचा एक स्वाभाविक व प्रमुख असा विशेष गुणधर्म आहे. त्या कारणानें गोष्टी सांगण्याचें व ऐकण्याचें वेड मानवी

* किर्लोस्कर, मार्च १९५०.

मनाला मानवाच्या जन्मापासूनचें आहे. स्थळकाळाचें किंवा वयोमर्यादेचें बंधन मानवी मनानें या वेडाच्या पूर्ततेच्या पायीं कधीं मानलें नाहीं. उलट या मनोभावांत जीवनांतील श्रेष्ठ प्रकारचा आनंदच उपभोगला. त्यामुळें इतर देशाच्या प्रमाणेंच भारतांतहि गोष्टींची पैदास भरपूर झाली. जीवनांत आलेल्या सर्व प्रकारच्या बऱ्यावाईट व्यावहारिक व अद्‌भुतरम्य कल्पनांची खैरात मानवानें या गोष्टींमधून केली. आणखी अद्‌भुताचें आकर्षण व जीवनांतील आदर्शांचें चित्रण हीं वैशिष्ट्यें आपल्या प्रारंभीच्या कथासाहित्यांत प्रामुख्यानें गुंफून दिली.

त्यामुळें आजच्या काळांत साहित्याच्या क्षेत्रांत आढळणारी लघुकथा किंवा कादंबरी ही वाङ्मय प्रकार म्हणून नवीन वाटत असली, तरी तिचें मूळ बीज फारच पुरातन आहे असें म्हणतां येईल. जुन्या काळांतील गुणाढ्याची 'बृहत्कथामंजरी', सोमदेवाचा 'बृहत्कथासरित्सागर', रामायण, महाभारत, आजीबाईच्या तोंडच्या नवलकथा, यक्षकिन्नरांच्या गांधर्वकथा, कहाण्या, नीतिकथा इत्यादि कथा प्रकारांमधून आजच्या कथा, कादंबरीचें अस्तित्व सांपडतें.

एक काळ असा होता कीं, या जुन्या कथांनीं आपला पसारा जगभर मांडला होता. प्रत्येक भाषेंत त्यांचीं रूपांतरें झालीं होतीं. एवढेंच नाहींतर लोकजीवनाशीं त्यांचा निकट संबंध होता. त्यामुळें भारतीय लोककथेबाबत बोलावयाचें म्हटलें तर असें सांगतां येईल कीं, " भारतीय लोककथा एका लोकसमुहापासून दुसऱ्या लोकसमुहाकडे इतक्या लवकर भटकत गेल्या कीं, आपणाला युरोप आणि आशियाखंडांतील बहुतेक सर्व प्रदेशांतून इतकेंच नव्हेंतर आफ्रिकन लोकांतही त्या अंशरूपानें दिसतात. "*

मराठी भाषेंतील गद्य व पद्य या दोन्ही वाङ्मयीन माध्यमांतून जें कथावाङ्मय निर्माण झालें त्याचे धागेदोरे बाराव्या शतकांत सांपडतात. लहान मुलांसाठीं त्याकाळीं नीतिकथा लिहिल्या गेल्या. महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामींच्या कारकीर्दींत या कथांचा अवतार झाला. रसाळपणें त्यांची जोपासना झाली. रामदेवरायांच्या सभेंत तर मराठी प्रबंधांचें वाचन केलें जाई ! आणि त्या संदर्भांत पुढें मग पौराणिक कथाहि रचल्या गेल्या.

परंतु इ. स. १३१८ त महाराष्ट्र देशावर मुसलमानांचें आक्रमण आलें व तेव्हांपासून पुढें ३०० वर्षें हा देश परक्यांच्या ताब्यांत गेला. त्यामुळें मराठी भाषेची दैना उडाली. फारशी शब्दांचा तिच्या अंतरंगांत भरणा झाला. तरीपण मराठी कवितेनें महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचें संरक्षण केलें. त्या कामीं मराठींतील लोकसाहित्यानें राखलेली आपली शुद्ध मराठी ठेवण उल्लेखनीय आहे.

* महाराष्ट्रीय ज्ञानकोश. वि. १०

यानंतरच्या काळांत छत्रपति शिवाजी महाराजांनीं जेव्हां स्वराज्याची मुहूर्तमेढ रोविली व महाराष्ट्रांत एक प्रकारचें नवचैतन्य निर्माण झालें, तेव्हां "प्रत्येक बाबतींत स्वाभिमानी बाणा प्रचारांत येऊं लागला. राज्यव्यवहारकोश निर्माण होऊन दरबारी भाषेचें स्वरूप पार बदललें. असंख्य संस्कृत शब्द पुनः प्रचारांत येऊन मराठी भाषा प्रौढ व संपन्न बनली. त्याबरोबरच राष्ट्राचा व्यवहार बहुविध झाल्यामुळें विचारविनिमयाला नवे प्रांत लाभले व भाषेचा व्याप वाढला."‡ लष्कर, आरमार, किल्ले वगैरे प्रकारचें नवेंच जीवन निर्माण झालें. न्यायमनसुबा मराठी भाषेंत होत गेला. इतिहासाचें लेखन घडूं लागलें आणि याच संदर्भात पुढें बखरींचा जन्म झाला. बखरवाङ्मयानें एक प्रकारचें नवीन कथावाङ्मय निर्माण केलें.

परंतु पेशवेकालानंतर इंग्रजी आमदान आली आणि कथेच्या विकासाला एक प्रकारें अडथळा निर्माण झाला. "स्वराज्य गेलें आणि पाठोपाठ सरस्वतीहि आम्हास विन्मुख झाली !...जुने खानदानी राज्य भोगलेले मुत्सद्दी, सरदार वगैरे अंतर्धान पावल्याप्रमाणें झाले ! राष्ट्राची वाचाच बसली !*"

इंग्रजी अमदान सुरू होण्यापूर्वी कादंबरीलेखनाची पार्श्वभूमि मराठीच्या प्रांतांत कितपत तयार होती याची एवढ्या विवेचनावरून कल्पना येते. म्हणजे चौकसपणानें जीवनमूल्यांचा विचार करणें व कल्पकतेला धरून मानवी प्रश्नांचा मूलतः विचार करणें हा जो कादंबरीचा मूळ दृष्टिकोण त्याचें अस्तित्व मुळांतच महाराष्ट्रांत होतें असा याचा उघड अर्थ होतो.

ब्रिटिशांच्या सहवासामुळें परभाषेंतील वाङ्मयाचा मराठी मनाला परिचय झाला. उच्च शिक्षण मिळूं लागलें. आणखी एखाद्या वाङ्मय प्रकाराचें तांत्रिक-दृष्ट्या अध्ययन करतां आलें. त्या कारणानें मराठींत भाषांतराचें युग सुरू झालें. सांचेबंद लेखनप्रकार आले. तसेंच इंग्रजी भाषेचें वळण असणारें लेखनहि अस्तित्वांत आलें.

पण त्यापूर्वींच्या काळांत हातिमताई, गुलबकावली व सिंहासनबत्तिशी यांसारख्या कथासंग्रहांनीं मराठी वाचकांच्या मनावर जबरदस्त मोहिनी घातली होती. अद्भुत रसाची बहार उडविली होती. तसेंच शृंगारालाहि वैचित्र्यानें खेळविलें होतें. त्याचा परिणाम कै. कृष्णशास्त्री चिपळोणकरांच्या "अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी" हें भाषांतरित पुस्तक निर्माण होण्यांत झाला आणि त्यामुळें कथावाङ्मयाची लोकप्रियता आणखीनच वाढत गेली.

इ. स. १८५७ मध्यें बाबा पदमजी यांची "यमुनापर्यटण" ही

‡ मराठीशाहींतील गद्य रचना. गो. स. सरदेसाई. वि. ज्ञा. वि. पु. ४८.

* द. वा. पोतदार. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार पा. १६

कादंबरी प्रकाशित झाली आणि मराठींतील कादंबरी वाङ्मयास प्रारंभ झाला. या कादंबरीसाठीं वापरण्यांत आलेली "बाबांची भाषापद्धति खरोखरच फार गोड आहे. त्यांत भक्तीचा जिव्हाळा आहे. समाज सुधारणेची तळमळ आहे. वाक्यें साधीं, शुद्ध, सरस व चटकदार आहेत. लिहिणें गंभीर व प्रौढ आहे. शब्द वेचक आहेत. वळण जरा कोंकणी आहे. त्यांची गोड व सुंदर टापटिपीची भाषा पाहतां बाबांची गणना उत्तम मराठी लेखकांत केली पाहिजे.* "

मराठींतील पहिल्या कादंबरीबाबत अनेक बरेवाईट मुद्दे उपस्थित झाले असले व मतभेदालाहि भरपूर वाव दिला गेला असला, तरीहि तिचें स्वरूप खात्रीनें महत्त्वपूर्ण आहे हें मात्र कोणीहि नाकबूल केलेलें नाहीं. या कादंबरीमधील ख्रिस्ती धर्माच्या पुरस्कारामुळें तिच्या लोकप्रियतेला बाध आलेला असला, तरी देखील बाबा पदमजींनीं आपल्या सूक्ष्म व व्यापक अवलोकनासाठीं वापरलेला नवा मानवतापूर्ण दृष्टिकोन उल्लेखनीय आहे.

इ. स. १८६१ मध्यें प्रकाशित झालेली कै. लक्ष्मणशास्त्री हेळवे यांची मुक्तामाला ही कादंबरी लेखकाच्या स्वभाषेवरील निष्ठेच्या दृष्टीनें विशेष आकर्षक झालेली आहे. या लेखनावर संस्कृतोद्भव शब्दकळांचा परिणाम झालेला असून साहित्यविषयक आदर्शहि त्यापुढें संस्कृत वाङ्मयांतले आहेत. म्हणजे निर्भेळ संस्कृत परंपरेवरून तिचा जन्म झालेला आहे असें थोडक्यांत म्हणतां येईल. संस्कृतांतील प्रसिद्ध महाकाव्यांचें बाह्य स्वरूप जरी पद्यात्मक असलें, तरी त्यांची अंतरंगाची धाटणी ऐतिहासिक कादंबऱ्यांप्रमाणेंच वाटते. महाकाव्याचे बाह्य गुणधर्म वाचीत असतां आपण कादंबरीचें तंत्रच विचारांत घेत आहोंत कीं काय असा भास होतो. महाकाव्याचे सर्ग म्हणजे कादंबरींतील प्रकरणेंच होत. त्यामुळेंच बाणभट्टाच्या "कादंबरी"स आदर्श मानून आपल्याकडील लेखकांनीं सुरवातीचें कादंबरी लेखन केलें आहे. अद्‌भुतरम्य कथानक हें त्यावेळच्या कादंबरीचा एक आवश्यक भाग झाला होता. शिवाय "रूढीच्या चाकोरींतून समाजाचा गाडा शतकानुशतकें चालत आला असल्यामुळें स्वातंत्र्य, ऐश्वर्य व प्रणय हें मानवी मनाला मोहिनी घालणारें त्रिभुवन त्याला सर्वस्वीं पारखें झालें होतें. कादंबरीचें विमान मिळतांच समाजाचें मन या त्रिभुवनांत स्वच्छंद विहार करूं लागलें. तेव्हां संस्कृतांतील बाणभट्टाच्या 'कादंबरी' वरूनच तत्समान मराठी वाङ्मय प्रकारास कादंबरी हें नांव पडलें याची येथें स्पष्ट कल्पना येते.

इंग्रजी असदानींत मराठी भाषेचें पुनरुज्जीवन होत असतांना मराठी भाषाशैलीनें दोन वळणें प्रामुख्यानें स्वीकारलीं. तीं म्हणजे इंग्रजी किंवा भाषांतरी हें एक वळण व शास्त्री किंवा संस्कृति हें दुसरें वळण होय.

* द. वा. पोतदार, मराठी गद्याचा इंग्रजी अवतार पा. ९६.

यमुनापर्यटण आणि मुक्तामाला या कादंबऱ्यांच्या नंतर रिसबुडांच्या कादंबऱ्यांनीं मराठींत एक वेगळेंच दालन निर्माण केलें. अनुप्रास, शाब्दिक कोट्या, कृत्रिम उपमा व उत्प्रेक्षा यांची त्यांनीं रेलचेल करून सोडली. तसेंच पात्र योजनेप्रमाणें भाषेची स्वाभाविकताहि राखली नाहीं. आणि शृंगारिकतेचा जसा जास्त प्रमाणांत उपयोग केला तसाच कादंबरीच्या रसपरिपोषासाठीं लोक-साहित्यांतील कलाप्रकारहि वापरले !

यानंतरच्या काळांत मराठींत अद्भुत व ऐतिहासिक कादंबरी निर्माण झाली. पण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस हरिभाऊ आपट्यांच्या लेखनानें मराठी कादंबरीला वैभवाचे दिवस दाखविले. समाजाभिमुखता व कलात्मक आनंद या मराठी कादंबरीच्या प्रारंभकालीं निर्माण होऊन नंतर विकास पावलेल्या दोन भिन्न वाटा हरि नारायणांच्या लेखननिर्मितींत एकत्र आल्या व एकजीवन होऊन गेल्या. त्यामुळें मराठी कादंबरीच्या वैभवाला, सामाजिक जीवनांतील परिणाम-कारकतेला व लोकप्रियतेला आगळा बहर आला.

मराठी कादंबरीच्या या वैभवशाली बहाराच्या कालांत मराठींत स्त्रियांनींहि कादंबरी लेखन केलें. काशीबाई कानिटकर या हरिभाऊंच्या समकालीन लेखिकेनें मराठी कादंबरीला चांगले दिवस दाखविण्यासाठीं वैशिष्ट्यपूर्ण हातभार लावला. काशीबाईंची भाषा सफाईदार होती. ध्येयवाद उल्लेखनीय होता. रसिकता अभिजात होती. अभिरुची सुसंस्कृत होती. निरीक्षण सूक्ष्म होतें. वर्णनें उठाव-दार होतीं. व्यक्तिरेखा—विशेषतः स्त्रियांच्या—जिवंत होत्या. लेखणींतील जिव्हाळा आणि कथनशक्ति डोळ्यांत भरणारी होती.

त्यामुळें काशीताई कानिटकरांच्या लेखनानें पुढील वीस पंचवीस वर्षांतील स्त्रियांच्या लेखन निर्मितीची नांदी गाईली. त्यांच्या लेखनांतील गुणविशेषांचाच आविष्कार त्यांच्या पुढील पिढीच्या स्त्रियांच्या कादंबरी लिखाणांतून झाला.

इ. स. १९२० नंतरच्या काळांत कादंबरीचा विकास झपाट्यानें होत गेला. वाचकवर्गाची खूप वाढ झाली. त्यांत स्त्रियांचा भरणा अधिक होता. थोडयाबहुत शिकलेल्या स्त्रिया आवडीनें कथा कादंबऱ्या वाचूं लागल्या. त्यामुळें त्यांना वाचनाची गोडी तर लागलीच पण त्यांच्या विचारांनाहि एक प्रकारचें वेगळें वळण लागलें. आणि त्या संदर्भांत निरनिराळ्या लेखिका कादंबरी लेखन करायला पुढें आल्या. स्त्रीजीवनांतील समस्यांचें स्त्रियांच्याच दृष्टिकोनांतून विवरण होऊं लागलें. म्हणजे जें स्त्रियांनाच बोचेल व जें पुरुष लेखकांना शोधूनहि दिसणार नाहीं, अशा अनुभूतींची एखादी स्पर्शछटा तरी त्यांच्या कथांमध्यें दिसून येऊं लागली. वस्तुनिष्ठ मनोवृत्तींतून त्यांनीं आपलें लेखन केलें.

वाढत्या शिक्षणाबरोबरच स्वतंत्रपणें विचार करण्याची नजर स्त्रीच्या लेख-णीला लाभल्याकारणानें तिची कल्पनाहि पल्लेदार झाली. जीवनाविषयीं बुद्धिनिष्ठ-

पणानें व विश्लेषणपूर्वक विचार करण्याची कुवत तिच्यामध्यें आली. त्यामुळें वैवाहिक जीवनांतील समस्यांवर स्त्रियांनीं स्वाभाविकच अधिक भर दिला व आपल्या खास अनुभवाचें व परिचयाचें जग कादंबरींतून चित्रित केलें.

वैवाहिक जीवनांतील अनेक समस्यांच्यामुळें उद्‌भवणाऱ्या सुखदु:खांची—विशेषत: दु:खांची—जबाबदारी स्त्रीसुलभ न्यायानें सामान्यत: ती बहुअंशी मुलीच्या आईबापांवर लादली जाते; हें लक्षांत घेऊन स्त्रियांनीं आपल्या कादंबरीची नायिका निरपराध, दुर्दैवी व असाहाय्य अशी चित्रित करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां या संदर्भात जानकीबाई देसाईंच्या गृहलक्ष्मी (१९१५), सौभाग्यतिलक (१९१८), मूळ नायिका (१९२५) या कादंबऱ्या किंवा कमलाबाई सोहनींची वादळा-पूर्वी (१९३४), शांताबाई नाशिककरांची लग्नाचा बाजार (१९२९), कमलाबाई बंबेवाल्यांची बंधमुक्ता (११३०) किंवा इंदिराबाई सहस्रबुद्धे यांच्या रूपांतरित कथा अवश्य पहातां येतील.

यांपैकीं कांहीं कादंबऱ्यांवर मामा वरेरकरांच्या लेखनाची छाप पडलेली दिसून येते, तर कांहींच्यावर फडक्यांच्या लेखनाचा संस्कार घडलेला आढळून येतो. म्हणजे कांहींनीं वरेरकरांच्या कादंबऱ्यांतील सुधारणाप्रिय वृत्ति व ध्येयवाद उचललेला आहे, तर कांहींनीं रचना व वर्णन पद्धतीच्या बाबतींत फडक्यांची लेखन-पद्धति स्वीकारलेली दिसते. तरीपण स्त्रियांनीं या प्रांतांत जें लेखन केलें आहे त्यांत स्त्रीजीवनविषयक म्हणून जी वेगळी दृष्टि वापरलेली आहे ती कोठेंच लपलेली नाहीं.

इ. स. १९२० नंतरच्या कालखंडांत एकंदरीनें कादंबरी वाङ्मयाच्या प्रांतांत जो विकास घडून आला आणि ज्या प्रकारचें वळण या वाङ्मयप्रकारानें उचललें, त्याबद्दल मराठींतील एक ज्येष्ठ कादंबरीकार कै. वा. म जोशी यांनीं आपल्या " विचार सौंदर्यांत " सांगितलें आहे कीं—

" हरिभाऊ आपट्यांनीं मराठी कादंबरीला अद्‌भुततेच्या बालोचित कल्पना विहारापासून परावृत्त करून वास्तवतेच्या भूमिकेवर आणून तेथील रमणीय, चिंत-नीय व लक्षणीय दृश्यांचा तिला नाद लाविला; आणि तिच्या क्रीडेला व्यवस्थित, कलासक्त व विचारगर्भ स्वरूप दिलें. नंतर " रागिणी "नें तिला कांहींसें अंतर्मुख करून किंचित् गंभीर स्वरूपाच्या अंत:कलहाकडे मधून मधून लक्ष देण्याचा थोडासा नाद लाविला. प्रो. फडके यांनीं तिची सुशिक्षित श्रीमंतांशीं ओळख करून देऊन सुसंस्कृत प्रेमलीला तिला शिकविल्या; आणि त्यांनीं तिची कलादृष्टि विशेष जागरूक व आग्रही केल्यानें कलानैपुण्यामुळें उत्पन्न होणारी " जादुगिरी " तिच्या डोळ्यां-पुढें चमकूं लागली. खांडेकरांनीं उपमा उत्प्रेक्षादि अलंकारांनीं तिला सजविली, पण अलंकारोन्मत्त न करतां तिला जीवनाकडे केवळ क्रीडादृष्टीनेंच नव्हे तर हळुवार चित्तानें पाहाण्याची संवय लावली. ना. ह. आपटे यांनीं तिला संसारविषयक सदुपदेशाचे पाठ दिले. विभावरी शिरूरकरनें तिला लालित्ययुक्त औधत्याभास

मधून मधून आकर्षक होतो हें एक विलोभनीय तत्त्व शिकविलें. अशा रीतीनें अनेकांनीं, प्रौढ तरुणांनीं, स्त्रीपुरुषांनीं कादंबरीच्या वाढत्या वयाला अनुसरून तिचें जीवन सुविनीत व कलापूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे."

या कालखंडांत स्त्रियांनीं जें कादंबरीलेखन केलें आहे त्याचा प्रारंभ सौ. इंदिराबाई सहस्रबुद्धे यांच्या लेखनानें होतो.

● ● ●

इंदिराबाई सहस्रबुद्धे

गोदावरी (१९१७), केवळ ध्येयासाठीं (१९२४) व बाळुताई धडा घे ! (१९३१) या तीन कादंबऱ्या इंदिराबाई सहस्रबुद्धे यांनीं लिहिलेल्या आहेत. त्यांपैकीं ' गोदावरी ' ही कादंबरी ही एका विधवेच्या दु:खाची कहाणी असून तिच्यांत विधवा विवाहाची गरज सांगितलेली आहे. ' केवळ ध्येयासाठीं ' ही एक रूपांतरीत कथा असून तिच्यांत विवाहामुळें स्त्रीचें स्वातंत्र्य नष्ट होत असल्यामुळें विवाह संस्थेची आवश्यकताच नसल्याचें प्रतिपादिलें आहे ! 'बाळुताई धडा घे !' ह्या कादंबरींत लेखिकेनें स्वत:ला सुधारक म्हणविणाऱ्या लोकांचा ढोंगीपणा उघड करण्याचा प्रयत्न केला आहे.

इंदिराबाईंनीं आपल्या या लेखनांतून स्त्री जीवनांतील विविध प्रश्नांचा या प्रकारें विचार केलेला असून स्त्रियांच्या सामाजिक दु:खांना वाचा फोडलेली आहे.

● ● ●

पिरोज आनंदकर

" माझं बाळ तें " (१९२७) ही कादंबरी पिरोजबाई आनंदकरांनीं सुशिक्षित स्त्रीजीवनांतील एक दोन महत्त्वाच्या प्रश्नांवर लिहिलेली आहे. या कादंबरीतील मूळ विषय अभिनव आहे. गृहव्यवस्था व शिशुसंगोपन हीं गृहिणीच्या जीवनांतील मूलभूत कर्तव्यें सोडून देऊन समाजकार्याच्या मागें लागणाऱ्या स्त्रियांची किती चूक होते हें इथें सांगण्याचा प्रयत्न झालेला आहे.

या कादंबरींत वापरलेली—" बरोबर आणणं झालं होतं ", " तिकडे म्हणायचें ", " सुचवायचं झालं आहे ", " स्वारींनीं विचारलें ", इत्यादि अशा प्रकारची वाक्यरचना त्याकाळच्या स्त्रियांच्या तोंडीं असलेल्या भाषेचें वैशिष्ट्य दर्शवितें.

प्रेमविवाहाचा पुरस्कारहि या कादंबरींत केलेला दिसून येतो. आपणाला

हवा तो पति आपण निवडावयाचा ही त्यावेळच्या समाजाला क्रांतिकारक वाटणारी गोष्ट येथें उघडपणें चर्चिलेली आहे व ती या कादंबरीचें वैशिष्ट्य होय.

• • •

आनंदीबाई जयवंत

आनंदीबाई जयवंत यांच्या कादंबऱ्या संख्येच्या मानानें कमी असल्या तरी गुणांच्या मानानें वरच्या दर्जाच्या आहेत. स्त्रीहृदयांत चालणारें भावनांचें वादळ अत्यंत कुशलतेनें रंगविण्यांत त्यांची लेखणी वाकबगार आहे. पुरुषाच्या पराक्रमावर स्त्री प्रेम करते याची सत्यता त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांमधून ठिकठिकाणीं दर्शविलेली आहे.

" जगाशीं बंडखोरी " (१९३१) या कादंबरींत आनंदीबाईनीं समाज परिस्थितीविरुद्ध बंड पुकारून वागणाऱ्या केदार व मल्लिका या प्रेमिकांची प्रेमकथा रंगविलेली आहे. " कुळकथे " मध्यें परिस्थितीशीं झगडून स्वावलंबनानें जीवनाची गाडी हाकारीत लहानाचा मोठा होत गेलेल्या तरुणाची कथा आहे; आणि " उर्मिलें " त (१९३८) हिंदु मुलींचा आदर्श कसा असावा, भोंवतालची परिस्थिति असते त्याप्रमाणें त्यांच्या मनावर बरेवाईट संस्कार कसे घडत जातात, त्यासाठीं आईवडिलांनीं आपल्या मुलांना कुठपर्यंत स्वातंत्र्य द्यावें, त्यांच्या मनावर वाईट संस्कार ठसविले जाणार नाहींत याची किती काळजी घ्यायला पाहिजे आणि योग्य ती काळजी घेतली असतां मुलें सहसा वाह्यात होऊं शकणार नाहींत इत्यादींचें हृदयंगम चित्र रेखाटलेलें आहे.

आनंदीबाई स्वतः उत्तम प्रकारच्या चित्रकार आहेत. त्यामुळें कुंचल्याच्या एकेका फटकाऱ्यासरशीं कागदावर उमटणारें मनोवेधक चित्र त्या जितक्या तन्मयतेनें चितारत, तितक्याच तन्मयतेनें त्यांनीं आपल्या मनांतील कल्पनांना सत्यसृष्टीच्या पडद्यावर शब्दांतून खेळविलेलें आहे आणि जगासमोर वस्तुस्थितीचें सुंदर चित्र ठेविलेलें आहे.

साधीच परंतु अतिशय चटकदार भाषा, परिणामकारक संवाद, प्रसंगांचा चित्तवेधक उठाव, कांहींसा प्रादेशिक वातावरणाचा स्वाभाविक परिपोष, मनोवेधक प्रसंगवर्णन, सूक्ष्मांतील सूक्ष्म दर्शविणारें घडीव स्वभावलेखन, स्त्रीहृदयांतील नाजूक भावनांचें आकर्षक नृत्य आणि त्यामधून स्वाभाविकरीत्या प्रगट होणारा भावनांचा खेळ, आणि या सर्वांबरोबर जात असतांना दिसून येणारी सहृदयता इ. ह्या गोष्टी आनंदीबाईच्या लेखनाचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येतील. त्यांचें लिखाण वाचीत असतांना कुठेंहि न खटकतां अगदीं सहजसुलभतेनें ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जाण्याची सोय त्यांनीं करून ठेविली आहे.

आजवरच्या लेखिकांनीं निर्माण केलेल्या वाङ्मयांत सहसा न आढळणारे समरप्रसंग व पुरुष पात्रांचें उत्तम प्रकारचें स्वभावलेखन या गोष्टी येथें बऱ्याच प्रमाणांत दिसून येतात.

आनंदीबाईनीं समरप्रसंग रेखाटण्यांत दाखविलेलें अप्रतिम कौशल्य "उर्मिले" मधील "काळरात्र" या प्रकरणांत दिसून येईल. निसर्गाच्या क्रौर्याच्या पार्श्वसंगीतावर मकरंदाच्या कृष्णकृत्याचें रेखाटलेलें चित्र या दृष्टीनें खरोखरच अत्यंत उल्लेखनीय असें आहे. या ठिकाणीं कांहीं भयंकर वाटणारे प्रसंग स्त्रीहृदयांतून फारसे आविष्कृत होत नसले, तरी ते जेव्हां आविष्कृत व्हावयाचा प्रयत्न करतात, तेव्हां किती कुशलतेनें प्रगट होतात, याची कल्पना येते.

एखाद्या व्यक्तीविषयीं स्त्रीच्या हृदयांत प्रेम निर्माण झालें आणि ती व्यक्ति सहजासहजीं तिला आपलीशी करतां आली नाहीं, तर त्या व्यक्तीच्या प्राप्तीसाठीं ती किती संकटें निर्माण करते आणि आपणहून त्यांत उडी टाकून कशी बाहेर पडूं शकते, याचें चित्र लेखिकेनें "जगाशीं बंडखोरी" चित्रित करतांना मल्लिकेच्या द्वारें रेखाटलें आहे.

आनंदीबाईच्या लेखणींतून उतरलेलें विविध पात्रांचें स्वभावलेखन अतिशय हृदयस्पर्शी आणि परिणामकारक झालेलें आहे. पाश्चात्य जीवनाशीं एकजीव झालेली परंतु परिस्थितीनें बदलेली उर्मिला असहाय स्थितींत असतां प्रथम तिला गांवरान वाटणारा सदानंद जेव्हां ती जवळून पाहते व त्याचे विशाल अंतःकरण जाणते तेव्हांची विश्वासानें त्याच्या खांद्यावर मान टाकणारी उर्मिला आनंदीबाई जेव्हां जिव्हाळ्यानें रंगवितात, तेव्हां पुरुषांच्या ठायीं असणारा सद्भावहि त्या विसरत नाहींत हें विशेष होय. विद्येनें विभूषित असूनहि साधी रहाणी पत्करलेला, शेतकरी जीवन जगणारा, सर्वांना आपल्या प्रेमळ वागणुकीनें हवा हवासा वाटणारा, मकरंदाच्या द्वेषाला न जुमानतां त्याला सुसरीच्या तडाख्यांतून सोडवितांना जिवावरचा प्रसंग ओळखून वागणारा, सुधाताईशीं बंधूच्या नात्यानें अगदीं मोकळ्या मनानें वागणारा आणि अखेरीस अविवाहित स्थितींत माता होऊं पहाणाऱ्या उर्मिलेला प्रेमानें जवळ घेऊन आणि तिला आपल्या विशाल अंतःकरणाचा आधार देत "पण मी तुला पतित समजतच नाहीं." असें आपुलकीनें सांगणारा थोर अंतःकरणाचा सदानंद आनंदीबाईनीं खरोखरच फार चांगल्या प्रकारें रंगविलेला आहे. मकरंदासारखा खलनायकहि लेखिकेच्या लेखणींतून तितक्याच प्रभावानें उतरलेला आहे.

स्त्रियांमध्यें असणारे दोष उघडपणें उर्मिलेसारख्या स्वभावरेखांद्वारें मांडून आनंदीबाईनीं स्त्रियांच्या लेखनाला वास्तवतेचें मैदान आणखीनच खुलें करून ठेविलें आहे त्याचप्रमाणें मुख्य कथानक व उपकथानकें यांची सुंदर सांगड लेखिकेनें घालून दाखविलेली आहे.

सौ. कुमुदिनी रांगणेकर-प्रभावळकर

इ. स. १९३० च्या आसपासचा काळ असा होता कीं, त्यावेळीं स्त्रियांचें शिक्षण वेगानें वाढू पहात होतें. पुरुषांच्या बरोबरीनें कांहीं काम करण्याची जिद्द स्त्रिया बाळगून होत्या. पुरुषमंडळी लेखन करतात तसें लेखन करावयाची त्यांची आशा आकांक्षा होती. त्यामुळें स्वाभाविकच पुरुषी थाटाच्या लेखनाची छाप त्यांच्या अनुकरणाच्या प्रवृत्तीमुळें त्यांच्या लेखनावरहि पडत असे. कुमुदिनी प्रभावळकर-रांगणेकर-ह्या लेखिका याच प्रकारच्या लेखन करणाऱ्यांपैकीं एक होत. त्यांनीं त्या मानानें आजवर पुष्कळच लेखन केलेलें आहे.

कर्तव्याची जाणीव (१९३२), अनियमित जग (१९३४), निर्माल्यांतील कळी (१९३५), शकुनी मोहर (१९३७), एकेरी गांठ (१९३७), निसर्गाचा नियम (१९३७), कुस्करलेलं हृदय (१९३८), कल्पना (१९३८), बेसूर संगीत (१९३८), पुष्प-पराग (१९३८), रस्सीखेंच (१९३९), विरलेलं वस्त्र (१९४०), परतदान (१९४३), मनीषा (१९५४), पुनर्जीवन (१९५४), साळावरील खून (१९५४), प्रीतीचा गोल घुमट (१९५७), छाया प्रकाश (१९५८), आणखी उठाठेव (१९६१) या कुमुदिनीबाईंच्या एकूणवीस कादंबऱ्या आहेत !

या कादंबऱ्यांचे विषय अनेक आहेत. आईवडिलांची आपल्या मुलीला आंतरजातीय विवाह करण्यास मिळणारी कर्तव्यदक्ष अशी मोकळीक, सूडभावापेक्षां प्रेमभावाचें माहात्म्य अधिक असतें, पैशापेक्षां प्रीति श्रेष्ठ ठरते, वेश्येच्या अपत्य जीवनांतील शीलाचें महत्त्व, घटस्फोट, विषम विवाह, निसर्गाची हांक, प्रीति व मोह, सवतीमत्सर, स्त्रीत्वाचें सौंदर्य, रहस्यमय जीवन, विशुद्ध प्रीति, विजोड जोडपें आणि विनोदी जीवन इत्यादि अनेक विषयांनीं कुमुदिनीबाईंच्या या कादंबऱ्या नटलेल्या आहेत.

अशा सामाजिक कादंबऱ्यांच्या जोडीलाच कुमुदिनीबाईंनीं " शकुनी मोहोर " ही ऐतिहासिक कादंबरीहि लिहिलेली आहे. या कादंबरींत अठराव्या शतकांतील रजपुतांचें जीवनचित्रण आलें असून त्या काळाला साजेल असा रणसंग्रामहि आलेला आहे. आपल्याला विश्वासघातकी वाटणाऱ्या माणसाबरोबर मनाच्या दुबळेपणासुळें विवाहबद्ध होणारी नायिका लेखिकेनें येथें रंगविलेली आहे !

कुमुदिनीबाईंची भाषा चटकदार आणि सहजसुलभ झालेली आहे. कथानकाला वैशिष्ट्यपूर्ण विषय निवडण्यांत त्यांची चांगलीच हातोटी दिसून येते. विषयाबद्दल त्यांना वाटत असलेली सहृदयता त्या विषयाच्या झालेल्या मांडणीवरून दिसून आल्याविना रहात नाहीं. मात्र कुमुदिनीबाईंच्या या लिखाणांत स्त्रीच्या लेखणीचें म्हणून वेगळें असें वैशिष्ट्य फारसें सांपडत नाहीं !

विभावरी शिरूरकर

स्त्रियांच्या मनामध्यें ज्या बऱ्यावाईट अशा सर्वप्रकारच्या भावना येतात, त्यांचें अगदीं वास्तव स्वरूप निःसंकोचमनानें चित्रित करण्याबद्दल विभावरी वाङ्मयाचें वैशिष्ट्य आहे. चार माणसांत आपलें लिखाण वाचलें जाणार तेव्हां स्त्री स्वभावाला धरून ठराविक मर्यादेपर्यंतच लेखनांतील विषयाचा उठाव करण्याची जुनी पद्धत होती. त्या काळांत स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीनें समाजांत स्थान दिलें जात नसे. त्यामुळें स्त्रीच्या विचारांत आणि आचारांतहि संकोच निर्माण झालेला होता. त्याचा परिणाम अर्थात् वाङ्मयावरहि झालाच. पण नंतरचा काळ बदलला. स्त्रिया सुशिक्षित झाल्यामुळें आणि परदेशांतील स्त्रीजीवनाचा त्यांनीं ग्रंथावरून अभ्यास केल्यामुळें त्यांच्यामधील "आपण एक स्त्री आहोंत" म्हणून असलेली संकोच वृत्ति अजून मर्यादशील अवस्थेंत असली तरी कमी होत चालली आहे. त्यामुळें स्त्रीच्या मनांत परिस्थितीनें निर्माण झालेल्या आघातांनीं होणारी विचारांची खळबळ वास्तव स्वरूपांत रंगविण्याची ताकद स्त्रीच्या लेखणींत येऊं लागली आहे. विभावरी वाङ्मयानें अशा प्रकारचें लेखन बेधडकपणें केलें आणि स्त्रीच्या मनांतील खरीखुरी भावना उघड बोलून दाखविण्याची कला आत्मसात् करून तिचा आविष्कार आपल्या लेखनांतून केला. "हिंदोळ्यावर" (१९३४) या कादंबरीकडे या दृष्टीनें पाहिलें म्हणजे त्याचें प्रत्यंतर आल्याविना रहात नाहीं.

ही कादंबरी कथानकाच्या दृष्टीनें जितकी आकर्षक आहे, तितकीच ती तिच्यांत दिसून येणाऱ्या लेखन गुणांनींहि चित्तवेधक झालेली आहे. प्रसंग-लेखन, स्वभावलेखन, वर्णनशैली आणि आकर्षक भाषा या विविध अंगांनीं ह्या कादंबरीची परीक्षा केली, तरी ती सरस आहे असाच निर्वाळा द्यावा लागेल.

या कादंबरींत विभावरीबाईंनीं नवऱ्यानें टाकलेल्या अचला नामक स्त्रीची कहाणी दिलेली आहे. अशा स्थितींत "अचले"च्या मनांत चाललेलें द्वंद्व येथें लेखिकेनें फार मार्मिक रीतीनें दाखविलें आहे. निसर्गनियमांना धरून होणारें "अचले"चे वागणें स्वाभाविक घडत जातांनाच येथें दिसून येतें.

हें लेखन एका स्त्रीच्याच लेखणींतून उतरलें आहे असें निश्चितपणें म्हणतां येईल असा हा प्रसंग पहा—

"अचलेनें सभोंवार पाहिलें. राधिकेला यायला अवकाश होता. तिनें झटकन् अरविंदाला आपल्या मांडीवर घेतलें. अरविंदानें "उंहु उंहु" केलें. खायला मिळालें कीं झालें. त्याला आईंत व इतरांत फरक कळत नव्हता. खायला देते ती आई. त्या ओठाच्या स्पर्शानें अचलेच्या अंगावर रोमांच आले. सर्व अंगांतून कसल्या तरी लहरी एका ठिकाणीं केंद्रित झाल्या. तिनें डोळे घट्ट मिटले. पण—

पण छे; अरविंदाचें समाधान झालें नाहीं. जोरानें शोषण करुनहि त्याचें समाधान झालें नाहीं. तिचेंहि समाधान झालें नाहीं. तिचें सर्वांग विचलित झालें. डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. ती हताश झाली. "नाहीं. अचल, मातेचा पान्हा यायला फार मोठी किंमत द्यावी लागते. आपल्याच देहात्म्याची ती एवढीशी दुसरी प्रतिमा अंगाला बिलगली असतां, निर्माण होणारी आत्मीयता—ममता—मातृत्व—अशा कृत्रिमतेनें जोडून उत्पन्न नाहीं होणार. मग काय करूं? माझ्या चित् शक्तींचा गोळा—माझा मुलगा—माझ्या जीवनाचं सारसर्वस्व ओतलेला माझा अरविंद मला हवा आहे." ती अगदीं परकेपणानें मांडीवरील मुलाकडे पहात होती. तो रडत होता. ती शून्य मनानें हळूहळू मांडी हलवीत होती. त्याच्या रडण्याचे सूर तिच्या कानांत घुमायला, तिच्या हृदयांत पीळ पाडायला, तिची चेतना ठिकाणावर नव्हती."

"विरलेलें स्वप्न" (१९३५) ही विभावरीबाईंची दुसरी कादंबरी. परंतु या पुस्तकाला कादंबरी न म्हणतां लेखिकेनेंच दैनंदिनी म्हटलें आहे. पात्रांच्या स्वतंत्र आत्माविष्कारामधून या कादंबरीची रंगसंगती घडलेली आहे. प्रेम-भंगासारख्या दुःखात्मक घटनेवर हा कथाभाग आधारलेला आहे. भावकथा म्हणून हल्लीं जो कथाप्रकार मराठी वाङ्मयांत रूढ होत आहे त्याप्रकारची ही लेखन पद्धति आहे.

विभावरीबाईंच्या या कलाकृतींत भावनांचा जो आविष्कार झाला आहे, त्याचें स्वरूप बऱ्याच अंशीं काव्यमय आहे. सर्वसामान्य माणसापेक्षां बुद्धिमान माणसांचें विचारच येथें अधिक आढळतात.

स्त्रीच्या दृष्टिकोनांतून रंगलेलें हें रोहिणीचें जीवन विभावरीबाईंनीं खरोखरच हृदयंगम रीतीनें व्यक्त केलें आहे. वैशाखचे विचारहि असेच चित्ताकर्षक झालेले आहेत.

"बळी" (१९५०) ही विभावरी शिरूरकरांची अगदीं अलीकडची कादंबरी त्यांच्या मागच्या दोन्ही कादंबऱ्यांपेक्षां निराळी आहे. या कादंबरींत लेखिकेनें बहुजनसमाजाच्या खालच्या थरांत असणाऱ्या मांग गारुडी जीवनाचें चिंत्रण केलेलें आहे. मांग गारुड्यांच्या जीवनाची भरपूर माहिती येथें आलेली असली, तरी म्हणावी तशी कलात्मक घडण तिच्याभोंवतीं निर्माण झालेली दिसत नाहीं.

पण या कादंबरींतील वातावरण मात्र एखाद्या प्रबंधासाठीं भरपूर प्रमाणांत गोळा केलेली माहिती एकत्र गोवून द्यावी तसें वाटतें! तरीपण अगदीं मागास-लेल्या मांग गारुड्यासारख्या जमातीचा सूक्ष्म रीतीनें अभ्यास करून प्रकृत्या चोर म्हणून समजल्या गेलेल्या लोकांच्या जीवनावर केलेलें लेखन म्हणून 'बळी' उल्लेखनीय होईल. या कादंबरींतील उदार वात्सल्याच्याच भावनेनें चितारलें

गेलेलें आबाच्या जीवनाचें चित्रण सुंदर झालें आहे. या कादंबरीचा आणखी एक ठळक विशेष म्हणजे यांत प्रकट झालेलें वात्सल्य जेवढें गाढ आहे तितकीच त्यांत तटस्थता व अलिप्तताहि आली आहे ! त्यामुळें आबाचें चित्रण हें एका जमातीचें प्रातिनिधिक चित्र म्हणूनच नव्हें, तर मानवी जीवनांतील एका घोर व मूलभूत समस्येची अभिव्यक्ति करणारें चित्र म्हणून ठळकपणें नजरेंत भरतें.

मनोवृत्तीमधील या भिन्नतेबरोबरच या कादंबरींतील विभावरींची भाषा पूर्वींच्या मानानें बरीच साधी झालेली आहे. तसेंच पूर्वींच्या त्यांच्या लेखनांतील हळुवार रेखीवपणानें इथें काटेकोरपणा पत्करलेला आहे. इथला सूक्ष्म पण तीव्र उपरोध पूर्वींच्या उफाळलेल्या व्याख्यानबाजीपेक्षां उल्लेखनीय आहे. इथली विचारसरणी अग्रसेर आहे. तरी परंतु विभावरींच्या पूर्वींच्या लेखनांतील चित्तवेधक रचनासौष्ठव स्त्रीजीवनांतील खळबळजनक उठावदार चित्रण व स्त्रीच्या लेखणीचें वैशिष्ट्य मात्र येथें आढळून येत नाहीं. त्याचप्रमाणें श्री. रणजित देसाई यांच्या अशाच विषयावरील " बारी " या कादंबरीचें सर्वांगीण वैशिष्ट्यहि येथें दिसून येत नाहीं.

गीता साने

निखळलेली हिरकणी (१९३६), हिरवळीखालीं (१९३६), वठलेला वृक्ष (१९३६), लतिका (१९३७), वादळापूर्वी (१९३७), आविष्कार (१९४६), माळरानांत (१९४६) व दीपस्तंभ (१९४९) या कादंबऱ्या गीता साने यांनीं लिहिलेल्या आहेत. त्यांच्या लेखनाचा भार मनोविश्लेषणावर त्यांनीं अधिक ठेवलेला असल्यामुळें मनोलेखनाची व स्वभावलेखनाची कला त्यांना चांगलीच साधलेली आहे. त्यांनीं आपल्या कादंबरींतील निरनिराळ्या प्रकरणांना वेगवेगळीं नांवें दिलेलीं असून कादंबरीचें आकर्षण वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. रचनासौष्ठवाच्या दृष्टीनें त्यांचें लेखन तितकेंसें यशस्वी झालेलें दिसून येत नाहीं. परंतु त्यांच्या लेखनाला आरंभापासूनच लाभलेला साधेपणा व रोखठोकपणा मात्र परिणामकारक झालेला आहे. तसेंच त्यांच्या वृत्तीमधील वस्तुनिष्ठा व स्त्रीजीवनविषयक आकसहि अधिक उल्लेखनीय आहे.

स्त्रीजीवनाला आवश्यक वाटणाऱ्या स्वातंत्र्याच्या विचारावर आधारित लेखन गीता साने यांनीं केलेलें आहे. त्यांच्या लेखनानें राजकीय विचारप्रणालींचा विचार केला आहे. सामाजिक जीवनाच्या मनोविश्लेषणावर त्यांनीं भर दिला आहे. स्त्रीजीवनाकडे त्यांनीं जिव्हाळ्यानें पाहिलेलें आहे.

परंतु कित्येकदां जें व्यक्त करावयाचें आहे तें स्पष्ट करून सांगण्याची दखल त्यांनीं घेतली नसल्यामुळें 'निखळलेल्या हिरकणी' चा व्हावा तसा परिणाम वाचकांच्या मनावर होऊं शकत नाहीं. म्हणजे या कादंबरींत लेखिकेनें रंगविलेला एका तरुण मुलीच्या ठिकाणाचा अपवादात्मक न्यूनगंड वाचकाच्या मनाची पकड घेऊं शकत नाहीं. त्यामुळें अशा लेखनांत अनुभूतीचा अपुरेपणा जाणवतो. रचना सौष्ठवहि नजरेंत भरत नाहीं.

"माळरानांत" ही कादंबरीहि राजकीय वातावरणावर आधारलेली अशी आहे. राजकारणाच्या क्षेत्रांत आढळणाऱ्या निवडणुकी, प्रचार वगैरेंचा येथें भरपूर वापर आढळतो. वकिली न चालणारा श्रीधर राष्ट्रभक्त बनून बेकार जीवन कसा जगतो, तें येथें दिसून येतें. कथानकाच्या दृष्टीनें या कादंबरीचा नंबर बराच खालीं लागेल.

कथानकाच्या दृष्टीनें गीताबाईंची "लतिका" ही कादंबरी चांगली आहे. हें कथानक साधें असलें तरी मनोहर आहे. परंतु "आयुष्याचा गाडा तो यदृच्छेनें जाईल तिकडे जाऊं देत होता. पैसे मिळाले तोंवर शिकला, नोकरी दिसतांच त्यानें ती घेतली. दुसऱ्यांनीं लग्न ठरवितांच हा बोहल्यावर उभा राहिला. वादळी वाऱ्याची झळ त्याला नव्हती. शिक्षणसत्रांत असूनहि विचारांच्या माऱ्यांतून तो सुटला होता. पत्नी या वस्तूचा त्यानें कधीं विचारच केला नव्हता. त्याला आत्मपरीक्षण माहीत नव्हतें व तत्त्वज्ञानाची मुळींच आवड नव्हती." लेखिकेनेंच वर्णन केलेल्या नीळकंठाच्या अशा स्वभाव परिवर्तनामुळें एक मोठा दोष येथें निर्माण झाला आहे. एकच व्यक्ति दोन भिन्न स्वरूपांत कशी वावरूं शकते हें मोठें गूढच आहे. आणि तिनें तसें कां वागावें याचेंहि लेखिकेनें स्पष्टीकरण दिलेलें नसल्यानें सावळागोंधळ निर्माण झालेला आहे.

गीताबाईंच्या कादंबऱ्यांची अशी ओळख करून घेतल्यानंतर त्यांच्या लेखनाचा डोळ्यांत भरणारा व उठून दिसणारा प्रमुख गुण म्हणजे त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांची केलेली सुरुवात आणि शेवट हा होय. विस्मय आणि उत्कंठा वाचकांच्या मनांत एकसारखी कार्य करीत असली, तरच त्या ललित कलाकृतीचें खरें यश लेखकाच्या पदरांत पडतें, असा सर्वसामान्य नियम आहे. लेखन विषयांत प्रवेश करतांना वाचकांचें लक्ष चटकन् आपल्याकडे वेधून घेणें आणि अखेरीस आणखी आतां पुढें काय झालें असेल अशी रुखरुख त्याच्या मनांत रहाणें असें लेखन करण्यांतच लेखकाचें खरें कसब दिसून येतें. गीताबाई त्या दृष्टीनें बऱ्याच भाग्यवान् ठरलेल्या आहेत.

• • •

सौ. शांताबाई नाशिककर

एक सहृदय लेखिका म्हणून शांताबाई नाशिककर यांचा लौकिक आहे. स्त्रीजीवनांत येणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगांचें मनोवेधक चित्रण करण्यांत त्यांची लेखणी बरीच वाकबगार आहे. स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधीं, स्त्रीच्या दृष्टिकोनांतून विचार करून त्यांनीं लेखन केलें आहे. त्यामुळें त्यांच्या लेखनांत सहजता आणि सहृदयता हे दोन गुण विशेष साकल्यानें आढळतात. आजपर्यंतचें स्त्रियांचें समाजांतील स्थान ध्यानांत घेणें व अनुषंगानें त्याचें आपल्या लेखनांत चित्रण करीत असतांनाच क्रांतिकारक विचारांची पेरणी करणें या बाबतींत शांताबाईंनीं बरेंच कौशल्य दाखविलेलें आहे. पुरुषांच्या बरोबरीनें आम्ही लेखन करूं शकतों या हिरीरीनें आपल्या लेखनाकडे त्यांनीं पाहिलें आहे असें दिसत नाहीं. पुरुषांचें अनुकरण केवळ न करतां त्यांनीं स्त्रियांचे प्रश्न किंवा कांहीं सामाजिक प्रश्न स्त्रीच्याच भावनेनें रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीनें पाहिलें तर " माझीं कोरीव लेणीं " (१९४३) ही शांताबाईंची कादंबरी सर्वोत्कृष्ट ठरेल. या कादंबरीच्या बाबतींत स्वत: लेखिकेनेंच म्हटल्याप्रमाणें ती एक आत्मचरित्रवजा कादंबरी आहे. प्रकाशकांनीं नमूद करून ठेवल्याप्रमाणें " ही कादंबरी म्हणजे गेल्या पिढींतील सुखवस्तु आणि सुधारक अशा मध्यमवर्गांतील स्त्रीचें आत्मचरित्र आहे. महाराष्ट्रीय मध्यम वर्गाच्या गेल्या पन्नास वर्षांचा सामाजिक इतिहास त्यांत आपोआपच चित्रित झाला आहे आजच नव्हे तर पुढें केव्हांहि ही कादंबरी वाचणाराला गेल्या अर्धशतकांतील महाराष्ट्रीयांचे आचारविचार, राहाणी, सामाजिक रूढि, विधवा स्त्रियांची परिस्थिति, त्यांच्याकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन इत्यादींची उपयुक्त आणि मनोरंजक माहिती मिळण्यासारखी आहे. "

कादंबरीला आवश्यक असणाऱ्या कोणत्याहि अंगांतून या कादंबरीकडे पाहिलें तरी शांताबाई यशस्वी झालेल्या दिसतात.

समाजजीवनाचें एक चित्र या दृष्टीनें कादंबरीकडे पुष्कळदां पहाण्यांत येतें. आणि स्त्रियांनीं केलेल्या लेखनांत या सामाजिक जीवनाचा विशेष आविष्कार घडलेला दिसून येतो.

मुकुंदराव, सुमति, ताई व इंदिराबाई यांचीं स्वभावचित्रें चांगलीं झालेलीं आहेत. स्त्रीजीवनांतील घडामोडींचा धावता इतिहास सुमतीच्या स्वभावचित्रांत उत्कृष्ट रीतीनें प्रतिबिंबित झालेला आहे. प्रेमविवाह, पुनर्विवाह, द्विभार्याविवाहाचा प्रश्न आणि समाजकार्य या विविध प्रकारांमधून मुकुंदराव आणि सुमति यांच्या जीवनांतील महत्त्वाचा भाग रंगविला गेला असून तो चटकदार झाला आहे.

शांताबाईंची भाषा येथें अतिशय सफाईदार, घरगुती आणि ओघवती झालेली आहे. लेखिकेची वर्णनशैली चटकदार असून त्यांनीं म्हटल्याप्रमाणें ही

कादंबरी वाचीत असतांना "काळाच्या डोंगरांत प्रत्येक जीव आपल्या जीवनाचीं बरी वाईट लेणीं खोदून ठेवीत असतो. डोंगराच्या उदरांत ताऱ्याप्रमाणें अगणित लेणीं खोदलेलीं आहेत.

खरेंच आकाशांतील तारे म्हणजे देवदेवतांचीं लेणीं असतील का? असेलहि तसें.

स्वर्गातल्या देवदेवतांचीं लेणीं आकाशाच्या डोंगरांत आणि आमचीं लेणीं पृथ्वीवर." या कल्पनेचा आस्वाद घेण्याचा मोह अनावर होतो आणि अखेरीस लेखिकेनें कोरून ठेवलेलें हें मानवी जीवनाचें लेणें खरोखरच हृदयंगम झालें आहे, अशी मनाची खात्री पटते.

ध्येयवादी कौस्तुभ आणि कर्तव्यापेक्षां प्रेम श्रेष्ठ मानणारी कीर्ति यांच्या जीवनसंघर्षावर आधारलेली "कीर्ति" (१९४२) ही शांताबाई नाशिककरांची दुसरी एक कादंबरीहि वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे. येथेंहि लेखिकेची वर्णनशैली चांगली असून स्वभावलेखन उठावदार झालेलें आहे. भाषा साधी व घरगुती असली तरी संस्कृत वाङ्मयाचा पगडा लेखिकेच्या मनावर बराच बसला असावा, असें पुढील प्रकारच्या वर्णनावरून दिसून येतें—"उन्हातान्हांत हिंडून श्रम केल्यामुळें त्याचें शामलवर्ण झालेलें मुख आतां वेदना जर्जरतेमुळें एकाद्या जलहीन पांडुर मेघखंडाप्रमाणें दिसत होतें."

या कादंबरींतील सर्व वातावरण श्रीमंती थाटाचें असून त्यांत सुस्वभावी माणसें आलेलीं आहेत. त्यामुळें हें जीवनचित्र सर्वसामान्य मध्यमवर्गाचें दिसत नाहीं. वाचकाला परिचित अशा जगापासून आपण थोडें दूर जात आहोंत असें वाटण्याचा संभवच येथें अधिक. त्याचप्रमाणें अस्पृश्योद्धाराचा प्रश्न थोड्या प्रमाणांत कां होईना हाताळण्यासाठीं दादासाहेबांना अस्पृश्य बनविलें असावें अशी दाट शंका मनांत येते. या कादंबरींतील वैवाहिक समस्या व आदर्शवाद यांत मात्र अगदींच कृत्रिमता आलेली दिसून येते.

"चिखलांतलें कमल" या कादंबरींत शांताबाईंनीं अविवाहित मातेच्या मुलीशीं चांगल्या घराण्यांतील मुलाचा प्रेमविवाह घडत असल्याचें दाखविलें आहे. समाजाला सुखासुखी न पटणाऱ्या प्रश्नाला लेखिकेनें हात घातला आहे. त्या दृष्टीनें येथें विषयाचें वैशिष्ट्य दिसून येतें.

"लग्नाच्या बाजारांत" शांताबाईंनीं समाजांतील हुंड्याची घातुक पद्धति, समाजाकडून विधवांचा होणारा छळ आणि विवाहित अशा हिंदु स्त्रीचें दुबळें जीवनचित्र यांचीं हृदयस्पर्शी चित्रें रेखाटलेलीं आहेत.

शांताबाईंची "हाच का धर्म" ही कादंबरी हिंदु समाजांत आढळून येणारी प्रचलित रूढि, आचार, विचार व विधी इत्यादींच्या आधारानें कथानकाची गुंफण करून "'हिंदुधर्म' म्हणून ज्याला आपण समजतों तो हाच का?" असा प्रश्न वाचकांसमोर टाकून विचार करावयास लावते.

सामाजिक कादंबऱ्यांबरोबर शांताबाईंनीं कांहीं ऐतिहासिक कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत.

" साम्राज्यासाठीं " या कादंबरींत इतिहास प्रसिद्ध अशा माध्वाचार्यांच्या साहाय्यानें व सल्ल्यानें नरसिंगरायानें पट्टारायाला मारून विजय-नगरच्या साम्राज्य–गादीवर शिवरायाला स्थापन केल्याचा कथाभाग आहे.

" कौमुदी " मध्यें बिसनगरचे राणा चंद्रसेन आणि कमलपूरचा राणा रामसिंग यांची नात व सुवर्णगिरीच्या कृष्णरायानें अपत्यवत् प्रेम करून वाढविलेली कौमुदी यांच्या प्रेमविवाहाचें चित्र आलेलें आहे.

ऐतिहासिक कादंबरीस आवश्यक असलेला सत्य स्वरूपांतील इतिहास आणि तो चटकदार बनविण्यासाठीं लागणारें कलाकौशल्य लेखिकेनें या ललित-कृतींत फार चांगलें दाखविलें आहे. या कादंबरींत कथानकाला धरून आलेला बारीक सारीक भाग वाचीत असतांना लेखिकेच्या इतिहासाच्या सखोल अध्ययनाची प्रचीति येते.

ऐतिहासिक कालाला अनुसरून त्यावेळचा रजपुतांचा आणि मुसलमानांचा परस्परांसंबंधींचा द्वेषभाव आणि रजपुतांची आपआपसांतील लढाई येथें लेखिकेनें रंगविलेली आहे. परंतु सारें वातावरण कांहीं तुरळक भाग सोडला, तर सहजगत्या घडत गेल्यामुळें समरप्रसंगांनीं नटलेल्या इतिहासाला वाचक पारखा होऊन बसतो ! हरिभाऊंनीं आपल्यांनीं खुलविलेलें इतिहासाचें प्रत्येक दालन नजरेसमोर घेतलें कीं, इथें फारच फिकेपणा वाटायला लागतो. घनघोर रणसंग्रामाचें तांडवनृत्य दर्शविण्याची कला लेखिकेच्या ठायीं असती, तर हरिभाऊंच्या बरोबरीचें स्थान त्यांना प्राप्त व्हायला फारशी अडचण पडली नसती.

एकंदर नाशिककरबाईंचें हें कादंबरीलेखन पाहिलें म्हणजे त्यांनीं केलेलीं घरगुती प्रसंगांचीं चटकदार वर्णनें, साध्या व सफाईदार घरगुती भाषेचा वापर आणि विशेषतः स्त्रीहृदयांत आढळून येणारें भावनांचें वादळ चटकन् नजरेंत भरतें. साध्या सुध्या चारसहा शब्दांमधूनहि एखादा व्यक्ति–विशेष चित्रित करण्याचें प्रभावी साधन लेखिकेनें कौशल्यानें संपादन केलें असून त्याचा वापर करण्यांतहि ती यशस्वी झाली आहे.

परिणामकारकतेच्या दृष्टीनें शांताबाईंचें लेखन चांगलें असलें तरी त्यांत दुःखद घटनांनाच विशेष स्थान दिलें गेल्याची स्पष्ट जाणीव वाचकाला व्हावी इतक्या त्या त्यांच्या लेखनांत आलेल्या आहेत. शिवाय मध्यम वर्गाचेंच चित्र रेखाटण्यांत त्यांची लेखणी प्रामुख्यानें गुंतली आहे. त्यामुळें कांहीं अंशीं त्यांचें लेखन एकांगी झालें आहे असें म्हणावें लागतें. समरप्रसंगांची उत्कटता जर त्यांच्या लेखणीनें निर्माण केली असती, तर त्यांनीं अनुभवावर आधारून केलेलें हें लेखन अधिक उठावदार झालें असतें, यांत वाद नाहीं.

सौ. मालती दांडेकर

स्वत:चें शालेय शिक्षण फारसें झालेलें नसतांनाहि लेखनाची हौस मनांत बाळगून ज्यांनीं भरपूर लेखन केलेलें आहे अशा अलिकडच्या लेखिकांत मालतीबाई दांडेकर यांचा प्रामुख्यानें समावेश करावा लागेल.

मातृमंदिर (१९४१), तेजस्विनी (१९४३), वज्रलेख (१९४५), कृष्णरजनी (१९४७), कांटेरी मार्ग (१९४८), संसारांत पदार्पण (१९४९) व हिरा आणि गारगोटी (१९५०) या मालतीबाईंच्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या लेखनामागची बौद्धिक झेप व अनुभवाचें क्षेत्र तसें मर्यादित आहे. त्याचप्रमाणें आजच्या काळच्या कादंबरीस आवश्यक असलेलें मनोविश्लेषणहि त्यांनीं हाताळलेलें नाहीं. राजकारणाची जशी त्यांना ओढ नाहीं तशीच ती दलित वर्गाच्या सहानुभूतीचीहि नाहीं. मध्यम वर्गातील स्त्रियांच्या वैवाहिक समस्यांचें चित्रण स्त्रीमनाच्या भूमिकेंतून करण्याचें क्षेत्रच तेवढें त्यांनीं आवडीनें निवडलेलें दिसतें. एवढ्या या क्षेत्रांत मात्र त्यांची लेखणी जाणतेपणानें व सहजतेनें वावरतांना दिसून येते. घरगुती लहान सहान प्रसंगांची जुळणी व वातावरणाची निर्मिति त्यांना चांगली साधली आहे.

मालतीबाईंच्या कथालेखनामागें एक स्पष्ट असा हेतु दिसून येतो. तो म्हणजे त्यांच्या कथा प्रश्नप्रधान आहेत हा होय. म्हणजे एखादा विवाहविषयक प्रश्न त्या वाचकांच्यापुढें ठेवतात व त्या प्रश्नाच्या विविध अंगांचें दर्शन निरनिराळ्या पात्रांच्या कृतींमधून घडविण्याचा यशस्वी प्रयत्न करतात. परंतु त्यामुळें त्यांचें लेखन कंटाळवाणें मात्र होत नाहीं. त्यांचें लेखन सहानुभूतीनें माखलेलें आहे. त्यांचे कादंबऱ्यांतील प्रश्न हे व्यवहारांतील वस्तुनिष्ठेनें हाताळलेले आहेत.

स्त्रियांच्या जीवनांत येणाऱ्या कठोर दु:खाची कहाणी मालतीबाईंनीं आपल्या कादंबऱ्यांमधून चित्रित केलेली आहे. या त्रिविध दु:खांकडे मालतीबाईंनीं अतिशय जिव्हाळ्यानें पाहिलेलें आहे आणि सहृदयतेनें लिहिलेलेंहि आहे, असें त्यांनीं आपल्या प्रत्येक कादंबरीस प्रस्तावादाखल लिहिलेल्या माहितीवरून दिसून येतें.

आजन्म अविवाहित राहणाऱ्या कुमारिकांचा वर्ग अलिकडे दिवसेंदिवस समाजांत वाढत्या प्रमाणांत दिसून येत आहे. अशाच एका समाजसेवेंत आयुष्य घालविणाऱ्या कुमारिकेच्या जीवनाची कथा मालतीबाईंनीं "मीना"च्या आयुष्यांत गोवून देऊन "मातृमंदिरां"त सांगितलेली आहे. "तेजस्विनीं"त मालतीबाईंनीं संक्रमणावस्थेंतून जाणाऱ्या "क्षमा" नांवाच्या एका खानदान घराण्यांतील स्वाभिमानी, बुद्धिमान आणि तडफदार स्त्रीची कथा रंगविली आहे. माणसाला आपल्या आयुष्याची नौका हाकारीत असतांना पदोपदीं निर्माण होणारा भावनांचा खेळ, परिस्थितीचें बदलतें स्वरूप, आर्थिक स्थितीची चलबिचल, रूढींचा पगडा,

शत्रूशीं आणि मित्रांशीं द्यावा लागणारा बरावाईट सामना इ. शीं किती धडाडीनें आणि हिंमतीनें झुंजावें लागतें याची कल्पना क्षमेच्या स्वभावरेखेवरून येथें दिसून येतें. अडचणींशीं झगडून आणि परिस्थितीला जिंकून जीवन यशस्वी करणाऱ्या "मीरा"चें जीवनचित्र "कृष्णरजनी"त मालतीबाईंनीं दाखविलें आहे. स्त्रीचा स्वभाव किती सोशीक असतो आणि ती किती कर्तव्यदक्ष असतें याची कल्पना "मीरा"च्या स्वभावरेखेवरून लक्षांत येते. "वज्रलेख"मध्यें लेखिकेनें जुलमी विवाहाचीं कठोर व वज्रलेखवत् दुःखें मूकपणें सोसणाऱ्या "छाये"चें जीवनचित्र रेखाटलें आहे व "कांटेरी मार्ग"मध्यें नवऱ्यानें टाकलेली बायको घटस्फोटाविना दुसरें लग्न करते, अशी क्रांतिकारक हकीकत दिलेली आहे.

मालतीबाईंच्या कादंबऱ्यांचा हा प्रवास अशा रीतीनें मुख्यतः सामाजिक जीवनचित्राच्या मार्गावरून झालेला आहे. सामाजिक जीवनांत स्त्रीच्या वांट्याला येणाऱ्या दुःखांची सांगता उघड करून सांगण्याचा, तिच्या मनाला त्या दुःखानें होरपळून जातांना होणाऱ्या यातनांचा, त्यांनीं येथें अतिशय जिव्हाळ्यानें आविष्कार केलेला आहे. स्त्रीला सोसावें लागणारें व तिच्या मनांत खुपत रहाणारें दुःख ती उघडपणें बोलून दाखविण्याचें धैर्य कसें दाखवितें, हें पहायचें असेल तर "कांटेरी मार्ग"मधील विवेचन मनोवेधक ठरेल.

पुष्कळदां स्त्रियांना सासुरवास सोसावा लागतो. त्याची झळ कांहीं स्त्रियांना इतकी सोसावी लागते कीं जीव नकोसा व्हावा! अशाच एका दुर्दैवी स्त्रीच्या आत्मचरित्रांतील भाग "कृष्णरजनी"त मालतीबाईंनीं सुंदर शब्दांतून सांगितलेला आहे.

स्वभावलेखनाची कला मालतीबाईंना चांगली साधलेली आहे जीवनांतील बारीकसारीक सारे धागेदोरे लक्षांत घेऊन मानवी मनाची घडण चितारण्याची कला त्यांनीं आत्मसात् केली आहे. आणि याचें ठळक उदाहरण म्हणून "वज्रलेख"-मध्यें काढलेलें छायेचें स्वभावचित्र घेतां येईल.

मालतीबाईंनीं आपल्या "मातृमंदिरां"त स्त्रीजीवनाची एक विशिष्ट बाजू दर्शविली आहे. एखाद्या व्यक्तीबद्दल तरुण मुलीला किती नितांत आदर वाटूं लागतो, आणि तो आपला पति व्हावा म्हणून तिच्या मनांत किती उत्कंठा दाटूं लागते, या गोष्टी रंगवीत असतांनाच, तीच व्यक्ति जर आपल्याच लहान भगिनीची प्रेममूर्ति ठरेल तर उघडया डोळ्यांनीं त्यांचा संसार पहात असतांना तिच्या मनाला किती यातना होतात, याची कल्पना "मीना"च्या स्वभावरेखेंत मालतीबाईंनीं दिलेली आहे. परंतु मुख्य गोष्ट म्हणजे आपल्या भगिनीच्या सुखासाठीं आणि स्वतःच्या सुखासाठीं म्हणून "मीना" अविवाहित राहून समाजसेवा करते, हें दाखविण्यांत स्त्रीच्या हृदयांतील निःस्सीम प्रेमाची आणि त्यागाची भूमिका विशेष साकल्यानें येथें आलेली आहे. प्रा. फडक्यांच्या "अखेरच्या

बंडांत " नेमका याच्या उलट भाग दिसून येतो. परिस्थिति बहुतेक सारखीच परंतु अखेर मात्र वेगळी. आयुष्यभर भावांसाठीं स्वतःच्या सुखाची राखरांगोळी करणारी फडक्यांची नायिका मोहाच्या एखाद्या क्षणार्धांत विवाहबद्ध होते, याचें आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं.

मालतीबाईंची भाषा अगदीं घरगुती, साधी, सोपी आणि ओघवती आहे. परंतु एक स्त्रीच पुरुषाचेंहि जीवनचरित्र रेखाटीत आहे असा भास निर्माण करण्याइतपत ती कधीं कधीं बायकीहि होऊन बसलेली दिसते !

तथापि स्त्रीस्वभावानुसार मालतीबाईंनीं आपल्या ' मातृमंदिर ' या कादंबरीमध्यें पाऊल वाटेला अंगणांतील रांगोळ्यांच्या रेषांची जी उपमा दिली आहे, ती फारच आकर्षक झालेली आहे.

● ● ●

कृष्णाबाई मोटे

" मालू, आयुष्यांत धांवतां धांवतां मला धाप लागली आहे. मला विश्रांतीची जरूरी आहे आणि माझ्यासारखीला ती दुसरी कशांत मिळणार ?

आतांपर्यंत शीलाला तूं आपली म्हणून वाढविलीस अशीच यापुढेंहि वाढव. पण–तिला मी खरी तिची कोण हें कळावें अशी माझी फार इच्छा आहे.

तिनें " एकूण ही माझी आई होती अं ? " एवढें म्हटलें तरी पुरे ! मी तिला कशी वाढविली असती याची मला कल्पना नाहीं. पण माझें आयुष्य मी जगलें, हार खाल्ली नाहीं. वाऱ्यावादळांशीं झुंजत, हांसत मलाच खाऊं पहाणाऱ्या लाटांवर आरूढ होऊन जगलें. हा कांहीं कमी अनुभव नाहीं. एवढं खरं कीं, तुझ्यांत आढळून येणारें समाधान मात्र मला कधींच मिळूं शकलें नाहीं.

माझ्याजवळ संपत्ति अशी फार नाहीं. माझें आयुष्य हीच माझ्या मुलीला फक्त शेवटची देणगी म्हणून मी तुझ्याजवळ ठेवून जात आहें."

अशा प्रकारच्या मनोवृत्तीनें लिहिलेल्या " मीनाक्षी " च्या जीविताची कहाणी चित्तवेधक रीतीनें कृष्णाबाई मोटे यांनीं " मीनाक्षीचें जीवन " मध्यें सांगितलेली आहे. या पुस्तकाचें स्वरूप आत्मचरित्रपर आहे, हें या प्रस्तावांतील वरील भावनाविष्कारावरूनच दिसून येतें. या कादंबरीचें वातावरण अतिशय मोकळें असून वर्णनशैलीहि चटकदार आहे.

या कादंबरीची भाषा चटकदार आहे, वर्णनशैली आकर्षक आहे आणि भावनाविष्कारहि काळजाला जाऊन भिडणारा आहे.

● ● ●

सौ. सिंधू गाडगीळ

" क्षितिजापार " ही सिंधू गाडगीळ यांची भावकथावजा कादंबरी आहे. मराठी वाङ्मयांत वैमानिक जीवनावर लेखन करून या लेखिकेनें आपलें एक स्वतंत्र स्थान मिळविलेलें आहे. ठराविक घरगुती जीवन रंगविण्यांतच बहुतेक लेखिकांनीं जास्त प्रगति केली आहे, या विधानाला हा अपवाद ठरेल यांत वाद नाहीं. वैमानिकविद्येशीं ऐकूनहि परिचय नसणाऱ्याच स्त्रिया अधिक. परंतु सौ. गाडगीळ यांनीं त्या विषयावर अभ्यास करून लिहावें, ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे.

येथें लेखिकेनें इतकी चटकदार भाषा वापरली आहे आणि विमान विद्येंतील इतक्या हकीकती दिलेल्या आहेत कीं, ही कथा वाचीत असतांना वैमानिकाच्या खडतर जीवनाची कल्पना आल्याविना रहात नाहीं.

जो प्रसंग समोर दिसेल तो भाडभीड न ठेवतां जसाच्या तसा निर्भयपणें व निःसंकोचपणें लिहिण्यांत सौ. गाडगीळ चांगल्याच वाकबगार आहेत.

शोबा आणि वैमानिक यांचीं स्वभावचित्रें येथें चांगलीं साधलेलीं आहेत. ब्रह्मदेश–आसामच्या सरहद्दीवरील नाग लोकांचें येथें रानटी जीवन रंगवीत असतां त्या लोकांच्या कांहीं चालीरीतीहि दिल्या आहेत. हिंदु संस्कृतीहून त्या भिन्न असल्यामुळें वैमानिकाला वाटणारा विस्मयहि येथें उत्कटतेनें दिग्दर्शित केलेला आहे. सासरीं जाण्याची कल्पना सांगतांना शोबा म्हणते, " एक मूल झाल्याशिवाय नाहीं जात नवऱ्याजवळ नांदायला आमच्यांत !...आमच्या जमातीची रीतच आहे ती...बायकोचें मूल संभाळणें म्हणजे अनैतिक झालें वाटतें !..."

या कादंबरीचा शेवट मात्र स्वाभाविकपणें झालेला दिसत नाहीं. आपण या जगांतून नाहींसे झालों आहोंत या कल्पनेनें आपल्या पत्नीनें पुनर्विवाह केला ही कल्पना न आवडून, स्वतःच्या प्राणाचीहि पर्वा न करतां विमान विद्येच्या प्रगतीसाठीं हा वैमानिक चंद्रलोकावर उड्डाण करण्यास प्रवृत्त झालेला लेखिकेनें दाखविला आहे !

रानटी लोकांच्या जीवनाचें चित्रण या कादंबरींत चांगलें झालेलें असून लेखिकेची भाषाहि चित्ताकर्षक व सफाईदार आहे.

• • •

प्रेमा कंटक

माणसाचा जीवनक्रम ज्या प्रकारचा असतो त्या प्रकारचा ठसा त्याच्या लेखनावर उमटणें अगदीं स्वाभाविक असतें, याची कल्पना प्रेमा कंटक यांच्या

कादंबऱ्या वाचतांना येते. स्वत: प्रेमा कंटक यांचें आयुष्य राजकीय जीवनांत गेल्यामुळें त्यांनीं गांधीवादाचा पुरस्कार करण्यासाठीं आपलें लेखन केलें आहे.

काम आणि कामिनी (१९३७) व अग्नियान (१९४२) या दोन कादंबऱ्या प्रेमाबाईंनीं लिहिल्या आहेत. या लेखनाची पार्श्वभूमि राजकीय आहे. यापैकीं पहिलींत गांधीजींनीं प्रतिपादिलेल्या वैवाहिक ब्रह्मचर्याच्या तत्त्वाचें चित्रण करण्याचा प्रयत्न झाला असून दुसरींत जीवनविषयक आदर्शनिष्ठा दाखविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. विषयाच्या दृष्टीनें हें लेखन तसें एकदम लक्षांत येण्याजोगें असलें तर रचनेच्या दृष्टीनें कांहीं वेगळें तत्त्व येथें स्वीकारलेलें दिसून येत नाहीं. स्वभावलेखन किंवा व्यक्तिरेखांचें चित्रण करण्यांत मात्र प्रेमाबाईंनीं चांगलेंच यश मिळविलेलें आहे. विशेषत: अग्नियानमधील वहिनीचें स्वभावलेखन उठावदार व स्त्रीच्या लेखणीचें वैशिष्ट्य दर्शविणारें झालें आहे. वर वर पाहिलें तर वृत्तीनें अगदीं बेफिकीर वाटणारी वहिनी वेळप्रसंगीं अंत:करणानें किती प्रेमळ आणि कार्यक्षम आहे याचें चित्रण लेखिकेनें मोठें सुरेख केलेलें असून तें कलापूर्णहि झालें आहे.

रोहिणीच्या या आत्मवृत्तांत (अग्नियान) ती मॅट्रिक झाली तेव्हांपासूनच्या तिच्या मानसिक उत्क्रांतीच्या व जीवनानुभवाच्या अवस्था मोठ्या समरसतेनें चितारल्या गेल्या आहेत.

या कादंबरींतील वैचारिकता, चिंतनशीलता, आदर्शवाद व वस्तुनिष्ठा यांचा झालेला सुंदर समन्वय व प्रगल्भ भाषाशैली यांच्यामुळें हें लेखन भारदस्त व भरीव झालें आहे.

कथानकाच्या दृष्टीनें प्रेमाबाईंच्या लेखनांत कसलेंच नाविन्य आढळत नसलें तरी एकाद्या स्वीकारलेल्या तत्त्वप्रणालीचा प्रचार उल्लेखनीय आहे. त्याचप्रमाणें येथें करण्यांत आलेलें भाव-भावनांच्या समस्यांचें चित्रण आणि आदरनिष्ठेची उभार हीं मराठी कादंबरींत मानाचें स्थान मिळविणारीं अशीं झालेलीं आहेत.

परंतु या लेखनांत सूचित झालेला निराशावाद मात्र प्रेमाबाईंसारख्या गांधीवादी लेखिकेच्या दृष्टीनें आश्चर्यकारक वाटतो. तरीपण त्यामुळें परिणामकारकतेच्या दृष्टीनें ही गोष्ट हानीकारक न होतां आकर्षकच झाली आहे.

शांता ज. शेळके

मराठींतील चांगल्या लेखिका म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्यांच्यामध्यें शान्ता ज. शेळके यांना चांगलें मानाचें स्थान मिळालेलें आहे. शान्ताबाईंनीं भरपूर काव्य व लघुकथा लेखन केलेलें आहे. त्याचप्रमाणें विझती ज्योत, मायेचा पाझर,

ओढ, सुखाची सीमा, कोजागिरी, स्वप्नतरंग, तालपुष्कर, नव्या जगांत इत्यादि कादंबऱ्याहि लिहिलेल्या आहेत. याखेरीज कांहीं अनुवादित लेखनहि या प्रांतांत शान्ताबाईंनीं यशस्वीरीत्या केलेलें दिसून येतें.

बहुजन समाजांतील कोष्टी जमातीचें जीवनचित्रण करण्याचा शांताबाईंनीं "विझती ज्योत" आणि "ओढ" या कादंबऱ्यांमधून यशस्वी प्रयत्न केलेला आहे. कथानकास जानपद वातावरणाची पार्श्वभूमि असल्यामुळें बराच उठाव आलेला आहे. लेखिका स्वतःच ह्या कोष्टी जमातीची असल्यामुळें त्या लेखनास अनुभवाची सुंदर जोड मिळालेली आहे. त्यामुळें सत्य चित्रणाच्या दृष्टीनेंहि या कादंबऱ्या सरस झालेल्या आहेत.

"ओढ"मध्यें कोष्टयांच्या जमातींतल्या एका श्रीमंत, मानधन आणि प्रतिष्ठावान् कुटुंबाचे अखेर तुकडे कसे झाले ती हृदयस्पर्शी कहाणी मीं या कादंबरींत निवेदन केली आहे." असें खुद्द लेखिकेनेंच सांगितलेलें आहे. कथानकाच्या दृष्टीनें ही कादंबरी चांगलीच रंगत गेलेली आहे. त्याचप्रमाणें या कादंबरींतील अभिमानी मोरूभाऊ, घराण्याच्या प्रतिष्ठेला जगणारे बाबा, हट्टी गोपी, दुर्दैवी सरस्वती, सरल मनस्क रंगनाथ या स्वभावरेखा उत्तम साधलेल्या आहेत. त्यांतल्या त्यांत हट्टी पण समजूतदार गोपीचें आणि कमालीची सहानुभूति वाचकाच्या मनांत निर्माण करणारें सरस्वतीचें चित्र विशेष हृदयंगम झालें आहे. त्यावरून लेखिकेनें ह्या स्त्रियांचीं अंतःकरणें काळजीपूर्वक वाचलेलीं आहेत असें दिसून येतें.

या दोन्ही कादंबऱ्यामधून कोष्टी जमातीमधील अनेक चालीरीतींचा समावेश केलेला असल्यामुळें, ते ते विशिष्ट प्रसंग अधिक आकर्षक झालेले आहेत. शांताबाईंची भाषा अतिशय चटकदार आणि ओघवती असल्याचें त्यांच्या सर्व कादंबऱ्यांमधून दिसून येईल. "स्वप्नतरंग"मधील स्वप्नाळु जीवनाच्या चित्रणापेक्षांहि या कोष्टी जीवनाशीं लेखिका अधिक समरस झालेली आहे, असें या कादंबऱ्यांच्या भाषेवरूनच दिसून येईल. "कोजागिरी"मधील लेखिकेचें भाषासौंदर्य तर अप्रतिम झालेलें आहे. तथापि विविध कादंबऱ्यांमधून झालेला शृंगाररसाचा परिपोष कांहीं कांहीं वेळां फारच उत्तान झालेला असून लेखिका अशा प्रसंगांचें चित्रण करतांना अधिक वहावते असें दिसतें ! वास्तवतेला मात्र कुठेंहि बाध येत असलेला दिसत नाहीं !

शकुंतला परांजपे

"घराचा मालक" (१९४८) ही शकुंतला परांजपे यांची पहिलीच कादंबरी. सामान्यतः प्रत्येक कादंबरींत आढळणारा ठराविक थाटाचा प्रेमाचा त्रिकोण न उभारतां आठ दहा वर्षांच्या चांदणीच्या व म्हाताऱ्या रावजीच्या प्रेमळ

जीवनावर ही कथा उभारलेली आहे. अतिशय खेळकर आणि मोकळें वातावरण हा या कादंबरीचा जसा प्रमुख विशेष तसाच चांदणी व रावजी यांच्या स्वभावलेखनानें आलेलें वास्तव सौंदर्य हाहि एक महत्त्वाचा विशेष आहे. लहान मुलाचें मानसशास्त्र शकुंतलाबाईनीं अत्यंत खुल्या दिलानें येथें व्यक्त केलेलें आहे:

आपल्या वडिलांच्या व रावजीच्या मायेच्या उबींत लहानाची मोठी झालेली चांदणी, लहान मोठ्या मांजरांच्या गोतावळ्यांत रमून जाऊन सुखी झालेली चांदणी, शाळेंतील बाईवर भक्ति करीत असलेली चांदणी, त्याच बाई आपली आई होणार या नादांत आनंदून गेलेली चांदणी, त्यानंतर आपल्या वडिलांचें व आईचें वाढतें सलोख्याचें वागणें बघून "आपण आतां बाजूला तर पडलों नाहीं!" या शंकेनें काळवंडून जाऊन मनांत एक बारीकशी अढी निर्माण झालेली चांदणी, एका बाजूला आईवडिलांची कडक शिस्त आणि दुसऱ्या बाजूला रावजीचें नितांत प्रेम या द्वंद्वांत गुदमरून गेलेली चांदणी, रावजीला घरांतून हाकलून दिल्याचें ध्यानांत येतांच त्याच्या शोधासाठीं स्वतःचा जीव पाखडणारी प्रेमळ चांदणी, तो परत आल्यावर हर्षातिरेकानें टाळ्या पिटून त्याचें स्वागत करणारी चांदणी, आईनें दिलेली भारी भावली न घेतां रावजीनें दिलेली चिंध्याची बाहुली घेऊन नाचणारी चांदणी, खरोखरच लेखिकेनें अत्यंत सहृदयतेनें, हळुवारपणें व अचूकतेनें चित्रित केली आहे. हरिभाऊंची एखादी कलाकृति सोडली तर चांदणीच्या या स्वभावरेखेला मराठी सारस्वतांत दुसरी तोड नाहीं इतकी ती हृदयंगम झालेली आहे. स्वभावलेखन हाच या कादंबरीचा आत्मा आहे. साध्या आणि सरळ घरगुती वातावरणांत घरमालकाची चिमुरडी पोर आणि गडी यांच्यामधील परस्परांतील नितांत प्रेम–माया–हाच या कादंबरीचा गाभा आहे.

शकुंतलाबाईनीं अर्पण पत्रिकेच्या निमित्तानें म्हटल्याप्रमाणें अनुभवाची भर्जरी झालर या कथेला लाभल्यामुळें एक वास्तवचित्र म्हणूनहि या कादंबरीस विशेष प्राधान्य आहे. लक्ष्मीबाई टिळक यांचेप्रमाणेंच मनांत येईल तें जसेंच्या तसें लिहिण्यांत शकुंतलाबाईंची लेखणी निष्णात आहे. दोघींच्याहि भाषेंतील प्रसंगानुसार निर्माण होणारा नर्मविनोद आणि अवखळपणा सारखाच आहे. एक प्रकारचा करुण रसाचा जिवंत पाझरहि दोघींच्या लेखनांत सारख्याच प्रगल्भतेनें नजरेस पडेल. मात्र कधीं कधीं लक्ष्मीबाईंप्रमाणें मनाचा तोल सावरून लेखन करणें शकुंतलाबाईंना जमत नाहीं! त्यामुळें त्यांच्या लेखनाला त्या दृष्टीनें थोडा बाध आल्यासारखा होतो.

शकुंतलाबाईंची ही कादंबरी वाचली असतां एखाद्या स्त्रीच्या मनावर परकीय संस्कृतीचा, भाषेचा, वाङ्मयाचा कसलाहि संस्कार न होतां तिनें मराठींत

लेखन करावें म्हणजे जी खरीखुरी वास्तवता व अभिजातता निर्माण व्हावी, त्याचें प्रत्यंतर आल्याचें समाधान मिळतें.

● ● ●

लीला देशमुख

मध्यम वर्गांतील सुशिक्षित स्त्रीच्या विविध प्रश्नांवर लीला देशमुख यांनीं मोठ्या खेळीमेळीनें कादंबरीलेखन केलेलें आहे. त्यांच्या कादंबऱ्यांचा प्रमुख विशेष म्हणजे खेळीमेळीचें वातावरण आणि पात्रांचीं आकर्षक नांवें. स्वप्ना, श्रद्धा, भारती, डार्सी, राजेश्वरी इत्यादि वैशिष्ट्यपूर्ण नांवें लेखिकेनें आपल्या लेखनांत योजिलीं असून तीं वाचणाराच्या चटकन् नजरेंत भरल्याविना रहात नाहींत.

" दोन घडीचा डाव " मध्यें लेखिकेनें द्वितीय विवाहाचा प्रश्न हाताळलेला आहे.

" दूर कोठें तरी–" मध्येंहि याच प्रश्नाचा ऊहापोह करण्यांत आलेला असला तरी येथें मुख्य विषय तो नव्हे. या कादंबरींत लेखिकेला एका सुशिक्षित पण ध्येयवादी तरुणीचें चित्र रेखाटावयाचें आहे. विशिष्ट ध्येय मनांत बाळगून अमेरिकेला जायला निघणारी या कादंबरीची नायिका स्वप्ना आपलें ध्येय झुगारून " रजनी " शीं विवाहबद्ध होत असल्याचें लेखिकेनें दाखविलें आहे ! एकमेकांच्या ध्येयांची पूर्ति करूं इच्छिणाऱ्या ह्या दूर कोठेंतरी असलेल्या दोन जीवांच्या मीलनाची घटना मोठ्या कौशल्यानें लेखिकेनें रंगविली आहे. स्वप्ना ही येथें कवयित्री असल्याचें लेखिका सांगते पण तिच्या काव्याचा मागमूस मात्र कोठेंच लागत नाहीं हें आश्चर्यच आहे ! मात्र रजनीचें लेखकाचें चित्रण व्यवस्थित झालेलें आहे.

" पूर्वेचा वारा " या कादंबरीत लीलाबाईंनीं मधून मधून चित्रकलेची माहिती दिली असून चित्रकार अब्बांचें स्वभावचित्रहि चांगलें रेखाटलेलें आहे. लेखिकेची भाषाशैली चटकदार असून वर्णनशैलीहि आकर्षक आहे.

● ● ●

सौ. सुमति धनवटे

लेखनाची आवड, मनाची हौस, सामाजिक जीवनाबद्दल जिव्हाळा, ध्येयवाद व वास्तववाद यांचा समन्वय करीत जीवनाच्या मूल्यांचा होणारा विचार, अन्यायाची चीड आणि दिलदार मनोवृत्तीचें चित्रण या पार्श्वभूमीवर सुमति धनवटे यांनीं आपलें कादंबरीलेखन केलेलें आहे. त्यांची कादंबरी नागपूर भागांतील निसर्गाशीं एकजीव झालेली आहे आणि तिनें वरच्या वर्गांतील—श्रीमंत घराण्यांतील-

सुखदु:खांचा प्रामाणिकपणें विचार केला आहे.

जयपराजय (१९५१), प्रकाशाकडे (१९५४), वादळज्योत (१९५६) व कातरसांज (१९५७) ह्या सुमतीबाईंच्या कादंबऱ्या आहेत. त्यांनीं कांहीं लघुकथालेखनहि केलें आहे. परंतु कादंबरीकार म्हणूनच मराठींतील वाचकांना त्या परिचित आहेत.

स्वतः सुमतीबाई ह्या एक संसारी स्त्री व समाज कार्यकर्त्या असल्यामुळें प्रीतिकथा रंगवितांना त्यांनीं एक वेगळी दृष्टि आपल्या कादंबरीसाठीं वापरलेली आहे. त्यामुळें उच्चवर्णीय समाजजीवनाचें दर्शन घडत असतांनाहि कादंबरींतून त्यांनीं ठेवलेला अनौपचारिक मोकळेपणा मोठा आल्हादकारक वाटतो. तंत्राच्या दृष्टीनें सुमतीबाईंचें लेखन कांहीं ठराविक चाकोरींत बसणारें नसलें, तरी त्यांनीं स्वतःची म्हणून जी एक वेगळी लेखनपद्धति अवलंबिलेली आहे ती विशेष आहे. जागोजाग त्यांनीं पेरलेल्या विचारांच्या हिरवळी व कल्पनांच्या फुलवेली त्यामुळेंच नजरेंत भरतात. शिवाय ध्येयवाद व वास्तववाद यांचा समन्वय घालण्याचा जो त्यांनीं येथें प्रयत्न केला आहे तो लक्षांत घेण्याजोगा आहे. कारण खऱ्या जीवन-मूल्यांचें दर्शन घडविणें हा आपल्या लेखनामागचा एक प्रमुख हेतु त्यांनीं मानला आहे.

सुमतीबाईंची लेखनाची भाषा हळुहळू सुधारते आहे. मांडणी आकर्षक होते आहे. त्यामुळें त्यांनीं याच विश्वासानें आपलें लेखन चालू ठेवलें, तर मराठींत त्यांची कादंबरी उल्लेखनीय ठरेल असें वाटतें.

मराठी कादंबरीच्या विकासाच्या दृष्टीनें या लेखिकांच्या खेरीज सुधा साठे, डॉ. सुमति क्षेत्रमाडे, शिरीष अत्रे, नलिनी शहा इत्यादींनीं कादंबरी लेखनास आपला हातभार लावलेला आहे.

● ●

कादंबरीच्या क्षेत्रांतील स्त्रियांची ही कामगिरी यापरीनें लक्षांत घेतां कांहीं गोष्टी ठळकपणें लक्षांत येतात. गेल्या पांचपन्नास वर्षांत किंवा गेल्या शतकांतहि महाराष्ट्रांतील स्त्रीजीवन कोणत्या सामाजिक परिस्थितींतून पुढेंपुढें सरकत राहिलें व जगत गेलें याचें बरेंचसें स्पष्टपणें पडलेलें प्रतिबिंब या लेखनांतून दिसून येतें. त्याचप्रमाणें त्या त्या कालमानाप्रमाणें लेखिकांचा शैक्षणिक दर्जा, लेखनाचें कौशल्य, विचारांची पातळी व दृष्टिकोण या संबंधींहि कल्पना येते. त्यामुळें लेखनाची निर्माण क्षमता व प्रतिभा ही स्त्री जीवनाला लाभणाऱ्या विशेष परिस्थितीवर अवलंबून असते याचाहि इथें उलगडा होतो.

ह्या कादंबरी निर्मितीमध्यें बहुतेक सर्व लेखिकांची नजर ही प्रामुख्यानें स्त्री जीवनाच्या कथांनींच माखलेली वा मर्यादित झालेली आहे. त्या त्या काळांतील स्त्रीजीवनविषयक अशा प्रमुख प्रश्नांचाच त्यांनीं येथें अधिक विचार केला आहे.

या अलिकडच्या काळांत स्त्रीशिक्षणाचा झालेला वाढता विकास, कुटुंब व व्यक्तिजीवनांत झालेला बदल, आर्थिक क्षेत्रांत घडलेलें परिवर्तन, सामाजिक सुधारणा, स्त्रियांना मिळालेला सामाजिक दर्जा वगैरे लक्षांत घेतां लेखिकांनीं लिहिलेल्या या लेखनाचें क्षेत्र विस्तारलें वस्तुनिष्ठ चित्रणहि विकास पावलें. त्यांत भारदस्तपणा आला. कल्पनेची भरारी वाढली. स्वतःचें मनोभाव स्पष्टपणें व्यक्त करण्याचें आगळें धैर्य उभारीत आले ! त्यामुळें मराठीला हा विकास लाभदायक ठरला.

परंतु प्रेमा कंटकांचा एक अपवाद सोडला, तर भारत स्वतंत्र होण्याच्या संग्रामकाळांतील मराठी जीवनाचें चित्रण या स्त्रियांनीं केलेलें नाहीं ! त्याचप्रमाणें शांता शेळकेंचा अपवाद सोडला तर कोणीं बहुजन समाजाच्या सुखदुःखांचाहि विचार केलेला दिसत नाहीं. त्यामुळें स्त्रियांनीं लिहिलेली कादंबरी एका मर्यादित क्षेत्रांतून वावरलेली आहे. कांहीं अंशी एकांगी जीवनाचाच तिनें विचार केला आहे.

त्यामुळें अण्णाभाऊ साठ्यांची ‘ फकिरा ’ किंवा खांडेकरांची ‘ ययाति ’ अगर दिघ्यांची ‘ पड रे पाण्या ’ किंवा ‘ सराई ’ स्त्रिया निर्माण करूं शकल्या नाहींत ! हा विचार मी केवळ भाषाशैली लक्षांत न घेतां सामाजिक जीवनाच्या चित्रणाच्या दृष्टीनें देखील येथें मांडतें आहे.

कला विलासाच्या दृष्टीनें स्त्रियांनीं लिहिलेल्या या कादंबरी लेखनाकडे जर आपण पाहिलें तर मात्र येथें त्याबाबतींत समाधानकारक वातावरण आढळून येईल, असाच या कादंबऱ्यांचा साजशृंगार साधलेला आहे. तथापि अपवाद म्हणून चारदोन कादंबऱ्या सोडल्या तर येथून तेथून एकजात सारें मध्यमवर्गाचेंच वातावरण या कादंऱ्यांतून विखुरलेलें दिसून येईल ! शांता शेळके यांच्या कोष्टी जीवनावरील कादंबऱ्या या अपवादांत मोडत असल्या, तरी श्री. दिघ्यांच्या “ सराई ” चें हृदयंगम गावरान स्वरूप तेथें आढळत नाहीं. सामाजिक चाली-रीतींची विशिष्ट बाजू सोडून दिली तर तेथें जानपद असें कांहींच उरत नाहीं. शिवाय तेंथील निसर्गाचें वर्णन देखील फारच मर्यादित झालेलें आहे.

प्रा. ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्यांमधून विखुरलेलें रचनासौष्ठव आणि भाषावैभव स्त्री कादंबरीकारांच्या लेखनांतहि बरेचसें आढळत असलें, तरी समर-प्रसंगांचा तितकासा चित्तवेधक उठाव एखादा अपवाद सोडला तर फारसा कोठेंहि आढळत नाहीं ! स्त्रीमनाच्या मानसशास्त्राच्या दृष्टीनें तयार होणारा स्वभावलेख फडक्यांच्या “ जादुगार ” मधील “ इंदुमती ” च्या आणि श्री. खांडेकरांच्या “ दोनध्रुवा ” मधील “ वत्सले ” च्या रूपानें फारच चांगला निर्माण झालेला आहे. स्त्रीचें खरेंखुरें चित्र येथें आपणास पहावयास सांपडतें हें खरें असलें तरी विभावरीच्या “ अचले ” ची सर या स्वभावलेखांस आलेली नाहीं ! मातृहृदयां-तील वात्सल्याचा येथें होणारा विलोभनीय स्फोट स्त्रीच्याच लेखणीनें करूं जाणें,

इतका अप्रतिम वठलेला आहे. तीच गोष्ट या विविध कादंबऱ्यांमधून सर्वत्र विखुरलेल्या घरगुती वातावरणाबद्दलहि सांगतां येईल.

कादंबरीस आवश्यक असणाऱ्या सर्व वैशिष्ट्यांनीं या कादंबऱ्या भरगच्च असलेल्या दिसतात. तथापि या सर्व कादंबऱ्यांतून एखादा अपवाद सोडला तर एखाद्या विषयाबद्दल किंवा एखाद्या विशिष्ट अनुभूतीबद्दल स्त्रियांच्या लेखणीनें तो तितक्या उत्कटत्वानें विचार केलेला नाहीं, हें केव्हांहि कबूल करावें लागेल. कादंबरीकाराला आपलें लेखन करतांना, वर्णित विषयाशीं एकजीव होतांना, जी मनाची बेहोष होऊन जाणारी अवस्था असावी लागते, आणि बेधडकपणें तिचा आविष्कारहि करण्याची आवश्यकता लागते, ती स्त्रीमध्यें अजून यावयाची आहे. आजवरच्या तिच्या सामाजिक जीवनामधील ज्या अवस्थेंतून ती गेली आहे, त्या अवस्थेचा आणि तिच्यावर समाजानें लादलेल्या बंधनांचा विचार लक्षांत घेतां, तिचा भावनाविष्कार अस्फुट अवस्थेंत दिसावा, यांत कांहीं जगावेगळें खास घडलेलें नाहीं.

पाश्चात्य देशांतील लेखिकांनीं ज्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत आणि जागतिक लौकिक कमावला आहे, त्यांचें कारण पाहिलें, तर त्यांचें सामाजिक जीवनच त्यांना जास्त सहाय्यभूत झालें आहे, असें म्हणावें लागेल. तिकडील स्त्री आणि पुरुष यांच्यामधील सामाजिक मूल्यें आणि त्यांचें समाजामधील स्थान हें केव्हांहि आपल्यापेक्षां निराळें आहे. त्या लेखिकांनीं पुष्कळदां स्वतःच्या आयुष्यांतील अनुभूतींचाच फार मोकळ्या मनानें आविष्कार केलेला आहे. पण आपल्याकडे तसें नाहीं. " असुक एक बेधडकपणें लिहिलें तर काय होईल " ही धास्ती अजून आमच्या लेखिकांना वाटत असावी ! शकुंतला परांजपे यांची " घराचा मालक " ही कादंबरी ह्या धास्तीची मर्यादा ओलांडून पुढें गेलेली असली, तरी इतर सर्व कादंबऱ्यांना तोच दृष्टिकोन लावतां येणार नाहीं.

आमच्याकडील स्त्रीच्या मनावरील भारतीय संस्कृतीचा पगडा आणि सामाजिक बंधनें यांत ढिलेपणा आल्याविना सुंदर व कलापूर्ण कादंबरीची स्त्रियां-कडून अपेक्षा करतां येणार नाहीं. पण त्यासाठीं विभावरीसारखी बंडखोरी अंगांत आणणें जरूरीचें आहे, हेंहि स्त्रियांनीं विसरून चालणार नाहीं. शिक्षणाच्या वाढी-बरोबरच कल्पनाविस्तारहि व्हायला हवा आहे, हें स्त्री कादंबरीकारांच्या ध्यानांत येत नसावें असें दिसतें. घरगुती प्रसंगांचा अतिशय उत्तम आविष्कार आणि पुरुषांना जमणार नाहीं अशा स्त्रीसुलभ भावनांचा अप्रतीम आविष्कार त्यांनीं केलेला आहे यांत वाद नाहीं. पण त्याचबरोबर त्यांचें कल्पनावैभव तेथें कोतें पडलें आहे हेंहि मान्य करावें लागेल. आनंदीबाई जयवंत यांची " उर्मिला " आणि श्री. बोरकरांची " भावीण " या दृष्टीनें पडताळून पहाण्यासारखी आहे. स्त्री जीवनाकडे पहाण्याची या दोन लेखकांची दृष्टि निराळी असली आणि दोन्हीं-

मधील सात्त्विक वातावरणहि उल्लेखनीय असलें, तरी बोरकरांची कल्पना कांकण-भर तरी सरस ठरण्याची शक्यता आहे! तीच गोष्ट काशीबाईंच्या आणि हरि-भाऊंच्या कादंबऱ्यांमध्येंहि दिसून येईल. शिवरामपंत परांजप्यांच्या " गोविंदाच्या गोष्टी "मधील कल्पना वैभवाची चमक तर येथें फारशी कोठेंच आढळत नाहीं असें म्हणावें लागेल!

या सर्व विवेचनावरून एक प्रमुख निष्कर्ष असा काढतां येईल कीं, स्त्री आणि पुरुष यांच्या कादंबऱ्यांमध्यें गुणदोषांचें प्रमाण कमीजास्त असलें तरी त्या एकमेकांना पूरक झालेल्या आहेत.

तथापि एक गोष्ट मात्र खरी कीं, श्री. वि. स. खांडेकरांची पौराणिक जीवनावर आधारलेली " ययाति " सारखी कादंबरी किंवा उद्धव ज. शेळके यांची विदर्भांतील बोलीमधून गोरगरिबांचें जीवन चित्रण करणारी " धग " सारखी कादंबरी अद्याप स्त्रियांच्या हातून लिहिली गेली नाहीं. कारण एखाद्या वर्णित विषयाचा अतिशय खोलवर जाऊन विचार करण्याची संवयच स्त्रीमनाला अद्याप लागलेली दिसत नाहीं. फार काय त्यांनीं सामाजिक, राष्ट्रीय किंवा आंतर-राष्ट्रीय अशा घडामोडींचा सूक्ष्मतेनें विचार करून त्याबाबत आपली खंबीरपणें भूमिकाहि तयार केलेली दिसत नाहीं. कांटेरी जाळीं गुंफणें त्यांच्या मनालाच सहन होत नसावें! त्या कारणानें एखादा विशिष्ट असा मनाजोगता चटकदार भाग उचलून त्यांनीं त्यावरच आपलें लेखन प्रामुख्यानें आधारलें आणि कादंबरीं-तील जीवनचित्रण केलें! त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्या कादंबरीनें एखादा दुसरा अपवाद सोडला तर फारशी लोकप्रियता मिळविली नाहीं किंवा सामाजिक सुधारणांचा आधारभूत ग्रंथ म्हणूनहि मान राखला नाहीं. स्वाभाविकच या कादंबऱ्यांना अक्षर वाङ्मयांत स्थान राहिलें नाहीं आणि जागतिक कीर्तीचाहि वाटा उचलता आला नाहीं!*

---

* " None of these seriously attack the complexities, social, national and international save Incidentally and as it were to illustrate life on the surface and character as moulded by special experience. they are of great value historically; clever and sympathetic studies of a unique era in the march of civilization; but like all art most true in detail to its period they lack permanence and universality. "

R. Brimley Johnson, Some contemporary Novelists (Women).

नाटक

विविध प्रकारची श्रेष्ठ कलाकृति आपल्या वाङ्मयाच्याद्वारें निर्माण करणाऱ्या कलावंताला जर कोणीं एखाद्या अफाट वृक्षाची उपमा दिली, तर मग कथा किंवा कादंबरी ही त्या वृक्षाला आच्छादून टाकणारी पालवी ठरेल. काव्य हा त्या वृक्षाला आलेला सुगंधी न् गोड फुलोरा होईल. आणखी नाटक हें त्या मोहोरांतून निर्माण होणारें परिपक्व फळ दिसेल !

नाटक ही एक स्वतंत्र अशी कला आहे. माणसाच्या अंगीं उपजतच असलेली ती एक स्वाभाविक प्रवृत्ति आहे. त्या कारणानें कादंबरी ही जर एखाद्या निर्झरासारखी वळसे घेत झुळुझुळू वाहत राहिलेली दिसली, तर नाटक हें एखाद्या धबधब्यासारखें एकदम कोसळलेलें दिसून येतें. नाटक म्हणजे मानवी जीवनांत आढळणारा खटका, झगडा, झोंबाझोंब, द्वंद्व, युद्ध ! म्हणून नाटक हें केवळ वाचून भागत नाहीं तर तें प्रत्यक्ष पहावें लागतें. माणसाचें मन गुंग करून सोडणारी ती एक उत्कृष्ट कलाकृति असते. कृति हा तिचा आत्मा असतो आणि गति हें तिचें शरीर असतें. आणि म्हणूनच नाटकाइतकें जीवनाचें रसोत्कट प्रतिबिंब दुसऱ्या कोणत्याहि वाङ्मय प्रकारांत पडलेलें आढळून येत नाहीं !

एकदम हजारों लोकांच्या अंतःकरणांचा ताबा घेण्याची ताकद फक्त नाटक ह्याच एकस्या वाङ्मयीन कलाकृतींत आहे. त्यामुळें नाटक पहातांना प्रेक्षक एकदम नाटकांतील विषयाशीं तादात्म्य पावतो. नाटकांतील पात्रांच्या सुखदुःखांशीं एकजीव होऊन जातो ! आणि मग एका वेगळ्याच जीवनांत त्याचा प्रवेश होतो. रोजचें आपलें जीवन सोडून त्याचें मन नाटकांतील जीवनांतच बराच काळ तरंगत रहातें ! क्वचित प्रसंगीं त्यास आपलेंहि भान अशा वेळीं रहात नाहीं.

त्यामुळें नाटक हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकारांच्या मानानें अधिक प्रभावी आहे हें प्रेक्षकांच्या व वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येतें. अभिनयाची उत्तम बोज राखीत आणि भाषणांतून जीवन मूल्यांची खैरात करीत, रंगभूमीवरील नाटक हें समोर बसलेल्या प्रेक्षकांना मानवी जीवनांतील एक चांगली गोष्ट सांगत असतें. ही गोष्ट मानवी जीवनमूल्यांचें चित्ताकर्षक भाष्य करते. जागतिक भावनेचा आविष्कार करते. आपल्या देशाचें अंतःकरण बोलून दाखवते. चालू घडीच्या प्रभावी प्रश्नांचा उलगडा करते. त्या कारणानें नाटक पहाणाराला भाषेची फारशी अडचण पडत नाहीं. अभिनयाच्या द्वारेंच प्रेक्षक सारे अंदाज बांधूं शकतो. कारण त्याच्यापुढें जिवंत काव्य उभें असतें. मानवी जीवनमूल्यांचा प्रत्यक्ष घडणारा साक्षात्कार तो पहात असतो. आणि म्हणून नाटक हें लेखकाच्या बुद्धिवैभवाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून त्याच्या मनांत भरतें.

मराठी रंगभूमीचा व नाटकांचा इतिहास तसा उल्लेखनीय आहे. अगदीं

प्रारंभींच्या कालांतील संस्कृत वाङ्मयांत लोकप्रिय झालेली नाट्यकला मराठीच्या प्रांतांत पहिल्यांदा भाषांतराच्या रूपानें अवतरली असली, तरीहि नंतर तिनें स्वतःचें म्हणून चांगलेंच मंदिर उभारलें आहे. इंग्रजींतील नाटकांचा तिच्यावर सुरवातीला परिणाम झालेला असला, तरी तिनें आपलें म्हणून खास वैशिष्ट्य हें नेहमींच राखलें आहे.

गेल्या शंभर वर्षांतील नाट्यकला या संदर्भांत लक्षांत घेतां एक गोष्ट ठळकपणें लक्षांत येते ती अशी कीं, नाट्यकला, नाटककार व नटनटी यांच्या विषयीं समाजाच्या कल्पना ह्या झपाट्यानें बदलत गेलेल्या आहेत. नाटकासाठीं लागणारे विषय, पडदे, पोषाख, देखावे वगैरेंतहि कालमानाप्रमाणें ओघानेंच बदल झालेला आहे. तसेंच सुरवातीच्या गद्य नाटकाला आतां संगीताचीहि सुंदर जोड मिळालेली आहे.

इ. स. १८४३ मध्यें जन्म पावलेली गद्यमय नाट्यकला इ. स. १८८० मध्यें संगीताचा साज अंगावर ल्याली. या नाट्यकलेची सेवा प्रामुख्यानें इ. स. १८७५ ते १८८५ मध्यें त्रिलोकीकरांनीं व विशेषतः किर्लोस्करांनीं मोठ्या ईर्षेनें केली आहे. यानंतरच्या काळांत नाट्यवाङ्मयाचा विकास इतिहास, कला व वाङ्मय या तिन्ही दृष्टींनीं चांगलाच होत गेल्यामुळें किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी, वरेरकर, अत्रे व रांगणेकर इत्यादि नाटककारांनीं मराठी नाट्याची भरघोस अशी सेवा केली.

त्यामुळें प्रणयकथेची रम्यता व हृदयंगमता सुंदर रीतीनें प्रगट करतांनाच मानवी मनाला मोहिनी घालणारे सर्व गुण अंगीं धारण केलेलें सौभद्र नाटक, जन्मापासूनच लोकप्रिय विषय धारण करून मानवी मनाला चटका लावून सोडणारें शारदा नाटक, कल्पनारम्य कथानकानें आपली गोडी कायम टिकविणारें मानापमान नाटक, पतिव्रतेचा प्रभाव सांगणारें पुण्यप्रभाव व एकच प्याला नाटक, अद्भुतरम्यतेनें मनाला भुरळ पाडणारे राजसंन्यास नाटक, नाट्यरचनेचें चातुर्य दाखविणारें वरेरकरांचें 'करीन ती पूर्व' हें नाटक, किंवा अत्र्यांची घराबाहेर, उद्यांचा संसार अगर जग काय म्हणेल हीं नाटकें आणि रांगणेकरांचें 'कुल-वधू' हें नाटक, हीं सर्व नाटकें मराठी रंगभूमीवर नेहमींच यशाची चढती कमान घेऊन लोकप्रिय झालीं. त्यांच्यामुळें मराठी रंगभूमीचा व नाट्यकलेचा विकास झाला. प्रतिभासंपन्न लेखकांनीं मराठी रंगभूमी गाजविली.

मराठींतील वरील नाटककारांच्या जोडीलाच मराठी नाट्यकलेची सेवा करण्याची संधि कांहीं स्त्रियांनींहि घेतलेली आहे. संख्येच्या मानानें त्यांची ही सेवा फारच थोडी आहे. तरीपण जी आहे, तिचाच केवळ या प्रकरणांत सारांशानें विचार केलेला आहे.

गिरिजाबाई केळकर

मराठींत नाटक लिहिणारी पहिली स्त्री या नात्यानें गिरिजाबाई केळकर यांची योग्यता फार मोठी आहे. मागील कालखंडामध्यें त्यांच्या " पुरुषांचें बंड " या नाटकाचा उल्लेख आलेला आहेच. त्यांनीं आजवर एकूण पांच नाटकें लिहिलेलीं आहेत. त्यांपैकीं " पुरुषांचें बंड ", " आयेषा " व " हीच मुलीची आई " हीं सामाजिक नाटकें असून " राजकुंवर " हें ऐतिहासिक नाटक आहे.

" पुरुषांचें बंड "मध्यें स्त्रियांच्या योग्यतेचें समर्थन आलेलें असून " आयेषां "त एखादी स्त्री मनांत आणील तर अंगीकृत कार्यांत आपलें सर्वस्व राखून एखाद्या योगिनीप्रमाणें आपलें चारित्र्य किती दिव्य असल्याचें दाखवूं शकते, याचें दिग्दर्शन लेखिकेनें केलेलें आहे. " हीच मुलीची आई " या नाटकांत वरेरकरांच्या " हाच मुलाचा बाप " याच्या उलट परिस्थिति रंगविलेली आहे. पण या सर्व नाटकांपेक्षां " राजकुंवर " (१९२४) हें नाटक लेखिकेनें फार चांगलें लिहिलेलें आहे.

" शिवाजीची मुलगी गणोजी शिर्क्यांना दिलेली होती व शिर्क्यांची मुलगी शिवाजीनें सून करून घेतली होती, ही गोष्ट ऐतिहासिकच आहे. तसेंच संभाजीचें शिरकाणहि महशूरच आहे. फक्त राजकुंवरसारखी तेजस्वी मुलगी शिवाजीला होती कीं नाहीं एवढाच काय तो प्रश्न. पण तो इतिहाससंशोधक पहातील. मला फक्त तें पात्र आवडलें व त्याबरोबरच कितीतरी सुंदर राजकारणांतील तत्त्वें दिसूं लागलीं. तीं दाखविण्याकरितां मीं हें नाटक लिहावयास घेतलें " अशी खुद्द लेखिकेचीच या नाटकाविषयींची भूमिका आहे.

" राजकुंवर " या नाटकांत " वीर कुलोत्पन्न राजकन्या देशाच्या विपन्न कालीं कर्तव्यच्युत झालेल्या पतीस दूर सारून रजपूत राजकन्येप्रमाणें स्वदेशाकरितां जिवाचें किती रान करितें, तें गतकालाचें चित्र उभारलेलें आहे......ज्या ऐतिहासिक प्रसंगावर त्यांनीं हें नाटक लिहिलें आहे तो अत्यंत ओजस्वी व तेजस्वी आहे. " (प्रस्तावना—के. स. सोनाळकर).

इ. स. १९५७ च्या नागपंचमीला गिरिजाबाई केळकरांनीं " मंदोदरी " हें नाटक मराठी रसिकांच्या स्वाधीन केलें आहे. या नाटकांत श्रीमति केळकरांनीं पतिव्रतेचा महिमा सांगण्याचा जिवापाड प्रयत्न केला आहे. सीतामाई व लंकाधीश्वराची राणी मंदोदरी या दोघीहि खऱ्या पतिव्रता असल्याची गोष्ट या नाटकानें सांगितली आहे. खरा पत्नीधर्म सांगण्याच्या भरांत लेखिकेनें जो भावनाविष्कार केला आहे तो अगदीं घरगुती व भावनाप्रधान असा आहे. त्यामुळें वीरश्रीला शोभणारी भाषा या नाटकाला लाभलेली नाहीं ! संवाद देखील त्यामुळेंच खटकेबाज झालेले नाहींत. तरी परंतु एका स्त्रीनें दुसऱ्या स्त्रीचें स्त्रीहृदय ओळखावें

म्हणून मंदोदरीची येथें प्रकट झालेली भूमिका नव्यानेंच मराठी वाङ्मयांत आलेली दिसते. त्याचप्रमाणें रावण व मंदोदरीकडून सीता पवित्र असल्याची रामापुढें दिली गेलेली ग्वाही व खुद्द सीतामाईचें या नाटकांतील स्वभावचित्रहि उल्लेखनीय आहे.

● ● ●

शकुंतला परांजपे

शकुंतला परांजपे या मोठ्या रसिक नाट्यभक्त आहेत. त्यांनीं फ्रेंचमधून मराठींत अनुवादित केलेलीं " सोयरीक " व " चढाओढ " हीं प्रहसनें मार्मिक आणि विनोदी होतीं. पण " संगीत पांघरलेलीं कातडीं " लिहितांना मात्र त्यांना तितकेसें यश मिळालेलें नाहीं. असलें कृत्रिम कल्पनारम्य कथानक एखादा कवि कदाचित् चांगलें रंगवूं शकेल. शकुंतलाबाईंचा मुख्य आत्मीय गुण अत्यंत मोकळा पण निरागस विनोद हा आहे.

शकुंतलाबाईंच्या भाषांतरित प्रहसनांमध्यें जी ठसकेबाज भाषा आणि नाट्याला योग्य अशी गुंतागुंत आलेली आहे ती या त्यांच्या स्वतंत्र नाटकांत दिसून येत नाहीं. परस्परांवरील प्रीति सफल होण्यासाठीं चित्रकला व लेखनकला यांच्या बुरख्याखालीं इच्छित कार्य सफल होणारी कथा येथें आलेली आहे ! या नाटकाची भाषा पात्रानुरूप आणि सोईची असली, तरी " भिल्लीणीच्या बोरांतील " लेखिकेचें व्यक्तिमत्त्व आणि लालित्य येथें दिसून येत नाहीं.

● ● ●

सौ. दया पटवर्धन

" सात पाहुण्या " या पुस्तकांत दया पटवर्धन यांनीं आपल्या सात एकांकिका प्रसिद्ध केलेल्या आहेत. " वाचकांचें व प्रेक्षकांचें मनोरंजन करून त्यांची कांहीं वेळ करमणूक व्हावी, या हेतूनेंच या नाटिका लिहिल्या आहेत. " अशी या नाटिकांची मूळ कल्पना येथें प्रस्तावनेंतच सांगितलेली आहे. त्यामुळें केवळ करमणुकी पलीकडे या नाटिकांचें इतर वैशिष्ट्य दिसत नाहीं.

या नाटिकांसाठीं निवडलेले विषय सर्वसामान्य लोकांच्या रोजच्या जीवनांतील आहेत. पात्रांचीहि सहज ओळख पटावी इतकी ती ओळखीच्या जगांतील दिसून येतात ! त्यांच्या भोंवतीं निर्माण केलेले प्रसंग गमतीचे असून ते वाचकांना परिचित वाटणारे आहेत. उदाहरणार्थ " प्रेमवेडा " मधील वसंता-सारखे मित्राच्याच पत्नीवर प्रेम करून फसणारे कित्येक कॉलेज तरुण वाचकांना

सत्यसृष्टींत भेटणें शक्य आहे ! त्याचप्रमाणें या नाटिकांतील पात्रांना जबाबदारीची जाणीवहि एकंदरीनें कमीच दिसते. " नाटकांतील पात्रें साधीं, सरळ मनाची तरुण मंडळी आहेत. त्यांच्यावर ओढवलेले प्रसंग गंमतीचे पण क्षुल्लक आहेत. " (प्रस्तावना) कृति हा नाटकाचा आत्मा समजण्यांत येत असला, तरी गति हें त्याचें शरीर असतें हें अचूकपणें ओळखून लेखिकेनें या नाटिकांचें तंत्र सांभाळलेलें दिसून येत नाहीं.

● ● ●

सौ. मालतीबाई बेडेकर
(बाळूताई खरे)

" ही नाटिका नाट्यतंत्राकडे मुळींच लक्ष न पुरवतां केवळ स्त्रीपात्रांकरवीं करमणूक करण्याच्या उद्देशानें लिहिली आहे. " आपल्या " पारध " नाटकाच्या पहिल्याच पानावर मालतीबाई बेडेकर यांनीं असें सांगून ठेवलेलें आहे. त्यामुळें त्यांच्या या नाटिकेविषयीं नाट्यकलेच्या दृष्टीनें पहाण्याचें कारणच उरत नाहीं. जुन्या आणि नव्या विचारसरणींच्या स्त्रियांमधील संसाराबद्दलची चर्चा यांत प्रामुख्यानें आलेली आहे.

लेखिकेची या नाटिकेंतील भाषा चटकदार व संवादलेखनहि चांगलें झालें आहे, तरी पण या नाटिकेंत खरें नाट्य तितक्या प्रभावानें आढळत नाहीं. " अलौकिक संसार "मध्यें मात्र सौ. मालतीबाई बेडेकर या त्या मानानें बऱ्याच यशस्वी झाल्या आहेत.

● ● ●

सौ. सुधा साठे

" एकच गांठ " या संगीत नाटकांत सुधा साठे यांनीं प्रत्येक स्त्रीला आपल्या आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी लग्नचक्रांतून एकदां जावेंच लागतें व " हजार वळसे अन् एकच गांठ " या म्हणीप्रमाणें तिला या प्रसंगाला तोंड द्यावें लागतें, या गोष्टीची कल्पना रंगविली आहे. त्यासाठीं विवाहाचे अनेक जुने नवे प्रकार त्यांनीं संभाषणद्वारेंच चर्चिलेले आहेत.

सुधा साठे यांची भाषा घरगुती आहे. पात्रांच्या मनाच्या ठेवणीनुसार लेखिकेनें विचारांची पेरणीहि चांगली केली आहे. पण जिवंत नाट्याला लागणारा संग्राम मात्र येथें कोठेंच फारसा आढळत नाहीं.

● ● ●

उमाबाई सहस्रबुद्धे

" संगीत काहूर " आणि " लोकराज्य " हीं दोन नाटकें उमाबाई सहस्रबुद्धे यांनीं लिहिलीं आहेत. त्यांपैकीं पहिल्या नाटकांत स्वतः लेखिकेनें सांगितल्याप्रमाणें " अकल्पित योगायोगानें मनांत उद्‌भवणाऱ्या संशयी काहूरानें गोंधळ घालून सर्वांनाच त्याची थोडी थोडी झळ लावली आणि सूज्ञ मनांनीं ती विझवली. " असा या नाटकाचा कथाभाग आहे. आणि " लोकराज्य " या नाटकांत लेखिकेनें संस्थानांतील लोकशाहीच्या अवतारासाठीं निर्माण होणाऱ्या घडामोडीं-बरोबरच रहस्यमय व अद्‌भुतरम्य प्रेमविवाहाची जोड दिलेली आहे. श्री. धुंडिराज-शास्त्री विनोद यांनीं लेखिकेला धन्यवाद देतांना म्हटलें आहे कीं, " संगीत लोकराज्य नाटकांतील पात्रांचा स्वभावपरिपोष चांगला वठला आहे. शब्दयोजना साधी पण समर्पक व मार्मिकहि आहे. राजकीय, शैक्षणिक व संस्थान विषयक प्रश्न नाजुकपणें हाताळले आहेत. " तसेंच या नाटकाबद्दलचें आपलें मत व्यक्त करतांना मामासाहेब वरेरकर ह्यांनीं म्हटलें आहे कीं, " नाटक हें लोकशिक्षणाचें प्रभावी साध्यम आहे. या कसोटीला प्रस्तुत नाटक उपयुक्त असून नव्या बैठकीवर आधारलेलें आहे. प्रेक्षकांना खेंचून धरण्याचें सामर्थ्य यांत असून प्रयोगदृष्ट्या नाटक आकर्षक होईल.

उमाबाईंची नाट्यलेखनकला अद्याप सुरवातीच्या प्रयोगावस्थेंत आहे. " त्यांचा सराव जसजसा वाढत जाईल तसतशी भाषेची सफाई, रचनेचें चातुर्य व प्रयोगक्षमता हे गुण त्यांचेमध्यें अधिक येत जातील " * असें म्हणावयास हरकत नाहीं.

सौ. कृष्णाबाई मोटे

" माझी गुणाची पोर " हें तीन अंकी छोटें नाटक कृष्णाबाई मोटे यांनीं लिहिलें असून या नाटकांत मनानें वरलेला पति मिळवावा कसा याचें मोठें मनोरंजक चित्रण आलेलें आहे. या नाटकाची सुरवात हरितालिकेच्या पूजेपासून झाली असल्यामुळें जुन्या व नव्या विचारांची सुंदर सांगड येथें लेखिकेनें घालून दिली आहे. लेखिकेची भाषा चांगली असून संवादहि ठीक आहेत.

* लोकराज्य, प्रस्तावना, डॉ. के. ना. वाटवे.

सौ. मुक्ताबाई दीक्षित

मराठींतील एक विचारवंत व सुसंस्कृत लेखिका म्हणून नांवलौकिक मिळविलेल्या सौ. मुक्ताबाई दीक्षितांनीं ' जुगार ', ' अवलिया ' व ' संसार ' हीं नाटकें लिहिलीं आहेत. पैकीं अवलिया व संसार यांना स्वतंत्रपणापेक्षां आधारच मोठा आहे. त्यामुळें त्यांचा इथें विचार केलेला नाहीं. ' जुगार ' हें नाटक मात्र स्वतंत्र असून सपत्नीकाचें लग्न हा या नाटकाचा विषय आहे.

मुक्ताबाईंची या नाटकांतील भाषा प्रौढ आहे, सोपी व प्रासादिकहि आहे. संवाद तात्त्विक चर्चेकडे झुकलेले असले तरी परिणामकारक आहेत. लेखनाचा दर्जा वरच्या प्रतीचा आहे. या लेखनामध्यें लेखिकेची भूमिका विचारप्रधान आहे. समाजांतील एका अनिष्ट प्रथेला आळा घालण्याचें काम नुसत्या कायद्यापेक्षां चटकदार संवाद आणि विनोदी व गंभीर प्रसंगांचें मिश्रण साधून या नाटकानें केलेलें आहे.

या निरनिराळ्या लेखिकांच्या शिवाय सौ. सुमति धनवटे (धुळीचे कण), शशिकला आळंदकर (आकाश-दिवा, तारू लागलें किनारीं), सौ. उमाबाई भट (पत्त्यांचा बंगला), सौ. कुमुदिनी रांगणेकर (बच्चू लछमन, इच्छा नगरी, स्पर्धेचा निकाल), सौ. ज्योत्स्ना भोळे (आराधना), सौ. विमल काळे (मृगजळ) इत्यादींनींहि मराठी नाट्यकलेच्या विकासासाठीं आपल्या नाट्य लेखनाद्वारें प्रयत्न केलेला आहे.

स्त्रियांनीं लिहिलेलीं हीं निरनिराळीं नाटकें लक्षांत घेतां एक गोष्ट ठळकपणें दिसून येते ती अशी कीं, नाट्यलेखनकलेंत स्त्रीची लेखणी अद्यापि फारच नवशिकी आहे. पुरुष लेखकांच्या दृष्टीनें ती फार मागें आहे. त्यामुळें एखादा अपवाद सोडला तर मराठींतील ' शारदा ' नाटकाची किंवा " सौभद्रा "ची बरोबरी कोणत्याहि स्त्रीच्या नाटकानें केलेली नाहीं ! एवढेंच नव्हें तर खुद्द स्त्री जीवनांतील जिव्हाळ्याचे प्रश्न देखील पुरुष लेखकांच्या प्रमाणें नाटकाच्या माध्यमाचे द्वारें समाजापुढें प्रभावीपणें मांडणें आचार्य अत्रे यांचेप्रमाणें स्त्रियांना जमलेलें नाहीं ! !

नाटककाराला उत्तम नाटक लिहित असतांना तिऱ्हाइताच्या भूमिकेवरून जीवनाचें उत्तम चित्र रंगवावयाचें असतें. मानवी जीवनाचें प्रतिबिंब नाटकामध्यें हुबेहूब रीतीनें वठवून दाखविण्याची त्याच्यावर जबाबदारी असते. स्त्रियांना नेमकें हेंच जमत नाहीं. तिऱ्हाइताच्या भूमिकेवरून विचार करणें स्त्रियांना जमतच नाहीं. त्यांनीं जें जें लिहिलें त्यास स्वानुभवाची जोड फार आहे. कल्पनेपेक्षां सत्यचित्रणच त्यांत विशेष आहे. स्वतःच्या जिव्हाळ्यानें लेखन करणें हा स्त्रीचा खरा मनोधर्म आहे. बदल हा केवळ बदलासाठीं म्हणून पुरुषाला हवा असतो. स्त्रीला बदल नको असतो. तिला जुनें टिकवावेंसें वाटतें. त्यामुळें " नाटक हें

व्यक्तीसाठीं नसून गर्दीसाठीं आहे " ह्या तत्त्वानुसार समाजांतील सर्व थरांमधून येणाऱ्या हजारों प्रेक्षकांचीं मनें नाटककाराला आपल्याकडे खेंचून घ्यावयाची कला स्त्रीला साधत नाहीं. नाटकाला जंगी स्फोटक द्रव्यासारखा कडाडणारा समरप्रसंग हवा असतो. नाटक हें एकदम धबधब्याप्रमाणें कोसळत असतें ! स्त्रीच्या मनाचा पिंडच या वातावरणाला पोषक असा नाहीं. त्यामुळेंच नाट्यलेखनांत ती यशस्वी होऊं शकली नाहीं, असें म्हणावें लागेल. एखाद्या निर्झरणीप्रमाणें वळसा घेत घेत झुळु झुळू वहाणाऱ्या कादंबरीला पोषक असाच स्त्रीचा मनोधर्म आहे. तिला संवादलेखन जमतें पण त्यांत नाट्य फार कमी असतें. त्याचेंहि कारण हेंच असावें !

स्त्रियांनीं लिहिलेल्या नाटकांचा फार तर एखादा दुसरा प्रयोग यशस्वी झाल्याचेंच ऐकिवात येतें ! आणि हे प्रयोग देखील प्रामुख्यानें महिलामंडळाच्या एखाद्या स्नेहसंमेलनच्या निमित्तानें झालेले असतात ! गडकरी, अत्रे, खाडिलकर, वरेरकर आणि अगदीं अलीकडचे रांगणेकर या नाटककारांच्या नाटकांना मराठी रंगभूमीवर जी लोकप्रियता आहे, ती लोकप्रियता स्त्रियांच्या कोणत्याहि नाटकाला मिळालेली नाहीं. त्या दृष्टीनें पाहिलें, तर उत्तेजनाभावीं स्त्रीनें विशेष जिव्हाळ्यानें नाट्यलेखन केलें नसावें, असेंहि म्हणतां येईल !

एकंदरीनें विचार केला असतां येथें एकच गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते; आणि ती म्हणजे नाट्यलेखनास लागणाऱ्या प्रभावी मनोवृत्तीचाच स्त्रीच्या ठिकाणीं अभाव आहे, ही होय.

निबंध

जगांतील प्रतिभाशाली व सामर्थ्यसंपन्न भाषांपैकीं मराठी भाषा ही एक आहे. तिचा प्राचीन काळ वैभवसंपन्न आहे. तिची त्यावेळची काव्यसंपत्ति अलौकिक आहे. गद्यसंपत्तीचा बोलबाला त्या काळांत फारसा झालेला दिसत नाहीं. जुन्या काळचें कहाणीवाङ्मय आणि बखरवाङ्मय यांनीं मात्र आपलें खास वैशिष्ट्य अद्याप शाबूत ठेवलेलें आहे.

तथापि मराठी गद्याचा खरा विकास झाला तो इंग्रजी राजवट सुरू झाल्यानंतर, असा एक लोकभ्रम फोफावला गेला होता. दरम्यानच्या काळांत जुन्या कमावलेल्या मराठी राजभाषेचा नव्या इंग्रजी भाषेच्या प्रभावाखालीं लोकांना विसर पडला होता ! परंतु विष्णुशास्त्री चिपळोणकरांनीं हा लोकभ्रम नाहींसा करण्याचा विडा उचलला. मराठीला लाभलेलें संस्कृतचें बोजड वळण काढून टाकून नव्या मराठीचें दर्शन त्यांनीं समाजाला घडविलें. त्या कामीं कृष्ण-

शास्त्री चिपळोणकर यांनींहि श्रम घेतले होतेच. त्या कारणानें परक्या भाषेंतील भाषांतरित वाङ्मयानेंहि दिशाभूल पावलेल्या मंडळींचा भ्रमनिरास होणें सोईचें झालें. एवढेंच नाहींतर इंग्रजी वाङ्मयाचा विचार करतांना "इंग्रजी वाङ्मयाचें अध्ययन करावयास गेलों तर एकाऐवजीं शेंकडों टीका, प्रतिटीका, चर्चा, टिप्पणी ग्रंथ, सारांश ग्रंथ, चरित्र ग्रंथ, कोश ग्रंथ आपल्या सहाय्यास सिद्ध असतात. फक्त वाचावयाचें व मनन करावयाचें ! मराठींत तसें नाहीं. सारा धर्मशाळेंतला संसार ! त्यामुळें जी वेडीवांकडी शिधासामुग्री मिळेल त्यावर भात पिठलें साधेल तसें उरकून दिवस साजरा करावा लागतो. आज आमची मराठी अशी पोरकी दिसली तरी ती थोरामोठ्यांची कुलीन, शुद्ध सत्त्व आहे, तिचें कोड परमेश्वर पुरविणारा आहे ! *" ही कल्पनाहि मागें पडली आणि मराठींतील गद्यवाङ्मय–विशेषतः निबंधवाङ्मय झपाट्यानें लोकमान्य होत गेलें. विष्णुशास्त्री चिपळूण-करांपासून तो साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांपर्यंत अनेक निबंधकारांनीं उल्लेखनीय कामगिरी केली.

दरम्यानच्या काळांत इ.स. १८५७ सालीं मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. देशी भाषेची त्या कारणानें हकालपट्टी झाली. तसेंच गोडबोले, लेले, राजवाडे प्रभृतींच्या लेखनानें संस्कृताचा उतारा मराठींत आणला. कोल्हटकर-चिपळूण-करांनीं मराठी निबंधाला चांगले दिवस आणले. मोरोबा, हळबे, रिसबूड वगैरेंनीं मराठी कादंबरीला सजविलें. आणि विशेषतः इ. स. १८७४ त मालाकारांनीं मराठीचा खरा जयजयकार केला. मराठीचा गेलेला मान पुन्हां मिळाला.

"समाजाला निद्रेंतून जागें करणें जीवनांतल्या मूल्यांचा निर्भय आणि प्रामाणिक दृष्टीनें विचार करायला त्याला शिकविणें, जें असत् आणि अमंगल आहे त्याच्यावर तर्कशुद्ध प्रहार करणें, जें सत् आणि मंगल आहे त्याचा सावेश पुरस्कार करणें" ‡ हें निबंध लेखकाचें मुख्य कार्य मराठींतील संतांनीं पूर्वींच केलें होतें.त्याला पुढें चांगले दिवस येत गेले. आणि मराठींत डौलदार निबंधाची रचना भरघोंसपणें होत गेली.

सुरवातीच्या निबंधांचें स्वरूप विचारप्रवर्तक होतें. टिळक, आगरकर, केळकर, परांजपे किंवा अच्युतराव कोल्हटकर हे साहित्यिक असूनहि पत्रकार असल्यामुळें त्यांनीं आपल्या निबंधांच्याद्वारें आपल्या विचारांचाच प्रामुख्यानें प्रचार केलेला दिसून येईल. अर्थात्‌च त्यांचे हे विषय त्यांनीं आपल्या भोंवतालच्या राजकीय धुमाकुळींतून निवडले. देशाची त्या वेळची परिस्थितीच अशी होती कीं, या क्षेत्राशिवाय विषयाची निवड करणें त्यांना शक्यच होऊं नये ! त्यामुळें त्यांच्या

* द. वा. पोतदार. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार. पा. १७

‡ वि. स. खांडेकर. प्रास्ताविक, वासंतिका.

निबंधाची घडणहि गंभीर स्वरूपाची झाली आहे. ह्या निबंधाची रचना होत असतांना त्या निबंधकारांचें पांडित्य, तर्कशुद्ध विचारसरणी आणि विलक्षण आवेश इत्यादि गुण जणुं पणालाच लावले जात! ह्या निबंधांतून कसल्याहि प्रकारचा ललित आत्माविष्कार होत नव्हता हें विशेष होय.

१९२० नंतर वाङ्मयाचें एकंदर युगमान पालटलें. जीवनाकडे पहावयाची माणसाची दिशाहि बदलली. पत्रकार आणि साहित्यिक या दोन भूमिका एकत्रित होऊन निर्माण होणारा निबंध हळू हळू लुप्त होत चालला. पत्रकार हा साहित्यिक एक वेळ असूं शकेल पण साहित्यिक हा पत्रकार असेलच असें मात्र सांगवत नाहीं. त्यामुळें पत्रकार आणि साहित्यिक हे दोन वर्ग बदलत्या कालक्रमणानुसार विभक्त होत गेले. अगदीं लहान किंवा क्षुल्लक वाटणाऱ्या घरगुती विषयावरहि पुष्कळ लोक निबंधरचना करूं लागले. लेखकांच्या याच मनःप्रवृत्तीमधून लघुनिबंधाचा जन्म झाला.

निबंधाची व्याख्या तयार करतांना आर्लो वुईल्यम्स् हा प्रसिद्ध निबंध-शास्त्रज्ञ म्हणतो कीं " विचारांची स्वैर व आनंददायक मांडणी, त्या विचारांच्या प्रतिपादनांतील कलाविलासाची शोभा आणि अल्पावकाशांतूनच प्रकट होणारे मनाच्या विशालतेचे पडसाद इत्यादींनीं युक्त असलेला लेख म्हणजे निबंध होय."* अर्थात् प्रत्येक निबंधकाराला हें म्हणणें सर्वस्वीं मान्य होईलच असें नाहीं. पण त्यावरून निबंध या कला प्रकाराबद्दल कल्पना यावयास हरकत नाहीं एवढी ही व्याख्या समर्पक आहे. निबंधाची अगदीं सुटसुटीत व्याख्या पहावयाची असेल तर जे. बी. प्रीस्टले यांचें पुढील मत पहावें. त्यांच्यामतें " शेगडीजवळ बसून गप्पा मारणारा तत्त्वज्ञ म्हणजेच निबंधकार होय."

आणि त्याच दृष्टीनें स्त्रियांनीं लिहिलेल्या या कालखंडांतील निबंधांचेकडे पहावयास हरकत नाहीं.

गिरिजाबाई केळकर

जुन्या काळच्या एक नामवंत लेखिका या दृष्टीनें गिरिजाबाई केळकर यांचा उल्लेख करण्यांत येतो. १९२० पूर्वीं त्यांनीं लेखनाला आरंभ केलेला असला तरी अद्यापहि त्या लेखन करीत आहेत. त्यांच्या विचारांना लाभलेलें एक प्रकारचें जुनें वळण अद्यापहि आहे असें त्यांच्या अनेक निबंधांवरून दिसून येईल.

" संसार सोपान " या पुस्तकांत त्यांनीं एकत्र कुटुंब पद्धतीची बाजू

* साहित्यदर्शन पान ७३.

मांडलेली आहे. मुलींना संसाराला उपयुक्त असें व्यावहारिक शिक्षण परंपरेनें मिळत असतें असें त्यांचें म्हणणें आहे; आणि एकत्र कुटुंबामध्येंच तें शक्य आहे असें त्यांनीं मोठ्या कौशल्यानें दर्शविलें आहे. अलीकडच्या काळामधील वाढत्या स्त्रीशिक्षणामुळें व स्त्रीपुरुषांमधील समानहक्कांच्या जाणिवेमुळें जो स्त्रीच्या मनाचा एक वेगळा कल होत चालला आहे, त्यामुळें गृहिणी या नात्यानें स्त्रियांच्या कर्तृत्वशक्तीची हानी होत आहे असें गिरिजाबाईंनीं स्पष्टपणें येथें नमूद केलेलें आहे.

घरांतील प्रत्येक कामाकडे घरमालकिणीनें जातीनें लक्ष घालावें असें लेखिकेचें म्हणणें आहे. त्याशिवाय घराची निगा नीट राखली जाणें शक्य नाहीं असेंहि त्यांना सुचवावयाचें आहे.

या पुस्तकांतील अठराव्या प्रकरणांत लेखिकेनें सांजा, तिखट सांजा, शंकरपाळीं, जिलबी, लाडवांत दळ, बाळंतणीचा सांजा, साखरपाण्याच्या वड्या, नानकटाई, करंज्या, चिरोटे, शेवया, गव्हले, खीर, सांजोऱ्या, सर्व प्रकारच्या पोळ्या, उसळ, माहिमी हलवा, पारोटे, बट्टया इत्यादि प्रकार गव्हापासून करतां येत असल्याची उपयुक्त माहिती दिलेली आहे व ती आकर्षकहि आहे.

जुन्या पिढीच्या स्त्रियांची प्रतिनिधि म्हणून गिरिजाबाईंना संबोधण्यांत येतें. त्यांनीं स्वानुभवावर आधारलेलें लेखन करून त्यामध्यें सामान्यतः जुन्या परंतु चांगल्या चालीरीतींची बाजू हिरीरीनें मांडून नव्याशीं मिळतें घेण्याचें धोरण ठेवलेलें आहे. स्त्रीशिक्षण, सोवळें ओवळें, लग्नांतील मानपान व रुसवे फुगवे, प्रौढ विवाह, तरुण पिढी इत्यादींबद्दल माहिती देऊन कालमानाप्रमाणें योग्य तो बदल असावा, असें मोठ्या खुबीनें त्यांनीं सूचित केलेलें आहे.

गिरिजाबाईंची भाषा सोपी, प्रौढ आणि घरगुती असून त्यांनीं आपले विचार विविध प्रकारच्या निबंधांतून कांहींशा जोरदारपणानें पण सुबोध वाटतील अशा आपुलकीच्या जिव्हाळ्यानें मांडलेले आहेत. त्यांची विषयाची मांडणी करण्याची पद्धति आकर्षक आहे. शिवाय त्यांनीं केलेला घरगुती प्रसंगांचा उठावहि मनोवेधक झालेला आहे, यांत शंका नाहीं.

● ● ●

लक्ष्मीबाई प्रधान

" माजघरांतील चर्चा " या पुस्तकांत श्री. लक्ष्मीबाई प्रधान यांनीं स्त्रियांना उपयुक्त अशा निरनिराळ्या विषयांवर संवादरूपानें चर्चा केलेली आहे. " ऋषिपंचमी कीं रुढिपंचमी ", " कायद्याचें अज्ञान ", " रोगांचें बीज ", " डॉ. देशमुखांचें बील ", " गृहरचनेंतील सौंदर्य-दृष्टि " " काटकसरीचें महत्त्व "

निबंधाची घडणहि गंभीर स्वरूपाची झाली आहे. ह्या निबंधाची रचना होत असतांना त्या निबंधकारांचें पांडित्य, तर्कशुद्ध विचारसरणी आणि विलक्षण आवेश इत्यादि गुण जणुं पणालाच लावले जात ! ह्या निबंधांतून कसल्याहि प्रकारचा ललित आत्माविष्कार होत नव्हता हें विशेष होय.

१९२० नंतर वाङ्मयाचें एकंदर युगमान पालटलें. जीवनाकडे पहावयाची माणसाची दिशाहि बदलली. पत्रकार आणि साहित्यिक या दोन भूमिका एकत्रित होऊन निर्माण होणारा निबंध हळू हळू लुप्त होत चालला. पत्रकार हा साहित्यिक एक वेळ असूं शकेल पण साहित्यिक हा पत्रकार असेलच असें मात्र सांगवत नाहीं. त्यामुळें पत्रकार आणि साहित्यिक हे दोन वर्ग बदलत्या कालक्रमणानुसार विभक्त होत गेले. अगदीं लहान किंवा क्षुल्लक वाटणाऱ्या घरगुती विषयावरहि पुष्कळ लोक निबंधरचना करूं लागले. लेखकांच्या याच मन:प्रवृत्तीमधून लघुनिबंधाचा जन्म झाला.

निबंधाची व्याख्या तयार करतांना आर्लो बुईल्यम्स् हा प्रसिद्ध निबंधशास्त्रज्ञ म्हणतो कीं " विचारांची स्वैर व आनंददायक मांडणी, त्या विचारांच्या प्रतिपादनांतील कलाविलासाची शोभा आणि अल्पावकाशांतूनच प्रकट होणारे मनाच्या विशालतेचे पडसाद इत्यादींनीं युक्त असलेला लेख म्हणजे निबंध होय." * अर्थात् प्रत्येक निबंधकाराला हें म्हणणें सर्वस्वीं मान्य होईलच असें नाहीं. पण त्यावरून निबंध या कला प्रकाराबद्दल कल्पना यावयास हरकत नाहीं एवढी ही व्याख्या समर्पक आहे. निबंधाची अगदीं सुटसुटीत व्याख्या पहावयाची असेल तर जे. बी. प्रीस्टले यांचें पुढील मत पहावें. त्यांच्यामतें " शेगडीजवळ बसून गप्पा मारणारा तत्त्वज्ञ म्हणजेच निबंधकार होय. "

आणि त्याच दृष्टीनें स्त्रियांनीं लिहिलेल्या या कालखंडांतील निबंधांचेकडे पहावयास हरकत नाहीं.

गिरिजाबाई केळकर

जुन्या काळच्या एक नामवंत लेखिका या दृष्टीनें गिरिजाबाई केळकर यांचा उल्लेख करण्यांत येतो. १९२० पूर्वी त्यांनीं लेखनाला आरंभ केलेला असला तरी अद्यापहि त्या लेखन करीत आहेत. त्यांच्या विचारांना लाभलेलें एक प्रकारचें जुनें वळण अद्यापहि आहे असें त्यांच्या अनेक निबंधांवरून दिसून येईल.

" संसार सोपान " या पुस्तकांत त्यांनीं एकत्र कुटुंब पद्धतीची बाजू

* साहित्यदर्शन पान ७३.

मांडलेली आहे. मुलींना संसाराला उपयुक्त असें व्यावहारिक शिक्षण परंपरेनें मिळत असतें असें त्यांचें म्हणणें आहे; आणि एकत्र कुटुंबामध्येंच तें शक्य आहे असें त्यांनीं मोठ्या कौशल्यानें दर्शविलें आहे. अलीकडच्या काळामधील वाढत्या स्त्रीशिक्षणामुळें व स्त्रीपुरुषांमधील समानहक्कांच्या जाणिवेमुळें जो स्त्रीच्या मनाचा एक वेगळा कल होत चालला आहे, त्यामुळें गृहिणी या नात्यानें स्त्रियांच्या कर्तृत्वशक्तीची हानी होत आहे असें गिरिजाबाईंनीं स्पष्टपणें येथें नमूद केलेलें आहे.

घरांतील प्रत्येक कामाकडे घरमालकिणीनें जातीनें लक्ष घालावें असें लेखिकेचें म्हणणें आहे. त्याशिवाय घराची निगा नीट राखली जाणें शक्य नाहीं असेंहि त्यांना सुचवावयाचें आहे.

या पुस्तकांतील अठराव्या प्रकरणांत लेखिकेनें सांजा, तिखट सांजा, शंकरपाळीं, जिलबी, लाडवांत दळ, बाळंतणीचा सांजा, साखरपाण्याच्या वड्या, नानकटाई, करंज्या, चिरोटे, शेवया, गव्हले, खीर, सांजोऱ्या, सर्व प्रकारच्या पोळ्या, उसळ, माहिमी हलवा, पारोटे, बट्ट्या इत्यादि प्रकार गव्हापासून करतां येत असल्याची उपयुक्त माहिती दिलेली आहे व ती आकर्षकहि आहे.

जुन्या पिढीच्या स्त्रियांची प्रतिनिधि म्हणून गिरिजाबाईंना संबोधण्यांत येतें. त्यांनीं स्वानुभवावर आधारलेलें लेखन करून त्यामध्यें सामान्यत: जुन्या परंतु चांगल्या चालीरीतींची बाजू हिरीरीनें मांडून नव्याशीं मिळतें घेण्याचें धोरण ठेवलेलें आहे. स्त्रीशिक्षण, सोवळें ओवळें, लग्नांतील मानपान व रुसवे फुगवे, प्रौढ विवाह, तरुण पिढी इत्यादींबद्दल माहिती देऊन कालमानाप्रमाणें योग्य तो बदल असावा, असें मोठ्या खुबीनें त्यांनीं सूचित केलेलें आहे.

गिरिजाबाईंची भाषा सोपी, प्रौढ आणि घरगुती असून त्यांनीं आपले विचार विविध प्रकारच्या निबंधांतून कांहींशा जोरदारपणानें पण सुबोध वाटतील अशा आपुलकीच्या जिव्हाळ्यानें मांडलेले आहेत. त्यांची विषयाची मांडणी करण्याची पद्धति आकर्षक आहे. शिवाय त्यांनीं केलेला घरगुती प्रसंगांचा उठावहि मनोवेधक झालेला आहे, यांत शंका नाहीं.

लक्ष्मीबाई प्रधान

" माजघरांतील चर्चा " या पुस्तकांत श्री. लक्ष्मीबाई प्रधान यांनीं स्त्रियांना उपयुक्त अशा निरनिराळ्या विषयांवर संवादरूपानें चर्चा केलेली आहे. " ऋषिपंचमी कीं रुढिपंचमी ", " कायद्याचें अज्ञान ", " रोगांचें बीज ", " डॉ. देशमुखांचें बील ", " गृहरचनेंतील सौंदर्य-दृष्टि " " काटकसरीचें महत्त्व "

वगैरे विषय या चर्चेंत आलेले आहेत. येथें प्रस्तावनेंत काशीबाई कानिटकरांनीं म्हटल्याप्रमाणें "लेखिकेनें प्रत्येक गोष्टींत मनुष्य स्वभावाचें चित्र उत्तम रेखाटिलें आहे, व हल्लीं प्रचिलित असलेल्या अनेक वेडगळ चालीरीतींना स्त्रियांनीं रुढीमुळें कसें विकृत स्वरूप दिलें आहे हें फार मार्मिकपणानें दाखविलें आहे." या सर्व लेखांतून मनोरंजक उपदेश ध्वनित झालेला असून लेखांची भाषा प्रौढ व साधी अशी उतरलेली आहे. अनुभवाची पार्श्वभूमि याहि लेखांना लाभलेली असल्यामुळें वाचकास ओळखीचें जग भेटल्याचा आनंद होतो.

बाळूताई खरे

"अलंकार–मंजूषा" हा कु. बाळूताई खरे यांचा प्रबंध एक उल्लेखनीय ग्रंथ म्हणून येथें नमूद करावा लागेल.

या प्रबंधामध्यें लेखिकेनें दर्शविलेलें प्राविण्य खरोखरच प्रशंसनीय आहे. अलंकारासारख्या अवघड विषयावरील सर्व मतांची अभ्यासपूर्वक छाननी करून शिवाय कांहीं अलंकारांचें एकत्रीकरण करण्याची नवीन सूचना करावयाचें हें काम साधें नव्हे. अलंकारशास्त्राचा अगदीं खोलवर असा अभ्यास करून येथें लेखिकेनें अलंकारांच्या लक्षणांची अतिशय सूक्ष्म अशी चर्चाहि केलेली आहे हें विशेष होय.

अरेबियन नाईटस्‌मधील रत्नांच्या चमचमाटानें मनुष्य भांबावून जावा आणि त्यांतील कोणतीं रत्नें उचलून घेऊं आणि कोणतीं नको याबद्दल त्याच्या मनांत संभ्रम निर्माण व्हावा, तशीच स्थिति अलंकारशास्त्रज्ञांची होत असावी, असें लेखिकेनें उपसंहारांत म्हटलें आहे. त्याबद्दल लिहितांना लेखिका म्हणते, "प्रत्येक अलंकार-शास्त्रज्ञाला काव्यांतील विविध सौंदर्यानें असेंच भांबावल्यासारखें झालें. या सौंदर्याचा सन्मान करूं तरी कसा व कोणत्या आदरपूर्वक पदवीनें ! बरें तें सौंदर्य तरी एका तऱ्हेचें थोडेंच ! त्याच्या कितीक कला त्या सौंदर्यकलांचें कौतुक करून प्रत्येकांतील सूक्ष्म विनिम्रता लक्षांत घेऊन कौतुकानें सूक्ष्म सौंदर्यकलेचेंहि व्यवच्छेदन करून शास्त्रज्ञांनीं तिला एकेक नामपदवी दिली." आणि त्याच पदवीची यथार्थता तिनें आपल्या शक्तीप्रमाणें येथें पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.सखोल अभ्यास आणि विचारप्रवर्तक लेखन यादृष्टीनें या ग्रंथाचें मोल विशेष आहे.

गोदावरी केतकर

"भारतीय नाट्यशास्त्र" या ग्रंथांत गोदावरी केतकर यांनीं नाट्यशास्त्राच्या अंगोपांगांची विवेचक व सविस्तर चर्चा केली असून ती मराठींतील नाटकाच्या

उदाहरणांनीं समजावून सांगण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. नाट्यासारख्या एका महत्त्वाच्या आद्य ग्रंथांचें मराठींत सुलभ आणि सुसंगत विवेचन करणारा प्रबंध या दृष्टीनें या मराठी नाट्यशास्त्राची योग्यता मोठीच आहे यांत शंका नाहीं.

• • •

वेणूताई पानसे

"हरि नारायण आपटे—चरित्र व वाङ्मय विवेचन" हा वेणूबाई पानसे यांचा ग्रंथ अलंकार मंजुषाचे सुमारास प्रकाशित झाला आहे. या ग्रंथांत वणूबाईनीं हरिभाऊंच्या वाङ्मयाबद्दल परीक्षणात्मक असें बरेंच लिहिलेलें आहे. हरिभाऊंबद्दलच्या ज्या जिव्हाळ्यानें त्यांनीं त्यांच्या चरित्राचा असा या ग्रंथाचा जो पूर्वार्ध लिहिला आहे, तो जिव्हाळा या वाङ्मयीन विवेचनांच्या उत्तरार्धात मात्र उतर लेला नाहीं असें दिसून येतें. एक तर हें विवेचन फार विस्तारपूर्वक झालेलें असल्यामुळें कंटाळवाणें झालें आहे; आणि दुसरें म्हणजे हरिभाऊंचें चरित्र सांगत असतांना त्यांत मधून मधून वाङ्मयाचाहि उल्लेख आल्यानें पुनरुक्तीचा दोष देखील ठिकठिकाणीं निर्माण झालेला आहे. तथापि हरिभाऊंचें वाङ्मय अभ्यासून हें लेखन झालेले आहे हें मान्य करण्याइतपतची बारीकसारीक वाङ्मयीन माहिती या ग्रंथांत आलेली आहे. हरिभाऊंच्या निकटच्या मंडळींतील एका पदवीधर लेखिकेनें त्यांच्या वाङ्मयाचें केलेलें हें विवेचन यापेक्षांहि चटकदार व्हायला हवें होतें. कारण हरिभाऊंच्या जीवनाचें जिवंत दर्शन ज्या लेखणीनें घडविलें तीच लेखणी त्यांच्या वाङ्मयाचेंहि खरेखुरें दर्शन कां घडवूं शकली नाहीं, किंवा तींत थोडीफार कां होईना कमतरता कां यावी, हें कोडें न उलगडण्यासारखेंच दिसतें ! कदाचित् लेखिकेनें हरिभाऊंचें जीवन जेवढें जवळून पारखून घेतलें तितकें त्यांचें वाङ्मय अभ्यासिलें नसण्याचाहि संभव आहे !

"प्रगतिपथावर" या आपल्या पुस्तकांत वेणूबाईनीं हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स, हुजुरपागा, या संस्थेच्या ५० व्या वर्षाच्या सुवर्ण महोत्सवप्रसंगीं संस्थेनें केलेल्या कार्यांचा समग्र इतिहास दिलेला आहे. या पुस्तकाची मांडणी एकंदरीनें चांगली झालेली आहे.

• • •

सौ. कमलाबाई टिळक

स्त्रियांचें शिक्षण जसें वाढलें तशा त्या विविध विषयांवर विचारप्रवर्तक लेखन करूं लागल्या हें बाळुताई खरे किंवा वेणूबाई पानसे यांच्या लेखनावरून दिसून

आलेंच आहे. कमलाबाई टिळकांनीं त्यांच्याप्रमाणेंच अभ्यासपूर्ण असें लेखन केलें आहे. पण त्यांचा विषय मात्र निराळा आहे. सभोंवतालच्या सामाजिक जीवनांत स्त्रियांना जो अन्याय सहन करावा लागला, किंवा आजवरच्या रूढीच्या नियमांनीं त्यांना समाजांत जें कमी प्रतीचें स्थान मिळत गेलें, त्याची चर्चा करणारें पुस्तक कमलाबाईनीं लिहिलें. " स्त्री-जीवनविषयक कांहीं प्रश्न " या पुस्तकांत त्यांनीं स्त्रीजीवनांत उद्‌भवणाऱ्या अनेक प्रश्नांची चिकित्सापूर्ण छाननी केलेली आहे. आणि ती करीत असतांना त्यांनीं हिंदी स्त्रीच्या जीवनाची परराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनाशीं विशेष उल्लेखनीय तुलनात्मक माहिती मधून मधून दिलेली आहे,

या पुस्तकांत वेदकालीन स्त्रीजीवनापासून तों आजतागायतच्या स्त्रीजीवनाचा आढावा घेण्यांत आलेला आहे. त्यासाठीं लेखिकेनें धार्मिक ग्रंथांमधील अनेक उतारे आधारादाखल म्हणून घेतलेले आहेत हें सर्व विवेचन येथें विस्ताराच्या दृष्टीनें मोठें व चटकदारहि झालेलें आहे.

" स्त्री ही कुटुंबराज्याची स्वामिनी आहे " हें लक्षांत घेऊन स्त्रीशिक्षणाचा व विवाहाचा प्रश्न लेखिकेनें अनेक उदाहरणें देऊन व कायद्यांचे आधार घेऊन सविस्तर चर्चिलेला आहे. ह्यांतील " स्त्रियांचे कायदेशीर हक्क " या विषया-संबंधाचीं दोन प्रकरणें विशेष आस्थापूर्वक लिहिलीं गेलीं असून एका स्त्रीनेंच आपल्या जीवनांतील ह्या महत्त्वाच्या भागाचें सखोल विवेचन केलें आहे हें या प्रकरणांचें महत्त्वाचें अंग होय. वास्तविक, हिंदु कायद्याचा, विशेषतः एकंदरीनें सर्व कायद्याचाच प्रश्न स्त्रीच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा आहे. पण नेमक्या त्याच भागावर दुर्दैवानें स्त्रीची लेखणी एखादा अपवाद सोडला तर खर्ची पडलेली दिसत नाहीं. त्या दृष्टीनें लेखिकेचें हें विवेचन केव्हांहि स्वागतार्ह आहे यांत वाद नाहीं; आणि तें विवेचन सविस्तरहि झालेलें आहे ही समाधानाची गोष्ट होय.

या पुस्तकाचा बराचसा भाग परदेशीय वातावरण रंगविण्यांत गेल्यामुळें आपल्याकडील स्त्रियांबद्दलचें विवेचन मात्र कांहीं अंशीं अपुरें झालें आहे, असें या पुस्तकांतील कोणत्याहि भागावरून दिसून येईल. तथापि या पुस्तकाची भाषा ओघवती असून विचार मांडण्याची पद्धति चित्ताकर्षक आहे. लेखिकेची कल्पनेची भरारी बंडखोर वृत्तीची असून आघाडीवरील योद्ध्याच्या हिरीरीनें तिचें चित्रण झालेलें आहे.

डॉ. चंद्रकला हाटे

डॉ. चंद्रकला हाटे यांनीं स्त्रीजीवनांतील विविध प्रश्नांवर १९२८ पासून तों आजतागायत अनेक मासिकांमधून लेख लिहिलेले आहेत. विशेषतः स्त्री किंवा

किर्लोस्कर या मासिकांमधून त्यांनीं विपुल लेखन केलें. परंतु आजवरच्या लेखिकां-प्रमाणें केवळ प्रपंचकथा न सांगतां स्त्री ही एक पुरुषाप्रमाणेंच मनुष्य आहे या दृष्टीनें तिच्याकडे बघून अलीकडच्या काळांतील स्त्रीजीवनाबद्दल त्यांनीं आपले विचार व्यक्त केलेले आहेत. डॉ. हाटेनीं आपल्या " हिंदु स्त्री आणि तिचें भवितव्य " या ग्रंथांत आपले हे विचार स्पष्टपणें मांडलेले आहेत.

पुरुषांप्रमाणेंच स्त्री ही एक मानवी प्राणी असून तिनें आपल्या भवितव्याच्या सुखासाठीं पुरुषांवर अवलंबून न राहतां किंवा आपल्या हक्कांसाठीं त्यांचेकडे मागणी न करतां आपल्या स्वतःच्या सामर्थ्यावरच इच्छित कार्यांची सफलता मिळवावी असें चंद्रकलाबाईंनीं अनेक लेखांमधून व्यक्त केलेलें आहे.

चंद्रकलाबाईंनीं विवाहासंबंधींहि भरपूर लेखन केलें असून त्यांत सन्मित्रांच्या उच्च भूमिकेवरच वैवाहिक आयुष्याची यशस्विता अवलंबून असते, असें सुचविलें आहे.

कायद्याच्या बाबतींतहि लेखिकेनें अभ्यासपूर्ण लेखन केलें असून त्यांत येणाऱ्या प्रत्येक कलमाची सुंदर छाननी केलेली आहे. वास्तविक हा भाग लेखिकेच्या आवडीचा दिसतो, परंतु तो तिनें फार थोड्या प्रमाणांत हाताळलेला आहे असें म्हणावें लागेल.

हिंदुस्थानची भावी राज्यघटना* डोळ्यासमोर ठेवून लेखिकेनें ह्या घटनेंतील स्त्रियांचें स्थान ठरवितांना स्त्रीला तिच्या व्यक्तित्वाची वाढ करून देईल, असें हक्काचें स्थान तिला समाजांत मिळावें, असें आग्रहानें प्रतिपादन केलेलें आहे.

" उपासमार कीं नियोजन ? अर्थात् हिंदी लोकसंख्येचा प्रश्न " हें एक महत्त्वाचें पुस्तक डॉ. हाटे व कु. कोल्हटकर या दोघींनीं मिळून लिहिलेलें आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक प्रश्नाकडे सरकारचें व लोकांचें लक्ष ज्यावेळीं विशेष खेंचलें गेलें त्या काळांत हें पुस्तक प्रकाशित झालेलें आहे. या पुस्तकाचे प्रस्तावनाकार श्री. श्री. गो. बेरी यांनीं म्हटलें आहे कीं, " मराठी भाषेंत हिंदी लोकसंख्येच्या प्रश्नांवर लिहिलेलें हें पहिलेंच पुस्तक आमच्या अवलोकनांत आलें. " आणि त्या दृष्टीनें मराठी सारस्वतांत या पुस्तकाचें स्थान विशेष आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

१९११ पासून आपल्या देशाच्या लोकसंख्येची वाढ दरसाल पस्तीस ते चाळीस लाखांच्या दरम्यान होते आहे. त्या दृष्टीनें आपल्याकडील लोकांचें सरासरी आयुर्मान फार कमी आहे आणि त्यामुळें आपल्या देशाच्या उत्पादनास कांहीं मदत होण्याऐवजीं देशावर उलट पोषणाचाच भार पडत आहे ! जीवनकलहाच्या तीव्रतेची जाणीव होऊन या लेखिकांनीं हा प्रश्न हाताळला असावा. या लेखिकांनीं

* झारापकर १९४०

या विषयाचें सर्व बाजूंनीं मोठें मार्मिक विवेचन केलेलें आहे. त्यासाठीं अनेक प्रकारच्या तक्त्यांची व कोष्टकांची भरपूर योजना येथें केलेली असून, त्यावरून विविध प्रांतांतील अनेक जातींची तुलनात्मक माहिती वाचकांसमोर ठेविली आहे. त्यामुळें या विषयाची सर्वसामान्य वाचकालाहि ओळख पटावी इतकें या ग्रंथाचें विवेचन सुंदर झालेलें आहे. शिवाय या ग्रंथाची भाषाहि सोपी व सहज समजेल अशी उतरलेली आहे, आणि हाच या पुस्तकाचा प्रमुख गुण म्हणावयास हरकत नाहीं.

इतर देशांच्या मानानें हिंदुस्थानचें बालमृत्यूंचें व मातांच्या मृत्यूंचें प्रमाण जास्त असल्याचें दाखवून त्यास कारण म्हणून आपल्याकडील लोकांच्या रहाणीचा कनिष्ठ दर्जा व दारिद्य यांची माहिती येथें लेखिकांनीं दिलेली आहे.

या ग्रंथाच्या उत्तरार्धांत हा वाढता लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठीं - संख्या व संपत्ति यांचें समीकरण घडविण्यासाठीं--लोकांचा रहाणीचा दर्जा सुधारावा म्हणून सामाजिक व आर्थिक नियोजनांचें एकत्रीकरण करण्याची योजना सुचविलेली आहे. त्याचबरोबर संपत्तीच्या वाढीच्या प्रमाणांत लोकांची कार्यक्षमता वाढण्यासाठीं सार्वजनिक आरोग्य व शिक्षणप्रसार अवश्य असल्याचें येथें नमूद केलेलें आहे.

एकंदरीनें या ग्रंथाचा दर्जा बराच वरचा आहे हें कोणासहि मान्य होईल. नाहीं. एखादी स्त्रीलेखिका एखाद्या कठिण विषयावर विचार करून उत्तम ग्रंथ-निर्मिति करून पुरुषवर्गालाहि त्या ग्रंथाची मान्यता समाधानानें देण्यास प्रवृत्त करूं शकते, हें अशा ग्रंथांवरून म्हणावयास हरकत नाहीं.

चंद्रकलाबाईंच्या या निबंधांमधून स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेबद्दलचा व सामाजिक दर्जाबद्दलचा जिव्हाळा फार उत्कटत्वानें दिसून येत आहे. त्यांची विचारसरणी जशी पुरोगामी आहे तशीच भाषाहि आकर्षक आहे. स्त्रीजीवनांतील विविध प्रश्न हाताळतांना लेखिकेनें कायद्याच्या कक्षेंत येणारा भाग अधिक लिहावयास हवा होता येवढें मात्र वाटतें.

● ● ●

सौ. मालतीबाई दांडेकर

सौ. मालतीबाई दांडेकर यांनीं स्त्रीजीवनावरील विविध प्रश्नांची चर्चा करणारीं अशीं एकूण चार पुस्तकें लिहिलीं आहेत. या पूर्वींच्या स्त्रियांनीं स्त्रियांच्या जीवनाचा जो विचार केला आणि त्या विषयीं जें लेखन केलें तीच भूमिका याहि लेखिकेची आहे. मात्र या पुस्तकांच्या परिसरांत येणारें स्त्रीजीवन आजच्या काळांतील आहे येवढा फरक येथें प्रामुख्यानें नमूद करावा लागेल.

"अमोल आहेर" या पुस्तकाचें स्वरूप पत्रात्मक आहे. नववधूनें

आपल्या नव्या संसारांत धांदल गडबड न उडवतां चांगल्या रीतीनें कसें वागावें याची शिकवण या आहेराच्याद्वारें सौ. मालतीबाईंनीं दिलेली आहे. विशेषतः आजच्या काळांत फक्त राजाराणीच्या कुटुंबाचाच थाट ठेवणाऱ्या सुशिक्षित मुलींना या पुस्तकानें मार्गदर्शन घडावें असा लेखिकेचा हेतु आहे.

"तरुणींचे प्रश्न" हें मालतीबाईंचें अलिकडचें पुस्तक याच प्रकारचें आहे. मालतीबाई आपल्या लेखनाची भूमिका प्रत्येक पुस्तकाला जोडलेल्या स्वतःच्या प्रस्तावांत नमूद करून ठेवतात, हा त्यांच्या लेखनाचा एक विशेष होय. माझें लेखन मी अमुक एक हेतु मनांत धरून लिहितें किंवा अमुक एका विशिष्ट दृष्टिकोनांतून माझ्या विचारांना मीं चालना दिली, हें खुद्द लेखकानेंच नमूद केल्यानंतर त्याविषयीं वादळ निर्माण व्हायचें कारण उरत नाहीं; आणि शिवाय वाचकालहि आपले विचार पुस्तकांतील विचारांशीं तोलून पहायला सोपें जातें. तेव्हां मालतीबाईंची ही वैशिष्ट्यपूर्ण भूमिका खरोखरच वाखाणण्यासारखी आहे.

या पुस्तकांत मालतीबाईंच्या भाषेची घडण मोठी डौलदार झालेली आहे. एखादा रुपाया किंवा नाणें फरसबंदी जमिनीवर टाकावें आणि त्याचा झंकार किंवा छिन्‌छिनाट् कानांत घुमून समाधान व्हावें तसा ह्या भाषेचा नाद आहे. येथें मालतीबाईंनीं आपल्या पूर्वींच्याच पुस्तकांतील कांहीं प्रश्नांची उजळणी केली आहे हें मान्य केलें, तरीहि आजच्या तरुणींच्या गुणांबरोबरच दोषांचेंहि निर्भयपणें दिग्दर्शन केलेलें आहे, हे विशेष होय. शिवाय स्त्रीजीवनांत येणाऱ्या बहुतेक सर्व बारीक सारीक प्रश्नांची छाननी करण्याचा लेखिकेनें येथें अभ्यासपूर्वक प्रयत्न केलेला आहे.

"आकर्षक संसार" ह्या पुस्तकाची उभारणी मालतीबाईंनीं "स्त्रीनं स्त्रीच्याच दृष्टीकोनानं लिहिलेलं अन् आज घडीपर्यंतची विस्कळित समाजरचना हिशेबांत घेऊन संसाराची आकर्षकता कशी कायम ठेवावी हें दर्शविणारं पुस्तक अद्यापहि वाङ्मयदालनांत दिसत नव्हतं !....ती उणीव हें माझं पुस्तक अल्पांशानं तरी भरून काढील असा विश्वास वाटतो" या दृष्टीनें केली आहे.

कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीनें व विशेषतः पतिपत्नींनीं एकमेकांशीं व नातलगांशीं कसें वागावें आणि गृहाला नंदनवनाचें स्वरूप कसें आणावें, हें सांगण्याची लेखिकेनें येथें पराकाष्ठा केली आहे. तथापि या चारहि पुस्तकांतून त्याच त्याच विषयांची व विचारांची पुनरावृत्ति अनेकदां झाल्यानें कांहीं विवेचन सगळीकडेच कंटाळवाणें झालेलें आहे. कदाचित् एकाच विषयाकडे विविध दृष्टिकोनांतून पाहिल्याचा हा परिणाम असावा !

ह्या पुस्तकांतून मालतीबाईंनीं स्त्रीजीवनांत येणाऱ्या व्रतवैकल्यासारख्या अनेक जुन्या चालीरीतींची व आजच्या स्त्रीजीवनांतील नोकरीसारख्या अनेक प्रश्नांची मोठी मनोवेधक मांडणी केलेली आहे.

" लोकसाहित्याचें लेणें " हा मालतीबाईंचा लोकगीतांवरील प्रबंध मोठा उल्लेखनीय आहे. या प्रबंधांत मालतीबाईंनीं निरनिराळ्या विषयावरील ओव्या संपादित केलेल्या असून विषयवार त्यांची रसग्रहणात्मक मांडणी केलेली आहे.

मालतीबाईंनीं या ओव्या प्रामुख्यानें साताऱ्याकडील मराठमोळ्या व शेतकरी स्त्रियांच्याकडून घेतलेल्या असल्यानें या प्रबंधाला एक निराळें वैशिष्ट्य प्राप्त झालेलें आहे.

• • •

सौ. उषा देशमुख

स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीबाबतचे जोरदार विचार मांडणारी लेखिका म्हणून सौ. उषा देशमुख यांना मानाचें स्थान मिळालेलें आहे. समाजकारणाचा आणि राजकारणाचा अभ्यास करून त्यांनीं अनेक लेख लिहिले असून त्यांची विचारसरणी समाजवादी धोरणाची आहे.

उपासमारीचें कारण शोधून काढून त्यावर उपाय सुचवितांना उषाबाईंनीं दर हजार माणशीं शेतकीवर होणारा सरकारी खर्च, शेतीवर अवलंबून राहणाऱ्या हिंदी लोकांचें प्रमाण आणि अन्न निर्मितीच्या जमिनीच्या लागवडीचें दर माणशीं प्रमाण यांचीं कोष्टकें दिलीं आहेत.

" पहाटे पूर्वीचा काळोख "० या लेखांतील संपत्ति निर्माण करणारे आणि संपत्तीची मालकी गाजविणारे एक होतील, तरच भविष्यकाल सुखावह होण्याची आशा लेखिकेनें दर्शविली आहे.

हिंदी महिलांच्या जीवनक्रांतीचें थोडक्यांत दिग्दर्शन करवितांना " नवी सृष्टि, नवी दृष्टि " या लेखांत (स्त्री ऑक्टोबर १९४६) उषाबाईंनीं भारतीय महिलांची सृष्टि पूर्वकालिन महिलांच्या पराक्रमी मार्गदर्शनानें जागृत झाली असल्याचें समर्पकरीत्या दर्शविलेलें आहे. याशिवाय स्वतंत्र हिंदुस्थानमधील स्त्री व पुरुष समान भूमिकेवर यायचे असतील, तर त्यांनीं समाजवादी धोरणाचा पुरस्कार केला पाहिजे, असेंहि त्यांनीं सुचविलेलें आहे.

" अष्टीला मी काय पाहिलें "* या लेखांत ऑगस्ट आंदोलनांतील स्मृति लेखिकेनें एकत्र गुंफिल्या आहेत. त्या कालांत मनानें खंबीर असलेल्या भारतीय स्त्रीच्या मनाची घडण चांगली होत असल्याचें आपलें मत हृदयद्रावक वर्णनांनीं लेखिकेनें पटवून दिलें आहे.

---

० स्त्री, एप्रिल १९४१,
* स्त्री, ऑगस्ट १९४६.

" नव्या युगाची महाराष्ट्रीय महिला "× या लेखांत उषाबाईंनीं आपलें राष्ट्र स्वतंत्र झाल्यावर एका नवीन युगास सुरवात झाल्याचें दर्शविलें आहे.

● ● ●

रोहिणी भाटे

" नूपुरांच्या किंचित् रुमझुम नादानेंहि जिच्या अंगावर आज रोमांच उभे राहतात, तबल्यावर साधा जरी बोल वाजूं लागला तरी स्वतःच्या पावलांना ताब्यांत ठेवणें जिला आज जड जातें, समोर चालू असलेलें कोणतेंहि नृत्य पाहतांना स्वतःच्या अंगाअंगांतून जागी होणारी नृत्याची स्फूर्ति जी लपवून ठेवूं शकत नाहीं, वाद्यवृंदाच्या खेळकर संगीतांतून उमटणाऱ्या सादेला जिच्याकडून आपोआपच तालबद्ध प्रतिसाद मिळूं पाहतो, त्या माझ्यासारख्या मुलीच्या आयुष्यांत डोकावून पाहून त्या नृत्यविषयक आवडीचें मूळ कोणी शोधूं म्हटलें, तर तें मात्र कठीण आहे. खरोखरच माझ्यांत ही आवड कशामुळें उत्पन्न झाली हें कोडें मला नक्की उकललें नाहीं..." अशा प्रकारची स्वतःची नृत्यविषयक पार्श्वभूमि सांगणाऱ्या रोहिणी भाटे यांचे पूर्वीं विविध नियतकालिकांतून लिहिलेलें नृत्यावरील लेख आतां " माझी नृत्यसाधना " या पुस्तक रूपानें प्रकट झालेले आहेत. हे विचार मोठे आकर्षक आणि खेळकर वृत्तीनें हाताळलेले आहेत.

वास्तविक आजवर नृत्याची कला कित्येक स्त्रियांनीं आत्मसात् केलेली आहे. परंतु त्या विषयावर अभ्यासपूर्ण असें लेखन कोणीं केलेलें नव्हतें. ती बाजू या लेखिकेनें कांहीं अंशीं कां होईना सावरली, ही विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणावी लागेल. रोहिणी वागळे यांनींहि या विषयावर काहीं स्फुट लेखन केलेलें आहे.

" माझा नृत्यव्यासंग" या लेखांत रोहिणी भाटे यांनीं आपल्या नृत्याबद्दलची मनोरंजक माहिती दिलेली आहे.

" कांहीं नृत्यनाट्यप्रयोग " या लेखांत लेखिकेनें विविध नृत्यकारांच्या नृत्यांची सचित्र माहिती दिलेली आहे; आणि ती देत असतांना त्या त्या विशिष्ट नृत्यकाराचें त्या कलेंतील वैशिष्ट्यहि सूक्ष्म निरीक्षण करून आकर्षक पद्धतीनें दर्शविलें आहे. नृत्यावरील अशाच इतर लेखांमधून रोहिणीबाईंनीं कथाकली, भरतनाट्य, मणिपूर व कथक या नृत्यकलेच्या चार खाणींचा इतिहास, आजचें स्वरूप आणि शास्त्र व कला यांची होत असलेली फारकत या दृष्टीकोनांतून सविस्तर माहिती दिलेली आहे.

" दाक्षिणात्य नृत्य पद्धतीचे दोन प्रवर्तक " या लेखांत रोहिणीबाईंनीं

× स्त्री, जुलै १९४९.

श्री. गोपीनाथ व सौ. तंगमणी या श्रेष्ठ कलावंतांची व त्यांच्या नृत्यकलेंतील वैशिष्ट्याची समर्पक रीतीनें माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

नृत्याबद्दलची कमालीची आस्था, वर्णनांतील खेळकरपणा, वेंचक शब्दांची आकर्षक मांडणी आणि ओघवती सफाईदार भाषा हे या लेखिकेचे प्रमुख विशेष म्हणतां येतील.

सौ. कुसुमावती देशपांडे

मराठींतील एक उत्कृष्ट टीकाकार आणि लघुकथा लेखिका म्हणून प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांचा लौकिक आहे. आजपर्यंत त्यांनीं जशा अनेक लघुकथा लिहिल्या तसेच अनेक विषयावरील टीकालेखहि लिहिले. त्याचप्रमाणें कुसुमावतींच्या या लेखनाबाबतहि अनेकांचे टीकालेख प्रकाशित झाले.

इंग्रजी वाङ्मयाचा कुसुमावतींचा अभ्यास विशेष आहे. त्यामुळें त्यांनीं विपुल वाचन केलें आहे. इतरांच्या टीकालेखनाचा चिकित्सक दृष्टीनें विचार केलेला आहे. आपल्या लेखनामधून मराठींतील व इतर भाषेंतील लेखकांच्या विचारांचें तुलनात्मक विवेचन केलेलें आहे.

" पासंग " आणि " मराठी कादंबरींचें पहिलें शतक " हे कुसुमावतींचे प्रकाशित निबंधसंग्रह आहेत. यांपैकीं दुसऱ्या संग्रहांत मराठी कादंबरीचें अभ्यासपूर्ण समालोचन कुसुमावतींनीं केलेलें असून पहिल्यामध्यें निरनिराळ्या विषयांवरील आपले विचार प्रगट केले आहेत. या लेखनामधून कुसुमावतींचा अभ्यास, गाढा व्यासंग, सडेतोड विचारसरणी आणि एखाद्या विषयाकडे सूक्ष्म दृष्टिकोनांतून व सर्वांगीण बाजूंनीं पहावयाची पद्धति दिसून येते. कुसुमावतींची भाषा सफाईदार असून मांडणी रेखीव आहे.

" संधिकाल " या लेखांत स्वतंत्र भारतांतील संधिकालाचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. " आम्ही कोण " या केशवसुतांच्या कवितेवरील कुसुमावतीबाईंचा मर्मग्रहणात्मक लेखहि अत्यंत उद्बोधक आहे.

कुसुमावती देशपांडे यांचा " माध्यान्ह " हा लघुनिबंध त्यांच्या इतर लघु निबंधांच्या मानानें मोठा आकर्षक आहे. " लेखिकेची मनोवृत्ति मूलतः कवीची आहे. तिला आलेली एक असामान्य अनुभूति....रखरखीत दुपार पाहून कल्पना, भावना आणि विचार यांना मिळालेली चालना...अतिशय रेखीवपणानें या निबंधांत आविष्कृत झाली आहे. "*

* धनुर्धारी ९ एप्रिल १९४९.

सूक्ष्म निरीक्षण, कल्पनासौष्ठव आणि निसर्गाशीं एकजीव होण्याची शक्ति या लेखिकेच्या गुणांनीं या लघुनिबंधाला एक प्रकारची विशेष हृदयंगमता आलेली आहे.

दुर्गा भागवत

एखाद्या विषयांचें संशोधन करून व सखोल अभ्यास करून त्या विषया-संबंधींचें आपलें मत सडेतोडपणानें सांगण्याची हातोटी ज्यांना साधलेली असते, अशा कांहीं लेखकांच्या यादींत दुर्गा भागवत यांचा समावेश करतां येईल. दुर्गाबाईचें बहुतेक सगळे लेखन संशोधनपर असून समाजशास्त्र व मानव वंशशास्त्र हे त्यांच्या लेखनाचे प्रमुख विषय आहेत. लोकसाहित्याचाहि अभ्यास दुर्गाबाईनीं केलेला असून या विषयावरील त्यांचीं निरनिराळीं पुस्तकेंहि प्रकाशित झालेलीं आहेत. "लोकसाहित्याची रूपरेखा" व "ऋतुचक्र" ही दुर्गाबाईचीं पुस्तके या संदर्भांत लक्षांत घेतां त्यांच्या लेखनाची कल्पना यावयास हरकत असूं नये. आठदहा वर्षांमागें 'सत्यकथा' मासिकांत डॉ. केतकरांचे लेखनासंबंधीं दुर्गाबाईनीं लिहिलेली लेखनमाला त्यांच्या चिकित्सकवृत्तीची साक्ष देते. डॉ. केतकरांचें वाङ्मय ज्यांनीं वाचलें नसेल त्यांनाहि त्यांची ओळख घडावी एवढें हें लेखन सडतोड विचारसरणीनें प्रेरित झालेलें व सखोल अभ्यासानें भरलेलें दिसून येतें.

"डॉ. केतकरांचें साहित्य दर्शन" या लेखामध्यें दुर्गाबाईनीं डॉ. केतकरांच्या वाङ्मयामुळें घडलेल्या त्यांच्या जीवनदर्शनाचे आपल्या मनावर कसकसे संस्कार होत गेले, याचें मोठें मार्मिक व समर्पक विवेचन केलेलें आहे आणि तें आकर्षकहि झालेलें आहे.

"एका जगाची कल्पना आणि डॉ. केतकर"* या लेखांत दुर्गाबाईनीं डॉ. केतकरांची भूमिका ही प्रचारकाची किंवा समाजसुधारकाची नसून ती समाज संशोधकाची होती असें स्पष्टपणें नमूद केलेलें आहे.

"राजारामशास्त्री भागवत" या चरित्रग्रंथांत दुर्गाबाईनीं शास्त्रीबुवांच्या वाङ्मयाची करून दिलेली ओळख अशीच सखोल व सविस्तर आहे. एखाद्या विषयांत जातां येईल तितकें जास्तींत जास्त खोलांत जाणें हाच या लेखिकेचा प्रमुख विशेष असून त्या अनुरोधानेंच त्यांचें सर्व लेखन झालेलें दिसून येतें.

"ही नर्मदा सुंदरी" (धनुर्धारी दिवाळी अंक १९४९) या लेखांत दुर्गाबाईनीं नर्मदाकांठच्या रानटी परंतु रम्य जीवनाची ओळख करून दिली आहे.

* नवभारत, एप्रिल १९४९.

"आदिवासींचें मृत्युंजय तत्त्वज्ञान "× हाहि दुर्गाबाईंचा एक लेख या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. तो त्यांनीं फार जिव्हाळ्यानें लिहिला आहे हें विशेष होय.

सौ. लीला दुबे, एम्. ए. यांनीं लिहिलेल्या " हिंदुस्थानांतील आदिवासी लोकांचें भवितव्य " या लेखांत दुर्गाबाईंप्रमाणेंच जिव्हाळ्याचा भाग आला असून आदिवासींच्या रोजच्या जीवनाचें सविस्तर चित्रण झालेलें आहे. श्री. भानू शिरधनकर यांचाहि याच विषयासंबंधींचा लेख महत्त्वपूर्ण वठला आहे. या सर्वांच्या लेखांमधून आदिवासींबद्दलचा जिव्हाळा आणि त्यांच्या भवितव्याबद्दलची आस्था सहानुभूतीपूर्वक प्रतीत झालेली दिसून येते.

● ● ●

पिरोज आनंदकर

आपण एक स्त्री आहोंत आणि म्हणून स्त्रिया जें जें करतील तें तें सगळे चांगलेंच आहे असें न मानतां तिच्या अंगीं असणाऱ्या गुणांबरोबर तिच्या दोषांचाहि निर्भयपणें विचार करणाऱ्या ज्या कांहीं थोड्या स्त्रिया आहेत त्यांपैकीं पिरोज आनंदकर या एक प्रमुख होत. पिरोजबाईंनीं स्वतः शिक्षिकेचा पेशा पत्करलेला असल्यामुळें त्यांचा अनेक विद्यार्थिनींशीं व स्त्री पालकांशीं संबंध आला आहे. त्यामुळें स्वाभाविकच त्यांनीं मुलींचें व स्त्रियांचें मानसशास्त्र अनुभविलें आहे व अभ्यासिलेंहि आहे. एवढेंच नाहींतर त्यासंबंधीं त्यांनीं अनेकदां लेखनहि केलेलें आहे.

अगदीं अलिकडे " स्त्री " मासिकांतून प्रकाशित झालेली त्यांची " इंद्रधनुष्याचा पूल " ही लेखमाला विशेष लोकप्रिय झाली असून या लेखमालेंतून त्यांनीं तरुण मुलींच्या जीवनांतील अनेक प्रश्नांचा सूक्ष्मपणें विचार केलेला आहे.

पिरोजबाईंचा स्वभाव विनोदी आहे. भाषा गोड आहे. मांडणी साधीच पण रेखीव आहे. लेखनविषयाशीं त्यांचे ठायीं जिव्हाळाहि आहे. म्हणजे एखाद्या प्रश्नावर भरपूर विचार करून मग लेखन करावयाचें अशी त्यांच्या लेखणीची बैठक आहे. त्यामूळें त्यांचें लेख वाचतां क्षणींच वाचणाराच्या मनाची पकड घेतात. एवढेंच नाहींतर त्यांतून कांहीं निश्चित घेण्यासारखें आहे असें वाचकांना—विशेषतः स्त्रियांना—वाटल्याशिवाय रहात नाही.

" महाराष्ट्रीय स्त्रीची सौंदर्यदृष्टि "* या लेखांत वस्तुस्थितीचें चित्रण करण्याचा लेखिकेनें प्रयत्न केला आहे. निरनिराळ्या जातींतील स्त्रियांच्या सौंदर्य-

× मौज, दिवाळी, १९४९. * मनोहर, सप्टेंबर १९१८.

दृष्टीनें तोलून पाहिलें तर महाराष्ट्रीय स्त्री याबाबत उदासीन असल्याचें लेखिकेनें येथें दर्शविलें आहे.

" महाराष्ट्रीय महिलांची बदलती वेषभूषा " ०या लेखांत लेखिकेनें वरील लेखाप्रमाणेंच चिकित्सक दृष्टीनें सकच्छापासून विकच्छ साडीचा धावता पण मोठा मनोरंजक इतिहास सांगितलेला आहे. हा इतिहास सांगत असतांना आजच्या स्त्रीच्या जीवनावर सिनेमांतील जीवनाची छाप पडली असल्याचें अनेक उदाहरणांनीं पटवून देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे.

" मराठी वाङ्मयांत बालवाङ्मयाचें स्थान "* हा लेख लिहितांना पिरोजबाईनीं " विसावें शतक हें मुलांचें शतक आहे " असें समजण्याची जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांची कल्पना मनासमोर ठेवून लेखन केलें आहे. बालमनांचा योग्य तो विकास होईल अशा प्रकारचें वाङ्मय लिहिलें जाणें इष्ट आहे असें त्यांनीं येथें ठासून सांगितलें असून जातां जातां मुलांना पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें, मुलांना आवडणाऱ्या वाङ्मयाचे प्रकार, मुलांनीं आतांपर्यंत वाचलेल्या विषयानुरूप पुस्तकांची शेंकडेवारी आणि मुलांना कोणतीं पुस्तकें आवडतात इत्यादींचीं पत्रकेंहि त्यांनीं दिलेलीं आहेत. आणि त्यांवरून निष्कर्ष काढतांना शेवटीं त्यांनीं अशी आशा व्यक्त केली आहे कीं, प्रतिथयश लेखकांनीं व प्रकाशकांनीं बालवाङ्मयाकडे विशेष लक्ष पुरवून मराठी भाषेच्या वैभवाचें हें नवीन दालन उघडण्याचें श्रेय मिळवावें.

● ● ●

डॉ. कमलाबाई देशपांडे

डॉ. कमलाबाई देशपांडे यांचें " अपौरुषेय वाङ्मय अर्थात् स्त्रीगीतें " हें प्रबंधात्मक पुस्तक वैशिष्ट्यपूर्ण आहे. " अपौरुषेय वाङ्मय म्हणजे स्त्रियांकडून त्यांच्या जीवनक्रमांत उपयोगांत आणलें जाणारें वाङ्मय. हें मुख्यतः स्त्रियांनींच रचलेलें आहे. कांहीं ठिकाणीं पुरुषांनीं भर घातली नसेलच असें नाहीं. उदा. झोपाळ्यावर बहिणी ओव्या म्हणत असतां भावानें त्यांना कांहीं ओव्या जोडून दिल्या असतील...स्त्रियांच्या जीवनावर आधारलेले, स्त्रियांचेकडून खेळ, सण, उत्सव इत्यादि प्रसंगीं उपयोगांत आणलें जाणारें, स्त्रियांच्या दृष्टिकोनांतून व प्रामुख्यानें स्त्रियांनीं रचलेलें वाङ्मय म्हणजे ' अपौरुषेय वाङ्मय.... '

" जसें सुचलें तसें रचलें । आणि रुचलें म्हणून ठसलें ॥ हीच याची पद्धति; हाच याचा इतिहास. " अशी आपल्या या लेखन प्रयत्नाची माहिती " विषय

० स्त्री, ऑगस्ट, १९४९, * स्त्री, मार्च १९४७.

प्रवेशां "त देऊन या अपौरुषेय वाङ्मयाची योजना पुढील रूपकालंकारांत त्यांनीं गोवून टाकली आहे.

....' गाणीं ' हीं स्त्रियांचे वेद, ' दळण्याचें जातें ' हें त्यांचें यज्ञकुण्ड व प्राचीन ऋषि ज्याप्रमाणें यज्ञ कुण्डांमध्यें हविर्भाग अर्पण करून त्यांचे जोडीला परमेश्वराच्या स्तुतिपर सूत्रें म्हणत व मनोवांछिताची याचनाहि करीत, त्याचप्रमाणें या जात्याच्या यज्ञकुण्डांमध्यें ' दाण्याचा घास ' हा हविर्भाग अर्पण करून त्याचे-बरोबरच ईश्वरस्तुति व वांछित प्रार्थना ओव्यांचे रूपानें करीत."

या प्रबंधांत कमलाबाईंनीं उखाणे, खेळांतील गांणीं, फेराचीं गाणीं, ओव्या इत्यादींबद्दल सोदाहरण व सविस्तर विवेचन केलें असून तें त्यांच्या काल-खंडासहित अत्यंत समर्पक असें झालेलें आहे. काव्यशास्त्रदृष्ट्या लेखिकेनें या काव्याचें केलेलें रसग्रहण मोठें मार्मिक झालेलें आहे.

कमलाबाई देशपांडे यांनीं लिहिलेल्या लघुनिबंधांपैकीं "आकाशांतील कानोसा" हा "स्त्री" मासिकांतील लघुनिबंध फारच चित्ताकर्षक आहे. गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे यांचे सुवर्ण महोत्सवानिमित्त मुंबई नभोवाणी केंद्रावर झालेलें भाषण स्वर्गामध्यें प्रक्षेपित होत असल्याचा हा अद्‌भुतरम्य प्रसंग आहे. या लेखांत कमलाबाईंची भाषा चटकदार असून कल्पनेची भरारीहि विलक्षण आकर्षक आहे.

डॉ. कमलाबाई देशपांडे यांनी "स्त्रीजीवनावर"वर लिहिलेला लहानसा पण सर्व बाजूंनीं बारीक सारीक विचार करणारा प्रबंधहि उल्लेखनीय आहे. या लेखनांतील वातावरण जसें जिव्हाळ्याचें आहे तशीच त्याची भाषाहि मोठी खेळकर आहे. तसेंच या लेखनांत अधुनमधून आलेलीं संस्कृतांतील वचनें व घरगुती उदाहरणेंहि घेण्यासारखीं आहेत.

डॉ. कमलाबाईंनीं अगदीं अलिकडे केलेला स्त्रीजीवनविषयक कायद्याचा अभ्यास व त्यासंबंधीं केलेलें लेखन वैशिष्ट्यपूर्ण झालेलें आहे.

मुक्ताबाई दीक्षित

मुक्ताबाई दीक्षितांनीं तसें पाहिलें तर फारच थोडें लेखन केलेलें आहे. तथापि त्यांनीं जें लिहिलें तें मात्र एकाद्या विषयावर संपूर्ण विचार करून असें लिहिलें आहे. स्त्री-जीवनाची बाजू मांडतांना त्यांनीं वस्तुस्थितीचे अनेक दाखले देऊन आपल्या विचारांना बळकटी आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या दृष्टीनें त्यांची "आधुनिक स्त्रियांची मानसिक उत्क्रांति"* हा लेख जरूर पहाण्यासारखा आहे.

---

* मौज, रौप्य महोत्सव अंक, १९४७

स्त्रियांच्या ह्या मानसिक उत्क्रांतीमुळें तिच्या जीवनक्षेत्रांत जो बदल झाला आणि तिच्या ठिकाणीं जी लढाऊ वृत्ति आली त्याचें कारण दर्शवितांना लेखिकेनें पुढीलप्रमाणें समर्पक उत्तर दिलें आहे, "जीं दुःखें माझ्या आईनें सोसलीं तीं माझ्या मुलीच्या वांट्याला येऊं नयेत म्हणून मीं जर धडपड केली नाहीं, तर काळाच्या दृष्टीनें आईच्या कर्तव्याला मी जागलें नाहीं, असा त्याचा अर्थ होईल."

● ● ●

मालतीबाई बेडेकर

मालतीबाई बेडेकर यांनीं निरनिराळ्या विषयांवर अनेक लेख लिहिलेले आहेत. मालतीबाईंची विचारसरणी अतिशय सडेतोड आहे याचा प्रत्यय त्यांनीं लिहिलेल्या कोणत्याहि लेखावरून येईल. विषय कोणताहि असला तरी त्याबद्दल सखोल विचार करून त्याची सांगोपांग चर्चा करणें हा मालतीबाईंच्या लेखाचा विशेष आहे.

इ. स. १९६० च्या 'केसरी' च्या दिवाळी अंकांत सौ. मालतीबाई बेडेकरांचा "वाटेचे वाटसरू" हा निबंधहि या संदर्भांत उल्लेखनीय आहे.

या निबंधामध्यें लेखिकेनें स्त्रीजीवनांतील चालू घडामोडींचें विशेष दिग्दर्शन केलें आहे. दारिद्र्य, असंस्कृति व वासना ह्या तिर्हींच्या गुंतागुंतीमुळें निर्माण होणाऱ्या बिकट समस्यांची चर्चा मालतीबाईंनीं येथें केलेली असून तिचा आविष्कार मोठ्या प्रभावी रीतीनें झालेला आहे. या ना त्या कारणानें परिस्थितीला बळी पडणाऱ्या अनेक स्त्रियांच्या हकीकती मालतीबाईंनीं मोठ्या हृदयद्रावक रीतीनें सांगितलेल्या आहेत. नीति अनीतीच्या प्रश्नांचा त्यांनीं जिव्हाळ्यानें विचार केलेला आहे. स्वतःच्या त्या संबंधींच्या प्रतिक्रियांना वाचा फोडलेली आहे. त्यामुळें त्यांचा हा निबंध मोठा विचारप्रवर्तक व आकर्षकहि झालेला आहे.

स्त्री जीवनावर आजपर्यंत जरी अनेक लेखिकांनीं लिहिलेलें असलें तरी बदलत्या काळांतहि या विषयांत अनेक घडामोडी होत असल्यामुळें याच विषयावर नेहमींच लेखन चालू रहातें आहे व राहीलही. या संदर्भांत सौ. विद्या सिधये यांचे "सुखी संसार", सौ. रमाबाई पटवर्धन यांचें "स्त्रियांचें कल्याण" व सौ. वसुंधरा पटवर्धन यांचें "स्त्री-जीवन" हीं पुस्तकें अवश्य पहाण्यासारखीं आहेत. विषय एकच असला तरी या लेखिकांनीं त्या विषयाकडे पहाण्याचा आपला दृष्टिकोन निरनिराळा ठेवलेला आहे.

"सुखी संसार" मध्यें सौ. सिधये यांनीं आधुनिक दांपत्य जीवनावर प्रकाश पाडणारी वास्तववादी संसार-चित्रें रेखाटलीं आहेत. त्यासाठीं त्यांनीं एकूण नऊ विविध समाजदृश्यांचा उपयोग केलेला आहे. सिधयेबाईंचे विचार

म्हणजे जुन्या आणि नव्या विचारांची भेसळ होऊन येथें प्रकट झालेले दिसतात.

आजचे संसार सुखी होण्यासाठीं म्हणून जे अनेक मार्ग लेखिकेनें सुचविले आहेत त्यांपैकीं विविध सणांमधील चालीरीतींनीं निर्माण होणारें सौंदर्य लुटण्याचाहि एक मार्ग येथें सांगितलेला आहे. स्वतंत्र राष्ट्राचे नागरिक म्हणून भावी पिढी तयार होत असतांना स्वावलंबनाचे व देशभक्तीचे धडे प्रत्येक मातेनें आपल्या मुलांना लक्षपूर्वक देणें इष्ट आहे असेंहि लेखिकेनें येथें सुचवून ठेवलें आहे.

" स्त्रियांचें कल्याण " या पुस्तकांत सौ. रमाबाईनीं स्त्रीजीवनांतील विविध प्रश्न हाताळून आजच्या काळांतील स्त्रीच्या दृष्टीनें आयुष्य समाधानांत जाण्यासाठीं आपले जुन्याला धरून असलेले पण सुधारणाप्रिय विचार प्रकट केले आहेत. स्त्री आणि पुरुष या दोघांचेंहि जीवन परस्परांवर अवलंबून असल्याचें येथें लेखिकेनें जोरदारपणें सांगितलेलें आहे.

" आमचें स्त्रीजीवन " या पुस्तकांत वसुंधरा पटवर्धन यांनीं आपल्या पुरोगामी विचारसरणींतून जुनेच प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्पष्टवक्तेपणा हें या लेखिकेचें प्रमुख वैशिष्ट्य असल्यामुळें त्यांचें लेखन पुरुषी थाटाचें आहे असें अनेकांचें म्हणणें आहे. विभावरी शिरूरकर यांच्या वाङ्मयाबद्दलहि असेच गैरसमज निर्माण झाले होते.

पुरुषांप्रमाणें स्त्रीनेंहि आर्थिक स्वातंत्र्य उपभोगावें हें सांगतांना लेखिका म्हणते, " स्त्रीनें द्रव्यार्जन करावें असें मी म्हणतें याचा अर्थ, प्रत्येक स्त्रीनें जरूर नसतांहि नोकरी करावी, असा मात्र नाहीं. पण प्रसंग पडल्यास श्रीमंत नवऱ्याच्या बायकोनेंहि चार पैसे मिळविण्याची समर्थतता आपल्या अंगीं आधींच आणली पाहिजे हाच माझ्या म्हणण्याचा हेतु आहे. आपल्या आयुष्याच्या बाबतींत आपण अजिबात गाफिल राहिलों, असा पश्चात्ताप वाटण्याची पाळी येऊं नये म्हणून ही सावधानता आहे. " आणि हें सांगत असतांना गृहकर्तव्यें पार पाडीत असतां न-कळत स्त्रीला मिळणाऱ्या आर्थिक स्वातंत्र्याचाहि लेखिकेला विसर पडलेला नाहीं ही समाधानाची गोष्ट होय.

विशेषतः अपत्य असलेली स्त्री व पोक्त विधवा यांचा प्रश्न आणि घटस्फोट इ. प्रश्नांची लेखिकेनें अत्यंत धीटपणानें चर्चा केली आहे. जरूर तेथें घटस्फोटाची त्यांनीं आवश्यकता पटविली असून पुनर्विवाहाची बाजू मांडलेली आहे.

ताराबाई मोडक

शिक्षणशास्त्रावर विचारपूर्वक प्रयोग करून लेखन करणारी लेखिका या नात्यानें ताराबाई मोडकांची प्रसिद्धि आहे. शिक्षण क्षेत्रांतील त्यांची सेवा अनेक

वर्षांची आहे. त्यामुळें त्यांनीं जें जें लिहिलें तें तें सर्व स्वानुभवावर आधारून लिहिलें आहे " शिक्षणपत्रिकें ", मधून स्वानुभवावर आधारलेले कितीतरी लेख त्यांनीं लिहिलें आहेत. त्याचप्रमाणें मुलांसाठीं व पालकांसाठीं अशीं अनेक लहान लहान पुस्तकें त्यांनीं लिहिलीं असून तीं वाचनीयहि झालेलीं आहेत.

• • •

डॉ. इरावती कर्वे

मानव वंशशास्त्राचा अभ्यास केलेल्या प्रसिद्ध प्राध्यापिका डॉ. इरावती कर्वे यांनीं मराठींत थोडेंच पण वैशिष्ट्यपूर्ण असें लेखन केलेलें आहे

" मराठी लोकांची संस्कृति ", " परिपूर्ति " व " आमची संस्कृति " या त्यांच्या प्रकाशित पुस्तकांच्यावरून त्यांच्या सूक्ष्म अवलोकनाची, गाढ्या अभ्यासाची व चटकदार भाषाशैलीची कल्पना येते.

" परिपूर्ति " या पुस्तकांत इरावतीबाईनीं फारच सुंदर असे ललित निबंध दिलेले आहेत. त्यांमधून घरगुती असें खेळकर वातावरण व प्रत्येक मराठी वाचकाला ओळखीचे वाटतील असे खास मराठी स्त्रीच्या जीवनांत येणारे प्रसंग मोठ्या कुशलतेनें त्यांनीं चित्रित केलेले आहेत. या संग्रहांतील ' वाटचाल ' व ' परिपूर्ति ' हे दोन ललित निबंध म्हणजे एक स्त्री म्हणून इरावतींनीं वापरलेल्या लेखणीचा परमोच्च बिंदु दर्शवतील एवढे हृदयस्पर्शी झालेले आहेत.

या लेखनांत इरावतीबाईनीं खास स्त्री म्हणून आपला जीव ओतलेला आहे. मोकळ्या मनानें घडल्या गोष्टींना बोलकें केलेलें आहे. त्यामुळें त्यांचें हें 'परिपूर्ति' पुस्तक वाचणाराच्या मनाला चटका लावून सोडतें.

उरलेल्या इतर दोन पुस्तकांतून इरावतींनीं आपले अभ्यासपूर्ण विचार मांडलेले आहेत. त्यावरून त्यांच्या व्यासंगाची चांगली कल्पना येते.

" संस्कृतीची उत्पत्ति, जतन व संक्रमण भाषेच्या द्वारें होतें. भाषा हें संस्कृतीचें एक प्रभावी अंग आहे. भाषेशिवाय संस्कृतीची निर्मितीहि होणार नाहीं व संक्रमण तर सर्वस्वीं अशक्य आहे. " अशा विचारांची त्यांनीं आपल्या या दोन पुस्तकांतून जागोजाग पेरणी केलेली आहे. त्या कारणानें त्यांचें हें लेखनहि उठावदार झालेलें आहे.

डॉ. इरावती कर्वे यांच्याप्रमाणें कांहीं महत्त्वाच्या विषयांवर कांहीं स्त्रियांनींहि व्यासंगपूर्ण असें निबंध वा प्रबंध लेखन केलेलें आहे. परंतु अशा लेखिका फारच थोड्या आहेत. आणि मुख्य म्हणजे या प्रकारच्या लेखनांतून स्त्री म्हणून त्यांनीं कांहींसा वेगळा दृष्टिकोन मांडलेला आहे असें नाहीं. त्यामुळें या प्रकारच्या लेखनाचा अधिक विचार येथें केलेला नाहीं.

तथापि जातां जातां प्रा. नलिनी पंडित यांच्या “ महाराष्ट्रांतील राष्ट्रवादाचा विकास ” (१९५५) या पुस्तकाचा मी इथें जरूर उल्लेख करीत आहें.

या ग्रंथांत प्रा. नलिनी पंडितांनीं भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या निमित्तानें गेल्या शंभर दीडशें वर्षांत महाराष्ट्रांत जे निरनिराळे विचार प्रवाह निर्माण झाले त्यांचें विश्लेषण व मूल्यमापन करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

राष्ट्रवाद ही आजच्या युगांतील एक प्रभावशाली प्रेरणा आहे. जगांतील पुढारलेल्या आणि मागासलेल्याहि देशांच्या आधुनिक इतिहासांत या प्रेरणेची अपूर्व करामत पहावयास मिळते. त्यामुळें या सर्व गोष्टींचा प्रा. पंडितांनीं विचार केला व स्त्रीच्या लेखणीला एक नवा विषय हाताळण्याची संवय लावली, म्हणून त्यांच्या या ग्रंथाचें वैशिष्ट्य मी अधिक मानतें.

इंदुमति पंडित

मराठींत स्त्रियांनीं जें आजवर अनेक प्रकारचें लेखन केलें त्यापेक्षां अगदीं वेगळ्या प्रकारचें लेखन श्रीमति इंदुमति पंडित यांनीं केलेलें आहे. असें समजतें कीं, त्यांनीं आपलीं एकूण १६ पुस्तकें व तेराशें लेख केवळ राजकीय भविष्याचें कथन करण्यासाठीं लिहिलेले आहेत ! तेव्हां ही गोष्ट केव्हांहि स्त्रीच्या लेखणीच्या दृष्टीनें उल्लेखनीयच होईल.

आगामी काळ, अनागत काळ, भावी काळ, भविष्यवाणी, मानवयुग, विचार, ग्रहयोग, शुभाशुभयोग भावीग्रहयोग इत्यादि पुस्तकें इंदुमति पंडित यांनीं लिहून मराठींत प्रकाशित होणाऱ्या ज्योतिषविषयक ग्रंथांत एक वेगळीच भर टाकलेली आहे. इतर ज्योतिषांनीं मराठींत जें लेखन केलें तें प्रामुख्यानें व्यक्तिगत व राशीभविष्य सांगणारें असें केलें. परंतु इंदुमतींनीं केवळ राजकीय भविष्याचेंच कथन केलें हें विशेष होय.

इंदुमतींनीं हिंदी, गुजराथी व इंग्रजी या भाषांतूनहि राजकीय भविष्य लिहून जागतिक कीर्तीचा मान मिळविलेला आहे. तसेंच एकाच विषयावर एवढें भरपूर लेखन करून पुरुषांनीं लिहिलेल्या याच विषयावरील लेखनास संख्येच्या दृष्टीनें मागें टाकलेलें आहे !

स्फुट लेखन

मराठी भाषेंत अलीकडे पुष्कळशीं मासिकें चालू असलेलीं दिसून येतात. गेल्या २५–३० वर्षांच्या कालांत जीं विविध प्रकारचीं मासिकें निघत गेलीं

त्यांमधून अनेक लेखिकांनीं लेख लिहिले आहेत. त्यापैकीं स्त्रीच्या लेखणीचें वैशिष्ट्य दर्शवितील असे कांहीं लेख येथें पहावयाचे आहेत.

" शिशु "* ह्या लेखांत काशीबाई कानिटकर यांनीं लहान मुलांच्या जोपासनेचा प्रश्न चर्चिलेला आहे. काशीबाईच्या लेखनाला अनुभवाची विपुलता भरपूर आहे त्यांमुळें आपले विचार मांडतांना त्यांनीं नेहमींच वस्तुस्थितीचें सत्य चित्र रंगविण्याकडे आपल्या लेखणीचा कल ठेविलेला आहे.

" स्त्रियांचा सामाजिक दर्जा " या लेखांत कृष्णाकुमारी या लेखिकेनें आपले विचार मोठ्या जोमदारपणें मांडलेले आहेत.

पुरुषापेक्षां स्त्रीचा सामाजिक दर्जा कमी लेखण्यांत येतो. परंतु तसें म्हणणें योग्य नव्हे. हें सुचवितांना " मातेच्या रूपानें पुरुषजातीला जन्म देणाऱ्या, पत्नी रूपानें त्यांची जन्माची मैत्रिण होणाऱ्या आणि कन्या रूपानें त्यांच्या उदरीं जन्म घेणाऱ्या व या तिन्ही अवस्थांत त्यांना सात्विक प्रेमाची साक्ष पटवून पुत्र, पति व पिता अशा चढत्या पदवीस पोंहोचविणाऱ्या स्त्रियांना हलक्या दर्जाच्या समजणें म्हणजे पुरुषानें आपला पुरुषार्थ विसरण्यासारखेंच आहे " असें म्हटलें आहे. पतीच्या जीवनाशीं समरस होऊन वागणारी पत्नीहि एक जीवनशक्ति आहे असें लेखिकेचें म्हणणें आहे.

" आम्हांला पाहिजे तरी काय ? × " या शीर्षकाखालील लेखांत कु. जशोद विणेकर या तरुणीनें " चूल आणि मूल हें स्त्रियांचें कार्यक्षेत्र आहे. " या राजाजींच्या ठाकरसी विद्यापीठांतील भाषणाला मोठें बंडखोर उत्तर दिलें आहे.

" जीवन पथावरील पुरुषांच्या बरोबरीचे साथीदार, सहचर बनायचे आहे आम्हांला. यापुढें घर हें स्त्रीच्या चोवीस तास कामाच्या विसाव्याचें, आनंदाचें आणि स्फूर्तीचें स्थान व्हायला पाहिजे." असें त्या सांगतात.

या स्त्रियांचे हे विचार म्हणजे स्त्री जीवनांतील क्रांतिकालाचे आणि वाढत्या कार्यप्रवृत्तीचे निदर्शक होत. स्त्री ही स्वतःविषयीं अधिक विचार करूं लागल्याचें आणि आपलें खरें कार्यक्षेत्र ओळखूं लागल्याचेंच हें प्रतीक म्हणतां येईल.

माहेर ही स्त्रीच्या अत्यंत आवडीची चीज आहे. या गोष्टीबद्दल तिला वाटणारा जिव्हाळा पुरुषाच्या अंतःकरणाला ओळखतां येणें शक्य नाहीं इतका तो हृदयंगम आहे, इतका तो कळण्यासहि कठीण आहे. ज्याची उपमा त्यासच म्हणतात तसें हें आहे. या विषयावर अनेकांनीं आजवर लिहिलें पण " स्त्रिया व माहेर " या सरस्वतीबाई भिडे यांच्या लेखाची सर त्यास यायची नाहीं.

---

* गृहलक्ष्मी, मार्च १९२८.

‡ गृहलक्ष्मी, सप्टेंबर १९२७.

× नवशक्ति. दसरा अंक १९४५.

स्त्रियांना आपल्या माहेराबद्दल वाटणारें प्रेम जितकें नैसर्गिक तितकेंच स्वभावसहज असतें. त्याची पूर्वपारंपरिक खात्री पटवितांना लेखिकेनें कण्वदुहिता शकुंतला, सीतादेवी, हिमनगकन्या पार्वती या पौराणिक स्त्रियांच्या कथांचा आधार घेतला असून " पुण्याहून बोरघाटानें खालीं आलें म्हणजे, खोपवलीचें जें एक सुंदर तळें लागतें तें भाऊसाहेब पेशवे ह्यांच्या पत्नी पार्वतीबाईसाहेब यांची माहेरास जातांना गैरसोय होऊं नये म्हणूनच केवळ बांधलें गेलें ! " असा ऐतिहासिक आधारहि देऊन टाकला आहे ! याशिवाय विविध भाषेंतील काव्यकल्पना देखील अनुषंगानें येतील तशा सांगून टाकल्या आहेत.

माहेराकडे स्त्री कां धाव घेते याचें विवेचन करतांना लेखिका म्हणते, " मौंजिबंधनाच्या वेळीं मातृभोजनांत आईकडून मिळालेला घास जसा मुलाच्या जिव्हेवर आजन्म घोळत रहातो, तद्वत् विवाहदिनाचे आदले दिवशीं आईनें प्रेमानें वाढलेलें आग्रहाचें भोजन मुलीच्या जिव्हेवर निरंतर टिकतें व तेंच तिला मधून मधून माहेरीं आणण्यास कारणीभूत होतें....

...हिंदु स्त्रियांना माहेर विशेष प्रिय होण्याचें कारण म्हटलें म्हणजे स्थानांतर व तदनुषंगिक लाभणारी स्वतंत्रता होय.....पहिली गोष्ट म्हणजे तिच्या पाठीमागची चूल सुटते व कांहीं अंशानें मूलहि सुटतें. कारण, प्रेमळ आजा व आजी यांच्या सहवासांत, मुलें जवळ जवळ आईला विसरतात असें म्हटलें तरी चालेल. त्याहून अधिक म्हणजे गोड शैशवावस्था पुनरपि प्राप्त होते. सासरीं असणारें कृत्रिम गांभीर्य व मौन ह्यांना फाटा मिळतो. एकंदरींत बाळपणाचा काळ आनंदाचा...यावेळीं स्त्रीचे उद्योगहि ह्या शैशवावस्थेला अनुसरूनच होतात."°

" स्त्रियांचें नामकरण "* या लेखांत इंदिरा आंबेगांवकर यांनीं स्त्रीच्या दृष्टिकोनांतून केलेली या विषयाची आटोपशीर पण चित्तवेधक छाननी महत्त्वाची आहे. स्त्रियांचें नांव लग्नांत बदललें जातें. त्या रूढीला अनुसरून लिहीत असतां त्या म्हणतात, " ...लग्नप्रसंगीं मुलींनीं आपलें सर्वस्व पतीला अर्पण करावयाचें असतें...म्हणून कां नांव बदलावें ? आपला आत्मभाव विसरावा ? आपलें आडनांव बदलणें हें पतिगृहाला आपलें मानण्याचें संपूर्ण चिन्ह आहे. आपलें नांव बदलणें म्हणजे आत्मीयता विसरणें आहे. या विषयाकडे स्त्रीनेत्रांनीं पाहिलें पाहिजे. प्रत्येक जाणत्या समजुतदार नोवरीला विचारा...लग्नप्रसंगीं नांव बदलण्याच्या वेळीं तिच्या मनाला थोड्या तरी वेदना झाल्याशिवाय राहिल्या नाहींत असें अनुभवास येईल."

कांहीं डॉक्टर लेखिकांनीं, म्हणजे डॉक्टरकीचा व्यवसाय करीत असतां स्त्रीरोगांवर लेखन केलेल्या लेखिकांनीं, जें थोडें फार लेखन केलें आहे तें महत्त्वाचें

° गृहलक्ष्मी, मार्च १९३०. * गृहलक्ष्मी, मार्च १९२८.

आहे. आजवर अनेक डॉक्टरांनीं या विषयांवर लिहिलें आहे. परंतु स्त्रीरोग चिकित्सक डॉक्टरबाईनें आपल्या अनुभवाच्या चष्म्यांतून केलेलें हें लेखन विशेष मोलाचें आहे. अनुभव आणि जिव्हाळा हा या लेखांचा विशेष म्हणतां येईल. स्त्रियांमध्यें असलेले दोष व स्वतःच्या आरोग्याबद्दलची अनास्था या लेखिकांनीं स्पष्ट सांगून निरोगी जीवनाचे धडे दिलेले आहेत. डॉ. सुमति क्षेत्रमाडे, डॉ. काशी अवसरे व डॉ. सुशिला बेडेकर यांचे या विषयावर अलीकडे प्रसिद्ध झालेले "स्त्री" मधील लेख खरोखरच महत्त्वाचे आहेत. त्यांतल्या त्यांत "प्रत्येक स्त्रीला हें माहीत असावें" *हा डॉ. सुशिला बेडेकर यांचा लेख प्रत्येक स्त्रीनें पारायणें करून वाचावा इतका उत्कृष्ट झालेला आहे. मुलगी वयांत आल्यानंतर तिच्या शरीरांत पडत जाणारीं स्थित्यंतरें व त्यांची कारण परंपरा येथें लेखिकेनें फारच कुशलतेनें चित्रित केली आहे.

लघुनिबंध

निबंधाप्रमाणेंच कांहीं लेखिकांनीं लघुनिबंधहि लिहिलेले आहेत. मात्र निबंधांच्या मानानें त्यांच्या लेखनाचें हें क्षेत्र अगदींच मर्यादित आहे. हाताच्या बोटावर मोजतां येतील एवढयाच लेखिकांनीं ह्या प्रांतांत लेखन केलें आहे.

वास्तविक लघुनिबंध हाहि एक निबंधाचाच प्रकार, परंतु त्यांत विचारांच्या भारदस्तपणापेक्षां सहानूभुतीच्या जिव्हाळ्यानें केलेलें हितगुजच अधिक असते. हरघडी डोळ्यांसमोर दिसणाऱ्या अगदीं सामान्य गोष्टी आणि पदोपदीं येणारे बारीक सारीक विविध अनुभव अथवा सहजासहजीं कुठेंहि आढळतील असे सामान्यच पण निवडक प्रसंग यांचीं सोप्या व चटकदार भाषाशैलीनें रेखाचित्रें काढण्यांतच लेखकाला अतिशय समाधान वाटत असले. लघुनिबंधाचा उदय लेखकाच्या याच मनोवृत्तीमधून होत असतो.

"काव्य, विनोद व तत्त्वज्ञान यांच्या मधुर संमिश्रणानें प्राप्त होणाऱ्या रम्य, वास्तव परंतु अंतर्मुख अशा दृष्टीनें लघुनिबंधकार जगाकडे आणि जीवनाकडे पाहात असतो.०" तथापि ह्या तिन्ही गुणांचा लाभ प्रत्येक लघुनिबंधकाराला झालेला असतोच असें मात्र नाहीं. प्रत्येकाचे व्यक्तित्व आणि अनुभूतीचें क्षेत्र भिन्न असलें तरी ह्या दोन्हींच्या संमिश्र मनोवृत्तीमुळें रंगणारा लघुनिबंधच चटकदार होत असतो. त्यामुळें येथें असें म्हणतां येईल कीं, लेखकाचें व्यक्तित्व

* स्त्री, आरोग्य विशेषांक १९४९.

० वि. स. खांडेकर—प्रास्ताविक, वासंतिका.

जेवढें संपन्न, समतोल, संस्कारक्षम आणि बहुविध असेल तेवढें त्याचें यश निश्चित असतें.

"दृष्टीच्या आडच्या सृष्टींत" या पुस्तकांत सौ. कृष्णाबाई मोटे यांनीं अनेक उपेक्षितांचें अंतरंग किंवा त्याच्या भोंवतालचें जग म्हणा हवें तर, वाचकांना खुलें करून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. वृत्तांतनिवेदन किंवा गुजगोष्ट असें या लेखांचें स्वरूप आहे. अशा प्रकारचें स्त्रीनें लिहिलेलें लघुनिबंधाचें हें बहुधा पहिलेंच पुस्तक असावें. वास्तविक यापूर्वींच्या सौ. केळकरांच्या लेखांतून अधून मधून गुजगोष्टीचा अवतार झाला होता, परंतु येथें सर्व लेखच त्या पद्धतीचे आहेत इतकाच काय तो फरक.

आतांपर्यंत स्त्रियांनीं जें लेखन केलें त्या लेखनाचें क्षेत्र बहुधा मध्यमवर्गाचेंच होतें. परंतु काळ जसा बदलला तसा बहुजनांकडे व श्रमजीवी लोकांकडे लेखकांची दृष्टि दिवसेंदिवस जास्त वळत गेली. हें पुस्तक त्याच वृत्तीचें एक दृश्यफल म्हणतां येईल.

परिस्थितीमुळें दरिद्री जीवनाची होत असलेली थट्टा मोठ्या जिव्हाळ्यानें येथें चित्रित झालेली दिसून येते. लेखिकेचें सूक्ष्म निरीक्षण आणि आकर्षक निवेदन यामुळें या पुस्तकाचें अंतरंग मोठें मनोरंजक झालेलें आहे.

आपल्या देशाप्रमाणेंच सौ. कृष्णाबाई मोटे यांनीं येथें परदेशांतील दृष्टिआडच्या सृष्टीचीहि मोठ्या कौशल्यानें ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्त्रीस्वभावाला अनुसरून अशी भाषेची घडण लेखिकेनें सर्वत्र विखुरलेली आहे. दृष्टीआडची रम्य सृष्टि आणि सहानुभूतीनें तिचें लेखिकेनें केलेलें जिव्हाळ्याचें चित्रण हा या पुस्तकाचा गाभा आहे.

१९४२ सालीं "स्त्री" मासिकांत प्रसिद्ध झालेली "समाजाच्या अंतरंगात" ही इंदिराबाई मायदेव यांची लेखमाला लघुनिबंधाच्या धाटणीचीच आहे. बहुजन समाजांतील स्त्रियांचें जीवनदर्शन घडविणारीं एकूण आठ दृश्यें लेखिकेनें या लेखमालेंत दर्शविलेलीं आहेत. इंदिराबाईंची भाषा चटकदार असून संवादलेखनहि आकर्षक असल्यामुळें हीं दृश्यें चित्तवेधक झालीं आहेत. "बाळंतपणांत धाकट्या बहिणीला मदतीला म्हणून आणली तर ती आपली माझा संसारच पटकावून बसली!" अशी माहिती देणारें या लेखमालेंतील अखेरचें दृश्य फारच हृदयंगम वठलेलें आहे.

आपल्यासमोर मोलमजुरी करीत असतांना दिसणाऱ्या स्त्रीजीवनाचे अनेक पडसाद इंदिराबाईंनीं वाचकांना ऐकविलेले आहेत. त्यामुळें लेखिकेचें अवलोकनाचें क्षेत्र फारच मर्यादित झालेलें दिसतें. त्यापेक्षां बहुजन समाजाच्या सर्व थरांतील स्त्रीजीवन जर लेखिकेनें सहानुभूतीनें जवळून पाहिलें असतें, तर खऱ्याखुऱ्या समाजाच्या अंतरंगांत शिरल्याचें समाधान वाचकांना लाभलें असतें आणि विविधताहि भरपूर आली असती.

डॉ. कमलाबाई देशपांडे, शान्ता ज. शेळके व वसुंधरा पटवर्धन यांनींहि लघुनिबंध लिहिलेले आहेत. (कमलाबाई देशपांडे यांच्या या लेखन प्रकाराबाबत मागें उल्लेख आलेला आहेच.) वसुंधरा पटवर्धनांचें " मीं भटकतें आहें (१९५९) हें पुस्तक या लेखनप्रकारांत मोडतें. या पुस्तकांतील लेखन फारच प्रदीर्घ झालें असून पुनरावृत्तीचा दोष अधून मधून आढळून येतो. ' चाहुल ' या लघुनिबंधांत– ललित निबंधांत–चेटूक, उपाययोजना व देवघेव यावर भर दिलेला आहे. आणि " मी न्हाऊन आलें " या लघुनिबंधांत शस्त्रक्रियेनंतर क्लोरोफॉर्मच्या धुंदींत स्वर्गीय जीवनाचा होणारा भास रंगविलेला आहे.

शान्ताबाई शेळके यांचें " शब्दांच्या दुनियेंत " (१९५९) हें ललित निबंधांचें पुस्तक तसें आकर्षक झालेलें आहे. लेखन आटोपशीर असून येथें वर्णन केलेली ' मनांतील बाग ' लहानपणच्या अनुभवांनीं मोठी छानदार सजलेली आहे.

स्त्रियांनीं लिहिलेल्या निबंधलेखनाचें स्वरूप हें असें आहे. अपवाद म्हणून कांहीं थोडे निबंध सोडले, तर ह्या निबंधापैकीं बहुधा सर्व निबंध स्त्रियांच्या सामाजिक व घरगुती प्रश्नांवरच आधारलेले दिसून येतील. आपल्या घरगुती जीवनाबद्दल आणि आपणांला मिळालेल्या सामाजिक स्थानाबद्दल स्त्रियांना विशेष आस्था वाटत असते; आणि म्हणून त्यांनीं आपल्या ह्या मनोवृत्तीनुसार निबंधाचे विषय निवडले हें मान्य करूनहि असें म्हणतां येईल कीं, त्यांचें हें निबंधलेखन अतिशय मर्यादित क्षेत्रापुरतें झालेलें आहे.

● ● ●

टीका लेखनाच्याबाबतींत तर कुसुमावती देशपांडे, डॉ. इरावती कर्वे, कमलाबाई टिळक, बाळूताई खरे, यांच्याखेरीज फारसें कोणी लक्षच दिलेलें दिसत नाहीं. शिक्षणक्षेत्रांत अनेक स्त्रिया काम करीत असल्या, तरी त्या बाबतींत देखील ताराबाई मोडकांइतकी आस्था कुणींच दाखविली नसावी, इतकें थोडें लेखन या प्रांतांत झालेलें आहे. पाकशास्त्र, भरतकाम,शिवणकाम इत्यादींवर अनेक महिलांनीं लिहिलें असलें, तरी वाङ्मयाच्या दृष्टीनें तें लेखन महत्त्वाचें नाहीं व त्यामुळेंच त्या ग्रंथांचा समावेश या विवेचनांत आलेला नाहीं.

वास्तविक देशाबद्दलची प्रीति पुरुषांप्रमाणेंच स्त्रीलाहि वाटावयास हवी. पण त्या दृष्टीनेंहि स्त्रियांनीं फारसा विचार केलेला दिसत नाहीं. त्यामुळें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याप्रमाणें देशप्रीतीनें भारलेलें किंवा शिवरामपंत परांजपे यांच्या-सारखें पारतंत्र्याचें जळजळीत किल्मिष ओकून टाकणारे निबंध याहि कालखंडांत स्त्रिया लिहूं शकल्या नाहींत ! तीच गोष्ट भानू शिरधनकर यांनीं " किर्लोस्कर " मध्यें अधूनमधून लिहिलेल्या शिकारीच्या रोमहर्षक हकीकती सांगणाऱ्या निबंधांनाहि लागू पडेल.

कायद्याच्या बाबतींत खरें म्हणजे स्त्रियांनीं विशेष जागरूक रहायला हवें आणि त्या दृष्टीनें लेखनहि करणें इष्ट आहे. पण चंद्रकला हाटे, कमलाबाई देशपांडे किंवा कमलाबाई टिळक यांच्याखेरीज कायद्याच्या कक्षेंत येणाऱ्या प्रश्नांवर फारसें कोणीं लिहिलेलें दिसत नाहीं.

धार्मिक बाबतींत स्त्रिया स्वत:ला फार गुरफटून घेतात असें त्यांच्या रोजच्या जीवनांत आढळून येणाऱ्या उपासातापासावरून किंवा व्रतवैकल्यांवरून म्हणतां येईल. असें असतांना मग त्यांनीं या विषयांवर निबंध लिहून आपले विचार कां मांडले नसावेत याचें आश्चर्य वाटतें !

अगदीं अलीकडचा कांहीं काल सोडला तर असें दिसून येतें कीं, घर-कामापलिकडे स्त्रियांनीं इतर क्षेत्रामध्यें पाऊल टाकून फारसा विचारच केलेला नव्हता. अर्थात् हा स्त्रीचा दोष नसून परिस्थितीचा होता हें मान्य करावयास हवें आहे. कारण स्त्री ही पुरुषांपेक्षां कमी प्रतीची असून तिचें क्षेत्र फक्त घरापुरतेंच मर्यादित आहे अशी समाजानें आजवरच्या रूढीप्रमाणें चालत आलेली समजूत उराशीं बाळगलेली होती आणि स्त्रियांनींहि मुकाट्यानें त्या कल्पनेचा स्वीकार केला होता ! त्यामुळें स्वाभाविकच या विचारसरणीचा त्यांच्या लेखनावर परिणाम झाला असावा. त्यांनीं आपलें जग अत्यंत मर्यादित करून घेतलें आणि मुख्य म्हणजे आजवरच्या रूढीनें घातलेल्या चाकोरींतून बाहेर पडण्याचा कांहींसा प्रयत्न केला ! परंतु हा त्यांचा प्रयत्न कृतीपेक्षां त्यांच्या कल्पनेंतच अधिक तरंगत राहिल्यामुळें त्यांच्या विचारांची बंडखोरी त्यांच्या लेखनांतून म्हणावी तशी प्रकट झाली नाहीं.

स्त्रियांच्या मनाची ही ठेवणच त्यांना मिळणाऱ्या सामाजिक दर्जाला व त्यांच्या लेखन निर्मितीला प्रामुख्यानें कारणीभूत झाली. त्यामुळें आजच्या वैज्ञानिक युगामध्यें विज्ञानासंबंधींचें भरीव लेखन करणें त्यांना जमलेलें नाहीं ! किंवा एखादा दुसरा अपवाद सोडला तर मराठीला ललामभूत होईल असा प्रबंधहि त्यांच्या हातून लिहिला गेलेला नाहीं ! ! त्यांनीं लिहिलें तें सारें—थोडासा अपवाद सोडला तर—स्त्री जीवनाला धरून असेंच लिहिलें. परंतु जें लिहिलें तें मात्र खास स्त्रीजीवनाचा आविष्कार करणारें असें लिहिलें. त्यामुळें त्यांचें हें निबंधलेखनहि मराठी सारस्वतास भूषणावह होईल यांत शंका नसावी.

चरित्र वाङ्मय

आपल्या जीवनांत येणाऱ्या एखाद्या थोर व कर्तबगार व्यक्तीबद्दल मनांत आदर निर्माण होणें व त्या व्यक्तीच्या जीवनाबद्दल आकर्षण वाटणें हा मानवी

मनाचा एक प्रमुख गुणधर्म आहे. आणि त्यामुळेंच माणूस जन्माला आल्यापासून आपल्याजवळ कांहीं ईर्षा बाळगून आहे व कार्यप्रवृत्तहि झालेला आहे, होतो आहे व होईल देखील.

थोर पुरुषांची किंवा स्त्रियांची अद्‌भुतरम्य अगर अचाट वाटणारीं कृत्यें हीं विश्वासास जशीं पात्र असतात तशींच तीं आपल्या अवाक्याबाहेरचींहि नसतात. त्यामुळें एखाद्या विशिष्ट माणसाचें चरित्र लिहावयास ज्यावेळीं एखादा लेखक तयार होतो त्यावेळीं त्या विशिष्ट माणसाबद्दल त्याचें मन मोठ्या आपुलकीनें व जिव्हाळ्यानें विचार करीत असतें. एकमेकांतील नात्याचें विवेचन करणें मग अशा वेळीं त्याच्या लेखणीला विशेष आवडतें. आणि त्यामुळें ह्या चरित्रलेखनास कलात्मक वाङ्मयामध्यें महत्त्वाचें स्थान प्राप्त होतें.

चरित्रनायक आणि चरित्रकार यांच्या परस्परांमधील नात्याचें अधिक विवेचन ललित वाङ्मयाच्या प्रारंभकालाच्या मागील प्रकरणांत आलेलें असल्यानें येथें ही पुनरावृत्ति मुद्दामच केलेली नाहीं.

चरित्रनायकाचें जीवनदर्शन चरित्रकारास घडलें असतां तो किती आत्मीयतेनें लेखन करूं शकतो, याची कल्पना काशीबाई कानिटकर यांनीं लिहिलेल्या " डॉ आनंदीबाई जोशी " यांच्या चरित्रावरून मागें आलेली आहेच. त्याच गोष्टीचें आणखी एक प्रत्यंतर वेणूबाई पानसे यांनीं लिहिलेल्या हरिभाऊ आपटे यांच्या चरित्रावरून निश्चितपणें येतें.

वेणूबाई पानसे

आजपर्यंत हरिभाऊ आपटे यांच्याबद्दल अनेकांनीं लिहिलेलें आहे. श्री. आंबेकर, नि. म. केळकर व वा. ना. देशपांडे यांनीं लिहिलेलीं त्यांचीं चरित्रेंहि प्रसिद्ध झालेलीं आहेत. तथापि या सर्वांपेक्षांहि वेणूबाईनीं लिहिलेलें हरिभाऊंचें चरित्र विशेष उल्लेखनीय असें झालें आहे. हरिभाऊंचें खरेंखुरें जीवनदर्शन घडविण्याची यशस्वी कामगिरी वेणूबाईनीं " हरि नारायण आपटे " या आपल्या ग्रंथाद्वारें केलेली आहे. हरिभाऊ हे कशा प्रकारचे गहस्थ होते याची कल्पना येथें निश्चितपणें येते. हरिभाऊंच्या जीवनांतील बारीकसारीक सर्व गोष्टींचा जिव्हाळ्यानें अभ्यास करून वेणूबाईनीं त्यांचें जीवनचित्र या ग्रंथांत रेखाटलेलें आहे.

आत्मीयता हा वेणूबाईंच्या लेखनाचा प्रमुख विशेष येथें आढळून येईल. हरिभाऊंच्या एका स्नेह्याची मुलगी या नात्यानें त्यांचा आणि हरिभाऊंचा निकटचा संबंध आलेला. त्यामुळें त्यांच्या ह्या चरित्राला विशेष वास्तवता आलेली आहे. हरिभाऊंच्या निकटवर्ती असलेल्या सर्व मंडळींकडून विचारून व बारीकसारीक

माहिती गोळा करून वेणूबाईंनीं येथें एकत्र केलेली आहे. काशीबाई कानिटकरां-सारख्या विदुषींनींहि त्यांना हातभार लावलेला आहे. या प्रयत्नाला जिव्हाळ्याची पार्श्वभूमि होती हें मुख्यतः लक्षांत घ्यायला हवें. त्या जिव्हाळ्यामुळेंच आपल्याला हें लेखन करण्याकडे खेंचलें असें खुद्द लेखिकेचेंच म्हणणें आहे.

हरिभाऊंची जन्मापासूनची हकीकत देत असतांना वेणुबाईंनीं मधून मधून त्यांच्या लेखनांत आलेलीं विविध पात्रें कुठून व कशीं निर्माण झालीं, याची दिलेली माहिती मोठी मनोरंजक आहे. लहानपणापासून विष्णुशास्त्र्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून उत्तम लेखक व्हायची हरिभाऊंची इच्छा होती. ती इच्छा हळूहळू कशी वाढत गेली आणि ती पार पाडण्यासाठीं हरिभाऊंना कोणकोणत्या परिस्थितीशीं तोंड द्यावें लागलें, हा भागहि येथें लेखिकेनें मोठ्या आत्मीयतेनें रंगविलेला आहे.

हरिभाऊंचें लेखन अतिशय वास्तववादी आणि प्रामाणिक झालें व त्यांना मनुष्यस्वभावाची चांगली पारख होती म्हणून त्यांना स्वभावलेखनाची कला उत्तम रीतीनें हाताळतां आली असें पुष्कळदां म्हटलें जातें. त्यांत कितपत अर्थ आहे हें वाचकांना सोदाहरण समजावून देण्याची कामगिरी या चरित्रांत वेणूबाईंनीं केली आहे.

स्त्रीशिक्षणाबद्दलची हरिभाऊंची आस्था लेखिकेनें विशेष आपुलकीनें मांडलेली आहे. हरिभाऊंनीं काशीताई कानिटकरांना " रंगराव " कादंबरी पूर्ण करण्या-बद्दल लिहिलेलें पत्र येथें सविस्तर देण्यांत आलेलें आहे. त्यावरूनहि हरिभाऊंच्या या गुणाची ओळख पटण्यासारखी आहे. जुन्या काळच्या स्त्रीचें—प्रेमळ, सुशील अशा पोक्त स्त्रीचें—पात्र म्हणून राधाबाईंच्या स्वभावलेखनाबद्दल विशेष कौतुक वाटल्यामुळें हरिभाऊंनीं बहीण म्हणून जोडलेल्या काशीबाईंना आग्रहाची विनंती करून लेखन करण्यास प्रवृत्त केल्याची नोंद या पत्रांत आहे. स्वतःच्या पत्नीला शिकवितांना हरिभाऊंची उडालेली तारांबळ येथें मोठ्या मनोरंजक रीतीनें व्यक्त झालेली दिसून येते.

हरिभाऊ स्वभावानें भावनाप्रधान होते. त्यांच्या या मनोरचनेची ओळख पटवितांना लेखिकेनें दिलेली माहिती हृदयाला जाऊन भिडण्याइतकी सरस वठलेली आहे. हरिभाऊंची एकुलती एक मुलगी ताई हिच्या मृत्यूच्या वेळचें दृश्य हृदयाला चटका लावणारें आहे.

लेखिकेची भाषा किती चटकदार आणि साधी, सोपी आहे, हेंहि कळून येण्यासारखें आहे.

याच चरित्राला जोडून लेखिकेनें हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचें जें रसग्रहण केलेलें आहे तें येथें चरित्राइतकें सरस झालेलें नाहीं. एक तर चरित्र सांगत असतांनाच मधून मधून बऱ्याच कादंबऱ्यांचा परामर्ष घेतला गेल्यानें पुन्हां

आणखी तेंच सांगण्याची गरज नव्हती आणि दुसरें म्हणजे इतकें सविस्तर परीक्षण देण्याचें हे स्थळ नव्हें. चरित्र म्हटलें कीं, ती विशिष्ट व्यक्ति वाचकाच्या डोळ्यासमोर ठेवणें इष्ट असते आणि त्यासाठीं त्या व्यक्तीच्या गुणदोषांची छाननी करतांना जरूर तेवढ्या तिच्या इतर छंदांचा उल्लेख केला म्हणजे बस्स होतो.

हरिभाऊंच्या सामाजिक थोरवीची कल्पना लेखिकेनें अतिशय हळूवारपण दिलेली असून त्यावरून हरिभाऊंच्या मनाचा मोठेपणा निश्चित रीतीनें दिसून येतो.

उच्च शिक्षण घेतलें असतांना देखील लेखिकेनें या पुस्तकाचें अंतरंग मराठीच्या साध्या पण ठसठशीत स्वभावाला अनुसरून रंगविलें आहे. ही विशेष अशी गोष्ट होय.

हरिभाऊंची योग्यता सांगतांना वेणूबाई लिहितात—

" कादंबरीकार या नात्यानें हरिभाऊंची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्यापूर्वी व नंतरहि त्यांच्यासारखा बुद्धिमान् बहुश्रुत रसिक व प्रतिभासंपन्न कादंबरीकार झाला नाहीं. इंग्रजी वाङ्मयाचें त्यांचें ज्ञान अत्युत्कृष्ट होतें. त्यांचा ग्रंथसंग्रह विपुल होता. कोणतेंहि नवीन पुस्तक प्रासिद्ध होवो, हरिभाऊ तें प्रथम विकत घेऊन वाचीत. त्यांना वाचनाचें खरोखरच व्यसन होतें. ते पदवीधर नसूनहि त्यांचें वाचन व अध्ययन शेंकडों पदवीधरांना लाजविण्यासारखें होतें...

हरिभाऊ श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मयसेवक होते...सार्वजनिक कार्याचें त्यांचें क्षेत्र विशाल होतें ... त्यांची देशभक्ति श्रेष्ठ दर्जाची होती. या सर्व गोष्टींत जरी ते थोर होते, तरी व्यक्ति म्हणून त्यांची योग्यता सर्वांत अधिक आहे. पुत्र, पति, पिता, आप्त, मित्र, नागरिक इत्यादि सर्व दृष्टींनीं त्यांनीं आपलें कर्तव्य उत्कृष्ट रीतीनें बजावलें आणि यांतच त्यांच्या जीवनाचें खरें रहस्य आहे."

● ● ●

दुर्गा भागवत

" राजारामशास्त्री भागवत" हा दुर्गा भागवत यांनीं लिहिलेला अगदीं अलिकडचा असा एक चरित्र ग्रंथ आहे. मराठी भाषेच्या निबंधकारांत मानाची वतनदारी चालविणाऱ्या एका थोर साहित्यिकाचा हा अल्पसा परिचय आहे, येथें खुद्द लेखिकेनें प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें—"हा परिचय, महाराष्ट्राचें लक्ष त्याच्या एका थोर पण विस्तृत विचारवंतांच्या वाङ्मयाकडे खेंचण्यास निमित्तमात्र होवो अशी माझी अपेक्षा आहे." शास्त्रीबुवांच्या परिचयापेक्षां त्यांच्या वाङ्मयाचाच येथें अधिक परिचय देण्यांत आलेला आहे. लेखिकेच्या डोळ्यापुढें या चरित्र नायकापेक्षां त्याचें वाङ्मयच प्रामुख्यानें होतें असें यावरून स्पष्ट दिसून येतें. या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत शास्त्रीबुवाविषयीं लेखिकेनें आणखी असें सांगितलें आहे कीं,

" दलितांच्या दु:खाबद्दल आत्यंतिक कळवळा, अज्ञानानें ओढवलेलें सर्व तऱ्हेचें दैन्य पाहून आलेला उद्वेग, रूढीच्या ढोंगामुळें उत्पन्न झालेल्या सामाजिक विकृतीबद्दल मनस्वी चीड आणि त्याबरोबरच जिवावाड श्रम आणि प्रयत्न केल्यास कधींतरी तांबडे फुटेल हा दुर्दम्य आशावाद, ह्या सर्वांचें मिश्रण होऊन शास्त्रीबोवांचें लिखाण तयार झालें. मी साहित्याचा, समाजाचा हमाल आहे, असें ते अत्यंत अभिमानानें सांगत. "

चरित्र वाचीत असतांना त्यांत चित्रित केलेली व्यक्ति प्रामुख्यानें नजरेंत भरावी लागते. वाचकाला त्या व्यक्तीचें जिवंत दर्शन घडविण्याचें श्रेय चरित्रकाराला आपल्या पदरांत पाडून घेण्याचें कौशल्य प्रकट करावयाचें असतें; आणि तसें होईल तरच त्या चरित्राचें खरें यशापयश मोजणें सोयीचें होईल. येथें दुर्गाबाईनीं शास्त्रीबोवांचें चरित्र कांहीं थोड्या आठवणींच्या रूपानें दिल्यानें त्यांत अपुरेपणा दिसून येतो. ज्या हेतूनें त्यांनीं ह्या लेखनाचा प्रयत्न केला तो हेतु एवढ्यावरून साध्य होत नाहीं, असें खेदानें म्हणावें लागतें. यापेक्षां शास्त्रीबोवांच्या अनेक आठवणी त्यांनीं एकत्र करून संपादिल्या असत्या, तर वरकरणी स्वभावानें अगदीं विचित्र वाटणारें परंतु अंत:करणानें प्रेमळ किंवा समाजासाठीं व आपल्या मराठी भाषेसाठीं जीवापाड धडपडणारे कष्टाळू शास्त्रीबोवा वाचकांच्या ओळखीचे झाले असते. माणसाच्या लेखनापेक्षां, कर्तबगारीपेक्षां, प्रत्यक्षांत तो कसा होता, कसा वागत होता, हेंच सर्वसामान्य वाचकाला पहायची उत्सुकता असते. परंतु त्याच गोष्टीला नेमका येथें बाद येतो.

दुर्गाबाईनीं दिलेल्या आठवणींत व जीवनकथेंत आलेली शास्त्रीबुवांची माहिती त्रोटक असली तरी आहे तेवढी जिव्हाळ्याने लिहिलेली असल्याची खात्री पटते.

राजारामशास्त्र्यांच्या लेखनाबद्दल सखोल अभ्यास करून त्यांच्या लेखनाची येथें दिलेली ओळख लेखिकेनें मोठ्या आत्मीयतेनें करून दिलेली आहे. संशोधनात्मक लेखन करणें हें लेखिकेच्या लेखनाचें प्रमुख अंग असल्यामुळें त्या दृष्टीनें या पुस्तकांची किंमत विशेष उल्लेखनीय अशी आहे.

सौ. विजयालक्ष्मी रड्डी

साहित्याचार्य हरि रामचंद्र दिवेकर एम्. ए., डी. लिट्. यांचें व्यक्तिचित्र आणि जीवनवृत्त विजयालक्ष्मी रड्डी यांनीं आपल्या " हरिहीरक " या ग्रंथांत विशद केलेलें आहे. अतिशय खेळीमेळीनें केलेलें चित्ताकर्षक लेखन हा या पुस्तकाचा प्रमुख विशेष आहे.

डॉ. दिवेकर म्हणजे उत्तम शिक्षक म्हणून नावाजलेली व्यक्ति. आजन्म शिक्षणक्षेत्रांत एखाद्या तपस्व्याच्या नात्यानेंच त्यांनीं आपली भूमिका पार पाडलेली.

अशा प्रकारचीं कितीतरी सुंदर शब्दचित्रें या ग्रंथांत रेखाटलेलीं दिसून येतात. डॉ. दिवेकरांच्या स्वभाववैशिष्ट्यांचीं अनेक उदाहरणें देऊन लेखिकेनें त्यांचें मूर्तिमंत चित्र वाचकांसमोर ठेवलेलें आहे असें दिसून येतें.

या पुस्तकाची भाषा अतिशय साधी व ओघवती आहे. तसेंच निवेदन पद्धतीहि घरगुती थाटाची आहे. त्यामुळें कित्येक ठिकाणीं वाक्यरचना विस्कळित झालेली दिसून येते. विचारांची प्रगल्भता अगर ते मांडण्याची वैशिष्ट्यपूर्ण अशी पांडित्य–प्रचुर पद्धति या पुस्तकांत फारशी कोठें आढळत नाहीं. सारे कांहीं साधेसुधें व घरगुतीच आहे. त्यामुळें हे दोष येथें गुणांच्या समुदायांत आपोआपच लुप्त होऊन गेलेले दिसतात. शिवाय खुद्द लेखिकेनेंच " हृद्गतांत " म्हटल्या-प्रमाणें " सूर्यास दाखविणारीं ही मशाल नव्हे–भक्तिभावानें ओवाळलेलें हें निरांजन आहे. " अशीच या पुस्तकाच्या लेखनाची भूमिका असल्यामुळें त्या दृष्टीनें पाहता लेखिका बरीच यशस्वी झालेली दिसून येते.

● ● ●

कु. सुलोचना देऊळगांवकर

अलिकडे विविध मासिकांतून निरनिराळ्या स्त्री पुरुषांचीं चरित्रें देण्यांत येतात. या चरित्रांचें स्वरूप आकारानें लहान असलें तरी माहितीच्या दृष्टीनें भरीव असतें. सुलोचना देऊळगांवकर यांनीं विविधप्रकारच्या स्त्रियांची कलात्मक चरित्रें लिहिलीं आहेत.

" निरलस समाज–सेविका "* सेवासदनाच्या लेडी सुपरिंटेंडेंट श्री. जानकीबाई ऊर्फ बनुताई भट यांच्या चरित्राची सुरवात सुलोचनाबाई यांनीं मोठी आकर्षक केली आहे. बनुताई भटांच्या जीवनाची कल्पना देतांना त्या सुरवातीलाच लिहितात––

" नयनरम्य व आकर्षक दिसणाऱ्या भव्य मंदिराचा आल्हाददायक कळस हा त्या मंदिराच्या पायांतील दगडापेक्षां जास्त महत्त्वाचा नसतो. हजारों दगड जेव्हां स्वतःला पायांत पुरून घेतात तेव्हांच कळस तयार होऊन जगाला मोहीत करतो. सेवामंदिराच्या बाबतींत असेंच म्हणावें लागतें. जेव्हां अनेक कष्टाळू, दीर्घोद्योगी व निःस्वार्थी कार्यकर्ते आपापल्या आजन्म सेवेनें अव्याहत कार्य करून स्वतःला त्याच कार्यांत गाडून घेतात. तेव्हां कुठें समाजाचें लक्ष

* स्त्री, जानेवारी १९४१.

वेधतें......त्यापैकीं एखादा " कोनशिला लेख " बनून बसतो. आणि त्या मंदिराचा जागता इतिहास जगाला सांगतो. आज अखिल भारतवर्षांत सर्वश्रुत असलेल्या पुणें येथील " सेवासदन " संस्थेच्या सेवामंदिराच्या पायांतील दगड बनून कोनशिला बनलेल्या एका जिवंत शिलेचा जीवनवृत्तांत सांगावासा वाटतो..."

घडतील तशा व्यक्तीच्या जीवनांतील प्रसंगाची नोंद न करतां लेकिकेनें आपल्या लेखणीला दिलेलें हें कलात्मक वळण चित्ताकर्षक आहे. अशीं कितीतरी चरित्रें लेखिकेनें लिहिलेलीं आहेत.

पुरुषांच्या मानानें स्त्रियांनीं चरित्रलेखन बरेंच कमी केलें आहे. शिवाय एकंदरीनें पाहतां आपल्याकडे वाङ्मयाची ही शाखा कांहींशी मर्यादितच आहे असें दिसून येतें. तेव्हां संख्येची बाजू सोडली व गुणाच्या बाजूकडे वळलें तर या वाङ्मय प्रांतांत स्त्रीची लेखणी पुरुषाच्या लेखणीच्या बरोबरीनें काम करूं शकते आहे असें दिसून येईल. भाषेमधील आदेश आणि बंडखोर चरित्र नायकाची निवड या बाबतींत स्त्रियांनीं केलेलें चरित्रलेखन एक वेळ पुरुषांच्या मानानें फिकें पडेल. तथापि चटकदार आणि जिहाळ्याची भाषा व घरगुती प्रसंगांची रमणीय गुंफण या बाबतींत मागील विभागांत आलेलें काशीबाई कानिटकरांचें " डॉ. आनंदीबाई जोशी " यांचें चरित्र अणुभरहि कमी प्रतीचें न ठरतां उलट थोडें फार कां होईना सरसच ठरेल. चरित्रलेखन हा वाङ्मयप्रकार अलिकडे आत्मनिष्ठ वाङ्मयांत मोडत असल्यामुळें त्यांचें मोजमाप हें चरित्रनायकाच्या व चरित्रकाराच्या एकमेकांच्या एकजीव झालेल्या धाग्यादोऱ्यांवरूनच करावें लागेल. भाषाशैली हा प्रत्येकाचा व्यक्तिगत गुण असूं शकतो, तेव्हां तो कांहीं येथें तुलनेनें पहाण्याची जरूरी नाहीं. प्रत्येक चरित्रकार हा चरित्रनायकाकडे आपल्या स्वतंत्र दृष्टिकोनांतूनच पहात असतो. त्यामुळें या त्याच्या विशिष्ट दृष्टिकोनावरच चरित्राचें यशापयश मोजण्यांत येतें. त्या दृष्टीनें स्त्रियांनीं लिहिलेलीं हीं चरित्रें सरस झालेलीं आहेत.

● ● ●

आत्मचरित्र

स्वतःच्या कर्तबगारीचा विकास घडवून आणण्यासाठीं माणूस जन्मभर सतत कांहीं ना कांहीं उद्योग करीत रहातो. आपलें इच्छित ध्येय गांठण्यासाठीं अविश्रांत श्रम घेत असतो. तथापि त्याच्याजवळची उमेद या कामीं खर्चीं पडत असतांना अधून मधून त्याच्या जीवनांत असे कांहीं प्रसंग उभे रहातात आणि असे कांहीं क्षण येऊन जातात कीं, त्या घटकेला त्याच्या नजरेंत त्याचें उभें जीवन उभें रहातें. अनंत आठवणी मनांत घोळत रहातात. स्वतःच्या कर्तबगारीची थोरवी ओंठांवर घोळूं लागते. इतरांच्या जीवनाशीं तोलून पहातां

आपलेंच जीवन आपण चांगलें घालविलें असा विचार मनांत डोकावतो. त्यामुळें माणसाला ह्या सर्वांचा स्वतःशींच आढावा घेतां यावा म्हणून विश्रांतीची गरज भासते. विशेषतः उतार वयांत ही जाणीव प्रभावानें होत रहाते. त्या कारणानें जिवाभावाचा असा कोणी ऐकणारा भेटला कीं, मग तो माणूस आपल्या जीवनांत जें घडून गेलें असेल त्यांतून आपली कर्तबगारी रसभरीतपणें सांगत रहातो. स्वतःबद्दल खरेखुरें बोलणें अशा वेळीं त्याला आवडतें. त्यामुळें या बोलण्याला एक प्रकारची चव येते. जीवनाला कळा आली आहे असें वाटूं लागतें आणि ह्या आत्मकथनानें सांगणारा व ऐकणारा मग सुखावतो, खुशालींत राहातो.

जी मंडळी विचारी असतात, लेखक असतात, समाजसेवक असतात, राजकारणी असतात, समाजांत नांव मिळविलेली असतात किंवा ज्यांना त्यांच्या कर्तबगारीमुळें समाजांत मोठें स्थान प्राप्त झालेलें असतें, अशा मंडळींना-लोकांना-आपल्या जीवनांतील प्रसंगांचें केवळ आत्मकथन करणें आवडत नाहीं. बोलण्याप्रमाणेंच ह्या स्मृतिचित्रांना लिखित करून ठेवण्याचा त्यांना मोह होतो. अनेक वाचकांचे कानीं व ध्यानींमनीं आपलें आत्मकथन जावें अशी त्यांची इच्छा असते. त्यामुळें या आत्मकथनाचें लेखनांत रूपांतर होतें व नंतर हा लेखनप्रकार आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारांत मोडला जातो. आत्मचरित्र म्हणूनच नंतर हें आत्मकथन लोकांच्या हातीं जातें.

त्यामुळें स्वतःविषयीं लिहिणें हा विषय जेवढा सुखदायी तेवढाच तो अवघडहि होऊन बसतो. कारण स्वतःबद्दल कांहीं वाईट साईट घडलेलें सांगणें लेखकाला स्वतःलाच पटत नाहीं आणि वाचकांची तर इच्छा होते कीं, ह्या माणसाबद्दल चांगलेंच ऐकायला मिळावें ! * त्या कारणानें लेखक मोठ्या दुहेरी कात्रींत सांपडतो व सांगण्यासारखें असेल तेवढ्याच आपल्या पराक्रमाच्या व वैभवाच्या गोष्टी आपल्या आत्मचरित्रांत सांगून मोकळा होतो. जुन्या काळच्या आठवणींच्या गुंफणींत दंग होऊन जातो. नव्या पिढीला आपलें वैशिष्ट्य सांगितलें या समाधानांत जगालाहि विसरूं पाहतो.

मानवाच्या जीवनांतील ह्या जुन्या आठवणी--आत्मचरित्र--वा आत्मकथन म्हणजे डॉ. कर्वे यांच्या आत्मवृत्तास लिहिलेल्या प्रस्तावांत म्हटल्याप्रमाणें

---

* " It is a hard and nice snbject for a man to write of himself; it grates his own heart to say anything of disparagement and the reader's ears to hear anything of praise for him."

—Abraham Cowley

(Jawaharlal Nehru : An Autobiography.)

"...मनुष्याच्या विचारांचे व कृतींचें व हुबेहूब काढलेलें चित्र. जणूं काय प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकार रूसो यानें लिहिल्याप्रमाणें जगाच्या शेवटच्या दिवशीं परमेश्वराला आपल्या सर्व जीवितावर जो निकाल द्यावयाचा असतो, त्याकरितां आपण दिलेली जबानी..."

ललित वाङ्मयाच्या आरंभींचें मागील प्रकरणामध्यें रमाबाई रानडे यांच्या "आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी" या आत्मचरित्रपर ग्रंथाचा विचार केलेला आहेच. प्रस्तुत प्रकरणांत लक्ष्मीबाई टिळक, पार्वतीबाई आठवले, आनंदीबाई कर्वे, लीलाबाई पटवर्धन, कमलाबाई देशपांडे आणि शांता आपटे यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांचा विचार करावयाचा आहे.

सामान्यतः आत्मचरित्रपर ग्रंथांमधें स्वतःविषयीं आणि त्या अनुषंगानें येणाऱ्या भोंवतालच्या जगाविषयींच प्रामुख्यानें माहिती आलेली असते. त्यामुळें स्वभाविकच स्त्रियांनीं लिहिलेल्या आणि पुरुषांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांतून त्यांच्या वैयक्तिक जीवनानुसार दिसून येणारा फरक मोठ्या उत्कटत्वानें वेगळा असलेला दिसून येतो.

स्त्रियांचा बहुतेक सारा वेळ आपल्या घरकामांत, मुलाबाळांच्या संगोपनांत घरधन्याच्या सेवेंत आणि क्वचित् प्रसंगीं पत्करलेल्या सामाजिक कामाच्या निमित्तानें घराबाहेरच्या जगांत जात असतो. त्यामुळें त्यांच्या जीवनक्षेत्राला एक प्रकारचा ठराविक आकार आलेला असतो. हें जीवनक्षेत्र पुरुषांच्या मानानें बरेंचसें मर्यादित असतें. त्यामुळें स्वाभाविकच याच एका मर्यादित जगाचे पडसाद स्त्रियांच्या आत्मचरित्रांत उमटलेले दिसून येतात.

आत्मचरित्र लिहित असतांना सर्व लेखक लेखिकांची मूळ बैठक एक असली तरी व्यक्ति तितक्या प्रकृति या सिद्धांताप्रमाणें त्यांच्या लेखनाचें वैशिष्ट्यहि निरनिराळें असलेलें दिसून येतें. कारण "प्रत्येकाच्या आयुष्याचें ध्येय वेगळें, तें ध्येय पार पाडण्यासाठीं लागणारीं साधनें वेगळीं, मार्ग वेगळे आणि त्यामुळें शेवटीं प्राप्त होणाऱ्या यशापयशाचें स्वरूप देखील वेगळें असतें."* त्यामुळें स्वाभाविकच प्रत्येकाच्या जीवनाविषयीं इतरांना कुतूहल वाटत असतें. तें कुतूहल पूर्ण करण्यासाठीं लेखकानें आपल्या आठवणींशीं अतिशय एकजीव झालें तरच तें लेखन प्रभावी ठरतें. नाहींतरी आपलें स्वतःचेंच प्रतिबिंब समोरच्या आरशांत पहात असतांना मनुष्य जेवढा दंग होऊन जातो तितका दुसऱ्याच्या चित्रानें खास होऊन जात नाहीं! आणि तसें असतें म्हणूनच आत्मचरित्र लिहित असतांन लेखकाला कमालीचा आनंद उपभोगतां येत असतो. आजपर्यंतच्या त्याच्या आयुष्यांत जें कांहीं बरेंवाईट घडून गेलें असेल तें सर्व काळाच्या पडद्यावर उमटलेलें

*साहित्यदर्शन पान १०२.

असतें. आपल्या जीवनाचा तो ठसा बघूनच लेखकाला आपल्या कर्तबगारीचे पवाडे गावेसे वाटतात.

● ● ●

पार्वतीबाई आठवले

" माझी कहाणी " (१९२८) या पुस्तकांत पार्वतीबाई आठवले यांनीं आपल्या घरगुती जीवनांतील व अमेरिकेच्या प्रवासांतील अनेक प्रसंग रंगवून आपली ओळख करून दिलेली आहे.

पार्वतीबाईचें शिक्षण हिंगण्याच्या स्त्रियांच्या संस्थेंत झालेलें आहे. कर्व्यांच्या आश्रमांत राहून त्यांनीं आयुष्याचें एक नवें दालन उघडलें. म्हणजे विधवेचें जीवन जगत असतांनाच स्वतःच्या पायावर उभें राहून आयुष्याला स्थैर्य येईल अशा प्रकारचें शिक्षण घेतलें.

तसें पाहिलें तर स्त्रीजीवनांतील विधवांची अवस्था मोठी कठीण असते. सामाजिक बंधनांनीं आणि परंपरेनें चालत आलेल्या रूढींनीं त्यांच्या भावनांची एवढी गळचेपी झालेली असते कीं, त्याची कल्पना त्यांच्याशिवाय इतर कोणालाहि तेवढ्या तीव्रतेनें जाणवूं नये ! स्वतःच्या भावनांना तर त्यांना पदोपदीं मुरड घालावी लागते. समाजामधील आपल्या या विशिष्ट अवस्थेमुळें प्रत्यक्ष वैधव्याचें दुःख देखील त्यांना त्यापेक्षां कमी वाटतें. त्यांची भाषा सोपी आहे. लेखन-शैलीहि चांगली आहे, पण त्यांत लालित्याच्या भागापेक्षां ओघानें येणारें भावनाविष्करणच अधिक झालेलें असल्यानें पुस्तक तितकेसें चटकदार वाटत नाहीं.

● ● ●

लक्ष्मीबाई टिळक

मराठी साहित्याला आपल्या लेखनानें वैभवाचे दिवस दाखविणारी एक अमासान्य व प्रतिभासंपन्न लेखिका म्हणून लक्ष्मीबाई टिळक यांचा परिचय जाणत्या मंडळींना झालेला आहे. त्यांच्या 'स्मृतिचित्रांनीं' (भाग १ ते ४) केवळ मराठी वाचकांचींच मनें जिंकलीं आहेत असें नव्हे तर या स्मृतिचित्रांनीं परभाषेंतहि आपलें स्थान राखलेलें आहे. फारसें शालेय शिक्षण न झालेल्या एका बाईच्या पुस्तकांचीं इतर भाषेंत भाषांतरें होऊं शकतात हा जसा लक्ष्मीबाई टिळकांच्या लेखनाचा चमत्कार आहे, तसाच आणखी एक अद्भुत चमत्कार

म्हणजे ह्या बाईंना नामवंत साहित्यिकांच्याकडून ' साहित्य लक्ष्मी ' असा मिळालेला किताब होय !

लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांना अनुभवांची भक्कम बैठक असून कलात्मक लेखन वैशिष्ट्यांची चोळी बांगडी मिळालेली आहे. त्यांची भाषा अगदीं साधी, खेळीमेळीची, घरांतली पण भारी धारदार आहे. ओघवती आहे. निश्चितपणानें कांहीं सांगण्याची धमक तिच्यांत आहे. आत्मविश्वासानें ती सर्वत्र वावरते आहे. त्यामुळें या स्मृतिचित्रांनीं अक्षर वाङ्मयाची मानाची जागा मिळविली आहे. सुसंस्कृत मराठी मनाची त्यांनीं अस्मिता सांगितलेली आहे. आणि म्हणूनच स्मृतिचित्रांच्या रूपानें लक्ष्मीबाई टिळकांनीं सांगितलेलें आपलें आत्मचरित्र मराठी सारस्वतांत आपल्या वैशिष्ट्यानें चमकूं शकतें आहे.

तसें पाहिलें तर लक्ष्मीबाई स्वतः फारशा शिकलेल्या नव्हत्या. पण अनुभवाच्या बळावर त्यांनीं आपलें ज्ञान फार मोठ्या प्रमाणांत वाढविलेलें होतें. त्यांना लहानपणापासूनच शिक्षणाची कधीं हौस नव्हती. श्री. टिळकांना मात्र त्यांनीं शिकावें असें मनापासून वाटत असे. पण टिळक म्हणतात म्हणून आपण शिकायला हवें असें लक्ष्मीबाईंना कधींच वाटलें नाहीं ! त्यांचा स्वभाव निराळा होता. स्वतःच्या व्यक्तित्वाची त्यांना जाणीव झालेली होती. रमाबाई रानड्यांप्रमाणें " असे पति देवचि ललनांना " असा त्यांचा मनोधर्म नव्हता. टिळकांचें कांहीं चुकलें तरी तसें धीटपणें बोलून दाखविण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली होती !

आत्मचरित्रामध्यें अत्यावश्यक असणारी गोष्ट म्हणजे सत्यकथन ही होय. दुसऱ्याचे बरेवाईट गुण मनुष्य सहज सुलभ रीतीनें सांगूं शकत असला, तरी स्वतःचे गुणदोष त्यास तितक्या सहजपणें सांगणें कठिण वाटतें; आणि आपल्या जीवनांतील निर्मळ सत्य सांगितलें नाहीं, तर आत्मचरित्राला यावा तसा जिवंतपणा येत नाहीं ! लक्ष्मीबाईंनीं आपल्या लेखनांत निर्मळ सत्यकथनाची तर खैरातच करून टाकलेली आहे. त्यामुळें त्यांचें लेखन विशेष प्रभावी झालेलें आहे. आपल्या आयुष्यांत जें जें घडलें तें तें सर्व लक्ष्मीबाईंनीं कसलाहि संकोच मनांत न बाळगतां अतिशय मोकळ्या मनानें लिहिलेलें आहे. तरी देखील अतिशयोक्तीचा वास त्यांच्या लेखनांत कोठेंहि आलेला नाहीं हें विशेष होय. आणि त्यांच्या अंगच्या या गुणामुळेंच त्यांना ' साहित्यलक्ष्मी " अशी बहुमानाची पदवी मिळालेली आहे.

लक्ष्मीबाईंचें शिक्षण घरगुतीच झालेलें होतें त्यामुळें सर्वसामान्य रीतीनें ज्या स्त्रीला ही शिकलेली बाई आहे, असें समजण्यांत येतें, तशी परिस्थिति लक्ष्मीबाईंच्या जीवनांत कधींच निर्माण झालेली नव्हती. उलट बाळबोध घराण्यांतील जुन्या काळच्या स्त्रीला शोभेल इतपतच केवळ कामापुरतें, लिहिण्या–वाचण्या इतकेंच, त्यांचें शिक्षण झालेलें. त्यामुळें स्वाभाविकच लक्ष्मीबाईंच्या विचारसरणीला परदेशी किंवा परभाषी वाङ्मयांतील विचारांचें मोह निर्माण करणारें वातावरण

बाधलेलें नाहीं. म्हणून त्यांच्या भोळ्या भाबड्या मनाला जें जें सांगावेसें वाटलें तें तें त्यांनीं आपल्या साध्याभोळ्या कल्पनेनें मनांत एकत्र केलें आणि तितक्याच साध्या रीतीनें लिखाणांतहि चितारलें. महात्मा गांधींच्या "सत्याचे प्रयोग' मध्यें आढळणारा मोकळेपणा आणि निर्भयता लक्ष्मीबाईंच्या लिखाणांतहि पानापानांवर आढळून येतो. त्यामुळेंच त्यांच्या जीविताचें हें चिरस्मरणीय प्रतिबिंब वाचणाराच्या अंत:करणाला जाऊन भिडतें.

खिस्ती धर्माकडे दिवसेंदिवस टिळकांच्या मनाचा कल झुकत चाललेला बघून लक्ष्मीबाईंच्या मनाची चलबिचल सुरू झाली. टिळकांच्या एकंदर वागणुकींतील फरक जाणवल्यानंतर तर त्यांचें मन अधिकच बेचैन झालें. असें कां घडावें हें त्यांना कळेना. त्यामुळें अशा वेळीं होणारी मनाची अस्वस्थता रंगवितांना लक्ष्मीबाई सांगतात:--

"टिळक आतांशीं रोज रात्रीं कोठें तरी जातात. पण कोठें हें कसें कळावें? त्यांच्या ह्या वर्तनाचा शोध कोण लावणार? घरवालीच्या मुलाला सांगावें तर तो मुलगा लहान. त्यालाहि टिळक रागाच्या भरांत मारायचे! तेव्हां एक दिवस मीं विचार केला कीं, स्वत:च त्याचा शोध लावायचा. एक दिवस दत्तूला खायला घालून निजविला होता. आमचें दोघांचें कशावरून तरी भांडण झाल्यानें रात्रीं नऊच्या सुमारास चुलीवर थालिपीठ चढलें होतें. टिळक बाहेर निघाले. जातांना मला म्हणाले, "मी खऱ्यांच्या घरीं जाऊन येतों." दार लावून घेतलें व दाराच्या फटींतून पाहूं लागलें. टिळक बुटाचा कर्र् कर्र् आवाज करीत खऱ्यांच्या बाजूला वळले. दहापंधरा पावलें गेल्यावर ते हळूंच मागें परतले व पाऊल न वाजवतां विरुद्ध दिशेला चोरट्या पावलांनीं चालूं लागले. चांदणें स्वच्छ पडलें होतें. थालिपीठाचें पातेलें तसेंच चुलीवर टाकून मीं घराचें दार सताड उघडलें व कांहीं अंतरावरून झपझप पावलें टाकीत टिळकांच्या मागोमाग चालूं लागलें. पण पुढें डोक्यांत आलें कीं, लोकांच्या घरीं शोभा होण्यापेक्षां दत्तू उठण्याच्या आंत घरीं गेलेलें बरें. तेव्हां त्यांना ऐकूं जाईल अशा बेतानें मी म्हणालें, "खऱ्यांचें घर मागेंच राहिलें. ही वाट त्यांच्या घराची नाहीं."

हें शब्द कानीं पडतांच टिळक मागें वळले. मीहि मुरुड कानोला खाल्ला. आतां आमची शर्यत सुरू झाली. मला पुढचा रस्ता दिसेनासा झाला. जमीन दुभंग होऊन मी आंत गडप होऊन जाईन तरी किती चांगलें होईल, असें मला झालें. मी घरीं पोंचलें व सैंपाक घरांत जाऊन आंतून कडी लावून घेतली.

टिळक येऊन दारावर धक्के देऊं लागले. मी दार उघडीना. शेवटीं दार मोडायचा बेतांत आलें तेव्हां मीं तें उघडलें. दार उघडतांच टिळकांनीं मला यथास्थित चोप दिला. तिकडे थालिपीठ रामरक्षा म्हणत होतें. शेवटीं राग शांत झाल्यावर दोघांनींहि थंडा फराळ केला.

दुसऱ्या दिवशीं माझी सुजलेली पाठ पाहून मात्र टिळकांचें मन अतिशय दुःखी झालें......"

आत्मचरित्रांमध्यें स्वभावलेखन ही एक महत्त्वाची गोष्ट असते. आपल्या स्वतःबरोबरच आपल्या पतीचा स्वभावहि प्रसंगानुसार कसकसा दिसून आला याचें वास्तवरीतीनें चित्रण करणें म्हणजे वास्तविक फार अवघड अशी कला आहे. पण या कलेंतहि लक्ष्मीबाईनीं कमालीचें यश मिळविलें आहे. रे. टिकळांची स्वभावरेखा तयार करीत असतांनाच त्यांच्या स्वभावांतील आणखी एक वैशिष्ट्य सागतांना लक्ष्मीबाई म्हणतात,

"....मला एक दिवस ते म्हणाले, "चल सोंगट्या खेळूं! सोंगट्या खेळतांना मला एक मोठा रोग जडत असे. तो म्हणजे हंसणें! टिळकांच्या अंगावर डाव उलटूं लागला कीं, ते चिडायचे! त्या दिवशीं खेळतां खेळतां माझी सरशी होऊं लागली. माझ्या हंसण्याचा आजार वाढूं लागला. टिळकांचा रागाचा पारा चढूं लागला. तसा माझा आजारहि बळावूं लागला व त्या दिवशीं त्या "आजारा" पायीं खरोखरच मृत्यूशीं गांठ पडण्याची वेळ आली होती. पण थोडक्यांत बचावलें.

सोंगट्या, पट, फासे थरथर कांपूं लागली. कांहींनीं तर खालील गटारांचा आश्रय केला. घातलेले बिछाने सैरावैरा धावूं लागले. सगळ्या सामानानें बंड पुकारलें. जागच्या जागीं कांहीं राहिलें असेल तर तें फक्त बायको नि दिवा! प्रकरण इतकें हातघाईवर आलें कीं, शेवटीं दिव्यानेंहि राम म्हटलें. आगपेटी केव्हांच पासोडीचा आसरा करून बिछान्याच्या ढिगाऱ्यांत तोंड लपवून बसली होती. तरी मला वाटत होती गंमत! मी आणखी जोरजोरानें हसूं लागलें.

आतां या युद्धकांडांतील शेवटचा भाग. जिन्याला नव्हतें दार! टिळकांनीं मला अंधारांत लोटलें.

मी जिन्यांतून "घालीन लोटांगण वंदीन चरण" करीत खालीं तबकडींत येऊन पडलें. टिळकांचा राग मावळला व माझें हास्य पळालें. टिळक घाबऱ्या घाबऱ्या आगपेटी शोधूं लागले. ती सापडेना. शेवटीं अंधारांतच चांचपडत ते खालीं आले व मला उठवून वर घेऊन गेले. मला तो सातवा महिना होता...."

लक्ष्मीबाईनीं टिळकांच्या स्वभावांतील अशा प्रकारें दर्शविलेल्या विविध छटा वाचीत असतांना टिळकांचें मूर्तिमंत चित्र वाचकांच्या नजरेसमोर उभें रहातें. स्वतःच्या कल्पना अंमलांत आणीत असतांना वाटेल त्या गोष्टींचा त्याग करणारे, मनानें शांत पण तितकेच करारीहि असणारे, वेळोवेळीं विसराळूपणाला जवळ करणारे, आपल्याच नादांत गुंगून रहाणारे, उदार मनाचे, हौशी आणि प्रेमळ असणारे टिळक लक्ष्मीबाईनीं मोठ्या हृदयंगम रीतीनें या पुस्तकांत

रेखाटलेले आहेत. त्यामुळें त्यांच्या लेखनाला एक प्रकारचा मूर्तिमंत जिवंतपणा लाभलेला आहे.

लक्ष्मीबाईंची भाषाशैली फारच सुरेख असून वाचणाराचे मनावर भुरळ पाडण्याचें विलक्षण सामर्थ्य त्यांच्या लेखणीनें कमावलेलें आहे. स्वतःच्या जीवनांत मनाची अस्वस्थता वाढविणारे अनेक प्रसंग आले असतांहि आपल्या विनोदी स्वभावाच्या बळावर लक्ष्मीबाई सहीसलामत त्या प्रसंगांतून बाहेर पडल्या आहेत असें त्यांच्या या लेखनावरून दिसून येतें. लक्ष्मीबाईंचें आयुष्य म्हणजेच एक विनोदाचा प्रचंड झरा आहे! विनोदाचा आश्रय करीत असतांनाच त्यांनीं आपल्या स्त्रीसुलभ भावनांचा आविष्कार किती तरी चित्तवेधक आणि सहजसुलभ रीतीनें केला आहे.

लक्ष्मीबाईंची भाषा साधी, सोपी, घरगुती, विनोदी व चटकदार असून त्यांची वाक्यरचनाहि सुटसुटीत व रेखीव आहे. मोजक्या शब्दांत उत्कृष्ट शब्द-चित्र रेखाटण्याचें त्यांचें वैशिष्ट्य कोणीहि हेवा करण्याइतकें अविस्मरणीय असून कलेच्या दृष्टीनेंहि त्यांच्या लेखनाचा थाट अपूर्व असाच आहे.

● ● ●

सौ. आनंदीबाई कर्वे

गु. अण्णासाहेब कर्वे यांच्या महिलाश्रमाला व इतर कार्यक्षेत्राला स्वतःच्या पराकोटीच्या कष्टानें कै. सौ. आनंदीबाईंनीं मदत केलेली असून त्यास आनंदभवनाचें स्वरूप प्राप्त करून दिलेलें आहे. ज्या बालकांना कोणीहि जवळ घेणार नाहीं अशा अनेक अनाथ मुलांचें संगोपन त्यांनीं मोठ्या हौसेनें केलेलें आहे. त्याचप्रमाणें परिस्थितीमुळें ज्यांच्या जीवनाचा विकास खुंटलेला होता, अशा अनेक अनाथ स्त्रियांनाहि त्यांनीं आश्रय देऊन त्यांच्या जीवनांत अर्थ निर्माण केलेला आहे. आपल्या या कामगिरीचें चित्रण त्यांनीं आपल्या "माझें पुराण" या आत्मचरित्रांत केलेलें दिसून येतें.

त्यावेळच्या समाजांत एखाद्या अस्पृश्यापेक्षांहि विधवा स्त्रियांची अवहेलना करण्यांत येत असे. तेव्हां अशा स्थितींत जिला धड माणुसकीनें देखील वागविलें जात नसे तिला स्वतःच्या मनाला विरंगुळा मिळावा म्हणून कोण शिकूं देणार होतें! आनंदीबाईंनीं विधवेचें जीवन कंठीत असतांना या परिस्थितीची झळ सोसलेली होती. पण त्यांच्या सुदैवानें त्यांना शिक्षण घेण्यासाठीं अनुकूल अशी परिस्थिति प्राप्त झाली होती.

● ● ●

श्रीमती गिरिजाबाई केळकर

जुन्या काळांतील एक नावाजलेल्या लेखिका म्हणून ज्यांचा गौरव मराठी मनानें आजवर केला त्या श्रीमती गिरिजाबाई केळकर यांनीं लिहिलेलें " द्रौपदीची थाळी " (१९५९) हें आत्मचरित्र अलिकडे प्रकाशित झालेलें आहे. हें आत्मचरित्र म्हणजे एका संसारी परंतु विद्याव्यासंगी अशा स्त्रीच्या जीवनाची सुंदर कहाणी सांगणारें पुस्तक आहे. इथें लेखिका अगदी घरगुती अशा गृहिणीच्या स्वाभाविक भूमिकेंतून सर्वत्र वावरत असून तिनें मोठ्या प्रामाणिकपणानें आपल्या आयुष्याचा आढावा घेतलेला आहे. आणखी हेंच या पुस्तकाचें प्रमुख वैशिष्ट्य होय.

संसारांत येणाऱ्या सुखदु:खांशीं तडफदार रीतीनें तोंड देत राहून सदा आनंदांत रहाण्यांतच कशी माणुसकी असते याची गोष्ट हें पुस्तक सांगत आहे. आपल्या घराची रहाणी साधीच परंतु उच्च दर्जाची ठेवून व आल्या-गेल्यासह सर्वांची आपुलकीनें व्यवस्था राखून घरांत नंदनवन निर्माण करण्याची स्वत: लेखिकेनें किती पराकाष्टा केली व पुढच्या पिढीला आपल्या वागणुकीनें कसा धडा दिला याचें हें एक सुंदर उदाहरण होय.

गिरिजाबाईंचें बाळपण श्रीमंतींत व वैभवांत गेलें होतें आणि सुदैवानें पतीच्या सान्निध्यांतील काळांत देखील श्रीमंतीचा व ऐश्वर्याचा त्यांनीं उपभोग घेतला, पण ह्या वैभवानें त्यांना भुरळ पाडली नाहीं. आपल्या समाधानांत इतरांनाहि समाधानी करावें या भावनेनेंच त्यांनीं समाजजीवन, संस्कृति व देश यासंबंधींचा विचार केला. त्याप्रमाणें वागणूक ठेवली आणि मुख्य म्हणजे गृहस्था-श्रमांतील गृहिणीचें कर्तव्यहि चोख बजावलें.

• • •

डॉ. कमलाबाई देशपांडे

अगदीं प्रौढ वयांत शिक्षण घेऊन आत्मचरित्रासारखें लेखन करणाऱ्या स्त्रियांचा काळ आणि कमलाबाई देशपांडे यांनीं प्रत्यक्ष शाळेंत जाऊन लहानपणींच शिक्षणास आरंभ केलेला काळ यांत बरीच तफावत असलेली दिसून येते. यावेळीं स्त्री–शिक्षणाची वाढ बऱ्याच प्रमाणांत झालेली होती. "मुलींसाठीं" स्वतंत्र शाळा स्थापन झालेल्या होत्या. मुलाच्या बरोबरीनें मुलीलाहि लहान वयांत शाळेंत धाडण्यास आरंभ झालेला होता.

कमलाबाईंना गृहिणीचें सौभाग्य फार थोडा काळ लाभलें. पण तेवढ्या अवधींतल्या स्वप्नवत् जीवनांतील पतीचीं पत्रें त्यांनीं " स्मरणसाखळींत " दिलेलीं

आहेत. हीं पत्रें मोठीं हृदयंगम असून त्यामध्यें श्री. देशपांडे यांनीं कमलाबाईंनीं अध्ययन व लेखन करावें असें वारंवार सुचविलेलें दिसून येतें हें विशेष होय.

नंतरच्या आयुष्यांत कमलाबाईंचें शिक्षण पुण्याच्या कर्वे महिलाश्रमांत झालें. त्यावेळच्या विद्यार्थी जीवनाची मोठी मनोरंजक हकीकत त्यांनीं दिलेली आहे.

एक उत्तम प्रकारच्या शब्दचित्रकार म्हणून कमलाबाई देशपांडे यांना साहित्यप्रेमी लोक ओळखतात. आपल्या सहजसुलभ शब्दसौष्ठत्वाच्या सहाय्या-मुळें वाचणाऱ्या लोकांच्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत चित्र उभें करण्याचें सामर्थ्य त्यांच्या लेखणींत आहे. हिंगण्याला काम करीत असतांना आपलें काम चोख व्हावें म्हणून त्यांनीं आपल्या एकुलत्या एका लहान मुलाला घरीं आईकडेच ठेविलें होतें. त्यावेळीं त्यांच्या मुलाची नेहमीं अशी इच्छा असावयाची कीं, आपल्या आईनें घरीं रहावें. पण तसें करणें कसें शक्य होत नसे, हें सांगतांना कमलाबाई मातृहृदयाचें किती सुंदर चित्र रंगवितात !

कमलाबाई देशपांडे म्हणजे साहित्यसम्राट या पदवीचा बहुमान मिळविलेल्या कै. तात्यासाहेब केळकरांच्या कन्या. त्यांच्या लहानपणापासून माहेरीं सारें साहित्य संमेलनासारखें वाङ्मयीन वातावरण. अर्थात् त्याचा परिणाम म्हणून म्हणा किंवा कमलाबाईंना अध्ययनाची आवड विशेष म्हणून म्हणा, त्या ज्यावेळीं शिकावयाला लागल्या आणि अखेरास पीएच्. डी. च्या पदवीसाठीं परदेशींहि जाऊन आल्या ! त्या सर्व कालांत तात्यासाहेबांच्या स्वभावाचें त्यांनीं काढलेलें चित्र खरोखरच हृदयंगम आहे. वडील या नात्यानें त्यांनीं कमलाबाईंना परदेशांत असतांना प्रकृतीची काळजी घेण्याबद्दल, शक्य तितक्या काटकसरीनें रहाण्याबद्दल आणि ठरलेल्या मुदतींत परत येण्याबद्दल लिहिलेलीं विविध पत्रें व कमलाबाईंचीं त्यांना आलेलीं उत्तरें विशेष उल्लेखनीय आहेत. विशेषत: अपेक्षेपेक्षांहि कमला-बाईंनीं विद्याभ्यासांत यश मिळविलें तेव्हां तात्यासाहेबांनीं त्यांचें जें कौतुक केलें आणि मग आणखींहि हवे तेवढे पैसे पाठविण्याची इच्छा दर्शविली, हा " स्मरणसांखळीं "तील भाग अतिशय जिव्हाळ्याचा आणि वात्सल्याचा निदर्शक असाच आहे.

कमलाबाईंच्या या आत्मचरित्रांत घरगुती जीवनापेक्षां त्यांच्या शालेय जीवनाचा व संस्थेच्या कार्यांचाच भाग अधिक आलेला असल्यामुळें इतर लेखिकांपेक्षां हें पुस्तक निराळें झालेलें आहे. कमलाबाईंची भाषा ओघवती आणि सोपी आहे व वर्णनशैलीहि चटकदार आहे. आत्मचरित्र लिहावयाचें या दृष्टीनें या पुस्तकाचें लेखन झालें नाहीं आणि ओघानें लिहितां लिहितां त्यास तसें स्वरूप आलें असें खुद्द लेखिकेनेंच सुरवातीच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे ! त्यामुळें या पुतकांतील बराचसा भाग, विशेषत: संस्थेच्या कार्याच्या आढाव्याचा भाग, कांहींसा रुक्ष झालेला आहे असें दिसून येईल.

लीलाबाई पटवर्धन

महाराष्ट्राचे प्रसिद्ध कवि कै. डॉ. माधवराव पटवर्धन ऊर्फ 'माधव ज्यूलियन' त्यांच्या सुविद्य पत्नी कै. लीलाबाई पटवर्धन यांनीं "आमचीं अकरा वर्षें" या आत्मचरित्रांत आपल्या वैवाहिक जीवनांतील आठवणी एकत्रित केलेल्या आहेत.

माधवराव पटवर्धनांनी "माधव ज्युलियन" हें नांव धारण केल्यामुळें बरेंच दिवस त्यांच्याबद्दल टीकात्मक कुतूहल निर्माण झालेलें होतें; आणि अशा स्थितींतच लीलाबाईंचें त्याच्याशीं लग्न झालें होतें ! खुद्द लीलाबाईंच्या मनांतहि या कुतुहलानें वादळ निर्माण केले होतें हें विशेष होय !

माधवरावांबरोबर कोल्हापुरास जाऊन स्वतंत्र संसार थाटल्यानंतर पतीबद्दलचे बरेच बरेवाईट अनुभव लीलाबाईंना भोगावे लागले होते. माधवराव स्वतः कवि असल्यामुळें कित्येकदां आपल्या काव्याच्या नादांतच ते गुंग होऊन जात ! बिचाऱ्या लीलाबाईंना मात्र त्यामुळें गुदमरून गेल्यासारखें होई.

माधवरावांच्या आणि लीलाबाईंच्या आवडीनिवडी फारच भिन्न असत. त्यांमुळें स्वाभाविकच त्या दोघांमध्यें वरचेवर वादविवादाचे प्रसंग निर्माण होत.

लीलाबाईंसारख्या पदवीधर गृहिणीनें भुताखेताबद्दल एवढी धास्ती मनांत बाळगावी याचें मोठें आश्चर्य त्यांचें आत्मचरित्र वाचतांना वाटतें ! स्त्री कितीहि शिकली तरी अशा बाबतींत तिच्या मनाची वाढ अद्याप झालेली नसते असें म्हणावें लागेल !! कदाचित् लीलाबाईंसारख्या स्त्रीच्या मनाच्या हळवेपणाचाहि हा परिणाम असणें शक्य आहे !

माधवरावांच्या स्वभाववैशिष्ट्यांची नोंद करीत असतांनाच लेखिकेनें त्यांच्या कितीतरी कवितांच्या रचनाकालांतील मोठी सुंदर हकीकत दिलेली असून असा पति आपणाला लाभल्याबद्दल धन्योद्‌गारहि काढलेले आहेत.

लीलाबाईंची भाषा सोपी असून त्यांच्या लेखनामागें त्यांच्या मनांत वसत असलेला एक प्रकारचा जबरदस्त जिव्हाळाहि दिसून येतो. तसेंच अधून मधून स्त्रीसुलभ भावनांचा त्यांनीं केलेला आविष्कारहि मनोरम आहे.

• • •

शांता आपटे

सीनेमा–सम्राज्ञी शांता आपटे यांनीं आपल्या "जाऊं मी सिनेमांत !" या आत्मचरित्रपर ग्रंथांत सिनेमा व्यवसायांत आलेल्या अनुभवावर मोठें क्रांतिकारक आणि बंडखोर विचार प्रकट केले आहेत. आजपर्यंत या सिनेमासृष्टीवर लिहिणारांनीं तेथें काम करणाऱ्या अवमानितांचीं दुःखें बोलकीं करून जगासमोर

मांडण्याचा फारसा प्रयत्न केलेला नव्हता. शांता आपटे यांची लेखणी या मुख्या दुःखांना ओजस्वी रीतीनें या पुस्तकांत वाचा फोडीत आहे. मालकशाहीचा जाचक आणि अन्यायी दण्डक धाब्यावर बसवून या सिनेमासृष्टींतील सम्राज्ञीनें येथें क्रांतीची घोषणा केलेली आहे ! शांताबाईचें हें धैर्य कौतुकास्पद आहे.

शांताबाईंनीं सिनेमासृष्टींतल्या प्रत्येक मुद्यावर अशी सडेतोड विचारसरणी मांडलेली आहे. या लेखनाच्या बुडाशीं जिव्हाळा आहे, तळमळ आहे. त्यामुळेंच त्यांची भाषा ओघवती असली तरी तीं कांहींशी तिखट आणि झोंबणारी झाली आहे ! स्वतःच्या घरगुती जीवनापेक्षां आपल्या व्यवसायाच्या जीवनाचें चित्रण करणारें आत्मचरित्रवजा लेखन या दृष्टीनें मागें आलेल्या सर्व आत्मचरित्रांपेक्षां शांताबाईच्या या पुस्तकाचें वैशिष्ट्य कांहीं वेगळेंच आहे, यांत शंका नाहीं.

या विविध आत्मचरित्रांचें हें स्वरूप लक्षांत घेतां एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेंत भरते; आणि ती म्हणजे स्त्रियांनीं हाताळलेल्या सर्व वाङ्मय प्रकारांमध्यें हा आत्मचरित्रांचाच भाग विशेष समृद्ध आहे ही होय. ह्या वाङ्मयप्रकारांत त्यांनीं आपलें अंतःकरण विशेष आपुलकीनें व जिव्हाळ्यानें प्रकट केलेलें आहे. त्यामुळें त्यास एक प्रकारचा जिवंतपणा आलेला आहे.

या निरनिराळ्या आत्मचरित्रांच्यामधून हिंदु संस्कृतीच्या घराघरांतून वावरणाऱ्या सुसंस्कृत घराण्यांचा जसा इतिहास आलेला आहे तसाच ज्या देशांत हीं घराणीं जगलीं आहेत व जगत आहेत त्या भारत देशाचेंहि वास्तवचित्र कांहीं प्रमाणांत का होईना येथें पहावयास सांपडतें. त्याचप्रमाणें या सर्व स्मृतिचित्रांतून वावरणाऱ्या व्यक्तींनीं भारत देशाच्या जडणघडणीच्या कारागिरींतून त्यास आज आलेलें वैभव प्राप्त करण्यासहि हातभार लावलेला आहे असें दिसून येईल. ह्या लेखनांतून आणखी एक प्रभावानें प्रकट झालेला गुण म्हणजे प्रीतिरसांनीं न्हाऊन निघालेली माणुसकी ही होय. शिवाय गेल्या शेंपाऊणशें वर्षांतील स्त्री-जीवनांत घडत आलेला बदल या लेखनांतून प्रामुख्यानें प्रकट झाला आहे हें लक्षांत घेण्याजोगें व महत्त्वाचें असें आणखी निराळेंच आहे.

स्त्रियांच्या या आत्मचरित्रलेखनांत प्रामुख्यानें घरगुती जीवनाचा सुंदर चित्रपट सत्यस्वरूपांत अवतीर्ण झालेला आहे. त्यांत कामापुरतें बाहेरचें जीवन आलें आहे. कमलाबाई देशपांडे किंवा शांता आपटे यांचें लेखन याला अपवाद ठरेल. कारण त्यांच्या जीवनाची दिशाच इतर लेखिकांपेक्षां निराळी आहे. तरीपण त्यांच्या लेखनांतहि स्त्रीस्वभावाला धरून जो जो आविष्कार झालेला आहे त्याची सर इतर प्रसंग लेखनास आलेली नाहीं !

श्री. तात्यासाहेब केळकर (जीवनयात्रा), माडखोलकर (दोन तपें), अण्णासाहेब कर्वे (आत्मवृत्त), मामा वरेरकर (माझा नाट्यसंसार) इत्यादि लेखकांनीं जीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत तीं प्रामुख्यानें त्यांच्या व्यवसायाला धरूनच

आहेत असें दिसतें. त्यांत कारणापुरताच घरगुती भाग आलेला असून त्यांचा मुख्य भर घराबाहेरच्या त्यांच्या जीवनावरच अधिक आहे. त्यांत सामाजिक जीवनाचा इतिहास आलेला नसून त्यांच्या वैयक्तिक कार्यक्षेत्राचाहि इतिहास आलेला आहे.

त्यामुळें त्यांच्या या लेखनास एक प्रकारचें वैयक्तिक स्वरूप प्राप्त झालें आहे ! पण स्त्रियांच्या या लेखनाचें तसें नाहीं. स्वतःबरोबरच त्यांना सामाजिक जीवनांचींहि मूल्यें लक्षांत घेऊन जगावें लागलें आहे. त्यामुळें त्यांच्या या प्रकारच्या लेखनाला विशालता प्राप्त झालेली आहे.

भाषेच्या दृष्टीनें या आत्मचरित्रांकडे पाहिलें तर असें दिसून येतें कीं, या लेखिकांची भाषा अतिशय ओघवती, घरगुती सहजसुलभ आणि चटकदार झालेली आहे. Charles M. Schwabs यांनीं म्हटल्याप्रमाणें या मनोरम भाषाशैली-मुळें प्रकट झालेलें व त्या त्या लेखिकेनें आविष्कृत केलेलें व्यक्तिमत्त्व हें " Personality is to a man, what perfume is to a flower " अशा प्रकारचें नितांत सुंदर आहे. या लेखिकांच्या भाषासौंदर्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण नमुना पहावयाचा असेल तर रमाबाई रानडे यांनीं आपल्या पतीविषयीं " स्वतः " असा केलेला उल्लेख, लक्ष्मीबाई टिळकांनीं श्री. टिळकांना " टिळक " म्हणून मारलेली हांक, आनंदीबाई कर्व्यांनीं अण्णासाहेब कर्व्यांचा " कर्वे " असा केलेला नाम-निर्देष, कमलाबाई देशपांडे यांचें " स्वप्नदर्शन " हा काव्यात्मक आविष्कार आणि लीलाबाई पटवर्धनांनीं सरळ " माधवराव " असा नांवानेंच केलेला माधव ज्यूलियनांचा उल्लेख लक्षांत घ्यावा लागेल. खरोखरच हा भाग त्या दृष्टीनें अतिशय चित्ताकर्षक झालेला आहे. कालाच्या ओघाबरोबरच स्त्रियांच्या मनाचा झालेला विकासहि या शब्दांनीं सूचित केलेला आहे. अशा वेळीं जिवंत वाङ्मय हें एखाद्या झुंबरांतील लोलकासारखें शुद्ध असतें आणि त्यामधून विविध रंगांच्या छटांमधून आयुष्याचें जिवंत प्रतिबिंब दृष्टीस पडतें असें म्हटलें, तर अतिशयोक्तीचें होणार नाहीं याची खात्री पटते.

स्त्रियांनीं हाताळलेला हा लेखनप्रकार निदान एवढ्यापुरता तरी, पुरुषांपेक्षां कांकणभर कां होईना सरस आहे, असें मागें पाहिलेल्या त्याच्या अंतरंगावरून म्हणावयास हरकत नाहीं. स्त्रीच्या लेखणीनें तिच्या भावनांचा केलेला हा आत्माविष्कार वैशिष्ट्यपूर्ण तसाच अभिमानास्पदहि झालेला आहे ! लक्ष्मीबाई टिळकांना " साहित्यलक्ष्मी " होण्याचा मान त्यांच्या " स्मृतिचित्रां " नींच मिळवून दिलेला आहे. मराठी सारस्वतावर एक अभिनव लेणें चढवून स्त्रियांनीं आपलें स्थान येथें वैशिष्ट्यपूर्ण राखलें आहे, यांत शंका नाहीं. जिवंत वाङ्मय निर्माण करावयास लागणारें सर्व प्रकारचें मानसिक स्वातंत्र्य स्त्रियांनीं हा कलाप्रकार हाताळतांना उपभोगलेलें असल्यामुळें त्यांच्या या कलाकृतींना 'अक्षर वाङ्मयाचें' स्वरूप प्राप्त झालेलें आहे ! वास्तव लेखनाचा एक नमुनेदार आदर्श म्हणून या

आत्मचरित्रांकडे अभिमानानें बोट दाखवितां येईल इतकें हें लेखन सर्व बाजूंनीं सरस झालेलें आहे यांत शंका नाहीं.

• • •

व्यक्तिरेखा-स्वभावचित्रें-शब्दचित्रें

एखाद्या व्यक्तीचें शब्दांच्या सहाय्यानें उठावदार चित्र रेखाटणें किंवा त्या व्यक्तीच्या स्वभावाला धरून तिला साजिवंत करणारें लेखन लिहिणें ही गोष्ट कांहींशी अवघड आहे. कारण स्वभावलेखनाची ही कला आत्मसात करावयाची म्हणजे त्या विशिष्ट व्यक्तीचा विशेष अभ्यास करून लहान लहान बारकाव्यांच्या-सह व ठळक गुणविशेषांसह त्या व्यक्तीस साकार करावयाची कला हाताळा-वयाची. ही कला ललित लेखन करणारांनीं संपादन केलेली असते व तिचा वापर कथा कादंबऱ्यांसाठीं त्यांनीं केलेलाहि असतो.

परंतु कांहीं लेखक जेव्हां केवळ या कलेच्या आधारावर व्यक्तिरेखांचें, स्वभावरेखांचें वा शब्द चित्रांचेंच तेवढें लेखन करतात, तेव्हां त्यांच्या लेखनास वाङ्मयांत एक वेगळें स्थान प्राप्त होतें. हा एक स्वतंत्र असा-लेखन प्रकार म्हणून ओळखला जातो.

ह्या प्रकारच्या लेखनासाठीं सूक्ष्म निरीक्षणाची व मानसशास्त्राच्या अभ्या-साची विशेष गरज असते. कारण जें शब्दचित्र लिहावयाचें अगर व्यक्तिरेखा निर्माण करावयाची ती एवढी सरस व्हावी लागते की, तिचा वाचतांक्षणीं वाचकाला साक्षात्कार व्हावा, तिचें दर्शन घडावें.

चरित्राप्रमाणेंच कथा, कादंबरी किंवा नाटक यांत येणारें स्वभावचित्र त्या व्यक्तीचें सर्वांगीण दर्शन घडविणारें असतें. कथा, नाटक किंवा कादंबरी हा एक मानवी जीवनाचा चित्रपट असतो. अनेक प्रकारचा मनुष्यस्वभाव येथें एकत्र होऊन ठळकपणें एकाच व्यक्तीच्या द्वारें आविष्कृत झालेला असतो. त्यासाठीं पुष्कळदां आपल्या पहाण्यांतील व्यक्ति नजरेसमोर ठेवून व तिच्या गुणावगुणांना अनुलक्षून तिचें नजरेंत भरणारें वैशिष्ट्य दाखविण्यासाठीं लेखक कल्पनाशक्तीचाहि वापर करीत असतो. स्वभावचित्रालाहि हीच गोष्ट लागू पडते. मात्र मागें म्हटल्याप्रमाणें स्वभावचित्र हें त्या व्यक्तीचें सर्वांगीण दर्शन घडविणारें नसतें, तर विशिष्ट गुणच ठळकपणें दिग्दर्शित करणारें असतें. इतर लेखनप्रकारांतून प्रसंगाप्रसंगांमधून व्यक्तीचा स्वभाव दाखविलेला असतो, तर स्वभावचित्रांत एखाद्या ठळक गुणांच्या अनुषंगानें प्रसंगांचा वापर थोडाफार केलेला असतो, इतकेंच. वभावचित्रांत ती विशिष्ट व्यक्ति आणि तिचीं ठळक स्वभाव वैशिष्ट्यें

यांनाच प्राधान्य असतें व त्या मानानें प्रसंग आणि वातावरण हीं दुय्यम स्थानीं आलेलीं असतात.

श्री. दिवेकरांनीं लिहिलेलीं स्वभावचित्रें प्रत्यक्ष व्यक्तिपरिचयाला व त्यांच्या स्वतंत्र दृष्टिकोणाला महत्त्व देऊन लिहिलीं गेलीं आहेत. श्री. घाटे यांच्या " कांहीं म्हातारे आणि एक म्हातारा " मधील स्वभावचित्रें त्या त्या व्यक्तींच्या सहवासांत असतांना त्यांना आलेल्या अनुभवांच्या छटांमधून प्रकट झालेलीं आहेत. श्री. माडखोलकरांच्या " माझे कांहीं आवडते लेखक " या पुस्तकांतील स्वभावचित्रें त्यांनीं त्या व्यक्तींच्या वाङ्मयीन परिचयावरून लिहिलीं आहेत. म्हणजे स्वभावचित्रांतहि सामान्यत: दोन भाग पाडतां येतील. पहिला भाग म्हणजे प्रत्यक्ष परिचयांतील व्यक्तींच्या व्यक्तिरेखा आणि दुसरा म्हणजे अवांतर माहिती मिळवून लिहिलेल्या व्यक्तिरेखा. मात्र या दोन्ही भागांमधूनहि लेखक त्या विशिष्ट व्यक्तींचें स्वभावलेखन आपल्या स्वत:च्या दृष्टीनें दिग्दर्शित करीत असतो हें मुख्यतः ध्यानांत व्यावयास हवें.

स्वभावचित्राचें लेखन करणाऱ्या लेखकाचें अनुभवाचें क्षेत्र व्यापक असावें लागतें, ही गोष्ट मान्य केल्यानंतर स्त्रियांनीं लिहिलेलीं स्वभावचित्रें त्या दृष्टीनें पडताळून पहाण्यासारखीं आहेत. " हंसरा निर्माल्य आणि चिमण्या ", " भिल्लिणीचीं बोरें " " व्यक्ति तितक्या प्रकृति " आणि " विद्युत्‌रेखा " हीं अनुक्रमें डॉ. कमलाबाई देशपांडे, शकुंतला परांजपे, प्रिं. सुलभा पाणंदीकर आणि सौ. मालती दांडेकर यांनीं लिहिलेलीं स्वभावचित्रांचीं पुस्तकें आहेत. अपवाद म्हणून कांहीं चारदोन स्वभावचित्रें सोडून दिलीं, तर या पुस्तकांमधील बहुतेक सारीं स्वभावचित्रें स्त्रियांचींच आहेत; आणि त्यांपैकीं बरीचशीं अगदीं निकटच्या परिचितांचींच आहेत.

सामान्यतः सर्व सामान्य स्त्रियांचें रोजचें जीवन हें प्रामुख्यानें घरामध्येंच जात असतें. म्हणजे तिचें क्षेत्र अगदीं मर्यादित असतें, हें उघड आहे. त्यामुळें स्त्रीचा ओढा स्त्रीजीवनाकडे व मुलांकडे विशेष असणें अगदीं स्वाभाविक आहे. घरचीं माणसें, आप्तेष्ट, इष्टमित्र, पैपाहुणे इत्यादींनींच स्त्रीचें मर्यादित जग व्यापून गेलेलें असतें. त्यांपैकीं बहुसंख्य स्त्रियाच तिच्या अगदीं निकटच्या सहवासांत आलेल्या असतात आणि त्यामुळेंच अशा पुस्तकांमधून स्त्रियांनीं लिहिलेलीं स्वभावचित्रेंहि स्त्रियांचींच अशीं बहुसंख्य आहेत. आपल्या ओळखीच्या जगांमधूनच स्त्रियांनीं हीं स्वभावचित्रें वेंचलेलीं असल्यामुळें तीं विशेष वास्तव झालेलीं आहेत. अर्थात् त्यांत कल्पनेला अजिबातच वाव नाहीं असें मात्र नाहीं. तथापि कल्पिता-पेक्षां वस्तुस्थिति रंगविण्याकडेच स्त्रीच्या मनाचा कल विशेष झुकलेला असतो. त्यामुळें कल्पनेच्या बळावर स्त्रीनें कितीहि लेखन करावयाचें म्हटलें तरी तिचा स्वभाव हा वस्तुनिष्ठ अधिक असतो. व्यावहारिक जीवनांतून ती फिरत असते व

म्हणूनन त्याचा परिणाम तिच्या लेखणीवर झाल्यावांचून रहात नाहीं. त्यामुळें एखादा दुसरा अपवाद सोडला तर स्त्रियांनीं लिहिलेल्या या लेखन प्रकारांत त्यांचें म्हणून खास असें वैशिष्ट्य दिसून येतें. तसेंच पुरुषांचें अनुकरण न करतांना त्यांनीं येथें स्त्री स्वभावाला धरूनच विचारहि केलेला असतो, हें या संदर्भात अवश्य लक्षांत घेण्याजोगे आहे.

डॉ. कमलाबाई देशपांडे

" हंसरा निर्माल्य आणि चिमण्या " या आपल्या पुस्तकांत डॉ. कमलाबाई देशपांडे यांनीं उतारवयांतील नऊ स्त्रियांचीं आणि पांच ते पंधरा या वयो-मर्यादेच्या दरम्यान असलेल्या, शालेय जीवन अनुभवणाऱ्या तेरा छोट्या मंडळींचीं स्वभावचित्रें रेखाटलेलीं आहेत. यांपैकीं बहुतेक सारीं स्वभावचित्रें लेखिकेच्या अगदीं जवळच्या मंडळींपैकीं असावींत असें त्यांच्या अंतरंगावरून म्हणावयास हरकत नाहीं. आपल्या नात्यांतील प्रौढ स्त्रियांचीं व हाताखालच्या विद्यार्थिनींचीं स्वभावचित्रें कमलाबाईंनीं येथें मोठ्या कुशलतेनें लिहिलेलीं आहेत.

कमलाबाईंनीं हीं स्वभावचित्रें अतिशय जिव्हाळ्यानें लिहिलीं असून हाच या पुस्तकाचा प्रमुख विशेष म्हणतां येईल. कमलाबाईंची भाषा साधी, सोपी व ओघवती असून विचाराची मांडणीहि सुटसुटीत आहे. अधून मधून सर्वत्र विनोदा-लाहि योग्य तो वाव मिळालेला आहे. व्यक्तीच्या वर्णनाबरोबरच तिच्या बोलण्या-चालण्यामधूनहि प्रकट होणारा तिचा स्वभाव येथें लेखिकेनें सहृदयतेनें दर्शविलेला आहे. मात्र हीं सर्व स्वभावचित्रें मध्यमवर्गातीलच आहेत असें त्यांच्या मुखवट्या-वरून दिसून येतें. आतिशय मोकळ्या आणि प्रसन्न वातावरणामधून या साऱ्या स्वभावचित्रांना लेखिकेनें रंगविलेलें असल्यामुळें तीं वाचीत असतांना अशीं माणसें फक्त मध्यमवर्गातच आढळूं शकतात कीं काय? किंवा एखाद्या ठराविक क्षेत्रांतील लोकांविषयींच अशा प्रकारचें लेखन करतां येतें कीं काय? अशी शंका मनांत डोकावल्याविना रहात नाहीं. त्यामुळें एकांगीपणाचा दोष या स्वभावचित्रांच्या वाट्याला आला, तर तो कमलाबाईंच्या लेखनाचा दोष होऊं शकत नाहीं. दोषच म्हणावयाचा झाला तर तो त्यांच्या अनुभवाच्या आणि अवलोकनाच्या मर्यादेचा म्हणतां येईल.

लहान मुलें म्हणजे देवाघरचीं फुलें असें समजतात. देवाघरच्या बागेंतील हीं टवटवीत दिसणारीं, आपला सुगंध सगळीकडे पसरून इतरांना समाधान देणारीं, हंसरीं, खोडकर, परंतु अंतःकरणानें निरागस, निष्पाप असलेलीं अशीं चालतीं

बोलतीं फुलें कमलाबाईंनीं रसिकांच्या हवालीं केलीं आहेत. तीं फारच आकर्षक झालीं आहेत, कमलाबाईंच्या लेखणीनें त्यांना असर केलें आहे.

अशा प्रकारच्या मनुष्यस्वभावाच्या विविध छटा दर्शविणारीं कितीतरी हृदयंगम शब्दचित्रें या पुस्तकांत आहेत. त्यांपैकीं प्रत्येकाची गोडी निराळी, प्रत्येकाचा थाट निराळा, प्रत्येकाची धाटणीहि निराळी. मात्र माळीण किंवा मोलकरीण असा एखादाच अपवाद सोडला तर या शब्दचित्रांचा मुखवटा एकजात शहरी थाटाचा दिसेल. मागें सांगितल्याप्रमाणें येथून तेथून सारें मध्यमवर्गाचें वातावरण येथें आढळून येईल. त्याचप्रमाणें स्त्रीच्या लेखणीचें खास वैशिष्ट्यहि 'लाडु आत्याबाई' व 'भीमकाका' मधील स्त्रियांच्या भोळ्याभाबड्या स्वभाव-लेखनावरून दिसून येईल.

सौ. मालती दांडेकर

"विद्युत्‌रेखा" हें सौ. मालतीबाई दांडेकर यांचें अशाच प्रकारचें पुस्तक आहे. यांत त्यांनीं एकूण पंचवीस तरुण स्त्रियांचीं स्वभावचित्रें रेखाटलेलीं आहेत. एखादें ठळक स्वभावचित्र रंगविण्याऐवजीं येथें त्यांनीं फक्त त्या त्या व्यक्तीचा थोडक्यांत स्वभावविशेष दाखविलेला आहे. एखादा ठराविक प्रसंग किंवा कल्पना घेऊन तेवढ्यावरच त्या व्यक्तीचा स्वभाव दिग्दर्शित करण्यापेक्षां त्या व्यक्तीच्या रोजच्या जीवनक्रमांतील हालचालीमधून व बोलण्यामधून तो व्यक्त झाला तर अधिक हृद्य होतो. परंतु थोड्या जागेंत अनेक व्यक्तींचा नामनिर्देश करण्याची इच्छा लेखिकेला अनिवार झाल्यानें या स्वभावरेखांना कांहींसें त्रोटक स्वरूप आलेलें आहे.

मालतीबाईंना स्त्री-जीवनाबद्दल अतिशय जिव्हाळा वाटतो. हें पुस्तक लिहितांना त्यांनीं आपली ही भूमिका पुढील शब्दांत व्यक्त केलेली आहे—"सारी सृष्टि अंधारलेली आहे व मेघमालांनीं आकाश काळें निळें झालें आहे. अशा वेळीं लखलखीत विद्युत्‌रेखा काळ्या ढगांतून प्रकटते, काजळलेली सृष्टि तिच्या तेजानें क्षणभर उजळते, डोळे दिपतात—लगेंच ती एखाद्या देवतेप्रमाणें गुप्त होते, पण पहाणाऱ्याचे मनावर ती उज्ज्वलरेखा कायमची कोरली जाते."

या पुस्तकाला प्रस्ताव लिहितांना साहित्यसम्राट कै. तात्यासाहेब केळकर यांनी म्हटलें आहे—"हीं इतकीं निरनिराळीं वर्णनें करतां येण्याइतकें स्त्री—स्वभावाचे नमुने रंगविण्याच्या लेखिकेच्या निरीक्षण शक्तीची म्हणजे स्वभावा-स्वभावांतील भेद सूक्ष्मपणें, मार्मिकपणें, ध्यानांत घेऊन प्रगट करण्याची, कला

खरोखर अभिनंदनीय वाटते. पुस्तकाची भाषा ही प्रसादयुक्त, ठसठशीत व उचित आहे. "

● ● ●

शकुंतला परांजपे

शकुंतला परांजपे यांनीं आपल्या " भिल्लिणीचीं बोरें " या पुस्तकांत अनेक स्वभावचित्रें रेखाटलेलीं आहेत. मनांत येईल तें अतिशय मोकळ्या मनानें लिहिणें हें शकुंतलाबाईंचें नेहमींचें वैशिष्ट्य याहि पुस्तकांत आढळतें. आपल्या वडिलांचें त्यांनीं " हरवलेली छत्री " आणि "घोडा गाडी " या दोन लेखांमधून रेखाटलेलें स्वभावचित्र खरोखरच फार सुंदर आहे.

" कोंकणांतली आजी "* हें स्वभावचित्र चित्रित करतांना तर शकुंतलाबाईंची लेखणी एखाद्या अल्लड तरुणीसारखी नटलेली दिसून येते. आजीच्या आयुष्यांतील वाटेल त्या गोष्टी त्यांनीं येथें स्पष्टपणें सांगून टाकल्या आहेत. त्यांच्या आजीचें हें शब्दचित्र फारच हृदयंगम आहे यांत शंका नाहीं. आपल्या आजीचें एक वैशिष्ट्य सांगतांना त्या म्हणतात—" ..... आम्ही कोंकणांत गेलों कीं प्रत्येकवेळीं आजी एकदां " रघुच्या " जन्माचें पुराण सांगे. " रघू " म्हणजे आप्पा. ते झाले ते पायाळू जन्मले. मूल रडलें नाहीं, हललें नाहीं; म्हणून मेलें असें वाटून सुइणीनें वारेसकट त्याला सुपांत ठेवून ती आजीचें करायला लागली. आजीनें मुलाची विचारपूस केली. सुईण म्हणाली " मुलगा आहे गो चांगला. सुरेख, पण मेलेला गो मेलेला. " पण आजी त्याला मरूं थोडाच देणार होती. " मेला कशान् ? कानपटांत देस चांगली आणि जाळ लाव त्या वारेला. गार पाणी औत डोस्कीवर ! " आणि खरोखरच तसें करतांच मुलग्यानें भोंकाड पसरलें...

● ● ●

प्रिं. सुलभा पाणंदीकर

" **व्यक्ति तितक्या प्रकृति** " (१९५८) या आपल्या पुस्तकांत सुलभा पाणंदीकरांनीं एकूण तेवीस शब्दचित्रें दिलीं असून त्यांचा लेखनकाल सतरा वर्षांचा असल्याचें प्रस्तावांत सांगितलेलें आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं या सर्व लेखनांत भरपूर विविधता आणण्याचाहि यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

---

* विविधवृत्त, दिवाळी अंक १९४८

सर्व थरांतील मानवांच्या स्वभावविशेषांबरोबरच पशुपक्ष्यांचे, झाडांचे व रहात्या घरांचेहि स्वभावविशेष लेखिकेनें येथें सारख्याच आत्मीयतेनें चितारलेले आहेत हें विशेष होय.

' शांताराम ' हा सुलभाबाईंच्या घरचा कामाचा गडी. त्याला आपल्या मोरे घराण्याचा भारी अभिमान. तसेंच ' रामा ' या शब्दाचाहि भारी राग. तर अशा या गड्याबद्दल आपुलकीनें लिहितांना लेखिका सांगतेः—

" त्याचं सगळं काम कलापूर्ण आणि अत्यंत हौसेनं केलेलं असतं. आणि त्याच्या जोडीला त्याची बालिश वृत्ति असते. स्वयंपाक घर, जेवण, घरांतल्या बाटल्या, भांडीं, कपाटांतल्या कपबशा नवीन नवीन धर्तींनं लावील; आणि तें काम करतां करतां पोरपणानं भांड्यांकडे बोलेल. एखाद्या मोठ्यां भांड्यास उद्देशून म्हणेल, ' काय रे जाड्या, तूं इथं कशाला आलास ? चल, तुझी जागा खालीं तिथं. ' ' या बाई, वर या अशा ' असं म्हणून उंच अशी बाटली फळी-वर ठेवील...

' **पुण्याचा तांगेवाला** ' देखील लेखिकेनें मोठ्या गंमतीनें चित्रित केलेला आहे. भरपूर वेळ जवळ असतो व करमणूकहि बरीचशी होते या कल्पनेनें तांग्यांत बसणाऱ्या सुलभाबाई तांगेवाल्याकडून अनेक प्रकारच्या संसारांतील गंमतीजंमतीहि ऐकायला मिळतात असें मोठ्या गमतीनें व सोदाहरण सांगतात.

● ● ●

स्त्रियांनीं लिहिलेल्या स्वभावचित्रांचें स्वरूप हें असें आहे. आत्मचरित्रा-इतक्याच ह्याहि लेखनप्रकारांत स्त्रियांची लेखणी यशस्वी झालेली आहे. पुष्कळ दिवस अनुभविलेले, डोळ्यांनीं पाहिलेलें, बुद्धीनें आत्मसात् केलेलें आणि त्यामुळें जिव्हाळ्यानें लिहून चित्ताकर्षक बनलेलें असें या वाङ्मयाचें एकंदर स्वरूप आहे. जिव्हाळ्याबरोबरच सहानुभूति देखील या स्वभावचित्रांना लाभलेली आहे.

या स्त्रियांप्रमाणेंच कांहीं पुरुषांनींहि या प्रांतांत लेखन केलेलें आहे. श्री. विठ्ठलराव घाटे, श्री. व्यंकटेश माडगूळकर, श्री. गोपीनाथ तळवलकर, श्री. रघुवीर सामंत इत्यादींनीं अनेक स्वभावचित्रें रेखाटलेलीं आहेत. या लेखिका आणि हे लेखक यांच्यांत उघड असा दिसणारा पहिला फरक म्हणजे स्त्रियांनीं स्त्रियांचींच स्वभावचित्रें प्रामुख्यानें रेखाटलीं आहेत आणि पुरुषांचा कल पुरुषांचींच स्वभावचित्रें रेखाटण्याकडे प्रामुख्यानें झुकलेला आहे हा होय.

स्वभावचित्राला विषय होणाऱ्या व्यक्तींचा सहवास लेखकाला जितका घडेल तितके त्याचे स्वभावविशेष टिपून घेणें त्याला सोपें जातें. कारण त्या

सहवासाच्या बळावरच अमुक एक व्यक्ति अविस्मरणीय म्हणून त्याच्या नजरेंत भरत असते. आणि या बाबतींत प्रत्येकाचें मत भिन्न असणें स्वाभाविक आहे. पुरुष हा पुरुषाच्याच सहवासांत अधिक काळ घालवूं शकतो व तितक्या प्रमाणांत स्त्रीचा सहवास त्यास घडणें शक्य नसतें. घराबाहेरचेंच जीवन पुरुषाला अधिक जगावें लागत असल्यानें हा फरक होणें स्वाभाविक आहे. याच्या अगदीं उलट स्थिति स्त्रीची होते. याबद्दल लिहितांना " विद्युत्‌रेखें "त सौ. मालती दांडेकर म्हणतात, " अविस्मरणीय व्यक्ति फक्त स्त्रियाच असतात असें कसें होईल ? पण स्त्रीजीवनाचीच व्यापक सृष्टि आजवर मी पहात आलें म्हणून या सर्व रेखा मीं त्यांतून निवडल्या आहेत. " आणि मला वाटतें कीं, प्रत्येकाच्या बाबतींत हेंच उत्तर मान्य करावयास हरकत नसावी.

वास्तविक लेखनकौशल्याच्या दृष्टीनें हीं सारींच पुस्तकें एकमेकांना हार जाणार नाहींत इतकीं सरस आहेत. पण या लेखनप्रकाराला मुळांतच लागणारी अनुभवाची बैठक भिन्न असल्यानें उघड उघड फरक पडलेला दिसून येत आहे. स्त्रियांच्या बहुतेक सर्व स्वभावचित्रांमधून घरगुती वातावरण फारच चांगलें आलेलें आहे. जुन्या चालीरीतींचा भरपूर संगम येथें झालेला दिसून येईल. स्त्री आणि पुरुष यांच्यावरील भिन्न भिन्न जबाबदाऱ्या आणि निसर्गानें त्यांच्यावर सोंपविलेली कामगिरी यांच्यामधील परस्परांतील भिन्नता या स्त्री-पुरुषांच्या लेखनांतहि आढळून येत आहे. आणि त्याचें प्रमुख कारण म्हणजे प्रत्येकाची अनुभवाची मर्यादित कक्षा हें होय.

स्त्रियांनीं अशा प्रकारचें हें वैशिष्ट्यपूर्ण व सुंदर वाङ्मय निर्माण करून मराठीची साहित्यसेवा खरोखरच फार चांगली केलेली आहे. तसें झालें नसतें, तर स्त्री-जीवनाची एवढी ही सुरेख बाजू विनाकारण अंधारांत राहिली असती व मराठी साहित्याची हानी झाली असती, असें म्हणावयास हरकत नाहीं. स्त्रियांचा विशिष्ट स्वभाव, मनाचा कल, चालीरीति आणि घरगुती वातावरण इत्यादि या सर्वांची पारख पुरुषांपेक्षां केव्हांहि स्त्रियांनाच अधिक असणें स्वाभाविक आहे. त्यामुळेंच स्त्रियांना पुरुषांच्या व्यक्तिरेखा कांहीं थोडे अपवाद सोडले, तर म्हणाव्या तेवढ्या विशेषत्वानें लिहितां आलेल्या नाहींत.

• • •

प्रवास वर्णन

आपल्या नेहमींच्या वास्तव्याची जागा सोडून माणूस परक्या ठिकाणीं प्रवासाला गेला म्हणजे त्या नव्या ठिकाणची हकीकत वर्णन करून घरच्या लोकांना व इष्टमित्रांना कळवीत असतो; किंवा ती निदान लिहून तरी काढीत असतो.

प्रवास वर्णनाची ही पद्धति मराठींत फार जुन्या काळापासून रूढ झालेली असून संस्कृतांतहि ती आढळून येते. संस्कृतांतील उत्तमोत्तम ग्रंथांतून सुंदर रीतीनें वर्णन केलेलीं प्रवास वर्णनें आढळून येतात.

मराठींतील या लोकप्रिय लेखन प्रकारावरून लेखकाच्या मनोवृत्तीची, सूक्ष्म निरीक्षणाची, कल्पनाशक्तीची आणि वर्णनशैलीची माहिती मिळते. लेखकाचा दर्जा लक्षांत येतो. या सर्व कसोट्यांना उतरलेलीं प्रवास वर्णनें मराठींत पुष्कळशीं आहेत. लघुनिबंधांच्याप्रमाणें व आत्मचरित्रांच्याप्रमाणें याहि लेखन प्रकारांत लेखक जिव्हाळ्यानें विचार करीत असलेला व वर्णित विषयांशीं एकजीव झालेला दिसून येतो आहे.

याहि वाङ्मयीन क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें नसलें तरी बरेंचसें यशस्वी लेखन स्त्रियांनीं मराठींत केलेलें आहे. त्यांचेपैकीं कांहीनीं या संदर्भात स्फुटलेखन केलेलें आहे तर कांहींनीं ग्रंथलेखनहि केलेलें आहे.

स्त्रियांनीं लिहिलेलेलीं हीं प्रवास वर्णनें जेवढीं काश्मीरच्या नंदनवनांत विसावलीं आहेत तेवढींच ती परदेशच्या वातावरणांतहि पोसलीं आहेत.

परदेशच्या प्रवासाचें स्फुट लेखन **पिरोजबाई आनंदकरांनीं** केलेलें आहे. त्यांच्या या लेखनांत आपल्या देशांतील परिस्थितीची परदेशांतील चालीरीतींशीं तुलना आलेली असून त्यांच्याकडून घेण्यासारख्या गोष्टी काय आहेत, याची सुंदर माहिती आलेली आहे.

" युरोपच्या अंतरंगांत " या पुस्तकांत **सौ. सरोजिनी देशपांडे** यांनीं अतिशय चटकदार असें प्रवासवर्णन दिलेलें आहे. या प्रवासवर्णनासाठीं त्यांनीं कौशल्यानें " रोजनिशी " चा आणि " खाजगी पत्रव्यवहाराचा " उपयोग केलेला आहे.

युरोपला जायला निघतांना त्यांच्या मनाला काय वाटलें याची हकीकत देतांना त्या लिहितात–

" सर्वांचे पुन्हां निरोप घेतले...बरोबर एक वाजतां भोंगा झाला. काळजाचें कसें पाणी करीत होता तो आवाज. जहाजानें आपल्या माणसापासून विभक्त केलें आम्हांला. मुंबईचा किनारा दिसेपर्यंत बघत होतों आम्ही सारखें. चारपांच दिवस जमीन दिसणार नाहीं म्हणून व माणसें सुटलीं म्हणून जीव घाबरत होता सारखा."

लेखिकेची भाषाशैली व वर्णनशैली आकर्षक असून वर दिलेल्या उदाहरणांप्रमाणें मधून मधून तिच्या स्त्रीसुलभ भावनांचें झालेलें आविष्करणहि उल्लेखनीय आहे. कल्पनाशक्तीचा वापर मात्र लेखिकेनें फारच थोड्या प्रमाणांत केलेला दिसून येतो.

मुंबईच्या कामगार क्षेत्रांतील कार्यकर्त्या **कृष्णाबाई वाघ** यांनी " माझें

नागलोकीं उड्डाण ” + या लेखमालेंतून आपल्या परदेशच्या प्रवासाचें वर्णन केलेलें आहे.

लंडनमधील जागेची टंचाई वर्णन करतांना एका गृहिणीनें आपलें लहानगें बाळ सूट–केसमध्यें झोंपवल्याची हकीकत लेखिकेनें फार मजेनें वर्णन केलेली आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या विमानतळांवरील त्यांनीं दिलेली हकीकतहि मनोरंजक आहे.

कॅनिडियन समाजांतील वाखाणण्यासारख्या चालीरीतींचा कृष्णाबाईंनीं केलेला उल्लेखहि मोठा अनुकरणीय आहे. मॉंट्रियालमधील प्रेक्षणीय स्थळें आणि सभेचें कामकाज यांचा उल्लेखहि लेखिकेनें सहृदयतेनें केलेला दिसून येतो.

हिंदी स्त्रीजीवनाबद्दल उत्सुकतेनें प्रश्न विचारणाऱ्या युरोपियन महिलांना समाधानकारक उत्तरें देतांना लेखिकेनें त्यांच्या गृहजीवनाचेंहि मोठें मार्मिक विवेचन केलेलें आहे.

कृष्णाबाईंचें हें प्रवासवर्णन सुंदर झालेलें आहे. त्यांची वर्णनशैली व भाषाशैली आकर्षक असून त्यांनीं मोठ्या चिकित्सेनें सर्व विवेचन केलेलें आहे. अधून मधून त्यांनीं केलेला स्त्रीसुलभ असा भावनाविष्कारहि चित्ताकर्षक आहे.

‘ गृहलक्ष्मी ’च्या अंकांतून **रमाबाई परांजपे** यांनीं आपल्या काश्मीरच्या प्रवासाची हकीकत दिलेली आहे. त्यांची वर्णनशैली फारशी आकर्षक नसल्यामुळें हें प्रवासवृत्त तितकेंसें चित्तवेधक झालेलें नाहीं. तथापि त्यांनीं काश्मीरच्या प्रवासांतील स्थळांची व स्थलवैशिष्ट्यांची दिलेली माहिती उद्बोधक आहे. उदाहरण म्हणून काश्मीरच्या वैशिष्ट्यांची त्यांनीं दिलेली पुढील माहिती पहातां येईल–

“ ...येथल्या शालीवर केलेलें नक्षीकाम हातानें केलेलें. सर्व काम फार अप्रतीम असतें. शालीच्या गरम कापडाला “ पश्मीना ” म्हणतात. पश्मीना कमीजास्त दर्जाचा व किंमतीचा असतो. उंची पश्मीन्यास “ तापता ” असें नांव आहे. तो पंचवीस रुपये वार मिळतो...हें सर्व कापड हातमागावरील असतें...काम फार मेहनतीचें व सुंदर असतें....”

काश्मीरकडील स्त्रियांचें सामाजिक जीवन रंगवितांना लेखिकेनें त्यांच्याकडून मिळविलेलें अस्वच्छ रहाणीचें कारण मोठें मर्मभेदक असून काळजाला हात घालणारें आहे. “ बाईजी, आम्ही सर्व जर अशा स्वच्छ रहावयास लागलों तर आम्हांला सर्व लोक ही वाईट चालीची आहे असें समजून आम्हांला घरांतून बाहेर घालवितील व नवरा खूप मारील ! ” किती विचित्र हें कारण ! आणि माणुसकीचा संदेश जगाला पोंचविणाऱ्या भारताच्या नंदनवनांतील स्त्रीहृदयाची केवढी ही कुंचबणा !

+ स्त्री, मे १९४७ ते ऑक्टोबर १९४७.

" त्रिवेंद्रमची सफर " हें **कमला फडके** यांचें प्रवासवर्णन त्यांच्या इतर कोणत्याहि प्रकारच्या लेखनापेक्षां चित्ताकर्षक झालेलें आहे. हें पुस्तक वाचीत असतांना एखादी चित्तवेधक कादंबरी वाचल्याचें समाधान मिळतें. प्रा. फडक्यांच्या " कमलपत्रां "ची आठवण यावेळीं झाल्याविना रहात नाहीं. तसेंच तात्यासाहेब केळकरांच्या " सिमला वर्णना "ची किंवा काणेकरांच्या " धुक्यांतून लालतान्याकडे " या प्रवास वर्णनाचीहि स्मृति या पुस्तकाच्या वेळीं नकळत व्हावयास लागते, इतकें हें पुस्तक मनोवेधक व सर्वांग परिपूर्ण झालेलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

मदुरेच्या 'मीनाक्षी'च्या देवालयांतील मीनाक्षीच्या मूर्तीला तीन स्तन कां आहेत याची कमलाबाईंनीं चौकस वृत्तीनें मिळवून दिलेली पौराणिक माहिती मोठी चित्तवेधक आहे. त्याचप्रमाणें उत्तर गोपुराकडील प्रवेश-द्वारांतील संगीतमय खांबांची माहितीहि आकर्षक आहे.

निसर्गाची कितीतरी सुंदर चित्रें या पुस्तकांत लेखिकेनें सहृदयतेनें वर्णन केलेलीं आहेत. तसेंच प्रसिद्ध नृत्यकलाकार उदय शंकर यांच्या नृत्याच्या शिकवणुकीची व प्रत्यक्ष नृत्याचीं चित्तवेधक वर्णनेंहि येथें दिलेलीं आहेत.

प्रत्येक स्थळ, देखावा किंवा व्यक्ति जशीच्या तशी डोळ्यासमोर उभी करण्याचें सामर्थ्य कमलाबाईंच्या लेखणीनें पानापानांवर प्रकट केलेलें आहे. त्यांचें सूक्ष्म निरीक्षण, जिज्ञासू वृत्ति आणि मधून मधून त्यांनीं केलेला स्वतःच्या वेषभूषेचा उल्लेख मनोहर आहे. अखेरीस एक स्त्री या नात्यानें त्यांनीं काढलेले पुढील उद्गार या पुस्तकाच्या या वैशिष्ट्यांत भर घालणारे व वैशिष्ट्यपूर्णहि आहेतः—

" आम्ही ता. २८ डिसेंबर रोजीं रात्रीं अकराला घरीं पोंचलों. तेव्हां बेबी रोहिणी निजली होती. पण मी तिला मुद्दाम उठवून जवळ घेतलं. माझी कल्पना होती कीं, आम्हांला पाहून तिला आनंद होईल. पण ती अशा कांहीं बावरलेल्या दृष्टीनं आमच्याकडे पाहूं लागली कीं, गेल्या दहाबारा दिवसांत आम्ही तिच्या दृष्टीस न पडल्यामुळं आम्ही कायमचेच खतम् झालों असं जणूं तिनं ठरवलं होतं व आम्ही पुढें आहोंत हें तिला खरंच वाटत नव्हतं. पण नंतर चार पांच मिनिटांतच तिची नजर पालटली व ती हंसून आम्हांला बिलगली. हें पाहतांना मला जो आनंद झाला तो साऱ्या प्रवासाच्या आनंदाहून जास्त होता." ......

कमलाबाईंची प्रवासवृत्त कथन करण्याची ही शैली मोठी अपूर्व आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं मधून मधून रंगविलेले हास्यकारक प्रसंग, संगीत-नृत्यादि कलांतील निष्णात कलावंतांचीं वर्णनें, विविध प्रकारचीं आकर्षक व्यक्तिचित्रें आणि

स्वतःच्या व आपल्या अप्पांचा चित्रित केलेला स्वभावविशेष इत्यादि पाहिलें म्हणजे त्यांच्या लेखनशैलीचेंहि वैशिष्ट्य ठळकपणें नजरेंत भरतें.

सोलापूरच्या एक तपस्विनी व विचारवंत समाज कार्यकर्त्या **पंडिता सुमतिबाई शहा** यांनीं मराठींत बरेंचसें लेखन केलेलें नसलें तरी जें थोडें फार लेखन केलें आहे तें मौलिक आहे. त्यांच्या विचारांना आध्यात्माची बैठक आहे. वैचारिक जीवनाची पार्श्वभूमि आहे आणि सुविचारांची संगत आहे. त्यामुळें त्यांचें लेखन एकदम उठून दिसतें. निराळें वाटतें. धार्मिक भावनांशीं निगडित असलें तरीहि तें मोठें सुंदर व आकर्षक असें आढळून येतें.

त्यांच्या ' हृद्‌गंधां ' तील (१९५५) गौरीशंकराचें प्रवासांतील वर्णन या संदर्भांत अवश्य पहाण्यासरखें आहे.

मुंबईच्या एक प्राध्यापिका, समाजसेविका लेखिका डॉ. **चारुशीला गुप्ते** यांनीं लिहिलेलें ' बर्फाच्या दुनियेंत ' हें प्रवास वर्णन मोठें वाचनीय आहे. सैंपाकघरांतल्या षड्रसयुक्त साहित्यापासून तों महाविद्यालयांतील नवरसयुक्त साहित्यापर्यंत सर्वच विषयांत चांगल्या गतीनें वावरणाऱ्या चारुशीलाबाईनीं या प्रवासवर्णनांतहि मोठा चांगला रस निर्माण केलेला आहे.

कारण रशियाच्या प्रवासांतील अनुभव ज्या शैलीनें चारुशीलाबाईनीं सांगितलेले आहेत ती त्यांची शैली विनोद तर निर्माण करतेच, परंतु ती विशेष काव्यमयहि झालेली आहे. खेरीज स्त्रीजीवनाला शोभेल अशी उपमादृष्टांतांची खैरात त्यांनीं अधून मधून केल्यामुळें त्यांच्या लेखनाला मोठें चांगलें आकर्षण प्राप्त झालेलें आहे.

चारुशीलाबाईंच्या या प्रवासवर्णनांत कुशल लघुनिबंधकाराचे अनेक गुण आहेत, तसेच साहित्य गुणांचा सुगंधहि येथें सर्वत्र दरवळतो आहे. त्यांची दृष्टि येथें चौकसतेनें व रसिकतेनें वावरते आहे. त्यामुळें त्यांचें प्रवासवर्णन वाचतांना तों तो विशिष्ट असा परदेशचा भाग साइन संगीत नजरेंत भरतो व हेंच या पुस्तकाचें वैशिष्ट्य होय.

पुरुष मंडळी आठवणी सांगायला लागली म्हणजे बहुतेक विशिष्ट स्थळ काळांतील कांहीं ठराविक गोष्टींचाच तेवढा उल्लेख करतात. परंतु याच्या उलट स्त्रियांचेकडून घडतें. त्यांना कित्येक वर्षांपूर्वींच्या बहुतेक सर्व गोष्टी तपशिलांसह आठवतात. त्यामुळें त्यांच्या अशा आठवणींच्या वर्णनांत स्त्री-सुलभ असा नित्य नवा ताजेपणा आढळून येतो.

सौ. विजया जोशी यांचें " आठवणींचीं कोरीव लेणीं " (१९६०) हें प्रवासवर्णनपर पुस्तक असेंच स्त्री-सुलभ भावभावनांचें दर्शन घडविणारें आहे.

पुष्कळशा बहारदार व मजेदार आठवणी सांगतांना लेखिकेनें येथें सामा-
यांच्या अनुभवाला येणाऱ्या सुखदुःखांचेंहि वर्णन केलेलें आहे. पण त्यांत विशेष

मोकळेपणा आहे. स्वाभाविकता आहे. व्यक्तित्वाचा विशेष राखला आहे. उत्साह सर्वत्र कायम ठेवला आहे. आणि मुख्य म्हणजे बाईच्या स्वभावाला धरून जागोजाग काय सांगू नि काय नको याचा जिव्हाळा कायम राहील हें पाहिलें आहे.

त्यामुळें विजयाबाईचें हें पुस्तक म्हणजे आठवणींची मोठी सुंदर लेणीं आहेत. लेखनाचा उत्साह, स्मरणशक्तीची कमाल व निरीक्षणाची धमाल हें या पुस्तकाचें वैशिष्ट्य होय.

विजयाबाईची वर्णनशैली धांवतीच पण खोंचक अशी आहे. त्यांना भेटलेल्या व्यक्तींचीं शब्दचित्रें मोठी वाचनीय असून त्यांनीं अधूनमधून वापरलेली बोलभाषाहि उठावदार आहे.

स्त्रियांनीं लिहिलेलीं प्रवासवर्णनें हीं अशा प्रकारचीं आहेत. हा वाङ्मयप्रकार स्त्रियांनीं फारच थोड्या प्रमाणांत हाताळलेला दिसून येतो. संसाराची जबाबदारी सांभाळून प्रवास करण्याइतपत म्हणावी तशी फुरसत स्त्रियांना मिळत नसावी ! आणि प्रामुख्यानें त्याच कारणामुळें इतर वाङ्मय प्रकारांप्रमाणें मोठ्या प्रमाणावर स्त्रियांनीं हा वाङ्मयप्रकार हाताळलेला दिसत नसावा.

श्री. काका कालेलकर, तात्यासाहेब केळकर, ना. सी. फडके किंवा अनंत काणेकर इत्यादि लेखकांनीं प्रवास वर्णनपर लेखन फार केलेलें आहे. त्यांचें हें लेखन कलेच्या दृष्टीनेंहि सरस झालेलें आहे. तसेंच हें लेखन करीत असतांना त्यांनीं केलेला कल्पनेचा वापर आणि मिळविलेल्या माहितीची नोंदहि मोठी कौशल्यपूर्ण झालेली आहे. एखादी हृदयंगम कादंबरी वाचावी त्याप्रमाणें हीं प्रवासवर्णनें चित्ताकर्षक झालेलीं आहेत. त्या मानानें एखादा अपवाद सोडला तर स्त्रियांनीं लिहिलेलें हें प्रवास वर्णन अजून थोडें मागें आहे असें दिसून येईल. तथापि हा दोष स्त्रीच्या लेखणीचा नसून तिच्या सामाजिक जीवनाचा आहे असेंच म्हणावें लागेल. घरगुती जीवनाचा भाग मात्र त्यांनीं येथें उत्तम रीतीनें रंगविला आहे; आणि मुख्य म्हणजे जें सांगावयाचें तें विशेष जिव्हाळ्यानें व प्रामाणिकपणानें सांगितलेलें आहे. त्यामुळें स्त्रियांचीं हीं प्रवासवर्णनें वाचनीय झालीं आहेत यांत शंका नाहीं.

● ● ●

बालवाङ्मय

आपल्या पुढच्या पिढीला आपल्या घराण्याचे चांगले संस्कार मिळावेत व त्या नव्या पिढीनें सुसंस्कृत होऊन जगापुढें मानानें जावें, ह्या हेतूनें लहान मुलांच्या कानावर चांगलें म्हणून जें असेल तें आवर्जून घालावयाची चाल मराठी मुलखांत फार फार जुनी आहे. लहान मुलांच्या जीवनाला सर्वांगीण रीतीनें स्पर्श करतील

व त्यांच्या मनाचा सर्वोत्तम विकास घडवितील अशा गोष्टी तेवढ्यासाठींच वडील-
धारी मंडळी आपल्या नातवंडांना सांगत आलीं आहेत. स्वतःच्या मनांतील गोष्टी
रोखीनें न सांगतांना त्या इतरांचे दाखले घेऊन सांगितल्या तर बालमनाची
चांगली पकड घेतील, ह्या भावनेनें वडील मंडळींनीं आपल्या लहानग्यांना फार
पूर्वीपासून कहाण्या सांगितलेल्या आहेत. लोककथा ऐकवलेल्या आहेत. दंतकथांचे
दाखले दिले आहेत. दैवतकथांचे आदर्श त्यांचेपुढें ठेवलेले आहेत. अद्‌भुतरसाची
खैरात केली आहे. त्यामुळें फार जुन्या काळापासूनच आमचेकडे बालवाङ्मयाची
भरघोस अशी निर्मिति होत गेली आहे.

अलिकडे इंग्रजी व इतर परभाषेंतील वाङ्मयाच्या सहवासामुळें जुन्या
काळच्या बालवाङ्मयांत आणखी नवीन भर पडत गेली आहे. त्यासाठीं कविता,
गोष्ट, परीकथा, गुजगोष्ट, गाणीं, नाट्कली, नाटिका, पत्रें, प्रवासवर्णनें, कादंबऱ्या
वगैरे अनेक प्रकारचें वाङ्मयीन माध्यम नवीन लेखकांनीं स्वीकारलेलें आहे.
विशेषतः गेल्या पांचपन्नास वर्षांत ह्या प्रकारच्या वाङ्मयाची दिवसेंदिवस झपाट्यानें
वाढ होत गेली आहे. गेल्या दहा-बारा वर्षांत तर हें वाङ्मय सचित्र व चटकदार
करण्याकडे मराठी लेखकांच्या मनाचा कल अधिक झुकतो आहे.

ह्या बालवाङ्मयाची जडणघडण ही प्रामुख्यानें बालमानसशास्त्र लक्षांत घेऊन
होते आहे हें विशेष होय. लहान मुलांना आवडतील अशीं लहान लहान व
यमकें साधणारीं वाक्यें, सोपे सोपे वाक्‌प्रचार, खटकेबाज संवाद, रसानुकूल स्वर-
रचना इत्यादि वैशिष्ट्यें ह्या वाङ्मय निर्मितीच्या बुडाशीं सामावलेलीं आहेत.
त्यामुळें सचित्र रीतीनें प्रकट झालेला हा मनोभाव वाचतांना किंवा गातांना लहान
मुलें आनंदानें उड्या मारतात. हंसत खेळत नाचूं लागतात. भराभर वाचूं
पहातात. घडाघडा तोंडपाठ करूं इच्छितात. त्या कारणानें हें बालवाङ्मय वाचायला
मिळावें म्हणून लहान मुलांची झिम्मड पडलेली दिसून येते.

छोट्या छोट्या घरगुती गोष्टी, शूरवीरांच्या पराक्रमाच्या गोष्टी, अद्‌भुत-
रम्य व चटकदार गोष्टी, आभाळांतील विश्वाच्या मजेदार गोष्टी इत्यादींची खैरात
ह्या बालवाङ्मयांत झाल्यामुळें लहान मुलांच्या जीवनांत अलिकडे एक प्रकारचें नवेंच
विश्व उभारलें जातें आहे ! आणि हेंच ह्या बालवाङ्मयाचें प्रमुख वैशिष्ट्य होय.

लहान मुलांच्या विविध प्रकारच्या आवडीनिवडी किंवा छंद लक्षांत घेऊन
बालवाङ्मयाची निर्मिति केली जाते आहे. परंतु त्यापैकीं बरेचसें वाङ्मय हें पर-
भाषेंतील किंवा जुन्या काळांतील कथांच्यावर आधारित असेंच असतें. स्वतंत्र
रीतीनें खास मुलांच्यासाठीं लिहिलेलें असें वाङ्मय अद्यापहि त्या मानानें मराठींत
कमीच आहे. तरी पण जें थोडें फार आहे तें मात्र चटकदार आहे, लोक-
मान्य होणारें असें आहे. जुन्या काळच्या हातीमताई किंवा गुलबकावलीसारखा

चटका त्यामुळें बालमनाला लागत नसला, तरी आजच्या काळचा युगधर्म हें वाङ्मय राखू पहातें आहे.

हें बालवाङ्मय निर्माण करतांना पुरुषांच्या बरोबरीनें नसला तरी बराचसा हातभार स्त्रियांनींहि लावलेला आहे व या वाङ्मयाच्या प्रांतांत आपल्या लेखणीचें वैशिष्ट्य राखण्याचा प्रयत्न केला आहे.

पिरोजबाई आनंदकर ह्या स्वतः शिक्षिका असल्यामुळें त्यांनीं लिहिलेलीं "किशोरकथा" व 'बालबहिर्जी" हीं पुस्तकें बालवाङ्मयांत आपलें वैशिष्ट्य राखून आहेत. लहान मुलांच्या जीवनांतील नित्याच्या प्रसंगांना अद्‌भुतरम्यतेची जोड देऊन पिरोजबाईंनीं लिहिलेल्या कथा मोठ्या सुंदर आहेत व त्यांची भाषाहि चटकदार आहे.

साने गुरुजींच्या 'धडपडणाऱ्या मुलां'प्रमाणेंच पिरोजबाईंची 'बालबहिर्जी' ही कादंबरी लहान मुलांत विशेष लोकप्रिय आहे. या कादंबरींतील लहान मुलांच्या खोड्या मोठ्या माणसांनाहि वेड लावतील अशा बहारीनें उतरल्या आहेत.

ताराबाई मोडक ह्या देखील एक उत्तम शिक्षिका आहेत. त्यामुळें मुलांच्या मनाचा अभ्यास करून त्यांनीं लिहिलेलीं "गोपूदादाचा लाकूड तोड्या", "जादूचा घोडा" व "विक्रम" हीं पुस्तकें चांगलींच लोकप्रिय झालीं आहेत. ताराबाईंची भाषा चटकदार असून लेखनपद्धतीहि आकर्षक आहे.

आनंदीबाई जयवंत यांनीं लिहिलेल्या लहान मुलांच्या गोष्टी व विशेषतः "नंदूचा बंडू" हें पुस्तक मुलांच्या आवडीचें आहे. कल्पकतेबरोबरच या लेखनांत आनंदीबाईंनीं अद्‌भुततेचीहि जोड दिल्यामुळें त्यांची लेखणी येथें जिव्हाळ्यानें बोलते आहे. त्या कारणानें या पुस्तकांतील त्यांची काळ्यानिळ्या ढगांची लढाई बहारीची झाली आहे.

सौ. मालती दांडेकर यांनीं लहान मुलांच्यासाठीं कितीतरी पुस्तकें लिहिलेलीं आहेत. त्यांपैकीं बराचसा भाग परकीय कल्पनेवर आधारलेला आहे. जवळ जवळ वीस एक तरी त्यांचीं पुस्तकें या प्रकारांत मोडतील.

मालतीबाईंनीं मुलांच्यासाठीं कांहीं स्वतंत्रहि लेखन केलें असून तें चटकदार झालें आहे. त्यांच्या 'कमलिनी' मधील भाषा एखाद्या लडिवाळ मुलासारखी गुज गोष्टी करणारी असल्यामुळें हें त्यांचें लेखन बालजगतांत चांगलेंच वैशिष्ट्य राखून आहे.

या संदर्भांत उदाहरण म्हणून त्यांच्या 'पुनर्जन्म' या बालकथेंतील पुढील वर्णन अवश्य पहातां येईल—

"टमाटा आनंदानं घरंगळत त्या वाटेनें फाटकांतून आंत शिरला. मऊ माती अन् लहान लहान रोपं—झुडुपं पाहून मुलगी माहेरीं आल्यासारखं त्याला आनंदाचं भरतंच आलं! भराभर लोळत तो मऊ ओल्या मातींतून नाचूं खेळूं

लागला; अन् काय दुर्दैव...! ट्चकन् एका अणकुचीदार दगडावर तो आदळला ....अन् हाय रे दुर्दैवा...! फटकन् फुटला तो. रक्त तिथंच पडलं न् हृदयाशीं धरून ठेवलेलीं नाजुक बीजं तिथं विखुरलीं...!"

"विक्रमाचा विक्रम", "यक्षनगरींतील रम्य कथा", "मोहन माळ", "सोनेरी लोकर" इत्यादि पुस्तकांमधून लेखिकेनें अद्‌भुतरम्य कथा दिलेल्या असून "जगांतील जमती" मध्यें भौगोलिक माहितीवर आधारलेलें निबंध दिलेले आहेत. विषयाच्या दृष्टीनें मालतीबाईंच्या या प्रकारच्या लेखनांत भरपूर विविधता आलेली आहे.

शान्ता ज. शेळके यांनीं लहान मुलांच्यासाठीं अनेक लहान लहान पुस्तकें लिहिलेलीं आहेत. परंतु त्यांच्या या लेखनाची बरीचशी भिस्त ही पर-भाषेंतील कथांच्या अनुवादावर असल्यामुळें त्या लेखनाचा येथें विचार केलेला नाहीं. तरीपण एक गोष्ट निश्चितपणें येथें नमूद करतां येईल, ती अशी कीं, शान्ताबाईंनीं भाषांतरित केलेलें 'मीनाक्षी' किंवा 'निळा दिवा' हें वाङ्मय भाषाशैलीच्या दृष्टीनें सुंदरच आहे.

कावेरी कर्वे यांची 'चिमणी' किंवा 'माझ्या आवडत्या गोष्टी' हीं पुस्तकें मुलांना आवडतील अशींच सुंदर आहेत. त्यांची भाषा चटकदार आहे. लेखनपद्धति ओघवती व बांधेसूद आहे.

सौ. कुमुदिनी रांगणेकर यांनीं लहान मुलांसाठीं फार थोडें लिहिलें आहे. तरीपण चुकचुकणारा कोंबडा, सिठासारखी आवडती, जादूचें मडकें, कोंडा कुस्करी इत्यादि त्यांच्या कथा गमतीदार आहेत.

सौ. लीला भागवत यांनीं अगदीं अलिकडच्या काळांत लिहिलेल्या चिट्टुकल्या गोष्टी मुलांना फारच आवडतात. त्यांचें हें लेखन अगदींच लहान मुलांच्यासाठीं असल्यामुळें यमकें साधणारीं छोटी छोटी वाक्यरचना त्यांनीं वापरलेली आहे. गोष्टींत विविधता ठेवली आहे. भाषा आकर्षक राखली आहे. शिवाय या सर्वांच्या जोडीला त्यांनीं आपलें सर्व लेखन आकर्षक चित्रांनीं सजविल्यामुळें त्यास विशेष उठाव आला आहे.

लहान मुलांसाठीं लिहिल्या गेलेल्या कथावाङ्मयांत डॉ. **चारुशीला गुप्ते** यांचे 'झाजिमा,' **नलिनी देवळे** यांचे 'जिवलग मित्र,' **तारा वैशंपायन** यांचे 'कुकूच कोंबडा,' **विमल कर्णिकांचें** 'फुल-पांखरें' **सुशीला सावतांचें** 'आमचा खेळ,' **सुमति पायगांवकरांचें** 'छोटी नीरा' इत्यादि प्रकाशन लक्षांत घेण्याजोगें आहे.

कांहीं लेखिकांनीं लहान मुलांच्यासाठीं थोरामोठ्यांचीं **चरित्रें**हि लिहिलेलीं आहेत. त्यामध्यें डॉ. चारुशीला गुप्ते यांची 'वीररत्न बाजी प्रभु देशपांडे' व क्रांतिवीर वासुदेव बळवंत, यशोदाबाई भटांचीं 'आर्य स्त्री रत्नें;' उषा कोलते

यांचीं ‘ कथाभारत,’ ‘ समाज-विज्ञान,’ ‘ कांहीं उपकारीं माणसें ’ हीं पुस्तकें उल्लेखनीय आहेत.

मुलांच्यासाठीं स्त्रियांनीं लिहिलेल्या **कविता** मोठ्या सुंदर आहेत. त्यांपैकी **इंदिरा संतांची**--

नको नको रे पावसा
असा धिंगाणा अवेळीं
घर माझें चंद्रमौळी
आणि दारांत सायली
नको नाचू तडातडा
असा कौलारावरून
तांबे सतेलीं पातेलीं
आणूं भांडीं मी कोठून

ही पावसांत सांपडलेल्या राजसबाळाला सांभाळून आणण्यासाठीं विनंति करणारी कविता छानदार आहे. या कवितेंत पितळेची लोटीवाटी मांडून नवऱ्याबरोबर जेवायला वाढीन म्हणून पावसाला केलेली विनंतिहि उल्लेखनीय आहे.

शांता शेळके यांची--

थुई थुई नाच माझ्या अंगणांत मोरा
निळ्या निळ्या पिसाऱ्याचा फुलव फुलोरा
काय तुझ्या पिसाऱ्याचा सांगूं मी दिमाख
निळ्या मखमलीवरी हिरे लाख लाख
रंगीबेरंगी छटांनीं झळाळतें अंग
काय इंद्रधनुष्याचें चोरियलें अंग ?...

ही मोराला बघून प्रकट होणारी कल्पना मुलांना मोठी बहारीची वाटते. त्याचप्रमाणें **अपर्णा देशपांडे** यांची---

थांब ढगा ! थांब ढगा ! येऊं का मी वरी ?
लोळाया ने मला तुझ्या कापसाच्या घरीं
वाऱ्या ! वाऱ्या ! थांब जरा किती पळतोस ?
कळ्या फुलांतील वास सांग कुठें तूं नेतोस ?

ही कल्पनाहि भारी अपूर्वाईची आहे.

संजीवनी मराठे यांनीं लिहिलेली—

तूं आहेस बेबी, मी आहे आई
बरं का ग आई, हें विसरायचं नाहीं !

सकाळ होतांच मी तुला उठवीन
मीच तुझे दांत घांसून घेईन
दुधाचा पेला पाहून रडायचं नाहीं !...
झोपतांना मात्र तूं आई व्हायचं
अंगाई म्हणत थोपटत रहायचं
दुपारचं कांहीं आठवायचं नाहीं,
बरं का ग आई,
हें विसरायचं नाहीं !

ही कविता देखील बालमनाला चांगलाच चटका लावणारी व बालमनाला दिल-खुलास हंसविणारी अशी शानदार झालेली आहे.

स्त्रियांनीं लिहिलेल्या बालवाङ्मयातील निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांचें स्वरूप हें बहुतांशीं या प्रकारचें आहे. याच प्रकारचें लेखन आणखीहि कांहीं लेखिकांनीं व कवयित्रींनीं केलेलें आहे. पण अद्याप त्यापैकीं संग्रहित न होतां बरेचसें फुटकळ स्वरूपांत राहिलेलें आहे. तसेच लहान मुलांसाठीं अगदीं किरकोळ लेखन करणारांचीहि संख्या पुष्कळ आहे.

बालवाङ्मयाच्या निर्मितीच्या दृष्टीनें स्त्रियांची लेखणी या रीतीनें बरीच समाधानकारक रीतीनें आपलें पाऊल पुढें टाकते आहे असें दिसून येतें. गुणाच्या दृष्टीनें हें लेखन साहित्यसमृद्ध वाटत असलें तरी तें संख्येच्या मानानें मात्र फारच कमी आहे.

साने गुरुजींनीं लिहिलेली 'शामची आई,' 'चित्रकार रंगा,' 'धडपडणारीं मुलें,' 'सुंदर पत्रें' इत्यादि अनेक पुस्तकें पाहिलीं म्हणजे स्त्रियांनीं या प्रकारचें भरपूर लेखन करायला पाहिजे असें वाटूं लागतें. सुंदर पत्रांतून प्रकट झालेली भारतीय संस्कृति आमच्या स्त्रियांनीं हाताळली पाहिजे असें निश्चितपणें मनांत येतें.

त्याचप्रमाणें श्री. कृ. भा. बाबर यांच्या 'विद्यार्थी सीताराम' सारखें चरित्रलेखन किंवा वा. गो. आपट्याच्यासारखें 'परिस्तानांतील गोष्टी' चें कथा-लेखन आमच्या लेखिकांनीं करायला हवें आहे. तसेंच श्री. कोगेकर किंवा कर्वे यांच्यासारखें शास्त्रीय विषय सोप्या भाषेंतून समजावून देण्याचें कामहि स्त्रीच्या लेखणीनें करणें अगत्याचें आहे. कारण आजच्या विज्ञान युगाची ती एक प्रमुख गरज आहे.

खास मुलांसाठीं म्हणून लिहिलेलें मराठींतील स्वतंत्र वाङ्मय एकंदरीनें कमीच आहे. तशांत स्त्रियांनीं लिहिलेलें या प्रकारचें वाङ्मय त्याहूनहि कमी आहे. आणि जें लिहिलें आहे त्यांतदेखील स्त्रीचा म्हणून वेगळा दृष्टिकोन आणखीनच अपवादात्मक असा आहे. त्या कारणानें स्त्रियांच्या ह्या लेखनप्रकाराचें ठळक वैशिष्ट्य म्हणावें तसें मनांत भरत नाहीं.

त्यामुळें या संदर्भात एक अपेक्षा मनांत येते. ती अशी कीं, बालमनाची अविश्रांत जोपासना करणाऱ्या स्त्रियांनीं पुरुषांच्यापेक्षांहि भरीव कामगिरी या क्षेत्रांत करणें अगत्याचें आहे. कारण बालमनाला आकर्षित करणाऱ्या शेंकडों भावभावनांचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास केलेला असतो व त्याची पूर्तता करण्याचे अनुभवहि जिव्हाळ्यानें घेतलेले असतात.

★

७.

निष्कर्ष

मराठीच्या प्रभातकालापासून तो अगदीं आजतागायत निरानिराळ्या लेखिकांनीं लिहिलेलें वाङ्मय हें अशा प्रकारचें आहे. जवळ जवळ गेल्या सात शतकांत निर्माण झालेलें हें वाङ्मय अभ्यासित असतांना एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेंत भरते ती अशी कीं, या लेखिकांनीं वाङ्मयनिर्मिति करीत असतांना आपला म्हणून एक स्वतंत्र असा दृष्टिकोन असलांत आणलेला आहे. स्त्री आणि पुरुष समान भूमिके-वरून जाणारे असले, तरी सर आर्थर अण्डरहिल यांनीं " नाइन्टीन्थ सेंचरी " मध्यें म्हटल्याप्रमाणें या समानतेचा अर्थ एकरूपता असा होत नाहीं. त्यांच्या मतें स्त्री आणि पुरुष हे केवळ शारीरिक दृष्ट्याच भिन्न आहेत असें नव्हें, तर त्यांचा जीवनाकडे पहावयाचा दृष्टिकोनहि भिन्न प्रकारचाच आहे. याच विषयासंबंधीं लिहितांना स्वर्गीय कवि रविंद्रनाथ टागोर यांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, " यदि स्त्री और पुरुष स्वभावतः एक ही होते तो फिर स्त्री तो एक व्यर्थता ही होती, बिलकुल पुनरुक्ति....यदि स्त्रियों ऐसा समझ लें कि पुरुष-स्त्री की भिन्नता केवल शारीरिक भिन्नता है, और मानसिक एवं आध्यात्मिक दृष्टि से प्रकृत रूप में वे बिलकुल पुरुषों के ही समान हैं, और यदि इसी धारणा से (इस प्रकार जीवन को एक-पक्षीय पुरुष-रूप ही देकर) वे काम करें, तो जल्दी या देर में एक-न-एक दिन हमारी सभ्यता बिलकुल गड़बड़ी और अस्तव्यस्तता में डूब जायगी। * "

निसर्गानें स्त्रीवर एक प्रकारची महत्त्वाची अशी मातृत्वाची वेगळी जबाबदारी टाकलेली असल्यामुळें स्वाभाविकच पुरुषांहून निराळे असे तिचे आचार आणि विचार बनत गेलेले आहेत. तिचा बराचसा काळ घरकामांत जात असल्यामुळें अगदीं वेदकालापासून, म्हणजे ज्या काळांत स्त्रियांना सर्व प्रकारचें भरपूर स्वातंत्र्य उपभोगतां येत होतें, त्या कालापासूनच स्त्री म्हणजे घर आणि घर म्हणजेच स्त्री असें समीकरण होऊन बसलें आहे. त्यामुळेंच वेदकालामधें ' जायेदस्तं मघवन् सेदु योनिः । "० असें म्हटलें जात असें आणि अगदीं अलीकडेसुद्धां " गृहिणी

* स्त्री-समस्या, पा. ४२५. ०ऋग्वेद, मंडल ३४-३५

गृहमुच्यते। " या वचनाची सत्यता खुद्द स्त्रियांनींहि मान्य केलेली आहे.

स्त्रियांमधील या स्वतंत्र अशा दृष्टिकोनाविषयीं आणि त्यांच्या लेखनाविषयीं लिहितांना सुप्रसिद्ध पाश्चात्य कादंबरीकार जॉर्ज ईलियट या म्हणतात कीं,

" स्त्रियांनीं स्त्री म्हणूनच आपलें लेखन करतांना विचार केला व अनुभवहि घेतला, त्यामुळें त्यांनीं जेव्हां लेखन केलें तेव्हां त्यांचें तें लेखन स्त्री-जीवनाचाच आविष्कार करणारें असें झालें. स्वतःच्या जीवनांतील अनुभवाच्या बळावर स्फूर्ति घेऊन उठलेल्या त्यांच्या लेखनानें पुरुषांचें अनुकरण न करतां आपला म्हणून खास प्रामाणिकपणा राखला. त्यामुळें वाङ्मय आणि कला यांचा अभ्यास करणारांना त्यांच्या आठवणी, पत्रें, कथा, कादंबऱ्या किंवा शब्दचित्रें या वाङ्मय प्रकारांनीं आपलें उठावदार व वैशिष्ट्यपूर्ण असें दर्शन घडविलें."*

आणि असें असूनहि ज्या कांहीं थोड्या स्त्रियांनीं पुरुषांचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला त्यांचेविषयींहि जॉर्ज एलियट म्हणतात कीं, " स्त्रीसुलभ अशा खास भूमिकेवरून त्यांनीं लेखन करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. त्या कारणानें त्यांचें लेखन हें पुरुषी थाटाचें असें झालें."

जॉर्ज ईलियट यांनीं पाश्चात्य लेखिकांच्या लेखनाविषयीं दर्शविलेलें हें मत आपल्याकडील लेखिकांच्या लेखनासहि तंतोतंत लागूं पडणारें आहे. वास्तविक पाश्चात्य देशांमध्यें आपल्यापेक्षां कितीतरी दृष्टींनीं स्त्रिया स्वतंत्र आहेत. पुरुषांच्या बरोबरीनें वागण्यास त्यांना पुष्कळसा वाव आहे. त्यांनीं आपले असे वेगळे हक्क प्रस्थापित केलेले आहेत. त्यामुळें त्यांच्या समाजांत स्त्रियांना योग्य तो मान दिला जातो, अशा स्थितींताहे ईलियटबाईनीं त्यांच्याकडील लेखिकांच्या लेखनाबद्दल असें म्हणावें, याचा उघड अर्थ असा आहे कीं, स्त्रीला स्त्री म्हणूनच स्वतंत्र असें वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. स्त्री कितीहि सुधारली आणि तिनें पुरुषांच्या बरोबरीनें हवीं तीं कार्यें पार पाडण्याचा कितीहि प्रयत्न केला, तरी अनुभवानें तिला पटायला लागलें कीं, आपलें खरें कार्यक्षेत्र म्हणजे घरच आहे. कारखाना किंवा इतर दुसरें तिसरें कांहीं नव्हे! आणि याच तिच्या विशिष्ट भावनेचे पडसाद तिच्या वाङ्मयांतहि तिला न कळत पडत असतात.

* " ....They thought and felt as women, and when they work, their books became the fullest expression of their womanhood. And by being true to themselves, by only seeking inspiration from their own life-experience, instead of servively copying that of man, their letters and memoirs, their novels and pictures have a distinct, nay unique, for the student of art and literature."

George Eliot, 'Eminent Women series' by Mathilde Blind.

मराठी सारस्वतास भूषणावह होईल असा स्त्रियांनीं निर्माण केलेला वाङ्मयाचा एक भाग तर असा आहे कीं, तो केवळ स्त्रियांचाच म्हणून ओळखला जातो. पिढ्यानपिढ्या केवळ पाठांतरामुळें टिकून राहिलेला असा " स्त्री गीतें " हा तो वैशिष्ट्यपूर्ण भाग होय. जानपद ओव्या, उखाणे, खेळांतील गाणीं आणि कहाण्या हें स्त्रियांचें असें खास निराळें वाङ्मय आहे. परकीय संस्कृतीचा, भाषेचा, विचारांचा कसलाहि संपर्क न लागलेल्या खास मराठी अंतःकरणांतून निर्माण होणारा हा भावनाविष्कार आहे. या वाङ्मयांत स्त्रियांनीं आपला आत्मा ओतलेला आहे. त्यांच्या अंतःकरणांत वसत असलेल्या आत्मीयतेच्या उमाळ्यांतून प्रस्फुट झालेलें हें अक्षर वाङ्मय आहे. या वाङ्मयास साकार करणारा शब्दन् शब्द स्वयंस्फूर्तीनें, रक्ताच्या शाईनें, लिहिला गेलेला आहे. स्त्रियांच्या या अलिखित वाङ्मयानें भारतीय जीवनांत माणुसकीचा रंग भरलेला आहे ! भारतीय संस्कृतीचें अधिष्ठान म्हणून डौलानें जगाच्या पाठीवर मिरविण्याचें सामर्थ्य या वाङ्मयानें कमावलेलें आहे !

माझे पांच भाऊ । देवळाच्या भिंती ।
गिलावा देऊं किती । आयुष्याचा ॥
पेरा झाला रानांतून । मोड काढी वर मान ।
तसें हंसें माझें तान्हें । पाळण्यांत ॥
वाऱ्यानं हालती ग । पानमळ्याची शेवरी ।
दिष्ट नि झाली म्हणूं । माज्या कुंकवाच्या चिरी ॥
सासर एवडा वस । नको करूस सासूबाई ।
तुझ्या दारींच्या चांफ्या पाई । दूर देशाची आली जाई ॥

या ओव्यांतून गोवलेले उपमा, दृष्टांत आणि कल्पना ह्या खास स्त्रियांच्या आहेत. " साहित्यिकांचा आणि कलाकारांचा महान् धर्म कोणता " या विषयासंबंधीं बोलतांना सुप्रसिद्ध साहित्यिक साने गुरुजी एकदां म्हणाले, " स्त्री वाङ्मय हें पृथ्वी मोलाचें वाङ्मय आहे. कालिदास जिवंत झाला तर हें वाङ्मय वाचून नाचेल !... " गाईचे कान जसें नागलीचें पान " कोणत्या महाकवीला ही महान् उपमा सुचेल ? "

या ओव्यांप्रमाणेंच स्त्रियांनीं रचलेले उखाणे आणि गाणीं हीं मोठीं हृद्य आहेत. कहाण्यांना तर प्रा. पोतदारांनीं " स्त्रियांचे उपनिषद " असें म्हटलेलें आहे. या स्त्रियांच्या वाङ्मयांत त्यांची स्वतःची भाषा आहे. त्यांच्या अंतःकरणांतील भावनाविष्कार येथें त्यांच्याच कल्पनांमधून प्रकट झालेला आहे. हा वाङ्मय-प्रकार पुरुषांनीं फारसा हाताळलेला दिसून येत नाहीं. फार तर एखादा दुसरा उखाणा पुरुषांनीं रचल्याचें अधूनमधून ऐकावयास मिळतें इतकेंच. आणि या प्रकारच्या

* नवयुग, २५ जून १९५०.

वाङ्मयांत पुरुषांनीं भलरी सारख्या गीतांनीं कांहीं जर प्रयत्न केला असेल, तर तो या स्त्रीगीतांहून निराळा असल्याचें चटकन् ध्यानांत येईल ! इतकें हें वाङ्मय स्त्रियांच्या लेखनवैशिष्ट्यानें भरलेलें आहे.

मराठीच्या प्रभातकालामधील कवयित्रींनीं त्यावेळच्या पुरुष लेखकांच्या मानानें बरेंच कमी लेखन केलेलें आहे. पूर्वींच्या काळीं एकंदर स्त्री समाजावर धार्मिक, सामाजिक व इतर नियंत्रणें फार असत. त्याचा परिणाम अर्थातच त्यांच्या वाङ्मयावरहि झालेला आहे. हीं सर्व नियंत्रणें सांभाळून उरलेल्या वेळांत किंवा सवलतींत त्यांना वाङ्मयनिर्मिति करावी लागली. त्यामुळें धर्म, भक्ति, पौराणिक कथा, ओव्या, उखाणे, म्हणी इत्यादीपलीकडे त्यांच्या विचारांची धांव जाणें शक्य नव्हतें. तथापि या मर्यादित क्षेत्रांतहि स्त्रियांच्या लेखणीनें आपलें वैशिष्ट्य प्रस्थापित केलेलें आहे हें विशेष होय.

" काई रूपें वानूं नंदाचा कुमरू :
तुजा पती आम्हां पिता दुजा नाठवे विचारु : "

ही महदंबेची स्त्रीसुलभ भावनाविष्कार करणारी कल्पना

" विठो माझा लेकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा ॥ "

हा जनाबाईचा सर्वांगसुंदर अभंग आणि

" जेथ वसे तुलसीचें पान । तेथें असे नारायण "

ही बहिणाबाईची भाविक श्रद्धा खास स्त्रीहृदयाचा आविष्कार म्हणूनच पहाण्या सारखी आहे. त्याचप्रमाणें मराठ्यांच्या अमदानींत अहिल्याबाईसारख्या साध्वी स्त्रीनें स्वतःच्या पराक्रमाचें वैशिष्ट्य सांगण्यासाठीं एका पत्रांतून " सुभेदारांचे पुण्यप्रतापें येथेंही कोणी बांगड्या लेवून बसलेले नाहीं " असें दिलेलें खणखणीत उत्तर खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण आहे. अहिल्याबाईच्या राजकारणांतील कर्तबगारीपेक्षां एक स्त्री या नात्यानें तिनें दिलेलें हें उत्तर मोठें विलोभनीय तर खरेंच, पण तें सहसा पुरुषांच्या वैचारिक बैठकींत न बसणारें असेंहि आहे !

इंग्रजी अमदानी सुरू झाल्यावर त्यांच्या सहवासानें आणि विचारसरणीनें आपल्याकडील समाजांतील स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनांत फरक पडत गेला. इ. स. १८८५नंतर इंग्रजी वाङ्मयांतील स्त्रीजीवनविषयक उदार विचारांनीं आणि लोकहित-वादी, महात्मा फुले, विष्णुशास्त्री पंडित, आगरकर, महर्षि कर्वे, हरिभाऊ आपटे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, केळकर इत्यादींच्या प्रोत्साहनपर लेखनामुळें व प्रयत्नामुळें स्त्री शिक्षणाची वाढ झपाट्यानें होत गेली. त्यामुळें स्वाभाविकच स्त्रीचा सामाजिक दर्जाहि बदलत गेला. एखाद्या आवडत्या स्वप्नाची जागृति यावी आणि भोंवतालच्या समाजबंधनाच्या शृंखला तुटून पडून मोकळें वाटावें, तशीच कांहींशी त्यावेळच्या स्त्रियांची अवस्था झाली. आपल्या मनांत कित्येक दिवस दबून बसलेल्या विचारांना आपल्याच शब्दांमधून वाचा फोडावी, अशी विलक्षण इच्छा स्त्रीवर्गांत उत्पन्न झाली.

त्याचा परिणाम म्हणून जुन्या काळाच्या मानानें विपुल आणि विविध प्रकारचें वाङ्मय स्त्रिया लिहूं लागल्या. विशेषतः इ. स. १९२० नंतरच्या अलिकडच्या काळांत स्त्रियांनीं भरपूर वाङ्मयनिर्मिति केली, असें दिसून येतें.

स्त्रियांनीं जें वाङ्मय आजपर्यंत लिहिलेलें आहे त्यामध्यें कथा, काव्य आणि कादंबरी या वाङ्मयप्रांतामध्येंच त्यांनीं विशेष महत्त्वाचें लेखन केलेलें आहे. त्याचप्रमाणें अगदीं अलिकडच्या काळांत लक्ष्मीबाई टिळकांनीं लिहिलेलीं "स्मृतिचित्रें" मराठींत अजोड म्हणण्याइतकीं सरस वठलेलीं आहेत. वास्तवतेच्या आणि सहजसुलभ भावनाविष्काराच्या प्रत्येक कसोटीला लक्ष्मीबाईंची लेखणी यशस्वीरीत्या उतरलेली आहे. या स्मृतिचित्रांमधून त्यांनीं चित्रित केलेलें स्वतःचें आणि श्री. टिळकांचें स्वभावलेखन अप्रतिम आहे. "आगगाडीचे डबे म्हणजे लाडवाच्या डब्यासारखे असून आंत माणसें घालून मग झांकण लावीत असावें, अशा तऱ्हेची कल्पना करणारी मी मुलगी!" अशा प्रकारची निर्भयपणानें व निःसंकोच मनानें स्वतःची ओळख सांगणाऱ्या लक्ष्मीबाईंनीं उभें आयुष्य किती हालअपेष्टेंत काढलें, याचें हृदयंगम चित्र या पुस्तकामधून रेखाटलेलें आहे.

मराठींत असलेल्या आत्मचरित्रांमध्यें या पुस्तकाचें स्थान सर्वांत वरच्या दर्जाचें आहे. आत्मचरित्रांच्या प्रांतांत लेखन करून स्त्रियांनीं जें अवर्णनीय असें घरगुती जीवन रंगविलेलें आहे, त्याची सर पुरुषांच्या आत्मचरित्रांना येणार नाहीं! तीच गोष्ट कमलाबाई देशपांडे यांच्या "हंसरा निर्माल्य आणि चिमण्या" ह्या शब्दचित्राची. घरामधील लहानमोठ्या व्यक्तींच्या या पुस्तकांमधून आविष्कृत झालेल्या स्वभावरेखा इतक्या वास्तव वातावरणांत इतरत्र आढळणें शक्य नाहीं, असें म्हटलें, तर तें अतिशयोक्तीचें खास होणार नाहीं! ह्या पुस्तकांचा दुसरा विशेष म्हणजे यांमधील बहुधा सर्व स्वभावरेखा ह्या केवळ स्त्रियांच्या आहेत हा होय. स्त्रीलाच स्त्रीच्या भावना जेवढ्या उत्कटत्वानें समजतील तितक्या उत्कटत्वानें त्या पुरुषांना समजणें शक्य नाहीं, याचें प्रत्यंतर हीं पुस्तकें वाचतांना आल्याविना रहात नाहीं.

कथा, काव्य आणि कादंबरी हे वाङ्मयप्रकार हाताळीत असतांना स्त्रियांनीं आपल्या खास स्वानुभवाचे असे कांहीं प्रसंग अधून मधून रेखाटलेले आहेत. हे प्रसंग आणि त्यांमधून प्रकट झालेल्या कल्पना पुरुषी मनाला डिवचणाऱ्या नाहींत. स्वतःचें मूल आणि दत्तक घेतलेलें मूल यांच्या संबंधाच्या भावनेंत जो जमीन अस्मानाचा फरक असतो, तोच अशा भावना स्त्री व पुरुष हाताळीत असतांना दिसून येईल! म्हणजे कल्पना करून जर कांहीं लेखकांनीं या लेखिकांप्रमाणेंच अशा विशिष्ट प्रश्नांवर लेखन केलें, तर दोहोंत खात्रीनें बरीच तफावत पडेल असें म्हणावयास हरकत नाहीं. या संदर्भांत स्त्री स्वतःच्या भावना किती उत्कटत्वानें लिहूं शकते हें पहावयाचें झालें तर विभावरी शिरूरकरांच्या "हिंदोळ्यावर" या कादंबदीमधील

वाङ्मयांत पुरुषांनीं भलरी सारख्या गीतांनीं कांहीं जर प्रयत्न केला असेल, तर तो या स्त्रीगीतांहून निराळा असल्याचें चटकन् ध्यानांत येईल ! इतकें हें वाङ्मय स्त्रियांच्या लेखनवैशिष्ट्यानें भरलेलें आहे.

मराठीच्या प्रभातकालामधील कवयित्रींनीं त्यावेळच्या पुरुष लेखकांच्या मानानें बरेंच कमी लेखन केलेलें आहे. पूर्वीच्या काळीं एकंदर स्त्री समाजावर धार्मिक, सामाजिक व इतर नियंत्रणें फार असत. त्याचा परिणाम अर्थातच त्यांच्या वाङ्मयावरहि झालेला आहे. हीं सर्व नियंत्रणें सांभाळून उरलेल्या वेळांत किंवा सवलतींत त्यांना वाङ्मयनिर्मिति करावी लागली. त्यामुळें धर्म, भक्ति, पौराणिक कथा, ओंव्या, उखाणे, म्हणी इत्यादीपलीकडे त्यांच्या विचारांची धांव जाणें शक्य नव्हतें. तथापि या मर्यादित क्षेत्रांतहि स्त्रियांच्या लेखणीनें आपलें वैशिष्ट्य प्रस्थापित केलेलें आहे हें विशेष होय.

" काई रूपें वानूं नंदाचा कुमरूं :
तुजा पती आम्हां पिता दुजा नाठवे विचारु : "

ही महदंबेची स्त्रीसुलभ भावनाविष्कार करणारी कल्पना

" विठो माझा लेकुरवाळा । संगें लेकुरांचा मेळा ॥ "

हा जनाबाईंचा सर्वांगसुंदर अभंग आणि

" जेथ वसे तुलसीचें पान । तेथें असे नारायण "

ही बहिणाबाईची भाविक श्रद्धा खास स्त्रीहृदयाचा आविष्कार म्हणूनच पहाण्या सारखी आहे. त्याचप्रमाणें मराठ्यांच्या अमदानींत अहिल्याबाईसारख्या साध्वी स्त्रीनें स्वतःच्या पराक्रमाचें वैशिष्ट्य सांगण्यासाठीं एका पत्रांतून " सुभेदारांचे पुण्यप्रतापें येथेंही कोणी बांगड्या लेवून बसलेले नाहीं " असें दिलेलें खणखणीत उत्तर खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण आहे. अहिल्याबाईच्या राजकारणांतील कर्तबगारीपेक्षां एक स्त्री या नात्यानें तिनें दिलेलें हें उत्तर मोठें विलोभनीय तर खरेंच, पण तें सहसा पुरुषांच्या वैचारिक बैठकींत न बसणारें असेंहि आहे !

इंग्रजी अमदानी सुरू झाल्यावर त्यांच्या सहवासानें आणि विचारसरणीनें आपल्याकडील समाजांतील स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनांत फरक पडत गेला. इ. स. १८८५नंतर इंग्रजी वाङ्मयांतील स्त्रीजीवनविषयक उदार विचारांनीं आणि लोकहित-वादी, महात्मा फुले, विष्णुशास्त्री पंडित, आगरकर, महर्षि कर्वे, हरिभाऊ आपटे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, केळकर इत्यादींच्या प्रोत्साहनपर लेखनामुळें व प्रयत्नामुळें स्त्री शिक्षणाची वाढ झपाट्यानें होत गेली. त्यामुळें स्वाभाविकच स्त्रीचा सामाजिक दर्जाहि बदलत गेला. एखाद्या आवडत्या स्वप्नाची जागृति यावी आणि भोंवतालच्या समाजबंधनाच्या शृंखला तुटून पडून मोकळें वाटावें, तशीच कांहींशी त्यावेळच्या स्त्रियांची अवस्था झाली. आपल्या मनांत कित्येक दिवस दबून बसलेल्या विचारांना आपल्याच शब्दांमधून वाचा फोडावी, अशी विलक्षण इच्छा स्त्रीवर्गांत उत्पन्न झाली.

त्याचा परिणाम म्हणून जुन्या काळाच्या मानानें विपुल आणि विविध प्रकारचें वाङ्मय स्त्रिया लिहूं लागल्या. विशेषतः इ. स. १९२० नंतरच्या अलिकडच्या काळांत स्त्रियांनीं भरपूर वाङ्मयनिर्मिति केली, असें दिसून येतें.

स्त्रियांनीं जें वाङ्मय आजपर्यंत लिहिलेलें आहे त्यामध्यें कथा, काव्य आणि कादंबरी या वाङ्मयप्रांतामध्येंच त्यांनीं विशेष महत्त्वाचें लेखन केलेलें आहे. त्याचप्रमाणें अगदीं अलिकडच्या काळांत लक्ष्मीबाई टिळकांनीं लिहिलेलीं "स्मृतिचित्रें" मराठींत अजोड म्हणण्याइतकीं सरस वठलेलीं आहेत. वास्तवतेच्या आणि सहजसुलभ भावनाविष्काराच्या प्रत्येक कसोटीला लक्ष्मीबाईंची लेखणी यशस्वीरीत्या उतरलेली आहे. या स्मृतिचित्रांमधून त्यांनीं चित्रित केलेलें स्वतःचें आणि श्री. टिळकांचें स्वभावलेखन अप्रतिम आहे. "आगगाडीचे डबे म्हणजे लाडवाच्या डब्यासारखे असून आंत माणसें घालून मग झांकण लावीत असावें, अशा तऱ्हेची कल्पना करणारी मी मुलगी!" अशा प्रकारची निर्भयपणानें व निःसंकोच मनानें स्वतःची ओळख सांगणाऱ्या लक्ष्मीबाईनीं उभें आयुष्य किती हालअपेष्टेंत काढलें, याचें हृदयंगम चित्र या पुस्तकामधून रेखाटलेलें आहे.

मराठींत असलेल्या आत्मचरित्रांमध्यें या पुस्तकाचें स्थान सर्वांत वरच्या दर्जाचें आहे. आत्मचरित्रांच्या प्रांतांत लेखन करून स्त्रियांनीं जें अवर्णनीय असें घरगुती जीवन रंगविलेलें आहे, त्याची सर पुरुषांच्या आत्मचरित्रांना येणार नाहीं! तीच गोष्ट कमलाबाई देशपांडे यांच्या "हंसरा निर्माल्य आणि चिमण्या" ह्या शब्दचित्राची. घरामधील लहानमोठ्या व्यक्तींच्या या पुस्तकांमधून आविष्कृत झालेल्या स्वभावरेखा इतक्या वास्तव वातावरणांत इतरत्र आढळणें शक्य नाहीं, असें म्हटलें, तर तें अतिशयोक्तीचें खास होणार नाहीं! ह्या पुस्तकांचा दुसरा विशेष म्हणजे यांमधील बहुधा सर्व स्वभावरेखा ह्या केवळ स्त्रियांच्या आहेत हा होय. स्त्रीलाच स्त्रीच्या भावना जेवढ्या उत्कटत्वानें समजतील तितक्या उत्कटत्वानें त्या पुरुषांना समजणें शक्य नाहीं, याचें प्रत्यंतर हीं पुस्तकें वाचतांना आल्याविना रहात नाहीं.

कथा, काव्य आणि कादंबरी हे वाङ्मयप्रकार हाताळीत असतांना स्त्रियांनीं आपल्या खास स्वानुभवाचे असे कांहीं प्रसंग अधून मधून रेखाटलेले आहेत. हे प्रसंग आणि त्यांमधून प्रकट झालेल्या कल्पना पुरुषी मनाला डिवचणाऱ्या नाहींत. स्वतःचें मूल आणि दत्तक घेतलेलें मूल यांच्या संबंधाच्या भावनेंत जो जमीन अस्मानाचा फरक असतो, तोच अशा भावना स्त्री व पुरुष हाताळीत असतांना दिसून येईल! म्हणजे कल्पना करून जर कांहीं लेखकांनीं या लेखिकांप्रमाणेंच अशा विशिष्ट प्रश्नांवर लेखन केलें, तर दोहोंत खात्रीनें बरीच तफावत पडेल असें म्हणावयास हरकत नाहीं. या संदर्भात स्त्री स्वतःच्या भावना किती उत्कटत्वानें लिहूं शकते हें पहावयाचें झालें तर विभावरी शिरूरकरांच्या "हिंदोळ्यावर" या कादंबरीमधील

पुढील भाग पहातां येईल:—

" ...अचलेनें सभोंवार पाहिलें. राधिकेला यायला अवकाश होता. तिनें झटकन् अरविंदाला आपल्या मांडीवर घेतलें. अरविंदानें " उंहुं " " उंहुं " केलें. खायला मिळालें कीं झालें. त्याला आईंत व इतरांत फरक कळत नव्हता. खायला देते ती आई. त्या ओठाच्या स्पर्शानें अचलेच्या अंगावर रोमांच आले. सर्वांगांतून कसल्या तरी लहरी एका ठिकाणीं केंद्रित झाल्या. तिनें डोळे घट्ट मिटले. पण—पण छे; अरविंदाचें समाधान झालें नाहीं. तिचेंहि समाधान झालें नाहीं. तिचें सर्वांग विचलित झालें. डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. ती हताश झाली...."

हा भावनाविष्कार कल्पनेनें उमगणारा नाहीं ! वात्सल्याची भावनाच अशी आहे कीं, जिच्याभोंवतीं स्त्रीच्या जीवनाचे धागेदोरे गुंफलेले असतात. तिच्या रक्ताचा अणुरेणू स्वतःच्या मुलासाठीं खर्ची पडायला आनंदानें तयार झालेला असतो. मूल म्हटलें कीं, कमालीच्या आनंदानें बेहोष होऊन ती त्याच्यासाठीं वाटेल तें करायला तयार झालेली असते आणि त्यामुळेंच " संजीवनी " नें स्वतःच्या मुलाचें " स्वागत " करतांना

" ये गृहाला बाळराणा जीवनाचा माझिया
स्वागताची सिद्धता ना काय अर्पूं मी तया ?
हृदय माझें अंथरोनी घालुं का शय्या मऊ ?
दाटलें वात्सल्य पोटीं पाजुनीया कां शांतवूं ? "

असें वात्सल्याच्या उमाळ्यानें लिहिलेलें काव्य निर्माण केलें आहे.

" वटसावित्री " चें व्रत फक्त स्त्रियाच आचरणांत आणीत असतात. तथापि या व्रताचें माहात्म्य जें " हाच पति जन्मोजन्मीं लाभावा " असें आहे, तें चित्रित करण्याचा अनेक लेखक-लेखिकांनीं आजवर प्रयत्न केलेला आहे. परंपरेनें हिंदु स्त्रीच्या मनावर होणारे संस्कार त्यांनीं प्रतिबिंबित केलेले आहेत. पण आजच्या बदलेल्या काळांत या जुन्या विचारांना हादरा बसेल अशा प्रकारची कल्पना वसुंधरा पटवर्धन यांनीं " कां झालं असं ? " या आपल्या कथेंत मांडलेली आहे. आजची मुलगी स्वतःच्या दृष्टीनें विचार करूं शकते, याची कल्पना विभावरी शिरूरकरांच्या " कळ्यांच्या निःश्वासां " मधून गोविली गेलेली आहे. परंतु या कथेंत त्याहि पलीकडचा असा बंडखोर भावनाविष्कार आहे. स्त्री सुशिक्षित असो अगर अशिक्षित असो, तिला अजूनहि पतीबद्दल पूज्यभाव वाटत असतो. पण त्याबरोबरच एखाद्या मुलीच्या इच्छेविरुद्ध लग्न झालें असेल तर, एखादें शल्य तिच्या मनांत सतत बोचत असतें. त्याच शल्याची चुणूक वसुंधरा पटवर्धन यांनीं कशी दर्शविली आहे पहा:—

" वृक्षराज, आज, शेंकडों वर्षें तूं पहातो आहेस. आणि आम्ही स्त्रिया

कितीतरी वर्षं तुझी पूजा करीत आहोंत. पण खरं सांग, इथं येणाऱ्या सर्व स्त्रिया "जन्मोजन्मीं हाच पति लाभो" अशी तुझी खरीच प्रार्थना करतात काय? तूं वयानं वृद्ध असलास तरी दर वर्षी पिकल्या पानांच्या रूपानं तूं आपली चुकीचीं मतं बदलतोस आणि नव्या, चांगल्या कल्पनांची पालवी आपल्या फांद्यांवर खेळूं देतोस. तुला माझं म्हणणं समजणार नाहीं कां? दिलीपच्या आठवणीनं करपून जाणाऱ्या या दुर्दैवी मुलीच्या अंत:करणाची तुला दया येत नाहीं कां?....इतकीं वर्षं अनुभव घेऊन समंजस, प्रेमळ झालेल्या तुझ्या मनाला माझी प्रार्थना आहे कीं, श्रीमंतांचं चांगलं होऊं दे. पण देवा, पुढल्या जन्मीं दिलीपची, माझ्या आवडत्या दिलीपची राणी होण्याचा आशीर्वाद मला दे"

हा भावनाविष्कार केवळ स्त्रीमनांतूनच बाहेर पडणारा आहे. ज्या भावनेमुळें अंत:करणाला पीळ पडतो, तिची जाणीव इतरांना कल्पनेच्या आधारावर कशी होईल? सहानुभूतीचा पहिला स्पर्श झाल्याशिवाय ललित वाङ्मयाची खरी जोपासना होत नाहीं असें जें समजण्यांत येतें, तें येथें तंतोतंत लागू पडावयास हरकत नाहीं. आणि त्यामुळेंच अशा प्रकारचें हें लेखन, जरी तें अल्प प्रमाणांत असलें तरीसुद्धां, नि:संशय मराठीच्या वैभवशाली भाग्यास हातभार लावणारें असें झालेलें आहे. मराठीला वैभवसंपन्न बनविण्यास या लेखनानें आंतड्यांना पीळ पडेल इतके श्रम घेऊन मदत केलेली आहे. पुरुषांना जें जमलें नाहीं तें लिहून स्त्रियांनीं मराठीचें वैभव या प्रकारें तेजस्वी रीतीनें वाढविलेलें आहे यांत शंका नाहीं.

स्त्रियांनीं जें जें लिहिलें आहे, तें तें प्रामुख्यानें वैयक्तिक भावनेनें लिहिलेलें आहे. स्वत:च्या भावनांचा जेथें योग्य रीतीनें आविष्कार करतां येईल तेथेंच त्यांनीं लेखनाचा प्रयत्न केलेला आहे. सामान्यत: असें दिसून येतें कीं, समाजांतील सांस्कृतिक स्थैर्य टिकविण्याकडेच स्त्रीच्या मनाचा कल विशेष झुकलेला आहे. केवळ वादासाठीं म्हणून वाद घालण्याची तिच्या मनाची तयारीच नाहीं. तिऱ्हाइताची भूमिका घेऊन लेखन करणें तिला जमलेलें दिसत नाहीं. त्यामुळेंच नाट्यलेखनाच्या बाबतींत ती मागें पडलेली दिसून येते. अलीकडे पुष्कळ स्त्रिया उच्च दर्जाचें शिक्षण घेत असतांना दिसत असल्या, तरी त्यांच्या मागचा प्रपंच अजून सुटलेला नाहीं. गृहिणी या नात्यानें अशिक्षित स्त्रीप्रमाणेंच सुशिक्षित स्त्रियांनाहि "घर सांभाळावें लागतें आहे. त्यामुळें घरप्रपंच व मुलें बाळें सांभाळून एक तर त्यांना हवा तितका लेखनाला वेळ मिळत नाहीं; आणि दुसरें म्हणजे अद्यापहि आमच्या स्त्रियांना पुरुषांप्रमाणें जीवनाच्या विविध क्षेत्रांतील अनुभव मिळविण्याची शक्यता समाजामध्यें मिळत नाहीं. पुरुषांना समाजाच्या कोणत्याहि थरांत हव्या त्या जागीं व हव्या त्या वेळीं हव्या त्या माणसांत मिसळण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणें स्वत:च्या लेखनासाठीं म्हणून परप्रांतांत अगर परदेशांतहि मोकळ्या मनानें पुरुषांना प्रवास

करण्याची संधि मिळते. त्यामुळें त्यांचें अवलोकनाचें क्षेत्र व्यापक झालेलें असतें. मोठमोठ्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व इतर चळवळींमधून जातीनें मोठ्या प्रमाणावर भाग घ्यावयाची संधि मिळाल्यामुळें पुरुषांना विविध प्रकारचा अनुभवहि वरचेवर मिळत असतो. त्यामुळें त्यांच्या लेखनांत विषयांचीहि भरपूर विविधता आलेली असते. आणि नेमक्या याच सवलतींचा अभाव स्त्रियांच्या वांट्याला येत असतो ! स्त्री कितीहि शिकली तरी तिला स्त्री म्हणून कांहीं मर्यादा स्वतःभोंवतीं घालून घेणें भाग पडतें. अशा वेळीं चंद्रकला हाटे यांनीं म्हटल्याप्रमाणें :

" मी देखील स्वतः एक स्त्रीच असल्यामुळें केवळ स्त्रीचा जन्म आहे म्हणून येणाऱ्या अडीअडचणींचा अनुभव मीं घेतलेला आहे. "

अशा मनःस्थितींतून स्त्रीजीवनावरील विचार प्रकट करणारे अनेक निबंध स्त्रियांनीं लिहिलेले आहेत, पण त्यापलीकडे बाळूताई खरे, चंद्रकला हाटे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत किंवा गोदावरी केतकर यांच्याखेरीज इतर लेखिकांनीं संशोधनात्मक अगर साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा करणारें लेखन केलेलें फारसें आढळत नाहीं.

स्त्रियांच्या ललित लेखनामध्यें पुरुषांच्या लेखनाच्या मानानें समर प्रसंगाची पेरणी फारच कमी झालेली आहे असें म्हणावें लागेल. घराबाहेरच्या धकाधकीच्या मामल्यांत स्त्रिया म्हणावा तसा भाग घेत नसल्यानें कदाचित् अशा प्रकारचें लेखन करण्याची त्यांच्या मनानें उचल घेतली नसावी ! समर प्रसंगांना स्फोटक द्रव्याप्रमाणें लागणारा विचारांचा दारुगोळा स्त्रियांच्या लेखणीला कांहीं अपवाद सोडले तर पेलणारा दिसत नाहीं. तिच्या मनाची बैठकच तशी नाहीं.

ललित वाङ्मयाच्या विविध शाखांमधून स्त्रियांनीं व पुरुषांनीं निर्माण केलेल्या स्वभावरेखा लक्षांत घेतां एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत येते कीं, पुरुषांनीं पुरुषांच्याच स्वभावरेखा व स्त्रियांनीं स्त्रियांच्याच स्वभावरेखा जास्त आपुलकीनें रंगविलेल्या आहेत. स्वभावलेख तयार करीत असतांना वास्तवता निर्माण करण्यासाठीं आवश्यक ती सर्व प्रकारची माहिती व विशिष्ट व्यक्तींशीं निकटचा येणारा संबंध ही सामुग्री ज्याची त्यालाच जास्ती प्रमाणांत मिळविणें शक्य आहे. स्वानुभवाची पार्श्वभूमि तर प्रत्येकाची प्रत्येकालाच माहीत ! तथापि अपवाद म्हणून प्रा फडक्यांनीं रंगविलेली " इंदुमती " (जादूगार) आणि खांडेकरांची " वत्सला " (दोन ध्रुव) ह्या स्त्रियांच्या स्वाभाविक वाटणाऱ्या अशा स्वभावरेखा म्हणून उल्लेखनीय आहेत. स्त्रीजीवनांचें उत्तम चित्रण या लेखकांनीं या ठिकाणीं केलेलें आहे. तीच गोष्ट आनंदीबाई जयवंतांच्या " उर्मिले " मधील सदानंदाच्या स्वभावरेखेबद्दल म्हणतां येईल. तथापि एकंदरीनें पाहतां स्त्रियांनीं स्त्रियांचेंच स्वभावलेख अधिक चांगले निर्माण केले असून, ते संख्येच्या दृष्टीनेंहि विपुल आहेत.

स्त्रियांची भाषा पुरुषांच्या भाषेपेक्षां बरीच निराळी आहे. पुरुष ज्या प्रकारची भाषा वापरतात ती समजत असतांनाहि कित्येकदां स्त्रिया तिचा वापर करीत नाहींत. याच्या उलट परिस्थिति स्त्रियांच्या भाषेबद्दलची आहे. "जळ्ळं मेलं!" व "इश्य मेलं" अशा प्रकारचे उद्‌गार पुरुषांच्या तोंडून बाहेर पडत नाहींत आणि स्त्रिया सर्रास त्यांचाच वापर करतांना आढळतात! "माही", "पूस", "भादवा" अशीं महिन्यांचीं नावें या पद्धतीनें पुरुषांच्या तोंडून कधींहि बाहेर पडत नाहींत. तसेंच पुष्कळदां असें होतें कीं, "भाषेंतील कांहीं शब्द स्त्रियांना वर्ज्य असतात तर, कांहींवर त्यांनीं बहिष्कार घातलेला असतो. नवऱ्याचें नांव न उच्चारण्याची चाल जगांतील बऱ्याच जातींतील स्त्रीसमाजांत, विशेषत: वन्य समाजांत आहे. लाज, विनय, भीति किंवा कांहीं खुळ्या समजुती यांपैकीं एखाद्या दुसऱ्या कारणांनीं पत्नी पतीचें नांव घेत नाहीं. आपल्याकडील "तिकडे", "स्वारी", "घरांत" वगैरे नवऱ्याबद्दल योजण्यांत येणाऱ्या शब्दांप्रमाणें, नवऱ्याचें नांव न घेणाऱ्या जगांतील इतर बायकाहि असेंच कांहीं विशिष्ट शब्द योजतात; किंबहुना नवऱ्याच्या नांवांतील एखादा वर्ण जर बोलावयाच्या शब्दांत असेल तर, तो वर्ण काढून त्याबद्दल दुसरा वर्ण घालतात. उदाहरणार्थ एखाद्या आफ्रिकन बाईच्या नवऱ्याच्या नांवांत "झ" हा वर्ण असेल तर ती "अमनझी" (= पाणी) असा मूळ शब्द कधींच उच्चारावयाची नाहीं तर "अमनदबी" म्हणेल ? या वर्णांतरामुळें स्त्रियांचे नवीनच शब्द बनून वेगळी बायकी भाषा तयार होत जाते."‡

स्त्री आणि पुरुष यांच्या भाषेंत फरक आढळण्याचें आणखी एक कारण म्हणजे त्यांचा सामाजिक दर्जा होय. याचें मोठें उदाहरण म्हणजे संस्कृत नाटकांतील स्त्रियांच्या तोंडीं घातलेली प्राकृत भाषा! येथें या स्त्रियांना संस्कृत समजतें असें पुरुषांनीं त्यांच्याशीं बोलतांना केलेल्या संस्कृताच्या वापरावरून दिसून येईल. पण असें असतांहि हा जो फरक आढळतो तो प्रामुख्यानें स्त्रींच्या सामाजिक दर्जामुळें निर्माण झालेला आहे. आजच्या काळांतदेखील परकीय भाषेशीं फारसा संबंध न आलेल्या स्त्रीची भाषा आणि पुरुषांची भाषा यांत बराच फरक आढळतो.

"स्त्री पुरुषांच्या मनोरचनेंतच जी विषमता असते तीच पुष्कळ वेळां भाषाभेदालाहि कारणीभूत होते. स्त्री ही जात्याच पुरुषांपेक्षां जास्त पुराणमतवादी व रूढपरंपरेला एकदम न सोडणारी असल्यानें स्त्रीची भाषा प्राचीन परंपरेला धरून असते व ही परंपरा ती आपल्या मुलाबाळांना शिकविते. तसेंच भाषेला सभ्य वळण देण्याचें मोठें अवघड पण अत्यावश्यक कार्यहि स्त्री नकळत बिनबोभाट

‡ चिं. ग. कर्वे, स्त्रीपुरुषांमधील भाषाभेद, गृहलक्ष्मी एप्रिल १९२९.

करीत असते ..सहजसुंदर भाषेचा धडा स्त्रीपासूनच घ्यावा. हृदयस्पर्शी भाषण अकृत्रिमपणें कसें करावयाचें हें तिच्यापासून शिकावें आणि अर्थालंकार, पदलालित्य, प्रास, अनुप्रास वगैरे साहित्य शास्त्र माहीत नसतांहि कार्यक्षम साहित्य निर्माण करण्याची कला तिच्यापासून अवगत करून घ्यावी. "×

" ...तुषार पडतांना शब्द मुळींच होत नाहीं. कोणी उभे राहून बारीक सपीट चाळीत असतां तें जसें हलकेंच जमिनीवर पडतें व तें खालीं पडल्याचा शब्द कोणाला ऐकूं येत नाहीं, त्याप्रमाणें तुषारहि कोणाला नकळत पडतो..." पंडिता रमाबाई यांची ही समर्पक उपमा आणि..." या ज्या सर्वत्र पसरलेल्या चांदण्या आहेत, त्या कांहींतरी युक्ति करून वर जावें, आणि आपल्या साडीच्या ओच्यांत गोळा कराव्या. म्हणजे मग आपल्याला रत्नेंच रत्नें होतील. एकदां वाटे कीं, तीं सगळीं रत्नें गोळा करून एक ढीग करावा, आणखी मग आपल्या मैत्रिणींना गंमत दाखवायला बोलावून सगळ्यांनीं तीं मनःपूत उडवावीं, तीं खूप उंच उंच फेकून सागरगोट्यांसारखीं झेलावीं, त्यांचे सागरगोटे करून या आकाशांतच बसून एकमेकींवर आटक्या लावाव्या..." ही काशीबाई कानिटकरांची विलोभनीय कल्पना स्त्रियांच्या विशिष्ट भाषासरणीला शोभेल अशीच मनोरम आहे. काशीबाईच्या लेखनाचा गुणगौरव करतांना प्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांनीं त्यांना लिहिलेल्या एका पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे कीं,

" ...खरोखर साधेपणांत जी काय मौज आहे ती कशांत नाहीं. अव्याज मनोहरत्व हें कांहीं निराळेंच आहे. त्याची बरोबरी कशासही यावयाची नाहीं. मी आपणास जेन ऑस्टेनची उपमा देतों याचें कारण तरी आपल्या भाषेचें अव्याज मनोहरत्व हेंच होय....माझी तर आज मित्तीला अशी खात्री आहे कीं, "गृहसौख्य" व "सुखकर दरी" हे दोन भाग जसे तुम्हाला साधले आहेत तसे मला कधींहि साधले नसते....जर जुन्या काळच्या प्रेमळ, सुशील अशा पोक्त स्त्रीचें चित्र मला दाखवा असें कोणी म्हणेल तर मी त्यास चटकन् आपली कादंबरी वाच म्हणून सांगेन..." हरिभाऊंचे हे विचार लक्षांत घेतां स्त्रियांनीं घरगुती जीवनाचें क्षेत्र फार उत्तम रीतीनें रंगविलेलें आहे असें दिसून येतें. स्त्रियांच्या लघुकथांसंबंधीं लिहितांना "हृदयशारदे"च्या प्रस्तावांत त्यांच्या स्वानुभवप्रेरित लेखनाला उद्देशून कै. वा. म. जोशी यांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, "लहान मुलींची व बायकांचीं वर्णनें तर बायकांनींच करावींत . असें वाटूं लागलें आहे..."

स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या लेखनाकडे तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें, तर असें दिसून येतें कीं, स्त्रियांचें लेखन हें विषयांच्या दृष्टीनें मर्यादित आहे. तसेंच तें अधिक आत्मनिष्ठ असून वास्तवतेच्या दृष्टीनेंहि सरस आहे. मात्र संख्येच्या मानानें अजून तें बरेंच कमी आहे. आणि त्याचें प्रमुख कारण म्हणजे अजून

× चिं. ग. कर्वे, स्त्रीपुरुषांमधील भाषाभेद, गृहलक्ष्मी एप्रिल १९२९.

स्त्रियांचें शिक्षण पुरुषांच्या मानानें बऱ्याच कमी प्रमाणांत होतें आहे हें होय. हें होय. त्यामुळें मध्यम वर्गांतल्या पांढरपेशा सुशिक्षित स्त्रियांनींच तेवढी लेखणी उचललेली आहे ! अजून जगाच्या प्रगतीच्या दृष्टीनें निद्रावस्थेंत असलेल्या बहुजन समाजांतील कितीतरी स्त्रिया अशिक्षित आहेत. त्यांचें शिक्षण वाढलें, त्यांना आपल्या भावना कागदावर प्रकट करण्याचें सामर्थ्य कमावतां आलें, म्हणजे मग त्यांच्या लेखणींतून बाहेर पडणारें त्या त्या समाजांतील जिवंत वाङ्मय मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होईल. त्यांच्या भोळ्या भाबड्या अंत:करणांतील भाव आज ओव्यांच्या रूपानें त्यांच्या ओठांवर जिवंत संगीत निर्माण करीत आहे. उद्यां त्याच भावनाविष्काराचा स्फोट होऊन त्यांच्या लेखणींतून सुंदर असें अक्षर वाङ्मय निर्माण होईल, अशी आशा करावयास बिलकुल हरकत नाहीं. त्याचप्रमाणें आज नाहीं उद्यां तरी स्त्रियांची लेखणी कुसुमाग्रजांच्या ' मराठी माती ' सारखी वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्राभिमान दाखवूं शकेल, असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण बदलत्या काळांतील आजची स्त्री ही पूर्वींच्या मानानें बरीचशी घराबाहेरच्या क्षेत्रांत गुंतूं लागलेली आहे. तशीच ती स्वातंत्र्याच्या लढ्यांत भाग घेऊन स्वतंत्र राष्ट्राची एक नागरीक म्हणून प्रभावानें विचारहि करूं पहाते आहे. परंतु अद्यापहि क्रांतिकारी विचारांची प्रभावी नोंद स्त्रीच्या लेखणीनें फारशी केलेली नाहीं. त्या दृष्टीनें पुरुषांच्या मानानें स्त्रियांचें लेखन बरेंचसें मागासलेलें असें दिसून येईल ! त्याचप्रमाणें स्त्रियांनीं मराठीच्या विविध दालनांतून बराचसा संचार केलेला असला तरी, पुरुषांनीं मराठी वाङ्मयाचा आढावा घेतांना त्यांच्या लेखनास म्हणावें तसें मानानें वागवलें नसलें तरीहि स्त्रियांचें हें वाङ्मय स्वत:च्या प्रभावानें मराठींत स्थान राखून आहे. तरी पण आहे त्याच स्थितींतील या वाङ्मयाचा आजच्या घटकेपुरताच विचार करावयाचा झाला, तर असें म्हणतां येईल कीं, अनुभवाची धार असलेलें आणि नितांत रमणीय असें घरगुती जीवन दर्शविणारें हें स्त्रियांचें वाङ्मय मराठी सारस्वताचें वैभव खात्रीनें वाढविणारें असेंच आहे. या वाङ्मयास भावनेची अप्रतिम बैठक आहे, विचारांची खोली आहे, भाषेचा मनोहर साज आहे आणि उल्लेखनीय असें स्वतंत्र स्थानहि आहे. ज्ञानदेवांच्या प्रसिद्ध उक्तीप्रमाणें " माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके " असें अभिमानपूर्वक म्हणावयाचें सामर्थ्य खात्रीनें स्त्रियांच्या या लेखनानें कमविलेलें आहे. आज त्याचें अस्तित्व एखाद्या लहानशा निर्झरणीप्रमाणें दिसत असलें, तरी उद्यांच्या महाराष्ट्रांत भव्य सरितापात्राचें स्वरूप त्यास खात्रीनें येईल; आणि स्त्रियांनीं केलेली ही मराठीची साहित्यसेवा आज आहे त्यापेक्षांहि मराठी सारस्वतास अधिक भूषणावह होईल यांत शंका नाहीं.

● ● ●

परिशिष्ट

संदर्भ ग्रंथ

साहित्य शिक्षा	प्रेमचंद
स्त्री समस्या	श्री. मुकुटबिहारी
मराठी साहित्य समालोचन	सरवटे
महाराष्ट्र संत कवयित्री	आजगांवकर
आद्य मराठी कवयित्री	वा. ना. देशपांडे
भास्करभट्ट बोरीकर	डॉ. कोलते
संत काव्य समालोचन	ग्रामोपाध्ये
स्वभाव लेखन	डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
अर्वाचीन मराठी काव्य	रा. श्री. जोग
स्त्रीजीवन	साने गुरुजी
स्त्रीगीतें	कमलाबाई देशपांडे
पांच कथाकार (प्रस्तावना)	वि. स. खांडेकर
जीवनयात्रा	न. चिं. केळकर
आत्मवृत्त	धों. के. कर्वे
विचार सौंदर्य	वा. म. जोशी
मराठी काव्याची प्रभात	अ. ब. कोल्हटकर
मराठी गद्याचा इंग्रजी अवतार	द. वा. पोतदार
धुंधुर्मास	वि. स. खांडेकर
प्रदक्षिणा	
अर्वाचीन मराठी साहित्य	

होळकरशाहींतील ऐतिहासिक स्त्रियांचा पत्रव्यवहार, खंड १२

इतिहास संग्रह–ऐतिहासिक टिपणें–भाग १ व २

The Feminine Characters	Viola Klein
The Way of All Women	M. Esther Harding
Eminent Women Series	Mathilde Blind
Education in Ancient India	Dr. Alteker
Women and Social Injustice	Mahatma Gandhi
Women and Analytical Study	Richard Curle
Some Contemporary Novelists (Women)	R. Brimley Johnson
With no Regrets	Krishna Hathisingh
The Theory of Drama	Allardyce Nicoll
Women in Modern India	Fifteen Papers by Indian Women Writers

☆

परिशिष्ट २

व्यक्तिनामसूची

परिशिष्ट

संदर्भ ग्रंथ

साहित्य शिक्षा	प्रेमचंद
स्त्री समस्या	श्री. मुकुटबिहारी
मराठी साहित्य समालोचन	सरवटे
महाराष्ट्र संत कवयित्री	आजगांवकर
आद्य मराठी कवयित्री	वा. ना. देशपांडे
भास्करभट्ट बोरीकर	डॉ. कोलते
संत काव्य समालोचन	ग्रामोपाध्ये
स्वभाव लेखन	डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
अर्वाचीन मराठी काव्य	रा. श्री. जोग
स्त्रीजीवन	साने गुरुजी
स्त्रीगीतें	कमलाबाई देशपांडे
पांच कथाकार (प्रस्तावना)	वि. स. खांडेकर
जीवनयात्रा	न. चिं. केळकर
आत्मवृत्त	धों. के. कर्वे
विचार सौंदर्य	वा. म. जोशी
मराठी काव्याची प्रभात	अ. ब. कोल्हटकर
मराठी गद्याचा इंग्रजी अवतार	द. वा. पोतदार
धुंधुर्मास	वि. स. खांडेकर
प्रदक्षिणा	
अर्वाचीन मराठी साहित्य	

होळकरशाहींतील ऐतिहासिक स्त्रियांचा पत्रव्यवहार, खंड १२

इतिहास संग्रह–ऐतिहासिक टिपणें–भाग १ व २

The Feminine Characters	Viola Klein
The Way of All Women	M. Esther Harding
Eminent Women Series	Mathilde Blind
Education in Ancient India	Dr. Alteker
Women and Social Injustice	Mahatma Gandhi
Women and Analytical Study	Richard Curle
Some Contemporary Novelists (Women)	R. Brimley Johnson
With no Regrets	Krishna Hathisingh
The Theory of Drama	Allardyce Nicoll
Women in Modern India	Fifteen Papers by Indian Women Writers

☆

परिशिष्ट २

व्यक्तिनामसूची

* * *

परिशिष्ट ३

विषयनामसूची

* * *

आशीर्वाद

" वनिता सारस्वत " या ग्रंथामध्यें मराठी भाषेचा व साहित्याचा विकास करण्याकरितां स्त्रियांनीं कशा प्रकारची मौलिक भर घातली आहे, तिचा मागोवा घेण्यांत आलेला आहे. त्यासाठीं महदंबेपासून सरोजिनीपर्यंत बहुतेक सर्वांच्या लेखनाचा विचार झालेला आहे.

वाङ्मयाचा मूळ विषय हा नाजूक भावनांचा खेळ आहे. तशांत तो स्त्रियांनीं आपल्या नाजूक हातांनीं हाताळला म्हणजे किती नाजूक होत असेल याची कल्पनाच करावी. या संदर्भात ज्ञानेश्वरींतील एक ओवी मला आठवते ती अशीच मोठी नाजूक कल्पना सांगणारी आहे.

" जैसें शारदेचिये चंद्रकळे । माजी अमृतकण कोंवळे
ते वेंचिति मनें मवाळें । चकोर तलगें " ॥

साहित्यनिर्मिति करणाऱ्या रसिकाच्या हळुवार मनोवृत्तीचें वर्णन या ओवींत केलेलें आहे.

स्त्रियांच्या संबंधानें जें जें बोललें जातें तें तें साहित्याच्या कोटीप्रत जाऊं शकतें. तेव्हां अशी ज्यांची मोठी योग्यता आहे, त्यांनीं मराठी शारदेच्या अंगावर चढवलेलें साहित्याचें लेणें हें किती मोलाचें असेल याची कल्पनाच करावी.

मराठी भाषा ही अमृतातेंहि पैजा जिंके अशी आहे. तिचा वापर स्त्रियांनीं मोठ्या रसिकतेनें करून आपल्या वाङ्मयाची निर्मिति केली आहे. त्या वाङ्मयाची धनदौलत एकत्र आणून मराठी शारदेला फार मोलाचा अलंकार सरोजिनीबाईंनीं घातलेला आहे. त्या अधिक विद्वान होवोत व त्यांचे हातून अशीच मराठीची सेवा घडो.

यशवंतराव चव्हाण

[महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री ना. यशवंतरावजी चव्हाण यांनीं पुणें येथें कॉंग्रेस भवनवर ह्या प्रबंधाचें प्रकाशन दि. ९ एप्रिल १९६१ रोजीं केलें, त्यावेळीं त्यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश.]